म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.

# अण्णासाहेब वर्तक

[ व्यक्ति आणि कार्य ]

लेखक

'बाळ'

REFBK-0008574

मूल्य दोन रुपये



# अण्णासाहेब कर्वे



लेखक – बाळ



# अण्णासाहेब वर्तक

[ व्यक्ति आणि कार्य ]

REFBK-0008574

'बाळ'

७८३२५
विभाग ९००३
क्रमांक ७२१०१४५
क्र. क्रं. ८५७८

मूल्य दोन रुपये

पहिली आवृत्ति : १९५५

मुद्रक
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
दी. बा. चुरी
चिटणीस,
अण्णासाहेब वर्तक स्मारक समिति
बोर्डी, जि. ठाणें

# पुरस्कार

श्री. गोविंद धर्माजी ऊर्फ अण्णासाहेब वर्तक ह्यांच्या ह्या चरित्राला पुरस्कारादाखल चार शब्द लिहिणें हें माझें कर्तव्य आहे असें मी मानतों. त्यांच्या मृत्यूमुळें सोमवंशी क्षत्रिय समाजाची फारच मोठी हानि झाली. स्वयंसेवक संघ, परिषद, वगैरे उपायांनीं त्यांनीं ह्या समाजांत प्रचंड चैतन्य निर्माण केलें व त्यामुळें समाजाची चांगलीच प्रगति झाली. ह्या समाजाचेंच नव्हे तर सर्व ठाणें जिल्ह्याचे ते २५–३० वर्षें अप्रतिहत सर्वश्रेष्ठ पुढारी होते. एकही सार्वजनिक कार्य त्यांच्या सल्ल्यावांचून होत नसे. त्यांचा स्वभावही दिलदार, उदार व आनंदी होता. ते जगले असते तर किती तरी आणखी सेवा त्यांनीं केली असती. पण ईश्वरी सूत्र असतें तसेंच होतें.

ह्या चरित्रापासून इतरांना बोध व स्फूर्ति मिळो.

बाळ खेर.

*'अलका', मुंबई २१,*
*५ मे, १९५५*

# भूमिका

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें जीवन म्हणजे ठाणें जिल्ह्यांतील सार्वजनिक जीवनाचा इतिहासच होय. गांधीयुगाला सुरुवात होण्याच्या पूर्वीपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पांच सहा वर्षेपर्यंत सुमारें तेहतीस वर्षे अण्णासाहेब वर्तक हे ठाणें जिल्ह्यांतील सार्वजनिक जीवनांत एक विशेष प्रतिष्ठा बाळगून होते. ह्या तीस पसतीस वर्षांतील काळांत ह्या देशांतील स्वातंत्र्याच्या युद्धाचा शेवटच्या पर्वाचा काळ समाविष्ट होतो. एका दृष्टीनें किंचित असामान्य अशा ह्या कालांत ज्या घटना घडल्या त्या सर्वांचा परिणाम अण्णासाहेब वर्तकांच्या जीवनांत प्रतिबिंबित झाल्याचें दिसून येतें. एखाद्या युगाच्या अगर कालखंडाच्या जीवनाबाबत प्रतिनिधीरूप अशीं कांहीं माणसें असतात. तसेच थोडेसे अण्णासाहेब वर्तक हे ह्या कालखंडाचे प्रतिनिधि होते असें म्हटल्यास तें अयोग्य होणार नाहीं.

१९१५ ते १९२० हा काल भारतांत धामधुमीचा होता. होमरूलची चळवळ भारताप्रमाणें महाराष्ट्रांतही जोरांत होती आणि ह्या खंडांत जी

तरुण मंडळी राजकारणाकडे आकर्षिली गेली त्यांचें जीवनदर्शन कांहीं एक विशिष्ट मूल्यावर आधारलें गेलें. लोकमान्य टिळक ह्यांची देशभक्ति, त्याग, तळमळ व विद्वत्ता हीं सगळीं स्फूर्ति देणारीं द्रव्यें होतीं आणि कै. अण्णासाहेब ह्यांच्या राजकीय जीवनाची ही पार्श्वभूमि होती. निःस्वार्थीपणें पण निर्भीडपणें कार्य करीत राहावयाचें व तेंही निष्कामबुद्धीनें करावयाचें ह्यासाठीं मनाची तात्त्विक भूमिका पक्की असावी लागते. तसेंच वैयक्तिक स्वार्थ व मानसन्मान ह्यांपेक्षां अंगीकारलेलें कार्य हें अधिक महत्त्वाचें मानणारें मन निग्रही व निष्ठावंत असावें लागतें. त्या कालखंडांत जी कांहीं तरुण मंडळी महाराष्ट्राच्या राजकारणांत आली ती ह्या प्रकारच्या निष्ठेनें प्रेरित होऊन आली आणि त्यांत अण्णासाहेब वर्तक हे एक होते. घरची चांगली परिस्थिति असून, सरकारी नोकरी सहज मिळणें कठीण नसतांना जाणूनबुजून देशसेवेचें व्रत अण्णासाहेबांनीं घेतलें होतें.

१९२० मध्यें लोकमान्यांच्या मृत्यूनंतर भारतांत एका नव्या युगाला प्रारंभ झाला. गांधीजींचें तत्त्वज्ञान, त्यांची कार्यप्रणाली ही सर्व नवीन होती. तथापि ती गति कुंठित झालेल्या राजकारणाला चेतना देणारी असल्यामुळें उत्साही व साहसी मंडळींना गांधीजींचें राजकारण एक आकर्षण वाटलें. १९२० ते १९३० पर्यंत महाराष्ट्रांतील राजकारण म्हणजे दोन दृष्टिकोनांतील संघर्ष होता आणि जेव्हां १९३० सालीं सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली त्या वेळीं झंझावातानें मोठमोठे वृक्ष कोलमडून पडावे त्याप्रमाणें अनेक राजकीय विचार उन्मळून पडले. अण्णासाहेबांची अन्तःकरणांतील देशभक्ति व तळमळ ह्यांनीं राजकीय तर्कांना बाजूला सारून भावनांना वाव करून दिला आणि त्याचा परिणाम म्हणजे अण्णासाहेब हे सत्याग्रहाच्या चळवळींत सामील झाले. तथापि त्यांचा मूळचा धीमा स्वभाव, शांत वृत्ति ही त्यांनीं सोडली नाहीं व चळवळीच्या संघटनेच्या कामीं ठाणें जिल्ह्यांत त्यांनीं फारच चांगलें कार्य केलें. राजकीय चळवळीच्या क्षेत्रांत ते जरी त्या वेळीं फार पुढें नसले तरी मागेंही नव्हते. तथापि शेतकऱ्यांची संघटना, लोकल बोर्ड, स्वसमाज संघटना, इत्यादि क्षेत्रांत त्यांनीं भरीव अशी कामगिरी केलेली

आहे. त्यांची प्रवृत्ति विधायक होती आणि ह्या त्यांच्या प्रवृत्तीला ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या कारभारांत पूर्ण वाव मिळाला. एका तपापेक्षां अधिक काल त्यांनीं ह्या क्षेत्रांत काम केलें आणि ज्या कांहीं परंपरा त्या क्षेत्रांत निर्माण केल्या त्या लोकशाहीला भूषणावह अशाच आहेत.

१९४६ सालीं मंत्रिपद मिळाल्यानंतर त्यांनीं केलेलें कार्य हें प्रभावी व भरीव असेंच होतें. त्यांनीं आपल्या कार्यामध्यें एक विशिष्ट पद्धत आणलेली होती. ते आग्रही जरी दिसत नसले, तरी आपल्या मौलिक भूमिकेवरतीं ते स्थिर असत. तडजोड ही राजकारणाचा आत्मा हें ते जाणत. तथापि ऐन सिद्धान्ताला कधींही त्यांनीं धोक्यांत येऊं दिलें नाहीं. विधान सभेंतील त्यांचीं भाषणें अभ्यास व तयारी दर्शवीत; तर जाहीर सभेंतील त्यांचें वक्तृत्व तळमळ व उत्साह ह्यांवर स्वार झालेलें दिसत असे. वैयक्तिक जीवनांत ते अत्यंत साधे व निर्व्यसनी होते. श्रीमंतींतील सुलभ अशी आढ्यता त्यांच्यांत नव्हती. तुरुंगामध्यें त्यांची खोली म्हणजे एक क्लबच होत असे.

लोकशाही युगामध्यें आतां राजकारणाच्या नव्या परंपरा सुरू व्हावयाच्या आहेत आणि त्याबरोबर नवे आदर्श पण आपण निर्माण केले पाहिजेत. लोकांचा कारभार म्हणजे अव्यवस्थित कारभार, लोकांसाठीं कारभार म्हणजे लांचलुचपतीचा, असें होतां कामा नये. सार्वजनिक जीवन हें एका उच्च पातळीवरून चाललें पाहिजे आणि त्या दृष्टीनें विचार करतां अण्णासाहेबांचें हें चरित्र नवीन पिढीला मार्गदर्शक ठरेल असें मला वाटतें.

**न. वि. गाडगीळ**

*नवी दिल्ली, २९-४-५५*

# दोन शब्द

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें हें चरित्र आज वाचकांच्या हातीं देतांना पू. अण्णासाहेब वर्तक स्मारक समितीस आनंद होत आहे. अण्णासाहेबांसंबंधीं स्मारकग्रंथ प्रकाशित करण्याचें काम 'सोमवंशी क्षत्रिय संघा' तर्फे नेमण्यांत आलेल्या ह्या स्मारक समितीकडे सोपविण्यांत आलें होतें. स्मारक समितीनें त्याप्रमाणें अण्णासाहेबांच्या जीवनाशीं संबंध आलेल्या अनेक थोर व्यक्तींना अण्णासाहेबांसंबंधीं आपल्या आठवणी अगर तत्सम मजकूर समितीकडे पाठविण्यासंबंधीं विनंती केली. परंतु मध्यंतरीं केवळ स्मारकग्रंथ प्रसिद्ध न करतां चरित्रात्मक ग्रंथ प्रसिद्ध करण्याची कल्पना निघाली आणि त्याप्रमाणें हें काम प्रस्तुत चरित्राच्या लेखकाकडे सोपविण्यांत आलें. त्याप्रमाणें अगदीं थोडक्या वेळांत त्यानें हें पुस्तक तयार केलें आहे. अण्णासाहेबांनीं विविध क्षेत्रांत बजावलेलें कार्य अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें मुख्यतः त्या कार्याचेंच दिग्दर्शन लेखकानें ह्या पुस्तकांत केलेलें आहे. ह्या दिग्दर्शनाच्या अनुरोधानें अण्णासाहेबांचें जेवढें व्यक्तिदर्शन करतां येईल तेवढेंच करण्याचा लेखकानें

प्रयत्न केला आहे. पुस्तक अल्पावधींत तयार करण्यांत आलेलें असल्या-कारणानें त्यांत अनेक दोष राहून गेले असण्याचा संभव आहे. त्यांकडे वाचकांनीं दुर्लक्ष करावें अशी विनंती आहे.

प्रस्तुत चरित्र लिहून दिल्याबद्दल लेखकाचे समितीतर्फें मी आभार मानतों. त्याचप्रमाणें हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं, श्री. तात्यासाहेब चुरी, कै. मदनराव राऊत, श्री. शामराव पाटील, श्री. भाऊसाहेब वर्तक, श्री. ह. ना. ठाकूर, श्री. बाळासाहेब मोगरे, श्री. वसंतराव मोगरे, श्री. के. वा. व्रह्मे, वगैरे अनेक सद्गृहस्थांचें साह्य झालें आहे. विशेषतः कै. मदनराव राऊत व श्री. भास्करराव राऊत ह्यांच्या साहाय्याचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. कै. मदनराव राऊत ह्यांनीं मोठ्या आत्मीयतेनें चरित्रग्रंथ लिहिण्याच्या कार्यास चालना दिली नसती तर हें चरित्र प्रसिद्ध होऊं शकलें नसतें. आज हें चरित्र प्रसिद्ध होत असतांना ते आपणांत नाहींत ह्याची तीव्रतेनें जाणीव होते. त्याचप्रमाणें श्री. भास्करराव राऊत ह्यांनीं चरित्रग्रंथासाठीं अत्यंत परिश्रमपूर्वक साधनसामुग्री जमविली त्यामुळेंच प्रस्तुत चरित्र तयार होऊं शकलें हें येथें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों. वरील सर्व सद्गृहस्थांचे समितीतर्फें मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

मुंबई राज्याचे माजी मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर ह्यांनीं ह्या चरित्रग्रंथाला पुरस्कार लिहून दिला ह्याबद्दल स्मारक समिति त्यांची आभारी आहे. त्याचप्रमाणें महाराष्ट्राचे थोर पुढारी श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं 'भूमिके' चे चार शब्द लिहिले ह्याबद्दल समितितर्फें त्यांचे मी अन्तःकरणपूर्वक आभार मानतों. त्याचप्रमाणें समितीच्या विनंतीला मान देऊन अण्णासाहेबांच्या स्मृतिग्रंथासाठीं ज्या ज्या सद्गृहस्थांनीं आपले स्मृतिलेख पाठविले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं, अण्णासाहेबांच्या ह्या चरित्रग्रंथाचें वाचक अंतःकरणपूर्वक स्वागत करतील अशी अपेक्षा ठेवून हे दोन शब्द पुरे करतों.

**दीनानाथ बाळकृष्ण चुरी**

चिटणीस, अण्णासाहेब वर्तक स्मारक समिति

*मुंबई, ५ मे, १९५५*

# अनुक्रमणिका


पुरस्कार ( बा. गं. खेर ) तीन

भूमिका ( न. वि. गाडगीळ ) पांच

दोन शब्द ( स्मारक समिति ) नऊ

१. कुल-वृत्तान्त ... १

२. बालपण व व्यक्तित्वाची घडण ६

३. राष्ट्रकार्यांत पदार्पण ... १५

४. असहकार कीं कौन्सिलप्रवेश ? २०

५. संघशक्तिदर्शन ... २९

६. स्थानिक स्वराज्याचा श्रीगणेशा ३८

७. शेतकरी संघटनेचें प्रभावी कार्य ४३

८. धारावाढ आंदोलन ... ५०


९. कर्तबगार अध्यक्ष ... ५८

१०. यशस्वी लढा ... ७०


११. रेल्वेविषयक अडचणींचा परिहार ७३
१२. भातशेतीचे तज्ज्ञ ... ७६
१३. झगड्याचा गोड शेवट ... ८४
१४. स्वातंत्र्यसंग्रामांतील साधना ८८
१५. समाजाचे शिल्पकार ... १००
१६. १९४० चें वादळ ... १०६
१७. मंत्रिमंडळांत आवडीचें खातें ११०
१८. जिल्हा बोर्डांचें आर्थिक संवर्धन १२०
१९. आर्थिक स्वावलंबनाचें धोरण १२९
२०. नव्या मनूंतील लोकशाही कारभार १३५
२१. आदर्श ग्रामराज्याचें स्वप्न १४५
२२. नागरी विकासाचीं प्रगतिपर पावलें १५२
२३. शेतकऱ्यांचे आधारस्तंभ १६८
२४. स्वराज्याचे प्रभावी प्रचारक १७३
२५. अकल्पित निकाल ... १७९
२६. महाप्रयाण ... १८८
२७. स्मशानयात्रा ... १९६
२८. कुटुंब व मित्रपरिवार ... १९८
२९. विविधक्षेत्रांतील कामगिरी २०४
३०. इतर कांहीं गोष्टी ... २१२
३१. अण्णासाहेबांचे व्यक्तिविशेष २२०
३२. श्रद्धांजलि ... २२८
परिशिष्ट २०३

# अण्णासाहेब वर्तक

जन्मांगम्




राश्यंगम्




जन्म

१० ऑक्टोबर १८९४

निधन

१४ जुलै १९५३


## अण्णासाहेबांचें हस्ताक्षर

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

I am crippled representative of crippled people -.

नवीन कोंवळ्या अंकुराची वाढ स्त्रियांनींच करावी.
नवीन कुंकरीच्या माडा, नवीन फुलझाडे, नवीन दुर्वा
स्त्रियांनींच वाढवाव्या. नवीन बाळाला हळुवार हातानीं
त्यांनींच वाढवावे. ~~क्रीया~~ स्त्रिया वाढवतील ते जगेल.
जुन्या/साऱ्या चळवळी स्त्रियांना वाढवू द्या. तरच त्या जगतील
हरिजन चळवळ स्त्रियांत जाऊं दे; कॉंग्रेस, किसान,
कामगार चळवळ, साऱ्या चळवळी स्त्रियांपर्यंत पोंचल्या पाहिजेत्,
स्त्रिया वाढवतील ते जगेल. बाकीचे मरेल. स्त्रियांचा हात म्हण-
जे ~~अमृताचा~~ अमृत हात.

## अण्णासाहेबांचें हस्ताक्षर



नवीन कोंवळ्या अंकुराची वाढ स्त्रियांनीच करावी.
नवीन तुळशीचा माडा, नवीन फुलझाड, नवीन दुर्वा स्त्रियांनीच वाढवाव्या. नवीन बाळाला हळुवार हातानी त्यांनीच वाढवावे. ~~[illegible]~~ स्त्रिया वाढवतील ते जगेल.
जुन्या/सान्या चळवळी स्त्रियांना वाढवू द्या. तरच त्या जगतील.
हरिजन चळवळ स्त्रियांत जाऊं दे; काँग्रेस, किसान, कामगार चळवळ, सर्वच चळवळी स्त्रियांपर्यंत पोंचल्या पाहिजेत.
स्त्रिया वाढवतील ते जगेल. बाकीचे मरेल. स्त्रियांचा हात म्हणजे ~~अमृताचा~~ अमृत हात.

## प्रकरण पहिलें

# कुल-वृत्तान्त

९८३२८ सं. चरि ६०० ९५०५

अण्णासाहेब वर्तक ह्यांचें घराणें मूळचें ठाणें जिल्ह्यांतील माहीम तालुक्यांत ( हल्लींचा पालघर तालुका ) असलेल्या केळवें गांवचें. सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वी अण्णासाहेबांचे पणजोबा गोविंद वर्तक आपला गांव सोडून नशीब काढण्यासाठीं विरार येथें आले आणि कालान्तरानें तेथेंच स्थाइक झाले. विरार येथें आल्यानंतर त्यांनीं आपला चांगलाच जम बसविला व स्वतःची अशी थोडीफार शेती संपादन करून घरदारही केलें. गोविंद वर्तक १८५०च्या सुमारास निपुत्रिक मरण पावले. त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी द्वारकाबाई ह्यांनीं वसई तालुक्यांतील नाळें गांवच्या म्हात्रे कुटुंबांतील आपल्या बहिणीचा मुलगा हिरा ह्याला १८५४ च्या सुमारास दत्तक घेतलें. ह्या दत्तक मुलाचें वय त्या वेळीं चौदा वर्षांचें होतें. पुढें हाच दत्तक मुलगा हिराजी वर्तक ह्या नांवानें वसई तालुक्यांत चांगलाच प्रसिद्धीस आला.

हिराजी वर्तकांनीं आपल्या कर्तृत्वानें चांगला नांवलौकिक मिळविला व आपल्या वडिलार्जित मिळकतींत बरीच भर घातली. त्या काळीं त्यांची

गणना सधन व सुखवस्तु शेतकऱ्यांत केली जात असे. ते स्वतः मेहनती, काटकसरी व शिस्तप्रिय होते. त्यांना लिहितांवाचतां येत नव्हतें, परंतु अंगच्या उपजत हुशारीनें व आपल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनीं शिक्षणाची ही उणीव भरून काढली. त्यांना एकंदर पांच अपत्यें असून त्यांत एक मुलगा व चार मुली होत्या. त्यांच्या ह्या एकुलत्या एक मुलाचें नांव धर्माजी. त्याचा जन्म १८६६ सालीं झाला. हेच अण्णासाहेब वर्तकांचे वडील. धर्माजींच्या वडिलांनीं त्यांच्या शिक्षणाची फार काळजी घेतली. विरारसारख्या खेडेगांवीं जितकें मराठी शिक्षण देतां येण्यासारखें होतें तितकें त्यांनीं त्यांना दिलें. त्या काळीं विरार येथें फक्त मराठी चौथीपर्यंतच शिक्षण मिळे. इंग्रजी शिक्षणाची सोय विरार येथेंच काय परंतु सबंध वसई तालुक्यांतही नसल्यामुळें मराठी चौथीनंतर धर्माजींना आपल्या शिक्षणास रामराम ठोकावा लागला. परंतु स्वभावतःच त्यांचा वाचनाकडे कल असल्यामुळें आपल्या वाचनांत पुढें त्यांनीं चांगलीच भर घातली. त्यांचें हस्ताक्षरही फार सुंदर होतें.

धर्माजींचा पहिला विवाह स. १८७७ मध्यें म्हणजे ते अकरा वर्षांचे असतांना वसईच्या राऊत घराण्यांतील शिवा राऊत ह्यांची कन्या मनीबाई हिच्याशीं झाला. शिवा राऊत हे वसई आगरांतील चांगले सुखवस्तु शेतकरी होते. त्या काळीं सर्वत्र बालविवाहाची पद्धत रूढ असून विवाह समारंभ तीन-तीन चार-चार दिवस चालत असत. धर्माजींच्या ह्या विवाहप्रसंगाची एक मजेदार आठवण येथें नमूद करण्यासारखी आहे. त्यावरून पूर्वीचा काळ आणि आतांचा काळ ह्यांत किती महदंतर पडलें आहे तें चांगलेंच दिसून येतें. विरार व वसई ह्यांतील अंतर जवळ जवळ तेरा मैलांचें. वराची मिरवणूक त्या काळीं एवढ्या दूरच्या ठिकाणींसुद्धा पायीं नेण्यांत येत असे. विरारहून वसईस पोचण्यास ह्या मिरवणुकीस सहज पांच सहा तास लागत. परंतु वरातीबरोबर लहान मुलें आणि स्त्रिया ह्यांना एवढ्या दूर पायीं जाणें साहजिकच शक्य होत नसे. त्यासाठीं बैलगाड्यांची व्यवस्था करावीच लागे. साधारणतः एवढ्या

दूरच्या वरातीबरोबर दहा पंधरा बैलगाड्या असत. एवढ्या बैलगाड्या त्या काळच्या पद्धतीप्रमाणें ग्रामस्थ परस्परांच्या मदतीनें व सहकार्यानें आणीत असत. धर्माजींच्या वरातीबरोबर आलेल्या बैलगाड्यांनीं त्या कालीं उच्चांक गांठला. विरार येथील ग्रामस्थांनीं व शेजारच्या इतर गांवांतील हिराजी वर्तकांच्या मित्रमंडळीनें आणि त्यांच्या कुळांनीं ह्या वरातीबरोबर दीडशें पावणेदोनशें बैलगाड्या आणल्या होत्या! तेवढ्या बैलगाड्या व्याह्यांच्या अंगणांत अगर वाडींत मावणें शक्यच नव्हतें, म्हणून ह्या गाड्यांची व्यवस्था आजूबाजूच्या वाड्यांतून मोठ्या मुष्किलीनें करण्यांत आली. ह्या बैलगाड्यांना जोडलेल्या तीनशें साडेतीनशें बैलांनीं व्याह्यांच्या अंगणांत असलेला सर्व पेंढा दोन-तीन तासांत फस्त करून टाकला! हिराजींचे व्याही–शिवा राऊत हेही कांहीं कमी बाणेदार नव्हते. परत वरातीच्या वेळीं त्यांनींही आपल्या ग्रामस्थ व इतर स्नेही मंडळीच्या मदतीनें मोठ्या ईर्षेनें सुमारें दोनशें गाड्या विरार येथें नेल्या व आपल्या व्याह्यांवर मात केली.

धर्माजींना आपल्या पहिल्या पत्नीपासून फक्त एक कन्या झाली. परंतु ह्या विवाहापासून त्यांना पुत्रप्राप्ति न झाल्याकारणानें आपल्या वडिलांच्या इच्छेखातर त्यांनीं दुसरा विवाह केला. हा विवाह विरार येथील हरि पिलाजी चौधरी ह्यांची कन्या पद्माबाई हिच्याशीं १८८९ सालीं झाला. पद्माबाईपासून धर्माजींना दोन अपत्यें झालीं. एक मुलगा गोविंद म्हणजे आपले चरित्रनायक अण्णासाहेब व एक कन्या भिमाबाई. नातू झाला म्हणून हिराजींना फार आनंद झाला आणि त्या आनंदाच्या भरांतच त्यांनीं आपल्या नातवाला आपल्या वडिलांचें 'गोविंद' हें नांव ठेविलें.

अण्णासाहेबांचे वडील धर्माजी हे साधारणपणें मध्यम उंचीचे व मजबूत बांध्याचे गृहस्थ होते. आपल्या वडिलांसारखेच ते व्यवहारचतुर परंतु अधिक दिलदार व धार्मिक वृत्तीचे होते. त्यांची धार्मिक वृत्ति त्यांच्या धर्माजी ह्या नांवाला साजेशीच होती. दररोज सकाळीं शुचिर्भूत होऊन

नियमितपणें ते पूजा-अर्चा करीत. चातुर्मासांत त्यांच्या घरीं निरनिराळ्या धार्मिक ग्रंथांचें पठण आणि पारायण होत असे. अनेक धार्मिक ग्रंथांचें त्यांनीं श्रद्धापूर्वक वाचन व मनन केलें होतें. त्यांचा उदारपणाही धर्मराजासारखाच होता. पैशाच्या व्यवहाराबाबत अनेक प्रसंगीं माणसाची कठोर बुद्धि जागृत होते. अशा वेळीं माणसाची माणुसकी कसोटीला लागते. व्यवहार पाहूं लागल्यानंतर धर्माजींवर एक मोठा चमत्कारिक प्रसंग आला. हिराजींच्या नाळें येथील मूळच्या म्हात्रे घराण्यांतल्या एका बंधूकडे कर्जाऊ रकमेची बाकी बरेच दिवस थकली होती. थकबाकी वसूल होण्याची इतर कांहींच शक्यता नसल्या-कारणानें नाइलाजानें हिराजी वर्तकांना कोर्टदरबार करून हुकूमनाम्याचा अवलंब करावा लागला. हा हुकूमनामा बजावण्याची कामगिरी त्यांनीं आपल्या मुलाकडे – धर्माजींकडे – सोपविली. वडिलांची शिस्त कडक असल्यामुळें त्यांची आज्ञा अमान्य करणें त्यांना शक्यच नव्हतें. परंतु त्यांच्यासारख्या सहृदय तरुणाला हुकूमनाम्याच्या बजावणीसाठीं आपल्या एका जवळच्या आप्ताकडे अशा तऱ्हेनें जप्ती नेणें कसें जमणार ? इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची स्थिति झाली. पण ह्या पेचप्रसंगांतून मोठ्या युक्तीनें त्यांनीं मार्ग काढला. त्यांनीं हुकूमनाम्याची बजावणी न करतां आपलाच कांहीं जंगम माल गाडींत भरून आणला आणि तो माल जप्तीचा असल्याचें आपल्या वडिलांना सांगून ह्या विचित्र प्रसंगांतून आपली सुटका करून घेतली !

धर्माजी वयांत आल्यावर, आपल्या संसाराचा भार त्यांच्या वडिलांनीं हळूहळू त्यांच्यावर सोंपविला, परंतु आपल्या कुटुंबापुरतीच पाहाण्याइतकी धर्माजींची वृत्ति संकुचित नव्हती. आपल्या गांवाबाबत आपलें कांहींतरी कर्तव्य आहे ह्याची त्यांना चांगली जाणीव होती. शेजाऱ्यांचीं भांडणें मिटविणें, ग्रामस्थांचें आपापसांतील वैमनस्य नाहींसें करणें, ह्यांसारख्या समाजसेवेच्या कार्यांत ते आपल्या तरुणपणींच लक्ष घालूं लागले होते. आपल्यामुळें दुसऱ्यांचें भलें होण्याची संधि आल्यास ते ती कधीं

वायां जाऊं देत नसत. असें म्हणतात कीं विरार येथील वर्तक व चौधरी ह्या घराण्यांत बराच काळ असलेलें वैमनस्य नाहींसें व्हावें म्हणून ज्या वेळीं त्यांच्या वडिलांनीं आपला वंशवेल चालू ठेवण्यासाठीं दुसरा विवाह करण्याचा त्यांना आग्रह केला, त्या वेळीं त्यांनीं चौधरी घराण्यांतीलच एका मुलीबरोबर आपला दुसरा विवाह केला.

हळूहळू धर्माजींचें कार्यक्षेत्र वाढूं लागलें. सधन व सुखवस्तु शेतकरी घराण्यांतील एकुलता एक मुलगा म्हणून तरुण वयांतही त्यांना प्रतिष्ठा मिळाली होती. तींत त्यांनीं आपल्या अंगीं असलेल्या सौजन्य, औदार्य, सहिष्णुता, इत्यादि अनेक गुणांनीं भर घातली. १८९५ सालीं ते वसई तालुका लोकलबोर्डाचे सभासद झाले. त्या वेळीं त्यांचें वय अवघें एकोणतीस वर्षांचें होतें. एवढ्या लहान वयांत वडील हयात असतांना अशा तऱ्हेनें मानमान्यता मिळाल्याचीं उदाहरणें त्या काळीं क्वचितच दिसून येत. आपल्या अंगच्या गुणांनीं धर्माजींनीं लोकांच्या अंतःकरणांत मानाचें व आदराचें स्थान मिळविलें होतें. तालुका लोकलबोर्डाचे सभासद म्हणून सार्वजनिक कार्याचें अधिक व्यापक क्षेत्र त्यांना खुलें झालें होतें. परंतु विधिघटना कांहीं निराळीच होती. ऐन तारुण्यांत, वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी धर्माजी काळपुळीच्या आजारानें मृत्यु पावले. धर्माजींच्या मृत्यूमुळें त्यांच्या वृद्ध वडिलांची व त्यांच्या कुटुंबाची स्थिति आकाश फाटल्यासारखी झाली. अण्णासाहेबांचें वय त्या वेळीं अवघें तीन वर्षांचें होतें.

प्रकरण दुसरें

# बालपण व व्यक्तित्वाची घडण

धर्माजींच्या अकाली निधनानें हिराजी वर्तकांवर दुःखाचा डोंगरच कोसळला. एखाद्या भव्य इमारतीवर अचानकपणें वीज पडल्यामुळें ती इमारतच कोसळून पडावी तशी त्यांची स्थिति झाली. आपल्या चिरंजिवावर संसाराची सर्व जबाबदारी सोपवून वानप्रस्थाश्रमाच्या मार्गावर नुकतेंच त्यांनीं पाऊल टाकलें होतें, तोंच संसाराचा सर्व भार पुन्हा आपल्या शिरावर घेणें त्यांना प्राप्त झालें. आपल्या एकुलत्या एक मुलाला ऐन तारुण्यांत मृत्यु यावा व त्याच्या एकुलत्या एक मुलाला वाढविण्याची जबाबदारी म्हातारपणीं आपल्या शिरावर पडावी ह्यापेक्षां अधिक दारुण व विलक्षण घटना एखाद्या वृद्धाच्या आयुष्यांत दुसरी कोठली असूं शकेल ? परंतु आलेल्या प्रसंगाला हिराजींनीं मोठ्या धैर्यानें तोंड दिलें आणि आपला संसारशकट सांवरून धरून प्राप्त परिस्थितींत आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें पार पाडलें.

त्यांच्यावर मोठ्यांत मोठी जबाबदारी अण्णासाहेबांच्या संगोपनाची होती. अण्णासाहेबांतच आतां त्यांचें सारें जग सामावलें होतें. आपला

एकुलता एक नातू हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव आधार होता आणि ह्याच आशातंतूच्या आधारानें त्यांचा वंशवेल फुलणार होता. एकुलत्या एक मुलाच्या जीवनांत लहानपणीं अनेक धोके निर्माण होण्याचा संभव असतो. परंतु अशा सर्व धोक्यांपासून हिराजींनीं अण्णासाहेबांना दूर ठेवलें. अण्णासाहेबांना त्यांनीं कुसंगतीचा संपर्क लागूं दिला नाहीं; त्याचप्रमाणें त्यांचे त्यांनीं फाजील लाडही केले नाहींत. अण्णासाहेबांवर साहजिकच त्यांचें फार प्रेम होतें व ते त्यांना आपणांपासून फार दूर फिरकूं देत नसत. अण्णासाहेबांच्या बाबतींतला त्यांचा हळुवारपणा कांहीं कांहीं वेळां अगदीं पराकोटीला जात असे. अण्णासाहेब चार वर्षांचे असतांना एकदा खेळतां खेळतां सहज खालीं पडले व त्यांच्या डोक्यास जखम होऊन तिच्यांतून घळघळां रक्त वाहूं लागलें. हें पाहून अण्णासाहेबांचे आजोबा स्वतःच रडूं लागले. हिराजींच्या सभोवतीं जी विशिष्ट परिस्थिति निर्माण झाली होती तिच्यामुळेंच पूर्वीचें त्यांचें शिस्तप्रिय मन आतां इतकें हळुवार बनलें होतें.

एकुलता एक नातू म्हणून अण्णासाहेबांच्या शिक्षणाबाबत हेळसांड होण्याचा मोठाच धोका होता. त्या काळीं शिक्षणाची मातबरीही फारशी वाटत नसे. हिराजी वर्तकांसारख्या सुखवस्तु व सधन शेतकरी कुटुंबांतल्या मुलाच्या बाबतींत तर ती वाटण्याचें मुळींच कारण नव्हतें. परंतु अण्णासाहेबांच्या आजोबांना, ते स्वतः निरक्षर असले तरी, शिक्षणाची महति पटलेली होती. त्यांनीं अण्णासाहेबांना वयाच्या चौथ्या वर्षींच म्हणजे सन १८९८ मध्यें विरार येथील मराठी शाळेंत शिक्षणासाठीं दाखल केलें. परंतु बालवयामुळें अण्णासाहेब शाळेंत वक्तशीरपणें गेले नसावेत. सन १९०० पासून मात्र ते नियमितपणें शाळेंत जाऊं लागले. घरीं त्यांना शिकविण्यासाठीं एका शिक्षकाचीही योजना करण्यांत आली होती. विरार येथील श्री. रघुनाथ रामचंद्र चौधरी हे अण्णासाहेबांचे मराठी शाळेंतील वर्गशिक्षक होते. ते अद्यापि हयात आहेत. अण्णासाहेब शाळेंतील एक हुशार विद्यार्थी होते, ते फारसा हूडपणा करीत नसत

व आजोबांच्या शिकवणीवरून वर्गांतील इतर मुलांत फारसे मिसळत नसत अशी अण्णासाहेबांसंबंधींची त्या वेळची ते आपली आठवण सांगतात.

त्या काळीं सर्वसाधारणपणें एक दोन वर्षांआड विरार येथें प्लेगची साथ उद्भवत असे. साथ आली म्हणजे गांवांतील सर्व मंडळी आपलीं घरें सोडून गांवाबाहेर राहावयास जात. अण्णासाहेबांना अशा वेळीं त्यांच्या वसई येथील आजोळीं म्हणजे सावत्र आईच्या माहेरीं राउतांकडे पाठविण्यांत येई. त्यांच्या सावत्र आईचें नांव मनीबाई. सापत्नपणाचा पूर्ण अभाव असलेली ती एक पुण्यशील बाई होती. अण्णासाहेबांस तिनें अगदीं आपल्या स्वतःच्या मुलाप्रमाणें वागविलें. तिच्या समवेत दरवर्षी कांहीं महिने ते वसईस राहात असत. अशा प्रकारें वसईस घालविलेल्या काळाच्या रम्य आठवणी अण्णासाहेब तल्लीन होऊन, आपल्या प्रसादपूर्ण भाषेंत पुढें अनेक वेळां सांगत असत.

विरार येथील मराठी शाळेंतून १९०६ सालीं अण्णासाहेब मराठी पांचवी इयत्ता पास झाले. परंतु पुढील शिक्षणाची सोय विरार येथें नसल्यामुळें आणि शिक्षणासाठीं त्यांना बाहेरगांवीं पाठविण्यास त्यांच्या आजोबांची तयारी नसल्याकारणानें, त्यांना आपलें शिक्षण सोडणें भाग पडलें. ह्यापुढील तीन-चार वर्षें अण्णासाहेबांना घरींच काढावीं लागलीं. शिक्षण बंद पडलें तरी अण्णासाहेबांची शिक्षणलालसा मुळींच कमी झाली नव्हती. पुढें अनुकूल संधि प्राप्त होतांच आपलें मधेंच खंड पडलेलें शिक्षण त्यांनीं चिकाटीनें पुन्हा सुरू केलें.

दरम्यान त्या काळीं रूढ असलेल्या बालविवाह-पद्धतीप्रमाणें अण्णासाहेबांचा विवाह मथाणें येथील सुकड्या पाटील ह्यांची कन्या अन्नपूर्णा हिच्याशीं ता. १४-३-१९०५ रोजीं झाला. त्या वेळीं अण्णासाहेबांचें वय फक्त अकरा वर्षांचें होतें.

अण्णासाहेबांचे आजोबा आतां वृद्धापकाळामुळें बरेच थकलेले होते. नातवाच्या संसाराचा सुखसोहळा पाहाण्यास ते फार दिवस जगले नाहींत.

१९०७ सालीं म्हणजे अण्णासाहेब तेरा वर्षांचे असतांना ते मृत्यु पावले. घरांत दुसरा कर्तासवरता पुरुष नसल्यामुळें, त्यापुढील वर्तक कुटुंबाचा सर्व व्यवहार कुटुंबाचे पूर्वीपासूनचे कारभारी नारायणराव ठाकूर ह्यांनींच पाहिला. नारायणराव ठाकूर हे बालपणापासून वर्तक कुटुंबांतच वाढले होते. ह्यापूर्वीच दहा-बारा वर्षें ते वर्तक कुटुंबाच्या व्यवहारांत अण्णासाहेबांच्या आजोबांना मदत करीत असत. ते चांगले व्यवहारदक्ष व अत्यंत प्रामाणिक असे गृहस्थ होते. अण्णासाहेब पुढें पदवीधर होऊन स्वतःच कुटुंबाचा सर्व व्यवहार पाहूं लागल्यावर ते ह्या जबाबदारींतून मुक्त झाले.

अण्णासाहेबांच्या आजोबांप्रमाणेंच त्यांच्या मातुश्रींनीं अण्णासाहेबांच्या लहानपणीं त्यांची फार काळजी घेतली. अण्णासाहेबांच्या मातुश्रींचें नांव पद्मावाई. पद्मावाई अत्यंत विचारी, कर्तृत्ववान् व व्यवहारदक्ष होत्या. तरुणपणींच वैधव्याची कुन्हाड कोसळली असतांही डगमगून न जातां त्यांनीं अण्णासाहेबांना उत्तम प्रकारची शिस्त लावली. आपला मुलगा चारित्र्यवान् व शीलसंपन्न व्हावा म्हणून त्यांनीं फार दक्षता घेतली. आपण मोठे सधन असून इतरांपेक्षां निराळे आहोंत अशा प्रकारची भावना अण्णासाहेबांच्या मनांत त्यांनीं कधींही निर्माण होऊं दिली नाहीं. दुसऱ्याच्या नेहमीं उपयोगी पडण्याचा अण्णासाहेबांत असलेला गुण त्यांच्या मातुश्रींकडूनच त्यांच्यांत आला होता. विरार गांवांत पद्मावाईंच्या शब्दाला फार मान असे. गांवांतील भांडण-तंटे आपला शब्द खर्चे करून त्या नेहमीं मिटवीत असत. घरीं कितीही पाहुणे आले अगर कितीही कुळें जेवावयास असलीं तरी त्या कधीं त्रासून जात नसत. दिवसभर त्यांच्या कामाचा रगाडा चालू असे. त्या हयात असेतोंपर्यंत अण्णासाहेबांना घरांतलें कांहीं बघावें लागलें नाहीं. त्या १९२९ सालीं निधन पावल्या. अण्णासाहेबांच्या आयुष्यांत त्यांना मोठें स्थान आहे. पुढील आयुष्यांत अण्णासाहेबाना मिळालेल्या यशाचें बरेंचसें श्रेय ते आपल्या मातुश्रींच्या शिकवणुकीला देत असत.

आपण शिकावें व मोठें व्हावें अशी लहानपणापासून अण्णासाहेबांची प्रबल इच्छा. परंतु विरार येथें पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळें व योग्य मार्गदर्शनाच्या अभावीं, आजोबांच्या मृत्यूनंतरचा कांहीं काळ अण्णासाहेबांना मानसिकदृष्ट्या एक प्रकारच्या किंकर्तव्यमूढ स्थितींत घालवावा लागला. आजोबांच्या मृत्यूनंतर, अण्णासाहेब एका मोठ्या इस्टेटीचे धनी झाले होते. पैशाची त्यांना वाण नव्हती. मन चाहील तें ते करूं शकत होते. आजूबाजूची परिस्थिति अशी होती कीं अण्णासाहेबांपेक्षां कमी मनोनिग्रहाचा दुसरा एखादा तरुण त्यांच्या ठिकाणीं असता तर तो सहज अनिष्ट मार्गाकडे वळला असता. अण्णासाहेबांच्या आयुष्यांतील हा अत्यंत आणीबाणीचा काळ होता. त्यांच्या चारित्र्याची व व्यक्तित्त्वाची जणूं ह्या काळांत घडण घडत होती. त्यांचा जीवनप्रवाह खडकाळ भागांतून आपला मार्ग काढीत होता. अण्णासाहेब ह्या काळांत सर्व मोहांपासून दूर राहिले एवढेंच नव्हे तर संधि प्राप्त होतांच स्वयंप्रेरणेनें त्यांनीं आपल्या शिक्षणास पुन्हा सुरुवात केली. अण्णासाहेबांच्या मोठेपणाचें व त्यांच्या भावी आयुष्यांतील उत्कर्षाचें बीज, त्यांनीं ज्या चारित्र्यबळाच्या जोरावर ह्या चमत्कारिक परिस्थितींतून आपल्या उन्नतीचा मार्ग शोधून काढला त्या चारित्र्यबळांतच होतें ह्यांत शंका नाहीं.

सुदैवानें ह्याच वेळीं श्री. सुळे नांवाच्या शिक्षकांशीं त्यांची गांठ पडली. हा योग अगदीं अकल्पितपणें घडून आला. सुळे मास्तरांचे वडील बंधु श्री. रामभाऊ सुळे हे उंबरगांव येथें तलाठी होते. त्यांची त्याच वेळीं विरार येथें बदली झाल्याकारणानें त्यांच्या कुटुंबांतील सर्व मंडळी विरार येथें राहावयास आली. ह्या मंडळींत सुळे मास्तरही होते. ते त्या वेळीं आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत शिक्षक होते. पुढें ते विल्सन हायस्कूलमध्यें गेले. श्री. सुळे मास्तर विरार येथें राहावयास आल्यानंतर थोडक्याच दिवसांत अण्णासाहेबांची त्यांच्याशीं ओळख झाली. ह्या ओळखीनंतर शिक्षणाबद्दलची अण्णासाहेबांची आकांक्षा पुन्हा जागृत झाली आणि सुळे मास्तर ह्यांच्या विरार येथील वास्तव्याचा

फायदा घेण्याचें त्यांनीं ठरविलें. अण्णासाहेबांचें वय ह्या वेळीं सुमारें चौदा-पंधरा वर्षांचें असावें. वय बरेंच झाल्यामुळें मुंबईस शाळेंत जाऊन इंग्रजी पहिल्या इयत्तेपासून पुन्हा शिक्षण सुरू करणें अण्णासाहेबांना प्रशस्त वाटलें नाहीं ; म्हणून श्री. सुळे मास्तरांची खाजगी शिकवणी ठेवून त्यांनीं इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. अण्णासाहेब बुद्धीनें इतके तरतरीत होते कीं पहिल्या सहा महिन्यांतच त्यांनीं तीन इयत्ता पुऱ्या केल्या व मुंबईस विल्सन हायस्कूलमध्यें ते चौथ्या इयत्तेंत दाखल झाले. श्री. सुळे मास्तरांसारखे हुशार व मेहनती शिक्षक लाभल्यामुळेंच अण्णासाहेब अशा तऱ्हेचें असाधारण यश मिळवूं शकले. अण्णासाहेबही आपल्या गुरुजींना कधींही विसरले नाहींत आणि पुढील आयुष्यांत अण्णासाहेबांनीं त्यांना मोठ्या आदरानें वागविलें.

विल्सन हायस्कूलमध्यें नांव दाखल केल्यानंतर अण्णासाहेब मुंबईस श्री. नीळकंठराव बाळकृष्ण नाईक ह्यांच्या बिऱ्हाडीं राहावयास गेले. श्री. नीळकंठराव नाईक ह्यांचे वडील बाळकृष्णपंत हे त्या काळचे प्रसिद्ध वैद्य होते. त्यांचा अण्णासाहेबांच्या घराण्याशीं फार जिव्हाळ्याचा संबंध होता. श्री. नीळकंठराव नाईक त्या वेळीं गिरगांवांत सदाशिव क्रॉस लेनमधील महंमदी बिल्डिंगमध्यें राहात असत. त्यानंतर श्री. नाईक बनाम हॉल लेनमध्यें राहूं लागले. अण्णासाहेबांचा मध्येंच खंडित झालेला शिक्षणप्रवाह अशा प्रकारें पुन्हा सुरळीत चालू झाला. पुढें यथाक्रम अण्णासाहेब ब्रॅडले नाईट हायस्कूलमधून १९१४ सालीं मॅट्रिकची परीक्षा उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले.

ह्या वेळची श्री. सुळे मास्तर ह्यांनीं अण्णासाहेबांसंबंधीं सांगितलेली एक मजेदार आठवण येथें नमूद करण्यासारखी आहे. श्री. सुळे मास्तर अद्यापि हयात आहेत. अण्णासाहेब मॅट्रिक झाले त्या वेळीं ते अंधेरी-जवळच्या वेसावें गांवीं राहात असत. आपलें नांव उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या यादीमध्यें पाहातांच अण्णासाहेबांना फार आनंद झाला आणि त्या



9623 ... 321

आनंदाच्या भरांतच ते आपल्या गुरुजींना भेटण्यासाठीं वेसाव्यास गेले. परंतु श्री. सुळे ह्यांची भेट न झाल्याकारणानें अण्णासाहेबांनीं एक बंद पाकीट त्यांच्या मातुश्रींजवळ दिलें आणि 'मास्तर घरीं आले म्हणजे त्यांना हें पाकीट द्या' असें त्यांना सांगितलें. त्या बंद पाकिटांत आपण उत्तीर्ण झाल्याबद्दलची एक लहानशी चिठ्ठी अण्णासाहेबांनीं आपल्या गुरुजींना लिहिली होती आणि त्या चिठ्ठीबरोबरच आपल्या गुरुजींना दोनशें रुपयांची रक्कम गुरुदक्षिणा म्हणून ठेविली होती! श्री. सुळे मास्तर ह्यांना ती चिठ्ठी व रक्कम पाहून गहिंवरून आलें.

मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अण्णासाहेबांना तावडतोब आपलें नांव कॉलेजमध्यें दाखल करतां आलें नाहीं. सन १९१५ सालीं मुंबई विश्वविद्यालयानें आपला वर्षारंभ बदलला. १९१५ पूर्वीं विश्वविद्यालयाच्या निरनिराळ्या परीक्षांचे निकाल डिसेंबरमध्यें लागत असत आणि त्यानंतर जानेवारीपासून कॉलेजची नवी टर्म सुरू होई. परंतु १९१५ पासून मुंबई विश्वविद्यालयानें आपला वर्षारंभ जूनपासून केल्यामुळें १९१४ डिसेंबरपासून १९१५ मे पर्यंतचा सहा महिन्यांचा काळ अण्णासाहेबांना घरींच बसून काढावा लागला. १९१५ सालीं अण्णासाहेबांनीं सेंट झेविअर्स कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल केलें. परंतु झेविअर्स कॉलेजला जाणें-येणें त्यांना सोयीचें न वाटल्याकारणानें आणि त्यांचे अनेक मित्र विल्सन कॉलेजमध्यें गेल्यामुळें इंटरच्या वर्गांत असतांना अण्णासाहेबांनीं आपलें कॉलेज बदललें व ते विल्सन कॉलेज-मध्यें जाऊं लागले. विल्सन कॉलेजमध्यें गेल्यानंतर त्यांची श्री. ज. वि. ऊर्फ बाळासाहेब मोगरे व श्री. शांतारामभाऊ मोगरे ह्यांच्याशीं ओळख झाली व पुढें लवकरच ते त्यांचे जिवलग स्नेही बनले. त्यांचा व अण्णासाहेबांचा स्नेह अकृत्रिम होता व तो अखेरपर्यंत तसाच टिकला.

अण्णासाहेब बनाम हॉल लेनमध्यें राहावयास आल्यानंतर आपल्या मित्रमंडळीचा 'आर्य यंग मेन्स क्लब' ह्या नांवाचा छोटासा क्लब त्यांनीं

काढला. करमणूक व सहली हें ह्या क्लबाचें उद्दिष्ट होतें. क्लबाच्या सभासदांची संख्या मर्यादित ठेवण्यांत आली होती. नीळकंठराव नाईक पांडुरंगराव नाईक, गजाननराव पाटील, वासुदेवराव आचार्य व अण्णासाहेब हे ह्या क्लबाचे आरंभींचे सभासद होते. फावल्या वेळांत ही मंडळी एकत्र जमून चर्चा, गप्पागोष्टी, पत्ते, वगैरे रूपानें आपला वेळ घालवीत असत. दरवर्षी एखाद्या सहलीचा कार्यक्रमही ह्या क्लबामार्फत आंखला जाई. अण्णासाहेब कॉलेजमध्यें असेतोंपर्यंत ह्या क्लबामार्फत माथेरान, महाबळेश्वर, सिंहगड, वगैरे ठिकाणांच्या सहली काढण्यांत आल्या होत्या. अण्णासाहेब हे ह्या क्लबाचे खजिनदार होते. त्यांनीं कॉलेज सोडल्यानंतर हा क्लब बंद पडला.

अण्णासाहेबांना स्मरणशक्तीची उत्तम देणगी होती. कॉलेजमध्यें असतांना प्राध्यापकांच्या व्याख्यानांचीं ते विशेष टिपणें घेत नसत. वर्गांत झालेल्या विषयासंबंधीं आपल्या मित्रांबरोबर चर्चा करण्याची त्यांची पद्धत असे. ह्या पद्धतीमुळें त्यांचा विषय पक्का होत असे व त्यांच्या मित्रांनाही अनायासें त्यांच्या अभ्यासांत अण्णासाहेबांकडून मदत होई. बी. ए. च्या वर्गांत असतांना अभ्यासासाठीं त्यांनीं कांदेवाडीमध्यें एक स्वतंत्र खोली घेतली होती. ह्या खोलींतच अभ्यासासंबंधीं चर्चा चालत असे. बी. ए. च्या परीक्षेसाठीं अण्णासाहेबांनीं संस्कृत व इंग्रजी हे विषय घेतले होते. त्यांना संस्कृत विषयाची विशेष आवड होती. बी. ए. च्या वर्गांत असतांना तुळपुळे, वालावलकर, रांगणेकर, कावळे, वगैरे अनेक सहाध्यायांशीं त्यांची मैत्री झाली. ह्याच वेळीं त्यांना पान खाण्याची सवय लागली. पान व चहा ह्यांशिवाय त्यांना दुसरें कसलेंही व्यसन नव्हतें. प्रचलित राजकारणासंबंधीं चर्चा करण्याची मात्र त्यांना फार आवड होती. किंबहुना राजकारणाकडे असलेला त्यांचा ओढा ह्याच काळांत स्पष्टपणें दिसून आला. कॉलेजमध्यें असतांना राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या व्याख्यानांस ते न चुकतां हजर राहात असत. विशेषतः लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर,

वगैरे पुढाऱ्यांचीं व्याख्यानें त्यांनीं कधींच चुकविलीं नाहींत. कॉलेजमध्यें असतांनाच त्यांनीं स्वदेशीचें व्रत घेतलें व स्वदेशीचा पुरस्कार केला. स्वदेशीचें हें व्रत त्यांनीं आमरण पाळलें.

१९१९ सालीं विल्सन कॉलेजमधून संस्कृत व इंग्रजी हे विषय घेऊन अण्णासाहेब बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले व त्यानंतर कायद्याच्या अभ्यासासाठीं त्यांनीं लॉ कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल केलें.

प्रकरण तिसरें

# राष्ट्रकार्यांत पदार्पण

अण्णासाहेबांनीं कायद्याच्या अभ्यासासाठीं लॉ कॉलेजमध्यें नांव दाखल केलें खरें, परंतु विधात्याच्या मनांत निराळेंच होतें. कॉलेजमध्यें असतांनाच अण्णासाहेब राजकारणाकडे आकृष्ट होऊं लागले होते. १९१४ ते १९२० हा सहा वर्षांचा काल भारताच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा होता. १९१४ सालीं लोकमान्य टिळक मंडाले येथील आपलें सहा वर्षांचें अग्निदिव्य संपवून परत आले होते. देशासाठीं लोकमान्यांनीं अनंत कष्ट भोगले होते आणि अतुलनीय स्वार्थत्याग केला होता. त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वानें सारा देश भारून गेला होता. आपल्या राजकीय आकांक्षा निर्भयपणें व्यक्त करण्यास देशाला त्यांनींच प्रथम शिकविलें. त्यांच्या लढाऊ राजकारणामुळें, अर्ज-विनंत्यांचा मार्ग मागें पडून देशाच्या राजकारणांत कणखरपणा आला. त्यांच्या धडाडीच्या नेतृत्वामुळें राष्ट्रांत नवचैतन्य खेळूं लागलें व देशाच्या राजकारणाला नवीन वळण लागलें. त्यांच्या जहाल राजकीय विचार-सरणीमुळें " हिंदुस्थानांतील अशांततेचे जनक " अशी संज्ञा त्यांना प्राप्त

झाली होती. लोकमान्यांनीं देशांतील हजारों तरुणांना त्यागाची व देशभक्तीची स्फूर्ति दिली. विशेषतः महाराष्ट्रांत लोकमान्यांकडून स्फूर्ति घेऊन अनेक तरुणांनीं देशसेवा हेंच आपल्या जीवनाचें ध्येय निश्चित केलें. अण्णासाहेबही त्यांच्यापैकींच एक होते.

१९१७ सालीं टिळकांनीं हिंदी स्वराज्य संघ स्थापन करून स्वराज्यासाठीं प्रचंड चळवळ सुरू केली. तिच्यांत अण्णासाहेब विद्यार्थी-दशेंतच सामील झाले. पुढील दोन वर्षांत देशांत एकंदर अशा घटना घडून आल्या कीं देशांतील 'अशांततेचा' पारा सारखा वर चढत गेला. हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याची चळवळ दडपून काढण्यासाठीं सरकारनें रौलेट ॲक्ट पास करून देशांतील प्रतिकारशक्तीला जणूं आव्हानच दिलें. सर्व हिंदुस्थानभर रौलेट ॲक्टविरुद्ध प्रचंड आंदोलन सुरु झालें. जनतेचा प्रतिकार मोडून काढण्यासाठीं सरकारनें अनन्वित अत्याचार केले. त्या दडपशाहीचा जोर विशेषतः पंजाब प्रांतांत जास्त होता. अमृतसर येथील जालियनवाला बागेंत तर ह्या अत्याचारांचा कडेलोट झाला. अक्षरशः हजारों निरपराध स्त्रीपुरुषांची व अर्भकांची निमिषार्धांत सरसहा कत्तल झाली. जालियनवाला बागेंतील हत्याकांडानें देशाच्या काळजावरच जणूं प्रहार केला. देशाला आपल्या आत्यंतिक असहायतेची जाणीव झाली व देशांत सर्वत्र प्रक्षुब्ध वातावरण निर्माण झालें. ह्याच सुमारास गांधीजी देशाच्या राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेऊं लागले होते. देशांत निर्माण झालेल्या स्फोटक वातावरणांतून मार्ग काढण्यासाठीं आपल्या शांततामय असहकाराचा संदेश त्यांनीं राष्ट्राला दिला. गांधीजींनीं दाखविलेल्या ह्या असहकारितेच्या अभिनव मार्गानें राष्ट्रानें आपल्या स्वातंत्र्य-संग्रामाची नवी आघाडी उघडली. ते १९२० सालचे दिवस होते. हिंदुस्थानच्या इतिहासांत एका नवीन युगास प्रारंभ होत होता. गांधीजींनीं त्याग व सेवा हीं दोन मूल्यें देशासमोर ठेविलीं. देशभक्तीनें प्रेरित झालेले हजारों तरुण गांधीजींनीं दाखविलेल्या मार्गानें देशासाठीं वाटेल तो त्याग व वाटेल तें दिव्य करावयास सिद्ध झाले

सर्वत्र एक प्रकारचें चैतन्यमय वातावरण निर्माण झालें. ह्या सर्व वातावरणाचा परिणाम अण्णासाहेबांसारख्या अत्यंत संस्कारक्षम मनाच्या तरुणावर झाल्याशिवाय कसा राहील ? कॉलेजमध्यें असतांनाच देशसेवा हेंच आपल्या जीवनाचें ध्येय त्यांनीं निश्चित केलें होतें. देशांतील तप्त होत चाललेल्या एकंदर राजकीय परिस्थितीमुळें कायद्याच्या अभ्यासावरील त्यांचें लक्ष उडालें व पहिल्या एल्एल्. बी. च्या परीक्षेंत त्यांना अपयश आलें. एल्एल्. बी. होऊन वकिली करण्याचें अण्णासाहेबांचें ध्येयही नव्हतें. म्हणून त्यानंतर लवकरच अण्णासाहेबांनीं लॉ कॉलेजमधील आपल्या शिक्षणाला रामराम ठोकला आणि स्वतःला समाज व राष्ट्रसेवेस वाहून घेतलें.

१९२० साल हें अण्णासाहेबांच्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचें वर्ष होय. त्याच सालीं त्यांनीं देशसेवेचें व्रत घेतलें आणि आमरण त्याचें निष्ठापूर्वक पालन केलें. त्या सालीं कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनास वसई तालुक्याचे प्रतिनिधि म्हणून ते हजर राहिले. अशा रीतीनें अण्णासाहेबांच्या राजकीय जीवनास सुरुवात झाली. कलकत्ता येथें भरलेलें हें अधिवेशन देशाच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें व क्रांतिकारक होतें. कारण ह्याच अधिवेशनांत महात्मा गांधींचा असहकारितेचा ठराव पास होऊन देशाचें पुढारीपण गांधीजींच्याकडे आलें.

कलकत्त्याहून परत आल्यानंतर अण्णासाहेबांनीं आपल्या कार्यास मोठ्या आत्मविश्वासानें सुरुवात केली. प्रथमतः त्यांनीं आपल्या तालुक्याच्या ग्रामीण विभागांतील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. शेतकऱ्यांच्या ऱ्हासास, अज्ञान, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, वगैरे कारणांबरोबरच मद्यपानाचें व्यसनही तितकेंच जबाबदार होतें असें अण्णासाहेबांना आढळून आलें. घराला भुंगा लागल्यानंतर घराचे वासे व तुळया जशा आंतून साफ पोखरून निघतात तशीच अनुकंपनीय अवस्था मद्यपानाच्या आहारीं गेलेल्या मद्यप्याच्या कुटुंबाची होत असते. मद्यपानाच्या व्यसनामुळें शेतकरी समाजांतील चांगलीं चांगलीं कुटुंबें धुळीस

मिळाल्याचीं अनेक उदाहरणें त्यांना आढळून आलीं. ह्या व्यसनामुळें होणारा नैतिक अधःपात पाहून तर त्यांचें अंतःकरण पिळवटून निघालें. मद्यपानाचें उच्चाटण झाल्याशिवाय शेतकरी समाजास चांगले दिवस दिसावयाचे नाहींत असें त्यांचें ठाम मत बनलें. परंतु केवळ विचार करून अण्णासाहेब थांबले नाहींत. आपले विचार प्रत्यक्ष कृतींत उतरविण्यासाठीं दारूबंदीची चळवळ मोठ्या प्रमाणांत अण्णासाहेबांनीं आपल्या भागांत सुरू केली. प्रथमतः आपल्या मालकीचीं ताडाचीं झाडें ह्यापुढें ताडी काढण्यासाठीं द्यावयाचीं नाहींत असें त्यांनीं ठरवून टाकलें व तो निश्चय लगेच अमलांत आणला. ताडाच्या झाडांपासून दरसाल मिळणाऱ्या शेंकडों रुपयांच्या उत्पन्नावर अण्णासाहेबांनीं १९२० सालीं आपल्या तत्त्वासाठीं अशा रीतीनें कायमचें पाणी सोडलें. असें करतांना आपण जरी झाडें देण्याचें बंद केलें तरी इतर लोक थोडेच तसें करणार आहेत? असा स्वार्थी विचार त्यांच्या मनाला कधींच शिवला नाहीं. आपल्या विचारांची कृतीशीं सांगड घालतांना खरा समाजसेवक वैयक्तिक नफानुकसानाचें गणित मांडीत बसत नाहीं. त्याचें सारें लक्ष आपल्या कृतीच्या परिणामावर केंद्रित झालेलें असतें. आपल्या कृतीनें समाजांतील एखाद्या व्यक्तीला जरी स्वतःच्या कार्याची प्रेरणा मिळाली तरी तो आपला त्याग सफल झाला असें समजतो. अण्णासाहेबांना हें समाधान लवकरच मिळालें.

मद्यपानाच्या व्यसनापासून अण्णासाहेबांचा स्वतःचा सोमवंशी क्षत्रिय समाज अलिप्त नव्हता. ह्या समाजांतही मद्यपानाचें व्यसन बरेंच फैलावलें होतें; म्हणून ह्या व्यसनापासून आपल्या समाजाला परावृत्त करण्याच्या मार्गास अण्णासाहेब लागले. मद्यपानबंदीसाठीं त्यांनीं केलेल्या त्यागामुळें त्यांच्यासंबंधीं आदराची भावना समाजांत निर्माण झालेलीच होती. अण्णासाहेबांनीं दारूबंदीचें कार्य हातीं घेतांच समाजांतील अनेक कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीनें त्यांना मदत करूं लागले. त्यांच्या सहकार्यानें वसई तालुक्यांतील समाजाच्या गांवागांवांतून अण्णासाहेबांनीं प्रचार-सभा

घेतल्या आणि लवकरच जुन्या ज्ञातिपंचायतींची. त्यांनीं पुनर्घटना केली. ह्या नव्या पंचायतींचें काम अत्यंत शिस्तबद्ध व कांटेकोरपणानें चाले. पंचायतींचा दंडकही फार कडकपणानें अंमलांत आणला जाई. पंचायतींच्या कार्यामुळें समाजांत दारू पिणें हा गुन्हा मानला जाऊं लागला आणि पट्टीच्या दारुड्यांनाही दारू पिणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें. पंचायतींचें हें काम पुढें अनेक वर्षें चालू राहिलें.

१९२० सालीं महात्मा गांधींच्या दारूबंदीच्या कार्यक्रमानुसार अण्णासाहेबांनीं आपल्या गांवांतील दारूदुकानावर पिकेटिंग करण्याचें ठरविलें. ठाणें जिल्ह्यांत ही चळवळ प्रथमतः जमनादास मेहता ह्यांच्या नेतृत्वाखालीं सुरू झाली. ठाणें जिल्ह्याचे त्या वेळचे कलेक्टर मि. कॅम्बेल ह्यांनीं ह्या चळवळीविरुद्ध बंदीहुकूम जाहीर केल्यामुळें हा बंदीहुकूम मोडण्यासाठीं जिल्ह्यांतून पांचशें स्वयंसेवकांचीं नांवें नोंदविण्यांत आलीं. परंतु पुढें हा हुकूम मागें घेण्यांत आल्यामुळें कोणास अटक झाली नाहीं. तथापि पिकेटिंगची चळवळ चालूच राहिली. ह्या चळवळीमुळें विरार येथील दारूदुकानांतील दारूविक्रीच अजिबात बंद झाली व सरकारला निरुपायानें तें दुकान शेवटीं बंद करणें भाग पडलें. दारूबंदीची ही मोहीम यशस्वी व्हावी म्हणून अण्णासाहेबांनीं वसई व इतर तालुक्यांतून सारखा प्रचार करून त्याबाबत लोकमत तयार केलें.

अण्णासाहेबांचें हें दारूबंदीसंबंधींचें कार्य शेतकऱ्यांबद्दल त्यांना वाटणाऱ्या जिव्हाळ्यांतून निर्माण झालें होतें. ते स्वतः शेतकरी समाजांत जन्मास आले होते व स्वतःस मोठ्या अभिमानानें शेतकरी म्हणवून घेत असत. दारूबंदीबाबत त्यांनीं केलेल्या कार्यामुळें त्यांच्याबद्दल एक प्रकारचा वचक निर्माण झाला. अण्णासाहेब रस्त्यांतून चालले असतां चुकूनही एखादा दारुड्या त्यांच्या समोर येत नसे किंवा सल्लामसलतीसाठीं दारू पिऊन एखादा माणूस त्यांच्या घरीं आला आहे असें कधीं झालें नाहीं. इतकें नैतिक वजन अण्णासाहेबांनीं आपल्या आचरणानें एवढ्या लहान वयांत आपल्या सभोवतालच्या जनतेंत निर्माण केलें होतें.

प्रकरण चौथें

# असहकार कीं कौन्सिलप्रवेश ?

राजकारणांत १९२० सालीं प्रवेश केल्यानंतर अण्णासाहेबांनीं कॉंग्रेसच्या असहकारितेच्या कार्यक्रमानुसार मद्यपानबंदीबरोबरच स्वदेशीच्या कार्यास वसई तालुक्यांत जोरानें सुरुवात केली. स्वदेशीच्या तत्त्वावर अण्णासाहेबांची आत्यंतिक निष्ठा होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामांत स्वदेशीच्या तत्त्वाला फार मोठा अर्थ होता. ब्रिटिश अमदानींत हिंदुस्थानांतील उद्योगधंदे पद्धतशीरपणें मारण्यांत आले. ह्यांतील हेतु ब्रिटिश मालाला हिंदुस्थानांत स्वैर बाजारपेठ मिळावी हा होता. युरोपमधील औद्योगिक क्रान्तीमुळें उत्पादनाच्या साधनांत प्रचंड बदल होऊन यंत्रयुगास सुरुवात झाली होती. यंत्रांच्या साहाय्यानें थोडक्या श्रमांत युरोपांतील कारखानदारांना आपलें उत्पादन अनेक पटींनीं वाढवितां येणें शक्य झालें. इंग्लंड मुख्यतः औद्योगिक देश असल्याकारणानें यांत्रिक सुधारणेच्या आघाडीवर राहून त्यानें आपल्या उद्योगधंद्याच्या उत्पादनांत प्रचंड प्रमाणांत वाढ केली. ह्या वाढत्या उत्पादनासाठीं नवीन नवीन बाजारपेठा शोधून काढणें इंग्रजांना भागच होतें. हिंदुस्थानवर त्यांचें राजकीय वर्चस्व

प्रस्थापित झाल्याकारणानें आपल्या सत्तेच्या जोरावर सबंध हिंदुस्थानला त्यांनीं एका. प्रचंड बाजारपेठेचें स्वरूप दिलें. अशा प्रकारें पारतंत्र्या-बरोबरच आर्थिक शृंखलांचे पाश हिंदुस्थानच्या भोवतीं घट्ट करण्यांत आले. हें आर्थिक वर्चस्व टिकविण्यासाठींच ब्रिटिशांनीं आपल्या हिंदुस्थानांतील राजकीय सत्तेचा उपयोग केला, ही गोष्ट लक्षांत घेऊन ब्रिटिशांची ह्या देशावर असलेली राजकीय पकड सैल व्हावी म्हणून त्यांची आर्थिक कोंडी करण्याच्या दृष्टीनें स्वदेशीची चळवळ सुरू करण्यांत आली होती. त्याबरोबरच आपला स्वाभिमान जागृत होऊन स्वावलंबनाची भावना देशांत वाढीस लागावी हाही हेतु ह्या स्वदेशीच्या चळवळीमागें होता. इंग्लंडमधून मँचेस्टर व लँकशायर येथील गिरण्यांतील कापडाची हिंदुस्थानांत फार मोठ्या प्रमाणांत आयात होत असल्यामुळें स्वदेशीच्या ह्या चळवळींत परदेशी कापडावरील बहिष्काराला फार मोठें स्थान मिळालें. अण्णासाहेबांनीं स्वदेशीच्या व परदेशी कापडावरील बहिष्काराच्या चळवळींत आपल्या तालुक्यांत फार मोठी कामगिरी बजावली. खेड्यापाड्यांतून व्याख्यानें देऊन ह्या चळवळीबाबत तालुक्यांतील जनतेंत त्यांनीं मोठी जागृति निर्माण केली. एखाद्या व्रता-प्रमाणें स्वतः त्यांनीं स्वदेशीचें पालन निष्ठेनें केलें. त्यांच्या घरीं स्वदेशी वस्तूशिवाय परदेशी कोणतीही वस्तु दिसत नसे. फटाके परदेशी म्हणून दिवाळींत घरांतील मुलांना फटाके उडविण्यास मनाई असे. तत्त्वाप्रमाणें स्वतः अण्णासाहेब आपलें आचरण ठेवीत असल्यामुळें जनमतावर त्यांच्या व्यक्तित्वाची छाप अल्पावधींतच बसली व त्यामुळें त्यांचें कार्य अधिक प्रभावी होत गेलें.

असहकारितेच्या तत्त्वांत धैर्याची व त्यागाची भूमिका अभिप्रेत होती. अण्णासाहेबांनीं असहकारितेच्या चळवळीचा पुरस्कार जोरानें केल्यामुळें त्यांच्या हालचालींवर व भाषणांवर सरकारची अगदीं बारीक नजर होती. अण्णासाहेबांना ह्या परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. अण्णासाहेब सुस्थितींत वाढलेले तरुण असले तरी स्वभावानें ते

अत्यंत करारी होते. सरकारच्या वक्रदृष्टीची जाणीव झाल्यानंतर त्यांनीं आपल्या ध्येयास अनुसरून आपल्या जीवनांत बदल केला. झोपण्यासाठीं बिछान्याचा त्याग करून घोंगडीवर झोपण्यास त्यांनीं सुरुवात केली. परंतु हें कठोर नियमाचें जीवन व्यतीत करतांना आपल्या निकट सहकाऱ्यांच्याही तें लक्षांत येऊं नये इतक्या सहज रीतीनें ते वागत असत.

अण्णासाहेबांच्या भावी जीवनाच्या रूपरेखा आतां पक्क्या झाल्या होत्या. कट्ट्या समाजसुधारकाच्या व राजकीय कार्यकर्त्यांच्या जीवनाचा त्यांनीं अंगीकार केला होता. ठाणें जिल्ह्यांतील कॉंग्रेसच्या कार्यांत ते आतां अधिक व उत्साहानें भाग घेऊं लागले. १९२० च्या डिसेंबरमध्यें नागपूर येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला ते प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. ह्याच अधिवेशनामध्यें कॉंग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनांत पास झालेल्या असहकारितेच्या ठरावास मान्यता देण्यांत आली. कॉंग्रेसनें स्वीकारलेला नवीन मार्ग प्रागतिक पुढाऱ्यांच्या थंड प्रकृतीला मानवणारा नसल्यामुळें नागपूर अधिवेशनानंतर त्यांनीं कॉंग्रेसचा कायमचा त्याग केला.

कॉंग्रेसचीं अधिकारसूत्रें ह्याप्रमाणें गांधीजींच्या हातांत आल्यानंतर लोकमान्य टिळकांसारख्या लोकोत्तर पुढाऱ्याचें भव्य स्मारक व्हावें म्हणून त्या स्मारकासाठीं देशांतून एक कोटि रुपयांचा फंड जमविण्याचा आणि कॉंग्रेसचे एक कोटि प्राथमिक सभासद नोंदविण्याचा देशव्यापी कार्यक्रम गांधीजींनीं देशापुढें ठेवला. ह्या कार्यक्रमामुळें कॉंग्रेसच्या लहानमोठ्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना भरीव कार्य करण्यास मोठा वाव मिळाला. टिळक स्वराज्य फंड जमविण्याच्या कामीं व कॉंग्रेसचे सभासद नोंदविण्याच्या मोहिमेंत अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्यांत मोठी कामगिरी बजावली. १९२१ सालच्या मे महिन्यांत वसईच्या इतिहास-प्रसिद्ध किल्ल्याजवळील नारळीबागेंत झालेल्या पहिल्या महाराष्ट्र प्रांतिक

परिषदेंत महात्मा गांधींना टिळक स्वराज्य फंडासाठीं अण्णासाहेबांनीं एक हजार रुपयांची देणगी दिली. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व कार्यकर्ते प्रतिनिधि म्हणून ह्या परिषदेस हजर राहिले होते व त्यांची संख्या दीड हजारांपेक्षां अधिक होती. परिषदेचे स्वागताध्यक्ष बॅ. जमनादास मेहता हे असून अध्यक्षपदीं डॉ. मुंजे ह्यांची योजना झाली होती. ह्या परिषदेस महात्मा गांधी हजर राहिल्यामुळें लोकांचा उत्साह दुणावला होता. ह्या परिषदेंत कॉंग्रेसच्या असहकारितेच्या ठरावाला व मुळशी पेट्यांतील सत्याग्रहाला पाठिंबा देण्यांत येऊन मालेगांव येथील अत्याचाराचा निषेध करण्यांत आला. वसई येथील ही परिषद यशस्वी व्हावी म्हणून अण्णासाहेबांनीं आपल्या सहकाऱ्यांसह फार श्रम घेतले.

१९२१ सालीं अहमदाबाद येथें झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत कॉंग्रेसच्या कायदेभंगाच्या चळवळीचें पहिल्यानें सूतोवाच करण्यांत येऊन महात्मा गांधींना सर्वाधिकारी नेमण्यांत आलें. परंतु त्यानंतर लवकरच त्यांना अटक होऊन सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. महात्मा गांधी तुरुंगांत गेल्यानंतर महाराष्ट्रांत कॉंग्रेसच्या असहकारितेच्या धोरणावर मतभेद माजून राहिले आणि ह्या मतभेदांतूनच फेरनाफेर वादाचें वादळ निर्माण झालें.

फेर व नाफेर हे दोन्ही पक्ष असहकारितेचे पुरस्कर्ते होते. परंतु कौन्सिलप्रवेश करून सरकारला अधिक यशस्वी रीतीनें शह देतां येईल अशी फेरवाल्यांची विचारसरणी होती; तर नाफेरवाले गांधीजींच्या धोरणाचे कट्टे पुरस्कर्ते असून गांधीजी तुरुंगांत असतांना त्यांनीं पुरस्कारलेलें धोरण बदलणें योग्य होणार नाहीं असें त्यांचें ठाम मत होतें. दोन्ही पक्ष आग्रही मताचे असल्याकारणानें असहकारितेच्या धोरणाबाबत त्यांच्यांतील मतभेद सारखे वाढतच गेले. त्यांतच कॉंग्रेसनें नेमलेल्या कायदेभंग कमिटीपुढें महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे त्या वेळचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर ह्यांनीं जी साक्ष दिली त्यामुळें सर्व महाराष्ट्रभर खळबळ माजून राहिली. याच कारणावरून पुढें

तात्यासाहेबांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व त्यानंतर जमनादास मेहता हे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष झाले.

जमनादास मेहता हे अध्यक्ष झाल्यानंतर महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटींतील फेरनाफेरवादाचा निकाल लावण्याच्या उद्देशानें त्यांनीं ता. २९-११-२२ रोजीं विरार येथें प्रांतिकची सभा घेतली. विरार येथील ही सभा महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. विरारसारख्या एका खेडेगांवाची ह्या सभेसाठीं जमनादास मेहता ह्यांनीं निवड केली ह्याचें एक मुख्य कारण म्हणजे त्यांचा अण्णासाहेबांवर असलेला विश्वास हें होय. अण्णासाहेब स्वतः फेरवादी असून ठाणें जिल्ह्यांत त्यांच्या मताला प्रतिष्ठा होती. अण्णासाहेबांच्या मदतीनें आपण ही सभा यशस्वी करूं शकलों तर महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटी फेरवाल्यांच्या ताब्यांत कायमची येईल अशी जमनादास मेहतांची आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांची कल्पना होती आणि ह्याच कल्पनेनें ह्या सभेची सर्व तयारी करण्यांत आली होती.

अण्णासाहेबांनीं ह्या सभेची पूर्वतयारी फार विचारपूर्वक केली होती. कोणताही प्रसंग उद्भवल्यास त्याला तोंड देतां यावें अशा प्रकारची पूर्ण दक्षता घेण्यांत आली होती. विरार येथील ह्या सभेस फेरनाफेर पक्षांतील रथीमहारथी उपस्थित होते. दोन्ही पक्षांनीं सभा जिंकण्याचा निश्चय केला होता. सुरत कॉंग्रेसची छोटी आवृत्ति विरार येथें होणार होती. फेर पक्षातर्फें अध्यक्षपदासाठीं जमनादास मेहता ह्यांचें नांव सुचविण्यांत आलें होतें तर नाफेर पक्षातर्फें ह्या जागेसाठीं शिवरामपंत परांजपे हे उमेदवार होते. दोन्ही पक्षांतील सामना चुरशीचा होणार असल्यामुळें एकंदर वातावरण फार तंग होतें.

सभेसाठीं एक भव्य मंडप उभारण्यांत आला होता. सभेच्या कामास दुपारीं चार वाजतां सुरुवात होणार होती. परंतु त्यापूर्वी किती तरी वेळ अगोदर मंडप प्रतिनिधींनीं भरून गेला होता. सभेमध्यें काय

होणार आहे इकडेच सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. सभेस सुरुवात होण्यापूर्वी कांहीं तडजोड होते कीं काय हें पाहावें म्हणून शिवरामपंत परांजप्यांनीं जमनादास मेहता ह्यांना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु साडेतीन वाजेपर्यंत भेटण्यास सवड नाहीं अशा प्रकारचें उत्तर मेहतांकडून शिवरामपंतांना आलें. त्याप्रमाणें साडेतीन वाजतां शिवरामपंत जमनादास मेहता ह्यांना भेटण्यासाठीं निघून गेले. परंतु चार वाजेपर्यंत शिवरामपंत अगर जमनादास ह्यांपैकीं कोणीच परत न आल्यामुळें सभेंत ठेवलेल्या घड्याळांत चार वाजून पांच मिनिटें होतांच वासूकाका जोशी ह्यांनीं उठून प्रांतिकचे उपाध्यक्ष श्री. दास्ताने ह्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून सभेचें काम सुरू करावें अशी सूचना मांडली व ह्या सूचनेस रीतसर अनुमोदन मिळतांच तंग वातावरणांतच सभेच्या कामास सुरुवात करण्यांत आली. प्रांतिकच्या अध्यक्षपदासाठीं शिवरामपंत परांजपे ह्यांचें नांव नाफेर पक्षातर्फे सुचविण्यांत येऊन सभेंत माजलेल्या गोंधळांतच शिवरामपंत परांजपे प्रांतिकचे अध्यक्ष निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें. त्यानंतर इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीचें काम सुरू करण्यांत आलें आणि नेमका ह्याच वेळीं शिवरामपंत परांजपे व जमनादास मेहता ह्यांनीं मंडपांत प्रवेश केला. परंतु सभेचें अध्यक्षपद न सोडण्याच्या निश्चयानें श्री० दास्ताने ह्यांनीं सभेचें काम चालूच ठेवलें. त्यामुळें जमनादास मेहता मुळींच न थांबतां सभेच्या मंडपांतून एकदम निघून गेले. त्यानंतर सभेच्या कामांत एकच गोंधळ माजून राहिला आणि त्या गोंधळांतच नाफेरवाल्यांनीं इतर निवडणुका पार पाडल्या.

सभेच्या मंडपांतून बाहेर पडल्यानंतर जमनादास मेहतांनीं आपल्या फेर पक्षाच्या सभासदांची सभा अण्णासाहेब वर्तकांच्या बंगल्यांतील दिवाणखान्यांत भरविली. ह्या सभेचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल हे होते. ह्या सभेची व्यवस्था अण्णासाहेबांनींच केली होती. ह्या सभेंत जमनादास मेहता ह्यांची प्रांतिकचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्याचप्रमाणें इतर पदाधि-

कार्यांच्या निवडणुकाही ह्या सभेंत करण्यांत आल्या. विरार येथील सभेस आलेल्या ॲसोसिएटेड प्रेसच्या बातमीदारानें जमनादास मेहता ह्यांच्या सभेचाच वृत्तान्त वर्तमानपत्रांकडे पाठविल्यामुळें दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत जमनादास मेहता ह्यांच्या बाजूचीच बातमी प्रसिद्ध झाली. त्यामुळें ह्या सभेसंबंधीं लोकांच्या मनामध्यें उडालेल्या गोंधळांत अधिकच भर पडली.

फेरनाफेर वादाचा निकाल लावण्याच्या उद्देशानें बोलावण्यांत आलेल्या विरार येथील ह्या सभेंत ह्या वादाचा निकाल तर लागला नाहींच, परंतु गैरसमजाचे प्रचंड पर्वत मात्र ह्या पक्षांच्या पुढाऱ्यांत ह्या सभेमुळें निर्माण झाले. दोन्ही पक्षांनीं आपआपल्या पक्षाचे पदाधिकारी निवडल्यामुळें महाराष्ट्रांत दोन प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या अस्तित्वांत आल्या. त्यामुळें हें प्रकरण येथेंच थांबणें शक्य नव्हतें. त्याचा निकाल कॉंग्रेसची वर्किंग कमिटीच लावूं शकत होती. अपेक्षेप्रमाणें वर्किंग कमिटीनें ह्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं बॅ. सेन गुप्ता व गंगाधरराव देशपांडे ह्यांची एक कमिटी नेमली. ह्या कमिटीनें दोन्ही पक्षांचे निम्मे निम्मे प्रतिनिधि मान्य करून गया येथें भरणाऱ्या कॉंग्रेसमध्यें ज्या पक्षाचा पराभव होईल त्यानें त्यानंतर राजीनामा द्यावा असा निकाल दिला. गया येथील कॉंग्रेसमध्यें फेरवादी पक्ष पराभूत झाला. परंतु वरील कमिटीच्या निर्णयानुसार जमनादास मेहतांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा त्वरित दिला नाहीं. परंतु कांहीं दिवसांनीं त्यांनीं राजीनामा दिल्यानंतर फेरवादी पक्षातर्फे अण्णासाहेब भोपटकर ह्यांचें नांव अध्यक्ष म्हणून पुढें करण्यांत आलें. त्यामुळें अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीला ह्या प्रश्नांत पुन्हा लक्ष घालणें प्राप्त झालें. कमिटीकडून ह्या प्रश्नाची पुन्हा सविस्तर चौकशी करण्यांत येऊन कमिटीनें शिवरामपंत परांजपे ह्यांचीच निवड अखेर योग्य ठरविली. ह्याप्रमाणें विरार येथील सभेंतून उद्भवलेल्या प्रकरणावर तात्पुरता पडदा पडला. तात्पुरता म्हणण्याचें कारण हा वाद महाराष्ट्रांत पुढें बराच काळ रेंगाळत राहिला हें होय.

१९२२ च्या डिसेंबरमध्यें गया येथें झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनास प्रतिनिधि म्हणून अण्णासाहेब हजर राहिले होते. गया येथील कॉंग्रेसचें हें अधिवेशन फार महत्त्वाचें होतें. ह्याच अधिवेशनांत गांधीजींच्या असहकारितेच्या धोरणावर तुमुल वाग्युद्ध झालें. ह्या कॉंग्रेसचे अध्यक्ष देशबंधु दास ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत कौन्सिलप्रवेशाचें जोरदार समर्थन केलें होतें. पंडित मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल व श्रीनिवास अय्यंगार ह्यांचा देशबंधूंना संपूर्ण पाठिंबा होता. परंतु विरुद्ध बाजूनें श्री० राजगोपालाचारी ह्यांनीं आपल्या बुद्धिचातुर्यानें व बिनतोड युक्तिवादानें ह्या सर्व थोर पुढाऱ्यांना पराभूत केलें. गांधीजींच्या गैरहजेरींत कौन्सिलबहिष्काराचा ठराव रद्द करणें म्हणजे गांधीजींशीं द्रोह करण्यासारखें आहे अशा प्रकारचें वातावरण ह्या अधिवेशनांत श्री. राजगोपालाचारी ह्यांच्या वाक्पटुत्वानें निर्माण झाल्यामुळें कौन्सिलबहिष्कार उठविण्या-बाबतचा ठराव नापास झाला. हा आपल्या विचारप्रणालीचाच पराजय समजून देशबंधु दास ह्यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. कौन्सिलबहिष्कार उठविण्याच्या ठरावावर ह्या कॉंग्रेसमध्यें अण्णासाहेबांनीं ठरावाच्या बाजूनें मत दिलें होतें.

गया येथील कॉंग्रेस अधिवेशनांत देशबंधु दास ह्यांचा जरी पराभव झाला तरी १९२३ च्या सेप्टेंबर महिन्यांत दिल्ली येथें मौलाना आझाद ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनांत कौन्सिलबहिष्कार उठविण्यांत आला. ह्याच सुमारास निरनिराळ्या निवडणुका लढविण्यासाठीं दासबाबूंनीं स्वराज्यपक्षाची स्थापना केली. महाराष्ट्रांतील वातावरण कौन्सिलप्रवेशाला अनुकूल असल्यामुळें देशबंधूंना ह्या प्रश्नाबाबत महाराष्ट्रांतून जोरदार पाठिंबा मिळाला. त्यामुळें स्वराज्य-पक्षाची स्थापना होतांच महाराष्ट्रांतून त्या पक्षाच्या जिल्हानिहाय शाखा निघाल्या. ठाणें जिल्ह्यांतील स्वराज्यपक्षाच्या शाखेचें काम यशस्वी होण्यासाठीं अण्णासाहेबांनीं हिरीरीचे प्रयत्न केले. स्वराज्यपक्षाच्या प्रचारार्थ देशबंधूंनीं सर्व देशभर दौरा काढला होता. ह्या दौऱ्यांत त्यांना

ठाणें जिल्ह्यास भेट देण्यासाठीं अण्णासाहेबांनीं पाचारण केलें. अण्णासाहेबांची विनंती मान्य करून देशबंधूनीं वसई शहरास भेट दिली. त्या वेळीं ठाणें जिल्हा स्वराज्यपक्षातर्फे त्यांचा भव्य सत्कार करण्यांत येऊन त्यांना ठाणें जिल्ह्यातर्फे मोठी थैली अर्पण करण्यांत आली.

१९२४ च्या सुरुवातीस महात्मा गांधी ॲपेंडिसायटिसनें आजारी पडल्यामुळें त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली आणि त्यानंतर लवकरच सरकारनें त्यांची बिनशर्त मुक्तता केली. गांधीजी तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर कॉंग्रेसमध्यें माजून राहिलेले अंतर्गत बखेडे त्यांनीं थांबविले आणि नाफेर पक्षाला स्वराज्यपक्षाच्या ताब्यांत सर्व कॉंग्रेस कमिट्या देण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें नाफेरवादी १९२५ मध्यें सर्व कॉंग्रेस कमिट्यांतून निवृत्त झाले. त्यानंतर नवीन महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची पहिली सभा पालघर येथें भरविण्यांत आली. ह्या सभेंत श्री. अण्णासाहेब भोपटकर महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष निवडून आले. ह्याच सभेंत अण्णासाहेब महाराष्ट्र प्रांतिकचे एक खजिनदार निवडले गेले. तेव्हांपासून १९३० पर्यंत ते त्या पदावर होते. १९३० सालीं अण्णासाहेबांची महाराष्ट्र प्रांतिकच्या उपाध्यक्षपदावर निवड झाली होती. त्याच सालीं ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या निवडणुका स्वराज्यपक्षातर्फे लढविण्यांत आल्या आणि त्यानंतर अण्णासाहेब जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष निवडून आले. त्याचा उल्लेख पुढें येणारच आहे. जिल्हा लोकलबोर्डाच्या ह्या निवडणुकी यशस्वी व्हाव्यात म्हणून अण्णासाहेबांनीं जीवापाड मेहनत केली. स्वीकृत कार्यासाठीं सतत झटत राहाणें हा अण्णासाहेबांचा स्वभावधर्मच होता. ह्या स्वभावधर्मानुसार अण्णासाहेब शेवटपर्यंत प्रत्येक कार्य करीत आले होते म्हणूनच त्यांच्या कार्याला उठाव मिळत गेला.

प्रकरण पांचवें

# संघशक्तिदर्शन

दारूबंदीच्या चळवळीबरोबरच अण्णासाहेबांनीं आपल्या सोमवंशी क्षत्रिय समाजाच्या संघटनेचें कार्य हातीं घेतलें. हा समाज प्रायः शेतकरी समाज असून त्याची वस्ती मुख्यतः ठाणें जिल्ह्यांतील समुद्रालगतच्या डहाणू, पालघर व वसई ह्या तीन तालुक्यांतून विखुरलेली आहे. समाजाची कांहीं मंडळी उद्योगधंद्यानिमित्त मुंबईस स्थाइक झालेली आहे. पूर्वी एका तालुक्यांत राहाणाऱ्या समाजांतील मंडळींचा दुसऱ्या तालुक्यांतील मंडळींशीं फारच क्वचित् संबंध येत असे. त्यामुळें समाजाचे हे निरनिराळे घटक अगदीं अलग पडल्यासारखे वाटत. समाजांत रूढीचें व परंपरागत चालत आलेल्या आचार-विचारांचें त्या काळीं फार प्राबल्य होतें. हा केवळ ह्या समाजाचा दोष होता असें नाहीं. त्या काळचा खेड्यापाड्यांतून राहाणारा कोठलाही समाज ह्या दोषापासून मुक्त नव्हता. समाजाचा शैक्षणिक दर्जा अगदींच बेताबाताचा होता. मुंबई येथें राहाणाऱ्या मंडळींचा अपवाद सोडल्यास समाजांत शिक्षणाचें प्रमाण अगदींच अल्प होतें. स्त्रीशिक्षण तर जवळजवळ अस्तित्वांतच नव्हतें.

समाजाची आर्थिक परिस्थिति कांहींशी हलाखीचीच होती. समाजांतील बहुसंख्य लोकांचें जीवन शेती व बागाईत ह्यांवर अवलंबून असून, कांहीं लोक सुतारकी व मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करीत असत. सुशिक्षितांपैकीं कांहीं मंडळींनीं प्राथमिक शिक्षकाचा, तलाठ्याचा अगर जंगलखात्यांत फॉरेस्टरचा पेशा पत्करला होता. खुद्द मुंबईत मात्र समाजांतील कांहीं मंडळी सरकारी खात्यांत किंवा खाजगी कंपन्यांतून नोकरीला होती, तर कांहीं डॉक्टरकी, वकिली, इंजिनिअरिंग, सुतारकी ह्यांसारखे स्वतंत्र धंदे करीत होती.

समाजाचें जीवन मुख्यतः शेती व बागाईत ह्यांवरच जरी अवलंबून असलें तरी समाजांतील फारच थोड्या मंडळींजवळ आपल्या स्वतःच्या मालकीच्या जमिनी होत्या. लग्नकार्यांत अवास्तव खर्च करण्याच्या प्रवृत्तीमुळें समाजांत कर्जबाजारीपणा वाढला व त्यामुळें कांहीं मंडळींच्या स्वतःची मालकी असलेल्या जमिनी सावकारांच्या ताब्यांत गेल्या. समाजांत मद्यपानाच्या व्यसनाचा बराच फैलाव झाला होता. उत्तर कोंकणांतील सर्वच शेतकरी समाजांत मद्यपानाचें हें व्यसन पूर्वापार चालत आलेलें होतें व त्याला सोमवंशी क्षत्रिय समाजही अपवाद नव्हता. एकंदरींत समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिति विशेष स्पृहणीय नव्हती. समाजाच्या ह्या परिस्थितींत बदल घडवून आणणें अत्यंत इष्ट व महत्त्वाचें कार्य होतें. हा बदल समाजाची योग्य मार्गानें संघटना करण्यानेंच घडून येणार होता. संघटनेचें हें कार्य फार बिकट होतें. परंतु हें बिकट कार्य अण्णासाहेबांनीं आपल्या सहकारी मित्रांच्या साह्यानें हातीं घेतलें.

अण्णासाहेब कॉलेजमध्यें शिकत असतांनाच त्यांनीं आपल्या समाजाच्या दुःस्थितीविषयीं बराच विचार केला होता. आत्मारामपंत सावे, भास्करराव पाटील ह्यांच्यासारख्या आपल्या मित्रांबरोबर समाजाची सुधारणा घडवून आणण्याबाबत त्यांनीं बराच विचारविनिमय केला होता. कॉलेजचें शिक्षण पुरें होतांच हें कार्य हातीं घेण्याचें ह्या मित्रांनीं ठरविलें.

समाजाच्या उन्नतीसाठीं ह्यापूर्वी १९०७ पासून समाजांतील बोर्डी, चिंचणी व मुंबई येथील कांहीं सुशिक्षित मंडळींनीं प्रयत्न केले होते. परंतु योग्य मार्गदर्शन व संघटना ह्यांच्या अभावीं हे प्रयत्न यशस्वी होऊं शकले नाहींत. असें असलें तरी सुधारणावादी मंडळींनीं आपले प्रयत्न चालूच ठेविले होते. आत्मारामपंत सावे ह्यांच्या सल्ल्यावरून ह्या मंडळींनीं अण्णासाहेबांची भेट घेतली. समाजसुधारणेसंबंधींचीं अण्णासाहेबांचीं विचारपूर्वक बनलेलीं प्रगल्भ मतें ऐकून त्यांना ह्या मंडळींकडून अधिक विचारविनिमयासाठीं बोर्डी येथें बोलाविण्यांत आलें. बोर्डी येथें झालेल्या ह्या सभेस चिंचणी येथील श्री० परशुरामपंत चुरी, बोर्डी येथील श्री० माधवराव राऊत, श्री० मुकुंदराव सावे, गोपाळराव पाटील, आत्मारामपंत सावे, मदनराव राऊत, माहीम येथील जनोबा ठाकूर, वसई येथील भास्करराव पाटील, मुंबई येथील रामचंद्रपंत चौधरी, इत्यादि समाजांतील पुढारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ह्याच सभेंत समाजाच्या उन्नतीसाठीं संघाची स्थापना करण्याचा निर्णय करण्यांत आला व संघाचें कार्य सुरू करण्याच्या उद्देशानें अण्णासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं ता. २८ मार्च, १९२० रोजीं प्रथम स्वयंसेवक मंडळाची स्थापना करण्यांत आली. अण्णासाहेबांचें धडाडीचें नेतृत्व व त्यांचें ओजस्वी वक्तृत्व स्वयंसेवक मंडळाला लाभल्यामुळें स्वयंसेवक मंडळाचें काम अत्यंत सुकर झालें. समाजाच्या सर्व गांवांतील परस्पर संघटन वाढवून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं एकमेकांच्या सहकार्यानें समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचें विशाल ध्येय स्वयंसेवक मंडळानें आपल्यापुढें ठेविलें होतें. समाजाच्या प्रत्येक गांवांतील तरुण, उत्साही आणि निर्व्यसनी समाजकार्यकर्त्यांची स्वयंसेवक मंडळातर्फे संघटना करण्यांत आली. स्वयंसेवक मंडळाचे स्वयंसेवक संघाचे आघाडीचे वीर होते. समाजांतील निष्क्रियतेस व अलिप्तपणाच्या वृत्तीस पहिले सुरुंग लावण्याचें महत्त्वाचें कार्य त्यांनीं केलें. स्वयंसेवक मंडळाच्या सदस्यांनीं गांवागांवांतून दौरे काढले, व्याख्यानें दिलीं व लोकजागृति केली. प्रत्येक

तालुक्यांतून स्वयंसेवक मंडळाच्या शाखा स्थापन करण्यांत आल्या. वसई तालुक्यांत मंडळाच्या शाखा स्थापण्याचा प्रश्न चर्चेस निघाल्या-नंतर त्या तालुक्यांत अनेक पक्षोपपक्ष असल्याकारणानें मंडळाचें कार्य कितपत यशस्वी होईल ह्याबद्दल साशंकता व्यक्त करण्यांत आली. त्या वेळीं अण्णासाहेब म्हणाले, "वसई हा माझा तालुका आहे, त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे, त्याबद्दल आपणांस साशंक राहाण्याचें मुळींच कारण नाहीं. माझा तालुका आपली कामगिरी योग्य तऱ्हेनें बजावील." अण्णासाहेबांच्या ह्या आश्वासनामुळें शंकेस कांहींच कारण उरलें नाहीं. त्यानंतर वसई तालुक्यांतील समाजाचे वयोवृद्ध पुढारी भायजी जगू राऊत ह्यांची अण्णासाहेबांनीं भेट घेतली व त्यांना संघाची सर्व योजना समजावून सांगितली. भायजी राऊत ह्यांनीं ह्या चर्चेनंतर संघाच्या योजनेस मान्यता दिली. वसई तालुक्यांत भायजी राऊत ह्यांच्या शब्दाला फार मान होता. त्यांनीं तालुक्यांतील पुढाऱ्यांची सभा बोलाविली आणि ह्या सभेंत अण्णासाहेबांनीं संघाच्या स्थापनेची कल्पना विषद करून सांगितली. पुढारी मंडळींना ती पटली. आणि त्यानंतर लगेच सर्व वसई तालुकाभर स्वयंसेवक मंडळाच्या शाखा स्थापन करण्यांत आल्या. अण्णासाहेबांनीं वसई तालुक्याबाबत दिलेलें आश्वासन ह्याप्रमाणें खरें करून दाखविलें.

स्वयंसेवक मंडळाच्या एक वर्षाच्या अविरत कार्यामुळें समाजांत नवचैतन्य निर्माण झालें व अलिप्तपणाचे बांध वाहून गेले. समाजांतील अनिष्ट चालीरीतींना आळा बसूं लागला व समाजांत शिक्षणासंबंधीं आस्था निर्माण झाली. ह्यानंतर संघ स्थापन करण्याचा निर्णय करण्यांत आला आणि अण्णासाहेबांना संघाची घटना तयार करण्यासंबंधीं विनंती करण्यांत आली. अण्णासाहेबांनीं ही जबाबदारी स्वीकारून अत्यंत विचार-पूर्वक संघाची घटना आपल्या सहकारी मित्रांच्या मदतीनें तयार केली. घटना तयार होतांच, ता. २ मे, १९२१ रोजीं वसई येथें समाजाची परिषद भरविण्यांत आली. समाजाच्या इतिहासांतील हा चिरस्मरणीय

प्रसंग होता. एवढ्या मोठ्या प्रमाणांत समाजांतील मंडळी एकत्र कधींच जमली नव्हती. परिषदेंतील उत्साहही अपूर्वच होता. समाजाची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याचें अण्णासाहेबांचें ध्येय होतें. ह्या ध्येयाची मुहूर्तमेढ वसई येथील ह्या परिषदेंत संघाच्या स्थापनेनें रोवली जात होती. संघाची घटना हातांत घेऊन अण्णासाहेब व्यासपीठावर उभे राहिले. त्यांचा प्रफुल्ल चेहेरा सात्त्विक आनंदानें उजळून गेला होता. आपलें एक जीवितस्वप्न साकार होत आहे ही भावना त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रकट होत होती. अण्णासाहेबांनीं आपलें स्फूर्तिदायक भाषण संपविलें आणि टाळ्यांच्या प्रचंड गजरांत संघाच्या घटनेला परिषदेनें मान्यता दिली. संघाच्या घटनेप्रमाणें संघाच्या आश्रय-दात्यांची वर्गणी ५०० रुपये ठेवण्यांत आली होती. संघाच्या स्थापनेच्या वेळीं भायजी जगू राऊत व अण्णासाहेब संघाचे आश्रयदाते झाले. ह्या घटनेनुसार संघाचें पहिलें कार्यकरी मंडळ बनविण्यांत आलें. संघाच्या कार्यास व कार्यपद्धतीस आतां निश्चित स्वरूप प्राप्त झालें. संघाची ही घटना थोड्याफार फरकानें आजही अस्तित्वांत आहे.

संघ स्थापन करतांना संघाच्या संस्थापकांनीं ऐक्यवृद्धि आणि शिक्षण-प्रसार हे दोन उद्देश मुख्यतः आपल्यासमोर ठेविले होते. ऐक्यवृद्धीच्या बाबतींत स्वयंसेवक मंडळानें उत्तम प्रकारचें कार्य केलें होतें. शिक्षण-प्रसार हें महत्त्वाचें कार्य त्यानंतर संघानें आपल्या हातीं घेतलें. त्यासाठीं समाजाची प्रथमतः खानेसुमारी करण्यांत आली. ह्या खानेसुमारींत समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीची पाहाणी करण्यांत आली. समाजाच्या कांहीं गांवांत प्राथमिक शिक्षणाची मुळींच सोय नव्हती असें आढळून आलें. तेव्हां अशा गांवांपैकीं एखाद्या गांवीं संघामार्फत प्राथमिक शाळा काढण्याचा प्रयोग करण्याचें ठरविण्यांत येऊन त्याप्रमाणें सन १९२१ सालीं माकुणसार येथें प्राथमिक शाळा स्थापन करण्यांत आली. ह्या शाळेच्या स्थापनेसाठीं अण्णासाहेबांनीं आपली १०० रुपयांची देणगी दिली. संघाच्या ह्या प्रयोगाला चांगलेंच यश मिळालें. माकुणसार

येथील शाळागृह बांधण्याकरितांही संघानें मदत केली. त्यानंतर चटाळें येथें शाळा सुरू करण्यांत आली. पुढें ह्या दोन्ही शाळा जिल्हा स्कूलबोर्डानें आपल्या ताब्यांत घेतल्या. दातिवरें येथील शाळेच्या इमारतफंडासाठींही संघानें मदत केली.

परंतु शिक्षणाची व्यवस्था नसलेल्या समाजाच्या प्रत्येक गांवीं शाळा स्थापन करणें संघाला आर्थिक दृष्ट्या शक्य नव्हतें, म्हणून शिक्षण-प्रसाराचें कार्य नेटानें आणि अधिक जोमानें चालविण्याकरितां सन १९२२ सालीं गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना संघाकडून मदत देण्याचा नवीन उपक्रम करण्यांत आला. हा उपक्रम परिणामाच्या दृष्टीनें अधिक यशस्वी झाल्यानें ह्या उपक्रमावरच पुढें भर देण्यांत आला. संघाच्या मदतीमुळें समाजांतील अनेक गरीब विद्यार्थ्यांचें शिक्षण पुरें होण्यास मदत झाली. पुढें हें कार्य सारखें वाढत गेलें. शिक्षणप्रसारासाठीं १९२३ सालीं संघानें आणखी एक प्रयोग केला. तो म्हणजे वार्षिक परीक्षेंत पास होणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बक्षिसें वांटण्याचा. हें कार्य संघाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते व उत्साही चिटणीस भास्करराव पाटील ह्यांजकडे सोंपविण्यांत आलें होतें. हें कार्य उत्साहानें पार पाडण्यास मदत व्हावी व संघाच्या शिक्षणप्रसाराच्या कार्यास हातभार लागावा म्हणून भास्करराव पाटील व त्यांच्या तरुण सहकाऱ्यांनीं शिक्षणप्रसारक मंडळाची स्थापना केली. शिक्षणप्रसारक मंडळाकडून संघाच्या प्रत्येक शाखेंत स्थानिक मंडळीच्या मदतीनें हे बक्षीस-समारंभ दरवर्षी घडवून आणले जात. शिक्षणाची विद्यार्थ्यांत लालसा उत्पन्न व्हावी आणि समाजांत शिक्षणप्रसारासंबंधीं प्रचाराचें कार्य व्हावें ह्या दुहेरी उद्देशानें हे समारंभ घडवून आणले जात. संघाचें शिक्षणविषयक उद्दिष्ट साध्य होण्यास ह्या समारंभांची फार मदत झाली. दहा हजार संख्येच्या ह्या लहानशा शेतकरी समाजांत शिक्षणाचा झपाट्यानें प्रसार झाला. त्याचें श्रेय संघामार्फत संघाच्या धुरीणांनीं केलेल्या प्रयत्नांनाच आहे. ह्या श्रेयाचा बराचसा वांटा संघाच्या नेतृत्वाला आहे.

आपल्या कार्याला अधिक चालना मिळावी म्हणून संघानें दरवर्षी समाजाच्या परिषदा भरविण्याचा उपक्रम सुरू केला. संघाच्या कार्य-पद्धतींत ह्या परिषदांना फार महत्त्वाचें स्थान आहे. समाजाच्या प्रत्येक गांवांतून समाज बंधुभगिनी मोठ्या संख्येनें ह्या परिषदांना हजर राहात असत. संघानें हातीं घेतलेल्या कार्याच्या प्रचाराच्या दृष्टीनें ह्या परिषदांचा फार उपयोग होत असे. ह्या परिषदांमधून जें उत्साहाचें व चैतन्याचें वातावरण निर्माण होई त्यामुळें संघाचें कार्य अधिक व्यापक व सफल होण्यास ह्या परिषदांची मोठी मदत झाली. १९२१ च्या वसई येथील पहिल्या परिषदेनंतर, माहीम व केळवें येथें संघाच्या दोन परिषदा झाल्या. त्यानंतर १९२४ सालीं बोर्डी येथें भरलेली संघाची चौथी परिषद सर्वच दृष्टींनीं अत्यंत यशस्वी झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भरलेली समाजाची ही पहिलीच परिषद होती. ह्या परिषदेला जोडून एक शेतकी प्रदर्शनही भरविण्यांत आलें होतें. शेतकरी समाजाच्या दृष्टीनें ही योग्य अशीच गोष्ट होती. ह्या शेतकी प्रदर्शनांत हस्तकौशल्याचा एक लहानसा विभागही ठेवण्यांत आला होता. संघाच्या चार वर्षांच्या कार्यानें समाजांत ऐक्यभाव निर्माण झाल्याची स्पष्ट ग्वाही ह्या परिषदेनें दिली. संघाचा एक उद्देश सफल झाल्याचें मनोहर दृश्य संघाच्या संस्थापकांना ह्या परिषदेंत दिसलें. बोर्डी येथील ही परिषद संघाच्या इतिहासांत चिरस्मरणीय झाली आहे.

संघाच्या शैक्षणिक कार्यासाठीं निधीची अत्यंत आवश्यकता होती. म्हणून संघस्थापनेनंतर संघाच्या इतर कार्यांबरोबर निधि जमविण्याच्या कार्यावरही जोर देण्यांत आला. १९२४ नंतर १९२८ सालीं खुंतोडी (वसई) येथें भरलेली परिषद महत्त्वाची होय. त्या सालीं संघाकडून स्त्रीशिक्षणाला अधिक जोराची चालना देण्यांत आली. निरनिराळ्या परीक्षेंत उत्तीर्ण होणाऱ्या समाजांतील मुलींना कपड्यांच्या रूपानें बक्षिसें वांटण्याचा नवा उपक्रम संघानें सुरू केला. ह्याच परिषदेंत अण्णासाहेबांनीं आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्यासाठीं संघाला

एक हजार रुपयांची देणगी दिली. संघाचा निधि वाढविण्यासाठीं साहाय्यकांची व हप्त्यानें होणाऱ्या संघाच्या तहाहयात सभासदांची योजना ह्याच सालीं अमलांत आणण्यांत आली.

समाजामध्यें वैचारिक जागृति झपाट्यानें व्हावी म्हणून एखादें त्रैमासिक काढण्यासंबंधींचे विचार अण्णासाहेब व श्री. तात्यासाहेब चुरी, वगैरे मंडळीच्या मनांत बरेच दिवस घोळत होते. १९२४ सालच्या व्यवस्थापक मंडळाच्या सभेंत त्रैमासिक काढण्यासंबंधींचा आपला ठराव अण्णासाहेबांनीं वक्तृत्वपूर्ण भाषण करून मंजूर करून घेतला. ह्या ठरावानुसार १९२४ सालीं श्री. तात्यासाहेब चुरी ह्यांच्या संपादकत्वाखालीं 'क्षात्रसेवक' नांवाचें त्रैमासिक सुरू करण्यांत आलें. अण्णासाहेब ह्या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर होते. ह्या 'क्षात्रसेवका'नें सामाजिक सुधारणांना जोराची चालना देऊन फार महत्त्वाचें कार्य केलें.

दुसरें एक लहानसें कार्य ह्या कालांत संघानें हातीं घेतलें तें म्हणजे समाजाचें आरोग्य सुधारण्याकरितां उपयुक्त औषधें फुकट वांटण्याची योजना हें होय.

१९३० नंतर संघाकडून झालेल्या कार्यांचा उल्लेख पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत करण्यांत आला आहे.

समाजाची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून संघाचे नेते ह्याप्रमाणें आटोकाट प्रयत्न करीत होते. संघानें सुरू केलेली चळवळ जातिविषयक खरी; परंतु ती जातिनिष्ठ नव्हती. अण्णासाहेबांनीं राष्ट्रीयत्वाचें विशाल ध्येय सुरुवातीपासूनच संघासमोर ठेविलें होतें. अण्णासाहेब कट्टर राष्ट्रीयवादी होते. ते संघाच्या कार्यांकडे एका विशिष्ट नजरेनें पाहात असत. आपल्या देशांतील निरनिराळे समाज आणि ज्ञाति ह्या भारताच्या अविभाज्य घटक असून, राष्ट्राचा कोणताही घटक पंगु राहातां कामा नये अशी त्यांची व्यापक विचारसरणी होती. देशाच्या प्रगतीबरोबर त्या देशाचे घटक असे जे निरनिराळे समाज त्यांचीही प्रगति

होतच असते. परंतु ही प्रगति सहेतुक व एकाच पातळीवरून न होतां आस्तेकदम होत असते. ह्या समाजांना राष्ट्रीय जीवनांतील आपल्या कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांना कार्यप्रवृत्त करण्याचें बिकट कार्य केवळ संघटनेनेंच पार पाडणें शक्य होईल असें त्यांना वाटे. देशांतील निरनिराळे समाज सांस्कृतिक दृष्ट्या उंचावत जाऊन एकाच पातळीवर आले म्हणजे जातीजातींतील कृत्रिम बंधनें आपोआप नाहींशीं होतील असें त्यांचें ठाम मत होतें. संघाची संघटना निर्माण करतांना संघाकडे ह्याच उच्च हेतूनें त्यांनीं पाहिलें. संघाच्या कार्याची जोपासना करतांना संकुचित जातिनिष्ठ विचार त्यांना कधींच शिवला नाहीं. जातिनिष्ठ विचारांचा शेवट नेहमीं इतर समाजांचा द्वेष व तिरस्कार करण्यांत होत असतो. अशा प्रकारची घातुक समाजविद्वेषी शिकवण आपल्या समाजाला अण्णासाहेबांनीं कधींच दिली नाहीं. समाजा-समाजांतील संबंध सलोख्याचे असावेत, त्यांना परस्परांविषयीं आदरभाव वाटावा व आपल्या कर्तव्याची त्यांना जाणीव असावी अशा प्रकारचे त्यांचे विचार होते. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या आपल्या समाजाची प्रगति होऊन राष्ट्रांतील इतर समाजांबरोबरच आपल्या समाजाकडून राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागावा ह्याच उच्च भूमिकेवरून त्यांनीं संघाचें नेतृत्व केलें. त्यांच्या ह्या विचारसरणीला लवकरच गोड फळें आलीं. अण्णासाहेबांच्या समाजांत त्यांच्या शिकवणीमुळें राष्ट्रीय बाणा निर्माण झाला आणि पुढील कालांत झालेल्या अनेक राष्ट्रीय आंदोलनांत सोमवंशी क्षत्रिय समाजांतील अनेक कार्यकर्ते उदयास आले.

प्रकरण सहावें

# स्थानिक स्वराज्याचा श्रीगणेशा

आपल्या खेडेगांवांत व आपल्या शेतकरी समाजांत राहूनच आपणास जी लोकसेवा करतां येईल ती करायची हें अण्णासाहेबांचें ध्येय होतें. ह्या ध्येयानुसार अण्णासाहेबांनीं १९२० सालीं आपल्या सार्वजनिक जीवनास सुरुवात केल्यानंतर लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांत प्रवेश केला. अण्णासाहेबांचा ओढा विधायक कार्याकडे अधिक असल्यामुळें स्थानिक स्वराज्य संस्थांचें क्षेत्र त्यांच्या कार्याला अनुरूप असेंच होतें. विशेषतः तालुका लोकलबोर्ड, जिल्हा लोकलबोर्ड व ग्रामपंचायती ह्या संस्था ग्रामीण विभागांतील जनतेच्या हितार्थ झटणाऱ्या असल्याकारणानें, ह्या संस्थांतून होणारें कार्य अण्णासाहेबांच्या ध्येयाला पूरक होणारें होतें. ह्या संस्थांत अण्णासाहेबांचा प्रवेश वसई तालुका लोकलबोर्डांतून झाला. १९२२ सालीं विरारचे बावाजी कृष्ण जोशी व तापीदास बापूशा ह्यांच्या आग्रहावरून ते वसई तालुका लोकल-बोर्डाच्या निवडणुकीस उभे राहिले. जोशी व तापीदासशेठजी ह्यांचा अण्णासाहेबांच्या घराण्याशीं जिव्हाळ्याचा संबंध असून जोशी पूर्वी वसई तालुका लोकलबोर्डाचे अनेक वर्षे सभासद होते. अण्णासाहेबांनीं

ह्यापूर्वीच आपल्या सार्वजनिक कार्यास मोठ्या धडाडीनें सुरुवात केली होती. त्यांच्या सार्वजनिक कामाच्या आवडीमुळें व त्यांनीं ह्या बाबतींत दाखविलेल्या कर्तव्यतत्परतेमुळें, वसई तालुक्यांतील जनता त्यांच्याकडे आपला उदयोन्मुख पुढारी म्हणून पाहूं लागली होती. त्यामुळें १९२२ सालच्या वसई तालुका लोकलबोर्डाच्या निवडणुकीमध्यें अण्णासाहेब सहज निवडून आले. तेथूनच पुढें ते ह्या तालुका लोकलबोर्डाचे प्रतिनिधि म्हणून ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे सभासद झाले. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांत पुढें बहुमोल कामगिरी करून १९४६ सालीं ते मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री झाले, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांत, वसई तालुका लोकलबोर्डाचे सभासद म्हणून १९२२ सालीं अण्णासाहेबांनीं ह्याप्रमाणें पदार्पण केलें. ह्यापुढील वसई तालुका लोकलबोर्डाच्या व ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या प्रत्येक निवडणुकींत ते प्रचंड बहुमतानें निवडून येत असत. १९२२ पासून १९३० अखेर व पुन्हा १९३५ पासून १९३८ सालीं तालुका लोकलबोर्डें रद्द झालीं तोंपर्यंत ते वसई तालुका लोकलबोर्डाचे सभासद होते. १९३१ सालीं झालेल्या वसई तालुका लोकलबोर्डाच्या निवडणुकींतही ते निवडून आले होते. परंतु त्याच सालीं ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदीं त्यांची निवड झाल्यामुळे जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षांनीं तालुका लोकल-बोर्डाचे सभासद राहूं नये, अशी इष्ट प्रथा पाडण्याच्या दृष्टीनें त्यांनीं वसई तालुका लोकलबोर्डावरील आपल्या जागेचा राजीनामा दिला.

वसई तालुका लोकलबोर्डाचे सभासद ह्या नात्यानें त्यांनीं चांगली कामगिरी बजावली. खेड्यांतील जनतेच्या मुख्य अडचणी म्हणजे रस्ते व विहिरी ह्या होत. अण्णासाहेबांनीं आपल्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीनें लोकवर्गणी जमा करून शेतकऱ्यांना उपयुक्त असे अनेक रस्ते तालुक्यांत तयार करून घेतले व शेतकऱ्यांची एक मोठी अडचण दूर केली. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं विहिरी बांधवून लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली. ह्याही कामाकरितां त्यांनीं आपलें वजन खर्च करून

लोकांकडून वर्गणी मिळविली. त्याचप्रमाणें तालुकाबोर्डाच्या ऑफीस-साठीं बोर्डाच्या मालकीची इमारत पुरी करण्याचा प्रयत्न केला.

तालुका लोकलबोर्डाचे अण्णासाहेब कधीं अध्यक्ष झाले नसले तरी बोर्डाचें अंदाजपत्रक अगर बोर्डाचें कोणतेंही महत्त्वाचें काम त्यांच्या संमतीशिवाय होत नसे. वसई तालुका लोकलबोर्डाचे खरे सूत्रधार अण्णासाहेबच होते. वसई तालुका लोकलबोर्डाचे त्या वेळचे प्रमुख सभासद म्हणजे केशव रामचंद्र ऊर्फ बाळाशेट गाळवणकर, श्री. त्र्यंबक-राव बाळकृष्ण गव्हाणकर व अण्णासाहेबांच्या इतर अनेक कार्यांतील सहकारी श्री. नारायणराव गणेश गाळवणकर हे होत. वसई तालुका लोकलबोर्डाच्या कार्यांत श्री. त्र्यंबकराव गव्हाणकर व श्री. नारायणराव गाळवणकर ह्यांची अण्णासाहेबांना विशेष मदत झाली.

१९२३ सालचा मुंबई लोकलबोर्डाचा कायदा अस्तित्वांत आल्यानंतर १९२४ सालीं निवडणुकीमध्यें अण्णासाहेब वसई तालुक्यांतून ठाणें जिल्हा लोकलबोर्डावर निवडून आले. तेव्हांपासून १९४० सालीं वैयक्तिक सत्याग्रहांत भाग घेऊन कारागृहांत जाईपर्यंत सतत सोळा वर्षें ते जिल्हा लोकलबोर्डाचे सभासद होते. जिल्हा लोकलबोर्डांत त्यांनीं केलेल्या कार्याची सविस्तर हकीकत पुढें स्वतंत्र प्रकरणांत देण्यांत आली आहे.

मुंबई ग्रामपंचायतीचा कायदा पहिल्यानें १९२० सालीं पास झाला. परंतु त्या कायद्याखालीं निवडणुकीचे नियम वगैरे तयार होऊन ग्रामपंचायतीच्या प्रत्यक्ष निवडणुकी होण्यास १९२४ साल उजाडलें. त्या सालीं अण्णासाहेबांनीं आपल्या विरार गांवांत ग्रामपंचायत स्थापन केली व ते त्या पंचायतीचे सरपंच झाले. तेव्हांपासून १९४० पर्यंत अण्णासाहेब विरार ग्रामपंचायतीचे सरपंच होते.

१९२० सालच्या ग्रामपंचायतीच्या कायद्यान्वयें ग्रामपंचायतींना देण्यांत आलेले अधिकार अगदींच अपुरे असून त्यांचें कार्यक्षेत्रही अगदीं मर्यादित ठेवण्यांत आलें होतें. परंतु ह्या मर्यादित क्षेत्रांतही अण्णासाहेबांनीं अत्यंत निष्ठापूर्वक अनेक वर्षें कार्य केलें.

ग्रामपंचायतीसारख्या अत्यंत लहान स्थानिक स्वराज्य संस्थेचें उत्पन्न फारच मर्यादित व तुटपुंजें असतें. त्यामुळें सार्वजनिक स्वरूपाच्या कार्यासाठीं लागणाऱ्या पैशाची त्यांना नेहमींच अडचण भासते. पैसा उभारावयाचा म्हणजे जनतेवर कर बसवून उभारावा लागतो. अण्णासाहेबांनीं जेव्हां ग्रामपंचायत स्थापन केली त्या वेळीं घरपट्टी बसविल्याशिवाय पंचायतीचें कार्य चालणें शक्यच नव्हतें. आजही खेड्यांतील जनता घरपट्टीसारखे कर भरण्यास नाराज असते. १९२४ सालीं तर हें कार्य विशेष अवघड होतें. परंतु त्या काळांतसुद्धा लोकांचीं मनें न दुखवितां घरपट्टी बसवून त्यांनीं पंचायतीच्या उत्पन्नाची सोय केली व पंचायतीकडून मर्यादित स्वरूपांत जेवढें कार्य करतां येणें शक्य होतें तेवढें कार्य त्यांनीं आपल्या कारकीर्दींत केलें. ग्रामपंचायतीमार्फत त्यांनीं गांवांत नवे रस्ते केले, रस्त्यांची झाडलोट करण्याकरितां भंगी ठेवून गांवाची स्वच्छता वाढविली व रस्त्यावर दिव्यांची सोय केली. दर शनिवारीं विरार येथें भरणाऱ्या बाजारासाठीं त्यांनीं पंचायतीमार्फत मार्केट शेड्स् बांधल्या व ह्याप्रमाणें पंचायतीला कायमचें उत्पन्न मिळवून दिलें. विरार येथील स्मशानभूमि गांवापासून बरीच दूर असल्यामुळें विशेषतः पावसाळ्यांत स्मशानभूमीकडे जाणें पूर्वी अत्यंत त्रासाचें होतें. अण्णासाहेबांनीं पंचायतीमार्फत स्मशानभूमीकडे जाणारा चांगला रस्ता तयार केला व स्मशानभूमीवर स्वतःच्या खर्चानें आपल्या मातुश्रींच्या स्मरणार्थ छोटीशी धर्मशाळा बांधून पावसाळ्यांत चांगल्या निवाऱ्याची सोय केली. विरार गांवांत पाण्याचें फार दुर्भिक्ष. त्याचें लहानशा प्रमाणांत का होईना, निवारण व्हावें म्हणून स्वतःच्या पदरचा पैसा खर्च करून आणि आपल्या मित्रांकडून मदत मिळवून त्यांनीं गांवांत एक मोठी विहीर बांधली. उन्हाळ्यांतील पाण्याच्या टंचाईच्या दिवसांत ह्या विहिरीचा गांवकऱ्यांना फार उपयोग होत असतो.

पंचायतीच्या कार्याबाबत पंचायतीच्या सभासदांमध्यें अण्णासाहेबांनीं एकदिलाची भावना निर्माण केली होती. त्यामुळें पंचायतीच्या कारभारांत

कधीं विरोधाचे सूर निघाले नाहींत किंवा मतभेदाचे प्रसंगही आले नाहींत. ह्या सर्वांस अण्णासाहेबांचें व्यक्तिमत्व आणि पंचायतीच्या कार्यासंबंधीं त्यांची तळमळ हींच कारणीभूत होतीं. अण्णासाहेबांच्या सतरा वर्षांच्या दीर्घ कारकीर्दींत एकदाही ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्याचा प्रसंग न येतां सर्वच निवडणुकी बिनविरोध झाल्या, ही गोष्ट लक्षांत भरल्या-वांचून राहात नाहीं. स्वराज्य संस्थांच्या कारभाराबाबत त्यांच्या मताप्रमाणें अत्यावश्यक असणारी एकदिलाची ही भावना पुढें जिल्हा लोकलबोर्डाचा कारभार हाकतांनाही त्यांनीं निर्माण केली व ठाणें जिल्हा लोकलबोर्डाला एक महत्त्वाची परंपरा घालून दिली.

प्रकरण सातवें

# शेतकरी संघटनेचें प्रभावी कार्य

अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्यांतील व विशेषतः वसई तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठीं केलेल्या कार्याला त्यांच्या सार्वजनिक जीवनांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. अण्णासाहेबांचा जन्म एका शेतकरी कुटुंबांत झाला होता त्यामुळें म्हणा किंवा खेड्यांत राहाण्याच्या त्यांच्या आवडीमुळें म्हणा, अण्णासाहेबांना शेती व शेतकरी ह्यांसंबंधीं फार जिव्हाळा होता. स्वतःला शेतकरी म्हणवून घेण्यांत त्यांना फार अभिमान वाटे, एवढेंच नव्हे तर ते स्वतः आपली शेती लावीत असत. शेतीची पेरणी, आवणी, कापणी ह्यांसारखीं महत्त्वाचीं कामें ते आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं करवून घेत. पुढें मंत्री झाल्यानंतरसुद्धा शेतीच्या हंगामांत अण्णासाहेब मधून मधून शेती पाहून जात असत. जमिनीवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें. ज्या जमिनीवर आपण जगतों तिची शेतकऱ्याकडून आबाळ झालेली त्यांना मुळींच खपत नसे. स्वतः ते आपल्या जमिनीचा 'पोत' सुधारण्याचा सारखा प्रयत्न करीत. अण्णासाहेब स्वतः सधन होते, सुशिक्षित होते. त्यांनीं मनांत आणलें असतें तर ते खुशाल चैनींत राहूं शकले असते.

परंतु आपल्या सभोवतालच्या शेतकरी समाजाची दैन्यावस्था पाहून त्यांचें मन कळवळलें व शेतकऱ्यांच्या उन्नतीचें कार्य त्यांनीं हातीं घेतलें. त्यासाठीं ते आयुष्यभर सारखे झटले. १९१९ सालीं अण्णासाहेब पदवीधर झाले. वसई तालुक्यांतील शेतकरी समाजामधले पदवी संपादन करणारे तेच पहिले तरुण होते. धडाडी, वक्तृत्व, कार्यक्षमता, भारदस्तपणा, वगैरे गुण त्यांच्या अंगीं उपजतच होते. शेतकऱ्यांच्या उन्नतीचें कार्य त्यांनीं हातीं घेतल्यानंतर त्यांच्या ह्या गुणांमुळें अवघ्या दोनतीन वर्षांतच वसई तालुक्यांतील शेतकऱ्यांचे प्रमुख पुढारी म्हणून ते ओळखले जाऊं लागले. त्याला कारणेंही तशींच होतीं. अण्णासाहेब स्वतः शेतकरी समाजांतील असल्याकारणानें शेतकऱ्यांना आपणास हवा असलेला पुढारी मिळाला असें वाटणें साहजिकच होतें. अण्णासाहेबांनाही शेतकऱ्यांसंबंधीं फार जिव्हाळा होता. परंतु अण्णासाहेबांकडे शेतकऱ्यांचें पुढारीपण आलें त्याचें मुख्य कारण शेतकऱ्यांच्या तक्रारी व अडचणी निवारण्यासाठीं त्यांनीं जे संघटित प्रयत्न केले त्यांतच आपणांस आढळून येईल. अण्णासाहेबांपूर्वीं शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची व तक्रारींची संघटित रीत्या दाद लावून घेणारा वसई तालुक्यांत कोणीही पुढारी नव्हता. किंबहुना अण्णासाहेबांपूर्वीं वसई तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या पुढाऱ्याची जागा रिकामीच होती असें म्हणणें मुळींच अस्थानीं होणार नाहीं. शेतकऱ्यांसाठीं अनेकविध कार्य करून अण्णासाहेबांनीं ही उणीव पूर्णपणें भरून काढली.

मागासलेला शेतकरी समाज अण्णासाहेबांपूर्वीं आपल्या अडीअडचणी निवारण करून घेण्यासाठीं इतर पांढरपेशा समाजाकडे दीनवाण्या नजरेनें पाहात असे. शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची दाद लावून घ्यावयाचा त्या काळांतील एकमेव मार्ग म्हणजे अर्जविनंत्यांचा. इंग्रजी जाणणाऱ्या एखाद्या इसमाकडून अर्ज लिहून घ्यावयाचा व तो सरकारी अधिकाऱ्यांकडे पाठवून देऊन त्याच्या निकालाची मार्गप्रतीक्षा करीत बसावयाचें. परंतु अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत लक्ष घालण्यास सुरुवात

केल्यानंतर सर्व परिस्थिति पालटली. शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं दूर करावयाचीं, त्यांना योग्य सवलती मिळवून द्यावयाच्या, म्हणजे त्यासाठीं केवळ अर्जविनंत्यांचा मार्ग उपयोगी नाहीं, त्यासाठीं संघटित स्वरूपाचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत, हें अण्णासाहेबांनीं तात्काळ ओळखलें व त्यासाठीं तालुक्यांतील प्रमुख लोकांच्या मदतीनें त्यांनीं १९२३ सालीं वसई तालुका शेतकी सभेची स्थापना केली. ह्या कार्यात अण्णासाहेबांना सहकार्य देणाऱ्यांत भायजी जगू राऊत, आंगण कुवेल, मोरेश्वर केशव सावे, मनु लोप, सिलु कुरेल, सखाराम नथु पाटील, सखाराम नाना नाईक, पांडुरंग गोविंद ऊर्फ अण्णा कोपराडकर, श्री. बापू बाबाजी जाधव, श्री. नारायण गणेश गाळवणकर, श्री. गोविंद गणेश चौधरी, वगैरे तालुक्यांतील प्रमुख मंडळी होती. ह्या सभेनें पुढील तीस वर्षांत अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं केलेल्या कार्यानें त्यांच्या जीवनाचा मोठा भाग व्यापलेला आहे. ह्या संस्थेला जोडून अण्णासाहेबांनीं १९२८ सालीं मुंबई इलाखा लँड लीगची शाखा वसई तालुक्यांत सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे इलाखा लँड लीगचे अध्यक्ष होते. ह्या दोन संस्थांमार्फत पुढें जी वसई तालुक्यांतील धारावाढीविरुद्ध चळवळ झाली, तिच्यामुळें अण्णासाहेबांचें नांव सबंध महाराष्ट्रांत महशूर झालें.

वसई शेतकी सभेची वार्षिक सभा दरसाल डिसेंबर महिन्यांत होत असे आणि कारणपरत्वें ज्या वेळीं जरूरी भासेल त्या वेळीं शेतकी सभेच्या इतरही सभा घेतल्या जात. ह्या सभांतून शेतकऱ्यांचीं निरनिराळ्या प्रकारचीं गाऱ्हाणीं दूर करण्यासंबंधींच्या प्रश्नांचा विचार होत असे. शेतकी सभेमार्फत अण्णासाहेबांनीं पुढील कालांत शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांची दाद लावून घेतली. ह्या प्रकरणांत, शेतकऱ्यांच्या जंगलविषयक दरसाल उद्भवणाऱ्या तक्रारींची दाद लावून घेण्यासाठीं सभेनें जे प्रयत्न केले आणि वसई तालुक्यांतील पानवेलीवर आलेल्या रोगाच्या निवारणार्थ जें कार्य केलें त्याबद्दलची हकीकत मुख्यतः दिली आहे.

वसई तालुक्याचे बंदरपट्टी व जंगलपट्टी असे निसर्गतःच दोन भाग झालेले आहेत. ह्या दोन भागांच्या सीमारेषेवरून पश्चिमी रेल्वेचा लोहमार्ग गेलेला आहे. रेल्वेच्या पश्चिमेकडील भागाला बंदरपट्टी व पूर्वेकडील भागाला जंगलपट्टी असें म्हणतात. बंदरपट्टीचा भाग अत्यंत सुपीक व समृद्ध असून पानवेल, केळीं, भाजीपाला, वगैरे बागायती पिकांचा आगर असल्याकारणानें 'आगर' ह्या नांवानेंही तो प्रसिद्ध आहे. बंदरपट्टींतील बागाईत शेतकरी आपल्या पिकांच्या लागवडीसाठीं लागणाऱ्या बांबू, बुंधी, टोंकरे, वगैरे मालाबाबत मुख्यतः तालुक्यांतील जंगलपट्टीच्या भागावर अवलंबून असतो. त्यासाठीं जंगलाचा कांहीं भाग दरसाल खुला करून घेणें, जंगलखात्याकडून बागायतदारांना लागणारा माल सवलतीच्या दरानें मिळवून घेणें, ह्या मालाच्या वाहतुकीबाबत परवाने वगैरे संबंधींच्या गैरसोयी दूर करून घेणें, इत्यादि अनेक प्रकारच्या शेतकऱ्यांच्या अडचणींची दाद अण्णासाहेबांनीं शेतकी सभेमार्फत जंगलखात्याकडून दरसाल लावून घेतली व शेतकऱ्यांचा दुवा मिळविला.

जंगलपट्टीच्या भागांतील शेतकऱ्यांच्याही जंगलखात्याच्या बाबतींत अनेक तक्रारी असतात. भातशेतीसाठीं पावसाळ्यापूर्वी राब तयार करण्याची पूर्वीची पद्धत आहे. त्यासाठीं जंगलांतून पालापाचोळा आणावा लागतो. हा पालापाचोळा जंगलांतून बाहेर आणण्यासाठीं परवानगी मिळविण्याच्या बाबतींत जंगलखात्याबरोबर शेतकऱ्यांच्या नेहमींच अनेक तक्रारी होत. ह्या तक्रारींची अण्णासाहेबांनीं दाद लावून घेतली. त्याचप्रमाणें इंजायली झाडें शेतकऱ्यांच्या घरगुती उपयोगासाठीं तोडण्याची परवानगी मिळविणें, शेतकऱ्यांच्या घरांच्या व गोठ्यांच्या दुरुस्तीसाठीं जंगलांतून लाकडें तोडून आणण्याबाबत सवलती मिळविणें, ह्या व अशाच प्रकारच्या अनेक गरजा जंगलपट्टींतील शेतकऱ्यांच्या असत. ह्याही बाबतींत जंगलखात्याकडून अण्णासाहेबांनीं शेतकी सभेच्या मार्फत सर्व सवलती मिळवून दिल्या.

शेतकी सभेमार्फत हें कार्य चालू असतांनाच शेतकी सभेला एका मोठ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावें लागलें. १९२६ च्या सुमारास वसई तालुक्यांतील पानवेलींवर एक प्रकारचा रोग आला. पानवेलींची लागवड ही बंदरपट्टींतील बागायतदारांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची लागवड होय. पानवेलींच्या लागवडीवर अनेक शेतकऱ्यांचा चरितार्थ अवलंबून असून एकर–अर्धा–एकर जमिनींतल्या लागवडीवर लहान लहान कुटुंबें आपला प्रपंच चालवूं शकतात. वसई तालुक्यांत होणारी पानवेल काळ्या जातीची असून तिच्या लागवडीसाठीं फार खर्च येत असतो. ह्या पानवेलीची लागवड वसई तालुक्यांत १८८० पासून होऊं लागली व तिचा हळूहळू प्रसार होऊन पहिल्या महायुद्धानंतर वसई आगरांतील बागायतदारांच्या चरितार्थाचें ती मुख्य साधन होऊन बसली. अशा रीतीनें ऊर्जितावस्थेस आलेल्या ह्या धंद्यावर १९२६ सालीं 'मर' (Fight of thora) ह्या नांवाचा चमत्कारिक रोग आला. पहिल्या वर्षी ह्या रोगानें लागवडीखालील सुमारें २५ टक्के पानवेली दगावल्या. पुढील वर्षी हें प्रमाण जवळ जवळ ५० टक्क्यांपर्यंत गेलें व त्याच्या पुढील वर्षी तर हें प्रमाण ७५ टक्क्यांवर गेलें. पानवेलीवर आलेल्या ह्या अकस्मात् संकटानें वसई तालुक्यांतील बागायतदार अगदीं हवालदील होऊन गेले. कारण पानवेल जर अशाच प्रमाणांत दरवर्षी मरूं लागली तर तिच्यापासून मिळणारें उत्पन्न तर बाजूलाच राहो परंतु तिच्या लागवडीसाठीं लागणारा मोठा खर्चही भरून न येण्याची मोठी भीति निर्माण झाली. बागायतदारांवर आलेल्या ह्या संकटाचें त्वरित निवारण होणें जरुरीचें होतें. म्हणून अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत पुढाकार घेऊन, निश्चित रोगप्रतिबंधक उपाययोजना होण्याच्या दृष्टीनें अनेक सरकारी अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या व वसई तालुक्यांतील बागायतदारांवर आलेल्या संकटाची त्यांना जाणीव करून दिली. त्यामुळें कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांनीं रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या भागाला भेट तर दिलीच परंतु मुंबई सरकारचे प्लँट पॅथॉलॉजिस्ट डॉ. उप्पल

ह्यांनींही अण्णासाहेबांच्या समवेत पानवेलींच्या बागांची पाहाणी केली व जरूर ती उपाययोजना सुचविली. परंतु अण्णासाहेब एवढें करूनच स्वस्थ बसले नाहींत. मुंबई सरकारचे त्या वेळचे शेतीखात्याचे डायरेक्टर डॉ. बर्न्स ह्यांची त्यांनीं अनेक वेळां भेट घेऊन पानवेली-वरील रोगामुळें वसई तालुक्यांत निर्माण झालेली गंभीर परिस्थिति त्यांना समजावून सांगितली. अण्णासाहेबांच्या ह्या प्रयत्नांना यश येऊन पानवेलीवरील रोगाचें संशोधन करण्यासाठीं सन १९२९ मध्यें वसई येथें एक संशोधन केंद्र उघडण्यांत आलें व श्री. मलेल् नांवाच्या एका हुशार व तरुण कृषिविशारद पदवीधराची ह्या केंद्राचे प्रमुख म्हणून नेमणूक करण्यांत आली. श्री. मलेल् अत्यंत निरलस व मिशनरी वृत्तीचे संशोधक होते. त्यांनीं केलेल्या प्रयोगाला हळूहळू यश येऊं लागलें. आरंभीं आरंभीं जरी त्यांना निराश होण्याचे अनेक प्रसंग आले तरी अवघ्या दोनतीन वर्षांत ह्या रोगाचें मूळ शोधून काढण्यासाठीं व त्याचें स्वरूप समजून घेण्यासाठीं त्यांनीं केलेल्या अविश्रान्त संशोधनाला यश येऊन सन १९३५ सालीं ह्या रोगावर पूर्ण खात्रीचा असा प्रतिबंधक उपाय त्यांनीं शोधून काढला. ह्या रोगाच्या बाबतींत रोगनाशक औषध (Curative) शोधून काढण्यांत अद्यापिही जरी यश आलेलें नसलें तरी श्री. मलेल् ह्यांनीं संशोधून काढलेल्या प्रतिबंधक उपायामुळें पानवेलीवरील ह्या रोगाच्या आपत्तीस तोंड देतां येणें आतां शक्य झालें आहे. मुसळधार व सतत पडणारा पाऊस व त्यानंतर पडणारें कडक ऊन ह्यांमुळें मुख्यतः ह्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. अशा वेळीं उपयोगी पडणाऱ्या प्रतिबंधक योजनेचें ज्ञान बागायतदारांना आतां अवगत झाल्यामुळें गेलीं सतरा अठरा वर्षें पानवेलीच्या रोगापासून आपल्या धंद्याचा व पर्यायानें आपला बचाव ते करूं शकले आहेत.

अशाच प्रकारची दुसरी आपत्ति वसई तालुक्यांतील नारळीच्या भागावर १९३२ सालीं आली होती. नारळीच्या झाडावर एक प्रकारची कीड पडे व झाडावरील झावळ्या आपोआप सुकूं लागत. ह्या रोगाची

सुरुवात प्रथमतः शेजारच्या साष्टी तालुक्यांत झाली व पुढें वसई तालुक्यांतही त्याचा प्रसार झाला. वसई तालुका शेतकी सभेनें हा प्रश्न ताबडतोब हातीं घेतला व सभेच्या प्रयत्नामुळें सरकारनें ह्या रोगासंबंधीं शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठीं एका कीटकशास्त्रज्ञाची नेमणूक केली. अशा रीतीनें वसई तालुक्यावर येऊं घातलेलें हें दुसरें महासंकट तालुका शेतकी सभेच्या प्रयत्नानें टळलें.

वसई तालुका शेतकी सभेचें काम पुढें सारखें वाढतच गेलें. शेतकी सभेची स्थापना करण्यांत अण्णासाहेबांनीं जरी पुढाकार घेतलेला असला तरी त्या संस्थेचें प्रमुखपद आपणाकडे न घेतां त्या पदावर भायजी जगू राऊत ह्यांच्यासारख्या प्रसिद्ध शेतकरी पुढाऱ्याची त्यांनीं योजना केली. त्याचप्रमाणें अंगण कुवेल, मोरेश्वर केशव सावे, वगैरेसारख्या सद्‌गृहस्थांना त्यांनीं संस्थेचे प्रमुख पदाधिकारी केलें. स्वतःकडे मोठेपण न घेतां आपल्या सहकाऱ्यांना मानाचें स्थान देऊन आपलें कार्य करीत राहाण्याची अण्णासाहेबांची जी विशिष्ट कार्यपद्धति होती तिचाच अंगीकार त्यांनीं तालुका शेतकी सभेच्या बाबतींत केला. आरंभींचे संस्थेचे अध्यक्ष भायजी जगू राऊत हे १९३६ सालीं निधन पावल्यावर अण्णासाहेब वसई शेतकी सभेचे अध्यक्ष झाले आणि १९४६ सालीं मंत्रीपदावर जाईपर्यंत म्हणजे जवळजवळ अकरा वर्षें त्यांनीं अध्यक्ष म्हणून शेतकी सभेचें काम पाहिलें.

प्रकरण आठवें

# धारावाढ आंदोलन

सन १९२९ मध्यें वसई तालुक्यांतील धारावाढीविरुद्ध अण्णासाहेबांनीं संघटित रीत्या जी मोठी चळवळ केली तिला ठाणें जिल्ह्याच्या इतिहासांत फार महत्त्वाचें स्थान आहे. ह्या चळवळीची पार्श्वभूमि थोडक्यांत अशी आहे. सन १८९५–९६ मध्यें वसई तालुक्यांत पहिली रिव्हिजन सेटल्मेंट झाली. सरकारच्या कायद्याप्रमाणें दर तीस वर्षांनीं रिव्हिजन सेटल्मेंट होत असते. त्याप्रमाणें स. १९२६ मध्यें सरकारनें वसई तालुक्यांत दुसरी रिव्हिजन सेटल्मेंट केली. ह्या रिव्हिजन सेटल्मेंटमध्यें जमीनधाऱ्यांत दरसाल शें. ३३ इतकी वाढ सुचविण्यांत आली होती व कायद्याप्रमाणें ह्या बाबतींत लोकांच्या हरकती सरकारकडून मागविण्यांत आल्या होत्या. ह्या धारावाढीपूर्वी थोडाच काळ अगोदर लोकलफंड सेस जो पूर्वी एक आणा होता तो दोन आणे करण्यांत आला होता. त्यामुळें जमीनधाऱ्यांत सुचविलेली वाढ आणि लोकलफंडामध्यें झालेली वाढ एकत्र विचारांत घेतली असतां एकंदर वाढीचें प्रमाण दरसाल शेंकडा ५२ तें ५३ वर जात होतें. शेतकऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणें ह्या वाढीचा

शेतकऱ्यांवर पडणारा एकंदर बोजा जबरदस्त व अन्यायकारक होता, एवढेंच नव्हे, तर अशा प्रकारची भरमसाट वाढ इलाख्यांत इतरत्र कोठेंही झालेली नव्हती म्हणून ह्या अन्यायमूलक वाढीविरुद्ध वसई शेतकी सभेला चळवळ सुरू करणें प्राप्त झालें.

प्रथमतः सरकारी जाहीरनाम्याप्रमाणें, गांवोगांवच्या पाटलांमार्फत खातेदारांच्या धारावाढीविरुद्ध असलेल्या हरकती खुलासेवार स. १९२७ तच नोंदविण्यांत आल्या. सरकारचें म्हणणें असें होतें कीं १८९५–९६ सालच्या पिकांच्या किंमतीच्या मानानें १९२६ सालीं पिकांच्या किंमतींत दुपटीनें वाढ झालेली होती. त्याला खातेदारांचें उत्तर असें होतें कीं पिकांच्या किंमतींत झालेली दुप्पट वाढ खरी असली तरी पिकांच्या लागवडीसाठीं लागणारा खर्च १८९६ च्या मानानें १९२६ सालीं चौपट वाढला होता. त्यामुळें पूर्वींचाच सरकारसारा डोईजड झाला असतांना त्यांत वाढ करणें अन्यायाचें होतें. खातेदारांचें हें म्हणणें हरकतींच्या रूपानें सरकारकडे कळविणें जरूर होतें. त्यासाठीं करावयाच्या अर्जांचे नमुने छापवून घेऊन खातेदारांचे हरकतअर्ज प्रत्येक सभांतून सरकारकडे पाठवून देण्याची वसई तालुका शेतकी सभेनें व्यवस्था केली. परंतु शेतकी सभेच्या ह्या प्रारंभिक चळवळीचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

ह्यानंतरचा पुढील मार्ग म्हणजे धारावाढीविरुद्ध सामुदायिक रीत्या चळवळ करून त्या चळवळीचें लोण तालुक्यांतील प्रत्येक शेतकऱ्याकडे खातेदाराकडे पोहोंचविणें हा होता. ह्याच मार्गाचा शेतकी सभेनें अवलंब केला. ता. ५ सेप्टेंबर १९२८ रोजीं वसई शेतकरी सभेनें शेतकऱ्यांची एक मोठी सभा भरविली. ह्या सभेंत शेतकऱ्यांचें म्हणणें तपशीलवार सरकारसमोर मांडण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. ह्या समितीचे अध्यक्ष त्या वेळचे वसई येथील सुप्रसिद्ध वकील म. ल. प्रताप हे होते व अण्णासाहेब हे ह्या समितीचे कार्यवाह होते. समितीचे कार्यवाह ह्या नात्यानें अण्णासाहेबांनीं जमीनमहसुलाच्या सर्व प्रश्नांना

८५७८

अगदीं बारकाईनें व चिकित्सापूर्ण अभ्यास केला. त्यासाठीं त्यांनीं पहिल्या व दुसऱ्या रिव्हिजन सेटल्मेंटचे सविस्तर रिपोर्ट्स हाताळले. वसई तालुक्यांतील जमिनीपैकीं गोडी शेतजमीन किती, खारी शेतजमीन किती व बागाईत जमीन किती, ह्यासंबंधीं त्यांनीं प्रथम सविस्तर माहिती गोळा केली. त्यानंतर ह्या जमिनींतून दरवर्षी मिळणारें एकरीं उत्पन्न, लागवडीसाठीं येणारा खर्च, जमिनीच्या किंमती, वगैरे संबंधीं आंकडेवार माहिती काळजीपूर्वक मिळवून ह्या सर्व माहितीच्या आधारें सरकारला सादर करण्यासाठीं त्यांनीं परिश्रमपूर्वक एक मोठी कैफीयत (Statement) तयार केली. टाईप केलेल्या पंचवीस फुलस्केप पानांची ही कैफीयत असून ह्या कैफियतीच्या शेवटीं निरनिराळीं परिशिष्टें जोडण्यांत आलीं होतीं. ह्या परिशिष्टांमध्यें स. १८९६ पासून १९२६ पर्यंत निरनिराळ्या पिकांच्या दरसालच्या किंमती, प्रत्येक पिकाला लागवडीसाठीं येणारा खर्च, जमिनीच्या किंमती, मजुरीचे दर, इत्यादीबाबत तपशीलवार आंकडे देण्यांत आले होते. कैफियतीमध्यें धारावाढीसंबंधींच्या सर्व प्रश्नांची अत्यंत मुद्देसूद व उद्बोधक चर्चा करण्यांत आली होती व उपलब्ध माहितीच्या आधारें सरकारनें ठरविलेली धारावाढ करणें कसें अन्यायाचें आहे हें उत्तम रीतीनें दाखविण्यांत आलें होतें.

समितीचे अध्यक्ष प्रताप व कार्यवाह म्हणून अण्णासाहेब ह्यांनीं ही कैफीयत मुंबई सरकारच्या रेव्हिन्युखात्याचे सेक्रेटरी मि. जे. डब्ल्यू स्मिथ, आय्. सी. एस्. ह्यांजकडे ता. १०-११-२८ रोजीं दाखल केली. ह्या कैफियतीबाबत सरकारकडून शेतकीखात्याचे डायरेक्टर व जिल्ह्याचे कलेक्टर ह्यांच्या मार्फत चौकशी झाली. त्यानंतर ता. २२-१-२९ रोजीं शेतकी सभेचें एक शिष्टमंडळ गव्हर्नरसाहेबांस भेटलें. कैफियतीबाबत सरकारनें मागितलेला खुलासा गव्हर्नरसाहेबांकडे सादर करून तालुक्यांतील शेतकऱ्यांचें म्हणणें ह्या शिष्टमंडळानें त्यांच्यापुढें मांडलें. तालुका सभेच्या ह्या सर्व खटपटीला सरकारच्या रेव्हिन्युखात्याच्या सेक्रेटरीकडून ‘ सरकारनें शेतकी सभेच्या कैफियतींत मांडलेल्या सर्व

मुद्द्यांचा विचार केलेला असून, धारावाढीबाबत सरकारनें काढलेल्या हुकुमांचा पुनर्विचार करण्याचें कारण नाहीं' अशा प्रकारचें नकारार्थी व निराशाजनक उत्तर ता. ४-२-१९२९ रोजीं मिळालें. त्यामुळें धारावाढीबाबत आपलें गाऱ्हाणें सरकारपुढें मांडण्यासाठीं शेतकी सभेनें आतांपर्यंत स्वीकारलेला मार्ग जवळ जवळ बंदच झाला.

शेतकी सभेला सरकारकडून आलेलें निराशाजनक उत्तर पाहून शेतकी सभेचे अण्णासाहेब व इतर पुढारी बिलकुल डगमगून गेले नाहींत. धारावाढीबाबतच्या शेतकऱ्यांच्या चळवळीला पूर्वीपेक्षांही अधिक प्रातिनिधिक व तीव्र स्वरूप देण्यासाठीं त्यांनीं वसई तालुक्यांतील सर्व खातेदारांची व शेतकऱ्यांची एक परिषद १९२९ च्या एप्रिल महिन्यांत वसई रोड माणिकपूर येथें भरविली. ह्या सभेचें अध्यक्षस्थान पुण्याच्या 'मराठा' पत्रकाचे त्या वेळचे संपादक श्री. दामोदर विश्वनाथ गोखले ह्यांनीं स्वीकारलें होतें. परिषदेस तालुक्यांतून ठिकठिकाणचे हजारों शेतकरी उपस्थित होते. परिषदेंत शेतकी सभेनें सरकारला सादर केलेल्या कैफियतीस अनुसरून वसई तालुक्यांत झालेली अन्याय्य धारावाढ रद्द करण्यांत यावी अशा प्रकारचा सरकारला विनंती करणारा ठराव पास करण्यांत आला. परंतु सरकारनें ह्याही ठरावाला दाद दिली नाहीं.

ह्याच सुमारास मुंबई इलाख्यांत सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई इलाखा लँड लीगची स्थापना करण्यांत आली होती. ह्या संस्थेची वसई तालुक्यांत शाखा काढण्यांत येऊन तिच्या अध्यक्षपदीं म. ल. प्रताप व चिटणिसाच्या जागेवर अण्णासाहेब व श्री. नारायणराव गाळवणकर ह्यांची निवड करण्यांत आली. जुन्या तालुका शेतकी सभेचे भायजी जगू राऊत व श्री. गणेश गोविंद चौधरी हे अनुक्रमें अध्यक्ष व चिटणीस होते. ह्यापुढें धारावाढीसंबंधीं अगर शेतकऱ्यांच्या इतर गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं ज्या सभा झाल्या त्या ह्या दोन्ही संस्थांच्या विद्यमानें झाल्या.

ता. २५-८-१९२९ रोजीं होळीबाजार येथें वसई तालुक्यांतील शेतकऱ्यांची सभा होऊन त्या सभेंत पास झालेल्या ठरावान्वयें, धारावाढीबाबतच्या गाऱ्हाण्यासंबंधीं सरकारकडे पुन्हा एकदा दाद मागण्यांत आली. ह्या सभेंत एक जाहीर निवेदन (memorial) तयार करण्यांत येऊन तें सरकारकडे पाठविण्यांत आलें. परंतु सरकारनें ह्याही वेळीं धारावाढीबाबतच्या शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यासंबंधीं सहानुभूति दाखविली नाहीं. शेवटीं चार महिने वाट पाहून ता. २२-१२-२९ रोजीं वसई तालुका लँड लीग व तालुका शेतकी सभा ह्या दोन्ही संस्थांच्या विद्यमानें तालुक्यांतील शेतकऱ्यांची आणखी एक सभा घेण्यांत येऊन त्या सभेंत धारावाढीबाबत सरकारनें स्वीकारलेल्या उदासीन व सहानुभूतिशून्य वृत्तीचा एकमतानें निषेध करण्यांत आला. ह्याच सभेंत १९३० सालच्या सरकारसाऱ्याचा फक्त पहिलाच हप्ता जानेवारी महिन्यामध्यें तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं भरावा असा आदेश देण्यांत आला. त्या महिन्यांत सरदार वल्लभभाई पटेल वसई तालुक्यांतील परिस्थितीची पाहाणी करण्याकरितां येणार होते. ते ह्या बाबतींत जो सल्ला देतील त्याप्रमाणें शेतकऱ्यांनीं धारावाढीविरुद्ध न्याय्य लढा देण्यास तयार राहावें असाही आदेश तालुक्यांतील सर्व खातेदारांना व शेतकऱ्यांना ह्या सभेंत देण्यांत आला.

जानेवारी महिन्यामध्यें वल्लभभाईंनीं वसईस भेट देऊन धारावाढीबाबत तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. त्यानंतर ता. ११-२-३० रोजीं तालुक्यांतील सर्व खातेदार व शेतकरी ह्यांची एक मोठी सभा श्री. दा. वि. गोखले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं घेण्यांत आली. ह्या सभेंत धारावाढीबाबतच्या सरकारच्या बेफिकीर धोरणाचा निषेध करण्यांत आला. हा निषेध कृतींत दर्शविण्यासाठीं वाढीव धाऱ्यापैकीं कमींत कमी एक रुपया शेतकऱ्यांनीं व खातेदारांनीं सरकारांत भरणा करूं नये व अशा रीतीनें धारा न भरल्यानें जमिनी अगर इतर मालमत्ता जप्त झाल्यास ती कोणीं विकत घेऊं नये व वसुलीच्या बाबतींत सरकारला कोणत्याही प्रकारची मदत करूं नये असा आदेश सर्वांना देण्यांत आला.

त्यानंतर धारावाढीविरुद्ध निषेध म्हणून जमीनमहसुलापैकीं एक रुपया न भरल्याबद्दल खातेदारांच्या व शेतकऱ्यांच्या सर्व जमिनी खालसा करण्याचें अन्याय्य धोरण सरकारनें स्वीकारलें. ह्या धोरणाचा ता. २२-६-३० रोजीं मुंबई इलाखा लँड लीगचे चिटणीस व पुण्याच्या मराठा पत्रकाचे संपादक श्री. दि. वा. दिवेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरण्यांत आलेल्या सभेंत तीव्र निषेध करण्यांत आला. सरकारनें जप्त केलेल्या जमिनी पुढें विक्रीस काढल्या नाहींत. परंतु ज्या खातेदारांनीं जमीनमहसुलाचा एक रुपया निषेध म्हणून भरणा केला नव्हता त्यांचा फर्निचर, वगैरे माल सरकारनें जप्त करून विक्रीस काढला. ज्या खातेदारांचा माल अशा प्रकारें जप्त करण्यांत आला त्यांत अण्णासाहेब, श्री. नारायणराव गाळवणकर, श्री. त्रिंबकराव गव्हाणकर, वगैरे प्रमुख मंडळी होती.

ह्याच सुमारास देशांत मिठाच्या सत्याग्रहाची प्रचंड चळवळ सुरू झाली आणि ह्या देशव्यापी नव्या चळवळीमध्यें तालुक्यांतील सर्व कार्यकर्ते गुंतून गेल्यामुळें धारावाढीबाबतची ही स्थानिक स्वरूपाची चळवळ मागें पडली.

धारावाढीविरुद्ध करण्यांत आलेल्या ह्या चळवळीचें फळ जरी दृश्यरूपानें पदरांत पडलें नाहीं तरी ह्या चळवळीमुळें केवळ वसई तालुक्यांतीलच नव्हे तर सबंध ठाणें जिल्ह्यांतील शेतकरीवर्ग जागृत होऊन संघटित झाला, हा ह्या चळवळीचा मोठाच फायदा झाला. कारण १९२६ सालीं दुसऱ्या रिव्हिजन सेटलमेंटप्रमाणें करण्यांत आलेली धारावाढ केवळ वसई तालुक्यापुरतीच मर्यादित नव्हती. ठाणें जिल्ह्यांतील साष्टी, कल्याण, भिवंडी व मुरबाड ह्याही तालुक्यांत वसई तालुक्या-प्रमाणेंच धारावाढ करण्यांत आली होती. ह्या पांच तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं व खातेदारांनीं पुढें संघटित होऊन धारावाढीबाबतचें आपलें गाऱ्हाणें त्या वेळचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साईक्स ह्यांच्यासमोर एका कैफियतीच्या द्वारें मांडलें. ह्या निमित्तानें जिल्ह्यांतील

शेतकरी व खातेदार संघ ह्या नांवाची संघटना निर्माण करण्यांत आली. ह्या संघटनेंत अण्णासाहेब वर्तक, कल्याणचे श्री. गणपतराव फडके, शंकरराव झुंझारराव, वगैरे मंडळींनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. ह्या संघामार्फत पुढें दरसाल जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची व खातेदारांची सभा घेण्यांत येत असे आणि जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेतली जाई. १९३१ पासून धान्याचे व बागायतीच्या पिकांचे भाव एकाएकीं सारखे घसरूं लागले व शेतकरीवर्गाची आर्थिक स्थिति एकदम खालावली. अशा परिस्थितींत शेतकऱ्यांवरील आर्थिक बोजा हलका व्हावा म्हणून वसई तालुका शेतकी सभेनें, जिल्हा सभेच्या सहकारितेनें चळवळ करून १९३१ ते ३४ पर्यंतच्या सरकारधाऱ्यांत रुपयास तीन आणेप्रमाणें सूट मिळविली. १९३४ ते १९४० पर्यंत उतरलेल्या भावांत फारशी सुधारणा न झाल्यामुळें वसई तालुका सभेला ह्या बाबतींतले आपले प्रयत्न सारखे सुरू ठेवावे लागले. ह्या प्रयत्नांना प्रत्येक वर्षी यश येऊन सरकारधाऱ्यांत रुपयास कधीं दोन आणे तर कधीं तीन आणे ह्याप्रमाणें सूट मिळाली. १९४० नंतर व युद्धोत्तर कालांत धान्याचे व बागाइती पिकांचे भाव बरेच सुधारल्यामुळें जिल्हा व तालुका सभांना धारावाढीच्या बाबतींतली ही चळवळ चालू ठेवण्याचें कारणच उरलें नाहीं.

वसई तालुका शेतकी सभा व ठाणें जिल्हा शेतकरी व खातेदार संघ ह्या दोन्ही संस्था स्थापन करण्यांत आणि त्यांचें संवर्धन करण्यांत अण्णा-साहेबांचेच प्रयत्न मुख्यतः कारणीभूत होते. त्यांनीं आपल्या नेतृत्वानें ह्या संस्थांना मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. विशेषतः वसई तालुका शेतकी सभा व वसई तालुका लँड लीग ह्या संस्थांमार्फत धारावाढी-विरुद्ध अण्णासाहेबांनीं केलेली चळवळ चिरस्मरणीय झाली. संघटित व सामुदायिक रीत्या चळवळ करण्याचा वसई तालुक्यांतील शेतकऱ्यांचा व खातेदारांचा तो पहिलाच प्रयत्न होता. ह्या चळवळीमुळेंच तालुक्यांतील सर्व शेतकरीवर्ग अण्णासाहेबांच्या कुशल नेतृत्वाखालीं संघटित

झाला. त्यांनीं ह्या कार्यासाठीं आपल्या आयुष्याचीं दोनतीन वर्षें खर्ची घातलीं. अण्णासाहेबांनीं ह्या चळवळीचें जें नेतृत्व केलें त्यांत अण्णासाहेबांच्या अंगीं असलेल्या धडाडी, चिकाटी, कार्यक्षमता, अभ्यासू व स्वार्थत्यागी वृत्ति, इत्यादि गुणांची चांगलीच पारख झाली. ह्या चळवळीनंतर अण्णासाहेबांकडे जिल्ह्याचें नेतृत्व आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रकरण नववें

# कर्तबगार अध्यक्ष

वसई तालुक्यांतील धारावाढीच्या चळवळीपासून अण्णासाहेबांचें कार्यक्षेत्र व्यापक होऊं लागलें होतें. त्या चळवळींत अण्णासाहेबांच्या अंगीं असलेले लोकसंग्राहकवृत्ति आणि संघटनाचातुर्य हे गुण प्रकर्षानें दिसून आले. तालुक्यापेक्षां जिल्ह्यासारख्या विस्तृत कार्यक्षेत्रांत ह्या गुणांना अधिक वाव मिळणार होता. अण्णासाहेबही आतां जिल्ह्यांतील अनेकविध राजकीय व सामाजिक कार्यांत अधिक लक्ष घालूं लागले होते. समाजसेवा हेंच त्यांच्या जीवनाचें ध्येय होतें. त्यांच्या समाजसेवेच्या सीमा उत्तरोत्तर विस्तार पावत जाव्या हें ह्या ध्येयाला अनुसरूनच होतें. अण्णासाहेबांचें कर्तृत्व आणि धडाडी पाहून ठाणें जिल्ह्यांतील जनताही आपल्या जिल्ह्याचा एक निष्ठावान व श्रेष्ठ नेता ह्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहूं लागली. ठाणें जिल्ह्यानें त्यांच्यासंबंधीं बाळगलेल्या आकांक्षा त्यांनीं पुढील काळांतील आपल्या कर्तृत्वानें पुऱ्या केल्या, एवढेंच नव्हे, तर मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं आपल्या एका लेखांत म्हटल्या-



प्रमाणें अण्णासाहेब आपल्या कर्तव्यनिष्ठेनें आणि निरलस व निरपेक्ष सेवावृत्तीनें शेवटीं ठाणें जिल्ह्याचे 'अनभिषिक्त राजे' झाले.

सन १९२३ सालीं अण्णासाहेब वसई तालुक्यांतून ठाणें जिल्हा लोकलबोर्डावर पहिल्यानें निवडून आले. ठाणें जिल्हा लोकलबोर्डांतील अण्णासाहेबांचा प्रवेश ही त्यांच्या आयुष्यांतील महत्त्वाची घटना होती. अण्णासाहेब ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे अव्याहत सोळा वर्षें सभासद होते. सोळा वर्षांच्या ह्या प्रदीर्घ कालांत जिल्हा लोकलबोर्डाच्या कामाचा व कार्यपद्धतीचा त्यांनीं उत्तम अनुभव संपादन केला. पुढें मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्यमंत्री झाल्यावर त्यांना हा अनुभव फार उपयोगीं पडला. जिल्हा बोर्डाचे सभासद व पुढें अध्यक्ष ह्या नात्यानें अण्णासाहेबांनीं जी संस्मरणीय कामगिरी बजावली, त्यामुळें अण्णासाहेबांचें नांव सर्वतोमुखीं झालें आणि त्याबरोबरच ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचीही मुंबई राज्यांतील अत्यंत प्रगतिशील बोर्डांत गणना होऊं लागली.

१९३० सालीं झालेल्या ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या निवडणुकी जिल्ह्यांतील स्वराज्य पक्षानें लढविल्या व तो पक्ष बोर्डांत बहुमतानें निवडून आला. अण्णासाहेब वसई तालुक्यांतून ह्या पक्षातर्फें बोर्डावर निवडून आले. त्या वेळीं अण्णासाहेबांशिवाय श्री. नारायण दामोदर देवधेकर, श्री. विष्णु वामन दांडेकर, श्री. केशव लक्ष्मण मेकल, श्री. छोटालाल रामदास श्रॉफ, श्री. अमृतलाल नरसीलाल शहा, श्री. गणेश कृष्ण फडके, श्री. सखाराम गणेश फडके ह्यांच्यासारख्या जिल्ह्यांतील वजनदार व नामवंत व्यक्तींचा ह्या पक्षांत समावेश होता. १९२३ पासून अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकलबोर्डांत केलेलें कार्य लक्षांत घेऊन, बोर्डाच्या अध्यक्षपदासाठीं अण्णासाहेबांचें नांव पक्षातर्फें सुचविण्यांत आलें आणि अण्णासाहेब बहुमतानें जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष निवडून आले. अध्यक्षपदासाठीं त्यांचें नांव सुचवितांना पक्षानें त्यांच्याबद्दल दाखविलेला विश्वास किती योग्य होता हें अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं जी भरीव कामगिरी बजावली त्यावरून दिसून आलें.

अध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकलबोर्डाचीं सूत्रें ज्या वेळीं हातीं घेतलीं त्या वेळीं बोर्डाची आर्थिक परिस्थिति अत्यंत विकट होती. आर्थिक मंदीची लाट सर्वत्र पसरली होती. सरकारच्या तिजोरीवरही ह्या आर्थिक मंदीचा परिणाम होऊन सरकारनें सर्वत्र कपातीचें धोरण स्वीकारलें होतें. ह्या धोरणाची झळ बोर्डाला लागल्याशिवाय राहिली नाहीं. सरकारकडून बोर्डाला मिळणाऱ्या ग्रँटमध्येंही कपात करण्यांत आली. जिल्हा लोकलबोर्डाकडे मोठ्या उत्पन्नाच्या स्वतःच्या अशा बाबी जवळ जवळ नाहींतच, म्हणून आर्थिक प्रश्नांबाबत प्रत्येक वेळीं बोर्डांना सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावें लागतें. तुटपुंज्या उत्पन्नामुळें आधींच विकट असलेली बोर्डाची आर्थिक परिस्थिति सरकारनें स्वीकारलेल्या कपातीच्या धोरणामुळें अधिक विकट झाली. अशा परिस्थितींत नवीन कामासाठीं लागणारा पैसा अगर मदत सरकार बोर्डाला देईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ होतें. घटलेल्या उत्पन्नांतून नवीन कामें होणें जवळजवळ अशक्यच होतें, एवढेंच नव्हे तर नित्याचीं व अगोदरच हातीं घेतलेलीं नवीं कामें कशीं पार पाडावींत ह्या विवंचनेंत बोर्ड होतें. जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष झाल्यानंतर बोर्डाच्या विकट आर्थिक परिस्थितीमुळें अण्णासाहेब डगमगून गेले नाहींत. बोर्डाच्या आर्थिक प्रश्नांचा त्यांनीं सूक्ष्म अभ्यास केला आणि ह्या सर्व विकट परिस्थितींतून त्यांनीं धिमेपणानें आपला मार्ग काढला, एवढेंच नव्हे तर आपल्या कारकीर्दींत बोर्डाचीं मोठमोठीं कामेंही त्यांनीं करून दाखविलीं.

बोर्डाच्या विकट आर्थिक परिस्थितींत सरकारकडून मदत मिळण्याची मुळींच आशा नसल्याकारणानें बोर्डाला ह्या परिस्थितींतून निभावून नेण्यासाठीं अण्णासाहेबांनीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारण्याचें ठरविलें. सन १९२३ सालीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेसाठीं सरकारच्या मंजुरीनें बोर्डानें एक आण्याचा जादा सेस बसविला होता. परंतु ह्या योजनेबाबतचा आपला योग्य तो वांटा उचलण्यास सरकार तयार होईना म्हणून सन १९२७ सालीं बोर्डानें ह्या सेसमधून येणारी रक्कम मोफत व

ऐच्छिक शिक्षणासाठीं राखून ठेवण्याचें ठरविलें. १९३१ सालीं बोर्डास जेव्हां आर्थिक अडचण भासूं लागली तेव्हां ह्या जादा सेसच्या बारा पै उत्पन्नापैकीं चार पै उत्पन्नाची रक्कम अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकलबोर्डाच्या कामासाठीं घेण्याचें ठरविलें व अशा रीतीनें पैशाच्या अभावीं बोर्डाचे रस्ते, विहिरी, वगैरेसारखीं सार्वजनिक हिताचीं कामें अडून राहाण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली होती तिच्यांतून त्यांनीं मार्ग काढला.

बोर्डाच्या ह्या आर्थिक परिस्थितीची झळ थोड्या प्रमाणांत का होईना परंतु बोर्डाशीं संबंधित असलेल्या सर्वांनाच लागली. बोर्डाच्या सभांना हजर राहाण्यासाठीं बोर्डाच्या सभासदांना जाण्यायेण्याचा प्रवासभत्ता मिळत असतो. परंतु बोर्डाच्या आर्थिक अडचणीच्या परिस्थितीत बोर्डाच्या सभासदांनीं, बोर्डाची आर्थिक परिस्थिति सुधारेपर्यंत हा भत्ता घेऊं नये असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें ह्या कालांत बोर्डाच्या नोकर-वर्गाच्या पगारालाही ५ ते १० टक्के कपात बोर्डानें लागू केली. बोर्डाची आर्थिक अडचण लक्षांत घेऊन बोर्डाच्या सभासदांनीं आणि नोकरवर्गानें हा जो त्याग केला त्याला विशेष महत्त्व आहे. आपल्या वैयक्तिक हितापेक्षां जिल्ह्याचें हित मोठें आहे, ही त्या त्यागाच्या मागची भावना होती. बोर्डाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं ही भावना आपल्या सहकाऱ्यांत आणि आपल्या हाताखालील नोकरवर्गांत निर्माण करण्यांत अण्णासाहेब यशस्वी झाले ह्याचें सर्व श्रेय त्यांच्या व्यक्तिमत्वालाच होतें.

बोर्डाच्या ह्या बिकट आर्थिक परिस्थितींतही कुडुस कंचाड रस्ता, कानवी डीप, रायता पूल, किन्हवली येथील दवाखाना, डोंबिवली येथील शाळागृह, वगैरेसारखीं मोठमोठीं कामें हातीं घेऊन बोर्डानें तीं पुरीं केलीं. ह्या मोठ्या कामामध्यें बोर्डानें जिल्हा स्कूल बोर्डाच्या ऑफीससाठीं बांधलेल्या इमारतीचाही समावेश करावा लागेल. ह्या इमारतीला एक प्रकारचें वैशिष्ट्य आहे. आपल्या देशांतील एक सुप्रसिद्ध देशभक्त व

पूर्वीच्या मध्यवर्ती असेंब्लीचे नाणावलेले अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल हे एके काळीं ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे सभासद होते. त्यांचें कांहीं स्मारक व्हावें असें बोर्डास वाटणें साहजिकच होतें. म्हणून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोर्डानें बांधलेल्या ह्या स्कूल बोर्डाच्या नवीन इमारतीच्या सभागृहाला कै. विठ्ठलभाई पटेल ह्यांचें नांव देण्यांत आलें व त्यांचें एक तैलचित्रही ह्या सभागृहाला बोर्डाकडून लावण्यांत आलें. एका दृष्टीनें नवीन सभागृहाला विठ्ठलभाई पटेल ह्यांचें नांव देण्यांत बोर्डाचाही गौरव झाला असला तरी बोर्डानें त्यांचें नांव ह्या सभागृहाला देण्यांत मोठें औचित्य दाखविलें ह्यांत शंका नाहीं.

अण्णासाहेब पहिल्यापासूनच दारूबंदीचे मोठे पुरस्कर्ते होते व ह्या बाबतींतलीं त्यांचीं मतें अगदीं ठाम होतीं ह्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. दारूबंदीच्या कामासाठीं त्यांनीं स्वतः आर्थिक झीज सोसली होती. ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदावर आल्यानंतर त्यांनीं आपल्या ह्या आवडत्या कार्याला आणखी जोराची चालना दिली. पूर्वी बोर्डाच्य रस्त्यालगत असलेलीं शिंदीचीं झाडें ताडीसाठीं मक्त्यानें बोर्डाकडून देण्यांत येत असत. परंतु बोर्डासारख्या सार्वजनिक संस्थेनें अशा प्रकारें ताडीसाठीं झाडें मक्त्यानें देणें योग्य नव्हे असें त्यांचें मत असल्या-कारणानें ह्या बाबतींत बोर्डाकडून ठराव पास करवून घेऊन त्यांनीं ही प्रथा बंद करून टाकली.

बोर्डाचे आर्थिक प्रश्न कांहींसे तडीस लागल्यानंतर बोर्डाच्या अंतर्गत कारभारांत अण्णासाहेब लक्ष घालूं लागले. बोर्डाचें काम पाहाण्यासाठीं ऑफीसमध्यें येण्याच्या अध्यक्षांच्या वेळा निश्चित नसल्यास बोर्डाच्या कामांत मोठा गोंधळ माजून राहातो, तो टाळण्यासाठीं आणि बोर्डाच्या कामकाजांत सुसंगतपणा यावा व ऑफिसचे सर्व कागदपत्र नीट काळजी-पूर्वक पाहातां यावे, म्हणून अण्णासाहेबांनीं ऑफिसच्या कामासाठीं आठवड्यांतून दोन दिवस नेमून दिले. त्या दिवशीं आपलीं स्वतःचीं कितीही महत्त्वाचीं कामें असलीं तरी तीं बाजूस सारून अण्णासाहेब बोर्डाच्या

ऑफीसमध्यें नियमितपणें जावयाचेच. त्यामुळें बोर्डाचे सर्व कागदपत्र स्वतः पाहून त्यावर योग्य ते हुकूम त्वरित देणें त्यांना शक्य झालें. त्यांच्या ह्या नवीन प्रथेमुळें बोर्डाचीं कामें व्यवस्थित व वेळच्यावेळीं होऊं लागलीं व त्यामुळें बोर्डाच्या कार्यक्षमतेंत भर पडली. अण्णासाहेबांनीं सुरू केलेल्या ह्या नवीन प्रथेला आणखी एका दृष्टीनें महत्त्व होतें. जिल्हा बोर्डाच्या कार्याचा पसारा सर्व जिल्हाभर असल्यामुळें जिल्ह्यांतील अनेक व्यक्तींचा बोर्डाच्या कारभाराशीं संबंध येत असतो. त्याचप्रमाणें आपलीं गाऱ्हाणीं अध्यक्षांच्या पुढें समक्ष मांडण्यासाठीं जिल्ह्यांतील अनेक मंडळी अध्यक्षांच्या भेटीस नेहमीं येत असतात. अण्णासाहेबांनीं ऑफीसच्या कामासाठीं निश्चित दिवस ठरविल्यामुळें अध्यक्षांच्या भेटीस येणाऱ्या सव मंडळींची मोठीच सोय झाली. अण्णासाहेबांनीं घालून दिलेली ही प्रथा सर्व दृष्टींनीं इतकी फायदेशीर ठरली आहे कीं आजतागायत ती तशीच चालू आहे.

अण्णासाहेबांनीं बोर्डाच्या कामकाजाबाबत आणखी एक महत्त्वाचा उपक्रम सुरू केला. बोर्डाच्या सभेपुढील कार्यक्रमपत्रिकेमध्यें नमूद केलेल्या विषयांची साधकबाधक चर्चा होऊन सभेच्या वेळीं त्या त्या विषयाबाबत योग्य निर्णय घेतां यावेत म्हणून जनरल बोर्डाच्या सभेच्या आदल्या दिवशीं कार्यक्रमपत्रिकेवरील सर्व कामांचे कागदपत्र पाहून आपल्या प्रमुख सहकाऱ्यांबरोबर त्या त्या विषयाची ते सांगोपांग चर्चा करीत व स्थूल निर्णय घेऊन बोर्डापुढें येणाऱ्या ठरावांची रूपरेखा ते आंखून ठेवीत असत. त्यांच्या ह्या विशिष्ट पद्धतीमुळें बोर्डाच्या सभेपुढील कामांत अत्यंत सुटसुटीतपणा व आटोपशीरपणा आला. प्रत्येक विषयाची अगोदरच सांगोपांग चर्चा झाल्यामुळें प्रत्यक्ष सभेच्या वेळीं पुष्कळ वेळां चर्चेला येणारें वादाचें स्वरूप आपोआप टळलें जाऊं लागलें व प्रत्येक बाबतींत अचूक निर्णय करणें बोर्डाला शक्य झालें. निष्कारण चर्चा टळल्यामुळें सभेच्या कामांतही आटोपशीपणाबरोबर भारदस्तपणाही आला. अण्णासाहेबांनीं सुरू केलेली ही प्रथाही आजतागायत चालू आहे.

त्याचप्रमाणें बोर्डाच्या सभेपुढील कामाबाबतचे जिल्हा बोर्ड कायद्या-खालीं बनविण्यांत आलेले नियम लोकशाहीच्या मार्गानें बोर्डाचीं कामें पार पाडण्यास अपुरे आहेत असें दिसून येतांच अण्णासाहेबांनीं त्या नियमांत ताबडतोब सुधारणा करून घेतली आणि बोर्डाच्या सभेपुढील कामांत अवश्य असलेला सुसंगतपणा आणण्याचा प्रयत्न केला.

अण्णासाहेबांनीं लोकलबोर्डाच्या कामकाजाबाबत वर उल्लेखिलेल्या ज्या दोन नवीन प्रथा पाडल्या त्यांशिवाय आणखी एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम ह्या बाबतींत त्यांनीं सुरू केला. परिणामाच्या दृष्टीनें त्यांनीं सुरू केलेला हा उपक्रम सर्वांत महत्त्वाचा होय. बोर्डाचें वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्याच्या वेळीं जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचें मत अजमावून घेण्यासाठीं अण्णासाहेब प्रत्येक तालुक्यांतून दौरा काढीत असत. ह्या दौऱ्याच्या वेळीं त्या त्या तालुक्यांतील जिल्हा बोर्डाच्या सभासदांना व इतर स्थानिक कार्यकर्त्यांना ते तालुक्याच्या मुख्य अगर इतर सोयिस्कर ठिकाणीं एकत्र बोलावीत व बोर्डाच्या नवीन अंदाजपत्रकाबाबत त्यांच्याशीं मोकळे-पणानें चर्चा करीत. ह्या चर्चेच्या वेळीं पुढील सालीं बोर्डाचें अंदाजें किती उत्पन्न येईल व त्यांतून नैमित्तिक कामासाठीं लागणारा खर्च बाद करतां प्रत्येक तालुक्याच्या वांटणीस किती पैसा मिळण्याजोगा आहे ह्याची कल्पना ते सर्वांना देत. प्रत्येक तालुक्याच्या वांटणीस येणाऱ्या पैशांमधून तालुक्यांतील कोणकोणतीं कामें हातीं घेण्यासारखीं आहेत व त्यांपैकीं कोणत्या कामांना प्राधान्य द्यावयाचें ह्याचा साधकबाधक चर्चा करून निर्णय करण्यांत येई. ह्या पद्धतीमुळें बोर्डाचें वार्षिक अंदाजपत्रक वरून जिल्हा बोर्डाकडून तयार न होतां तालुक्यांतील जनतेच्या प्रतिनिधींच्या साह्यानें आणि विचारानें तयार होऊं लागलें. त्यामुळें प्रत्येक तालुक्याच्या गरजा अगर गैरसोयी काय आहेत ह्याचा योग्य विचार केला जाऊन शक्यतों ह्या गरजा जिल्हा बोर्डाकडून भागविण्याची व्यवस्थ होऊं लागली. ह्या पद्धतीमुळें लोकांना जिल्हा बोर्डाच्या कारभाराबद्दल विश्वास व जिव्हाळा वाटूं लागला आणि जिल्हा बोर्डाकडे कराच्या रूपानें

जाणाऱ्या आपल्या पैशाचा आपल्या कल्याणाकरितांच उपयोग होत आहे, अशी जाणीव त्यांच्यांत निर्माण झाली. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाही कारभाराच्या आधारभूत संस्था असून त्यांचा कारभार लोकमतानुवर्ति आणि लोकांच्या कल्याणार्थच व्हावा असें आपलें ठाम मत अण्णासाहेब पुढें आग्रहानें मांडीत. त्या मताचें प्रतिबिंब अण्णासाहेबांनीं सुरू केलेल्या ह्या महत्त्वाच्या उपक्रमांत स्वच्छपणें पडलेलें दिसून येतें. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत अण्णासाहेबांनीं बनविलेलीं आपलीं मतें प्रदीर्घ अनुभवावर आधारलेलीं होतीं, ह्याचाही पडताळा अण्णासाहेबांनीं सुरू केलेल्या ह्या प्रथेंत आपणांस दिसून येतो.

जिल्ह्याच्या आरोग्याच्या दृष्टीनें अण्णासाहेबांनीं आपल्या कारकीर्दीत एक महत्त्वाची योजना सुरू केली. ठाणें जिल्ह्याचा बराच भाग जंगल-पट्टीचा असल्याकारणानें पावसाळ्यानंतर दरवर्षी ह्या भागांत हिंवतापाचा ( malaria ) प्रादुर्भाव होतो. परंतु हे दिवस भातकापणीच्या हंगामाचे असल्याकारणानें शेतकऱ्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे असतात. पण नेमक्या ह्याच दिवसांत हिंवतापाचा जोर वाढत असल्याकारणानें शेतकऱ्याला नोव्हेंबर ते फेब्रुवारी हे चार महिने मोठ्या काळजींत आणि हालांत काढावे लागतात. तालुक्यांत दवाखान्याची सोय फक्त तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं असते आणि खेड्यांतून राहाणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा फारसा उपयोग होत नसतो. इतरत्र खेड्यांतून दवाखाने राहोच परंतु वैद्यकीय मदत मिळणेंदेखील मोठें मुष्किलीचें असतें. त्यामुळें कामाच्या ऐन हंगामांत शेतकरी हिंवतापानें बेजार झालेला असतो. ऐन कामाच्या वेळीं शेतकऱ्यांचे होणारे हाल पाहून अण्णासाहेबांचें मन त्यांना स्वस्थ बसूं देईना. परंतु खेड्यांतून शेतकऱ्यांना वैद्यकीय मदत कशी पोचवावयाची हा मोठा बिकट प्रश्न होता. खेड्यापाड्यांतून ठिक-ठिकाणीं दवाखाने उघडण्यानेंच हा प्रश्न सुटणार होता. वास्तविक खेड्यापाड्यांतून औषधोपचाराची सोय करण्याची सर्व जबाबदारी सरकारची. परंतु आर्थिकदृष्ट्या ही जबाबदारी स्वीकारणें सरकारला

शक्य नव्हतें. आणि पैशाच्या अभावीं व सरकारच्या मदतीशिवाय जिल्हा लोकलबोर्डालाही ही जबाबदारी पेलतां येण्यासारखी नव्हती. परंतु असें म्हणून शेतकऱ्यांचे होणारे हाल कमी होणार नव्हते. म्हणून सर्व गोष्टींचा विचार करून हिंवताप प्रतिबंधक हंगामी दवाखान्यांची योजना अण्णासाहेबांनीं तयार केली व तिला बोर्डाची मंजुरी मिळवून ती अंमलांत आणली. ह्या योजनेप्रमाणें हिंवतापाच्या दिवसांत प्रत्येक तालुक्यांतून एक एक हंगामी दवाखाना बोर्डाकडून उघडण्यांत आला. हे दवाखाने वर्षांतून फक्त चार महिने म्हणजे नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत ज्या भागांत हिंवतापाचा प्रादुर्भाव जास्त असेल त्या भागांत चालू राहात. प्रत्येक तालुक्यांत दोन दोन केंद्रें उघडण्यांत आलीं होतीं. एका केंद्रावर आठ दिवस व त्यानंतर दुसऱ्या केंद्रावर नंतरचे आठ दिवस ह्याप्रमाणें ह्या हंगामी दवाखान्यांचें काम चालू असे. त्याशिवाय आजुबाजूच्या खेड्यांतही जाऊन दवाखान्यांच्या डॉक्टरांना औषधोपचार करावा लागे. विशेष नमूद करण्यासारखी ह्या दवाखान्यांच्या संबंधींची बाब म्हणजे बोर्डाचा पहिला हंगामी दवाखाना उघडण्यासाठीं अण्णासाहेबांनीं स्वतः आपली दीडशें रुपयांची देणगी दिली व बोर्डाच्या इतर सभासदांनींही अण्णासाहेबांनीं विनंती केल्यावरून आपआपल्या परीनें ह्या योजनेसाठीं देणग्या दिल्या. ह्या योजनेवर बोर्डाला दरसाल सहा हजार रुपये खर्च करावा लागे व अंदाजें पंधरा हजार रोगी ह्या योजनेच फायदा घेत. अण्णासाहेबांनीं सुरू केलेली ही हंगामी दवाखान्याची योजना दूरगामी स्वरूपाची होती. दूरवर पसरलेल्या हजारों खेड्यांतून राहाणाऱ्या शेतकऱ्यांची निकडीची गरज भागविण्याचें सामर्थ्य अंशतः तरी ह्या योजनेमध्यें होतें. अण्णासाहेबांनीं ही योजना आंखून आणि अंमलांत आणून स्थानिक स्वराज्य संस्थांना आणि पर्यायानें सरकारलाही लोकहिताचा एक नवीन मार्ग दाखवून दिला. अण्णासाहेबांची ही योजना पुढें कॉंग्रेस सरकारची सब्सिडाइज्ड दवाखान्यांची योजना अंमलांत येईपर्यंत म्हणजे १९३९-४० पर्यंत चालू

होती. एका अर्थानें सरकारची ही सब्सिडाइज्ड दवाखान्यांची योजना म्हणजे अण्णासाहेबांनीं सुरू केलेल्या हंगामी दवाखान्याच्या योजनेची सुधारून वाढविलेली आवृत्ति होय असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

अशा प्रकारें बोर्डाच्या कारभारांत आमूलाग्र सुधारणा करण्यांत आणि लोकहिताचीं अनेक कामें पार पाडण्यांत अण्णासाहेब गुंतले असतांनासुद्धा अण्णासाहेबांना बोर्डाच्या नोकरवर्गाचा विसर पडला नाहीं. बोर्डाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळें नोकरवर्गाच्या पगारांत केलेल्या कपातीची झळ त्यांना अण्णासाहेबांनीं फार दिवस लागूं दिली नाहीं. बोर्डाची आर्थिक परिस्थिति थोडी सुधारतांच त्यांनीं ही पगार-कपात रद्द केली, एवढेंच नव्हे, तर नोकरवर्गाला आपल्या नोकरीबद्दल पुढील आयुष्यांत स्थैर्य वाटावें व त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून मुंबईसरकारचे बॉम्बे सिव्हिल सर्व्हिस रूल्स अण्णासाहेबांनीं बोर्डाच्या नोकरवर्गाला लागू केले व त्याचप्रमाणें नोकरवर्गासाठीं ग्रॅच्युइटी वगैरे-संबंधीं नियम मंजूर करून घेतले. ह्याशिवाय सेवानिवृत्तीच्या कालांत कुटुंबाची तरतूद करतां येणें अधिक सोयीचें व्हावें ह्या हेतूनें प्रॉव्हिडंट फंडांतून विम्याच्या हप्त्यांची रक्कम भरतां यावी म्हणून प्रॉव्हिडंट फंडाच्या नियमांत जरूर ती तरतूद करून घेतली.

अण्णासाहेबांच्या कारकीर्दीतच हरिजनांना देवालयांतील प्रवेशबंदी दूर करण्याबाबत लोकमत अजमावण्यांत आलें. अण्णासाहेबांसारख्या कट्ट्या सामाजिक सुधारकाच्या नेतृत्वाखालीं असलेल्या जिल्हा लोकल-बोर्डानें ह्या बाबतींत काय मत दिलें असेल हें लिहिण्याची जरूरीच नाहीं.

अण्णासाहेब जिल्हा लोकलबोर्डाचे संपूर्ण राष्ट्रीयवृत्तीचे अध्यक्ष होते. त्यांच्या अंगचा बाणेदारपणा त्यांच्या कारकीर्दींत घडलेल्या एका प्रसंगानें दिसून आला. तो प्रसंग म्हणजे मुंबईचे गव्हर्नर ठाण्यास भेट देणार होते त्या वेळचा होय. बोर्डांत राष्ट्रीय पक्ष अधिकारारूढ होता आणि अण्णासाहेब ह्या राष्ट्रीय पक्षाचे नेते होते. त्या काळीं व्हॉइसराय अगर गव्हर्नर ह्यांच्या भाषणास अगर त्यांच्या पार्टीस राष्ट्रीय पक्षानें हजर राहूं

नये असा एक दंडक स्वराज्य पक्षानें घालून दिला होता. गव्हर्नरसाहेबांचें शहरांत आगमन होणार म्हणून ठाण्याच्या नगरपालिकेनें गव्हर्नर साहेबांना मानपत्र देण्याचा ठराव केला. नगरपालिकेप्रमाणेंच जिल्हा लोकलबोर्डानेंही गव्हर्नरसाहेबांना मानपत्र द्यावें अशी साहजिकच स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा होती. म्हणून जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं अण्णासाहेबांना बोलावून बोर्डाच्या मानपत्रासंबंधीं त्यांना विचारलें. परंतु सरकारच्या रोषाची यत्किंचितही पर्वा न करतां आपल्या राष्ट्रीय पक्षाचें ह्या बाबतींतलें धोरण त्यांनीं कलेक्टरांना विशद करून सांगितलें व अत्यंत बाणेदारपणानें बोर्डातर्फें गव्हर्नरसाहेबांना मानपत्र देण्यास स्पष्ट नकार दिला. अण्णासाहेबांनीं ह्या प्रसंगीं जो स्वाभिमान व बाणेदारपणा दाखविला तो जिल्हा लोकलबोर्डाच्या इतिहासांत अपूर्व असाच होता.

जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांची कारकीर्द अत्यंत यशस्वी व संस्मरणीय अशीच झाली. त्यांच्या अंगीं असलेल्या धडाडी, बाणेदारपणा, लोकसंग्राहक वृत्ति, व्यावहारिक दूरदर्शीपणा, जनताहिताची कळकळ इत्यादि अनेक गुणांचें दर्शन ते बोर्डाच्या अध्यक्षपदीं असतांना ठाणें जिल्ह्यांतील जनतेला झालें. अण्णासाहेबांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे हातीं घेतलेल्या कार्यासंबंधींची तळमळ व आस्था हा होय. ज्या ज्या कार्यांत बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं हात घातला त्या त्या कार्यांत ही आस्था व तळमळ दिसून आली. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकोपयोगी संस्था असून त्यांचा कारभार लोकहिताच्या दृष्टीनें आणि लोकांच्या संमतीनेंच चालला पाहिजे हा त्यांचा दृष्टिकोन बोर्डाच्या कारभारांत त्यांनीं जी सुधारणा घडवून आणली तिच्यांत पूर्ण दृग्गोचर झाला होता. अण्णासाहेबांनीं जिल्ह्यांतील जनतेचें हित साधतांना जी आस्था दाखविली तीच आस्था त्यांनीं आपल्या हाताखालील बोर्डांतील नोकरवर्गाबद्दलही दाखविली. अण्णासाहेबांचे बोर्डांतील आपल्या सहकाऱ्यांबरोबरचे संबंध अत्यंत आपुलकीचे, स्नेहाचे आणि प्रेमाचे

होते. आपल्या सहकाऱ्यांप्रमाणें विरुद्ध पक्षाबद्दलही त्यांनीं आदराची भावना बाळगली. ह्या त्यांच्या गुणसमुच्चयामुळें विरुद्ध पक्षाकडून विशेष विरोध न होतां, आपल्या सहकाऱ्यांकडून, जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांकडून आणि बोर्डाच्या नोकरवर्गाकडून त्यांना जें जें साह्य लागलें, तें तें मोठ्या तत्परतेनें आणि स्वखुशीनें त्यांना मिळालें. अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून व पुढेंही जें यश मिळविलें त्याचें सर्व श्रेय त्यांच्या अंगीं असलेल्या ह्या असाधारण गुणांनाच द्यावें लागेल. अण्णासाहेबांना आपल्या अध्यक्षीय कारकीर्दींत त्या काळचे बोर्डाचे चीफ ऑफीसर सीतारामपंत प्रधान ह्यांची फार मदत झाली ह्याचा मुद्दाम उल्लेख ह्या प्रकरणांत करणें जरूर आहे. प्रधान हे अत्यंत विश्वासू, कार्यदक्ष व आपल्या कामांत फार हुशार असे गृहस्थ होते. अण्णासाहेबां-संबंधीं त्यांच्या मनांत निष्ठापूर्वक आदराची भावना होती. अण्णासाहेबांनीं शेवटपर्यंत त्यांना मोठ्या आपुलकीच्या भावनेनें वागविलें. बोर्डाचे त्या वेळचे इंजिनिअर श्री. घाटे ह्यांचाही अण्णासाहेबांना मोठा उपयोग झाला.

नये असा एक दंडक स्वराज्य पक्षानें घालून दिला होता. गव्हर्नरसाहेबांचें शहरांत आगमन होणार म्हणून ठाण्याच्या नगरपालिकेनें गव्हर्नर साहेबांना मानपत्र देण्याचा ठराव केला. नगरपालिकेप्रमाणेंच जिल्हा लोकलबोर्डानेंही गव्हर्नरसाहेबांना मानपत्र द्यावें अशी साहजिकच स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा होती. म्हणून जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं अण्णासाहेबांना बोलावून बोर्डाच्या मानपत्रासंबंधीं त्यांना विचारलें. परंतु सरकारच्या रोषाची यत्किंचितही पर्वा न करतां आपल्या राष्ट्रीय पक्षाचें ह्या बाबतींतलें धोरण त्यांनीं कलेक्टरांना विशद करून सांगितलें व अत्यंत बाणेदारपणानें बोर्डातर्फें गव्हर्नरसाहेबांना मानपत्र देण्यास स्पष्ट नकार दिला. अण्णासाहेबांनीं ह्या प्रसंगीं जो स्वाभिमान व बाणेदारपणा दाखविला तो जिल्हा लोकलबोर्डाच्या इतिहासांत अपूर्व असाच होता.

जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांची कारकीर्द अत्यंत यशस्वी व संस्मरणीय अशीच झाली. त्यांच्या अंगीं असलेल्या धडाडी, बाणेदारपणा, लोकसंग्राहक वृत्ति, व्यावहारिक दूरदर्शीपणा, जनताहिताची कळकळ इत्यादि अनेक गुणांचें दर्शन ते बोर्डाच्या अध्यक्षपदीं असतांना ठाणें जिल्ह्यांतील जनतेला झालें. अण्णासाहेबांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे हातीं घेतलेल्या कार्यासंबंधींची तळमळ व आस्था हा होय. ज्या ज्या कार्यांत बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं हात घातला त्या त्या कार्यांत ही आस्था व तळमळ दिसून आली. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकोपयोगी संस्था असून त्यांचा कारभार लोकहिताच्या दृष्टीनें आणि लोकांच्या संमतीनेंच चालला पाहिजे हा त्यांचा दृष्टिकोन बोर्डाच्या कारभारांत त्यांनीं जी सुधारणा घडवून आणली तिच्यांत पूर्ण दृग्गोचर झाला होता. अण्णासाहेबांनीं जिल्ह्यांतील जनतेचें हित साधतांना जी आस्था दाखविली तीच आस्था त्यांनीं आपल्या हाताखालील बोर्डातील नोकरवर्गाबद्दलही दाखविली. अण्णासाहेबांचे बोर्डातील आपल्या सहकाऱ्यांबरोबरचे संबंध अत्यंत आपुलकीचे, स्नेहाचे आणि प्रेमाचे

होते. आपल्या सहकाऱ्यांप्रमाणें विरुद्ध पक्षाबद्दलही त्यांनीं आदराची भावना बाळगली. ह्या त्यांच्या गुणसमुच्चयामुळें विरुद्ध पक्षाकडून विशेष विरोध न होतां, आपल्या सहकाऱ्यांकडून, जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांकडून आणि बोर्डाच्या नोकरवर्गाकडून त्यांना जें जें साह्य लागलें, तें तें मोठ्या तत्परतेनें आणि स्वखुशीनें त्यांना मिळालें. अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून व पुढेंही जें यश मिळविलें त्याचें सर्व श्रेय त्यांच्या अंगीं असलेल्या ह्या असाधारण गुणांनाच द्यावें लागेल. अण्णासाहेबांना आपल्या अध्यक्षीय कारकीर्दींत त्या काळचे बोर्डाचे चीफ ऑफीसर सीतारामपंत प्रधान ह्यांची फार मदत झाली ह्याचा मुद्दाम उल्लेख ह्या प्रकरणांत करणें जरूर आहे. प्रधान हे अत्यंत विश्वासू, कार्यदक्ष व आपल्या कामांत फार हुशार असे गृहस्थ होते. अण्णासाहेबां-संबंधीं त्यांच्या मनांत निष्ठापूर्वक आदराची भावना होती. अण्णासाहेबांनीं शेवटपर्यंत त्यांना मोठ्या आपुलकीच्या भावनेनें वागविलें. बोर्डाचे त्या वेळचे इंजिनिअर श्री. घाटे ह्यांचाही अण्णासाहेबांना मोठा उपयोग झाला.

प्रकरण दहावें

# यशस्वी लढा

सन १९२७ सालीं वसई तालुक्याच्या बंदरपट्टींतील भागावर एक नवीनच संकट येऊं घातलें होतें. बी. बी. अँड सी. आय्. रेल्वेनें ह्या भागांतील लोकांच्या सोयीसाठीं वसई रेल्वेपुलाच्या उत्तरेकडील उमेळें गांवापासून विरारपर्यंत रेल्वेचा एक फांटा बंदरपट्टीच्या भागांतून काढण्याची एक योजना तयार केली होती व ह्या योजनेप्रमाणें रेल्वेमार्गाच्या आंखणीचें काम रेल्वेअधिकाऱ्यांकडून हातीं घेण्यांत आलें होतें. हा संकल्पित रेल्वेमार्ग किरवली, वडवली, मुळगांव, धोवली, होळीबाजार, वसई बेणेपट्टी, रानगांव, भुईगांव, निर्मळ, नाळें, वटार, आगाशी, बोळींज वगैरे गांवांवरून जाऊन विरार येथें रेल्वेच्या मुख्य मार्गाला मिळणार होता. बंदरपट्टींतून भाजीपाला, मासळी, दूध, वगैरे-सारखा रोज मुंबईस जाणारा नाशवंत माल अल्पखर्चांत व त्वरित नेतां यावा व निरनिराळ्या उद्योगधंद्यासाठीं ह्या भागांतून दररोज मुंबईस जाणाऱ्या लोकांची चांगली सोय व्हावी ह्या उद्देशानेंच रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं ही योजना तयार केली होती. रेल्वेची ही योजना केव्हांही लोकांच्या हिताचीच असल्यामुळें, ह्या योजनेला तात्त्विक दृष्ट्या लोकांचा

मुळींच विरोध नव्हता. विरोध होता तो फक्त हा मार्ग कोठून नेण्यांत यावा ह्याबद्दल. रेल्वेनें आंखणी केलेला मार्ग वसई आगराच्या अत्यंत सुपीक व समृद्ध अशा भागांतून जात होता. त्यामुळें शेंकडों एकर बागायत जमीन रेल्वेमार्गाखालीं जाणार होती, एवढेंच नव्हे, तर हा मार्ग ज्या बागाइती वाड्यांतून जाणार होता त्या वाड्यांतील अनेक लोकांचीं घरेंदारें जाऊन ह्या मार्गामुळें त्या वाड्यांची अशी चमत्कारिक विभागणी होणार होती कीं रेल्वेखालीं गेलेल्या भागाशिवाय बाकी राहिलेल्या लहान लहान तुकड्यांचा लागवडीच्या दृष्टीनें कांहीं उपयोग होणार नव्हता. जमीन रेल्वेच्या एका बाजूस तर विहीर दुसऱ्या बाजूस अशाच प्रकारची बऱ्याच वाड्यांची स्थिति होणार होती. रेल्वेमार्गाच्या ह्या संकल्पित आंखणीमुळें मुळगांव, धोवली, सांडोर, कौलार, वगैरे गांवांतील बागायतदारांचें फारच मोठें नुकसान होणार होतें.

रेल्वेलाईन तर व्हावीच पण बागायतदारांचें संकल्पित मार्गामुळें होणारें नुकसान टळावें म्हणून अण्णासाहेबांनीं शेतकी सभेच्या कार्यकर्त्यांबरोबर विचारविनिमय करून रेल्वेच्या योजनेबाबत रेल्वे-अधिकाऱ्यांना दोन पर्याय सुचविले. त्यांनीं सुचविलेला पहिला मार्ग उमेळें, पापडी, भागोळें, गिरीज वगैरे गांवांवरून जाणारा होता. तर दुसरा मार्ग नागांव, वसई किल्ला, वसई बेणेपट्टी, भुईगांव, वगैरे गांवांवरून जात होता. अण्णासाहेबांनीं सुचविलेले दोन्ही मार्ग जिरायती, पडित व कमी सुपीक अशा भागांतून जात होते व त्यामुळें बागाइती वाड्यांचें होणारें नुकसानही टळत होतें. त्याचप्रमाणें लोकांचीही ह्या मार्गामुळें गैरसोय होणार नव्हती.

परंतु अण्णासाहेबांनीं सुचविलेल्या पर्यायांचा रेल्वेअधिकाऱ्यांकडून विशेष विचार न होतां रेल्वेच्या योजनेप्रमाणें रेल्वेमार्गाच्या आंखणीचें काम त्यांनीं तसेंच चालू ठेवलें. ह्या आंखणीप्रमाणें रेल्वेची योजना अमलांत आल्यास शेंकडों बागायतदारांना आपल्या घरादारांना मुकावें लागणार होतें. ज्यांच्या फायद्यासाठीं ही योजना मुख्यतः आंखण्यांत

आली होती, त्यांचें ह्या योजनेमुळें कांहींच हित न साधतां कायमचें अकल्याण मात्र होणार होतें. रेल्वेनें केलेल्या आंखणींतील धोका प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें बंदरपट्टीच्या भागांतील लोकांनीं रेल्वेनें केलेली आंखणी रद्द व्हावी म्हणून अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं मोठी चळवळ केली व आपलें गाऱ्हाणें सरकारकडे थेट वरपर्यंत पोचविलें. ह्या चळवळीचा परिणाम म्हणून म्हणा किंवा आर्थिकदृष्ट्या ही योजना सफल होणार नव्हती म्हणून म्हणा, ह्या योजनेचा सर्व बाजूंनीं विचार केल्यानंतर रेल्वेअधिकाऱ्यांनीं ही योजना कायमची रद्द केली.

योजना रद्द झाली तरी ह्या योजनेची आंखणी करतांना रेल्वे-अधिकाऱ्यांच्या बेगुमानपणामुळें जे अनेक प्रकार घडले ते रेल्वेला रेल्वेअधिकाऱ्यांना पुढें चांगलेच भोवले. रेल्वेची आंखणी करतांना रेल्वेअधिकाऱ्यांचें बागायतदारांबरोबर जें वर्तन झालें तें अत्यंत बेपर्वाईचें व उद्दामपणाचें होतें. प्रत्यक्ष आंखणी करतांना ऊंस, पानवेल ह्यांसारख्या पिकांची कारण नसतांना ते बेधडक नासाडी करीत. कांहीं कांहीं ठिकाणीं त्यांनीं नारळी, सुपारीसारख्या झाडांची उगीच पाडापाड केली. रेल्वेअधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांच्या वतीनें ह्या बाबतींत अनेक तक्रारी गुदरविण्यांत आल्या आणि त्यामुळें आंखणी करणाऱ्या कांहीं कांहीं अधिकाऱ्यांना शिक्षाही झाल्या. ह्या आंखणीअधिकाऱ्यांच्या बेजबाबदार-पणामुळें ज्या बागायतदारांचें नुकसान झालें होतें, त्यांपैकीं कांहींनीं रेल्वेविरुद्ध दिवाणी कोर्टांत दावे लावले व रेल्वेकडून खर्चासह नुकसान-भरपाई मिळविली. अशा तऱ्हेनें अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या शेतकऱ्यांच्या ह्या संघटित चळवळीचा यशस्वी शेवट झाला.

प्रकरण अकरावें

# रेल्वेविषयक अडचणींचा परिहार

वसई तालुक्यांतील पानवेलीच्या लागवडीवरील रोगाचें संकट अचानक आलें होतें. त्याचा परिहार करण्यासाठीं फार मोठे प्रयत्न करावे लागले. परंतु ह्या धंद्यांत येणाऱ्या इतर अडचणी नेहमींच्या आहेत. त्या निस्तरण्यासाठीं सतत प्रयत्न करावे लागतात. अशा अडचणीमध्यें पानवेलीच्या मालाच्या वाहतुकीबाबत उत्पन्न होणाऱ्या अडचणींना प्रमुख स्थान द्यावें लागेल. वसई तालुक्यांत मुख्यतः काळ्या जातीच्या पानांचीच लागवड होत असते, ह्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. ह्या जातीचें पान आकारानें बरेंच मोठें असून त्याचा रंग गडद काळसर हिरवा असतो. चवीला तें तिखट असून फार उष्णही असतें. ह्या पानाला खुद्द मुंबई शहरांतून मुळींच मागणी नसून, राजस्थान, संयुक्तप्रांत, पंजाब, वगैरेसारख्या दूरच्या प्रदेशांत ह्या मालाची निर्यात वसईहून फार मोठ्या प्रमाणांत होत असते. पाकिस्तानच्या निर्मितीपूर्वी सिंध, बलुचिस्तान, वायव्यसरहद्दप्रांत, वगैरे भागांतूनही ह्या मालाला चांगली मागणी असे. पानवेलीच्या पानासारखा नाजूक व नाशवंत माल इतक्या दूरच्या ठिकाणीं थोड्या वेळांत पोचण्यासाठीं वाहतुकीची चांगली सोय असली

तरच हा माल चांगल्या स्थितींत गिऱ्हाइकाच्या हातांत पडून मालाचा व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर उठाव होण्याचा संभव असतो. परंतु वाहतुकीच्या सोयीबाबत रेल्वेबरोबर बागायतदारांच्या व व्यापाऱ्यांच्या नेहमीं तक्रारी उत्पन्न होत व त्याचा परिणाम मालाची मागणी घटण्यांत होई. ह्यामुळें बागायतदार व व्यापारी ह्या दोन्ही वर्गांचें नुकसान होत असे. तें टाळण्यासाठीं व वाहतुकीबाबतच्या अडचणींची आणि तक्रारींची दाद लागावी म्हणून अण्णासाहेबांच्या प्रोत्साहनानें शेतकी सभेला जोडून सन १९३० सालीं पानव्यापाऱ्यांची एक असोसिएशन स्थापन करण्यांत आली.

शेतकी सभेनें व ह्या असोसिएशननें पुढील कांहीं वर्षे जुळ्या भावंडांप्रमाणें काम करून वसई तालुक्यांतील बागायतदारांच्या रेल्वे-विषयक अनेक तक्रारींची व अडचणींची दाद लावून घेतली. स. १९३० च्या पूर्वी बी. बी. सी. आय्. रेल्वेची पंजाब मेल वसई स्टेशनवर थांबत नसे. अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं वरील दोन्ही संस्थांनीं खटपट केल्यामुळें त्या सालापासून पानें व केळीं घेण्यासाठीं वसई स्टेशनांत पंजाब मेल थांबू लागली. त्याप्रमाणें जलद जाणाऱ्या इतर गाड्याही वसई स्टेशनवर थांबूं लागल्या. त्यामुळें मालाच्या वाहतुकीबाबत बागायतदारांची आणि व्यापाऱ्यांची मोठी अडचण दूर झाली. वाहतुकीच्या बाबतींत आणखी एक मोठी अडचण दरसाल पावसाळ्यांत उद्भवत असते. बी. बी. सी. आय्. रेल्वेचा म्हणजे सध्याच्या पश्चिमी रेल्वेचा मार्ग कांहीं कांहीं ठिकाणीं सखल आणि भुसभुशीत प्रदेशांतून जात असल्यामुळें पावसाळ्यांत अतिवृष्टीमुळें अशा ठिकाणचा रेल्वेमार्ग वाहून जातो. त्यामुळें रेल्वेचें दळणवळण कांहीं दिवस बंद पडण्याचा धोका उद्भवत असतो. परंतु अचानक येणाऱ्या ह्या संकटाची कांहींच कल्पना नसल्यामुळें बागायतदार आपला तयार झालेला माल तोडून बाजारांत आणीत असतो. अशा वेळीं तयार असलेला माल मध्य रेल्वेमार्गानें परप्रांतांत पाठविण्याची त्वरित व्यवस्था न झाल्यास हा माल फुकट

जाण्याचा धोका निर्माण होतो. एवढेंच नव्हे तर पानबाजार बंद पडून त्यामुळें बागायतदार व व्यापारी ह्या दोन्ही वर्गांचें मोठें नुकसान होतें. गेल्या तीस वर्षांत अशा प्रकारचे अनेक प्रसंग उद्भवले. परंतु प्रत्येक प्रसंगीं अण्णासाहेब बागायतदार व व्यापारी ह्यांच्या मदतीस धावून गेले आहेत. अशा वेळीं ते आपल्या स्वतःच्या खाजगी अगर सार्वजनिक कामाची पर्वा न करतां, रेल्वेअधिकारी, सरकारचे मार्केटिंग अधिकारी, वगैरे संबंधित अधिकाऱ्यांना भेटून दुसऱ्या रेल्वेमार्गानें वसई येथील माल नेहमींप्रमाणें परप्रांतांत पोचविण्याची ताबडतोब व्यवस्था करून घेत. त्यामुळें व्यापाऱ्यांचें व बागायतदारांचें होणारें मोठें नुकसान टळत असे. रेल्वेनें आपल्या दरांत वाढ केल्यास अगर वाहतुकीबाबत मिळणाऱ्या सवलती कमी केल्यास अण्णासाहेब ह्या बाबतींत ताबडतोब लक्ष घालीत आणि बागायतदारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेत. अण्णासाहेबांच्या कर्तव्यदक्षतेमुळें बागायतदार व व्यापारी अण्णासाहेबांना आपला त्राता समजत असत. अण्णासाहेबांनींही त्यांना सर्वतोपरी मदत करण्यांत कधींही हयगय केली नाहीं. संकटसमयीं अण्णासाहेबांचें दार त्यांना रात्रंदिवस खुलें असे. अण्णासाहेब पुढें मंत्री झाले तरी ह्या बाबतींत त्यांच्या वागणुकींत कधींही अंतर पडलें नाहीं. अण्णासाहेब मुंबईंत असोत अगर पुण्यांत असोत, बागायतदार आणि व्यापारी ह्यांच्या शिष्टमंडळास ते केव्हांही भेट देत आणि त्यांना योग्य तें मार्गदर्शन करून त्यांच्या तक्रारींची दाद लावून घेण्याचा ताबडतोब प्रयत्न करीत. अण्णासाहेबांच्या ह्या सर्व प्रयत्नाच्या मागें शेतकऱ्यांवरील त्यांचें प्रेम हीच मुख्य भावना होती. शेतकऱ्यांच्या सेवेसाठीं त्यांनीं आपलें जीवन वाहिलें होतें. त्यांचें हें कार्य त्यांच्या जीवनध्येयाला पूरक असेंच झालें.

तरच हा माल चांगल्या स्थितींत गिऱ्हाइकाच्या हातांत पडून मालाचा व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर उठाव होण्याचा संभव असतो. परंतु वाहतुकीच्या सोयीबाबत रेल्वेबरोबर बागायतदारांच्या व व्यापाऱ्यांच्या नेहमीं तक्रारी उत्पन्न होत व त्याचा परिणाम मालाची मागणी घटण्यांत होई. ह्यामुळें बागायतदार व व्यापारी ह्या दोन्ही वर्गांचें नुकसान होत असे. तें टाळण्यासाठीं व वाहतुकीबाबतच्या अडचणींची आणि तक्रारींची दाद लागावी म्हणून अण्णासाहेबांच्या प्रोत्साहनानें शेतकी सभेला जोडून सन १९३० सालीं पानव्यापाऱ्यांची एक असोसिएशन स्थापन करण्यांत आली.

शेतकी सभेनें व ह्या असोसिएशननें पुढील कांहीं वर्षे जुळ्या भावंडांप्रमाणें काम करून वसई तालुक्यांतील बागायतदारांच्या रेल्वे-विषयक अनेक तक्रारींची व अडचणींची दाद लावून घेतली. स. १९३० च्या पूर्वी बी. बी. सी. आय्. रेल्वेची पंजाब मेल वसई स्टेशनवर थांबत नसे. अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं वरील दोन्ही संस्थांनीं खटपट केल्यामुळें त्या सालापासून पानें व केळीं घेण्यासाठीं वसई स्टेशनांत पंजाब मेल थांबू लागली. त्याप्रमाणें जलद जाणाऱ्या इतर गाड्याही वसई स्टेशनवर थांबूं लागल्या. त्यामुळें मालाच्या वाहतुकीबाबत बागायतदारांची आणि व्यापाऱ्यांची मोठी अडचण दूर झाली. वाहतुकीच्या बाबतींत आणखी एक मोठी अडचण दरसाल पावसाळ्यांत उद्भवत असते. बी. बी. सी. आय्. रेल्वेचा म्हणजे सध्याच्या पश्चिमी रेल्वेचा मार्ग कांहीं कांहीं ठिकाणीं सखल आणि भुसभुशीत प्रदेशांतून जात असल्यामुळें पावसाळ्यांत अतिवृष्टीमुळें अशा ठिकाणचा रेल्वेमार्ग वाहून जातो. त्यामुळें रेल्वेचें दळणवळण कांहीं दिवस बंद पडण्याचा धोका उद्भवत असतो. परंतु अचानक येणाऱ्या ह्या संकटाची कांहींच कल्पना नसल्यामुळें बागायतदार आपला तयार झालेला माल तोडून बाजारांत आणीत असतो. अशा वेळीं तयार असलेला माल मध्य रेल्वेमार्गानें परप्रांतांत पाठविण्याची त्वरित व्यवस्था न झाल्यास हा माल फुकट

जाण्याचा धोका निर्माण होतो. एवढेंच नव्हे तर पानबाजार बंद पडून त्यामुळें बागायतदार व व्यापारी ह्या दोन्ही वर्गाचें मोठें नुकसान होतें. गेल्या तीस वर्षांत अशा प्रकारचे अनेक प्रसंग उद्भवले. परंतु प्रत्येक प्रसंगीं अण्णासाहेब बागायतदार व व्यापारी ह्यांच्या मदतीस धावून गेले आहेत. अशा वेळीं ते आपल्या स्वतःच्या खाजगी अगर सार्वजनिक कामाची पर्वा न करतां, रेल्वेअधिकारी, सरकारचे मार्केटिंग अधिकारी, वगैरे संबंधित अधिकाऱ्यांना भेटून दुसऱ्या रेल्वेमार्गानें वसई येथील माल नेहमींप्रमाणें परप्रांतांत पोचविण्याची ताबडतोब व्यवस्था करून घेत. त्यामुळें व्यापाऱ्यांचें व बागायतदारांचें होणारें मोठें नुकसान टळत असे. रेल्वेनें आपल्या दरांत वाढ केल्यास अगर वाहतुकीबाबत मिळणाऱ्या सवलती कमी केल्यास अण्णासाहेब ह्या बाबतींत ताबडतोब लक्ष घालीत आणि बागायतदारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेत. अण्णासाहेबांच्या कर्तव्यदक्षतेमुळें बागायतदार व व्यापारी अण्णासाहेबांना आपला त्राता समजत असत. अण्णासाहेबांनींही त्यांना सर्वतोपरी मदत करण्यांत कधींही हयगय केली नाहीं. संकटसमयीं अण्णासाहेबांचें दार त्यांना रात्रंदिवस खुलें असे. अण्णासाहेब पुढें मंत्री झाले तरी ह्या बाबतींत त्यांच्या वागणुकींत कधींही अंतर पडलें नाहीं. अण्णासाहेब मुंबईंत असोत अगर पुण्यांत असोत, बागायतदार आणि व्यापारी ह्यांच्या शिष्टमंडळास ते केव्हांही भेट देत आणि त्यांना योग्य तें मार्गदर्शन करून त्यांच्या तक्रारींची दाद लावून घेण्याचा ताबडतोब प्रयत्न करीत. अण्णासाहेबांच्या ह्या सर्व प्रयत्नाच्या मागें शेतकऱ्यांवरील त्यांचें प्रेम हीच मुख्य भावना होती. शेतकऱ्यांच्या सेवेसाठीं त्यांनीं आपलें जीवन वाहिलें होतें. त्यांचें हें कार्य त्यांच्या जीवनध्येयाला पूरक असेंच झालें.

प्रकरण बारावें

# भातशेतीचे तज्ज्ञ

अण्णासाहेब पदवीधर होऊन जिल्हा लोकल-बोर्डाचे अध्यक्ष झाले किंवा पुढें मंत्रीपदाला पोचले तरी अण्णासाहेबांनीं आपल्या शेतीच्या व्यवसायाकडे दुर्लक्ष केलें नाहीं. अण्णासाहेब हाडाचे शेतकरी असल्यामुळें आणि त्यांचें बहुतेक आयुष्य खेड्यांत व शेतकऱ्यांत गेलेलें असल्यामुळें शेतीसंबंधीं त्यांना विलक्षण प्रेम व आकर्षण वाटे. अण्णासाहेब मुख्यतः भातशेतीच करीत असत. त्यांच्या विरार गांवींही कांहीं बागायती जमीन आहे. परंतु वसई–आगाशी आगरामधील बागायती जमिनीसारखी ती समृद्ध नाहीं. शिवाय विरार येथें उन्हाळ्यांत पाण्याचें नेहमींच दुर्भिक्ष्य असल्याकारणानें जी बागायती जमीन आहे तिचाही ज्या प्रमाणांत उपयोग व्हावयास पाहिजे तसा तो होत नाहीं. अण्णासाहेबांची स्वतःची कांहीं बागाईत जमीन आहे. पूर्वी ह्या जमिनींत उसाची लागवड करण्यांत येत असे. परंतु पुढें गुळाचे भाव पडल्याकारणानें ही जमीन उसाच्या लागवडीखालून काढणें भाग पडलें. त्यामुळें अण्णासाहेबांच्या घराण्यानें भातशेतीवरच जास्त भर दिला.

लहानपणापासून आपल्या शेतीवर जाण्याचा अण्णासाहेबांचा परिपाठ होता. आवणीचा व कापणीचा मोसम असला म्हणजे सकाळ संध्याकाळ दोन्ही वेळां न चुकतां ते आपल्या शेतीवर जात असत. बींपेरणीपासून आवणी, कापणी, वगैरेपर्यंतचीं सर्व कामें त्यांच्या देखरेखीखालीं होत असत. ते मंत्री असतांनासुद्धा आवणीच्या व कापणीच्या वेळीं आपल्या चिरंजिवांना शेतीच्या कामासंबंधीं जरूर त्या सूचना देत असत आणि वेळांत वेळ काढून आपली शेती पाहून जात. आवणीच्या व कापणीच्या वेळीं शेतावर लावलेल्या मजुरांसाठीं सर्व स्वयंपाक त्यांच्या घरींच होत असे. ही प्रथा आजही त्यांच्या घरीं चालू आहे.

भातशेतीच्या प्रश्नांचा अण्णासाहेबांनीं सखोल अभ्यास केला होता. आपल्या येथील शेतांतून होणारें भाताचें दर एकरीं उत्पादन बरेंच कमी असतें ह्याची त्यांना फार पूर्वीपासून जाणीव होती. हें उत्पादन वाढविण्यासाठीं काय उपाय योजले पाहिजेत ह्याचाही त्यांनीं पूर्ण विचार केला होता. भातशेतीच्या बाबतींत आपण पावसावर फार अवलंबून राहातों व पेरणीनंतर वेळोवेळीं नियमितपणें पाऊस न पडल्यास भाताच्या उत्पादनावर त्याचा फार परिणाम होतो. पावसाबाबतची ही अनिश्चितता टाळण्यासाठीं भातशेतीला नियमानें पाणी मिळण्यासंबंधीं जर कांहीं योजना होऊं शकली तर भाताचें पीक उत्तम येऊन त्याला उताराही चांगला येईल, ह्याबद्दल अण्णासाहेबांना शंका नव्हती. म्हणून त्यांनीं आपल्या स्वतःच्या शेतीबाबत ह्यासंबंधीं एक लहानसा प्रयोग केला. त्यांच्या जमिनीजवळून एक लहानसा ओहोळ जात असून पावसाळ्यांत हा ओहोळ भरून वाहात असतो. पुष्कळ वर्षांपूर्वी त्यांनीं ह्या ओहोळाला एक लहानसा बांध घालून त्याचें पाणी अडविलें; आणि ज्या ज्या वेळीं पावसाचें दुर्भिक्ष्य भासेल त्या त्या वेळीं ह्या ओहोळाचें पाणी आपल्या जमिनीस देण्याची त्यांनीं व्यवस्था केली. त्यामुळें पाण्याची टंचाई त्यांच्या शेतीला फारशी कधीं जाणवत नाहीं.

पाणीपुरवठ्याप्रमाणेंच भातशेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं चांगल्या बियाण्याची व खताची जरूरी असते. उत्तम प्रकारच्या बियाण्याची निपज करण्यासाठीं त्या काळीं फारसे प्रयोग झाले नव्हते. परंतु सरकारनें पुढें अनेक प्रयोग करून झेड् २१ व ५४० हे भाताच्या बियाण्याचे नमुने तयार केले. अण्णासाहेबांनींच हे नमुने प्रथमतः वसई तालुक्यांत आणले व आपल्या जमिनींत त्यांचे प्रयोग केले. आतां ह्या बियाण्यांचा सर्व वसई तालुक्यांत प्रसार झाला आहे. खतांच्या बाबतींतसुद्धा अण्णासाहेबांनींच इतर शेतकऱ्यांना उदाहरण घालून दिलें. पूर्वीं शेतकरी पेंडीशिवाय भातशेतीला इतर खत देत नसत. पुढें बाजारांत अनेक रासायनिक खतें येऊं लागलीं. परंतु ह्या खतांचा उपयोग आपल्या भातशेतीकडे करण्याचें धाडस कोणी करीना. कारण ह्या खतामुळें जमिनीचा पोत बिघडून जाईल अशी शेतकऱ्यांना भीति वाटत होती. अण्णासाहेबांनीं हीं खतें स्वतः पहिल्यानें आपल्या जमिनीला देऊन शेतकऱ्यांना ह्या खतांबद्दल वाटणारी भीति नाहींशी केली.

अण्णासाहेब मंत्री असतांना बोर्डी येथील श्री. हरिश्चंद्र गोपाळराव पाटील ह्यांना जपान येथील भातशेतीच्या लागवडीच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठीं सरकारनें जपान येथें पाठविलें होतें. अण्णासाहेबांना ह्या पद्धतीबद्दल फार उत्सुकता होती. श्री. पाटील जपानहून परत आल्यानंतर अण्णासाहेबांनीं त्यांच्याकडून जपानी पद्धतीनें आपले कांहीं प्लॉट्स लावून घेतले व ह्या बाबतींत त्यांनीं शेतीसंबंधीं आपला पुरोगामीपणा सिद्ध केला.

अशा रीतीनें आपल्या भातशेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं अण्णासाहेब प्रयत्न करीत असतांना दुसऱ्या एक प्रकारच्या भातशेतीच्या जमिनीकडे त्यांचें दुर्लक्ष झालें नव्हतें. ही शेतजमीन मुख्यतः उत्तर कोंकणांत म्हणजे ठाणें जिल्हा, पूर्वीचा मुंबई उपनगर जिल्हा व कुलाबा जिल्हा मिळून होणाऱ्या विभागांत असून तिला खार जमीन असें म्हणतात. ह्या विभागांत सर्वत्र आढळणाऱ्या खाड्यांच्या किनाऱ्यांना लागून ही जमीन आहे. ह्या जमिनीचे प्रश्न गोड्या जमिनीच्या प्रश्नांपेक्षां सर्वस्वीं

भिन्न आहेत. ह्या जमिनींत एका विशिष्ट प्रकारचाच तांदूळ पिकूं शकतो. रंगानें हा तांदूळ लाल असून 'राता तांदूळ' ह्या नांवानें ओळखला जातो. बाजारांत त्याला इतर तांदळाच्या मानानें भावही बराच कमी येत असतो. खाऱ्या जमिनींतील भाताच्या लागवडीची पद्धतही गोड्या जमिनींतील लागवडीच्या पद्धतीहून सर्वस्वीं भिन्न आहे. गोड्या भातशेतीप्रमाणें खाऱ्या भातशेतीच्या जमिनींत भाताच्या रोपांची आवणी करावी लागत नाहीं किंवा पिकाला खतही द्यावें लागत नाहीं. खाऱ्या जमिनीचा मुख्य प्रश्न बांधबंदिस्तीचा आहे. भरतीच्या वेळीं खाडींत येणारें समुद्राचें पाणी लागवडीखालीं असलेल्या खाऱ्या जमिनींत शिरूं नये म्हणून खाऱ्या जमिनीच्या कडेला मोठमोठाले बांध घालावे लागतात. पुष्कळ वेळां अतिवृष्टीमुळें अगर उधानाच्या पाण्यामुळें हे बांध फुटून जाण्याचा मोठा संभव असतो. म्हणून मोठमोठे बांध घालणें व ते उत्तम स्थितींत ठेवणें हें खाऱ्या जमिनीच्या बाबतींत महत्त्वाचें काम असतें. बांधाच्या दुरुस्तीच्या कामास 'बांधबंदिस्ती' असें म्हणतात. ह्या बांधबंदिस्तीच्या कामासाठीं फार खर्च येत असतो. ह्या खर्चामुळेंच एके काळीं उत्तम स्थितींत असलेल्या अनेक 'खारी' आज ओस पडलेल्या आहेत.

ठाणें जिल्ह्यांत एकंदर खारी भातशेती किती आहे, तिचें गोड्या शेतीशीं काय प्रमाण पडतें, खाऱ्या भातशेतीवर किती लोकांचा निर्वाह होतो, खारी भातशेती सुधारण्यासाठीं काय काय प्रयत्न करतां येतील ह्या सर्व प्रश्नांचा अण्णासाहेबांनीं साकल्यानें विचार केला होता. खाऱ्या जमिनीचे प्रश्न वर लिहिल्याप्रमाणें मूलतः गोड्या जमिनीच्या प्रश्नांपेक्षां निराळे असल्याकारणानें गोड्या भातशेतीचें व खाऱ्या भातशेतीचें सरकारनें जें एकत्र वर्गीकरण केलें होतें तें अन्यायाचें होतें. अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत सतत प्रयत्न करून सरकारला आपलें म्हणणें पटवून देऊन खाऱ्या जमिनीचें पुन्हा वर्गीकरण करण्यास सरकारला भाग पाडलें.

शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नांत लक्ष घालून शेतकऱ्यांसंबंधीं अण्णासाहेबांनीं जी आस्था दाखविली व वसई तालुक्यांतील धारावाढीविरुद्ध

जोराची चळवळ करून शेतकरीवर्गांत त्यांनीं जी मोठी जागृति निर्माण केली, त्यामुळें ते ठाणें जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे पुढारी म्हणून ओळखले जाऊं लागले. शेतकऱ्यांतील अण्णासाहेबांच्या ह्या स्थानाची सरकारलाही जाणीव होती. म्हणून दिल्ली येथील इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या राईस कमिटीवर मुंबई इलाख्यांतील भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून मुंबई सरकारनें त्यांचें नांव मध्यवर्ती सरकारकडे सुचविलें. मुंबई, मद्रास, बंगाल, वगैरेसारख्या भात पिकविणाऱ्या मोठ्या इलाख्यांतून प्रत्येकीं एक असे आठ प्रतिनिधि ह्या राईस कमिटीवर घ्यावयाचे होते. मुंबई सरकारनें सुचविलेलें अण्णासाहेबांचें नांव मान्य होऊन १९३६ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत दोन वर्षांकरितां अण्णासाहेबांची राईस कमिटीवर नेमणूक झाली. ह्या कमिटी-वर प्रत्येक प्रांतांतील शेतकीखात्याचे डायरेक्टर्स असून शिवाय इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे मुख्य शेतकीतज्ज्ञ व स्टॅटिस्टि-शियन, मध्यवर्ती सरकारचे ॲग्रिकल्चरल मार्केटिंग ॲडव्हायझर, मुख्य मुख्य प्रांतिक सरकारांचे भातशेतीतज्ज्ञ व क्रॉप बोटॅनिस्ट्स, मद्रास युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉक्टर पी. जे. टॉमस, डाक्का युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉक्टर एच्. एल्. डे ह्यांच्या-सारखी बडी तज्ज्ञ मंडळी होती. कमिटीचे अध्यक्ष इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्चचे उपाध्यक्ष श्री. पी. एम्. खारेघाट हे असून श्री. एन्. सी. मेहता हे ह्या कमिटीचे सेक्रेटरी होते. सर्वच दृष्टींनीं ही नामवंत तज्ज्ञांची कमिटी होती. ह्या कमिटीचें मुख्य काम भातशेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं सरकारला उपाययोजना सुचविणें हें होतें. ह्याशिवाय भातशेतीसंबंधींच्या इतर निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रश्नांचाही विचार ह्या कमिटीकडून होत असे.

ह्या राईस कमिटीच्या सभांच्या वेळीं सभासदांकडून भातशेती-संबंधींच्या निरनिराळ्या विषयांवर प्रबंध वाचले जात व त्यावर जी चर्चा होई ती अतिशय शास्त्रीय स्वरूपाची असे. निरनिराळ्या प्रांतांतून

भातशेतीबाबत चालू असलेल्या प्रयोगासंबंधीं चर्चाही ह्या सभांच्या वेळीं होत असे. आज आपणांस थोडेंसें कुतूहल वाटेल अशी एक बाब कमिटी-पुढें एकदा चर्चेस आली होती आणि ती म्हणजे जपान, फिलिपाइन्स, जावा, चीन व मलाया ह्या मुख्यतः भात पिकविणाऱ्या देशांत तेथील भातशेतीच्या लागवडीच्या पद्धतींचा व भातशेतीविषयक इतर प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठीं सरकारनें आपला एक तज्ज्ञ अधिकारी पाठवावा ही होय.

अण्णासाहेबांनीं ह्या कमिटीपुढें "उत्तर कोंकणांतील भातशेतीचे कांहीं प्रश्न" ह्या विषयावर एक महत्त्वाचा प्रबंध वाचला. ह्या प्रबंधामध्यें अण्णासाहेबांनीं भातशेतीविषयक मुख्य मुख्य प्रश्नांची चांगल्या तऱ्हेनें चर्चा केलेली आहे. प्रबंधाचा पहिला भाग गोड्या भातशेतीसंबंधीं असून दुसरा भाग खाऱ्या भातशेतीसंबंधीं आहे. गोड्या जमिनीबाबत पाणीपुरवठ्याच्या योजना आंखण्यांत याव्यात, नवीन व उच्च प्रकारच्या भातबियाण्यासंबंधीं संशोधन करण्यांत यावें, ह्या भागांतील जमिनीचें स्वरूप लक्षांत घेऊन शेतकऱ्यांना उपयोगी पडतील अशीं नवीन उपकरणें शोधून काढण्यांत यावींत अशा त्यांच्या मुख्य सूचना होत्या. खाऱ्या जमिनीबाबत त्यांनीं बांधबंदिस्तीचा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला होताच. परंतु संशोधनाच्या दृष्टीनें पावसाळ्यांत खाऱ्या जमिनींत होणारा खेकड्यांचा उपद्रव व त्यामुळें कांहीं कांहीं वेळां होणारी जबर हानि आणि खाऱ्या जमिनींतील पिकाला उपद्रव देणारा 'लांबा' ह्या बाबतींत विशेष संशोधन व्हावें असें त्यांनीं प्रतिपादिलें होतें. अण्णासाहेब व्यवहारी बुद्धीचे होते. शक्याशक्यतेचा विचार करूनच त्यांनीं ह्या सूचना केल्या होत्या.

राईस कमिटीची मुदत संपल्यानंतर, पुढें ती १९४१ च्या सेप्टेंबर महिन्यापर्यंत वाढविण्यांत आली. ह्या वाढविलेल्या मुदतींतही अण्णासाहेबांची मुंबई इलाख्याचे प्रतिनिधि म्हणून राईस कमिटीवर पुन्हा योजना झाली हें लिहावयास नकोच.

खाऱ्या जमिनीबाबत अण्णासाहेबांनीं फार दूरवर विचार केला होता. उत्तर कोंकणांत लाखों एकर खारी जमीन योग्य उपाययोजनेच्या अभावीं ओस पडली होती. ही जमीन लागवडीस आणतां येणें शक्य झाल्यास अन्नधान्याचा प्रश्न सुटण्यास फार मोठा हातभार लागेल असें त्यांना वाटे. ह्या जमिनीपैकीं जी जमीन थोडक्या उपायानें लागवडीखालीं आणणें शक्य आहे अशा जमिनीबाबत सरकारनें ताबडतोब विचार करावा व 'खारटणा' सारख्या जमिनीचा प्रश्न मागाहून विचारांत घ्यावा, अशा प्रकारच्या सूचना अण्णासाहेबांनीं सरकारकडे वारंवार केल्या. त्यांनीं केलेल्या ह्या प्रयत्नांना शेवटीं यश येऊन खाऱ्या जमिनीच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं व उपाययोजना सुचविण्यासाठीं मुंबई सरकारनें महसूल खात्यांतील एक अधिकारी श्री. पी. के. खारकर ह्यांची नेमणूक केली. श्री. खारकरांनीं ह्या सर्व प्रश्नांचा साद्यन्त विचार करून निरनिराळ्या भागांसाठीं स्वतंत्र अशा अनेक योजना सरकारला सुचविल्या. परंतु ह्या बहुतेक योजना बऱ्याच खर्चाच्या असल्यामुळें आणि युद्धकाळांत इतर अनेक महत्त्वाच्या बाबतींत सरकार गुंतल्यामुळें खाऱ्या जमिनीचा हा प्रश्न त्या वेळीं तात्पुरता मागें पडला.

युद्धसमाप्तीनंतर प्रांतांत पुन्हा कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ होऊन त्यांत अण्णासाहेबांचा समावेश झाला होता. युद्ध संपलें तरी अन्नधान्याचा प्रश्न सुटला नव्हता. इतकेंच नव्हे तर परदेशांतून हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या अन्नधान्याच्या आयातीवर व विशेषतः तांदळाच्या आयातीवर युद्धोत्तर परिस्थितीचा फार परिणाम झाल्यामुळें अन्नधान्याच्या तुटीचा प्रश्न अधिकच बिकट होऊन बसला होता. अशा वेळीं मुंबई सरकारनें खाऱ्या भातशेतीचा प्रश्न हातीं घेतला. खाऱ्या जमिनी लागवडीखालीं आणण्यासाठीं सरकारनें एक योजना तयार करून खाऱ्या जमिनीसाठीं "खार लॅंड बोर्ड ॲक्ट" नांवाचा एक कायदा पास केला. ह्या कायद्यान्वयें मुंबईराज्यांत 'खार लॅंड बोर्डा'ची स्थापना होऊन ह्या बोर्डामार्फत खाऱ्या जमिनीची सुधारणा करण्यासाठीं अनेक योजना

अमलांत आल्या आहेत व येत आहेत. खाऱ्या जमिनीच्या प्रश्नाबाबत सरकारकडून ही जी जोराची चालना मिळाली तिचें बरेंचसें श्रेय अण्णासाहेबांना व सध्याचे मुंबई विधिमंडळाचे सभापति श्री. नानासाहेब कुंटे ह्यांना आहे.

भातशेती हा अण्णासाहेबांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याकारणानें भातशेतीच्या सुधारणेबाबत त्यांनीं सतत प्रयत्न केले. शेतकरी म्हणून असे प्रयत्न करणें ते आपलें परमकर्तव्य मानीत. हें कर्तव्य पार पाडीत असतांना अण्णासाहेबांच्या हातून फार मोठी सेवा घडली आणि त्यामुळेंच अनाहूतपणें मानाच्या अनेक जागा त्यांच्याकडे चालून आल्या. ह्या पदांचा स्वीकारही, आपल्या मोठेपणासाठीं नव्हे तर केवळ कर्तव्य-बुद्धीनेंच त्यांनीं केला, हें त्यांच्या सबंध जीवनाचें अवलोकन केल्यास सहज दिसून येईल.

प्रकरण तेरावें

# झगड्याचा गोड शेवट

सन १९३७ च्या सुमारास वसई नगरपालिका व वसई येथील भाजीपाल्याची लागवड करणारे बागायतदार ह्यांच्यामध्यें होळीबाजार येथें भाजी मार्केट उघडण्यासंबंधीं एक लढा उद्भवला. अण्णासाहेबांच्या दृष्टीनें केवळ घरगुती स्वरूपाचा असा हा लढा होता. त्या वेळीं वसई नगरपालिकेचें एकच भाजी मार्केट असून तें वसई बाजारपेठेंत होतें. खुद्द होळीबाजार येथें खाजगीरीत्या चालविलेलें एक पान-केळा मार्केट होतें. परंतु ह्या मार्केटमध्यें भाजीपाला विकण्यास नगरपालिकेची परवानगी नसे. १९२६-२७ पासून वसई येथील पानवेलीच्या लागवडीवर रोग येऊं लागल्यामुळें पानवेलीच्या धंद्यावर अवलंबून राहाणें बागायतदारांना धोक्याचें वाटूं लागलें आणि त्यामुळें ह्या बागायतदारांनीं पानवेलीच्या लागवडीबरोबर भाजीपाल्याचीही मोठ्या प्रमाणांत लागवड करण्यास सुरुवात केली. वसई बाजारपेठेंतील भाजीपाल्याचें मार्केट व होळीबाजार येथील पान-केळ्याचें मार्केट ह्यांमध्यें जवळ जवळ मैल सव्वा मैलाचें अंतर असल्यामुळें, केवळ भाजीपाल्याच्या विक्रीसाठीं स्वतंत्र माणूस वसई येथील भाजीपाला मार्केटमध्यें पाठविणें बागायतदारांना शक्य नव्हतें.

म्हणून होळीबाजार येथील पान-केळा मार्केटमध्यें ज्या वेळीं पानें, केळीं, वगैरे माल विक्रीसाठीं शेतकरी आणीत त्याच वेळीं त्या मालाबरोबर आपला भाजीपालाही आणीत व हा भाजीपाला होळीबाजारांतच रस्त्या-नजीक ठेवून विकीत. सुरुवातीसुरुवातीस वसई नगरपालिकेनें अशा प्रकारें भाजीपाल्याची विक्री करण्यास मनाई केली नाहीं. त्यामुळें सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. परंतु १९३७ च्या सेप्टेंबर महिन्याच्या सुमारास वसई नगरपालिकेनें अशा तऱ्हेनें भाजीपाला विकण्यास बंदी केली व आपला हुकूम जारीनें अंमलांत आणण्यासाठीं एक स्पेशल शिपाईही नेमला. त्यामुळें भाजीपाल्याची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्यें मोठीच खळबळ उडाली आणि आपल्या गाऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठीं त्यांनीं वसई शेतकी सभेकडे धाव घेतली. त्या वेळीं अण्णासाहेब शेतकी सभेचे अध्यक्ष होते. त्यांनीं ह्या बाबतींत जिल्ह्याचे कलेक्टर, उत्तर विभागाचे कमिशनर आणि त्याचप्रमाणें त्या वेळच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळांतील स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री श्री. एल्. एम्. पाटील ह्यांच्याशीं पत्रव्यवहार करून शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्याची दाद मागितली. शेतकरी होळीबाजारांत जो आपला भाजीपाला विकीत असतात त्याला नगरपालिकेकडून मनाई होऊं नये एवढेंच नव्हे तर शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं होळीबाजार येथें पान-केळा मार्केट शेजारींच एक स्वतंत्र भाजीपाला मार्केट बांधण्यास सरकारनें नगरपालिकेस भाग पाडावें अशा प्रकारची त्यांनीं सरकारकडे विनंती केली. ता. १९-१२-३७ रोजीं झालेल्या तालुका शेतकी सभेच्या वार्षिक सभेंत ह्या बाबतींत एक ठराव पास करण्यांत येऊन ह्या ठरावान्वयें नगरपालिकेच्या अन्याय्य हुकुमाविरुद्ध सरकारकडे दाद मागण्यांत आली. नगरपालिकेच्या हुकुमामुळें उद्भवलेल्या सर्व परिस्थितीचा विचार केल्यानंतर बागायतदारांची बाजू न्याय्य व रास्त आहे असें सरकारला आढळून आल्यामुळें नगरपालिकेनें शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं होळीबाजार येथें एक भाजीपाला मार्केट बांधावें अशी सूचना सरकारनें १९३८ सालीं नगरपालिकेला केली.

परंतु सरकारच्या ह्या सूचनेकडे दुर्लक्ष करून नगरपालिकेनें हा प्रश्न बाजूस सारण्याचा प्रयत्न केला. वास्तविक ह्या बाबतींत बागायतदारांचें म्हणणें अगदीं रास्त होतें. आपल्या थोड्याशा भाजीपाल्याच्या विक्रीसाठीं होळीबाजारापासून मैल सव्वा मैल दूर असलेल्या नगरपालिकेच्या भाजीपाला मार्केटमध्यें जाणें बागायतदारांस त्रासाचें होतें. नगरपालिकेचें म्हणणें असें होतें कीं होळीबाजार येथें भाजीपाल्याची विक्री करण्यास परवानगी दिल्यास वसई बाजारपेठेंतील नगरपालिकेचें भाजीपाला मार्केट बंद पडेल व त्यामुळें नागरिकांची मोठी गैरसोय होईल. परंतु नगरपालिकेची ही भीति अनाठायीं होती. वसई नगरपालिकेच्या मार्केटमध्यें येणारा माल होळीबाजारमध्यें येणाऱ्या भाजीपाल्याशिवाय इतर अनेक ठिकाणांहून येत होता. परंतु ह्या गोष्टीचा विचार करण्याचें नगरपालिकेनें नाकारल्यामुळें हा प्रश्न निष्कारण गुंतागुंतीचा होऊन बसला. ह्या प्रश्नाचा अखेर निकाल लावण्यासाठीं अण्णासाहेबांनीं स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. पाटील ह्यांना वसईस भेट देण्याची विनंती केली. अण्णासाहेबांची विनंती मान्य करून श्री. पाटील ह्यांनीं ता. २१-३-१९३९ रोजीं वसईस भेट दिली व सर्व परिस्थिति समक्ष पाहिली. त्याच दिवशीं वसई नगरपालिकेच्या बाजूच्या मंडळींची व बागायतदारांची एक मोठी सभा वसई पारनाक्यावर भरविण्यांत आली. ह्या सभेस श्री. पाटील स्वतः हजर राहिले. त्यांच्यासमोर दोन्ही पक्षांनीं आपआपलें म्हणणें मांडलें. प्रत्यक्ष पाहाणीवरून आणि दोन्ही बाजूंचें म्हणणें ऐकल्यानंतर बागायतदारांचेंच म्हणणें संयुक्तिक व रास्त असल्याचें आपले मत त्यांनीं ह्या सभेंत दिलें. त्यामुळें ह्या प्रश्नाचा लवकरच अपेक्षे-प्रमाणें निकाल लागून नगरपालिकेस बागायतदारांच्या म्हणण्याप्रमाणें होळभाट येथें भाजीपाला मार्केट बांधणें भाग पडलें.

नवीन भाजीपाला मार्केटसाठीं लवकरच वसई नगरपालिकेनें जुन्या पानकेळा मार्केटनजीकच जागा घेऊन तेथें भाजीपाला मार्केट बांधलें आणि अनेक वर्षें नगरपालिका आणि बागायतदार ह्यांच्यामध्यें चाललेल्या

ह्या झगड्याचा शेवट गोड झाला. नगरपालिकेनें बांधलेलें हें नवीन भाजीपाला मार्केट गेलीं चौदा वर्षे व्यवस्थित चाललेलें असून त्यामुळें नगरपालिकेच्या उत्पन्नांत चांगलीच भर पडली आहे. उलटपक्षीं पान-वेळी मार्केट व भाजीपाला मार्केट शेजारींशेजारीं झाल्यामुळें बागायतदारांचीही मोठी सोय झाली आहे. नवीन भाजीपाला मार्केटमुळें बाजारपेठेंतलें नगरपालिकेचें जुनें मार्केट ओस पडेल ही नगरपालिकेची पूर्वीची भीति अनाठायीं ठरलेली आहे. आरंभापासून अखेरपर्यंत अण्णासाहेबांनीं स्वतः ह्या प्रश्नांत लक्ष घातल्यामुळें व ह्या प्रकरणीं शेवटपर्यंत सनदशीर उपायांचा त्यांनीं अवलंब केल्यामुळें असल्या बाबतींत जो एक प्रकारचा कडवटपणा उत्पन्न होतो तो टळला. ह्याचें सर्व श्रेय अण्णासाहेबांनाच आहे.

प्रकरण चौदावें

# स्वातंत्र्यसंग्रामांतील साधना

लाहोर येथें १९२९ सालीं डिसेंबर महिन्यांत पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनानें आपल्या राष्ट्राच्या इतिहासाला क्रांतिकारक कलाटणी दिली. ह्याच अधिवेशनांत हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय घोषित करण्यांत आलें. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांतील चैतन्यमय पर्वास ह्या अधिवेशनानें सुरुवात होत होती. लाहोर काँग्रेसमधील पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा सामुदायिक आंदोलनाची नांदी ठरली. हिंदुस्थानचा आत्मा जागृत झाल्याची ही घोषणा द्योतक होती. हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षा पुऱ्या करण्यास इंग्रज सरकार कधींच उत्सुक नव्हतें. गोलमेज परिषदेचा उपयोग केवळ हिंदुस्थानला भुलावणी दाखविण्याकरितांच त्यांनीं केला. त्यामुळें हिंदुस्थानांत राजकीय वैफल्याची भावना सारखी वाढत गेली. ह्यांतूनच प्रचंड राजकीय सामुदायिक आंदोलनांचा जन्म झाला.

हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षा साध्य करून घेण्यासाठीं महात्मा गांधींनीं १९३० सालीं मिठाचा सत्याग्रह सुरू केला. मिठावर सरकारनें

बसविलेला कर अन्यायमूलक होता म्हणूनच केवळ हा सत्याग्रह पुकारण्यांत आला नव्हता. त्याचें स्वरूप प्रतीकात्मक होतें. त्याच्यामागें एक महान् तत्त्वप्रणाली होती. सत्याग्रहास सुरुवात करण्यापूर्वी साबरमतीच्या आश्रमांतून गांधीजींनीं व्हाइसरॉयला लिहिलेल्या पत्रांत ह्या तत्त्वप्रणालीचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें आहे. वर्षानुवर्षें इंग्रजांकडून होणाऱ्या हिंदुस्थानच्या पिळणुकीविरुद्ध गांधीजींनीं मिठाच्या सत्याग्रहाच्या रूपानें लढा पुकारला होता. हिंदुस्थानची आर्थिक दैन्यावस्था इंग्रजांच्या अमदानींत पराकोटीला पोचली होती. परकीय सत्ताधाऱ्यांकडून हिंदुस्थानवर लादण्यांत आलेल्या खर्चाचा भार जनतेला असह्य होत चालला होता. जनतेच्या ह्या मूक भावनांना गांधीजींनीं ह्या आंदोलनानें वाचा फोडली. परंतु गांधीजींचें हेंच केवळ ध्येय नव्हतें. राजकीय जागृति निर्माण करण्याचें सामुदायिक आंदोलन हें अमोघ शस्त्र होतें. प्रचंड प्रमाणावर लोकजागृति व ह्या जागृतीद्वारें जनतासंघटन झाल्याशिवाय आपण आपल्या राजकीय ध्येयाप्रत पोचूं शकत नव्हतों. गांधीजींनीं हा संघटनात्मक प्रतिकार वाढविण्यासाठीं सामुदायिक आंदोलनांचा मोठ्या कौशल्यानें उपयोग केला. मिठाचा सत्याग्रह ही त्या आंदोलनाची पहिली पायरी होती.

ता. १२ मार्च रोजीं गांधीजींनीं आपल्या निवडक ७९ अनुयायांसह साबरमती आश्रमांतून दांडीयात्रेस सुरुवात केली. साबरमती ते दांडी २३५ मैलांचें अंतर त्यांनीं पायीं २४ दिवसांत तोडलें. ता. ५ एप्रिल रोजीं गांधीजी दांडीस पोचले व ता. ६ रोजीं सकाळीं ६॥ वाजतां दांडी गांवच्या प्रशस्त समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजींनीं मिठाचा सत्याग्रह केला. राष्ट्राच्या इतिहासांतील तो एक रोमहर्षक क्षण होता. सबंध राष्ट्रांतून नवचैतन्याची व देशभक्तीची प्रचंड लाट उसळली. ठिकठिकाणीं मिठाच्या सत्याग्रहास सुरुवात झाली. ता. ६ एप्रिल रोजीं ठाणें जिल्ह्यांत सत्याग्रह मंडळ स्थापण्यांत आलें आणि ह्या मंडळाचें नेतृत्व बॅ. जमनादास मेहता ह्यांजकडे देण्यांत आलें.

ह्या मंडळातर्फें अर्नाळा येथें ता. १५ एप्रिल रोजीं सत्याग्रह शिबिर उघडण्यांत आलें. त्या वेळीं महाराष्ट्र सत्याग्रह मंडळाचे श्री. शंकरराव देव व श्री. वान्द्रेकर हे उपस्थित होते. जिल्ह्यांतून ठिकठिकाणांहून शिबिरांत सत्याग्रही दाखल होऊं लागले. चार आठ दिवसांत हा आंकडा १५० च्या वर गेला. ठाणें जिल्हाव्यतिरिक्त ह्या शिबिरांत महाराष्ट्रांतून नाशिक, खानदेश, पुणें, वगैरे जिल्ह्यांतून अनेक स्वयंसेवक दाखल झाले होते. प्रत्येक तालुक्यांतून शिबिरास मदत मिळत होती. परंतु शिबिराच्या बाबतींतली मुख्य आर्थिक जबाबदारी अण्णासाहेबांनीं आपणांकडे घेतली होती. अण्णासाहेब ठाणें जिल्हा सत्याग्रह मंडळाचे प्रमुख सभासद होते. त्यांच्या सल्ल्यानेंच शिबिराचें सर्व काम चालत असे. त्यांनीं आपल्या मित्र मंडळींच्या साह्यानें शिबिरासाठीं बराच निधि जमविला. स्वतःही ह्या बाबतींत बरीच आर्थिक झीज सोसली. प्रत्यक्ष सत्याग्रहांत भाग न घेतां शिबिर चालू ठेवण्यासाठीं संघटना करण्याची जबाबदारी त्यांनीं आपल्या अंगावर घेतली आणि ती उत्तम प्रकारें पार पाडली. ठाणें जिल्ह्यांत सत्याग्रह मंडळातर्फें मिठाचा पहिला कायदेभंग ता. १३ एप्रिल रोजीं म्हणजे अर्नाळा शिबिर उघडण्यापूर्वी बॅ. जमनादास मेहता ह्यांच्या हस्तें पालघर येथें करण्यांत आला. ह्या कायदेभंगाच्या वेळीं सर्वत्र स्फूर्तिदायक वातावरण निर्माण झाल्याचें दिसून आलें. ह्यानंतर ता. २० एप्रिल रोजीं अर्नाळा येथें मिठाचा पहिला सामुदायिक कायदेभंग बॅ. जमनादास मेहता ह्यांच्या नेतृत्वाखालीं करण्याचें जाहीर करण्यांत आलें. परंतु तत्पूर्वीच ता. १८ एप्रिल रोजीं मेहता ह्यांना शहापूर येथें अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली. जमनादास मेहता ह्यांच्या अटके- नंतरही सत्याग्रह मंडळाचें काम जोरानें चालू राहिलें. ठरल्याप्रमाणें ता. २० एप्रिल रोजीं अर्नाळा येथील मिठाचा सामुदायिक कायदेभंग पुण्याच्या मराठा पत्राचे संपादक श्री. बाबूराव गोखले ह्यांच्या नेतृत्वा- खालीं पार पडला. त्यानंतर माहीम, बोर्डी, चिंचणी, उंबरगांव, वसई, वगैरे अनेक ठिकाणीं सामुदायिक कायदेभंग करण्यांत आला. सामुदायिक

कायदेभंगाच्या ह्या मोहिमेस डॉ. ना. दा. सावरकर, श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय वगैरे प्रसिद्ध पुढाऱ्यांचें नेतृत्व लाभलें होतें. पुढें पुढें हे कायदेभंग जिल्ह्यांतील पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं करण्याचें ठरविण्यांत येऊन त्यासाठीं उंबरगांवचे श्री. देवधेकर ह्यांच्याकडे सत्याग्रह मंडळाचें नेतृत्व देण्यांत आलें. ता. २५ मे रोजीं जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतून स्थानिक पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं मिठाचा सामुदायिक कायदेभंग करण्यांत आला. सामुदायिक कायदेभंगाचा संदेश जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांतून पसरलेला होता ह्याची ग्वाही ता. २५ मेच्या सामुदायिक कायदेभंगानें मिळाली. मिठाचा हा सत्याग्रह मे अखेर चालू ठेवण्यांत आला. परंतु पुढें पावसाळ्यामध्यें तो तहकूब करण्यांत येऊन अर्नाळा येथील शिबिर पावसाळ्यांत तेथें ठेवणें गैरसोयीचें असल्याकारणानें तें विरार येथें हालविण्यांत आलें.

सत्याग्रह शिबिर विरार येथें हालविण्यांत आल्यानंतर अण्णासाहेबांच्या सूचनेवरून श्री. शामराव पाटील शिबिराचे मदतनीस म्हणून शिबिरांत दाखल झाले. त्यांच्याबरोबर श्री. मुकुंदराव सावे हेही शिबिरास येऊन मिळाले. गांधीजींबरोबर दांडीयात्रेच्या वेळीं गुजरात विद्यापिठाच्या अरुण तुकडींत श्री. शामराव पाटील व मुकुंदराव सावे हे दोघेही होते. दांडी येथील मिठाच्या कायदेभंगानंतर ह्या सत्याग्रहींना आपआपल्या प्रांतांत जाऊन काम करण्याचा गांधीजींनीं आदेश दिला होता. शिबिरांत दाखल झाल्यानंतर अण्णासाहेबांच्या सूचनेप्रमाणें श्री. शामराव पाटील शिबिराचें काम पाहूं लागले व लवकरच ते सत्याग्रह मंडळाचे सेक्रेटरी झाले. श्री. मुकुंदराव सावे ह्यांनीं अण्णासाहेबांच्या प्रोत्साहनानें जिल्ह्यांतील स्त्रीसंघटनेचें कार्य हातीं घेतलें व त्या कार्यांत त्यांनीं पुढें चांगलीच प्रगति केली.

१९३० च्या जुलै महिन्यांत वसई तालुक्यांतील पापडी व साष्टी तालुक्यांतील भायंदर ह्या ठिकाणीं १४४ कलम लागू केल्यामुळें ह्या कलमाचा भंग करण्याचें ठाणें जिल्हा सत्याग्रह मंडळानें ठरविलें आणि

ह्या मंडळातर्फे अर्नाळा येथें ता. १५ एप्रिल रोजीं सत्याग्रह शिबिर उघडण्यांत आलें. त्या वेळीं महाराष्ट्र सत्याग्रह मंडळाचे श्री. शंकरराव देव व श्री. वान्द्रेकर हे उपस्थित होते. जिल्ह्यांतून ठिकठिकाणांहून शिबिरांत सत्याग्रही दाखल होऊं लागले. चार आठ दिवसांत हा आंकडा १५० च्या वर गेला. ठाणें जिल्हाव्यतिरिक्त ह्या शिबिरांत महाराष्ट्रांतून नाशिक, खानदेश, पुणें, वगैरे जिल्ह्यांतून अनेक स्वयंसेवक दाखल झाले होते. प्रत्येक तालुक्यांतून शिबिरास मदत मिळत होती. परंतु शिबिराच्या बाबतींतली मुख्य आर्थिक जबाबदारी अण्णासाहेबांनीं आपणांकडे घेतली होती अण्णासाहेब ठाणें जिल्हा सत्याग्रह मंडळाचे प्रमुख सभासद होते. त्यांच्या सल्लयानेंच शिबिराचें सर्व काम चालत असे. त्यांनीं आपल्या मित्र मंडळींच्या साह्यानें शिबिरासाठीं बराच निधि जमविला. स्वतःही ह्या बाबतींत बरीच आर्थिक झीज सोसली. प्रत्यक्ष सत्याग्रहांत भाग न घेतां शिबिर चालू ठेवण्यासाठीं संघटना करण्याची जबाबदारी त्यांनीं आपल्या अंगावर घेतली आणि ती उत्तम प्रकारें पार पाडली. ठाणें जिल्ह्यांत सत्याग्रह मंडळातर्फे मिठाचा पहिला कायदेभंग ता. १३ एप्रिल रोजीं म्हणजे अर्नाळा शिबिर उघडण्यापूर्वी बॅ. जमनादास मेहता ह्यांच्या हस्तें पालघर येथें करण्यांत आला. ह्या कायदेभंगाच्या वेळीं सर्वत्र स्फूर्तिदायक वातावरण निर्माण झाल्याचें दिसून आलें. ह्यानंतर ता. २० एप्रिल रोजीं अर्नाळा येथें मिठाचा पहिला सामुदायिक कायदेभंग बॅ. जमनादास मेहता ह्यांच्या नेतृत्वाखालीं करण्याचें जाहीर करण्यांत आलें. परंतु तत्पूर्वींच ता. १८ एप्रिल रोजीं मेहता ह्यांना शहापूर येथें अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली. जमनादास मेहता ह्यांच्या अटके-नंतरही सत्याग्रह मंडळाचें काम जोरानें चालू राहिलें. ठरल्याप्रमाणें ता. २० एप्रिल रोजीं अर्नाळा येथील मिठाचा सामुदायिक कायदेभंग पुण्याच्या मराठा पत्राचे संपादक श्री. बाबूराव गोखले ह्यांच्या नेतृत्वा-खालीं पार पडला. त्यानंतर माहीम, बोर्डी, चिंचणी, उंबरगांव, वसई, वगैरे अनेक ठिकाणीं सामुदायिक कायदेभंग करण्यांत आला. सामुदायिक

कायदेभंगाच्या ह्या मोहिमेस डॉ. ना. दा. सावरकर, श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय वगैरे प्रसिद्ध पुढाऱ्यांचें नेतृत्व लाभलें होतें. पुढें पुढें हे कायदेभंग जिल्ह्यांतील पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं करण्याचें ठरविण्यांत येऊन त्यासाठीं उंबरगांवचे श्री. देवधेकर ह्यांच्याकडे सत्याग्रह मंडळाचें नेतृत्व देण्यांत आलें. ता. २५ मे रोजीं जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतून स्थानिक पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं मिठाचा सामुदायिक कायदेभंग करण्यांत आला. सामुदायिक कायदेभंगाचा संदेश जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांतून पसरलेला होता ह्याची ग्वाही ता. २५ मेच्या सामुदायिक कायदेभंगानें मिळाली. मिठाचा हा सत्याग्रह मे अखेर चालू ठेवण्यांत आला. परंतु पुढें पावसाळ्यामध्यें तो तहकूब करण्यांत येऊन अर्नाळा येथील शिबिर पावसाळ्यांत तेथें ठेवणें गैरसोयीचें असल्याकारणानें तें विरार येथें हालविण्यांत आलें.

सत्याग्रह शिबिर विरार येथें हालविण्यांत आल्यानंतर अण्णासाहेबांच्या सूचनेवरून श्री. शामराव पाटील शिबिराचे मदतनीस म्हणून शिबिरांत दाखल झाले. त्यांच्याबरोबर श्री. मुकुंदराव सावे हेही शिबिरास येऊन मिळाले. गांधीजींबरोबर दांडीयात्रेच्या वेळीं गुजरात विद्यापिठाच्या अरुण तुकडींत श्री. शामराव पाटील व मुकुंदराव सावे हे दोघेही होते. दांडी येथील मिठाच्या कायदेभंगानंतर ह्या सत्याग्रहींना आपआपल्या प्रांतांत जाऊन काम करण्याचा गांधीजींनीं आदेश दिला होता. शिबिरांत दाखल झाल्यानंतर अण्णासाहेबांच्या सूचनेप्रमाणें श्री. शामराव पाटील शिबिराचें काम पाहूं लागले व लवकरच ते सत्याग्रह मंडळाचे सेक्रेटरी झाले. श्री. मुकुंदराव सावे ह्यांनीं अण्णासाहेबांच्या प्रोत्साहनानें जिल्ह्यांतील स्त्रीसंघटनेचें कार्य हातीं घेतलें व त्या कार्यांत त्यांनीं पुढें चांगलीच प्रगति केली.

१९३० च्या जुलै महिन्यांत वसई तालुक्यांतील पापडी व साष्टी तालुक्यांतील भायंदर ह्या ठिकाणीं १४४ कलम लागू केल्यामुळें ह्या कलमाचा भंग करण्याचें ठाणें जिल्हा सत्याग्रह मंडळानें ठरविलें आणि

त्याप्रमाणें ता. १ ऑगस्टपासून ह्या ठिकाणीं सत्याग्रहास सुरुवात झाली. हा सत्याग्रह दारूदुकानावरील पिकेटिंगबाबत होता. ह्या सत्याग्रहांत तुरुंगांत गेलेल्या प्रमुख व्यक्ति म्हणजे श्री. देवधेकर, श्री. छोटालाल श्रॉफ, श्री. पुरुषोत्तम जनार्दन गाळवणकर, श्री. बाबूराव दांडेकर ह्या होत. दारूदुकानावरील पिकेटिंगबरोबरच दारू-ताडीच्या मक्तयांच्या व जंगलकूपांच्या लिलावाच्या वेळीं मक्तेदारांना लिलाव घेण्यापासून परावृत्त करण्याचें महत्त्वाचें काम सत्याग्रह मंडळानें केलें. ह्या कार्यांत अण्णासाहेबांच्या व्यक्तित्वाचा सत्याग्रह मंडळाला फार उपयोग झाला.

सहा महिन्यांची आपली शिक्षा संपवून जमनादास मेहता बाहेर आले, त्या वेळीं सत्याग्रह मंडळातर्फे त्यांचें भव्य स्वागत करण्यांत आलें. देशांत सर्वत्र मिरवणूकबंदी, लाठीहल्ले, धरपकड, शिक्षा, वगैरे दडपशाहीचे प्रकार चालूच होते. जमनादास मेहता ह्यांच्या स्वागतासाठीं झालेल्या सभेंत मद्यपानबंदीचें कार्य जिल्ह्यांत नेटानें सुरू ठेवण्यासाठीं ठाणें जिल्हा मद्यपान प्रतिबंधक मंडळाची स्थापना करण्यांत आली. ह्या मंडळामार्फत ठाणें जिल्ह्यांतून दारूताडीचें उच्चाटण करण्यासाठीं मोठी मोहीम काढण्यांत आली. ह्या मोहिमेंत जिल्ह्यांतून ठिकठिकाणीं प्रचार-सभा घेण्यांत आल्या. अण्णासाहेब पहिल्यापासूनच मद्यपानबंदीचे कट्टे पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांनीं दारूबंदीच्या ह्या चळवळींत आपल्या अमोघ वाणीनें जिल्ह्यांतील खेड्याखेड्यांतून शेकडों व्याख्यानें दिलीं व प्रचाराच्या दृष्टीनें मोठी संस्मरणीय कामगिरी बजावली.

१९३१ च्या मार्च महिन्यांत गांधी–आयर्विन समेट होऊन सत्याग्रहाचा लढा तहकूब करण्यांत आला. ह्या निर्णयानुसार ठाणें जिल्ह्यांतील शिबिरही बंद करण्यांत आलें. सत्याग्रहाच्या नैतिक यशामुळें देशांत सर्वत्र आनंदाचें वातावरण पसरलें होतें. लवकरच मार्च महिन्यांत कराची येथें सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. ह्या अधिवेशनास ठाणें जिल्ह्याचे प्रतिनिधि म्हणून अण्णासाहेब हजर राहिले होते. १९२० पासून झालेल्या कॉंग्रेसच्या

बहुतेक अधिवेशनांस अण्णासाहेब त्यांचे वसईचे स्नेही डॉ. अभ्यंकर ह्यांजबरोबर हजर राहात आले होते.

१९३१ च्या ऑक्टोबर महिन्यांत बोर्डी येथें स्वामी आनंद ह्यांच्या प्रेरणेनें गांधी आश्रम काढण्यांत आला. ह्या आश्रमाचें उद्घाटन सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या हस्तें झालें. ह्या प्रसंगीं डॉ. राजेंद्रप्रसादही हजर होते. आश्रमाची कल्पना अण्णासाहेबांना पसंत असल्याकारणानें त्यांनीं ह्या आश्रमाला मोठी देणगी दिली. पुढें कॅांग्रेस ही संस्था सरकारकडून बेकायदेशीर ठरविण्यांत आल्यावर हा आश्रम सरकारनें जप्त केला व त्यानंतर चार वर्षें तो सरकारच्या ताब्यांत राहिला.

कॅांग्रेस व सरकार ह्यांच्यामध्यें झालेल्या करारानंतर गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहिले. परंतु हा करार पाळण्याचा सरकारचा मुळींच उद्देश नव्हता. महात्मा गांधी विलायतेहून परत येण्यापूर्वींच सरकारनें देशांत दडपशाही सुरू केली आणि देशांतील लहानथोर पुढाऱ्यांना पकडून तुरुंगांत डांबून ठेविलें. सरकारच्या धोरणानुसार ठाणें जिल्ह्यांतही धरपकड झाली आणि ह्या धरपकडींत अण्णासाहेबांना पकडून ठाण्याच्या तुरुंगांत स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें.

ह्याच कालांत जातीय निवाडा प्रसिद्ध झाला. ह्या निवाड्यानें हरिजन समाजास हिंदूंपासून अलग करण्यांत आलें होतें. हा निवाडा कायम राहिल्यास हिंदु समाजाचीं शकलें होणार होतीं, एवढेंच नव्हे, तर देशाचें राजकीय भवितव्यही धोक्यांत येणार होतें. हा धोका ओळखून जातीय निवाडा रद्द व्हावा म्हणून गांधीजींनीं पुणें येथें प्राणांतिक उपोषण सुरू केलें. गांधीजींच्या आत्मसमर्पणाच्या ह्या निश्चयापुढें इंग्रज सरकारला माघार घ्यावी लागून जातीय निवाडा रद्द करावा लागला. आणि त्यानंतर अस्पृश्योद्धाराची चळवळ सर्व देशभर पसरली. ह्याच चळवळींत अण्णासाहेबांनीं आपलें श्रीराम मंदिर हरिजनांसाठीं खुले केलें.

१९३४ च्या जून महिन्यांत सरकारनें कॅांग्रेसवरील बंदी उठविली व त्यानंतर कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम कॅांग्रेसनें पुन्हा हातीं घेतला.

ह्या कार्यक्रमाबाबत पूर्वी महाराष्ट्रांत उठलेला फेरनाफेर वाद अद्यापि धुमसतच राहिला होता आणि ह्या वादांतूनच पुढें प्रतिसहकार पक्ष व त्यानंतर डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्ष जन्मास आले. तात्यासाहेब केळकर व जमनादास मेहता ह्यांचा कॉंग्रेसच्या धोरणाबद्दल मतभेद झाल्यामुळें त्यांनीं ह्या पक्षांची स्थापना केली होती. श्री. हरिभाऊ पाटसकर व अण्णासाहेब ह्यांसारखी मंडळी कांहीं काळ ह्या पक्षांमध्यें होती. परंतु अण्णासाहेब ह्या पक्षांशीं कधींच समरस होऊं शकले नाहींत. १९३५ सालच्या घटना कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होतांच मुंबई विधिमंडळासाठीं स्वतंत्रपणें उभें राहाण्याचा अण्णासाहेबांचा विचार होता. परंतु १९२० पासून अण्णासाहेबांनीं केलेली कॉंग्रेसची सेवा व ठाणें जिल्ह्यांत असलेलें त्यांचें वजन लक्षांत घेऊन महाराष्ट्रांतील कॉंग्रेसचे ज्येष्ठ व श्रेष्ठ नेते श्री. शंकरराव देव ह्यांनीं विधिमंडळासाठीं कॉंग्रेसच्या तिकिटावर उभें राहाण्याबाबत अण्णासाहेबांचें मन वळविलें आणि त्याप्रमाणें १९३७ सालीं झालेल्या मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकींत अण्णासाहेब कॉंग्रेसतर्फे ठाणें जिल्ह्यांतून प्रचंड बहुमतानें निवडून आले.

१९३७ सालच्या निवडणुकींत कॉंग्रेस पक्ष प्रचंड बहुमतानें मुंबई विधिमंडळांत निवडून आला आणि त्यानंतर लवकरच प्रांतांत कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ होऊन श्री. बाळासाहेब खेर पंतप्रधान झाले. कॉंग्रेस अधिकारारूढ झाल्यामुळें जनतेंत विलक्षण उत्साह निर्माण झाला. जनतेंतील हा उत्साह विधायक कार्यांत लावण्याच्या दृष्टीनें कॉंग्रेसनें स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुका लढविण्याचा निर्णय केला. ह्या निर्णयानुसार १९३८ सालीं ठाणें जिल्हा लोकलबोर्डाची निवडणूक अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसतर्फे लढविण्यांत आली आणि ह्या निवडणुकीमध्यें कॉंग्रेस पक्षाला बोर्डामध्यें हुकमी बहुमत मिळालें. त्यानंतर ठाणें येथील गांधी आश्रमांत महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव ह्यांच्या अध्यक्षतेखालीं बोर्डांतील कॉंग्रेस

पक्षाच्या सभासदांची सभा भरून पक्षनेता म्हणून अण्णासाहेबांची एकमतानें निवड झाली व पुढें रीतसर अण्णासाहेब जिल्हा लोकलबोर्डाचे दुसऱ्यांदा अध्यक्ष निवडून आले. अण्णासाहेबांना आपलें आवडतें कार्य करण्यास ह्याप्रमाणें पुन्हा संधि प्राप्त झाली.

कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर प्रत्येक जिल्ह्यांत ग्रामविकास मंडळें स्थापण्यांत आलीं. जिल्ह्यांतील ग्रामीण विभागांत होणारें कार्य पद्धतशीरपणें व जनतेच्या प्रतिनिधीमार्फत व्हावें हा ह्यांतील उद्देश होता. सरकारच्या धोरणानुसार ठाणें जिल्ह्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या विकास मंडळावर मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांची नेमणूक झाली. आचार्य भिसे ह्यांची ह्या बोर्डाचे सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. ह्या विकास मंडळामार्फत ठाणें जिल्ह्यांत अनेक लोकोपयोगी भरीव कामें करण्यांत आलीं.

१९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिति एकदम पालटली. सरकारच्या युद्धयंत्रणेचा केवळ एक भाग म्हणून काम करण्याचें कॉंग्रेसनें नाकारलें. स्वातंत्र्य-संरक्षणाच्या ज्या महान् तत्त्वांसाठीं हें सर्वनाशी युद्ध लढविण्यांत येत होतें तींच तत्त्वें हिंदुस्थानबाबत लागू करण्यासंबंधीं आश्वासन देण्याचें इंग्रज सरकारनें नाकारल्यामुळें कॉंग्रेसला पुन्हा एकदा सरकारबरोबर असहकार पुकारावा लागला आणि कॉंग्रेस प्रांतांत अधिकाररूढ असलेल्या मंत्रिमंडळांनीं राजीनामे देऊन अधिकारत्याग केला.

इंग्रज सरकारच्या युद्धहेतूंबद्दल कॉंग्रेसची भूमिका स्पष्ट करण्यासाठीं गांधीजींनीं वैयक्तिक सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला. सरकारच्या युद्ध-प्रयत्नांना खीळ घालण्याचा गांधीजींचा मुळींच उद्देश नसल्यामुळें सामुदायिक कायदेभंगाच्या मार्गाचा त्यांनीं अवलंब केला नाहीं. गांधीजींनीं सुरू केलेला हा वैयक्तिक सत्याग्रह पूर्ण अभिनव स्वरूपाचा होता व फार उच्च नैतिक भूमिकेवरून त्याची आंखणी करण्यांत आली होती. वैयक्तिक सत्याग्रहांत सत्याग्रह्यांवर घालण्यांत आलेलीं बंधनें अत्यंत

कडक होतीं आणि गांधीजींच्या खऱ्या सत्याग्रह्याच्या कसोटीला उतरणाऱ्या सत्याग्रह्यांनाच वैयक्तिक सत्याग्रहांत भाग घेण्याची परवानगी मिळालेली होती. ठाणें जिल्ह्यातर्फे अण्णासाहेबांची वैयक्तिक सत्याग्रहासाठीं गांधीजीं-कडून निवड झाली. परंतु ही निवड होण्यापूर्वीं अण्णासाहेबांच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारी एक गोष्ट घडून आली. अण्णासाहेबांमध्यें तत्त्वनिष्ठा आणि प्रामाणिकपणा ओतप्रोत भरलेला होता. त्यांच्या जीवनाची घडणच तशी झाली होती. तात्त्विक स्वरूपाच्या लहानसहान बाबींकडेही अण्णासाहेब अत्यंत बारकाईनें पाहात असत. वैयक्तिक सत्याग्रहाच्या प्रतिज्ञापत्रकांत सत्याग्रही दररोज नियमानें सूत काढीत असतो असें एक कलम होतें. प्रतिज्ञापत्रकावर सही करण्यापूर्वीं अण्णासाहेबांनीं ह्या कलमाला लाल पेन्सिलीनें खूण केली आणि त्याखालीं आपली टीप जोडली. अण्णासाहेबांना सूत कातता येत नव्हतें म्हणून त्यांनीं जोडलेल्या टीपेंत त्याप्रमाणें लिहिलें. परंतु सत्याग्रहांत भाग घेण्यापूर्वीं हें कलम अमलांत आणीन अशा प्रकारची पुस्ती त्यांनीं त्या टीपेला जोडली व अण्णासाहेबांनीं लगेच सूत कातण्याची कला हस्तगत केली. अण्णासाहेबांनीं दाखविलेल्या ह्या प्रामाणिकपणामुळें खऱ्या सत्याग्रह्याच्या कसोटीला अण्णासाहेब पूर्ण उतरले.

वैयक्तिक सत्याग्रहांत भाग घेण्याच्या वेळीं त्याच सुमारास ठाणें जिल्ह्यांत होऊन गेलेल्या वादळाच्या संकटनिवारणाच्या कामांत अण्णासाहेब गुंतलेले होते. अण्णासाहेबांनीं ह्या कार्यासाठीं बाहेर राहावें, अशी जिल्ह्यांतील अनेक कार्यकर्त्यांची तीव्र इच्छा होती. परंतु अण्णासाहेबांनीं त्यांची विनंती मान्य केली नाहीं. अण्णासाहेबांच्या मनाची पूर्ण तयारी झाली होती. देशासंबंधीं आपलें कर्तव्य पार पाडण्याबाबत त्यांनीं मनाचा निर्धार करून निर्णय केला होता. ह्या निर्णयापासून मागें येण्याची अण्णासाहेबांची तयारी नव्हती. परंतु सत्याग्रहास निघण्यापूर्वीं वादळ संकटनिवारण समितीच्या कामाची त्यांनीं नीट व्यवस्था लावून दिली. ह्या कामाप्रमाणेंच जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी

त्यांच्यावर होती. ह्या जबाबदारीबाबतही योग्य त्या सूचना बोर्डीतील सहकाऱ्यांना देऊन महात्मा गांधींच्या आदेशाप्रमाणें ता. २७ नोव्हेंबर १९४० रोजीं अण्णासाहेबांनीं बोर्डी येथें युद्धविरोधी घोषणा व भाषण करून सत्याग्रह केला. अण्णासाहेब जिल्ह्यांतील अत्यंत लोकप्रिय नेते होते. त्यांच्या सत्याग्रहप्रसंगीं ठाणें जिल्ह्यांतील हजारों नागरिक बोर्डी येथें उपस्थित होते. अण्णासाहेबांनीं धीरगंभीर वृत्तीनें एक तास भाषण केलें. अंतःकरणांतून उफाळून आलेल्या भावना त्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केल्यामुळें अत्यंत हृदयस्पर्शी व परिणामकारक असें त्यांचें हें भाषण झालें. अण्णासाहेबांचें भाषण संपल्यानंतर त्यांना अटक करण्यांत येऊन त्यांची ठाणें तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. त्यानंतर त्यांच्यावर भरण्यांत आलेल्या खटल्याचा निकाल लागून अण्णासाहेबांना एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा देण्यांत आली. त्यांच्या ह्या शिक्षेचा बहुतेक काल येरवडा येथील मध्यवर्ती तुरुंगामध्यें गेला.

अण्णासाहेबांचें येरवडा तुरुंगांतील जीवन अत्यंत शिस्तबद्ध होतें. तुरुंगांतील नियम त्यांनीं कांटेकोरपणानें पाळले. अण्णासाहेब वैयक्तिक सत्याग्रही म्हणून तुरुंगांत गेले होते. तुरुंगांतील शिस्त व नियम पाळणें ते आपलें कर्तव्य समजत होते. तुरुंगांत असतांना ते नित्य व्यायाम घेत असत आणि मराठी साहित्यांतील उत्तमोत्तम ग्रंथांचें वाचन करीत असत. आपल्या आनंदी, खेळकर व विनोदप्रिय स्वभावामुळें तुरुंगांतील अनेक राजबंद्यांबरोबर त्यांनीं शाश्वत स्नेहाचें नातें जोडलें.

तुरुंगाच्या भिंतींआड असतांनाही त्यांनीं आपल्या जिल्ह्यांतील कार्याची काळजी वाहिली. तुरुंगांतून श्री. काका नाईक ह्यांना त्यांनीं लिहिलेलें एक पत्र ह्या पुस्तकांत इतरत्र छापलें आहे. त्या पत्रावरून अण्णासाहेबांना आपल्या जिल्ह्यांतील कार्यासंबंधीं किती जिव्हाळा व कळकळ वाटत असे तें स्पष्ट दिसून येतें. तुरुंगांत गेल्यावर वैयक्तिक सत्याग्रहांतील प्रतिज्ञापत्रकावर सही करतांना सूतकताईसंबंधीं दिलेलें आश्वासन अण्णासाहेब विसरले नाहींत. ते नियमानें तुरुंगांत सूत कातीत,

एवढेंच नव्हे, तर त्या वर्षीच्या गांधीजयंतीच्या वेळीं गांधीजींना अर्पण करण्यासाठीं स्वतः कातलेल्या सुताच्या बारा गुंड्या त्यांनीं तुरुंगांतून पाठवून दिल्या. वैयक्तिक सत्याग्रहांतील नैतिक व आध्यात्मिक मूल्यें अण्णासाहेबांनीं सतत अभ्यासानें आत्मसात केलीं. त्यामुळें येरवडा तुरुंगांतील त्यांचें जीवन आदर्श सत्याग्रह्याचें झालें.

१९४१ च्या नोव्हेंबर महिन्यांत येरवड्याच्या तुरुंगांतून अण्णासाहेब बाहेर आले. त्या वेळीं युद्धपरिस्थिति अधिकाधिक बिकट होत चालली होती. जर्मनीनें विद्युद्वेगानें युरोपांतील अनेक देश एकामागून एक पादाक्रान्त करून जवळ जवळ सर्व युरोपवर आपलें आधिपत्य स्थापन केलें होतें. जर्मनीनें रशियावर हल्ला करतांच जपाननेंही जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी घेऊन आशिया खंडांत धडका मारण्यास सुरुवात केली. जपानी विमानांनीं हिंदुस्थानच्या भूमीवर अग्निवर्षाव केला. महायुद्ध हिंदुस्थानच्या दाराशीं येऊन थडकल्याची पूर्वसूचना हिंदुस्थानला मिळाली. देशावर येऊं घातलेलें महायुद्धाचें भीषण संकट महात्मा गांधींनीं पाहिलें. ब्रिटिश सरकार हिंदुस्थानचें संरक्षण करण्यास आतां असमर्थ आहे अशी त्यांची खात्री पटली. ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून जावें म्हणून त्यांनीं प्रचंड प्रचार सुरू केला व ‘हिंदुस्थान छोड दो’ची क्रांतिकारक घोषणा केली. ता. ७ ऑगस्ट रोजीं मुंबई येथें गवालिया टँकवर झालेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत ‘हिंदुस्थान छोड दो’चा ठराव पास झाला आणि बेचाळीसच्या क्रांतियुद्धास सर्व देशभर झंझावाताच्या वेगानें सुरुवात झाली. ता. ७ ऑगस्ट आपल्या देशाच्या इतिहासांत महान् क्रांतिकारी दिवस ठरला. कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना ताबडतोब गिरफदार करण्यांत आलें. सर्वत्र कॉंग्रेसच्या लहानमोठ्या पुढाऱ्यांच्या धरपकडीचें सत्र सुरू झालें. त्या वेळीं अण्णासाहेब विरारचे श्री. मनोरदासशेट ह्यांच्या सौराष्ट्रांतील तळाजा गांवीं गेले होते. तेथून परत येत असतांना वाटेंत त्यांना बोरिवली स्टेशनवर अटक करण्यांत आली आणि त्यांची ठाण्याच्या तुरुंगांत रवानगी झाली. त्यानंतर

लवकरच त्यांना नाशिक जेलमध्यें हलविण्यांत आलें. बरोबर चौदा महिन्यांनीं १९४३ मध्यें त्यांची सुटका झाली. ह्याप्रमाणें ब्रिटिशांचा हिंदुस्थानांतील सत्ता संपुष्टांत आणणाऱ्या ह्या क्रांतियज्ञाचा पावकाग्नि फुलविण्यासाठीं इतर देशभक्तांबरोबरच आपली समिधा त्यांत टाकण्याचा मान अण्णासाहेबांना मिळाला.

प्रकरण पंधरावें

# समाजाचे शिल्पकार

विरार येथें १९३१ सालीं सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाची सुप्रसिद्ध अकरावी परिषद झाली. संघानें हातीं घेतलेलें वैचारिक व शैक्षणिक कार्य आतां झपाट्यानें प्रगति पावत होतें. १९३१ सालच्या विरार येथील परिषदेच्या वेळीं समाजाची दुसरी खानेसुमारी करण्यांत आली. त्या खानेसुमारींत समाजाची शैक्षणिक प्रगति समाधानकारक होत असल्याचें दिसून आलें. स्त्रीशिक्षणाचा प्रसारही झपाट्यानें होत होता. स्त्रीशिक्षणाची प्रगति अधिक नेटानें व्हावी म्हणून अण्णासाहेबांनीं विरार परिषदेच्या वेळीं आपल्या मातोश्री कै. पद्माबाई ह्यांच्या स्मरणार्थ संघाला पांचशें रुपयांची देणगी दिली. विरार येथील ही परिषद संस्मरणीय व नमुनेदार व्हावी व तिची स्मृति दीर्घकाल टिकावी अशी अण्णासाहेबांची फार इच्छा होती. म्हणून ह्या परिषदेसाठीं त्यांनीं फार मेहनत घेतली. सर्वच दृष्टींनीं ही परिषद यशस्वी झाली. ह्या परिषदेस अण्णासाहेबांच्या अपेक्षेप्रमाणें समाजांतील बहुसंख्य मंडळी उपस्थित होती. अण्णासाहेबांना ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाल्याबद्दल ह्या परिषदेंत त्यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला व



प्रकरण पंधरावें

# समाजाचे शिल्पकार

विरार येथें १९३१ सालीं सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाची सुप्रसिद्ध अकरावी परिषद झाली. संघानें हातीं घेतलेलें वैचारिक व शैक्षणिक कार्य आतां झपाट्यानें प्रगति पावत होतें. १९३१ सालच्या विरार येथील परिषदेच्या वेळीं समाजाची दुसरी खानेसुमारी करण्यांत आली. त्या खानेसुमारींत समाजाची शैक्षणिक प्रगति समाधानकारक होत असल्याचें दिसून आलें. स्त्रीशिक्षणाचा प्रसारही झपाट्यानें होत होता. स्त्रीशिक्षणाची प्रगति अधिक नेटानें व्हावी म्हणून अण्णासाहेबांनीं विरार परिषदेच्या वेळीं आपल्या मातोश्री कै. पद्मावाई ह्यांच्या स्मरणार्थ संघाला पांचशें रुपयांची देणगी दिली. विरार येथील ही परिषद संस्मरणीय व नमुनेदार व्हावी व तिची स्मृति दीर्घकाल टिकावी अशी अण्णासाहेबांची फार इच्छा होती. म्हणून ह्या परिषदेसाठीं त्यांनीं फार मेहनत घेतली. सर्वच दृष्टींनीं ही परिषद यशस्वी झाली. ह्या परिषदेस अण्णासाहेबांच्या अपेक्षेप्रमाणें समाजांतील बहुसंख्य मंडळी उपस्थित होती. अण्णासाहेबांना ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाल्याबद्दल ह्या परिषदेंत त्यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला व

सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाचें कार्यकारी मंडळ, १९४४–४५



समाजाच्या प्रेमाची स्मृति म्हणून समाजातर्फें त्यांना मानपत्र अर्पण करण्यांत आलें. संघाच्या निधींत विरार परिषदेंत आणखी चार हजारांची भर पडून संघाचा निधि १९३२ सालीं २२००० हजारांवर गेला. दहा हजार लोकसंख्या असलेल्या ह्या गरीब व श्रमजीवि शेतकरी समाजानें १०–१२ वर्षांत केलेली ही कामगिरी स्पृहणीय होती. त्याचें सर्व श्रेय अण्णासाहेब व त्यांच्या संघांतील इतर सहकारी ह्यांनाच आहे.

शैक्षणिक बाबतींत समाजाची झपाट्यानें प्रगति होत असली, तरी समाजाच्या बहुतेक गांवीं इंग्रजी शिक्षणाची सोय नसल्यामुळें दुय्यम शिक्षणाच्या बाबतींत समाजांतील गरीब विद्यार्थ्यांची मोठी कुचंबणा होत असे. ही गैरसोय दूर व्हावी म्हणून संघातर्फें १९३५ सालीं बोर्डी येथें समाजांतील विद्यार्थ्यांसाठीं 'नूतन वसतिगृह' स्थापण्यांत आलें. ह्या वसतिगृहासंबंधींची जबाबदारी बोर्डीचे डॉ. दीनानाथ चुरी ह्यांनीं पत्करली होती.

१९३५ सालीं चिंचणी येथें झालेल्या संघाच्या पंधराव्या वार्षिक परिषदेचे अण्णासाहेब अध्यक्ष होते.

संघाचा वाढता निधि अधिक सुरक्षित राहावा म्हणून अण्णासाहेबांनीं सोमवंशीय क्षत्रिय समाजोन्नति संघ फंड ट्रस्टची योजना तयार करून १९३६ सालच्या संघाच्या वार्षिक सभेंत ती मंजूर करून घेतली. त्यानंतर ह्या योजनेनुसार तयार करण्यांत आलेलें ट्रस्टखत कायदेशीर रीत्या रजिस्टर करण्यांत आलें. ह्या योजनेप्रमाणें अण्णासाहेब, श्री. तात्यासाहेब चुरी, श्री. आत्मारामपंत सावे, श्री. नारायण भास्करजी म्हात्रे व श्री. बळवंत जगन्नाथ वर्तक ह्यांना संघाचे ट्रस्टी नेमण्यांत आलें. हें ट्रस्टखत रद्द करण्याचा अगर ट्रस्टच्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करण्याचा अगर ट्रस्टच्या हवालीं करण्यांत आलेली रक्कम परत घेण्याचा अगर तत्सम इतर कोणताही अधिकार संघानें आपल्याकडे ठेवलेला नाहीं. ट्रस्टडीडच्या योजनेप्रमाणें २७,००० रुपयांची रक्कम ट्रस्टींच्या स्वाधीन करण्यांत

आली. ट्रस्टच्या रकमेवर दरसाल येणारें व्याज ट्रस्टींनीं संघाच्या खर्चासाठीं संघास द्यावयाचें आहे.

सार्वजनिक संस्थांच्या बाबत पुष्कळ वेळां अनेक घोटाळे निर्माण होतात व कार्यकर्त्यांमध्यें भांडणें माजून राहातात. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें घडून आलेलीं आहेत. अनेक वर्षे परिश्रम करून आपण वाढविलेल्या संस्थेच्या बाबतींत अशी कांहीं विपरीत घटना घडून येऊं नये म्हणून अण्णासाहेबांनीं सावधगिरी राखून दूरदर्शीपणानें संघाच्या ट्रस्टडीडची योजना घडवून आणली. अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत दाखविलेली व्यवहारनिपुणता संघाच्या कार्याच्या दृष्टीनें पोषकच ठरेल ह्यांत शंका नाहीं.

संघाकडून अनेक वर्षांपासून समाजाच्या विद्यार्थ्यांस दरसाल जवळ जवळ ३५०० रुपयांची मदत करण्यांत येते. समाजांतील अधिकाधिक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस मदत करतां यावी म्हणून संघाकडून मदत घेतलेले जे विद्यार्थी मार्गाला लागले असतील त्यांनीं, मदतीच्या रकमेची फेड लहान लहान हप्त्यांनीं दरवर्षी संघाकडे करावी ह्यासंबंधीं अण्णासाहेबांचा फार कटाक्ष असे. मदतीच्या रकमेची फेड करणें ही ह्या विद्यार्थ्यांची नैतिक जबाबदारी आहे असें ते समजत असत. संघाच्या हिताची व आपल्या कर्तव्याची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या मनांत बाळगिली तर संघाचें कार्य कितीतरी व्यापक व उपयुक्त होईल असें अण्णासाहेब नेहमीं म्हणत असत.

१९४० सालीं ठाणें जिल्ह्यांत झालेल्या पहिल्या वादळानें समाजांतील गरीब शेतकऱ्यांचें फार नुकसान झालें. अण्णासाहेबांनीं त्या प्रसंगीं स्वतः संघाला देणगी दिली व त्या देणगींतून बीं-भात खरेदी करण्यांत येऊन समाजांतील गरीब शेतकऱ्यांना वांटण्यांत आलें.

१९४५ सालीं संघाला २५ वर्षे पुरीं होत होतीं. त्या प्रसंगीं संघाचा रौप्यमहोत्सव समारंभ भव्य प्रमाणांत साजरा करण्याचें अण्णासाहेबांच्या प्रेरणेनें संघानें ठरविलें. ह्या वेळीं संघाचा निधि एक लाखावर नेण्याचा

अण्णासाहेबांनीं संकल्प केला आणि मोठ्या उत्साहानें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें ते ह्या कार्याला लागले. संघावर त्यांचें नितान्त प्रेम होतें. संघाच्या कार्यावर त्यांची अढळ श्रद्धा होती. रौप्यनिधि जमविण्याच्या कार्यास सुरुवात करण्यासाठीं अण्णासाहेबांनीं कार्यकर्त्यांची पहिली सभा विरार येथें बोलाविली. ह्या सभेंत त्यांनीं अत्यंत हृदयस्पर्शी व स्फूर्तिदायक भाषण केलें. संघाच्या गंगाजळींत विरारच्या सभेंत आठ हजार रुपयांची भर पडली. ह्या सभेंत "संघाच्या रौप्यमहोत्सवाचा निधि जमविण्यासाठीं संघाची झोळी हातांत घेऊन मी प्रत्येक शाखेंत दौरा काढीन. संघाच्या कार्याकरितां भिक्षा मागण्यांत मला जराही कमीपणा वाटणार नाहीं" असे उद्गार त्यांनीं काढले. ह्या उद्गारांत अण्णासाहेबांना संघासंबंधीं वाटणारी तळमळ, निष्ठा व प्रेम हीं उत्कटपणें प्रतिबिंबित झालीं होतीं. अण्णासाहेबांनीं ह्या कार्यासाठीं सतत तीन-चार महिने खर्च केले. बोर्डीपासून मुंबईपर्यंत त्यांनीं अनेक दौरे काढले. ह्या कार्यांत अण्णासाहेबांना व त्यांच्या सहकाऱ्यांना कल्पनेबाहेर यश आलें. संघासाठीं प्रत्यक्ष गोळा झालेली व हप्त्यानें वसूल होणारी रक्कम एक लाखावर गेली! अण्णासाहेबांचें अंतःकरण आनंदानें भरून गेलें ह्यांत काय नवल!

संघाचा रौप्यमहोत्सव वसई शहरांत ज्या ठिकाणीं संघाच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली होती त्याच ठिकाणीं म्हणजे भायजी राऊत ह्यांच्या वाडींत मोठ्या उत्साहानें व आनंदानें ता. १२ व १३ मे १९४५ रोजीं साजरा करण्यांत आला. संघाचा हा रौप्यमहोत्सव अण्णासाहेबांच्या आयुष्यांतील एक अत्यंत रोमहर्षक प्रसंग होता. हा उत्सव म्हणजे सतत पंचवीस वर्षें त्यांनीं संघासाठीं घेतलेल्या परिश्रमांचा आणि त्याचप्रमाणें त्यांच्या व्यक्तिमत्वाचाही एक अपूर्व विजय होता. पंचवीस वर्षांच्या ह्या काळांत सोमवंशी क्षत्रिय समाजाची संघामार्फत स्पृहणीय प्रगति घडवून आणून समाजांत राष्ट्रीय बाणा निर्माण करण्यांत अण्णासाहेब संपूर्ण यशस्वी झाले होते. वसई येथील हा रौप्यमहोत्सव म्हणजे ह्या यशाचें दृश्य स्वरूपच होतें.

अण्णासाहेब ह्या रौप्यमहोत्सवाच्या स्वागत मंडळाचे अध्यक्ष होते. अण्णासाहेबांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचें दर्शन ह्या उत्सवप्रसंगीं अनेक वेळां झालें.

रौप्यमहोत्सवासाठीं चार हजारांपेक्षां अधिक मंडळी उपस्थित होती. रौप्यमहोत्सवाची स्मृति चिरकाल टिकावी म्हणून समाजाची व संघाची माहिती देणारी ‘ समाजदर्शन ’ नांवाची पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत आली. रौप्यमहोत्सवप्रसंगीं शेती-बागायतीचें व कलाकौशल्याचें एक अत्यंत प्रेक्षणीय व सुंदर प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें.

ह्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं अण्णासाहेबांनीं अत्यंत भावनापूर्ण असें भाषण केलें. त्यांनीं पंचवीस वर्षांपूर्वीचा सोमवंशी क्षत्रिय समाज व रौप्यमहोत्सवाच्या वेळचा तोच समाज ह्याचें उत्कृष्ट चित्र रेखाटून पंचवीस वर्षांच्या ह्या कालांत संघानें समाजांत सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांत घडवून आणलेल्या क्रान्तीचें उत्तम दिग्दर्शन केलें. अण्णासाहेब अगदीं गहिंवरून आले होते. त्यांच्या आयुष्यांत तो एक अति आनंदाचा क्षण होता. रौप्यमहोत्सवप्रसंगीं सर्वत्र उल्हास व उत्साह भरून राहिला होता. संघानें केलेलें अविरत कार्य समाजाच्या चरणीं रुजू झालें. ह्यापेक्षां संघाच्या पुढाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना अधिक कशाची अपेक्षा होती ? रौप्यमहोत्सवाची स्मृति हजर असलेल्या प्रत्येकाच्या हृदयांत चिरकाल टिकून राहील असाच तो सोहळा होता.

१९४७ सालीं स्वातंत्र्यदिनोत्सवाच्या वेळीं अण्णासाहेबांनीं संघाला एक हजाराची देणगी दिली.

पांचकळशी, चौकळशी समाजांतील निरनिराळ्या पोटजातींचें एकीकरण करण्याच्या उद्देशानें ह्या समाजांतील उत्साही कार्यकर्त्यांकडून ‘क्षात्रैक्य परिषदे’ची स्थापना करण्यांत येऊन ह्या परिषदेतर्फे १९५० सालीं दादर येथील अमर हिंद मंडळाच्या जागेंत मोठें संमेलन भरविण्यांत आलें होतें. ह्या संमेलनाचें उद्घाटन अण्णासाहेबांच्या हस्तें

करण्यांत आलें होतें. अण्णासाहेबांनीं आपल्या भाषणांत राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें क्षात्रैक्य परिषदेमार्फत सुरू करण्यांत आलेल्या जातींच्या एकीकरणाच्या चळवळीचा जोरदार पुरस्कार करून तिला आपला आशीर्वाद दिला आणि ही चळवळ अशीच विस्तार पावत जाऊन जातिभेदांचें शक्य तितक्या लवकर उच्चाटन व्हावें अशी सदिच्छा ह्या संमेलनांत प्रदर्शित केली.

माहीम येथें संघाची तिसावी परिषद भरली असतांना अण्णासाहेबांनीं केलेल्या भाषणांत ह्या जातींच्या एकीकरणाचें महत्त्व पटवून देऊन क्षात्रैक्य परिषदेच्या पोटजातींच्या एकीकरणाला सोमवंशी क्षत्रिय समाजाकडून संमति मिळविली.

अण्णासाहेबांनीं संघासंबंधीं केलेल्या सर्व अपेक्षा पुऱ्या झाल्या होत्या. त्यांनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं पंचवीस वर्षांपूर्वीं लावलेल्या संघरूपी रोपट्याचें विशाल वृक्षांत रूपांतर झाल्याचें प्रत्यक्ष पाहाण्याचें भाग्य अण्णासाहेबांना लाभलें. अण्णासाहेबांचें एक स्वप्न साकार झालें. अण्णासाहेबांच्या जीवनाचा बराचसा पूर्वभाग संघाच्या कार्यानें व्यापलेला आहे. समाजापुढें त्यांनीं ठेवलेला आदर्श समाजानें बव्हंशीं आत्मसात केला आहे. सामाजिक व शैक्षणिक बाबतींत समाजानें जी आघाडी मारली तिचें सारें श्रेय संघालाच आहे. संघाच्या स्थापनेसाठीं आणि त्याच्या संवर्धनासाठीं अण्णासाहेबांनीं अपार कष्ट केले; मोठा त्यागही केला. अमंगळ जातीय वृत्तीपासून अलिप्त राहून आपल्या समाजाला त्यांनीं राष्ट्रीयत्वाची दीक्षा दिली. अण्णासाहेबांनीं आपलें सर्व पुण्य खर्चीं घालून संघाची आणि आपल्या समाजाची मूस बनविली आहे. संघासाठीं अण्णासाहेबांनीं केलेलें कार्य अजरामर आहे. अण्णासाहेब व संघ अभेद्य आहेत. म्हणूनच त्यांच्या ह्या जीवनचरित्रांत संघासाठीं एवढीं पानें खर्चीं घालावीं लागलीं.

प्रकरण सोळावें

# १९४० चें वादळ

ठाणें जिल्ह्याच्या समुद्रालगतच्या पश्चिम भागांत ता. १६ ऑक्टोबर १९४० रोजीं एक भयंकर वादळ झालें. सकाळीं १० वाजल्यापासून संध्याकाळीं ४ वाजेपर्यंत वादळाचा विशेष जोर होता. ह्या वादळामुळें ठाणें जिल्ह्यांतील वसई, पालघर, डहाणू, उंबरगांव ह्या तालुक्यांतील बागायतीचें व शेतीचें अतोनात नुकसान झालें. हजारों रुपये खर्च करून तयार करण्यांत आलेले वसई व पालघर तालुक्यांतील पानवेलीचे मळे व केळींचे ताफे उध्वस्त झाले आणि मोठमोठीं झाडें उन्मळून पडलीं. चिंचणी-तारापूर ह्या भागांतही वादळाचा विशेष जोर होता. तेथील अनेक बागा उध्वस्त झाल्या. त्याचप्रमाणें मल्याण, डहाणू, बोर्डी, घोलवड, संजाण व उंबरगांव येथील चिकू, पपनस, पेरू, वगैरे बागांनाही वादळान जबरदस्त तडाखा दिला. भातशेतीच्या लागवडीला फार मोठ्या प्रमाणावर नुकसान पोचलें. ह्या वादळामुळें ह्या भागांतील शेतकरी व बागायतदार वर्ग भयंकर आपत्तींत सापडला. शेतकऱ्यांप्रमाणेंच समुद्रानजीक राहाणारे मच्छीमार लोकही उघडे पडले. त्यांच्या समुद्रांत

नांगरलेल्या होड्या वाहून गेल्या. त्यांचीं समुद्रांत गेलेलीं अनेक गलबतें वादळांत सापडून बुडालीं व ह्या गलबतांवरील शेंकडों लोक मृत्युमुखीं पडले. मच्छीमार लोकांच्या समुद्रालगत असलेल्या झोपड्या उडून गेल्यामुळें हे लोक संपूर्ण निराधार झाले. ह्याप्रमाणें ह्या वादळानें ह्या भागांत चोहोंबाजूंनीं हाहाकार उडवून दिला.

अण्णासाहेब त्या वेळीं ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष होते. शेतकरीवर्ग संकटांत सापडला म्हणजे त्यांच्या मदतीस ते नेहमींच त्वरित धावून जात असत. संकटांत सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणें अण्णासाहेब आपलें कर्तव्य समजत असत. सर्व शेतकरीवर्गाला ते आपलें एक मोठें कुटुंब मानीत. शेतकऱ्यांच्या जीवनाशीं एवढे समरस झालेले फारच थोडे पुढारी असतील. वादळामुळें आपल्या भागावर ओढवलेल्या ह्या भीषण आपत्तीच्या वेळीं अण्णासाहेब स्वस्थ कसे बसतील ? त्यांनीं ताबडतोब एक पत्रक काढून जिल्ह्यांतील सर्व कार्यकर्त्यांना जिल्ह्यावर ओढवलेल्या संकटाची जाणीव करून दिली व आपत्ग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्याची सर्वांना विनंती केली. संकटग्रस्त गरीब व निराधार कोळी व शेतकरी बंधूंची अन्नपाण्याची ताबडतोब सोय व्हावी म्हणून ठाणें जिल्हा लोकलबोर्डातर्फें एक हजार व स्वतःचे दोनशें मिळून एकंदर बाराशें रुपयांची मदत वसई, पालघर, डहाणू व उंबरगांव ह्या तालुक्यांत पाठवून दिली. ही मदत अत्यंत अल्प होती. परंतु त्वरित कांहीं तरी मदत पोचणें आवश्यक असल्यामुळें अण्णासाहेबांनीं ही व्यवस्था केली.

त्यानंतर लगेच आपत्ग्रस्तांसाठीं मोठ्या प्रमाणावर मदत मिळविण्यासाठीं अण्णासाहेबांनीं आपले प्रयत्न सुरू केले. लवकरच ठाणें जिल्हा कॉंग्रेस कमिटीची सभा भरविण्यांत येऊन, ठाणें जिल्हा कॉंग्रेस वादळ निवारण समितीची स्थापना करण्यांत आली. ह्या समितीचे अण्णासाहेब ह्यांना अध्यक्ष व आचार्य भिसे ह्यांना चिटणीस निवडण्यांत आलें.

वादळग्रस्त भागाची सरकारकडून प्रत्यक्ष पाहाणी व्हावी अशा प्रकारची विनंती ह्या समितीमार्फत अण्णासाहेबांनीं सरकारला केली. त्यांच्या ह्या विनंतीप्रमाणें त्या वेळचे मुंबई सरकारचे ॲडव्हायजर सर हेन्री नाईट व सर जनार्दन मदन ह्यांनीं ठिकठिकाणीं जाऊन संकटग्रस्त विभागांची पाहाणी केली व ह्या भागांतील प्रमुख नागरिक व शेतकरी ह्यांजबरोबर वादळ निवारण कार्यासंबंधीं चर्चा केली.

वादळ निवारण समितीमार्फत अण्णासाहेबांनीं आपत्‌ग्रस्तांच्या मदतीसाठीं निधि गोळा करण्याचें काम त्वरित हातीं घेतलें. ह्या समितीच्या तालुकानिहाय शाखा स्थापण्यांत आल्या व जिल्ह्यांतून हरतऱ्हेनें मदत मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. अवघ्या दोन चार दिवसांत अण्णासाहेबांनीं दहा हजारांचा निधि जमा केला. त्याच वेळीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई प्रांतांतील आपत्‌ग्रस्तांच्या मदतीसाठीं एक समिति नेमली होती. ठाणें जिल्ह्यांतील आपत्‌ग्रस्तांना मदत पोचविणें सोयीचें व्हावें म्हणून अण्णासाहेबांना ह्या समितीचे सभासद करून घेण्यांत आलें होतें.

अण्णासाहेब स्वतः आपत्‌ग्रस्त भागांत सर्व ठिकाणीं फिरले व हवालदील झालेल्या लोकांना त्यांनीं धीर दिला. वादळांत लोकांचें किती नुकसान झालें आहे हें समजून घेण्यासाठीं त्यांनीं सर्व जिल्हाभर कार्यकर्त्यांचें जाळें निर्माण केलें. नुकसानीची नोंद करून घेण्यासाठीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडून निरनिराळे फॉर्म्स छापवून घेण्याची त्यांनीं व्यवस्था केली. ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांनीं सर्वत्र हिंडून ह्या फॉर्म्सच्या द्वारें निरनिराळ्या प्रकारची माहिती गोळा केली. ह्या माहितीचा शेतकऱ्यांना सरकारकडून तगाई मिळविण्याच्या कामीं पुढें फार उपयोग झाला.

ठाणें जिल्ह्यांतील आपत्‌ग्रस्तांच्या साह्यासाठीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या वादळसंकट निवारण समितीकडून चाळीस हजारांची मदत

मिळाली. त्यांतच जिल्ह्यानें जमा केलेल्या निधीची भर टाकण्यांत आली. आपत्ग्रस्तांना ही मदत पोचविण्याचें काम महत्त्वाचें होतें. परंतु त्याच वेळीं गांधीजींनीं सुरू केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहासाठीं अण्णासाहेबांची निवड झाल्यामुळें ह्या कार्याबाबत आपल्या सहकाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन हें काम त्यांनीं त्यांच्याकडे सोपविलें व त्यानंतर लवकरच सत्याग्रह करून अण्णासाहेब तुरुंगांत गेले. आपत्ग्रस्तांना मदत पोचविण्याचें हें काम पुढें कित्येक दिवस चाललें होतें.

वादळग्रस्त भागाची सरकारकडून प्रत्यक्ष पाहाणी व्हावी अशा प्रकारची विनंती ह्या समितीमार्फत अण्णासाहेबांनीं सरकारला केली. त्यांच्या ह्या विनंतीप्रमाणें त्या वेळचे मुंबई सरकारचे ॲडव्हायजर सर हेन्री नाईट व सर जनार्दन मदन ह्यांनीं ठिकठिकाणीं जाऊन संकटग्रस्त विभागांची पाहाणी केली व ह्या भागांतील प्रमुख नागरिक व शेतकरी ह्यांजबरोबर वादळ निवारण कार्यासंबंधीं चर्चा केली.

वादळ निवारण समितीमार्फत अण्णासाहेबांनीं आपत्‌ग्रस्तांच्या मदतीसाठीं निधि गोळा करण्याचें काम त्वरित हातीं घेतलें. ह्या समितीच्या तालुकानिहाय शाखा स्थापण्यांत आल्या व जिल्ह्यांतून हरतऱ्हेनें मदत मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. अवघ्या दोन चार दिवसांत अण्णासाहेबांनीं दहा हजारांचा निधि जमा केला. त्याच वेळीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई प्रांतांतील आपत्‌ग्रस्तांच्या मदतीसाठीं एक समिति नेमली होती. ठाणें जिल्ह्यांतील आपत्‌ग्रस्तांना मदत पोचविणें सोयीचें व्हावें म्हणून अण्णासाहेबांना ह्या समितीचे सभासद करून घेण्यांत आलें होतें.

अण्णासाहेब स्वतः आपत्‌ग्रस्त भागांत सर्व ठिकाणीं फिरले व हवालदील झालेल्या लोकांना त्यांनीं धीर दिला. वादळांत लोकांचें किती नुकसान झालें आहे हें समजून घेण्यासाठीं त्यांनीं सर्व जिल्हाभर कार्यकर्त्यांचें जाळें निर्माण केलें. नुकसानीची नोंद करून घेण्यासाठीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडून निरनिराळे फॉर्म्स छापवून घेण्याची त्यांनीं व्यवस्था केली. ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांनीं सर्वत्र हिंडून ह्या फॉर्म्सच्या द्वारें निरनिराळ्या प्रकारची माहिती गोळा केली. ह्या माहितीचा शेतकऱ्यांना सरकारकडून तगाई मिळविण्याच्या कामीं पुढें फार उपयोग झाला.

ठाणें जिल्ह्यांतील आपत्‌ग्रस्तांच्या साह्यासाठीं मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या वादळसंकट निवारण समितीकडून चाळीस हजारांची मदत

मिळाली. त्यांतच जिल्ह्यानें जमा केलेल्या निधीची भर टाकण्यांत आली. आपत्ग्रस्तांना ही मदत पोचविण्याचें काम महत्त्वाचें होतें. परंतु त्याच वेळीं गांधीजींनीं सुरू केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहासाठीं अण्णासाहेबांची निवड झाल्यामुळें ह्या कार्याबाबत आपल्या सहकऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन हें काम त्यांनीं त्यांच्याकडे सोपविलें व त्यानंतर लवकरच सत्याग्रह करून अण्णासाहेब तुरुंगांत गेले. आपत्ग्रस्तांना मदत पोचविण्याचें हें काम पुढें कित्येक दिवस चाललें होतें.

प्रकरण सतरावें

# मंत्रिमंडळांत आवडीचें खातें

युद्धसमाप्तीनंतर देशांतील सर्वच राजकीय परिस्थिति एकदम बदलली. कॉंग्रेसनें मध्यवर्ती व प्रांतीय विधिमंडळांच्या निवडणुका लढविण्याचें ठरविलें आणि ह्या निर्णयानुसार निवडणुकांची जय्यत तयारी सुरू झाली. कॉंग्रेसनें देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं १९४२ चा महान् लढा पुकारून आपल्या ध्येयसिद्धीसाठीं अनंत हालअपेष्टा भोगल्या होत्या. कॉंग्रेसच्या मागें त्याग होता, ध्येयनिष्ठा होती व प्रचंड संघटनशक्तिही होती. कॉंग्रेस ह्या १९४६ च्या निवडणुकींत सर्वत्र विजयी होणार ह्याबद्दल शंका नव्हती. मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीसाठीं अण्णासाहेबांची कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाकडून निवड झाली आणि त्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यामध्यें झालेल्या निवडणुकींत अण्णासाहेब कॉंग्रेसतर्फें ठाणें जिल्हा उत्तर भाग मतदार संघांतून मुंबई विधिमंडळावर प्रचंड बहुमतानें निवडून आले. परतु ह्या निवडणुकीनंतर अण्णासाहेबांकडे फार मोठी कामगिरी सोपविण्यांत येणार होती ह्याची अण्णासाहेबांना यत्किंचितही कल्पना नव्हती. १९३५ च्या घटनाकायद्यानुसार मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं मुंबई विधिमंडळांतील बहुसंख्य पक्षाचे पुढारी



म्हणून श्री. बाळासाहेब खेर ह्यांना मंत्रिमंडळ बनविण्यासाठीं पाचारण केलें. बाळासाहेबांनीं गव्हर्नरसाहेबांची विनंती मान्य करून ता. १ एप्रिल १९४६ रोजीं रात्रीं मुंबईच्या ऑल् इंडिया रेडिओवरून केलेल्या भाषणांत आपल्या मंत्रिमंडळांतील मंत्र्यांचीं नांवें जाहीर कलीं. त्यांत अण्णासाहेबांच्या नांवाचा समावेश झाल्याचें ऐकून अण्णासाहेबांच्या अनेक मित्रांना आणि चाहत्यांना सानंद आश्चर्य वाटलें. परंतु बाळासाहेबांनीं अण्णासाहेबांची केलेली निवड किती अचूक होती हें अण्णासाहेबांनीं मंत्री म्हणून आपल्या सहा वर्षांच्या कारकीर्दींत जी भरीव कामगिरी बजावली त्यावरून दिसून येतें.

सुरुवातीस अण्णासाहेबांकडे अबकारी आणि पुनर्रचना हीं खातीं देण्यांत आलीं होतीं. परंतु अण्णासाहेबांची खरी ओढ स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असल्याकारणानें त्यांनीं लवकरच आपलीं खातीं बदलून घेऊन आपणांकडे स्थानिक स्वराज्य संस्थांचें खातें घेतलें. हें खातें अण्णासाहेबांकडे आल्यानंतर त्यांच्या विधायक मनोवृत्तीला पूर्ण वाव मिळाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत दुसऱ्या खेर मंत्रिमंडळानें केलेलें कार्य अण्णासाहेबांच्या प्रेरणेनेंच झालेलें असल्यामुळें त्या कार्याचा विचार त्यांच्या चरित्रांत होणें अपरिहार्य आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींतला अण्णासाहेबांचा अनुभव प्रदीर्घ होता. त्यांच्या प्रश्नांची व गरजांची त्यांना पूर्ण जाणीव होती. ह्या संस्थांची आर्थिक परिस्थिति सुधारणें आवश्यक होतें, त्यांच्या अंतर्गत कारभारांत सुधारणा व्हावयास पाहिजे होती, ह्या संस्था जेणेंकरून लोकशाहीला पोषक अशा होतील अशा प्रकारचें वातावरण त्यांत निर्माण व्हावयास पाहिजे होतें, त्यांच्यांत अधिक कार्यक्षमता यावयास पाहिजे होती आणि ह्याहीपेक्षां आपल्या देशाच्या लोकशाही कारभारांत ह्या संस्थांना जें महत्त्वाचें स्थान आहे त्यासंबंधीं त्यांच्यांत जाणीव निर्माण व्हावयास पाहिजे होती. हे आणि अशा प्रकारचे अनेक प्रश्न मंत्रिमंडळाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत सोडवावयाचे होते. परंतु ह्या सर्व

प्रश्नांत ह्या संस्थांचा आर्थिक प्रश्न अधिक महत्त्वाचा होता. पैशाच्या अभावीं बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार डफघाईस आला होता. अगोदरच ह्या संस्थांकडे, विशेषतः जिल्हा लोकलबोर्डांकडे असलेल्या उत्पन्नाच्या बाबी अगदींच मामुली स्वरूपाच्या होत्या. ह्या संस्थांची आर्थिक परिस्थिति कधींही स्पृहणीय नव्हती. त्यांतच युद्धजन्य परिस्थितींतील महागाईमुळें तर ह्या संस्थांचा कारभार अतिशयच बिकट होऊन बसला. रस्त्यासाठीं लागणारा माल, दवाखान्यासाठीं लागणारीं औषधें, पब्लिक वर्क्सखात्यासाठीं लागणारीं आयुधें, कामगारांचे मजुरीचे दर, इत्यादि सर्वच बाबतींत खर्च सारखा वाढत होता. राहाणीचें मानही सारखें वाढत राहिल्यामुळें आपल्या नोकरींतील नोकरवर्गाला महागाईभत्ता देणें अपरिहार्य होतें. उन्हाळ्यांत आधींच शुष्क आणि रखरखीत झालेल्या एखाद्या जंगलांत वणवा लागावा तशी परिस्थिति आर्थिक बाबतींत स्थानिक स्वराज्य संस्थांची झाली होती. त्या बाबतींत त्वरित उपाययोजना होणें जरूरीचें होतें. पोटांतील भूक शमल्याशिवाय इतर गोष्टी व्यर्थ ह्या न्यायानें स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक प्रश्नासारखी महत्त्वाची बाब मंत्रिमंडळानें प्रथम हातीं घेतली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत अत्यंत निकडीचा प्रश्न नोकरांच्या महागाईभत्त्याचा होता. ह्या संस्थांना नोकरांचे पगारच देणें जेथें मुष्किलीचें होऊन बसलें होतें, तेथें त्या आपल्या नोकरांना महागाई-भत्ता कोठून देणार? अण्णासाहेबांनीं प्रथमतः ह्या प्रश्नास चालना दिली. प्रांतांतील सर्व ग्रामपंचायती आणि अहमदाबाद, पुणें, सुरत व सोलापूर ह्या नगरपालिका सोडून इतर सर्व नगरपालिकांच्या नोकरवर्गाला, त्या त्या ग्रामपंचायती अगर नगरपालिका जो महागाई-भत्ता देत असतील, त्याचा निम्मा भार सोसण्याची जबाबदारी सरकारनें आपल्या शिरावर घेतली. अहमदाबाद, पुणें, सुरत व सोलापूर ह्या मोठ्या शहरांची लोकसंख्या एक लाखापेक्षां अधिक असल्यामुळें त्यांचें उत्पन्नही प्रान्तांतील इतर नगरपालिकांच्या मानानें

मोठें होतें. म्हणून ह्या नगरपालिकांच्या बाबतींत नोकरवर्गाच्या महागाई-भत्त्यावरील खर्चाचा फक्त एक चतुर्थांश भाग ह्या नगरपालिकांना ग्रँटच्या रूपानें देण्याचें सरकारनें मान्य केलें. महागाईभत्त्यावरील सरकारी ग्रँटचें हें तत्त्व पुढें जिल्हा लोकल बोर्डांच्या नोकरवर्गालाही लागू करण्यांत आलें. खेर मंत्रिमंडळ अधिकारावर येण्यापूर्वी म्हणजे १९४६ पर्यंत ग्रामपंचायतींना अगर नगरपालिकांना किंवा जिल्हा लोकल बोर्डांना महागाईभत्त्याच्या बाबतींत सरकारकडून एक पैचीही मदत मिळत नसे. ज्या ज्या वेळीं ह्या संस्थांनीं पूर्वीच्या सरकारकडे महागाईभत्त्याच्या बाबतींत मदतीची याचना केली त्या त्या वेळीं हा प्रश्न सरकारचा नसून महागाईभत्ता देण्याची जबाबदारी सर्वस्वी ह्या संस्थांचीच आहे असें सहानुभूतिशून्य उत्तर सरकारकडून ह्या संस्थांना मिळत असे. परंतु अशा उत्तरानें ह्या संस्थांचा महागाईभत्त्याचा प्रश्न सुटणार नव्हता. युद्धजन्य परिस्थितीमुळें ह्या संस्थांची आर्थिक परिस्थिति अधिकाधिक बिकट व हलाखीची होत चालली होती. सरकारकडून त्यांना आर्थिक मदत न मिळाल्यास त्यांचें भवितव्य ठरलेलेंच होतें. परंतु ह्या संस्थांना वाऱ्यावर सोडून देण्याचा अविचार खेर मंत्रिमंडळानें केला नाहीं. लोकशाहीच्या राज्यपद्धतीचें आपलें ध्येय हिंदुस्थाननें निश्चित केलें होतें. आपल्यासारख्या शैक्षणिक क्षेत्रांत मागासलेल्या देशांत लोकशाहीची स्थापना करावयाची म्हणजे लोकशाहीच्या कारभाराचें शिक्षण जनतेला पहिल्यानें मिळणें अत्यंत जरूर होतें. पाश्चात्य लोकशाही देशांत स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकशाही कारभाराच्या पूरक संस्था समजण्यांत येतें. त्या देशांत तेथील जनतेला ह्या संस्थांकडून लोकशाही कारभाराचें पूर्ण शिक्षण मिळत असतें, एवढेंच नव्हे तर, लोकशाही राज्य-कारभारांतील अनेक महत्त्वाचीं कामें ह्या संस्थांकडे सोपविलेलीं असतात. आणि ह्या संस्थांच्या अधिकारकक्षेंत येणाऱ्या बाबींसंबंधीं त्यांना संपूर्ण अधिकार दिलेले असतात. लोकशाहीच्या कारभारांत स्थानिक स्वराज्य संस्थांचें स्थान हें असें अढळ व अटळ आहे. त्यांच्याकडे यत्किंचितही

दुर्लक्ष झाल्यास लोकशाहीचा कारभार फार काळ यशस्वी होऊं शकणार नाहीं हें आपल्या सरकारनें जाणलें आणि त्यांना आर्थिक मदतीची संजीवनी देऊन त्यांच्यांत जिवंतपणा आणण्याचा निश्चय केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक साह्य देऊन त्यांचा महागाई-भत्त्याचा प्रश्न सोडविण्याचा सरकारनें प्रयत्न केला, तरी केवळ त्यामुळें त्यांचा मुख्य आर्थिक प्रश्न सुटत नव्हता. महागाईभत्त्याचा प्रश्न तात्कालिक स्वरूपाचा होता. महागाईभत्त्याबाबत सरकारकडून मिळणारा पैसा परस्पर नोकरवर्गाकडे महागाईभत्त्याच्या रूपानें जात होता. स्थानिक स्वराज्य संस्थांचीं जीं अनेकविध कर्तव्यें कायद्यांत सांगितलीं आहेत तीं पार पाडण्यांत ह्या पैशाचा त्या संस्थांना यत्किंचितही उपयोग होणार नव्हता. ह्या संस्थांच्या तुटपुंज्या उत्पन्नांत कायमची व व महत्त्वाची भर पडली तरच ह्या 'मृतवत्' संस्था जिवंत होणार होत्या, त्यांच्याकडून राष्ट्रोपयोगी कार्य होणार होतें. परंतु त्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग शोधून काढणें ही तितकीशी सोपी व सहजसाध्य गोष्ट नव्हती. सरकारपुढेंही मोठमोठे आर्थिक प्रश्न उभे होते. त्या सर्वांचा समन्वय साधून स्थानिक संस्थांना अत्यावश्यक असलेलें आर्थिक साह्य देणें मोठें बिकट कार्य होतें. स्थानिक स्वराज्य संस्थांचे मंत्री म्हणून हें बिकट कार्य अण्णासाहेबांकडे आलें होतें. परंतु अण्णासाहेबांनीं दूरदृष्टि ठेवून मोठ्या व्यावहारिक चातुर्यानें हा प्रश्न अत्यंत यशस्वी रीतीनें हाताळला. ह्या संस्थांसंबंधीं त्यांना वाटत असलेली आस्था व प्रेम आणि मंत्रिमंडळांतील आपल्या सहकाऱ्यांची सहानुभूति ह्यांच्या जोरावरच अण्णासाहेब हें यश मिळवूं शकले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक साह्याचा हा प्रश्न अण्णासाहेबांनीं एक विशिष्ट दृष्टिकोन आपल्यासमोर ठेवून सोडविला. सरकारकडे उत्पन्नाच्या रूपानें येणारा पैसा राज्यांतील सर्व जनतेच्या हितासाठीं खर्च होत असतो. अमूक विभागांतून इतकें उत्पन्न आलें म्हणून त्या उत्पन्नाचा एक विशिष्ट भाग त्याच विभागासाठीं सरकार खर्च करीत

नसतें. राज्यांतील सर्व जनतेचें हित साधतांना सरकारला अशा प्रकारची ‘ स्थानिक वृत्ति ’ ठेवतां येत नाहीं, हें जरी खरें असलें तरी राज्याच्या एकंदर कारभारांत आपल्या गांवाचें, आपल्या तालुक्याचें, आपल्या विभागाचें किती हित साधलें हें जाणण्याची प्रवृत्ति जनतेंत विशेषतः ग्रामीण विभागांतील जनतेंत कांहीं कांहीं वेळां निर्माण होतेच. राज्याच्या प्रगतीबरोबर प्रत्येक गांवाची, तालुक्याची, विभागाची प्रगति होतच असते. परंतु ग्रामीण जनतेंत तिचा ठसा पुष्कळ वेळां फार पुसट उमटत असतो. म्हणून सरकारकडे निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या उत्पन्नाचा कांहीं अंश दृश्यस्वरूपांत त्या त्या भागासाठीं ग्रामपंचायती, जिल्हा लोकल बोर्ड ह्यांसारख्या ग्रामीण विभागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत खर्च झाल्यास जनतेच्या मनांत सरकारच्या कारभारा-विषयीं अधिक आस्था निर्माण होईल व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांतसुद्धा जनता अधिक लक्ष घालूं लागेल अशी अण्णासाहेबांची विचारसरणी होती. ग्रामीण विभागांतून प्रत्यक्ष रूपानें सरकारकडे येणारा पैसा म्हणजे जमीनमहसूल होय. म्हणून ह्या जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं शेंकडा पंधरा इतकें उत्पन्न स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं त्या संस्थांना देण्यांत याव अशा प्रकारची योजना अण्णासाहेबांनीं तयार केली व त्या योजनेला मंत्रिमंडळाकडून मान्यता मिळाली. जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं कांहींतरी भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळावा अशा प्रकारच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांचे तज्ज्ञ अनेक वर्षांपासून करीत आले होते. पहिल्या खेर मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराबाबत कार्यक्षमतेच्या दृष्टीनें सुधारणा सुचविण्यासाठीं प्रो. व्ही. जी. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें एक समिति नेमली होती. मुंबई राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत ही समिति ‘ काळे समिति ’ ह्या नांवानें फार प्रसिद्ध असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराबाबत ह्या समितीनें सरकारकडे अनेक महत्त्वाच्या

सूचना केल्या होत्या. परंतु ९३ कलमी सरकारच्या अमदानींत काळे समितीच्या सूचनांचा विशेष विचारच झाला नाहीं. अण्णासाहेबांची कारकीर्द सुरू झाल्यानंतरच ह्या समितीचा रिपोर्ट सरकारकडून आस्थापूर्वक विचारांत घेण्यांत आला. ह्या समितीनें केलेल्या महत्त्वाच्या सूचनांमध्यें जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं १० टक्के उत्पन्न सरकारनें स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावें अशी एक सूचना होती. काळे समितीची ही सूचना अण्णासाहेबांनीं मान्य करून अमलांत आणलीच परंतु अण्णासाहेब ह्याहीपेक्षां थोडे पुढें गेले आणि १० टक्क्यांऐवजीं १५ टक्के जमीनमहसुलाचें उत्पन्न त्यांनीं सरकारमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना बहाल केलें ! मृतवत् स्थितीला पोचलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्यें ह्या मदतीमुळें एकदम चेतना निर्माण झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांवर ओढवूं पाहाणारें महान् संकट सूर्योदयाबरोबर पहाटेचें धुकें विरून जावें त्याप्रमाणें मागल्या पायींच नाहींसें झालें.

अण्णासाहेबांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत जरी ही एकच कामगिरी बजावली असती तरी अण्णासाहेबांचें नांव ह्या संस्थांच्या इतिहासांत अजरामर झालें असतें. परंपरागत ठराविक विचारांच्या चाकोरीचे बंध तोडणें फार कठीण असतें. सरकारच्या बाबतींत तर हें कार्य अधिकच कठीण होऊन बसतें. परंपरागत विचारांना सरकारी यंत्रणा जळूसारखी चिकटून राहाते. पायांपलीकडे बघण्याची तिची तयारी नसते. तिच्यांत बदललेल्या परिस्थितीशीं तादात्म्य पावण्याची ताकद पैदा करण्याचें कार्य, राज्याची धुरा वाहाणाऱ्या मंत्रिमंडळानें करावयाचें असतें. अण्णासाहेब ह्या कार्यांत पूर्ण यशस्वी झाले.

अण्णासाहेबांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत ही जी क्रान्तिकारक सुधारणा घडवून आणली तिचें महत्त्व ह्या संस्थांत कार्य केलेल्या कार्यकर्त्यांशिवाय इतरांच्या एकदम लक्षांत यावयाचें नाहीं. ह्या सुधारणेनें जो कायाकल्प घडून आला त्याची खरी कल्पना खालीं केलेल्या विवेचनानें अधिक स्पष्टपणें ध्यानांत येईल.

ग्रामपंचायती ह्या स्थानिक स्वराज्याचा पाया होत असें सर्वत्र समजण्यांत येतें. हिंदुस्थानसारख्या अद्यापि अनेक बाबतींत मागें असलेल्या लोकशाहीप्रधान देशांत ह्या संस्थांचें महत्त्वही फार आहे. ग्रामपंचायतींचा विस्तार अनेक शतकें आपल्या देशाच्या इतिहासांतून झाला आहे. फार प्राचीन काळींही ह्या संस्थांना आपल्या देशांत मानाचें स्थान होतें. इंग्रजी अमदानींतच ह्या संस्थांचा खरा लोप झाला. त्याचें एक कारण देशाची पूर्वींची आर्थिक घडी ह्या काळांत बदलली गेली हें होय. आज स्वातंत्र्याच्या काळांत ह्या संस्थांचा पुन्हा उदय होत आहे. ऐतिहासिक काळांत आर्थिकदृष्ट्या प्रत्येक गांव स्वावलंबी होता म्हणून ह्या संस्थांचें महत्त्व होतें. तर आज आपल्या देशांत लोकशाहीची स्थापना झालेली आहे म्हणून ह्या संस्थांना आपल्या राज्यकारभारांत महत्त्व प्राप्त झालेलें आहे. परंतु ह्या संस्थांची १९४६ सालापूर्वी आपल्या राज्यांत काय स्थिति होती? सर्वत्रच औदासिन्याची छाया पसरलेली होती असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कारण ह्या संस्थांतील जीवनरसच सुकून गेला होता. आर्थिकदृष्ट्या त्यांच्यांत कांहींच त्राण राहिलें नव्हतें. त्यांच्या उत्पन्नाची मुख्य किंवा जवळजवळ एकुलती एक बाब म्हणजे घरपट्टी होय. परंतु खेड्यांत घरें तीं कितीशीं असणार व त्यांच्यापासून घरपट्टीच्या रूपानें उत्पन्न तरी किती मिळणार? आर्थिकदृष्ट्या असाह्य परिस्थितींत असलेल्या ह्या स्थानिक स्वराज्याच्या 'पायाभूत' संस्था कोणत्याही प्रकारचें भरीव लोकहिताचें कार्य करूं शकत नव्हत्या. म्हणून त्यांच्यासंबंधीं जनतेला तरी विशेष सहानुभूति कां वाटावी? ग्रामपंचायतींची ही अगतिक परिस्थिति बदलणें अत्यावश्यक होतें आणि हा अत्यावश्यक बदल ह्या संस्थांना सरकारकडून भरपूर आर्थिक साह्य मिळण्यानेंच होणार होता. सरकारनें जमीन-महसुलापैकीं पंधरा टक्के उत्पन्न ग्रामपंचायतींना तोडून दिल्यामुळें ह्या परिस्थितींत एकदम पालट झाला. १९४६ सालापूर्वी ग्रामपंचायतींना जमीनमहसुलापैकीं एक पैही मिळत नसे. परंतु सरकारच्या ह्या नवीन

योजनेमुळें राज्यांतील ग्रामपंचायतींना १९५०–५१ सालीं जमीन-महसुलापैकीं अठरा लक्ष रुपयांपेक्षां अधिक रक्कम मिळूं लागली. ग्रामपंचायतींना नवीन उत्पन्न मिळाल्यामुळें लोकांतही उत्साह निर्माण झाला आणि मोठमोठ्या खेड्यांतून सर्वत्र ग्रामपंचायती स्थापन होऊं लागल्या. १९४६ सालीं राज्यांतील ग्रामपंचायतींची संख्या जी १४०० होती ती १९५१ सालीं ३८०० च्या वर गेली! मंत्रिमंडळाच्या ह्या विधायक धोरणामुळें ग्रामपंचायतींच्या सुधारणेचा मार्ग मोकळा झाला.

जिल्हा लोकल बोर्डांची आर्थिक परिस्थितिही ग्रामपंचायतींच्या आर्थिक परिस्थितीपेक्षां कांहीं विशेष स्पृहणीय नव्हती. जिल्हा लोकल बोर्ड ही संस्थाही ग्रामपंचायतीप्रमाणें ग्रामीण विभागांतील लोकहिताचें कार्य करणारी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. पूर्वीं ह्या संस्थेच्या उत्पन्नाची मुख्य बाब लोकल फंड सेस हीच होती. हा लोकल फंड सेसही जमीन-महसुलाच्या उत्पन्नावर कोठें एक आणा तर कोठें दोन आणे ह्या प्रमाणांत आकारला जात असे. लोकल बोर्ड कायद्यामध्यें लोकलबोर्डासाठीं उत्पन्नाच्या इतर अनेक बाबींची तरतूद केलेली असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या बाबींपासून मिळणारें उत्पन्न अगदींच अल्प असल्याकारणानें ह्या तरतुदींचा विशेष उपयोग कोणत्याही बोर्डाला झालेला नाहीं. धंद्यावरील करासारख्या चांगल्या उत्पन्नाच्या बाबीबाबतसुद्धा करवसुलीच्या अंमल-बजावणींत अनेक अडचणी येत असल्याकारणानें ह्या मार्गाचा अवलंबही एकदोन अपवाद सोडून दुसऱ्या कोणत्याही बोर्डानें केलेला नाहीं. त्यामुळें प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डाला आपला खर्च मुख्यतः लोकल फंड सेसच्या उत्पन्नांतून व सरकारकडून मिळणाऱ्या ग्रँटमधूनच भागवावा लागे. ह्या तुटपुंज्या उत्पन्नांतूनच जिल्हा लोकल बोर्डांना आपल्या नोकरवर्गाच्या पगाराची तरतूद करावी लागे, प्राथमिक शिक्षणा-साठीं जिल्ह्यांतून होणाऱ्या खर्चाचा आपला सक्तीचा वांटा सरकारला द्यावा लागे आणि बाकी राहिलेल्या उत्पन्नांतून जिल्हाभर पसरलेलीं लोकहिताचीं कामें हातीं घ्यावीं लागत. युद्धजन्य महागाईमुळें तर बोर्डांचा

आर्थिक पायाच उखडून निघाल्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. अण्णासाहेबांनीं जिल्हा लोकल बोर्डाचा कारभार अनेक वर्षें हाकला होता. दिवसेंदिवस खालावत चाललेल्या जिल्हा लोकल बोर्डाच्या आर्थिक परिस्थितीची त्यांना पूर्ण कल्पना होती. ह्या बिकट परिस्थितींतून मार्ग काढून बोर्डाच्या आर्थिक कारभारांत स्थिरता आणण्यासाठीं ग्राम-पंचायतींप्रमाणेंच जिल्हा लोकल बोर्डांनाही जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं पंधरा टक्के उत्पन्न देण्याची योजना सरकारकडून त्वरित अमलांत आणण्यांत आली. ह्या योजनेमुळें राज्यांतील जिल्हा लोकल बोर्डांच्या उत्पन्नांत सालीना पन्नास लक्ष रुपयांची भर पडली ! अचानक झालेल्या ह्या ‘ धनलाभा ’ मुळें बोर्डांच्या आर्थिक परिस्थितींत कोरॅमिनचें इंजेक्शन दिल्याप्रमाणें नवचैतन्य निर्माण झालें.

ग्रामपंचायती व जिल्हा लोकल बोर्डें ह्यांना जमीनमहसुलापैकीं पंधरा टक्के उत्पन्न देऊनच अण्णासाहेब थांबले नाहींत. ह्या मदतीची सुरुवात प्रथमतः ग्रँटच्या रूपानें करण्यांत आली होती. सरकारच्या दृष्टीनें हा एक प्रयोग होता. ही खुषीची मदत होती. ती देण्याबद्दल सरकारवर कायद्याचें कोणतेंही बंधन नव्हतें. त्यामुळें कोठलीही सबब पुढें करून सरकार आपली ही जबाबदारी केव्हांही टाळूं शकलें असतें. ही परिस्थिति पुढें केव्हांही उद्भवूं नये म्हणून दूरदर्शीपणानें ग्रामपंचायत आणि लोकल बोर्ड कायद्यांमध्यें जरूर ती दुरुस्ती अण्णासाहेबांनीं करून घेतली. त्यामुळें ह्या मदतीच्या बाबतींत सरकार कायद्यानें बांधलें गेलें. अशा प्रकारें स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या महसुलाच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग, एक उत्पन्नाची बाब म्हणून देण्याची प्रथा सबंध हिंदुस्थानांत मुंबई राज्यानेंच पहिल्यानें सुरू केली आणि त्यासंबंधींचा पहिला कायदाही मुंबई सरकारनेंच केला. देशांतील दुसऱ्या राज्यांना मार्गदर्शक व्हावी अशी ही फार महत्त्वाची कामगिरी अण्णासाहेबांच्या हातून ह्या कायद्याच्या रूपानें पार पडली.

प्रकरण अठरावें

# जिल्हा बोर्डांचें आर्थिक संवर्धन

जिल्हा लोकल बोर्डांना जमीनमहसुलांतून मिळणाऱ्या उत्पन्नाबद्दल जरी ह्याप्रमाणें सरकारकडून कायदा करण्यांत आला तरी राज्यांतील कांहीं जिल्हा लोकल बोर्डांचा प्रश्न ह्या कायद्यानें समाधानकारकपणें सुटला नाहीं. मुंबई राज्यांतील पंचमहाल, कारवार, ह्यांसारख्या जिल्ह्यांचा बराच भाग जंगलांनीं व्यापलेला असल्यामुळें ह्या जिल्ह्यांतून वसूल होणारा जमीन-महसूल इतर जिल्ह्यांतील जमीनमहसुलाच्या मानानें बराच कमी असतो. त्यामुळें ह्या जिल्ह्यांतील लोकल बोर्डांचा ह्या योजनेमुळें जेवढा फायदा व्हावयास पाहिजे होता तेवढा झाला नाहीं. त्यामुळें सर्व जिल्हा लोकल बोर्डांना लागू होईल परंतु जिच्यामुळें वरील जिल्हा लोकल बोर्डांचा विशेष फायदा होईल अशी आणखी एक योजना करणें सरकारला जरूर होतें. त्यासाठीं जंगलाच्या उत्पन्नापैकीं दोन टक्के उत्पन्न सर्वच जिल्हा लोकल बोर्डांना देण्याची योजना अण्णासाहेबांनीं तयार करून तिला मंत्रिमंडळाची मान्यता मिळविली. ह्या योजनेमुळें जिल्हा लोकल बोर्डांचें उत्पन्न पांच लाखांनीं वाढलें.

जिल्हा लोकल बोर्डांच्या आर्थिक परिस्थितींत कायमच्या स्वरूपाची सुधारणा व्हावी म्हणून ह्याप्रमाणें अण्णासाहेब प्रयत्न करीत असतांना जिल्हा लोकल बोर्डांना सरकारकडून दरसाल मिळणाऱ्या इतर ग्रँटकडे अण्णासाहेबांचें दुर्लक्ष झालें नव्हतें. जिल्हा लोकल बोर्डांच्या ताब्यांत असलेल्या रस्त्यांवर जिल्हा लोकल बोर्डाकडून फार मोठ्या प्रमाणावर खर्च होत असतो. खर्चाचें प्रमाण उत्पन्नाच्या मानानें फार मोठें असल्याकारणानें जिल्हा लोकल बोर्डांना हा खर्च स्वतःच्या उत्पन्नांतून भागविणें शक्य नसतें म्हणून जिल्हा लोकल बोर्डांना ह्या कामीं सरकारकडून बरीच मोठी मदत " लोकल पब्लिक वर्क्स " ग्रँटच्या स्वरूपांत देण्यांत येत असते. ही ग्रँट वाढविण्यांत यावी म्हणून जिल्हा बोर्डाकडून पूर्वी अनेक प्रयत्न झाले होते. परंतु सरकारनें त्या बाबतींत विशेष लक्ष घातलें नाहीं. दुसऱ्या खेर मंत्रिमंडळानें मात्र ह्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली व त्यानंतर दरसाल ही ग्रँट सारखी वाढत गेली. अण्णासाहेबांचेच प्रयत्न ह्या गोष्टीस कारणीभूत झाले हें लिहिण्याची जरुरीच नाहीं. जिल्हा लोकल बोर्डांना मिळणाऱ्या ह्या ग्रँटची रक्कम १९४६–४७ सालीं जी दहा लक्ष एकाहत्तर हजार होती ती १९५०–५१ सालीं बावीस लक्ष रुपयांची झाली.

लोकल पब्लिक वर्क्सच्या ग्रँटप्रमाणेंच खेड्यांतील जोडरस्त्यांबाबत जिल्हा लोकल बोर्डांना मिळणाऱ्या ग्रँटमध्यें अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत बरीच वाढ झाली. पहिल्या खेर मंत्रिमंडळानें सुरू केलेली जोड-रस्त्यांची ही योजना फार महत्त्वाची होती. परकीय अमदानींत खेड्यांकडे सरकारचें अजिबात दुर्लक्ष झालेलें होतें. हिंदुस्थान देश खेड्यांतून पसरलेला असून त्याची आर्थिक उन्नति साधावयाची असल्यास खेड्यांना आपल्या विकासाचे मार्ग मोकळे होऊन बाह्य जगाशीं त्यांचें दळणवळण वाढणें अत्यंत आवश्यक होतें. परंतु दळणवळणाचे मार्गच जर अस्तित्वांत नसले तर खेड्यांचा विकास व उन्नति कशी साधणार ? देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत दळणवळणाच्या मार्गांना फार मोठें स्थान आहे.

पुष्कळ वेळां देशाच्या आर्थिक प्रगतीची पातळी त्या देशांत अस्तित्वांत असलेल्या दळणवळणाच्या साधनांवरून ठरविली जाते. शरीरांत धमन्या व रक्तवाहिन्या जें कार्य करतात तेंच कार्य देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत दळणवळणांच्या साधनांकडून केलें जातें. दळणवळणांच्या साधनांना अशा प्रकारचें महत्त्व असल्याकारणानें देशाची आर्थिक परिस्थिति अधिक वेगानें सुधारण्यासाठीं खेड्यांकरितां रस्त्यांची सोय होणें जरूर होतें. ह्या कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन १९३७ सालच्या पहिल्या खेर मंत्रिमंडळानें खेड्यांतील जोडरस्त्यांची ( Village Approach Roads ) एक योजना तयार करून ती अमलांत आणली. परंतु युद्धकाळांत ह्या योजनेकडे दुर्लक्ष झालें. १९४६ नंतर मात्र दुसऱ्या खेर मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत ह्या योजनेला पुन्हा जोराची चालना मिळाली. ह्या योजनेच्या अंमलबजावणीचें काम जिल्हा लोकल बोर्डाकडे सोपविण्यांत आलें होतें व त्यासाठीं त्यांना सरकारकडून ठराविक ग्रँट मिळत असे. १९४६ सालानंतर ह्या ग्रँटच्या रकमेमध्यें अण्णासाहेबांच्या प्रयत्नानें सारखी भर पडत गेली. अण्णासाहेब ह्या योजनेला फार महत्त्व देत असत व जिल्हा लोकल बोर्डांकडून हें काम आस्थापूर्वक पार पाडलें जाईल असें त्यांना वाटत असे. जिल्हा लोकल बोर्डांना ह्या कामासाठीं १९४६ मध्यें तीन लक्ष रुपयांची ग्रँट मिळत असे त्या ग्रँटची वाढ १९५०–५१ सालीं सोळा लक्ष चाळीस हजार रुपयांपर्यंत झाली.

अण्णासाहेबांनीं वरील व मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या मार्गांनीं जिल्हा लोकल बोर्डांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं सारखे प्रयत्न चालविले होते. परंतु ह्या प्रयत्नांत आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा समावेश केल्याशिवाय अण्णासाहेबांनीं ह्या क्षेत्रांत बजावलेल्या कामगिरीचें वर्णन पूर्ण होऊं शकणार नाहीं. ही बाब म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चासंबंधीं होय. हा प्रश्न बराच गुंतागुंतीचा असल्यामुळें त्याची चर्चा थोड्या विस्तारानें खालीं केली आहे.

प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी १९२३ च्या प्राथमिक शिक्षण कायद्यान्वयें जिल्हा लोकल बोर्ड भागापुरती जिल्हा लोकल बोर्डांवर टाकण्यांत आली. परंतु ही जबाबदारी निरनिराळ्या जिल्हा लोकल बोर्डांनीं एकाच वर्षी न स्वीकारतां निरनिराळ्या वर्षी स्वीकारली. १९२३ सालच्या ह्या कायद्याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत जिल्हा लोकल बोर्डांना सरकारकडून एका विशिष्ट प्रमाणांत मदत मिळत असे. ह्या मदतीचें प्रमाण पुढीलप्रमाणें ठेवण्यांत आलें होतें. ज्या वर्षी जिल्हा लोकल बोर्डानें प्राथमिक शिक्षणाचा ताबा घेतला असेल त्या वर्षी प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च व त्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या अधिकृत बाबींवर प्रत्येक वर्षी जिल्हा लोकल बोर्डांकडून होणाऱ्या जादा खर्चाचा दोन तृतीयांश भाग इतकी रक्कम त्या त्या वर्षी बोर्डांना सरकारी मदत म्हणून मिळत असे. ही व्यवस्था कांहीं वर्षे उत्तम प्रकारें चालली. त्यानंतर ठाणें, सातारा, नाशिक, सोलापूर, वगैरे जिल्हा लोकल बोर्डांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजना आंखून त्याकरितां होणारा खर्च भागविण्यासाठीं लोकल फंड सेस एक आण्याऐवजीं दोन आणे केला. परंतु त्याच वेळीं सुरू झालेल्या आर्थिक मंदीची झळ सरकारलाही लागल्याकारणानें वाढत्या प्राथमिक शिक्षणाबाबत सरकारवर पडणारा आर्थिक बोजा उचलण्याचें सरकारनें नाकारलें, एवढेंच नव्हे, तर ह्या बाबतींत सरकारकडून बोर्डांना मिळणाऱ्या मदतींत कपातही करण्यांत आली. त्यामुळें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अनेक योजना मागें पडल्या. सरकारच्या या पुच्छगामी धोरणामुळें प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न पुढें सारखा बिकट होत गेला. त्यांत युद्धजन्य परिस्थितीची भर पडल्यामुळें ह्या प्रश्नानें उग्र स्वरूप धारण केलें.

मूस–परांजपे योजनेप्रमाणें अनट्रेन्ड प्राथमिक शिक्षकाचा दरमहाचा पगार पंधरा रुपये ठरविण्यांत आला होता, तर ट्रेन्ड शिक्षकाला २५½–३०–१–४० ही वेतनश्रेणी देण्यांत आली होती. युद्धकालांत व त्यानंतर राहाणीचें मान सारखें वाढत गेल्यामुळें प्राथमिक शिक्षकांचा चरितार्थ

पुष्कळ वेळां देशाच्या आर्थिक प्रगतीची पातळी त्या देशांत अस्तित्वांत असलेल्या दळणवळणाच्या साधनांवरून ठरविली जाते. शरीरांत धमन्या व रक्तवाहिन्या जें कार्य करतात तेंच कार्य देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत दळणवळणांच्या साधनांकडून केलें जातें. दळणवळणांच्या साधनांना अशा प्रकारचें महत्त्व असल्याकारणानें देशाची आर्थिक परिस्थिति अधिक वेगानें सुधारण्यासाठीं खेड्यांकरितां रस्त्यांची सोय होणें जरूर होतें. ह्या कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन १९३७ सालच्या पहिल्या खेर मंत्रिमंडळानें खेड्यांतील जोडरस्त्यांची ( Village Approach Roads ) एक योजना तयार करून ती अमलांत आणली. परंतु युद्धकाळांत ह्या योजनेकडे दुर्लक्ष झालें. १९४६ नंतर मात्र दुसऱ्या खेर मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत ह्या योजनेला पुन्हा जोराची चालना मिळाली. ह्या योजनेच्या अंमलबजावणीचें काम जिल्हा लोकल बोर्डाकडे सोपविण्यांत आलें होतें व त्यासाठीं त्यांना सरकारकडून ठराविक ग्रँट मिळत असे. १९४६ सालानंतर ह्या ग्रँटच्या रकमेमध्यें अण्णासाहेबांच्या प्रयत्नानें सारखी भर पडत गेली. अण्णासाहेब ह्या योजनेला फार महत्त्व देत असत व जिल्हा लोकल बोर्डांकडून हें काम आस्थापूर्वक पार पाडलें जाईल असें त्यांना वाटत असे. जिल्हा लोकल बोर्डांना ह्या कामासाठीं १९४६ मध्यें तीन लक्ष रुपयांची ग्रँट मिळत असे त्या ग्रँटची वाढ १९५०–५१ सालीं सोळा लक्ष चाळीस हजार रुपयांपर्यंत झाली.

अण्णासाहेबांनीं वरील व मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या मार्गांनीं जिल्हा लोकल बोर्डांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं सारखे प्रयत्न चालविले होते. परंतु ह्या प्रयत्नांत आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा समावेश केल्याशिवाय अण्णासाहेबांनीं ह्या क्षेत्रांत बजावलेल्या कामगिरीचें वर्णन पूर्ण होऊं शकणार नाहीं. ही बाब म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चासंबंधीं होय. हा प्रश्न बराच गुंतागुंतीचा असल्यामुळें त्याची चर्चा थोड्या विस्तारानें खालीं केली आहे.

प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी १९२३ च्या प्राथमिक शिक्षण कायद्यान्वयें जिल्हा लोकल बोर्ड भागापुरती जिल्हा लोकल बोर्डांवर टाकण्यांत आली. परंतु ही जबाबदारी निरनिराळ्या जिल्हा लोकल बोर्डांनीं एकाच वर्षीं न स्वीकारतां निरनिराळ्या वर्षीं स्वीकारली. १९२३ सालच्या ह्या कायद्याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत जिल्हा लोकल बोर्डांना सरकारकडून एका विशिष्ट प्रमाणांत मदत मिळत असे. ह्या मदतीचें प्रमाण पुढीलप्रमाणें ठेवण्यांत आलें होतें. ज्या वर्षीं जिल्हा लोकल बोर्डानें प्राथमिक शिक्षणाचा ताबा घेतला असेल त्या वर्षीं प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च व त्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या अधिकृत बाबींवर प्रत्येक वर्षीं जिल्हा लोकल बोर्डांकडून होणाऱ्या जादा खर्चाचा दोन तृतीयांश भाग इतकी रक्कम त्या त्या वर्षीं बोर्डांना सरकारी मदत म्हणून मिळत असे. हीं व्यवस्था कांहीं वर्षें उत्तम प्रकारें चालली. त्यानंतर ठाणें, सातारा, नाशिक, सोलापूर, वगैरे जिल्हा लोकल बोर्डांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजना आंखून त्याकरितां होणारा खर्च भागविण्यासाठीं लोकल फंड सेस एक आण्याऐवजीं दोन आणे केला. परंतु त्याच वेळीं सुरू झालेल्या आर्थिक मंदीची झळ सरकारलाही लागल्याकारणानें वाढत्या प्राथमिक शिक्षणाबाबत सरकारवर पडणारा आर्थिक बोजा उचलण्याचें सरकारनें नाकारलें, एवढेंच नव्हे, तर ह्या बाबतींत सरकारकडून बोर्डांना मिळणाऱ्या मदतींत कपातही करण्यांत आली. त्यामुळें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अनेक योजना मागें पडल्या. सरकारच्या या पुच्छगामी धोरणामुळें प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न पुढें सारखा बिकट होत गेला. त्यांत युद्धजन्य परिस्थितीची भर पडल्यामुळें ह्या प्रश्नानें उग्र स्वरूप धारण केलें.

मूस–परांजपे योजनेप्रमाणें अन्‌ट्रेन्ड प्राथमिक शिक्षकाचा दरमहाचा पगार पंधरा रुपये ठरविण्यांत आला होता, तर ट्रेन्ड शिक्षकाला २५½–३०–१–४० ही वेतनश्रेणी देण्यांत आली होती. युद्धकालांत व त्यानंतर राहाणीचें मान सारखें वाढत गेल्यामुळें प्राथमिक शिक्षकांचा चरितार्थ

त्यांना मिळणाऱ्या पगारांत भागेनासा झाला व त्यांची आर्थिक परिस्थिति विकट झाली. त्यामुळें त्यांना महागाईभत्ता देण्यांत यावा अशा प्रकारच्या सूचना सरकारकडून बोर्डांना करण्यांत आल्या. परंतु ह्या बाबतींत सर्वच बोर्डांचें धोरण एकसूत्रीपणाचें नव्हतें. कांहीं बोर्डें तीन रुपयांचा महागाईभत्ता देत तर कांहीं बोर्डांकडून वीस रुपयांपर्यंत महागाईभत्ता देण्यांत येत असे ! परंतु केवळ महागाईभत्ता देऊन प्राथमिक शिक्षकांचा आर्थिक प्रश्न सुटणार नव्हता. त्यांच्या वेतनश्रेणींत, राहाणीचें मान लक्षांत घेऊन बदल व्हावयास पाहिजे होता. प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टीनें हा अधिक महत्त्वाचा प्रश्न होता. परंतु १९४६ पर्यंत हा प्रश्न रेंगाळत पडला होता. १९४६ सालीं दुसरें खेर मंत्रिमंडळ अधिकारावर येतांच प्राथमिक शिक्षकांनीं हा प्रश्न धसास लावला. ह्या प्रश्नावर त्यांनीं १९४६ सालीं संप घडवून आणला. सरकारही ह्या बाबतींत मोठ्या चमत्कारिक परिस्थितींत सापडलें होतें. सरकारला शिक्षकांचा आर्थिक प्रश्न सोडविणें भागच होतें. पण त्याबरोबरच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजनाही सरकारला त्वरित अमलांत आणावयाची होती. परंतु ह्या योजनेंतून अनेक आर्थिक प्रश्न उत्पन्न होणार होते. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करावयाचें म्हणजे शिक्षकांची संख्या सारखी वाढत जाणार होती. त्यांच्या शिक्षणासाठीं अधिक ट्रेनिंग कॉलेजें काढणें सरकारला प्राप्त होतें. वाढत्या शाळागृहांचा प्रश्न सरकारला संत्रस्त करणारा होता. योजनेच्या यशस्वीपणाच्या दृष्टीनें देखरेखीसाठीं (Supervision) अधिक नोकरवर्ग नेमणें आवश्यक होणार होतें. मूलोद्योग शिक्षणाची व्यवस्था व्हावयास पाहिजे होती. हे आणि ह्यांसारखे सरकारची आर्थिक जबाबदारी वाढविणारे अनेक प्रश्न ह्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेमधून निर्माण होणार होते. सरकारपुढें ही सर्वांत मोठी आर्थिक समस्या उभी होती. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठीं लोकल फंड सेस तीन आण्यांपर्यंत वाढविण्यांत यावा म्हणून लोकल बोर्ड कायद्यांत दुरुस्ती करण्यात आली. परंतु सरकारप्रमाणेंच ह्या प्रश्नाबाबत बोर्डांची परिस्थितिही

चमत्कारिक झाली होती. शिक्षकांच्या वेतनश्रेणींत वाढ करून त्यांना योग्य तो महागाईभत्ता देणें आणि त्याबरोबरच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलांत आणणें ह्या दोन्ही गोष्टी आर्थिकदृष्ट्या बोर्डाच्या आवाक्याबाहेरच्या होत्या. लोकल फंड सेस तीन आणे करून ही प्राथमिक शिक्षणावरील खर्चाबाबतची आपली जबाबदारी बोर्ड पार पाडूं शकत नव्हतें. ह्याचें मुख्य कारण म्हणजे ह्या खर्चाबाबतच्या त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या व्यवस्थेनुसार सक्तीच्या प्राथमिक योजनेमुळें बोर्डांची आर्थिक जबाबदारी बेसुमार वाढणार होती. लोकल फंड सेस तीन आणे वाढवूनच काय परंतु बोर्डाच्या अंदाजपत्रकांतील बहुतांशीं रक्कम जरी बोर्डांनीं ह्या कामीं खर्च करण्याचें ठरविलें असतें तरी बोर्डांना ही जबाबदारी पार पाडतां आली नसती. शिवाय लोकल फंड दोन आण्यांपासून तीन आण्यांपर्यंत वाढविण्यास लोकांचा विरोध झाला असता तो निराळाच.

परंतु ह्या बिकट परिस्थितींतून मार्ग काढणें सरकारला भागच होतें. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हें सरकारचें ध्येय होतें. ह्या ध्येयानुसार प्राथमिक शिक्षणासंबंधींच्या खर्चाचा प्रश्न सरकारला त्वरित सोडविणें भाग होतें. हा प्रश्न मोठ्या कौशल्यानें व यशस्वी रीतीनें सरकारनें हाताळला ह्याचें बरेंचसें श्रेय त्या वेळचे शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब खेर व स्थानिक स्वराज्य मंत्री म्हणून अण्णासाहेब ह्यांजकडे येतें. ह्या बाबतींत जिल्हा लोकल बोर्डावर पडणारी आर्थिक जबाबदारी निश्चित स्वरूपाची असावी ह्यावर अण्णासाहेबांचा मोठा कटाक्ष होता. कारण तसें न झाल्यास प्राथमिक शिक्षणावरील खर्च दरवर्षी वाढत जाणारा असल्यामुळें जिल्हा लोकल बोर्डावर ह्या बाबतींत अल्पावधींतच एवढा मोठा आर्थिक बोजा पडणार होता कीं त्यामुळें त्यांचें अस्तित्वच जवळ जवळ नाहींसें व्हावें अशी परिस्थिति निर्माण होण्याचा संभव होता. प्रश्न मोठा बिकट होता. पण त्यांतून मार्ग काढण्यासाठीं स्थानिक स्वराज्य मंत्री म्हणून अण्णासाहेबांनीं एक तोड सुचविली. पूर्वी बहुतेक लोकल बोर्डांनीं जमीन-


महसुलाच्या प्रत्येक रुपयामागें दोन आणे लोकल फंड सेस बसविला होता व लोकल फंड सेसच्या ह्या उत्पन्नांतून आठ पै प्राथमिक शिक्षणावर बोर्डांकडून खर्च करण्यांत येत असत. ह्याऐवजीं लोकल फंड सेस तीन आणे करून ह्या छत्तीस पैच्या उत्पन्नापैकीं पंधरा पै जिल्हा लोकल बोर्डांनीं प्राथमिक शिक्षणासाठीं द्याव्यात व प्राथमिक शिक्षणासाठीं होणाऱ्या बाकीच्या सर्व खर्चांची जबाबदारी सरकारनें स्वीकारावी अशा प्रकारची योजना अण्णासाहेबांनीं सुचविली व बऱ्याच चर्चेनंतर ती मंत्रिमंडळाकडून मान्य झाली. बऱ्याच जिल्हा लोकल बोर्डांचा लोकल फंड सेस तीन आणे करण्यास विरोध होता. परंतु अण्णासाहेबांनीं अशा जिल्ह्यांतून दौरे काढून तेथील जिल्हा लोकल बोर्डांना सरकारी योजना समजावून दिली व ती स्वीकारण्यांतच बोर्डांचें कसें हित आहे तें त्यांना पटवून दिलें. त्यानंतर बहुतेक जिल्हा लोकल बोर्डांनीं लोकल फंड सेस तीन आणे करण्यासंबंधीं ठराव पास केला. एवढें सर्व झाल्यानंतर लोकल बोर्ड कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन लोकल फंड सेस सक्तीनें तीन आणे करण्यांत आला. हें सर्व घडवून आणण्यांत अण्णासाहेबांनीं फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. जिल्हा लोकल बोर्डांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं सरकारनें त्यांना ज्याप्रमाणें प्रत्यक्ष आर्थिक मदत केली त्याचप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाबाबत त्यांच्यावर मर्यादित जबाबदारी टाकून त्यांच्यावर पडणारा आर्थिक बोजा सरकारनें हलका केला. बोर्डांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास ह्यामुळें अप्रत्यक्षपणें सरकारकडून त्यांना मदत झालेली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

सरकारच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेशीं संबंधित असलेल्या अनेक गोष्टी त्यानंतर घडून आल्या. पूर्वी अनट्रेन्ड शिक्षकास दरमहा पंधरा रुपये पगार मिळत होता त्याऐवजीं त्याला ३५–१–४० ची वेतनश्रेणी देण्यांत आली. ट्रेन्ड शिक्षकाची वेतनश्रेणी ४०–१–५० –१½–६५ सिलेक्शन ग्रेड २½–९० करण्यांत आली. सरकारी नियमाप्रमाणें त्यांना महागाईभत्ता मिळूं लागला. एक हजारापेक्षां अधिक

लोकवस्ती असलेल्या गांवीं शाळा काढण्यांत आल्या. गांवागांवांतून शाळागृहें बांधण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला. शिक्षकांची संख्या चौतीस हजारांवरून ऐंशी हजारांच्या घरांत गेली ! त्रावणकोर नंतर प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत अग्रेसर होण्याचा मान मुंबई राज्याला मिळाला. ह्या सर्व गोष्टी घडून येत असतांना प्राथमिक शिक्षणावरील खर्च सारखा वाढत गेला आणि आज तो जवळजवळ साडेसात ते पावणेआठ कोटींच्या घरांत गेला आहे. परंतु ह्या सर्व खर्चापैकीं नवीन योजनेप्रमाणें राज्यांतील सर्व जिल्हा लोकल बोर्डांवर पडणारी आर्थिक जबाबदारी पन्नास साठ लाखांपेक्षां अधिक नाहीं. नवीन योजना अमलांत न येतां पूर्वीचीच व्यवस्था चालू राहिली असती तर ह्या बाबतींतली बोर्डांची जबाबदारी अडीच कोटींच्या वर गेली असती ! अण्णासाहेबांच्या कामगिरीचें महत्त्व ह्या आंकड्यांवरून आतां वाचकांच्या सहज लक्षांत येईल. तिचें वर्णन ह्या बाबतींत अण्णासाहेबांनीं मोठी किमया करून दाखविली ह्या शब्दांत ता. १४ नोव्हेंबर १९५४ रोजीं अण्णासाहेबांच्या स्मरणार्थ विरार येथें बांधण्यांत आलेल्या शाळागृहाचें उद्घाटन करतांना मुंबई विधिमंडळाचे सभापति श्री. नानासाहेब कुंटे ह्यांनीं जें केलें तें सर्वथैव यथार्थ आहे.

मागील आणि ह्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें ग्रामपंचायती व जिल्हा लोकल बोर्डें ह्यांचें ग्रामीण विभागांतील व त्याचप्रमाणें नवीन राज्यव्यवस्थेंतील महत्त्वाचें स्थान लक्षांत घेऊन त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं अण्णासाहेब सारखा प्रयत्न करीत होते. १९४६ सालापूर्वीं ह्या संस्थांना सरकारकडून मिळणाऱ्या ग्रँटच्या रकमेची दुसऱ्या खेर मंत्रिमंडळाच्या अमदानींत त्यांना मिळणाऱ्या ग्रँटच्या रकमेबरोबर तुलना केली म्हणजे अण्णासाहेबांनीं ह्या क्षेत्रांत बजावलेल्या कामगिरीचें मर्म वाचकांच्या ताबडतोब ध्यानांत येईल. ग्रामपंचायतींना निरनिराळ्या स्वरूपांनीं सरकारकडून मिळणाऱ्या ग्रँटची रक्कम १९४६ सालीं अवघी चार लक्ष सव्वीस हजार होती तिची १९५०–५१ सालांत

जवळ जवळ पावणेचौतीस लक्ष रुपयांपर्यंत वाढ झाली. जिल्हा लोकल बोर्डांना निरनिराळ्या स्वरूपांत सरकारकडून १९४६ सालीं एकंदर चौदा लक्ष तेहेतीस हजार रुपयांची मदत मिळाली तर तोच आंकडा १९५०–५१ सालीं एक कोट पांच लक्ष रुपयांवर गेला! ह्या वाढीव मदतींत जमीनमहसुलाचें जें १५ टक्के उत्पन्न ह्या संस्थांना देण्यांत आलें त्याचा फार मोठा भाग आहे. एक कोटि पांच लक्षांच्या ह्या रकमेंत जमीनमहसुलाच्या ग्रँटचे पन्नास लक्ष रुपये आहेत! एवढी मोठी मदत ह्या संस्थांना कोणत्याही प्रकारची आडकाठी न येतां अव्याहतपणें मिळावी म्हणून अण्णासाहेबांनीं ह्या मदतीला कायद्याचें स्वरूप (Statutary) दिलें! अण्णासाहेबांनीं ग्रामीण विभागांतील ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं आपल्या कारकीर्दींत हें जें भरघोंस कार्य केलें त्याला मुंबई राज्याच्या स्थानिक स्वराज्य सस्थांच्या इतिहासांत तरी तोड नाहीं! त्यांनीं ही ‘किमया’ आपल्या अनुभवाच्या व आत्मविश्वासाच्या जोरावर करून दाखविली. त्यांच्या ह्या कामगिरीबद्दल मुंबई राज्यांतील ह्या स्थानिक स्वराज्य संस्था वर्षांनुवर्षें अण्णासाहेबांच्या ऋणी राहातील.



दुसरें खेर मंत्रिमंडळ, मुंबई राज्य — २ एप्रिल १९५१


प्रकरण एकोणिसावें

# आर्थिक स्वावलंबनाचें धोरण

ग्रामपंचायती आणि जिल्हा लोकल बोर्डें ह्यांची आर्थिक परिस्थिति सुधारावी णून प्रयत्न करीत असतांना राज्यांतील नगरपालिकांकडे अण्णासाहेबांचें लक्ष झालें नव्हतें. परंतु नगरपालिकांचा आर्थिक प्रश्न उपरीनिर्दिष्ट स्थांच्या आर्थिक प्रश्नापेक्षां थोडासा निराळ्या स्वरूपाचा होता. मपंचायती व जिल्हा लोकल बोर्डें ह्यांजकडे असणाऱ्या उत्पन्नाच्या बी फार थोड्या असून त्या बिनलवचिक आहेत. जिच्यामुळें उत्पन्नांत र मोठी भर पडेल अशी एकही उत्पन्नाची बाब ह्या संस्थांच्या अखत्यारांत हीं. उलटपक्षीं नगरपालिकांच्या उत्पन्नाचें क्षेत्र विस्तृत असून त्यांच्या त्पन्नांत वाढ करणें झाल्यास त्याला बराच वाव असतो. परंतु असें जरी सलें तरी नगरपालिकांचा आर्थिक प्रश्नही अण्णासाहेबांनीं गौण मानला हीं. जिल्हा लोकल बोर्डें व ग्रामपंचायती ह्यापेक्षां कार्यक्षेत्राच्या आणि र्यस्वरूपाच्या दृष्टीनें नगरपालिकांना बराच मोठा नोकरवर्ग ठेवावा ातो. म्हणून महागाईभत्त्याच्या प्रश्नानें नगरपालिकांनाही भंडावून डल्यास त्यांत नवल नाहीं. त्यांच्या ह्या परिस्थितीचा सहानुभूतिपूर्वक चार करून अण्णासाहेबांच्या प्रेरणेनें ह्या संस्थांनाही महागाईभत्त्या-

बाबत मदत देण्याचें सरकारनें धोरण पत्करलें. परंतु तसें करतांना सरकारला तारतम्य दृष्टि वापरावी लागली. त्या वेळीं मुंबई ही एकच महानगरपालिका होती. बाकीच्या नगरपालिकांपैकीं कांहीं 'बरो' नगरपालिका व 'डिस्ट्रिक्ट' नगरपालिका होत्या. सर्वच लहानमोठ्या नगरपालिकांना महागाईभत्त्याबाबत एकाच मापानें मदत देणें सरकारच्या मतें योग्य होणार नसल्यामुळें ही मदत देण्यासाठीं नगरपालिकांची आर्थिक परिस्थिति आणि आपलें उत्पन्न वाढविण्याची त्यांची ताकद (Capacity) हा निकष सरकारनें ठरविला. मुंबई महानगरपालिकेचें स्थान मुंबई राज्यांतच काय परंतु सर्व देशांतील नगरपालिकांत अनन्यसाधारण असें आहे. मुंबई महानगरपालिकेची प्रतिष्ठाही फार मोठी असून आपल्या उत्पन्नांत वाढ करण्यास तिला पुष्कळ वाव असल्याकारणानें महागाईभत्त्यासंबंधीं मदत देतांना मुंबई महानगरपालिकेचा प्रश्न विचारांत घेण्यांत आला नाहीं. बाकी राहिलेल्या नगरपालिकांत 'बरो' नगरपालिका ह्या मोठ्या व अधिक प्रतिष्ठित नगरपालिका आहेत. त्यांतल्या त्यांत अहमदाबाद, सुरत, पुणें व सोलापूर येथील नगरपालिका फारच मोठ्या असल्याकारणानें आणि ह्या शहरांची वस्ती एक लाखापेक्षां जास्त असल्यामुळें ह्या नगरपालिकांनाही आपलें उत्पन्न वाढविण्यास इतर नगरपालिकांच्या मानानें अधिक वाव होता. म्हणून ह्या चार नगरपालिकांना महागाईभत्त्यावर त्यांच्याकडून होणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के मदत देण्यांत आली. बाकीच्या सर्व बरो व डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांच्या बाबतींत मदतीचा हा आंकडा ५० टक्के ठरविण्यांत आला. नगरपालिकांनाही ग्रामपंचायती व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डांप्रमाणें पूर्वीच्या सरकारकडून महागाईभत्त्याबाबत कांहीं मदत मिळत नव्हती. मुंबई सरकारनें हें नवें धोरण स्वीकारल्यानंतर हा खर्च वाढत गेला व १९५०–५१ सालीं हा आंकडा ६३ लाखांवर येऊन ठेपला. सरकारकडून मिळणाऱ्या ह्या मदतीमुळें नगरपालिकांची घसरलेली आर्थिक परिस्थिति बरीच सावरली गेली.

महागाईभत्त्याबरोबरच नगरपालिकांच्या हद्दींतून सरकारला मिळणाऱ्या बिगरशेतीच्या उत्पन्नापैकीं १५ टक्के उत्पन्न नगरपालिकांना देण्यांत आलें. परंतु ही मदत फारच अल्प असल्यामुळें नगरपालिकांच्या आर्थिक परिस्थितींत स्थैर्य निर्माण करण्यासाठीं इतर उपाययोजना होणें जरूरीचें होतें. नगरपालिकांचे आर्थिक प्रश्न स्थानिक स्वरूपाचे असल्याकारणानें ह्या बाबतींत नगरपालिकांनीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें योग्य होईल असें अण्णासाहेबांचें मत होतें. नगरपालिकांकडून जो खर्च होतो तो स्थानिक जनतेच्या सुखसोईसाठींच होत असतो, म्हणून ह्या खर्चाचा बोजा शक्यतों राज्याच्या तिजोरीवर पडूं नये अशा प्रकारचें धोरण त्यांनीं नगरपालिकांच्या बाबतींत स्वीकारलें. नगरपालिकांच्या उत्पन्नाच्या बाबीही लवचिक व विविध प्रकारच्य असल्यामुळें नगरपालिकांचें उत्पन्न वाढविण्यास पुष्कळ वाव असतो. ह्या बाबतींत नगरपित्यांनीं व नागरिकांनीं आपली जबाबदारी योग्य प्रकारें ओळखली तर नगरपालिकांचें उत्पन्न वाढण्यास फारशी अडचण पडूं नये. परंतु ह्या दृष्टीनें नगरपालिकांच्या कारभाराकडे पाहाणारे फारच थोडे लोक असतात व त्यामुळें नगरपालिकांना आर्थिक विवंचनेचा प्रश्न नेहमींच जाणवतो. ह्या बाबतींत नगरपालिकांकडून आपलें कर्तव्य चोख पार पाडलें जावें आणि स्वावलंबनाची वृत्ति अधिक वाढीस लागावी म्हणून ज्या ज्या नगरपालिका निरनिराळ्या करांपासून मिळणारें आपलें उत्पन्न रेटेबल व्हॅल्यूच्या २० टक्केपर्यंत वाढविणार नाहींत त्यांना महागाईभत्त्यावरील सरकारी ग्रँट मिळणार नाहीं असें सरकारनें जाहीर केलें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या नियमाची अंमलबजावणी अगदीं कांटेकोर पद्धतीनें न करतां ज्या नगरपालिकांनीं आपलें उत्पन्न २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या दिशेनें निश्चितपणें पाऊल टाकलें त्यांनाही महागाईभत्त्याची ग्रँट दिली गेली. पुष्कळशा नगरपालिकांना सरकारचें हें धोरण रुचलें नाहीं. परंतु विशेष आढेवेढे न घेतां सरकारचा हा हुकूम नगरपालिकांनीं बिनबोभाट मानला.




दुसरें खेर मंत्रिमंडळ, मुंबई राज्य — ३ एप्रिल १९५१

प्रकरण एकोणिसावें

# आर्थिक स्वावलंबनाचें धोरण

ग्रामपंचायती आणि जिल्हा लोकल बोर्डें ह्यांची आर्थिक परिस्थिति सुधारावी ्हणून प्रयत्न करीत असतांना राज्यांतील नगरपालिकांकडे अण्णासाहेबांचें ्लक्ष झालें नव्हतें. परंतु नगरपालिकांचा आर्थिक प्रश्न उपरीनिर्दिष्ट ्स्थांच्या आर्थिक प्रश्नापेक्षां थोडासा निराळ्या स्वरूपाचा होता. ्रामपंचायती व जिल्हा लोकल बोर्डें ह्यांजकडे असणाऱ्या उत्पन्नाच्या ्बाबी फार थोड्या असून त्या बिनलवचिक आहेत. जिच्यामुळें उत्पन्नांत ्ार मोठी भर पडेल अशी एकही उत्पन्नाची बाब ह्या संस्थांच्या अखत्यारांत ्ाहीं. उलटपक्षीं नगरपालिकांच्या उत्पन्नाचें क्षेत्र विस्तृत असून त्यांच्या ्त्पन्नांत वाढ करणें झाल्यास त्याला बराच वाव असतो. परंतु असें जरी ्सलें तरी नगरपालिकांचा आर्थिक प्रश्नही अण्णासाहेबांनीं गौण मानला ्ाहीं. जिल्हा लोकल बोर्डें व ग्रामपंचायती ह्यापेक्षां कार्यक्षेत्राच्या आणि ्ार्यस्वरूपाच्या दृष्टीनें नगरपालिकांना बराच मोठा नोकरवर्ग ठेवावा ्ागतो. म्हणून महागाईभत्त्याच्या प्रश्नानें नगरपालिकांनाही भंडावून ्ोडल्यास त्यांत नवल नाहीं. त्यांच्या ह्या परिस्थितीचा सहानुभूतिपूर्वक ्िचार करून अण्णासाहेबांच्या प्रेरणेनें ह्या संस्थांनाही महागाईभत्त्या-



दुसरें खेर मंत्रिमंडळ, मुंबई राज्य — २ एप्रिल १९५१

प्रकरण एकोणिसावें

# आर्थिक स्वावलंबनाचें धोरण

ग्रामपंचायती आणि जिल्हा लोकल बोर्डें ह्यांची आर्थिक परिस्थिति सुधारावी म्हणून प्रयत्न करीत असतांना राज्यांतील नगरपालिकांकडे अण्णासाहेबांचें दुर्लक्ष झालें नव्हतें. परंतु नगरपालिकांचा आर्थिक प्रश्न उपरीनिर्दिष्ट संस्थांच्या आर्थिक प्रश्नापेक्षां थोडासा निराळ्या स्वरूपाचा होता. ग्रामपंचायती व जिल्हा लोकल बोर्डें ह्यांजकडे असणाऱ्या उत्पन्नाच्या बाबी फार थोड्या असून त्या विनलवचिक आहेत. जिच्यामुळें उत्पन्नांत फार मोठी भर पडेल अशी एकही उत्पन्नाची बाब ह्या संस्थांच्या अखत्यारांत नाहीं. उलटपक्षीं नगरपालिकांच्या उत्पन्नाचें क्षेत्र विस्तृत असून त्यांच्या उत्पन्नांत वाढ करणें झाल्यास त्याला बराच वाव असतो. परंतु असें जरी असलें तरी नगरपालिकांचा आर्थिक प्रश्नही अण्णासाहेबांनीं गौण मानला नाहीं. जिल्हा लोकल बोर्डें व ग्रामपंचायती ह्यापेक्षां कार्यक्षेत्राच्या आणि कार्यस्वरूपाच्या दृष्टीनें नगरपालिकांना बराच मोठा नोकरवर्ग ठेवावा लागतो. म्हणून महागाईभत्त्याच्या प्रश्नानें नगरपालिकांनाही भंडावून सोडल्यास त्यांत नवल नाहीं. त्यांच्या ह्या परिस्थितीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून अण्णासाहेबांच्या प्रेरणेनें ह्या संस्थांनाही महागाईभत्त्या-

बाबत मदत देण्याचें सरकारनें धोरण पत्करलें. परंतु तसें करतांना सरकारला तारतम्य हाच वापरावा लागला. त्या वेळीं मुंबई ही एकच महानगरपालिका होती. बाकीच्या नगरपालिकांपैकीं कांहीं 'बरो' नगरपालिका व 'डिस्ट्रिक्ट' नगरपालिका होत्या. सर्वच लहानमोठ्या नगरपालिकांना महागाईभत्त्याबाबत एकाच मापानें मदत देणें सरकारच्या मतें योग्य होणार नसल्यामुळें ही मदत देण्यासाठीं नगरपालिकांची आर्थिक परिस्थिति आणि आपलें उत्पन्न वाढविण्याची त्यांची ताकद (Capacity) हा निकष सरकारनें ठरविला. मुंबई महानगरपालिकेचें स्थान मुंबई राज्यांतच काय परंतु सर्व देशांतील नगरपालिकांत अनन्यसाधारण असें आहे. मुंबई महानगरपालिकेची प्रतिष्ठाही फार मोठी असून आपल्या उत्पन्नांत वाढ करण्यास तिला पुष्कळ वाव असल्याकारणानें महागाईभत्त्यासंबंधीं मदत देतांना मुंबई महानगरपालिकेचा प्रश्न विचारांत घेण्यांत आला नाहीं. बाकी राहिलेल्या नगरपालिकांत 'बरो' नगरपालिका ह्या मोठ्या व अधिक प्रतिष्ठित नगरपालिका आहेत. त्यांतल्या त्यांत अहमदाबाद, सुरत, पुणें व सोलापूर येथील नगरपालिका फारच मोठ्या असल्याकारणानें आणि ह्या शहरांची वस्ती एक लाखापेक्षां जास्त असल्यामुळें ह्या नगरपालिकांनाही आपलें उत्पन्न वाढविण्यास इतर नगरपालिकांच्या मानानें अधिक वाव होता. म्हणून ह्या चार नगरपालिकांना महागाईभत्त्यावर त्यांच्याकडून होणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के मदत देण्यांत आली. बाकीच्या सर्व बरो व डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांच्या बाबतींत मदतीचा हा आंकडा ५० टक्के ठरविण्यांत आला. नगरपालिकांनाही ग्रामपंचायती व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डांप्रमाणें पूर्वींच्या सरकारकडून महागाईभत्त्याबाबत कांहीं मदत मिळत नव्हती. मुंबई सरकारनें हें नवें धोरण स्वीकारल्यानंतर हा खर्च वाढत गेला व १९५०–५१ सालीं हा आंकडा ६३ लाखांवर येऊन ठेपला. सरकारकडून मिळणाऱ्या ह्या मदतीमुळें नगरपालिकांची घसरलेली आर्थिक परिस्थिति बरीच सावरली गेली.

महागाईभत्त्याबरोबरच नगरपालिकांच्या हद्दींतून सरकारला मिळणाऱ्या बिगरशेतीच्या उत्पन्नापैकीं १५ टक्के उत्पन्न नगरपालिकांना देण्यांत आलें. परंतु ही मदत फारच अल्प असल्यामुळें नगरपालिकांच्या आर्थिक परिस्थितींत स्थैर्य निर्माण करण्यासाठीं इतर उपाययोजना होणें जरूरीचें होतें. नगरपालिकांचे आर्थिक प्रश्न स्थानिक स्वरूपाचे असल्याकारणानें ह्या बाबतींत नगरपालिकांनीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें योग्य होईल असें अण्णासाहेबांचें मत होतें. नगरपालिकांकडून जो खर्च होतो तो स्थानिक जनतेच्या सुखसोईसाठींच होत असतो, म्हणून ह्या खर्चाचा बोजा शक्यतों राज्याच्या तिजोरीवर पडूं नये अशा प्रकारचें धोरण त्यांनीं नगरपालिकांच्या बाबतींत स्वीकारलें. नगरपालिकांच्या उत्पन्नाच्या बाबीही लवचिक व विविध प्रकारच्य असल्यामुळें नगरपालिकांचें उत्पन्न वाढविण्यास पुष्कळ वाव असतो. ह्या बाबतींत नगरपित्यांनीं व नागरिकांनीं आपली जबाबदारी योग्य प्रकारें ओळखली तर नगरपालिकांचें उत्पन्न वाढण्यास फारशी अडचण पडूं नये. परंतु ह्या दृष्टीनें नगरपालिकांच्या कारभाराकडे पाहाणारे फारच थोडे लोक असतात व त्यामुळें नगरपालिकांना आर्थिक विवंचनेचा प्रश्न नेहमींच जाणवतो. ह्या बाबतींत नगरपालिकांकडून आपलें कर्तव्य चोख पार पाडलें जावें आणि स्वावलंबनाची वृत्ति अधिक वाढीस लागावी म्हणून ज्या ज्या नगरपालिका निरनिराळ्या करांपासून मिळणारें आपलें उत्पन्न रेटेबल व्हॅल्यूच्या २० टक्केपर्यंत वाढविणार नाहींत त्यांना महागाईभत्त्यावरील सरकारी ग्रँट मिळणार नाहीं असें सरकारनें जाहीर केलें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या नियमाची अंमलबजावणी अगदीं कांटेकोर पद्धतीनें न करतां ज्या नगरपालिकांनीं आपलें उत्पन्न २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या दिशेनें निश्चितपणें पाऊल टाकलें त्यांनाही महागाईभत्त्याची ग्रँट दिली गेली. पुष्कळशा नगरपालिकांना सरकारचें हें धोरण रुचलें नाहीं. परंतु विशेष आढेवेढे न घेतां सरकारचा हा हुकूम नगरपालिकांनीं बिनबोभाट मानला.

नगरपालिकांना घरपट्टीपासून मिळणारें उत्पन्न मोठें असतें. परंतु पुष्कळ वेळां नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांकडून चुकीच्या पायावर घरपट्टीची आकारणी झाल्यास नगरपालिकांच्या उत्पन्नास बाध येतो. घरपट्टीची आकारणी करतांना नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांना पुष्कळ वेळां अनेक हितसंबंधांकडे लक्ष ठेवून आपलें कर्तव्य पार पाडावें लागतें अशा प्रकारचे पुष्कळ प्रवाद प्रचलित होते. हें सर्व टाळण्यासाठीं नगर-पालिकांच्या घरपट्टीची आकारणी योग्य रीतीनें व्हावी ह्या उद्देशानें नगरपालिकांनीं ह्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांची मदत घ्यावी असें त्यांना सरकारकडून सुचविण्यांत आलें. परंतु ह्याही बाबतींत कांहीं नगरपालिकांकडून विरोध झालाच ! सरकारनें सुचविल्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांची मदत घेण्याचें नाकारल्यास नगरपालिकेविरुद्ध कोणताही इलाज सरकार करूं शकत नव्हतें. परंतु महागाईभत्त्याच्या मदतीचें शस्त्र सरकारच्या हातीं होतेंच. नगरपालिकांना महागाईभत्त्यावरील ग्रँट देणें सर्वस्वीं सरकारच्या इच्छेची बाब होती. घरपट्टीच्या आकारणीबाबत सरकारी सूचना अमान्य करणाऱ्या नगरपालिकांना महागाईभत्त्यावरील ग्रँट देण्याचें सरकारनें नाकारलें. ह्या सरकारी धोरणाचा योग्य तो परिणाम होऊन बहुतेक नगरपालिकांकडून सरकारनें सुचविल्याप्रमाणें आकारणी कामासाठीं सरकारी अधिकारी नेमण्यांत आले. राज्यांत शेंकडों नगरपालिका असल्यामुळें घरपट्टीच्या आकारणीचें हें काम पुढें पुष्कळ दिवस चाललें होतें.

महागाईभत्त्यावरील नगरपालिकांना मिळणाऱ्या ग्रँटचा सरकारनें एक प्रभावी शस्त्र म्हणून उपयोग केला. ही ग्रँट देतां देतांच नगरपालिकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं नगरपालिकांकडून सरकारनें ज्या गोष्टींची अपेक्षा केली होती त्या गोष्टी सरकारनें पुऱ्या करून घेतल्या. सरकारी धोरणामुळें ग्रँट नाकारावी तरी पंचाईत व स्वीकारावी तरी पंचाईत अशी कांहींशी चमत्कारिक परिस्थिति नगर-पालिकांची झाली. परंतु नगरपालिकांच्या हिताच्या दृष्टीनेंच सरकारनें हें

धोरण स्वीकारलें असल्यामुळें नगरपालिकांनीं ग्रँट स्वीकारून आपआपलीं अपेक्षित असलेलीं कर्तव्यें पार पाडलीं.

पाणीपुरवठा व ड्रेनेज ह्या खास नगरपालिकांच्या अखत्यारांतील बाबी आहेत. परंतु त्यासंबंधीं योजना तयार करून पार पाडणें फार खर्चाचें काम असल्यामुळें केवळ आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर नगरपालिकांना ह्या योजना पार पाडतां येणें शक्य नव्हतें, म्हणून त्या बाबतींत नगरपालिकांना सढळ हातानें मदत करण्याचें सरकारचें पूर्वीपासूनचें धोरण होतें. ह्या धोरणाप्रमाणें ह्या कामासाठीं बरो नगरपालिकांना खर्चाच्या ३३⅓ टक्के व डिस्ट्रिक्ट नगरपालिकांना ५० टक्के मदत मिळत असे. अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत ह्या मदतींत बरीच वाढ झाली. १९४५–४६ सालीं नगरपालिकांना ह्या योजनांसाठीं सरकारकडून तीन लक्ष रुपयांची मदत मिळाली, तर १९५०–५१ सालीं ह्या मदतीचा आंकडा अठरा लक्षांवर गेला.

त्याचप्रमाणें हरिजनांसाठीं घरें बांधण्याची योजना नगरपालिकांनीं आपल्या अंगावर घेतल्यास वरील प्रमाणांत नगरपालिकांना मदत देण्याचें नवीन धोरण अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत सरकारनें जाहीर केलें. ह्या कार्यासाठीं सरकारनें १९५०–५१ सालीं जवळ जवळ अडीच लक्ष रुपयांची मदत दिली.

नगरपालिकांच्या बाबतींत अण्णासाहेबांचें धोरण आर्थिक स्वावलंबनाचें होतें. नगरपालिकांचें कार्य स्थानिक स्वरूपाचें असल्याकारणानें ह्या कार्यासाठीं लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी शक्यतों नागरिकांनींच आपल्या शिरावर घ्यावी म्हणजे नगरपित्यांत आणि नागरिकांतही आपल्या कर्तव्याची जाणीव उत्पन्न होऊन नागरिकांच्या पैशाचा विनियोग योग्य प्रकारें होईल व नगरपालिकांचा कारभारही त्यामुळें सुधारण्यास मदत होईल अशी त्यांची विचारसरणी होती. ह्याच विचाराच्या भूमिकेवरून अण्णासाहेबांनीं नगरपालिकांच्या बाबतींतलें आपलें आर्थिक धोरण

आंखलें आणि तें अमलांत आणण्याचा कसोशीनें प्रयत्न केला. परंतु हें धोरण अमलांत आणतांना त्यांची दृष्टि सहानुभूतीचीच राहिली. महागाई-भत्त्यावरील खर्च, ड्रेनेज व पाणीपुरवठ्याच्या योजना, ह्यांसारखे जे प्रश्न आर्थिक दृष्ट्या नगरपालिकांच्या आवाक्याबाहेरचे होते त्या प्रश्नांच्या बाबतींत त्यांनीं नगरपालिकांना सढळ हातानें मदत केली.

प्रकरण विसावें

# नव्या मनूंतील लोकशाही कारभार

अण्णासाहेबांच्या स्थानिक स्वराज्य संस्थां-संबंधींच्या धोरणाचीं तीन मुख्य उद्दिष्टें होतीं. १. स्थानिक स्वराज्य संस्थांची मजबूत आर्थिक पायावर उभारणी करून त्यांच्यांत जोम निर्माण करणें. २. ह्या संस्थांच्या अंतर्गत कारभारांत जरूर त्या सुधारणा घडवून आणून त्यांचा कारभार अधिक लोकाभिमुख करणें आणि ३. ह्या संस्थांना जरूर ते अधिकार देऊन विकेन्द्रीकरणाच्या दृष्टीनें ह्या संस्थांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ति वाढविणें. स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं अण्णासाहेबांनीं केलेल्या उपाययोजनांची माहिती मागील तीन प्रकरणांत आलेलीच आहे. बाकी राहिलेलीं दोन उद्दिष्टें साध्य होण्यासाठीं अण्णासाहेबांनीं जे प्रयत्न केले त्यांचें विवेचन आतां करावयाचें आहे.

परकीय अमदानींत आपली सत्ता ह्या देशांत कायमची कशी टिकेल हाच येथील राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रश्न होता. हा उद्देश साध्य होण्यासाठीं जातीजातींत द्वेषाच्या भावनेचा फैलाव करून देशाच्या राज्यकारभारांत त्यांनीं स्वतंत्र मतदार संघाचे सवतेसुभे निर्माण केले.

ह्या सवत्यासुभ्यांच्या उपसर्गाची बाधा स्थानिक स्वराज्य संस्थांनाही झाल्याशिवाय राहिली नाहीं. ग्रामपंचायतींमधून, नगरपालिकांमधून, जिल्हा लोकल बोर्डांमधून, मुसलमान व ख्रिश्चन जमातींसाठीं स्वतंत्र जागा राखून ठेवण्यांत येत व मुसलमानांसाठीं तर खास मतदार संघ असत. असें करण्यांत राष्ट्रांतील इतर जनतेच्या हितसंबंधापेक्षां आपले हितसंबंध निराळे आहेत अशी दुष्ट व संकुचित भावना ह्या जमातींत निर्माण व्हावी हाच परकीय राज्यकर्त्यांचा आदेश होता. राष्ट्राचा राज्यकारभार जेथें सर्व जनतेच्या हिताच्या दृष्टीनें चालतो तेथें पृथक् पृथक् जमातींच्या हिताचा प्रश्नच उद्भवत नाहीं. ही गोष्ट खरीच, परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांचें कार्यक्षेत्र केवळ स्थानिक लोकहिताच्या प्रश्नापुरतेंच मर्यादित असल्याकारणानें ह्या संस्थांतून जातीय भावनेस मुळींच वाव मिळावयास नको होता. परंतु ह्याही संस्थांमधून परकीय अमदानींत ह्या दुष्ट भावनेचें बीज पेरलें गेलें होतें. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें त्याचा समूळ नायनाट शक्य तितक्या लवकर होणें जरूरीचें होतें. म्हणून १९४७ सालीं मुंबई सरकारकडून एक कायदा पास करण्यांत आला. ह्या कायद्यान्वयें स्थानिक स्वराज्य संस्थांतील सर्व राखीव मतदार संघ आणि हरिजन व मागासलेल्या वर्गांखेरीज इतर जमातींबाबत असलेल्या सर्व राखीव जागा नाहींशा करण्यांत आल्या. हरिजन व मागासलेल्या वर्गांसाठीं मात्र मध्यवर्ती सरकारच्या १९४७ च्या कायद्या-प्रमाणें, त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत, परंतु स्वतंत्र मतदारसंघाच्या तत्त्वावर नव्हे, पुढील दहा वर्षेपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांत जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत.

ह्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधीं दुसरी महत्त्वाची सुधारणा म्हणजे घटना कायद्याच्या एका मूलभूत तरतुदीप्रमाणें, ह्या संस्थांच्या निवडणुकींतही प्रौढ मतदान पद्धतीचा स्वीकार करण्यांत आला ही होय. ह्या सुधारणेमुळें ह्या संस्थांच्या निवडणुकीच्या वेळीं त्या त्या संस्थेच्या हद्दींतील वयांत आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला मतदानाचा

हक्क प्राप्त झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत लोकशाहीच्या प्रसाराच्या दृष्टीनें झालेली ही महत्त्वाची सुधारणा होय.

वरील दोन्ही सुधारणांमुळें ह्या संस्थांचें बाह्यस्वरूप पालटलें जाऊन त्या अधिक लोकाभिमुख होण्यास मदत झाली. ह्या सुधारणांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत आणखी एक सुधारणा सरकारनें घडवून आणली. पूर्वी बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी क्युम्युलेटिव्ह व्होटिंगच्या पद्धतीवर होत असत. ह्या पद्धतीप्रमाणें एखाद्या मतदारसंघांतून जितके प्रतिनिधि निवडून द्यावयाचे असतील तितकीं मतें देण्याचा प्रत्येक मतदाराला हक्क असून हीं सर्व मतें तो एकाच उमेदवारास देऊं शकतो. ह्याचा परिणाम विशेषतः नगरपालिकांच्या दृष्टीनें अनिष्ट झाला. क्यम्युलेटिव्ह व्होटिंगच्या पद्धतीमुळें मतदारसंघांतून लहान लहान गट निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळालें. ह्या गटांमागें कोणतीही तात्त्विक भूमिका नसे व पुष्कळ वेळां त्यांचें स्वरूप जातीय असे. उमेदवारांचे वैयक्तिक हितसंबंधही कांहीं कांहीं वेळां ह्या गटांशीं निगडित असत. ह्या पद्धतीमुळें उमेदवारांना सर्व मतदारसंघाला आवाहन करण्याची जरूरी नव्हती. मतदार-संघांतील ठराविक गटांचा पाठिंबा मिळाला म्हणजे त्यांना निवडून येणें सहज शक्य होई. त्यामुळें नगरपालिकांच्या निवडणुकीमध्यें कित्येक वेळां अनिष्ट प्रवृत्ति निर्माण झाल्याचें दिसून आलें. ह्या सर्वांचा परिणाम निवडून आलेल्या सभासदांचें प्रातिनिधिक स्वरूप नाहींसें होण्यांत झाला. नगरपालिकांच्या कारभाराची पातळीही कित्येक ठिकाणीं खालावत गेली. हे सर्व दुष्परिणाम टाळण्यासाठीं व नगरपालिकांच्या कारभारांत आलेला संकुचितपणा नाहींसा करण्यासाठीं इतर स्थानिक स्वराज्य संस्थां-प्रमाणेंच नगरपालिकांच्या निवडणुकांमध्येंही डिस्ट्रिब्युटिव्ह व्होटिंगची पद्धत सुरू करण्याचा अण्णासाहेबांनीं निर्णय केला. ह्या पद्धतीप्रमाणें मतदारसंघांत कितीही जागा असल्या तरी मतदारांना कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षां अधिक मतें देण्याचा अधिकार नसतो. त्यामुळें

निवडणुकीस उभ्या असणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला निवडून येण्यासाठीं मतदारसंघांतील सर्वच मतदारांकडे धाव घ्यावी लागते आणि त्यामुळें निवडून आलेल्या उमेदवारांची निवड खऱ्या अर्थानें प्रातिनिधिक स्वरूपाची ठरते. डिस्ट्रिब्युट्रिव्ह व्होटिंगची ही पद्धत पूर्वी अहमदावाद नगरपालिकांच्या निवडणुकीपुरती उपयोगांत आणली गेली होती. सर्वच नगरपालिकांतून ही पद्धत सुरू केल्यास खुद्द नगरपालिकांकडूनच तिला विरोध होण्याचा संभव असल्यामुळें ही पद्धत सुरू करतांना एकदम घाई करूं नये अशा प्रकारचा एक प्रभावी मतप्रवाह होता. परंतु ह्या मंडळींचा हा आस्ते कदम स्वरूपाचा सल्ला न मानतां नगरपालिकांच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें अण्णासाहेबांनीं ही पद्धत निश्चयपूर्वक व त्वरित अमलांत आणली. त्यांचीं ह्या बाबतींतील मतें पूर्ण विचारान्तीं बनलेलीं होतीं. नगरपालिकांच्या कारभारांत शिरलेल्या अनेक अनिष्ट प्रवृत्तींचें ह्या सुधारणेमुळें निर्मूलन होऊन त्यांचा कारभार अधिक प्रभावी व लोककल्याणकारी होण्यास तिची मदत होईल ह्याबद्दल अण्णासाहेबांना पूर्ण विश्वास वाटत होता. त्यांनीं उच्च हेतूनें घडवून आणलेल्या ह्या सुधारणेस फळें लागावयास अद्यापि अवकाश आहे. परंतु हीं फळें सुमधुर व रसपूर्ण लागावींत अशीच अपेक्षा स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत आस्था बाळगणाऱ्या प्रत्येक नागरिकाची असेल ह्याबद्दल शंका नाहीं.

नगरपालिकांच्या निवडणुकींबाबत अण्णासाहेबांनीं आणखी एक सुधारणा घडवून आणली. पूर्वी प्रत्येक नगरपालिकेचे निवडणुकींसंबंधी आपआपले स्वतंत्र नियम असत. ह्या नियमांत आपल्या सोयीप्रमाणें नगरपालिका दुरुस्त्या करून घेत. परंतु त्यासाठीं नगरपालिकांना प्रथम सरकारची मंजुरी घ्यावी लागत असे. ही मंजुरी मिळविण्याच्या कामीं पुष्कळ वेळां पत्रव्यवहार वाढून कालाचा अपव्यय होत असे व अनेक वेळां दफ्तरदिरंगाईचे प्रकारही घडत असत. हा दोष काढून टाकण्यासाठीं अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत नगरपालिकांच्या निवडणुकींबाबत

एकच प्रकारचे नियम तयार करण्यांत येऊन ते सर्व बरो व डिस्ट्रिक्ट नगरपालिकांना लागू करण्यांत आले. ह्या सुधारणेमुळें नगरपालिकांच्या निवडणुकींबाबतच्या नियमांत एकसूत्रीपणा आला व निष्कारण होणारा पत्रव्यवहारही थाबला.

ह्या सुधारणा घडवून आणल्यानंतर अण्णासाहेबांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घटनेच्या (Constitutions) प्रश्नांत लक्ष घातलें. ग्रामपंचायतींच्या सभासदांची संख्या किती असावी ह्यासंबंधीं पूर्वी नियम होतेच. ह्या नियमांत सरकारनें अमलांत आणलेल्या ग्रामपंचायतीसंबंधींच्या नवीन धोरणानुसार फेरबदल करण्यांत येऊन ग्रामपंचायतींच्या सभासदांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणांत एका विशिष्ट पद्धतीवर निश्चित करण्यांत आली. परंतु त्याबरोबरच सभासदांच्या संख्येबाबत किमान व कमाल मर्यादाही ठरविण्यांत आल्या. ह्या नवीन व्यवस्थेप्रमाणें कोणत्याही ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या सातापेक्षां कमी व पंधरापेक्षां अधिक असूं शकणार नाहीं.

ग्रामपंचायतींप्रमाणें लोकसंख्येच्या प्रमाणांत जिल्हा लोकल बोर्डांच्या सभासदांची संख्या ठरविण्याबाबत पूर्वी नियम करण्यांत आले नव्हते. त्यामुळें निरनिराळ्या जिल्हा लोकल बोर्डांच्या सभासदांच्या संख्येंत अनियंत्रितपणें वाढ होत गेली. प्रत्येक खानेसुमारीनंतर आणि पुष्कळ वेळां निवडणुका जवळ आल्या म्हणजे कित्येक बोर्डें सरकारकडून आपल्या सभासदांची संख्या वाढवून घेण्याचा प्रयत्न करीत. सरकारकडे बोर्डाकडून अशा प्रकारची योजना आल्यानंतर तिच्यासंबंधीं सरकारचा निर्णय बाहेर पडेपर्यंत बोर्डाची निवडणूक होऊं शकत नसे. त्यामुळें कांहीं कांहीं वेळां आपली मुदत वाढवून घेण्यासाठीं बोर्डें ह्या साधनाचा उपयोग करीत असत आणि ह्या प्रयत्नांत त्यांना पुष्कळ वेळां यशही मिळत असे ! अनियंत्रितपणाचे हे सर्व प्रकार थांबविण्यासाठीं अण्णासाहेबांनीं ग्रामपंचायतींप्रमाणेंच जिल्हा लोकल बोर्डांच्या बाबतींतही त्यांच्या सभासदांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणांत ठरविण्याचें तत्त्व अंमलांत

आणलें. ह्या नवीन पद्धतीप्रमाणें बोर्डांच्या सभासदांची किमान मर्यादा तीस व कमाल मर्यादा साठ ठरविण्यांत आली. सरकारनें ह्याप्रमाणें ही नवीन पद्धत अमलांत आणून निश्चित नियम केल्यामुळें बोर्डांना आपल्या सभासदांच्या संख्येच्या बाबतींत सरकारकडे तक्रार करण्यास जागाच राहिली नाहीं व आपली मुदत वाढवून घेण्याच्या कामीं बोर्डांना उपयोगी पडणारें त्यांचें एक साधन ह्या पद्धतीमुळें नाहींसें झालें !

अशाच प्रकारचे नियम नगरपालिकांच्या बाबतींतसुद्धा तयार करून अमलांत आणण्यासंबंधींचे विचार अण्णासाहेबांच्या मनांत होते. परंतु नगरपालिकांच्या बाबतींतला हा प्रश्न विशेष गुंतागुंतीचा आहे असें आढळून आल्यामुळें अण्णासाहेबांनीं तो बेत रहित केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घटना लोकसंख्येच्या प्रमाणांत निश्चित करण्यासाठीं अण्णासाहेबांनीं ही जी विशिष्ट पद्धत सुरू केली त्यामुळें ह्या संस्थांच्या घटनांच्या बाबतींत एक प्रकारचा सुसूत्रपणा आला. परंतु ही सुधारणा करण्यांत अण्णासाहेबांचा मुख्य उद्देश सरकारी कारभारावर पडणारा निष्कारण ताण नाहींसा व्हावा हा होता. सरकारी कारभारांत शक्य तितकी कमी गुंतागुंत असावी आणि सरकारी निर्णयाबाबत अनिश्चितता असूं नये हे चांगल्या राज्यकारभाराचे दोन मुख्य उद्देश ह्या सुधारणे-मुळें साधणार होते. ह्या प्रश्नासंबंधीं अण्णासाहेबांची भूमिका एखाद्या राज्यशासकासारखी ( Administrator ) होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकशाहीच्या राज्यकारभारांतील आपली जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडतां यावी म्हणून त्यांना केवळ आर्थिक साह्य देऊन किंवा त्यांच्या अंतर्गत कारभारांत सुधारणा करून भागणार नव्हतें. त्यांच्या कारभारावर देखरेख ठेवून त्यांना जरूर तें मार्गदर्शन करणें आवश्यक होतें. त्यासाठीं अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीज ह्या नांवाचे खास तीन अधिकारी नेमण्यांत आले. पूर्वीं ज्या वेळीं रेव्हिन्यु कमिशनरांच्या जागा अस्तित्वांत होत्या त्या वेळीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याची

जबाबदारी ह्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यांत आली होती. परंतु ह्या अधिकाऱ्यांचें मुख्य कार्य आपापल्या विभागांतील महसूलखात्याच्या कारभारावर देखरेख ठेवणें हें होतें. ह्याशिवाय ह्या अधिकाऱ्यांना सरकारकडून त्यांच्याकडे वेळोवेळीं सोपविण्यांत येणारीं महत्त्वाचीं कामें पार पाडावीं लागत. त्यामुळें स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याचें कार्य त्यांच्याकडून विशेष चौकसपणानें होत नसे. किंबहुना त्यांच्यावर टाकण्यांत आलेल्या जबाबदाऱ्यांमध्यें ह्या कार्याला दुय्यम स्थान होतें असें म्हणणें फारसें वावगें होणार नाहीं. सरकारनें त्यांच्या जागा कमी केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराबाबतच्या देखरेखीचा प्रश्न उपस्थित झाला. हा प्रश्न केवळ देखरेखीपुरताच मर्यादित नव्हता. नवीन राज्यव्यवस्थेंत स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य तें मार्गदर्शन मिळणेंही अत्यावश्यक होतें. ह्यासाठीं अण्णासाहेबांच्या प्रयत्नामुळेंच डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीजच्या जागा निर्माण करण्यांत आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीनें ह्या नेमणुकांना फार महत्त्व आहे. ह्या जागांवर नेमण्यांत येणारे अधिकारी रेव्हिन्यु कमिशनरांप्रमाणेंच बरीच वर्षें नोकरी झालेले व आपल्या कामाचा पूर्ण अनुभव असलेले आय्. सी. एस्. अगर आय्. ए. एस्. अधिकारी असतात. त्यांचें मुख्य काम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवून त्यांना जरूर तें मार्गदर्शन करणें हें आहे. ह्या संस्थांची दप्तरतपासणी करण्यासाठीं महिन्यांतून ठराविक दिवस त्यांना फिरतीवर जावें लागतें. थोडक्यांत खास स्थानिक स्वराज्य संस्थांसाठींच ह्या बड्या अधिकाऱ्यांची सरकारकडून नेमणूक झालेली आहे. अशा प्रकारें केवळ ह्या संस्थांसाठींच स्वतंत्र बडे अधिकारी नेमले गेल्याचें मुंबई राज्याच्या इतिहासांतील हें पहिलेंच उदाहरण आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीं डायरेक्टर्स ऑफ लोकल ॲथॉरिटीज ह्या अधिकाऱ्यांची योजना करूनच सरकार थांबलें नाहीं. राज्यांतील ग्रामपंचायतींची पद्धतशीर प्रगति व्हावी म्हणून सरकारकडून आणखी एक

योजना अमलांत आणण्यांत आली. आपल्या घटना-कायद्याच्या उद्देशांत 'गांवोगांवीं ग्रामपंचायती स्थापन करण्यांत याव्यात' असें एक उद्दिष्ट सांगितलेलें आहे. त्या उद्दिष्टानुसार व लोकशाही कारभाराच्या हिताच्या दृष्टीनें शक्य तेवढ्या ग्रामपंचायती स्थापन करणें जरूरीचें होतें. परंतु सुरुवातीस सर्वच खेड्यांतून पंचायती न स्थापतां ज्या ज्या गांवांतून ग्रामपंचायतीसाठीं लोकांचें पूर्ण सहकार्य मिळेल व तिचा कारभार यशस्वी होण्याची शक्यता दिसेल अशाच गांवांतून ग्रामपंचायती स्थापन करण्याचें अण्णासाहेबांनीं धोरण आंखलें. दोनशें पांचशें वस्तीच्या खेडेगांवांतून ग्रामपंचायतींना मिळणारें उत्पन्न अगदीं अपुरें असणार हें उघड होतें. म्हणून अशा खेड्यांसाठीं कांहीं खास व्यवस्था झाल्याशिवाय ग्रामपंचायती स्थापन करण्याची घाई करणें व्यावहारिकदृष्ट्या योग्य होणार नाहीं अशी त्यांची विचारसरणी होती. अण्णासाहेब आपली प्रत्येक योजना व्यावहारिक शक्यतेच्या निकपावर घासून पुसून पाहात असत. त्यांची स्वतःची ह्याप्रमाणें खात्री झाल्यानंतरच ते आपल्या योजना अमलांत आणीत. ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या प्रश्नाबाबत हीच दृष्टि ठेवून दोन हजारांवरील वस्तीच्या गांवासाठीं सक्तीनें ग्रामपंचायती स्थापन करण्याचें धोरण त्यांनीं जाहीर केलें. ह्या धोरणामुळें व ग्रामपंचायतींना देण्यांत आलेल्या जमीनमहसुलाच्या पंधरा टक्के उत्पन्नामुळें ग्रामपंचायतींची संख्या सारखी वाढूं लागली. परंतु ह्या नवीन स्थापन होणाऱ्या ग्रामपंचायतीचे सभासद ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत अगदींच अननुभवी व अनभिज्ञ असल्या-कारणानें ह्या ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यासाठीं सरकारकडून एक योजना आखण्यांत आली. ह्या योजनेप्रमाणें राज्यांतून अनेक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या जागा निर्माण करण्यांत येऊन त्या जागांवर महसूल-खात्यांतील अनुभवी अधिकारी नेमण्यांत आले. ह्या अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य जरी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यासंबंधीं असलें तरी त्याबरोबरच पंचायतींना सरकारकडून ग्रँटच्या रूपानें मिळणाऱ्या पैशाचा विनियोग योग्य रीतीनें होतो किंवा नाहीं हें पाहाण्याची जबाबदारीही

यांच्यावर टाकण्यांत आली आहे. ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या दैनंदिन कारभाराबाबत त्यांना ह्या अधिकाऱ्यांनीं सल्ला द्यावयाचा आहे. त्यासाठीं महिन्यांतून ठराविक दिवस ह्या अधिकाऱ्यांनीं जिल्ह्यांत फिरतीवर गेलेंच पाहिजे असें त्यांच्यावर बंधन घालण्यांत आलें आहे. ग्रामपंचायतींची पद्धतशीर वाढ होण्यास कांहीं कालावधि लागणें अपरिहार्य आहे. परंतु त्यांच्या बाल्यावस्थेंत सरकारनें नेमलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून त्यांना जरूर ती मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

अण्णासाहेबांनीं सुरू केलेल्या ह्या योजनेचें यश ह्या जागांवर ज्या प्रकारचे अधिकारी नेमण्यांत येतील त्यावर अवलंबून आहे. परंतु ग्रामोद्धारकार्याची आवड असणारे व सेवाभावी अधिकारी ह्या जागांवर नेमले गेल्यास ही योजना संपूर्ण यशस्वी होऊन ग्रामपंचायतींच्या इतिहासांतील एक नवीन पान उलटलें जाईल ह्यांत शंका नाहीं.

राज्यांतील सर्व नगरपालिकांच्या चीफ ऑफिसर व इंजिनिअरांसाठीं एक केडर ( सांखळी ) निर्माण करण्याची योजना अण्णासाहेबांपुढें होती. परंतु ती फारच गुंतागुंतीची असल्याकारणानें प्राथमिक चौकशीपलीकडे तिचा फारसा विचार झाला नाहीं.

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीं खास अधिकारी नेमण्याची प्रथा प्रथमतः अण्णासाहेबांनीं सुरू केली. डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीज व ग्रामपंचायत अधिकारी ह्यांच्याशिवाय घरपट्टीची आकारणी योग्य तत्त्वावर व निर्दोष व्हावी म्हणून नगरपालिकांना सरकारी अधिकाऱ्यांची मदत मिळण्यासंबंधीं सरकारनें केलेल्या व्यवस्थेचा निर्देश अगोदरच येऊन गेलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीनें ह्या महत्त्वाच्या सुधारणा होत्या. ह्या सर्व सुधारणांचा उद्देश ह्या संस्थांना जरूर तें मार्गदर्शन मिळावें व त्यांचा कारभार सुरळीतपणें चालून त्यामध्यें अधिक कार्यक्षमता निर्माण व्हावी हा होता. सर्व राज्यभर पसरलेल्या ह्या संस्थांच्या कारभारांत सुसूत्रपणा राखणें जरूरीचें होतें. ह्या संस्थांच्या कार्यासंबंधीं एक नवीन

दृष्टिकोन निर्माण होत होता. परकीय सत्तेच्या अमदानींत, राज्यकर्त्यांना ह्या संस्थांबद्दल कोणत्याही प्रकारची आस्था वाटत नव्हती. त्यांची ह्या संस्थांकडे पाहाण्याची वृत्ति उपेक्षितपणाची असून तिच्यामागें कोणत्याही प्रकारची तत्त्वप्रणाली नव्हती. परंतु स्वराज्यप्राप्तीनंतर ह्या संस्थांकडे पाहाण्याची वृत्ति बदलली. नव्या मनूंतील लोकशाहीच्या कारभारांत लोकहिताच्या कार्य करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था एवढेंच ह्या संस्थांचें स्वरूप न राहातां सरकारी यंत्रणेंतील त्या पूरक संस्था व्हाव्यात ह्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहाण्यांत येऊं लागलें. सत्तेचें विकेन्द्रीकरण करण्यासाठीं ह्या संस्थांचा फार उपयोग होणार असल्याकारणानें सरकारी कारभारांत ह्या संस्थांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें. भावी कालांतील ह्या संस्थांचें हें स्वरूप व महत्त्व लक्षांत घेऊन ह्या संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठीं अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत मोठमोठे अधिकारी नेमण्यांत आले. ह्या नेमणुका करून घेण्यांत अण्णासाहेबांनीं दाखविलेली दूरदृष्टि ह्या संस्थांकडे आलेल्या नवीन भूमिकेच्या व त्यांच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें फलदायी झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

प्रकरण एकविसावें

# आदर्श ग्रामराज्याचें स्वप्न

आपल्या राज्यघटनेंत सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचें तत्त्व स्वीकारण्यांत आलेलें आहे. लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्थेंतील तें एक मूलभूत तत्त्व असल्यामुळें त्याचा अंतर्भाव आपल्या राज्यघटनेंत व्हावा हें साहजिकच आहे. प्रत्यक्षांत सत्तेचें हें विकेंद्रीकरण टप्प्याटप्प्यानें व प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारा होणार असून ह्या कामीं स्थानिक स्वराज्य संस्थांचा सर्वांत अधिक उपयोग होणार असल्यामुळें ह्यापुढील कालांत ह्या संस्थांचें कार्यक्षेत्र व्यापक होत जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याची ही नवीन दिशा लक्षांत घेऊन अण्णासाहेबांच्या कारकीर्दीत ह्या संस्थांच्या बाबतींतील धोरणांत जरूर ते फेरबदल करण्यांत आले. परंतु हे फेरबदल करतांना सरकारनें आपलें लक्ष विशेषतः ग्रामपंचायतींवरच केन्द्रित केल्यामुळें ह्या प्रकरणांत ग्रामपंचायतींचाच प्रामुख्यानें उल्लेख आलेला आहे.

सरकारच्या नवीन धोरणानुसार १९४७ सालीं ग्रामपंचायत सुधारणा कायदा पास करण्यांत आला. सुधारणा कायदा तयार करण्यापूर्वी देशांतील

निरनिराळ्या राज्यांतील ग्रामपंचायतींच्या कायद्यांचा सूक्ष्म अभ्यास करण्यांत आला. पूर्वीच्या औंध संस्थानांतील ग्रामपंचायतींचा कायदा फार पुढारलेला होता. त्या वेळचे औंध संस्थानचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि ह्यांची अण्णासाहेबांनीं औंध संस्थानांतील ग्राम-पंचायतींचें कामकाज कसें चालतें तें प्रत्यक्ष पाहावें, अशी फार इच्छा होती. म्हणून त्यांच्या आमंत्रणावरून औंध संस्थानांतील ग्रामपंचायतींच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठीं मुंबईच्या लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूटचे ह्या क्षेत्रांतील तज्ज्ञ श्री. एस्. एस्. नाईक व श्री. सी. डी. बर्फीवाला ह्यांच्या समवेत अण्णासाहेबांनीं औंध संस्थानांतून तीन दिवसांचा खास दौरा काढला. ह्या दौऱ्याची आंखणी श्री. आप्पासाहेब पंत ह्यांनीं परिश्रमपूर्वक केली होती व तो पूर्णपणें यशस्वी व्हावा म्हणून त्यांनीं स्वतः ह्या दौऱ्यांत भाग घेतला. ठिकठिकाणच्या ग्रामपंचा-यतींच्या कारभाराची ह्या दौऱ्यांत प्रत्यक्ष पाहाणी केल्यानंतर औंध संस्थानचा ग्रामपंचायत कायदा अत्यंत प्रगतिपर असल्याबद्दल अण्णा-साहेबांची खात्री पटली. परंतु औंध संस्थाननें केलेल्या ह्या कायद्यांतील अनेक तरतुदी औंध संस्थानचें क्षेत्र मर्यादित होतें म्हणून यशस्वी होऊं शकल्या. मुंबईसारख्या विस्तीर्ण क्षेत्राच्या राज्यांत ह्या तरतुदींची अमल-बजावणी होऊं शकणार नाहीं असें अण्णासाहेबांना आढळून आलें. परंतु औंध संस्थानापुरतीच तरी ह्या कायद्यानें क्रान्तिकारक सुधारणा घडवून आणली होती ह्याबद्दल शंका नाहीं.

१९४७ सालचा ग्रामपंचायत सुधारणा कायदा घडवून आणतांना अण्णासाहेबांनीं ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबतच्या आपल्या दीर्घ अनुभवाला ह्याप्रमाणें सूक्ष्म अभ्यासाची जोड दिली. नवीन कायद्याचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणून सरकारच्या विकेन्द्रीकरणाच्या नवीन धोरणानुसार त्यांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ति वाढविणें हा होता. परंतु हा उद्देश कृतींत उतरवितांना ग्रामपंचायतींच्या सद्यःपरिस्थितींत त्यांना न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या

त्यांच्यावर टाकण्याची घाई सरकारनें केली नाहीं. शक्याशक्यतेच्या भूमिकेवरून ह्या सुधारणा कायद्यांतील प्रत्येक तरतुदीची सरकारकडून छाननी करण्यांत आली होती. ही काळजी घेण्यांत अण्णासाहेबांचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींच्या बाबतींत स्वीकारण्यांत आलेलें हें नवीन धोरण संपूर्ण यशस्वी व्हावें हा होता. १९४७ सालचा हा कायदा अत्यंत महत्त्वाचा असल्याकारणानें त्यांतील मुख्य मुख्य तरतुदींची फोड थोडक्यांत पुढें केली आहे.

ग्रामपंचायतींचा मुख्य प्रश्न आर्थिक स्वरूपाचा होता. तो सोडविण्यासाठीं सरकारनें त्यांना आपल्या जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं १५ टक्के उत्पन्न तोडून दिलें, त्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. ग्रामपंचायतींना हें उत्पन्न सदोदित मिळावें म्हणून तद्विषयक तरतूद १९४७ सालच्या ह्या सुधारणा कायद्यांत करण्यांत आली. परंतु ही तरतूद करतांना घरपट्टी शिवाय ग्रामपंचायत कायद्यामध्यें नमूद करण्यांत आलेल्या करांपैकीं आणखी एखादातरी कर ग्रामपंचायतींनीं बसविलाच पाहिजे अशा प्रकारचें बंधन सरकारनें ग्रामपंचायतींवर घातलें. आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं ग्रामपंचायतींनींही स्वतः कांहीं प्रयत्न केलेच पाहिजेत अशा प्रकारची विचारसरणी हें बंधन घालण्याच्या पाठीमागें असावी हें स्पष्ट दिसतें. जमीनमहसुलाच्या उत्पन्नाबरोबरच ह्या कायद्यान्वयें ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाच्या बाबींत वाढ करण्यांत आली. पूर्वी यात्राकर, यात्रेकरूंवरील कर, ऑक्ट्राय कर, विवाह व दत्तकविधानावरील कर, वगैरेसारखे कर बसविण्याची ग्रामपंचायतींना मुभा होतीच. ह्या करांत करमणुकीवरील कर आणि दुकानें व हॉटेल्स ह्यांवरील कर ह्यांची ह्या कायद्यान्वयें मुख्यतः भर घालण्यांत आली. ह्याचा अर्थ ग्रामपंचायतींनीं हे सर्व कर बसवावयाचे आहेत असा नाहीं. आपल्या आर्थिक गरजेप्रमाणें ह्या करांपैकीं कोणताही कर ग्रामपंचायतीला बसवितां येईल एवढाच ह्याचा अर्थ आहे. सुधारणा कायद्यांतील ह्या सर्व तरतुदींमुळें ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास चांगलीच मदत होईल ह्यांत शंका नाहीं.

विकेन्द्रीकरणाच्या दृष्टीनें १९४७ सालच्या सुधारणा कायद्यान्वयें ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रांत करण्यांत आलेली वाढ ही सर्वांत महत्त्वाची बाब होय. ग्रामपंचायतींवर कायद्यानें टाकण्यांत आलेल्या जबाबदाऱ्या दोन प्रकारच्या आहेत. कांहीं जबाबदाऱ्या सक्तीच्या स्वरूपाच्या आहेत व कांहीं ऐच्छिक स्वरूपाच्या आहेत. ग्रामपंचायत कायद्याच्या कलम २६ व २६ अ मध्यें ह्या जबाबदाऱ्या सविस्तरपणें सांगण्यांत आलेल्या आहेत. ग्रामसफाई, पाणीपुरवठा, वगैरे जबाबदाऱ्या सक्तीच्या स्वरूपाच्या असून त्या ग्रामपंचायत कायद्यामध्यें पूर्वीपासून आहेतच. कलम २६ अ, १९४७ च्या कायद्यान्वयें नवीन घालण्यांत आलें. ह्या कलमांत नमूद केलेल्या जबाबदाऱ्या ऐच्छिक स्वरूपाच्या असून ग्रामीण जीवनाशीं संलग्न असणाऱ्या प्रत्येक बाबीचा त्यांत समावेश करण्यांत आलेला आहे. ह्या कलमानुसार ग्रामपंचायतींना शेतीच्या बाबतींत, पीक वाढविण्या-संबंधीं अगर शेतींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं, प्रयोग करतां येतील, सहकारी तत्त्वावर शेती करण्याची जबाबदारी पत्करतां येईल, धान्याचीं कोठारें काढतां येतील अगर गुरांची निपज सुधारावी म्हणून प्रयत्न करतां येतील. खेड्यांतील सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीनें ग्रामपंचा-यती वाचनालयें काढूं शकतील, गांवांत क्रीडांगणें अगर उद्यानें तयार करूं शकतील किंवा गांवांतील घाटांचा ताबा आपणाकडे घेऊं शकतील. व्यापारउद्योगाच्या दृष्टीनें पंचायतींना ह्या कलमांतील तरतुदींप्रमाणें ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन अगर प्रोत्साहन देतां येईल आणि गांवांत नवीन मार्केट उघडून त्याची व्यवस्था आपणांकडे ठेवतां येईल. ह्या आणि अशा प्रकारच्या अनेक तरतुदी ह्या नवीन कलम २६ अ मध्यें आहेत. ज्या ज्या मार्गानें पंचायतींना आपल्या गांवाचें जीवन सुखी व समृद्ध करतां येईल अशा सर्व बाबींचा समावेश ह्या कलमांमध्यें झालेला आहे. परंतु ह्यांपैकीं कोणतीही जबाबदारी ग्रामपंचायतीनें आपल्या शिरावर घ्यावयाची म्हणजे त्यासाठीं पैशाचा प्रश्न आलाच आणि म्हणूनच ग्रामपंचायतींचें कार्यक्षेत्र विस्तृत करण्यापूर्वी सरकारला ग्रामपंचायतींचें

आर्थिक जीवन सुधारण्यासाठीं प्रथम व्यवस्था करावी लागली. ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्राची व्याप्ति आणि त्यांची आर्थिक सुधारणा हे दोन्ही प्रश्न ह्याप्रमाणें एकमेकांशीं संलग्न आहेत. सरकारनें ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिलेलें उत्पन्न ह्या जबाबदाऱ्यांच्या मानानें कदाचित् अपुरें असेल. परंतु जमीनमहसुलाच्या उत्पन्नाच्या रूपानें अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींतला मार्ग दाखवून दिलेला आहे. ग्रामपंचायतींनीं आपलें कर्तृत्व दाखविल्यास हा मार्ग रुंदावत जाणारा आहे एवढेंच येथें सुचवून ठेवावेंसें वाटतें.

ग्रामपंचायतींच्या अधिकारव्याप्तीच्या दृष्टीनें आणखी एकदोन बाबींचा उल्लेख करणें अवश्य आहे. त्यांपैकीं एक बाब म्हणजे ग्रामपंचायतींच्या सेक्रेटरीसंबंधीं ही होय. पूर्वीं ग्रामपंचायतींच्या सेक्रेटरीची नेमणूक सरकारकडून केली जात असे व त्याची सरकारी नोकरांत गणना होत असे. परंतु ह्याचा परिणाम असा झाला कीं त्याच्या कामांत कामचुकारपणा अगर दुसरे कांहीं दोष दिसून आल्यास पंचायतींना त्याबद्दल त्याला शासन करतां येत नसे. त्यामुळें कांहीं वेळां मोठी चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाल्याचीं उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून सरकारला ह्या बाबतींत सुधारणा करणें जरूरीचें वाटलें आणि त्याप्रमाणें १९४७ च्या ग्रामपंचायत सुधारणा कायद्यांत सेक्रेटरीसंबंधीं नवीन तरतूद करण्यांत आली. ह्या नवीन तरतुदीप्रमाणें सेक्रेटरीची नेमणूक ह्यापुढें ग्रामपंचायतीकडून व्हावयाची असून त्याच्या नोकरीबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीला सुपूर्द करण्यांत आलेले आहेत. ह्या सुधारणेमुळें ग्रामपंचायतींचें सेक्रेटरींच्या बाबतचें गाऱ्हाणें नाहींसें झालें. तत्त्वाच्या दृष्टीनें ग्रामपंचायतीचा नोकर ग्रामपंचायतीलाच जबाबदार असावा हें योग्यच झालें. शिवाय ह्या सुधारणेमुळें ग्रामपंचायती ह्या आपल्या अधिकाराच्या दृष्टीनें स्वायत्त–स्वतंत्र संस्था होत, ह्या तत्त्वालाही पर्यायानें पाठिंबा मिळाला.

१९४७ च्या सुधारणा कायद्यानें ग्रामपंचायतींच्या अधिकारव्याप्तीच्या दृष्टीनें केलेली आणखी एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे ग्रामपंचायतींच्या

न्यायपंचायतीचे अधिकार ह्या कायद्यान्वयें वाढविण्यांत आले ही होय. मुंबई राज्याच्या ग्रामपंचायत कायद्यांत न्यायपंचायतीसंबंधीं असलेली तरतूद महत्त्वाची आहे. खेडेगांवांत लहानसहान कारणावरून भांडणें उपस्थित होतात; व शेवटीं तीं विकोपास जाऊन त्याचें पर्यवसान कोर्टकचेऱ्या करण्यांत होतें. अशीं लहानसहान भांडणें अगर तक्रारी निकालांत काढण्याचा अधिकार ग्रामपंचायत कायद्यान्वयें न्यायपंचायतींना देण्यांत आलेला आहे. भांडणतंटे कोर्टदरबारीं गेल्यास कालाचा अपव्यय होतोच, परंतु नाहक खर्चही होतो. पंचायतीमार्फत न्यायदान करण्याची पद्धत प्राचीन काळापासून आपल्या देशांत अस्तित्वांत होती. ह्या पद्धतीसंबंधींची तरतूद जरी पूर्वी ग्रामपंचायत कायद्यामध्यें असली तरी ह्यासंबंधीं न्यायपंचायतींना – ज्यांना पूर्वी व्हिलेज बेंच म्हणत असत – देण्यांत आलेले अधिकार फार मर्यादित स्वरूपाचे होते. नवीन सुधारणा कायद्यान्वयें ह्या अधिकारांत बरीच भर घालण्यांत आली आणि न्याय पंचायतींचा शिक्षा करण्याचा अधिकारही वाढविण्यांत आला. न्याय पंचायतींचे वाढविण्यांत आलेले अधिकार ग्रामपंचायत कायद्याच्या कलम ४१ मध्यें सविस्तर देण्यांत आलेले आहेत.

न्यायदानाचें कार्य अत्यंत बिकट आहे. तें खेड्यांतील जनतेच्या प्रतिनिधींमार्फत व्हावयाचें असून नवीन अस्तित्वांत येणाऱ्या पंचायतींच्या न्यायपंचायतींना ह्या कामाचा अनुभव असण्याची शक्यता जवळ जवळ मुळींच नसल्यामुळें कायद्यांत सांगितलेले अधिकार न्यायपंचायतींना हप्त्याहप्त्यानें देण्यांत यावयाचे आहेत. न्यायपंचायतीपुढें असलेल्या कामांत वकील देण्यास कायद्यानें बंदी आहे, हें ह्या कायद्याचें वैशिष्ट्य आहे. न्यायदानाचें कार्य बिकट व जबाबदारीचें असल्याकारणानें त्याची वाढ आस्तेकदम स्वरूपाची राहाणार आहे. परंतु न्यायपंचायत ही सरकारच्या विकेन्द्रीकरणाच्या धोरणांतील एक महत्त्वाचा भाग आहे ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे.

ह्या सुधारणा कायद्यान्वयेंच दोन हजारांपेक्षां अधिक लोकवस्ती असलेल्या गांवांत सक्तीनें ग्रामपंचायतींची स्थापना करण्यांत आली.

१९४७ सालच्या ह्या ग्रामपंचायत सुधारणा कायद्याचें स्वरूप ह्याप्रमाणें अगदीं साधें असलें तरी ह्या कायद्यान्वयें प्राप्त झालेल्या अधिकाराच्या बळावर गांवाच्या उन्नतीचें कोणतेंही कार्य ग्रामपंचायत आपल्या हातीं घेऊं शकेल. ग्रामपंचायतीच्या दृष्टीनें ज्या महत्त्वाच्या बाबींचा विचार व्हावयास पाहिजे होता त्या सर्व बाबी हा सुधारणा कायदा तयार करतांना विचारांत घेण्यांत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थैर्याच्या प्रश्नाचा ह्या कायद्यामध्यें प्रामुख्यानें विचार झालेला आहे. ग्रामपंचायतींच्या अधिकारक्षेत्रांत वाढ झाल्याकारणानें ग्रामीण जीवन समृद्ध करण्याची संधि ह्या कायद्यान्वयें ग्रामपंचायतींना प्राप्त झालेली आहे. ह्या कायद्याचा हाच मुख्य उद्देश होता. ह्या कायद्याचा सूक्ष्म अभ्यास केल्यास सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचें बीज त्यांत सांठविलेलें आहे असें आढळून येईल. कायद्यांत दिलेल्या अधिकारांचा उपयोग करून कोणतीही ग्रामपंचायत नमुनेदार कारभार करूं शकेल. ह्या कायद्याच्या यशावरच विकेन्द्रीकरणाच्या धोरणांतील पुढील टप्पा गांठला:जाणार आहे.

न्यायपंचायतीचे अधिकार ह्या कायद्यान्वयें वाढविण्यांत आले ही होय. मुंबई राज्याच्या ग्रामपंचायत कायद्यांत न्यायपंचायतीसंबंधीं असलेली तरतूद महत्त्वाची आहे. खेडेगांवांत लहानसहान कारणावरून भांडणें उपस्थित होतात; व शेवटीं तीं विकोपास जाऊन त्याचें पर्यवसान कोर्टकचेऱ्या करण्यांत होतें. अशीं लहानसहान भांडणें अगर तक्रारी निकालांत काढण्याचा अधिकार ग्रामपंचायत कायद्यान्वयें न्यायपंचायतींना देण्यांत आलेला आहे. भांडणतंटे कोर्टदरबारीं गेल्यास कालाचा अपव्यय होतोच, परंतु नाहक खर्चही होतो. पंचायतीमार्फत न्यायदान करण्याची पद्धत प्राचीन काळापासून आपल्या देशांत अस्तित्वांत होती. ह्या पद्धतीसंबंधींची तरतूद जरी पूर्वी ग्रामपंचायत कायद्यामध्यें असली तरी ह्यासंबंधीं न्यायपंचायतींना – ज्यांना पूर्वी व्हिलेज बेंच म्हणत असत – देण्यांत आलेले अधिकार फार मर्यादित स्वरूपाचे होते. नवीन सुधारणा कायद्यान्वयें ह्या अधिकारांत बरीच भर घालण्यांत आली आणि न्याय पंचायतींचा शिक्षा करण्याचा अधिकारही वाढविण्यांत आला. न्याय पंचायतींचे वाढविण्यांत आलेले अधिकार ग्रामपंचायत कायद्याच्या कलम ४१ मध्यें सविस्तर देण्यांत आलेले आहेत.

न्यायदानाचें कार्य अत्यंत बिकट आहे. तें खेड्यांतील जनतेच्या प्रतिनिधींमार्फत व्हावयाचें असून नवीन अस्तित्वांत येणाऱ्या पंचायतींच्या न्यायपंचायतींना ह्या कामाचा अनुभव असण्याची शक्यता जवळ जवळ मुळींच नसल्यामुळें कायद्यांत सांगितलेले अधिकार न्यायपंचायतींना हप्त्याहप्त्यानें देण्यांत यावयाचे आहेत. न्यायपंचायतीपुढें असलेल्या कामांत वकील देण्यास कायद्यानें बंदी आहे, हें ह्या कायद्याचें वैशिष्ट्य आहे. न्यायदानाचें कार्य बिकट व जबाबदारीचें असल्याकारणानें त्याची वाढ आस्तेकदम स्वरूपाची राहाणार आहे. परंतु न्यायपंचायत ही सरकारच्या विकेन्द्रीकरणाच्या धोरणांतील एक महत्त्वाचा भाग आहे ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे.

ह्या सुधारणा कायद्यान्वयेंच दोन हजारांपेक्षां अधिक लोकवस्ती असलेल्या गांवांत सक्तीनें ग्रामपंचायतींची स्थापना करण्यांत आली.

१९४७ सालच्या ह्या ग्रामपंचायत सुधारणा कायद्याचें स्वरूप ह्याप्रमाणें अगदीं साधें असलें तरी ह्या कायद्यान्वयें प्राप्त झालेल्या अधिकाराच्या बळावर गांवाच्या उन्नतीचें कोणतेंही कार्य ग्रामपंचायत आपल्या हातीं घेऊं शकेल. ग्रामपंचायतीच्या दृष्टीनें ज्या महत्त्वाच्या बाबींचा विचार व्हावयास पाहिजे होता त्या सर्व बाबी हा सुधारणा कायदा तयार करतांना विचारांत घेण्यांत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थैर्याच्या प्रश्नाचा ह्या कायद्यामध्यें प्रामुख्यानें विचार झालेला आहे. ग्रामपंचायतींच्या अधिकारक्षेत्रांत वाढ झाल्याकारणानें ग्रामीण जीवन समृद्ध करण्याची संधि ह्या कायद्यान्वयें ग्रामपंचायतींना प्राप्त झालेली आहे. ह्या कायद्याचा हाच मुख्य उद्देश होता. ह्या कायद्याचा सूक्ष्म अभ्यास केल्यास सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचें बीज त्यांत सांठविलेलें आहे असें आढळून येईल. कायद्यांत दिलेल्या अधिकारांचा उपयोग करून कोणतीही ग्रामपंचायत नमुनेदार कारभार करूं शकेल. ह्या कायद्याच्या यशावरच विकेन्द्रीकरणाच्या धोरणांतील पुढील टप्पा गांठला:जाणार आहे.

प्रकरण बाविसावें

# नागरी विकासाचीं प्रगतिपर पावलें

ग्रामपंचायत कायद्यांत महत्त्वाच्या सुधारणा करण्यासाठीं १९४७ सालीं जो ग्रामपंचायत सुधारणा कायदा पास करण्यांत आला त्याची सविस्तर चर्चा मागील प्रकरणांतून आलेलीच आहे. जिल्हा लोकल बोर्डांच्या कायद्यांतही जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं जिल्हा लोकल बोर्डांना देण्यांत आलेल्या १५ टक्के उत्पन्नाच्या ग्रँटला कायद्याचें स्वरूप देण्यासाठीं आणि लोकल फंड सेस सक्तीनें तीन आणे करण्यासाठीं जे दुरुस्ती कायदे करावे लागले त्यांचा उल्लेखही पूर्वी आलेलाच आहे. ह्या कायद्याशिवाय बृहन्मुंबईचा कायदा, बी. ई. एस्. टी. संबंधींचा कायदा आणि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉरपोरेशन्स ॲक्ट हे स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधीं अण्णासाहेबांच्या कारकीर्दीत महत्त्वाचे कायदे पास झाले. पैकीं पहिले दोन कायदे मुंबई महानगरपालिकेसंबंधीं असून तिसरा कायदा मुंबई राज्यांत कोणत्याही मोठ्या शहरासाठीं महानगरपालिकेची स्थापना करावयाची असल्यास तें शक्य व्हावें इतक्या सर्वसाधारण स्वरूपाचा जरी असला तरी तो कायदा मुख्यत्वेंकरून पुणें व अहमदाबाद ह्या शहरांकरितां महानगरपालिका

स्थापन करण्यासाठींच पास करण्यांत आला. ह्या कायद्याबरोबरच रेंट ॲक्ट, लँड रिक्विझिशन ॲक्ट, टाऊन प्लॅनिंग अमेंडमेंट ॲक्ट हे महत्त्वाचे कायदे झाले. ह्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दैनंदिन कारभारांत उपस्थित होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीं दरवर्षी कांहीं ना कांहीं दुरुस्ती कायदे करावे लागतच असत. परंतु तात्त्विकदृष्ट्या त्यांचें फारसें महत्त्व नसल्यामुळें विस्तारभयास्तव त्यांचा ह्या चरित्रांत विचार करण्यांत आलेला नाहीं.

ह्या प्रकरणांत विचार करावयाच्या कायद्यांत बृहन्मुंबईचा कायदा सर्वांत महत्त्वाचा आहे. ह्या कायद्याचें संपूर्ण नांव धी बॉम्बे म्युनिसिपल (एक्स्टेन्शन ऑफ लिमिट्स) ॲक्ट असून तो १९५० सालीं पास करण्यांत आला. ह्या कायद्याचा मसुदा ज्या वेळीं बिलाच्या स्वरूपांत प्रसिद्ध झाला त्या वेळीं ह्या बिलासंबंधीं उलटसुलट अशी बरीच चर्चा झाली. मुंबई शहराच्या मर्यादा वाढविण्यांत कांहीं विशिष्ट हेतु नसतील ना अशा प्रकारची शंकाही कांहीं ठिकाणांहून प्रदर्शित करण्यांत आली. म्हणून ह्या कायद्याचा विचार करण्यापूर्वीं त्याची पार्श्वभूमि लक्षांत घेणें जरूरीचें आहे.

बृहन्मुंबईची कल्पना ही कांहीं नव्यानें निर्माण झालेली कल्पना नाहीं. बृहन्मुंबईचा कायदा अमलांत येण्यापूर्वीं ती अनेक वर्षें अस्तित्वांत होती. १९०७ सालापासून ह्या कल्पनेचा विचार सुरू होता. परंतु ह्या कल्पनेला प्रत्यक्ष आकार येण्यास १९३७ च्या पहिल्या खेर मंत्रिमंडळाच्या वेळीं सुरुवात झाली. मुंबई शहराची वाढ सारखी होत राहिल्यामुळें मुंबई शहरांतील पोलीसखात्याचें काम अधिकाधिक कठीण होऊं लागलें. मुंबई शहरांत आणि उपनगरांतील भागांत गुन्ह्यांची संख्या वाढूं लागली. मुंबई शहरांतून हद्दपार केलेले गुन्हेगार उपनगरांचा आश्रय घेत आणि तेथून आपले 'उद्योग' चालू ठेवीत. मुंबई शहर व उपनगर येथील पोलीस व्यवस्था निरनिराळी असल्याकारणानें त्यांच्या गुन्ह्यांचा तपास लावणें व गुन्ह्यांचा बंदोबस्त करणें जास्त जास्त बिकट होऊं लागलें.

अशा परिस्थितींत उपनगर येथील पोलीसखात्याचा कारभार मुंबई शहर पोलीसखात्याच्या नियंत्रणाखालीं आणणें सरकारला भाग पडलें. ह्याप्रमाणें मुंबई शहर पोलीसखात्याच्या मर्यादा वाढविण्यांत आल्यानंतर न्यायदानखात्याच्या मर्यादाही वाढविणें सरकारला क्रमप्राप्तच होतें. ह्यासंबंधींचा कायदा १९४५ सालीं करण्यांत येऊन ह्या कायद्यान्वयें सध्याच्या बृहन्मुंबईंत समाविष्ट करण्यांत आलेला उपनगरांतील जवळ जवळ सर्वच भाग मुंबई शहरांतील पोलीस व न्यायदानखात्याच्या अधिकारकक्षेंत आणण्यांत आला. अशा प्रकारें १९४५ सालींच पोलीस आणि न्यायदानखात्यापुरती बृहन्मुंबईची कल्पना अमलांत आली होती. राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत येणारे अडथळे लक्षांत घेऊनच ही योजना अमलांत आणण्यांत आली होती. ही योजना अमलांत आणण्याच्या वेळीं मुंबईच्या महानगरपालिकेच्या मर्यादा वाढविण्याचा प्रश्नही विचारांत घेतला गेला होता. परंतु हा प्रश्न बऱ्याच गुंतागुंतीचा असल्यामुळें आणि लवकरच प्रांतांत प्रातिनिधिक सरकार अधिकारपदावर येण्याची शक्यता असल्या-कारणानें त्या वेळच्या सरकारनें हा प्रश्न तात्पुरता तहकूब ठेवला.

१९४५ सालच्या कायद्यान्वयें मुंबई उपनगर जिल्ह्यांतील जो भाग बृहन्मुंबईमध्यें समाविष्ट करण्यांत आला होता त्या भागापर्यंत मुंबई नगरपालिकेच्या मर्यादा वाढविण्याचा प्रश्न १९४६ सालीं अधिकारपदावर आलेल्या खेर मंत्रिमंडळाला मुंबई शहरांतील व उपनगरांतील सारख्या वाढत्या लोकसंख्येमुळें विचारासाठीं लवकरच हातीं घेणें भाग पडलें. युद्धकाळांत मुंबई शहराच्या लोकसंख्येमध्यें अतोनात वाढ झाली. १९४१ सालीं मुंबई शहराची लोकसंख्या १४,८९,००० होती ती युद्धकालांत २८,००,००० वर गेली! मुंबई शहराच्या अवघ्या सव्वीस चौरस मैल क्षेत्रामध्यें ह्या वाढत्या लोकसंख्येचा समावेश होणें अवघड होतें. युद्धकालांत मुंबई शहरांतील घरांच्या संख्येंत जवळ जवळ मुळींच भर न पडल्यामुळें मुंबई शहरांत नव्यानें आलेल्या ह्या लोकांच्या घरादारांचा

प्रश्न मोठा बिकट होऊन बसला. फार मोठ्या प्रमाणांत शहराच्या लोकसंख्येंत वाढ झाल्याकारणानें मुंबई महानगरपालिकेला आपल्या नागरिकांना नेहमींच्या सुखसोयी उपलब्ध करून देणें मोठें कठीण होऊन बसलें. मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावरील ताण ह्याप्रमाणें सारखा वाढत राहिला. ह्यांतून कांहींतरी मार्ग काढणें सरकारला प्राप्त होतें. उलटपक्षीं मुंबई शहरामध्यें नव्यानें आलेल्या ज्या लोकांची घरादाराच्या दृष्टीनें सोय होऊं शकली नाहीं ते लोक हळूहळू मुंबई उपनगराकडे वळूं लागले. ह्या भागांत मुख्यतः वांद्रा, पार्लें, अंधेरी, कुर्ला, घाटकोपर आणि जुहू ह्या नगरपालिका होत्या. शिवाय त्यांत कांहीं खेड्यांचाही अंतर्भाव होत होता. उपनगरांतील ह्या नगरपालिकांकडून नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या सुखसोयी अगदीं मर्यादित स्वरूपाच्या असल्याकारणानें, मुंबई शहराकडून उपनगराकडे हा जो वाढत्या लोकसंख्येचा ओघ वळला त्यामुळें त्यांचेही प्रश्न विकट होऊन बसले. पाणीपुरवठा, ड्रेनेज, शहर-सफाई, रस्ते, औषधोपचार, ह्यांसारख्या नागरिकांच्या स्वास्थ्याच्या आणि आरोग्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या सोयी वाढत्या लोकसंख्येच्या मानानें उपनगर भागांत अगदीं अपुऱ्या पडूं लागल्या. त्यामुळें उप-नगराच्या आणि त्याबरोबरच मुंबई शहराच्या आरोग्यास धक्का पोचण्याचा संभव निर्माण झाला. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणांत नवीन सुखसोयी उपलब्ध करण्याचें सामर्थ्य त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळें ह्या नगरपालिकांत नव्हतें. थोडक्यांत उपनगरांतील आणि त्याचप्रमाणें मुंबई शहरांतील हे नवीन व बिकट प्रश्न मुंबई शहरांतील वाढत्या लोकसंख्येमुळेंच निर्माण झालेले असून ते एकमेकांशीं इतके निगडित व गुंतलेले होते कीं त्यांचा पृथक्‌पणें विचार करणें अशक्यच होतें. हे प्रश्न सोडविण्यासाठीं हा सर्व विभाग एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकाराखालीं आणणें जरूर होतें. उपनगरांतील ह्या भागासाठीं लंडन शहरांतील कौंटी कौन्सिलच्या धर्तीवर एखादी मध्यवर्ती स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करतां येणें शक्य होईल किंवा काय ह्याचाही विचार करण्यांत आला.

परंतु उपनगरांतील ह्या भागांपैकीं बऱ्याच भागाची वाढ व्हावयाची असल्याकारणानें आर्थिकदृष्ट्या हा मार्ग अपुरा वाटला. ह्या भागाची वाढ करण्यासाठीं लागणारा पैसा व इतर साधनें उपलब्ध करणें ह्या संस्थेच्या आवाक्याबाहेरचें झालें असतें. शिवाय ही सर्व व्यवस्था होईपर्यंत मुंबई शहरांतील प्रश्न खोळंबून राहूं शकले नसते. मुंबई शहरांत आणि उपनगरांत, नागरिकांच्या सुखसोयींसंबंधीं निर्माण झालेल्या ह्या नवीन प्रश्नांच्या स्वरूपांत जुळ्या भावंडांच्या चेहेऱ्यांमध्यें कैक वेळां जें असाधारण साम्य आढळून येतें तशाच प्रकारचें साम्य होतें. त्यांचा जन्मही एकाच उदरांतून झाला होता. एकमेकांशीं इतके निगडित असलेले हे प्रश्न सोडविण्याचें सामर्थ्य मुंबई महानगरपालिके-सारख्या सर्वच बाजूंनीं संपन्न असलेल्या नगरपालिकेंत होतें. सर्वसाधारण राज्यकारभार ( General Administration ), पोलीसखातें, न्यायदानखातें ह्यांसारख्या महत्त्वाच्या बाबतींत १९४५ सालींच 'बृहन्मुंबई, कायद्यानें अस्तित्वांत आली होती. मुंबई शहर व उपनगर जिल्हा ह्यासाठीं पूर्वींपासून कलेक्टरही एकच असे. अशा परिस्थितींत नागरिकांच्या हिताच्या आणि सुखसोयीच्या दृष्टीनें मुंबई नगरपालिकेच्या मर्यादा बृहन्मुंबईपर्यंत वाढविण्याचा निर्णय सरकारनें केला. अशा प्रकारचा निर्णय करणें प्राप्त परिस्थितींत सरकारला भागच पडलें. ह्या निर्णयानुसार धी बॉम्बे म्युनिसिपल ( एक्सटेन्शन ऑफ लिमिटस् ) ॲक्ट हा महत्त्वाचा कायदा १९५० सालीं पास करण्यांत आला आणि तो ता. १ एप्रिल ५० पासून अमलांत आणला गेला.

ह्या कायद्यान्वयें ह्या कायद्याच्या कक्षेंत येणाऱ्या उपनगरभागांतील वांद्रा, पार्ले, अंधेरी, कुर्ला, घाटकोपर व जुहू ह्या नगरपालिका आणि वर्सोवा, वर्सोवाबीच, भांडूप व चेंबूर ह्या ग्रामपंचायती नाहींशा करण्यांत आल्या आणि तेथील नागरिकांना त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें मुंबई महानगरपालिकेवर प्रतिनिधित्व देण्यांत आलें. मुंबई शहरांत साधारणतः १४००० लोकवस्तीस एक प्रतिनिधि आहे. परंतु उपनगरभागांतील

नागरिकांना प्रतिनिधित्व देतांना हें प्रमाण थोडेंसें सैल करण्यांत आलें. मुंबई महानगरपालिकेंत आलेल्या ह्या नवीन भागाला एकंदर अठरा प्रतिनिधि मिळाले आणि लोकसंख्येशीं त्यांचें प्रमाण सरासरी ११,४०० च्या लोकवस्तीस एक प्रतिनिधि असें पडलें. ह्या कायद्यान्वयें मुंबई महानगरपालिकेच्या सभासदांची संख्या ११७ वरून १३५ वर गेली.

ह्या कायद्यानें अनेक प्रकारच्या नवीन प्रथा ( Innovations ) सुरू केल्याचें आपणांस आढळून येईल. वास्तविक मुंबई महानगरपालिकेच्या कक्षेंतील भागांत नगरपालिकेच्या करांचा बोजा सर्वत्र सारखा असावयास पाहिजे. परंतु मुंबई नगरपालिकेंत नव्यानें आलेला हा भाग कांहींसा मागासलेला असल्यामुळें ह्या भागास मुंबई नगरपालिकेचे कर लागू न करतां त्या भागांतील पूर्वींचे ऑक्ट्रायशिवाय इतर कर तसेच पहिल्या वर्षापुरते चालू ठेवण्यांत आले. ऑक्ट्राय ऐवजीं मात्र टाऊन ड्यूटी तावडतोब बसविण्यांत आली. घरबांधणी वगैरे संबंधीं ह्या भागांत पूर्वीं-पासून जारी असलेले नियम कांहीं बाबतींत मुंबई नगरपालिकेच्या नियमा-पेक्षांही अधिक चांगले असल्याकारणानें ते तसेच ठेवण्यांत आले. मुंबई शहर आणि उपनगरांतील भाग ह्यांच्यासाठीं निरनिराळीं अंदाजपत्रकें ( Budget ) करण्याची आणि त्यांच्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे निर-निराळे हिशेब ठेवण्याची मुभा मुंबई महानगरपालिकेला देण्यांत आली. नवीन भागासाठीं एक डेप्युटी म्युनिसिपल कमिशनरची नेमणूक करण्याचा अधिकारही मुंबई नगरपालिकेला देण्यांत आला आणि ह्या भागासाठीं पाणीपुरवठा आणि ड्रेनेजच्या नवीन योजनांसाठीं जवळजवळ एक कोटीपर्यंत मुंबई महानगरपालिकेला मदत देण्याचें सरकारनें अभिवचन दिलें. उपनगर भागासाठीं ही जी निराळी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली ती संक्रमणकालापुरती असून उपनगरांत अस्तित्वांत आलेली नवीन व्यवस्था तेथील नागरिकांना डोईजड वाटूं नये ह्या दृष्टीनेंच करण्यांत आली. हा कायदा अमलांत आल्यानंतर बृहन्मुंबईची कल्पना संपूर्णतया कृतींत उतरली गेली आणि म्हणूनच ह्या कायद्याचें महत्त्व फार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या बाबतींत अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत अनेक दुरुस्ती कायदे पास झाले. ह्या कायद्यांपैकीं पूर्वीच्या बी. ई. एस्. टी. कंपनीचा कारभार मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यांत देणें कायदेशीर रीत्या शक्य व्हावें म्हणून बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टमध्यें १९४७ सालीं एका दुरुस्ती कायद्यान्वयें बदल करण्यांत आला. हा दुरुस्ती कायदा बराच महत्त्वाचा असल्यामुळें त्याचा येथें थोडक्यांत विचार करण्यांत आला आहे.

बॉम्बे इलेट्रिक सप्लाय ॲंड ट्रॅमवेज कंपनीला शहरांतील वीजपुरवठा आणि ट्रॅम सर्व्हिस सुरू करण्यासाठीं सरकारकडून १९०५ सालीं देण्यांत आलेल्या लायसेन्सची मुदत १९४७ सालीं संपत होती. त्याच सालीं ह्या बाबतींत कंपनीचा मुंबई नगरपालिकेबरोबर झालेला करारही ( Deed of Concession ) संपणार होता. लायसेन्समधल्या अटीप्रमाणें १९४७ सालानंतर कंपनीची सर्व व्यवस्था कांहीं अटींवर आपल्या ताब्यांत घेण्याचा पहिला अधिकार मुंबई नगरपालिकेला प्राप्त झाला होता. मुंबई नगरपालिकेनें ही जबाबदारी स्वीकारण्याचें नाकारल्यास त्यानंतरचा हक्क सरकारला प्राप्त होणार होता आणि सरकारनेंही मुंबई नगरपालिके-प्रमाणें जबाबदारी स्वीकारण्याची तयारी न दाखविल्यास मूळची व्यवस्था त्यानंतर कंपनीकडे राहाणार होती. परंतु १९४७ सालीं कंपनीच्या लायसेन्सची आणि मुंबई नगरपालिकेबरोबर झालेल्या कराराची मुदत संपतांच ही जबाबदारी स्वीकारण्याचा नगरपालिकेनें निर्णय केला. परंतु हा निर्णय अमलांत आणण्यासाठीं आवश्यक असलेले अधिकार नगरपालिकेकडे नसल्यामुळें १९४७ सालीं बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टमध्यें जरूर त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या आणि त्यानंतर बी. ई. एस्. टी. कंपनीचा कारभार मुंबई नगरपालिके-कडे आला. हा दुरुस्ती कायदा बराच मोठा असून त्यांतील पुष्कळशीं कलमें नगरपालिकेकडे हा कारभार आल्यानंतर त्याबाबत काय व्यवस्था करावी ह्यासंबंधीं असल्यामुळें ह्या कलमाविषयीं खोल चर्चा करण्याची

जरूरी नाहीं. मात्र ह्या कायद्याबाबत एक दोन महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख करणें जरूर आहे. ह्या कायद्यान्वयें हा कारभार पाहाण्यासाठीं नऊ सभासदांची एक कमिटी अस्तित्वांत आली. नगरपालिकेच्या स्टँडिंग कमिटीचा चेअरमन ह्या समितीचा चेअरमन असतो. समितीचे बाकीचे सभासद नगरपालिकेचे सभासद असलेच पाहिजेत असें कायद्यानें बंधन घालण्यांत आलेलें नाहीं. मुंबई नगरपालिकेकडे हा कारभार आल्यानंतर त्याला बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंग असें संबोधण्यांत येऊं लागलें. अंडरटेकिंगचा दैनंदिन कारभार पाहाण्यासाठीं जनरल मॅनेजर ह्या नांवाच्या मोठ्या अधिकाऱ्याची जागा निर्माण करण्यांत आली. परंतु अंडरटेकिंगच्या सर्व कारभारावर हुकमत चालविण्याचा अधिकार म्युनिसिपल कमिशनरला देण्यांत आला. बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंग ही व्यापारी तत्त्वावर चालणारी संस्था असल्याकारणानें तिचें स्वतंत्र बजेट करण्यांत आलें. पूर्वीं डीड ऑफ कन्सेशनप्रमाणें मुंबई नगरपालिकेला ट्रॅम्वेच्या रस्त्याबाबत कंपनीकडून दरसाल भाडें मिळत असे. परंतु कंपनीची व्यवस्था नगरपालिकेकडे आल्यामुळें नगरपालिकेला मिळाणारें हें भाडें साहजिकच बंद होणार होतें. ह्याप्रमाणें म्युनिसिपालिटीचें नुकसान होऊं नये म्हणून अंडरटेकिंगच्या बजेटमधून पुढील दहा वर्षेंपर्यंत दरसाल नगरपालिकेला दहा लाख रुपये मिळावेत अशी व्यवस्था करण्यांत आली. त्याचप्रमाणें हा सर्व खर्च भागून जी शिल्लक राहील ती रेव्हिन्यू रिझर्व्ह फंड, बेटरमेंट फंड व अंडरटेकिंगच्या नोकरींत असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि नोकरांच्या सुखसोयीसाठीं निर्माण करण्यांत आलेला फंड ह्यांत विशिष्ट प्रमाणांत वांटून देण्यासंबंधींची तरतूद करण्यांत आली. ह्या महत्त्वाच्या कायद्याचें स्वरूप थोडक्यांत असें होतें.

बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंगसंबंधींच्या ह्या कायद्याचें एका दृष्टीनें फार महत्त्व होतें. मुंबई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत ह्या कायद्यानें एक नवीन पायंडा पाडला. आपल्या हद्दींतील ट्रॅम अगर बस वाहातुकीची व्यवस्था एखाद्या नगरपालिकेनें आपल्याकडे घेतल्याचें

मुंबई महानगरपालिकेच्या बाबतींत अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत अनेक दुरुस्ती कायदे पास झाले. ह्या कायद्यांपैकीं पूर्वीच्या बी. ई. एस्. टी. कंपनीचा कारभार मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यांत देणें कायदेशीर रीत्या शक्य व्हावें म्हणून बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टमध्यें १९४७ सालीं एका दुरुस्ती कायद्यान्वयें बदल करण्यांत आला. हा दुरुस्ती कायदा बराच महत्त्वाचा असल्यामुळें त्याचा येथें थोडक्यांत विचार करण्यांत आला आहे.

बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय ॲंड ट्रॅमवेज कंपनीला शहरांतील वीजपुरवठा आणि ट्रॅम सर्व्हिस सुरू करण्यासाठीं सरकारकडून १९०५ सालीं देण्यांत आलेल्या लायसेन्सची मुदत १९४७ सालीं संपत होती. त्याच सालीं ह्या बाबतींत कंपनीचा मुंबई नगरपालिकेबरोबर झालेला करारही ( Deed of Concession ) संपणार होता. लायसेन्समधल्या अटीप्रमाणें १९४७ सालानंतर कंपनीची सर्व व्यवस्था कांहीं अटींवर आपल्या ताब्यांत घेण्याचा पहिला अधिकार मुंबई नगरपालिकेला प्राप्त झाला होता. मुंबई नगरपालिकेनें ही जबाबदारी स्वीकारण्याचें नाकारल्यास त्यानंतरचा हक्क सरकारला प्राप्त होणार होता आणि सरकारनेंही मुंबई नगरपालिके-प्रमाणें जबाबदारी स्वीकारण्याची तयारी न दाखविल्यास मूळची व्यवस्था त्यानंतर कंपनीकडे राहाणार होती. परंतु १९४७ सालीं कंपनीच्या लायसेन्सची आणि मुंबई नगरपालिकेबरोबर झालेल्या कराराची मुदत संपतांच ही जबाबदारी स्वीकारण्याचा नगरपालिकेनें निर्णय केला. परंतु हा निर्णय अमलांत आणण्यासाठीं आवश्यक असलेले अधिकार नगरपालिकेकडे नसल्यामुळें १९४७ सालीं बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टमध्यें जरूर त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या आणि त्यानंतर बी. ई. एस्. टी. कंपनीचा कारभार मुंबई नगरपालिके-कडे आला. हा दुरुस्ती कायदा बराच मोठा असून त्यांतील पुष्कळशीं कलमें नगरपालिकेकडे हा कारभार आल्यानंतर त्याबाबत काय व्यवस्था करावी ह्यासंबंधीं असल्यामुळें ह्या कलमाविषयीं खोल चर्चा करण्याची

जरूरी नाहीं. मात्र ह्या कायद्याबाबत एक दोन महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख करणें जरूर आहे. ह्या कायद्यान्वयें हा कारभार पाहाण्यासाठीं नऊ सभासदांची एक कमिटी अस्तित्वांत आली. नगरपालिकेच्या स्टँडिंग कमिटीचा चेअरमन ह्या समितीचा चेअरमन असतो. समितीचे बाकीचे सभासद नगरपालिकेचे सभासद असलेच पाहिजेत असें कायद्यानें बंधन घालण्यांत आलेलें नाहीं. मुंबई नगरपालिकेकडे हा कारभार आल्यानंतर त्याला बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंग असें संबोधण्यांत येऊं लागलें. अंडरटेकिंगचा दैनंदिन कारभार पाहाण्यासाठीं जनरल मॅनेजर ह्या नांवाच्या मोठ्या अधिकाऱ्याची जागा निर्माण करण्यांत आली. परंतु अंडरटेकिंगच्या सर्व कारभारावर हुकमत चालविण्याचा अधिकार म्युनिसिपल कमिशनरला देण्यांत आला. बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंग ही व्यापारी तत्त्वावर चालणारी संस्था असल्याकारणानें तिचें स्वतंत्र बजेट करण्यांत आलें. पूर्वी डीड ऑफ कन्सेशनप्रमाणें मुंबई नगरपालिकेला ट्रॅम्वेच्या रस्त्याबाबत कंपनीकडून दरसाल भाडें मिळत असे. परंतु कंपनीची व्यवस्था नगरपालिकेकडे आल्यामुळें नगरपालिकेला मिळाणारें हें भाडें साहजिकच बंद होणार होतें. ह्याप्रमाणें म्युनिसिपालिटीचें नुकसान होऊं नये म्हणून अंडरटेकिंगच्या बजेटमधून पुढील दहा वर्षेपर्यंत दरसाल नगरपालिकेला दहा लाख रुपये मिळावेत अशी व्यवस्था करण्यांत आली. त्याचप्रमाणें हा सर्व खर्च भागून जी शिल्लक राहील ती रेव्हिन्यू रिझर्व्ह फंड, बेटरमेंट फंड व अंडरटेकिंगच्या नोकरींत असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि नोकरांच्या सुखसोयीसाठीं निर्माण करण्यांत आलेला फंड ह्यांत विशिष्ट प्रमाणांत वांटून देण्यासंबंधींची तरतूद करण्यांत आली. ह्या महत्त्वाच्या कायद्याचें स्वरूप थोडक्यांत असें होतें.

बी. ई. एस्. टी. अंडरटेकिंगसंबंधींच्या ह्या कायद्याचें एका दृष्टीनें फार महत्त्व होतें. मुंबई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत ह्या कायद्यानें एक नवीन पायंडा पाडला. आपल्या हद्दींतील ट्रॅम अगर बस वाहातुकीची व्यवस्था एखाद्या नगरपालिकेनें आपल्याकडे घेतल्याचें

राज्यांतील हें पहिलेंच उदाहरण होतें. मुंबई महानगरपालिकेनें आपल्या उदाहरणानें इतर नगरपालिकांना एक व्यापक कार्यक्षेत्र खुलें करून दिलें. ह्याचा परिणाम इतर नगरपालिकांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. राज्यांतील अनेक नगरपालिकांकडून आपल्या हद्दींतील बस वाहातुकीची व्यवस्था आपल्या ताब्यांत देण्यासंबंधीं सरकारकडे विचारणा झाली. परंतु हा प्रयोग नवीनच असल्याकारणानें आतांपर्यंत सरकारकडून पुणें व अहमदाबाद ह्यांसारख्या फार मोठ्या नगरपालिकांनाच ह्या बाबतींत परवानगी देण्यांत आली आहे. ह्या दोन्ही शहरांतून बसवाहातुकीची व्यवस्था आतां तेथील नगरपालिकांकडून पाहिली जाते. अशा प्रकारें नगरपालिकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची ही घटना अण्णासाहेबांच्या कारकीर्दींतच घडली.

ह्यानंतर अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत झालेला आणखी एक महत्त्वाचा कायदा म्हणजे धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्ट हा होय. हा कायदा जरी सर्वसाधारण स्वरूपाचा असला तरी त्याची पार्श्वभूमि वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुणें शहरासाठीं मुंबई शहराप्रमाणेंच म्युनिसिपल कॉरपोरेशन स्थापन करण्यांत यावी अशा प्रकारची कल्पना बऱ्याच वर्षांपासून अस्तित्वांत होती. ह्या कल्पनेचा उगम पुणें शहर नगरपालिकेनें १९३३ सालीं ह्या बाबतींत जो एक ठराव पास केला त्यांत सापडतो. पुणें शहर नगरपालिकेच्या हद्दीला लागूनच पुणें उपनगर नगरपालिका, पुणें कॅन्टोन्मेन्ट बोर्ड व खडकी कॅन्टोन्मेन्ट बोर्ड ह्यांच्या हद्दी होत्या. ह्या सर्व नगरपालिकांऐवजीं पुणें शहरासाठीं एकच नगरपालिका असावी अशा आशयाचा तो ठराव होता. कालान्तरानें ह्या कल्पनेचें रूपान्तर बृहत् पुण्यासाठीं मुंबई येथील महानगरपालिकेच्या धर्तीवर पुणें महानगरपालिकेची स्थापना करण्यांत यावी ह्या कल्पनेंत झालें. बृहत्पुणें विभागासाठीं महानगरपालिका असावी ही मागणी अगदीं सयुक्तिक होती. ह्या भागांत एकमेकांस लागून अशा वर उल्लेख केलेल्या चार संस्था असल्याकारणानें ह्या नगरपालिकांच्या

कारभाराचे प्रश्न मोठ्या गुंतागुतीचे झाले होते. पाणीपुरवठा, ड्रेनेज, घरपट्टी, शहरसफाई, वगैरेसारख्या एकाच स्वरूपाच्या प्रश्नांची अमलबजावणी ह्या भागांत निरनिराळ्या चार संस्थांकडून होत होती. शिवाय ह्या प्रश्नाबाबत प्रत्येक संस्थेचें धोरण वेगवेगळें असे. त्यामुळें ह्या प्रश्नासंबंधींच्या अमलबजावणीच काम खर्चाचें आणि गुंतागुंतीच होऊन बसलें होतें. ह्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांऐवजीं एकच नगरपालिका स्थापन झाल्यास वरील प्रत्येक प्रश्नाबाबत सुसूत्रपणा येईल, अमलबजावणीच्या कामासाठीं येणाऱ्या खर्चांत बचत होऊन तें काम अधिक सुकर होईल, कारभारांत अधिक कार्यक्षमता येईल, हे व अशा प्रकारचे अनेक फायदे होणार होते. परंतु ह्या भागासाठीं महानगरपालिका स्थापण्याची एकदम घाई न करतां ह्या प्रश्नाशीं संलग्न असणाऱ्या सर्व बाबींचा सम्यक् विचार करण्यासाठीं १९४७ च्या जुलै महिन्यांत सरकारकडून श्री. एम्. डी. भट, आय्. सी. एस्. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमण्यांत आली. ही समिति 'भट समिति' म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या समितीनें बृहत् पुणें ह्या विभागांतील सर्व स्थानिक संस्थांचें विलीनीकरण करण्यांत यावें व ह्या भागासाठीं मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर महानगरपालिका स्थापन करण्यांत यावी, अशा प्रकारच्या दोन महत्त्वाच्या शिफारशी सरकारकडे केल्या. परंतु ह्या भागांतील पुणें कॅन्टॉन्मेन्ट बोर्ड व खडकी कॅन्टॉन्मेन्ट बोर्ड ह्या संस्था मध्यवर्ती सरकारच्या अखत्याराखालीं असल्याकारणानें व त्यांचा ह्या विलीनीकरणाला संरक्षणात्मक दृष्टीनें विरोध असल्याकारणानें हा भाग वगळून बृहत् पुण्यासाठीं महानगरपालिका स्थापण्याची भट समितीची शिफारस सरकारनें मान्य केली. परंतु ही शिफारस अमलांत आणण्यासाठीं स्वतंत्र कायदा करणें जरूर होतें. हा कायदा त्वरित तयार होणें शक्य नसल्यामुळें भट समितीची शिफारस तावडतोब अमलांत आणण्यासाठीं मध्यंतरीच्या कालापुरता एक तात्पुरता कायदा करण्यांत येऊन बृहत् पुण्यांतील पुणें शहर व पुणें उपनगर ह्या नगरपालिकांच्या कारभाराचें विसर्जन करण्यांत आलें आणि

ह्या भागाचा स्थानिक स्वराज्यापुरता कारभार पाहाण्यासाठीं श्री. एस्. जी. बर्वे, आय्. सी. एस्. ह्यांची पुण्याचे म्युनिसिपल कमिशनर म्हणून नेमणूक करण्यांत आली. ही नेमणूक होण्यापूर्वी श्री. बर्वे पुणें जिल्ह्याचे कलेक्टर होते. कलेक्टर म्हणून त्यांनीं चांगला नांवलौकिक मिळविला होता. त्यांच्यासारखा हुशार, तडफदार व अत्यंत कार्यक्षम असा अधिकारी म्युनिसिपल कमिशनर म्हणून पुण्यास लाभला, हा पुणें शहराच्या दृष्टीनें चांगला योग जमून आला. श्री. बर्वे ह्यांनीं आपल्या कारकीर्दीत पुणें शहराचें स्वरूप अजिबात पालटून टाकलें. आज पुण्यांत जी विलक्षण सुधारणा झालेली दिसून येते तिचें श्रेय श्री. बर्वे ह्यांनीं घेतलेल्या अविश्रान्त श्रमांना बऱ्याच अंशीं द्यावयास पाहिजे. परंतु ह्या भागाचा कारभार खास अधिकाऱ्याकडे कांहीं काळ सोपविण्यांत सरकारनें जो दूरदर्शीपणा आणि कल्पकता दाखविली त्यालाही ह्यापैकीं कांहीं श्रेय मिळणें जरूर आहे.

बृहत् पुणें विभागासाठीं महानगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय केल्यानंतर त्यासंबंधीं कायदा करण्याच्या तयारीस सरकार लागलें. परंतु त्याच वेळीं अहमदाबाद शहरासाठींही महानगरपालिका देण्यांत यावी अशा प्रकारची मागणी पुढें आल्यामुळें प्रत्येक शहरासाठीं स्वतंत्र कायदा करण्यापेक्षां ज्या कायद्याखालीं सरकारला जरूर वाटेल त्या वेळीं कोणत्याही मोठ्या शहरासाठीं महानगरपालिका स्थापन करतां यावी अशा प्रकारचा सर्वसाधारण स्वरूपाचा कायदा करण्याचा निर्णय सरकारनें केला. ह्या निर्णयामुळें केवळ पुण्यासाठीं कायदा करण्याची कल्पना मागें पडली आणि त्याऐवजीं बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्ट हा कायदा पास करण्यांत आला. ह्या कायद्याखालींच पुणें व अहमदाबाद येथें महानगरपालिका स्थापन करण्यांत आल्या. ह्या कायद्याची आंखणी आणि मांडणी बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टच्या धर्तीवर झालेली असली तरी हा कायदा तयार करतांना हिंदुस्थानांतीलच नव्हे तर हिंदुस्थानबाहेरच्या महानगरपालिकांसंबंधींच्याही

कायद्यांचा संपूर्ण अभ्यास करण्यांत आल्यामुळें हा कायदा अनेक दृष्टींनीं आदर्श झालेला आहे. अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत हा कायदा होऊन त्याखालीं अहमदाबाद व पुणें येथें महानगरपालिका स्थापन झाल्या ह्याबद्दल त्यांना नेहमींच अभिमान वाटे. पुण्यासंबंधीं त्यांना विशेष जिव्हाळा वाटत असल्याकारणानें पुणें शहरांतील सुधारणा घडवून आणण्याच्या प्रश्नांत त्यांनीं विशेष लक्ष घातलें. श्री. बर्वे ह्यांनीं पुण्यांत ज्या सुधारणा घडवून आणल्या त्याबद्दल त्यांनीं अनेक प्रसंगीं समाधान व्यक्त केलें होतें.

मागील मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत गाजलेले आणखी दोन कायदे – रेंट ॲक्ट व लॅंड रिक्विझिशन ॲक्ट – अण्णासाहेबांच्या कारकीर्दींतच झाले. भाडेंनियंत्रण कायदा १९४४ सालींच करण्यांत आला होता. परंतु त्याची मुदत १९४७ सालीं संपत होती. मोठमोठ्या शहरांतून घरांची टंचाई मुळींच कमी न झाल्यामुळें ह्या कायद्याची मुदत वाढविणें जरूर होतें. जुन्या कायद्याची मुदत न वाढवितां त्याऐवजीं त्याच स्वरूपाचा परंतु आणखी महत्त्वाचे बदल असलेला कायदा करण्याचा निर्णय करण्यांत येऊन त्याप्रमाणें एक मसुदा तयार करण्यांत आला. परंतु ह्या बिलामध्यें ज्या नवीन तरतुदी करण्यांत आल्या होत्या त्यांत भाड्यामध्यें वाढ करण्यासंबंधींचीही तरतूद होती. ह्या तरतुदीसंबंधीं लोकांत फार खळबळ माजून राहिली आणि तिच्याबाबत बराच मतभेद दिसून आल्याकारणानें हें बिल मागें घेण्यांत आलें आणि त्याऐवजीं मागलाच कायदा कांहीं किरकोळ दुरुस्त्या करून चालू ठेवण्यांत आला. १९४७ सालीं मागें घेण्यांत आलेल्या बिलांतील घरभाड्याच्या वाढीचें तत्त्व पुढें चालू मंत्रिमंडळाकडून स्वीकारण्यांत येऊन त्याप्रमाणें १९५३ सालीं घरभाड्यांत वाढ देणारा कायदा करण्यांत आला. या तरतुदीचा मुख्य उद्देश युद्धाच्या सुरुवातीपासून मोठमोठ्या शहरांतील बहुतेक इमारतींमध्यें डागडुजी करण्यांत आली नव्हती ती करण्यास मदत व्हावी हा होता.

दुसरा महत्त्वाचा कायदा लँड रिक्विझिशन ॲक्ट हा होय. १९४७ सालानंतर हिंदुस्थानांत निर्वासितांची सारखी रीघ लागून राहिली. मुंबई शहरामध्यें घरांचा प्रश्न पूर्वीपासूनच बिकट झाला होता. त्यांत निर्वासितांची भर पडल्यामुळें तो अधिकच बिकट होऊन बसला. जागा मिळविण्यासाठीं 'पागडी 'सारख्या नवीन वाममार्गांचा अवलंब करण्यास श्रीमंत लोकांनीं सुरुवात केली. चांगल्या वस्तींत जागा मिळविण्यासाठीं पंचवीस पंचवीस तीस तीस हजारांच्या 'पागड्या' देण्यांत येऊं लागल्या. सामान्य माणसाला त्यामुळें मुंबई शहरांत जागा मिळणें अशक्य होऊन बसलें. समाजांत पागडीची ही नवीन शिरलेली अनिष्ट प्रथा थांबविण्या-साठीं मुख्यत्वेंकरून लँड रिक्विझिशन ॲक्ट करण्यांत आला. खालीं झालेली जागा 'पागडी' घेऊन अगर अन्य मार्गानें भरली गेल्यास त्यासंबंधीं पहिल्यानें सरकारला बातमी देणाऱ्याला ती जागा दिली जाईल असें सरकारी धोरण जाहीर झालें. सुरुवातीस ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनें बराच गोंधळ माजून राहिला. परंतु त्या बाबतींत नीट व्यवस्था लागते न लागते इतक्यांत, शहरांत खालीं झालेल्या जागा आपल्या ताब्यांत घेऊन ह्या कायद्यान्वयें खासगी इसमांना (Private Individual) देतां येत नाहींत असा मुंबई हायकोर्टानें निर्णय दिल्या-मुळें ह्या कायद्याच्या मुळावरच आघात झाला. परंतु ह्या कायद्यामुळें 'पागडी' सारख्या घातुक प्रकारास बराच आळा बसला ह्यांत शंका नाहीं.

अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत झालेल्या आणखी एक दोन कायद्यांचा ह्या प्रकरणांत थोडक्यांत उल्लेख करणें जरूर आहे. टाऊन प्लॅनिंगचा कायदाही अण्णासाहेबांकडेच होता. ह्या कायद्यान्वयें एखाद्या शहरासाठीं अगर त्या शहरांतील भागासाठीं एखादी टाऊन प्लॅनिंग योजना तयार करावयाची झाल्यास त्याला अनेक वर्षांचा कालावधि लागत असे. टाऊन प्लॅनिंगची योजना तयार करण्याचा निर्णय केल्यानंतर ती योजना संपूर्ण तयार होईपर्यंत त्या भागांत घरें वगैरे बांधतां येत नसत.

ह्यामुळें शहरांतील नवीन भागाची वाढ बऱ्याच वेळां वर्षानुवर्षें खुंटली जात असे. टाऊन प्लॅनिंग कायद्यांतील हा दोष काढून टाकण्यासाठीं १९५१ सालीं ह्या कायद्यामध्यें एक महत्त्वाची सुधारणा करण्यांत आली. ह्या सुधारणेमुळें शहररचना योजनेचे निरनिराळे विभाग करण्याची मुभा मिळाल्यामुळें सबंध योजना पुरी होईपर्यंत थांबण्याचें कारण राहिलें नाहीं. त्यामुळें शहररचना योजनेंतील ज्या विभागाची वाढ होत आहे त्या विभागापुरती योजना पुरी करणें व त्यांत घरें वगैरे बांधण्यास परवानगी देणें शक्य झालें. टाऊन प्लॅनिंग ॲक्टमधील ही महत्त्वाची सुधारणा आहे.

त्याचप्रमाणें १९५० सालीं बॉम्बे म्युनिसिपल कॉरपोरेशन ॲक्टमध्यें एक महत्त्वाची दुरुस्ती करण्यांत आली. सरकारी नोकरींतील वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची निवड राज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशन मार्फत होत असते. राज्याचा कारभार चालविणाऱ्या ह्या अधिकाऱ्यांची निवड, राज्याच्या कारभाराची पातळी उच्च राहावी म्हणून केवळ उमेद-वारांच्या लायकीवरूनच व्हावी हा ह्यांतील मुख्य उद्देश आहे. मुंबई नगरपालिकेच्या कारभाराचाही व्याप फार मोठा असल्याकारणानें त्या संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवड सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणेंच पब्लिक सर्व्हिस कमिशनमार्फत होणें आवश्यक आहे असें अण्णा-साहेबांचें मत असल्यामुळें तशा प्रकारची सूचना मुंबई महानगरपालिकेला सरकारकडून करण्यांत आली आणि ती सूचना नगरपालिकेला मान्य होतांच त्याप्रमाणें एक दुरुस्ती कायदा पास करण्यांत आला. ह्या कायद्यान्वयें मुंबई महानगरपालिकेंतील तीनशें रुपयांपेक्षां अधिक पगार असणाऱ्या अधिकाऱ्यांची निवड मुंबई पब्लिक सर्व्हिस कमिशन मार्फत करण्याची अत्यंत महत्त्वाची अशी प्रथा सुरू करण्यांत आली. अशा प्रकारची प्रथा सुरू करणारें मुंबई हें हिंदुस्थानांतील पहिलें राज्य होय. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे अण्णासाहेबांनीं सुरू केलेली ही प्रथा किती पुरोगामी स्वरूपाची होती हें निराळें सांगावयास नकोच.

अण्णासाहेबांच्या कारकीर्दींत झालेल्या दुसऱ्या अनेक दुरुस्ती कायद्यांचा उल्लेख अगर विचार विस्तारभयास्तव येथें करणें शक्य होणार नाहीं. परंतु सहा वर्षांच्या आपल्या कारकीर्दींत अण्णासाहेबांनीं ह्या क्षेत्रांत जी भरीव व महनीय कामगिरी बजावलेली आहे तिचा उल्लेख मुंबई राज्याच्या इतिहासांत प्रामुख्यानें करावा लागेल. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांना जमीनमहसुलाच्या उत्पन्नापैकीं पंधरा टक्के उत्पन्न कायद्यानें देऊन अण्णासाहेबांनीं जो नवीन उपक्रम सुरू केला त्याला तर ह्या संस्थांच्या इतिहासांत तोड नाहीं. अण्णासाहेबांनीं हा कायदा करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतींत विचारांची नवीन दिशा दाखविली आणि त्यांच्या प्रगतीचें नवीन पर्व सुरू केलें. स्थानिक स्वराज्य संस्थांची मजबूत आर्थिक पायावर उभारणी करणें, त्यांच्या अंतर्गत कारभारांत सुधारणा करून त्यांना अधिक कार्यक्षम बनविणें, त्यांचा कारभार पूर्ण लोकमतानुवर्ती व्हावा म्हणून त्यांच्यांत जरूर त्या सुधारणा करणें आणि त्यांच्या कार्यक्षेत्रांत वाढ करून त्यांच्याकडे अधिकाधिक जबाबदाऱ्या सोपविणें हीं अण्णासाहेबांच्या ह्या संस्थांबाबतच्या धोरणाचीं मुख्य तत्त्वें होतीं. ह्या तत्त्वांच्या मागील विचारसरणी अत्यंत निश्चित स्वरूपाची होती. हिंदुस्थानच्या लोकशाहीच्या कारभारांत लोकशाही कारभाराचें प्राथमिक शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणून ह्या संस्थांचा मोठा उपयोग होणारच आहे. किंबहुना लोकशाही राज्यपद्धति आपल्या देशांत संपूर्ण यशस्वी करण्याचा सर्वांत जवळचा मार्ग म्हणजे ह्या संस्था होत, ह्या दृष्टीनें ह्या संस्थांकडे पाहाणें अधिक उचित होईल. विकेन्द्रीकरणाच्या धोरणाप्रमाणें लोकमतानुवर्ति चालणाऱ्या संस्थांकडे अधिकाधिक जबाबदाऱ्या सोपवून त्यांना देशाच्या राज्यकारभाराचे अविभाज्य घटक बनविण्याचें अत्यंत महत्त्वाचें कार्य ह्यापुढें व्हावयास पाहिजे अशा प्रकारचे अण्णासाहेबांचे ह्या संस्थांबाबतचे विचार होते. अण्णासाहेबांच्या ह्या विचारसरणीचें स्वरूप अत्यंत विधायक आणि अत्यंत प्रगतिपर होतें. तिला अनुभवाची पार्श्वभूमि होती आणि तिच्यांत भविष्यकाळांत दूर पाहाण्याचें सामर्थ्यही

पंडित जवाहरलाल नेहरू अमेरिकेहून परत आले त्या वेळीं — १४ नोव्हेंबर १९४९



होतें. तिच्या मागें निष्ठा होती आणि ह्या निष्ठेला ध्येयप्रवणतेचें आवरण होतें. अण्णासाहेबांच्या ह्या ध्येयनिष्ठ विचारसरणीचे ठसे त्यांनीं ह्या संस्थांसंबंधीं केलेल्या कार्यांत ठिकठिकाणीं उठलेले आहेत. कालाच्या ओघानें पुसून न जाणारे असे हे ठसे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत अण्णासाहेबांनीं बजावलेली कामगिरी अजरामर झालेली आहे.

प्रकरण तेविसावें

# शेतकऱ्यांचे आधारस्तंभ

ठाणें जिल्ह्यांत १९४० सालीं झालेल्या मोठ्या वादळानंतर अवघ्या आठ वर्षांनीं वादळाचा दुसरा प्रचंड तडाखा ठाणें जिल्ह्याच्या पश्चिम भागास बसला. १९४८ चें हें वादळ १९४० सालच्या वादळापेक्षां अनेक पटींनीं मोठें व भयानक होतें. ह्या भागांतील रहिवाश्यांनीं एवढें मोठें वादळ आपल्या हयातींत पाहिलें नव्हतें. ऑक्टोबरच्या २३ तारखेस रात्रीं सुमारें तीन वाजतां वादळास सुरुवात झाली आणि त्याचा जोर सारखा वाढतच गेला. सकाळीं ८ वाजल्यापासून १० वाजेपर्यंत तर त्यानें अगदीं रुद्रावतार धारण केला आणि आपल्या दोन तासांच्या तांडव-नृत्यानें विशेषतः वसई व पालघर तालुक्यांतील पानवेलीच्या, केळीच्या आणि भाजीपाल्याच्या लागवडीमुळें संपन्न व समृद्ध असलेला हा हिरवागार व रम्य प्रदेश आपल्या पायदळीं तुडवून साफ उध्वस्त व बेचिराग करून टाकला. सर्वत्र प्रचंड पडझड झाली होती. सर्वत्र हाहाकार उडाला होता. १९४० च्या वादळानंतर शेतकरी आतांच कोठें डोकें वर काढूं लागला होता, इतक्यांत त्याला हा दुसरा जबरदस्त

तडाखा बसला. पायांखालची जमीन दुभंगून जावी तशी त्याची असह्य परिस्थिति झाली. वसईच्या सुप्रसिद्ध पानकेळा मार्केटमध्यें पुढील सातआठ महिन्यांत एकही केळें दृष्टीस पडलें नाहीं आणि पानांचा व्यापार तर जवळ जवळ बंद झाल्यासारखाच झाला होता; इतकी उलथापालथ ह्या वादळानें केली होती.

प्रत्यक्ष वादळ झालें त्या वेळीं अण्णासाहेब कारवार जिल्ह्यांत दौऱ्यावर होते. मुंबईस परत येत असतांना बेळगांव स्टेशनवर अण्णासाहेबांना वादळाची बातमी समजली. परंतु पुढील स्टेशनवर मालगाडीचा डबा रुळावरून घसरल्यामुळें अण्णासाहेबांना एक रात्र बेळगांव येथें काढावी लागली. त्यानंतर पुण्यास पोहोंचल्यावर वादळाच्या रौद्र स्वरूपाची त्यांना खरी कल्पना आली. रेल्वेमार्गांची सर्वत्र नासधूस झाल्यामुळें पुण्यासही अण्णासाहेबांना एक रात्र मुक्काम करावा लागला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं रेल्वेवाहातूक सुरू झाल्यानंतर पहिल्या गाडीनेंच अण्णासाहेब सहा वाजतां पुण्याहून निघाले. परंतु त्यांची गाडी मुंबईस पोचण्यास दुपारचे तीन वाजले! १९४० चें वादळ त्यांनीं पाहिलें होतें. त्यामुळें ह्या प्रचंड वादळानें ठाणें जिल्ह्यांत किती अनर्थ उडविला असेल ह्याची त्यांना त्वरित कल्पना आली. मोठ्या अस्वस्थ मनानें ते सेक्रेटेरिएटमध्यें गेले. परंतु वादळ झालेल्या भागांतील सर्वच दळणवळण चारपांच दिवस बंद पडल्यामुळें वादळानें केलेल्या अनर्थांचे सविस्तर अहवाल सेक्रेटेरिएटमध्येंही आले नव्हते. अशा परिस्थितींत स्वस्थ न बसतां वसई, पालघर व डहाणू तालुक्यांतील वादळानें उध्वस्त झालेल्या भागांतून अण्णासाहेबांनीं तीन दिवसांचा दौरा काढला. ह्या दौऱ्यांत आपल्या शेतकरी बांधवांवर किती भयंकर आपत्ति ओढवली होती ह्याची त्यांना संपूर्ण कल्पना आली. वसई तालुक्यांत बागायतीखालीं एकंदर पांच हजार एकर जमीन असून तिच्यापैकीं २७०० एकर जमीन केळीच्या लागवडीखालीं व ७०० एकर जमीन पानवेलीच्या लागवडीखालीं होती. बाकी राहिलेल्या जवळ जवळ १५०० एकर

जमिनींत भाजीपाल्याची लागवड होत असे. पांच हजार एकरांचा हा विस्तीर्ण भाग संपूर्ण उध्वस्त झाला होता. आंबा, चिंच, फणस ह्यांसारखे मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडले होते. केळींच्या ताफ्यांत एकही केळ उभी नव्हती. पानवेलीचे आणि भाजीपाल्याचे मांडव इतस्ततः दूर फेकले गेले होते. ठिकठिकाणीं भाताचीं उडवीं वाहून गेलीं होतीं आणि जीं उडवीं शेतांत जाग्यावर शिल्लक राहिलीं होतीं त्यांच्यांत वरून पावसाचें पाणी शिरल्यामुळें भाताच्या लोंब्यांना धक्का पोचला होता. घरांवरील कौलें व छपरें उडून गेल्यामुळें शेतकरी उघडे पडले होते तर हरिजन व आदिवासी लोकांच्या झोपड्या वाहून गेल्यामुळें ते संपूर्ण निराधार बनले होते. कोळी लोकांचीं कैक गलबतें वादळांत बुडालीं होतीं व अनेक गलबतांची नासधूस झाली होती. समुद्रालगतच्या त्यांच्या झोपड्या वाऱ्यानें केव्हांच उडवून फेकून दिल्या होत्या. आपल्या भेटीचीं सर्वत्रच उदास व भकास पदचिन्हें मागें ठेवून वादळ निघून गेलें होतें.

अशाच प्रकारची परिस्थिति कमीअधिक प्रमाणांत अण्णासाहेबांना पालघर तालुक्यांत आढळली. पालघर तालुक्यांत बागायतीखालील क्षेत्र वसई तालुक्याच्या मानानें बरेंच कमी म्हणजे जवळ जवळ पंधराशें एकर होतें. परंतु ह्या तालुक्यांतही वसई तालुक्याप्रमाणें प्रचंड प्रमाणांत नुकसान झालें होतें. ह्या तालुक्यांत गवताचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. वादळामुळें ह्या धंद्यालाही नुकसानीचा प्रचंड तडाखा बसला होता. डहाणू तालुक्यांत मात्र वसई व पालघर तालुक्यापेक्षां वादळाचा जोर कांहींसा कमी होता. बागायतीखालीं ह्या तालुक्यांत जवळ जवळ १२०० एकर जमीन असून मुख्य बागायती लागवड म्हणजे चिकूच्या बागा होत. ह्या बागांचेंही फार मोठ्या प्रमाणांत नुकसान झालेलें होतें. चिकूच्या बागांची लागवड ही कांहींशा कायम स्वरूपाची असल्यामुळें बागायतदारांचें झालेलें नुकसान लवकर भरून येण्यासारखें नव्हतें. डहाणू तालुक्यांतील चिंचणी गांवांत झालेलें एकंदर नुकसानही फार मोठ्या प्रमाणावर होतें.

अण्णासाहेबांनीं तीन दिवसांच्या ह्या दौऱ्यांत ह्या तीन तालुक्यांतील अनेक गांवांना भेटी देऊन शेतकऱ्यांना व बागायतदारांना धीर दिला. प्रत्यक्ष परिस्थिति अवलोकन केल्यानंतर वादळानें वसई तालुक्यांत झालेलें नुकसान जवळ जवळ १ ते १। कोटीचें, पालघर तालुक्यांतील नुकसान जवळ जवळ ३० ते ४० लक्षांचें व डहाणू तालुक्यांतील नुकसान सुमारें १० लाखांचें असल्याचें अण्णासाहेबांना आढळून आलें. शेतकऱ्यांना ह्या आपत्तींतून निभावून नेण्यासाठीं तावडतोब उपाय-योजना होणें जरूर होतें. अण्णासाहेब मुंबईस परत पोंचल्यानंतर ठाणें जिल्ह्यांतील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या आणि बागायतदारांच्या मदतीसाठीं सरकारकडून अनेक हुकूम निघाले. कांहीं दिवसांपुरतीं ह्या भागांतून स्वस्त धान्याचीं दुकानें सुरू करण्यांत आलीं. हरिजन, आदिवासीं-सारख्या अगदीं गरीब लोकांना मोफत मदत मिळण्यासाठीं पन्नास हजार रुपयांची मदत मुक्रर करण्यांत आली. नुकसान झालेल्या गांवांतून शेतसारा तहकूब करण्यांत आला. शेतकऱ्यांना आपल्या धंद्यासाठीं जंगलांतून मिळणारा माल त्वरित मिळावा म्हणून अनेक सवलती देण्यांत आल्या. कौलें, सीमेंट व पत्रे शेतकऱ्यांना मिळण्याची व्यवस्था झाली. परंतु ह्या संकटसमयीं शेतकऱ्यांना सरकारनें दिलेली सर्वांत मोठी मदत म्हणजे तगाई—कर्ज होय. बागायतीच्या धंद्याला फार मोठें भांडवल लागत असल्यामुळें सरकारकडून भरपूर आर्थिक मदत मिळाल्याशिवाय बागायतदार शेतकरी ह्या आपत्तींतून पार पडूं शकले नसते. म्हणून सरकारकडून ठाणें जिल्ह्यासाठीं तगाईच्या रूपानें चाळीस लक्ष रुपयांची मदत मंजूर करण्यांत आली. सरकारकडून मिळणाऱ्या एवढ्या मोठ्या मदतीचा दुरुपयोग होऊं नये म्हणून दोन किंवा तीन हप्त्यांनीं ही मदत देण्यांत आली. शिवाय मदतीचा कांहीं भाग खताच्या रूपानें देण्यांत आला. भरपूर प्रमाणांत तगाईच्या रूपानें वेळींच सरकारकडून मदत मिळाल्यामुळें बागायतदार व शेतकरी त्यांच्यावर ओढवलेल्या ह्या भयंकर नैसर्गिक आपत्तींतून बाहेर पडूं

शकले. सरकारकडून ही जी त्वरित उपाययोजना झाली त्याला बहुतांशीं अण्णासाहेबांचेच प्रयत्न कारणीभूत झाले. संकटसमयीं शेतकऱ्यांच्या मदतीसाठीं अण्णासाहेब नेहमींच धावून जात असत. १९४८ सालच्या वादळामुळें ठाणें जिल्ह्याच्या पश्चिम भागांतील शेतकऱ्यांवर ओढवलेलें संकट, प्राणसंकट होतें. त्याच्या निवारणासाठीं अण्णासाहेबांनीं आटोकाट प्रयत्न केले. मंत्रिमंडळांतील मंत्री म्हणून ह्या प्रसंगीं त्यांनीं उत्तम कामगिरी बजावली व आपल्या शेतकरी बांधवांसंबंधीं त्यांच्या आपद्काळांतील आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें पार पाडलें. अण्णासाहेबांसारखी कर्तव्यपालनाची जाणीव सर्वांनाच असती तर पुढील कितीतरी कटु आणि विदारक अनुभव व आपत्ति टळल्या असत्या.

प्रकरण चोविसावें

# स्वराज्याचे प्रभावी प्रचारक

मंत्री म्हणून १९४६ ते १९५२ ह्या सहा वर्षांच्या काळांत अण्णासाहेबांनीं सर्व राज्यभर अनेक दौरे काढले. दौऱ्यांचा मुख्य उद्देश स्थानिक परिस्थिति समजून घेतां यावी, स्थानिक कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा आणि सरकारनें हातीं घेतलेल्या अनेक योजना आणि त्यांच्या मागील धोरण जनतेला समजावून देतां यावें हा असतो. लोकशाहीच्या कारभारांत राज्यकर्त्यांनीं अशा प्रकारें जनतासंपर्क वाढविणें केवळ इष्टच नव्हे तर अपरिहार्य ठरतें. शिवाय मंत्र्यांना आपण ज्या राज्याचा कारभार चालवितों त्या राज्याच्या प्रत्येक भागाची माहिती व त्या भागांतील परिस्थितीचें ज्ञान असणें अत्यावश्यक आहे. ह्या दृष्टीनें अण्णासाहेबांनीं काढलेले दौरे वैशिष्ट्यपूर्ण असत. स्थानिक स्वराज्य संस्थांचे मंत्री म्हणून अण्णासाहेबांना राज्यांतील अनेक शहरांना भेटी द्याव्या लागल्या. परंतु त्यांचा खरा ओढा ग्रामीण भागाकडेच होता. ह्याचें कारण ग्रामीण भागांतील लोकांच्या जीवनाशीं ते समरस झाले होते व ग्रामीण जीवनाशीं संबंध येणाऱ्या ग्रामपंचायत व जिल्हा लोकल बोर्ड ह्या संस्थांमध्यें त्यांनीं अनेक वर्षें काम केलें असल्यामुळें ह्या भागांतील लोकांच्या अडचणींची

त्यांना पूर्ण कल्पना होती. अण्णासाहेबांचे दौरे बहुधा ग्रामीणविभागांतून काढलेले असत, ह्यांतील मुख्य इंगित हें होतें. पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, सोलापूर, सातारा, नाशिक, अहमदनगर, खेडा, पंचमहाल, बेळगांव, विजापूर, कारवार, वगैरे जिल्ह्यांतील अनेक खेड्यांना अण्णासाहेबांनीं ह्या सहा वर्षांच्या काळांत भेटी दिल्या.

खेड्यांत होणाऱ्या त्यांच्या सभांना मोठ्या प्रमाणांत शेतकरीवर्ग हजर असला म्हणजे त्यांना आनंद वाटत असे. ह्या सभांतून अण्णासाहेब इतक्या सोप्या भाषेंत बोलत असत कीं त्यांचीं भाषणें ऐकतांना शेतकरी रमून जात. खेड्यांतील लहानसहान संस्थांना भेट देण्याबाबत त्यांना विनंती केल्यास दौऱ्याच्या आंखलेल्या कार्यक्रमांत जरी अशा भेटीचा समावेश नसला तरी सहसा असली विनंती ते अमान्य करीत नसत. त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम लांबत जात असे. खेड्यांतील सभांतून अण्णासाहेब राजकारणावर फारसें बोलत नसत. त्यांच्या भाषणाचा विषय बहुधा बहुजनसमाजाच्या उन्नतीसाठीं सरकार काय प्रयत्न करीत आहे हा असे. गांवागांवांतून भांडणें नाहींशीं होऊन एकोप्याची वृत्ति निर्माण व्हावयास पाहिजे ह्या गोष्टीवर ते विशेष भर देत. गांवागांवांतून ग्रामपंचायती स्थापन व्हावयास पाहिजेत ह्यासंबंधीं आपल्या मुद्द्यांचें ते आग्रहानें प्रतिपादन करीत. त्यांच्या भाषणांत विनोदही भरपूर असे. कोणत्याही खेडेगांवांत अण्णासाहेब गेले म्हणजे तेथील हरिजनांसंबंधीं आस्थापूर्वक चौकशी करीत आणि त्यांच्या वस्तीस भेट देण्यास ते सहसा कधीं चुकत नसत.

शहरांतील त्यांच्या भाषणांत राजकारणासारख्या अनेक गंभीर प्रश्नांचा उल्लेख असे. अशा प्रसंगीं त्यांनीं केलेलीं भाषणें भारदस्त असत. ते उत्तम वक्ते असल्याकारणानें आणि मराठी भाषेवर त्यांचें चांगलें प्रभुत्व असल्याकारणानें त्यांचीं दौऱ्यांतील भाषणें मोठीं प्रभावी होत असत.

स्थानिक स्वराज्य मंत्री म्हणून त्यांना अनेक नगरपालिकांना भेटी द्याव्या लागल्या. नगरपालिकांकडून त्यांना अनेक मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. मानपत्रांना उत्तर देतांना परकीय अमदानींतील राज्यकर्त्यांचा नगरपालिकांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन व लोकशाहींतील जनतेच्या सरकारचा ह्या संस्थांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन ह्यांतील फरक ते उत्तम रीतीनें समजावून सांगत. त्याचप्रमाणें नगरपालिकांच्या सभासदांच्या कर्तव्यासंबंधीं अण्णासाहेब फार जिव्हाळ्यानें बोलत असत. अशा वेळीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासंबंधीं त्यांच्या स्वतःच्या कल्पना ते विशद करून सांगत. एखाद्या नगरपालिकेच्या निवडणुकी जरी राजकारणांतील अगर इतर पक्षोपपक्षांच्या भूमिकेवरून लढविल्या गेल्या असल्या तरी निवडणुका संपल्यानंतर आपापल्या पक्षांतील मतभेद विसरून नागरिकांच्या हितासाठीं प्रत्येक सभासदानें झटलें पाहिजे व नगरपालिकेसंबंधींचीं आपलीं कर्तव्यें आस्थापूर्वक पार पाडलीं पाहिजेत ह्यावर त्यांचा फार भर असे. नगरपालिका अगर तत्सम संस्था ह्या पक्षापक्षांतील डावपेच खेळविण्याच्या जागा नव्हेत, ज्यांना हे डावपेच खेळावयाचे असतील त्यांच्यासाठीं निराळीं क्षेत्रें मोकळीं आहेत असा ते मोठ्या कळकळीनें नगरपित्यांना उपदेश करीत असत. स्थानिक स्वराज्य संस्थांत पुष्कळ वेळां आढळणारें अनिष्ट वातावरण ह्या संस्थांत स्त्रियांना अधिक प्रतिनिधित्व दिल्यास पुष्कळसें बदलेल असें त्यांचें मत होतें. म्हणून ह्या संस्थांतून स्त्रियांसाठीं त्यांनीं पूर्वींपेक्षां अधिक जागा राखून ठेवल्या. नगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांतून स्त्रियांनीं अधिक प्रमाणांत भाग घ्यावा असें ते प्रतिपादन करीत असत.

नगरपालिकांच्या भेटीच्या वेळीं नगरपालिकांच्या पाणीपुरवठा व सांडपाणी ह्यांसारख्या महत्त्वाच्या योजनांची ते स्वतः पाहाणी करीत असत. त्यांच्या कारकीर्दींत अनेक शहरांतील पाणीपुरवठ्याच्या व सांडपाण्याच्या योजनांचा त्यांच्या हस्तें पाया घातला गेला व त्यांपैकीं पुष्कळ योजनांना मूर्तस्वरूप आलेलेंही त्यांनीं आपल्या कारकीर्दींत पाहिलें.

नगरपालिकांच्या हरिजन नोकरांना राहाण्यासाठीं घरें बांधून देण्याच्या कामीं नगरपालिकांना सरकारकडून ग्रँट दिली जाते. त्याचा संपूर्ण फायदा नगरपालिकांनीं घ्यावा अशी अण्णासाहेबांची फार इच्छा असे. म्हणून प्रत्येक दौऱ्यांत ह्यासंबंधीं ते आस्थापूर्वक चौकशी करीत. शहरांतील त्यांच्या दौऱ्याच्या कार्यक्रमांत हरिजन वस्तीला भेट देण्याचा कार्यक्रम नेहमींच असे. शहराचें आरोग्य राखण्यासाठीं रोज राबणारे लोक नेहमीं गलिच्छ वस्तींत राहात असतात. अशा गलिच्छ वस्त्या शहरांत राहूं देणें म्हणजे ह्या लोकांवर *अन्याय करण्यासारखें* आहे असें ते नेहमीं आर्जवानें सांगत असत. त्यांना हरिजनांसंबंधीं वाटणाऱ्या ह्या कळकळी-मुळेंच अनेक नगरपालिकांनीं आपल्या हरिजन नोकरांसाठीं घरें बांधण्याच्या योजना आंखून त्या पुऱ्या पाडल्या.

गुजरातमधला दौरा असला म्हणजे सुरुवातीस अण्णासाहेब स्वतः गुजरातीमधून लहानसें भाषण करीत. त्यांना साधारणतः चांगलें गुजराती बोलतां येत असे. त्यांच्या ह्या पद्धतीमुळें श्रोतृवर्गामध्यें एक प्रकारचें आपलेपणाचें वातावरण निर्माण होई. त्यानंतर ते आपलें भाषण मराठींत करीत व आपल्या भाषणाचें सार शेवटीं गुजरातींतून सांगण्यासाठीं आपल्या बरोबरच्या एखाद्या कार्यकर्त्याला विनंती करीत. कर्नाटकांतील दौऱ्याच्या वेळचीं त्यांचीं भाषणें मराठी होत असत. परंतु तेथील आपल्या भाषणांतील प्रत्येक वाक्य कानडीमधून श्रोतृवर्गाला सांगितलें जावें अशी ते व्यवस्था करीत. कर्नाटकमधील श्री. जयदेव कुळकर्णी, श्री. अण्णु-गुरुजी व बेळगांव जिल्हा बोर्डाचे माजी चीफ ऑफिसर कै. वाली वगैरे मंडळी ही कामगिरी उत्तम प्रकारें पार पाडीत.

सहा वर्षांत त्यांनीं काढलेल्या दौऱ्यांत अण्णासाहेब फक्त दोन वेळांच आजारी पडले. एकदा विजापुर येथें व दुसऱ्यांदा सोलापुर येथें. तापासारखे दोन तीन दिवस टिकणारे किरकोळ स्वरूपाचे हे आजार होते. दौऱ्यांत प्रवासाचा वगैरे पुष्कळ वेळा ताण पडत असे. परंतु त्यामुळें अण्णासाहेबांच्या आनंदी वृत्तींत कधीं फरक पडला नाहीं. दौऱ्यांत

त्यांच्या बरोबर जाणाऱ्या त्यांच्या चिटणिसांची व चोपदारांची, जेवणाखाण्याची, राहाण्याची, जाण्यायेण्याची नीट व्यवस्था झाली आहे किंवा नाहीं ह्याबद्दल ते स्वतः विचारपूस करीत. हें त्यांचें एक वैशिष्ट्य होतें. त्याचप्रमाणें दौऱ्याच्या कार्यक्रमाची काळजीपूर्वक छाननी करणें हेंही त्यांचें एक वैशिष्ट्य होतें. मंत्र्यांच्या दौऱ्याच्या कार्यक्रमाची आंखणी स्थानिक कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानें जिल्ह्याच्या कलेक्टरमार्फत होत असते व त्यानंतर तो कार्यक्रम मंजुरी-साठीं मंत्र्यांकडे पाठविला जातो. दौऱ्याचा कार्यक्रम तयार होत असतांना शक्यतों ग्रामीण विभागाचा समावेश कार्यक्रमांत करण्याबद्दल अण्णासाहेबांकडून कलेक्टरांकडे सूचना जात असत. कार्यक्रम तयार होऊन आल्यानंतर, दौऱ्यांतील प्रवास मोटरनें व्हावयाचा असल्यास, वाटेंत येणारे अडथळे लक्षांत घेऊन एकंदर प्रवासास किती वेळ लागेल ह्याचा अंदाज घेऊन दौऱ्याच्या कार्यक्रमाची ते शहानिशा करीत आणि त्यानंतरच त्याला ते मंजुरी देत. दौऱ्यावर निघतांनासुद्धा प्रत्येक बाबतींत ते काळजी घेत. प्रवासासाठीं बरोबर घ्यावयाच्या सामानाबद्दल ते स्वतः सूचना देत आणि आपल्यासमक्ष नोकरांकडून आपलें सामान बॅग व होल्डॉलमध्यें भरून घेत. मंत्रीपदावर येण्यापूर्वी सबंध हिंदुस्थानां-तून त्यांनीं अनेक वेळां प्रवास केलेला असल्यामुळें प्रवासांत येणाऱ्या अडचणींची त्यांना पूर्ण कल्पना असे. त्यामुळें प्रवासांत लागणारी कोणतीही वस्तु त्यांच्याकडे मिळाली नाहीं असें कधींही होत नसे. किंबहुना विसरणें हा शब्द त्यांना माहीतच नव्हता. प्रवास रेल्वेनें व्हावयाचा असल्यास रेल्वेचें चालू वेळापत्रक ते स्वतःबरोबर घेत आणि गाडी निघण्याची व ठरलेल्या ठिकाणीं पोचण्याची वेळ ते स्वतः पाहून घेत. गाडी सुटावयाच्या अगोदर पांच मिनिटें स्टेशनवर जाण्याची त्यांची पद्धत असल्यामुळें प्रवासास निघण्याच्या वेळीं त्यांची कधींही धांदल उडत नसे. दौऱ्यांतील प्रवासाबाबत ते ह्याप्रमाणें काळजी घेत असल्यामुळें त्यांचे सर्व दौरे व्यवस्थित रीतीनें पार पडले.

अण्णासाहेबांच्या दौऱ्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेक परिषदा होत. असल्या परिषदांत महत्त्वाची चर्चा व्हावयाची असल्यास लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूटचे श्री. एस्. एस्. नाईक अगर श्री. सी. डी. बर्फीवाला ह्यांना ते बरोबर घेऊन जात असत. श्री. नाईक ह्यांच्यावर त्यांचा फार लोभ होता. तर श्री. बर्फीवाला ह्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासंबंधींच्या दांडग्या व्यासंगाबद्दल त्यांना आदर वाटत असे. श्री. नाईक अगर श्री. बर्फीवाला बरोबर असले म्हणजे कितीही मोठ दौरे असले तरी ते कंटाळवाणे होत नसत.

ह्या दौऱ्यांतून अण्णासाहेबांनीं अनेक मित्र जोडले व जुने मित्रत्वाचे संबंध अधिक दृढ केले. अण्णासाहेब जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांनीं आपल्या व्यक्तित्वानें आदराची भावना निर्माण केली. अण्णासाहेबांच्या मृत्यूनंतर दूरदूरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांच्या कुटुंबियांना जे सांत्वनपर संदेश आले त्यांत ही भावना स्पष्टपणें प्रतिबिंबित झाली आहे. नुकतेंच मुंबईपासून फार दूर असलेल्या कुमटा येथील नगरपालिकेनें सध्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें अण्णासाहेबांच्या तैलचित्राचें जें अनावरण केलें ह्यांतही तीच भावना प्रकट झालेली दिसून येते. दूरदूरच्या लोकांना ह्या दौऱ्यांमुळें अण्णासाहेब जसे ओळखूं लागले त्याचप्रमाणें अण्णासाहेबांचीही त्यांना ह्या दौऱ्यांमुळेंच ओळख पटली. दौऱ्यासंबंधींच्या ह्या प्रकरणांत ह्या गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय त्याला पूर्णता कशी येईल ?

प्रकरण पंचविसावें

# अकल्पित निकाल

१९४६ सालच्या निवडणुकीनंतर आपण आपल्या प्रांताचे मंत्री होऊं अशा प्रकारची पुसट कल्पना देखील, श्री. बाळासाहेब खेर ह्यांजकडून मंत्रिपदाबद्दल त्यांना विचारण्यांत येईपर्यंत अण्णासाहेबांच्या मनांत आली नाहीं. मंत्रिपदाची त्यांना अपेक्षा नव्हती, तशी त्यांची महत्त्वाकांक्षाही नव्हती. किंबहुना ज्या अर्थानें व्यवहारांत 'महत्त्वाकांक्षा' हा शब्द वापरला जातो तशा प्रकारच्या महत्त्वाकांक्षेपासून अण्णासाहेब नेहमींच दूर राहात आले होते. ठाणें जिल्हा लोकल बोर्डाचें अध्यक्षपद सोडल्यास, ज्या ज्या वेळीं मानाच्या जागा मिळण्याचे त्यांच्या आयुष्यांत योग आले त्या त्या वेळीं आपल्या सहकाऱ्यांनाच त्या जागांवर त्यांनीं बसविलें. अधिकाराच्या, मोठेपणाच्या जागा न स्वीकारतां आपलें कार्य करीत राहावें हा अण्णासाहेबांचा स्वभाव होता. किंबहुना तो त्यांचा स्थायीभाव होता असें म्हणणें अधिक उचित होईल. मंत्रिपद स्वीकारण्यापूर्वी ठाणें जिल्हा हें त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र बनविलें होतें व ह्या मर्यादित क्षेत्रांत राहूनच आपणास जेवढी लोकसेवा करतां येईल तेवढी करावी अशी त्यांची प्रवृत्ति होती. म्हणूनच मंत्रिपदाबद्दल विचारणा होतांच अण्णा-

साहेब हुरळून गेले नाहींत अगर त्यांनीं त्वरित होकारही दिला नाहीं. मंत्रिपदाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत आली म्हणूनच त्यांनीं ती स्वीकारली. मंत्रिपद स्वीकारल्यानंतरही परत आपल्या जिल्ह्यांत जावें असे त्यांच्या मनांत कांहीं कांहीं वेळां विचार येत. परंतु आपल्यावर टाकलेली जबावदारी टाळणें ही कर्तव्यच्युति होईल हें त्यांना पटल्यानंतर एकनिश्चयानें अण्णासाहेब आपल्या कामाला लागले. अण्णासाहेबांवर टाकण्यांत आलेली कामगिरी त्यांनीं किती उत्तम प्रकारें पार पाडली ह्याची कल्पना मागच्या कांहीं प्रकरणांवरून वाचकांना आतां आली असेलच. मंत्री म्हणून अण्णासाहेबांनीं केलेल्या बहुमोल कामगिरीची संपूर्ण कल्पना फारच थोड्या जणांना असल्याकारणानें तिच्या संबंधींची सविस्तर माहिती मागील प्रकरणांतून दिली आहे. विद्युल्लतेचा झगझगाट डोळ्यांना दिपवितो, मेघांचा गडगडाट कानांना लगेच ऐकूं येतो, परंतु जीवनधारणेसाठीं व जीवनाच्या विकासासाठीं अत्यावश्यक असलेल्या उष्णतेचें कार्य आपल्या चटदिशीं लक्षांत येत नाहीं. अण्णासाहेबांनीं मंत्री म्हणून केलेलें कार्य अशाच स्वरूपाचें आहे. परंतु आपण आपली जबाबदारी उत्तम प्रकारें पार पाडली ह्याची जाणीव अण्णासाहेबांना होती. कर्तव्यपूर्तीचें समाधानही त्यांना लाभलें होतें. मंत्रिपदाच्या जबाबदारींतून मुक्त होण्याची आतां ते वाट पाहात होते. प्रकृतींत अधून मधून बिघाड होत चालल्याची जाणीवही त्यांना होत चालली होती. प्रातःकालापासून सर्व दिवसभर अंतरिक्षांत भराऱ्या मारणारे पक्षी ज्या ओढीनें सूर्यास्तापूर्वीं आपल्या घरट्यांत परत येतात तशाच प्रकारची ओढ आपल्या कर्मभूमींत जाण्यासाठीं अण्णासाहेबांना लागली होती. अण्णासाहेबांचें जीवनाच्या व्यापक क्षेत्रांतील परिभ्रमण पुरें झालें होतें. आतां कांहीं फारसें पाहावयाचें राहिलें नव्हतें, फारसें अनुभवावयाचें राहिलें नव्हतें. कर्मयोगाच्या साधनेंत अण्णासाहेब यशस्वी झाले होते. कर्तव्य म्हणून लोकसभेच्या ठाणें मतदार संघांतील सर्वसाधारण जागेसाठीं अण्णासाहेब कॉंग्रेस पक्षातर्फे उभे राहिले. लोकसभेच्या ह्या मतदार संघां-

तील दोन्ही जागा – एक सर्वसाधारण व एक राखीव – कॉंग्रेसला मिळतील ह्याबद्दल शंका नव्हती. राखीव जागेसाठीं कॉंग्रेस पक्षातर्फे जव्हारचे अनंत सावळाराम नंदकर ह्यांना उभें करण्यांत आलें होतें. ठाणें मतदार संघांतील अण्णासाहेबांची जागा कॉंग्रेसच्या हुकमी जागांपैकीं एक समजली जात होती. अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्याची तशीच सेवा केली होती. त्यांना आपल्या जिल्ह्याबद्दल व कार्यकर्त्यांबद्दल फार आत्मविश्वास वाटत होता. त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून चार उमेदवार उभे असले तरी त्यांत महत्त्वाचे उमेदवार डॉ. गिडवानी हेच होते. कल्याणजवळील उल्हास नगरांतील निर्वासितांचीं बहुसंख्य मतें आपणांस मिळतील ह्या अपेक्षेनें डॉ. गिडवानी ह्या निवडणुकीस सोशालिस्ट पक्षातर्फे उभे राहिले होते. ठाणें जिल्ह्याशीं ह्यापूर्वी त्यांचा कधींही संबंध आला नव्हता. ठाणें जिल्ह्याचें नांव कदाचित् पूर्वी ऐकून त्यांना माहीत असेल तेवढेंच. सोशालिस्ट पक्षाचें कुंकूंही त्यांनीं ह्या निवडणुकीच्या वेळींच पहिल्यानें लावून घेतलें. सोशालिस्ट पक्षाबरोबर झालेला त्यांचा हस्तमिलाफ सोशालिस्ट पक्षाच्या आणि त्यांच्या दृष्टीनें परस्परांना सोयीचा होता. परंतु केवळ सोशालिस्ट पक्षाच्या मदतीनें अगर उल्हासनगर येथें मिळणाऱ्या मतांच्या जोरावर डॉ. गिडवानी निवडून येऊं शकत नव्हते ह्याबद्दल सर्वांनाच खात्री होती. निवडणूक जसजशी जवळ आली तसतशीं कॉंग्रेस संघटनेच्या प्रचाराचीं चक्रें भराभर फिरूं लागलीं. जिल्हाभर अण्णासाहेबांचे विश्वासू कार्यकर्ते प्रचार करीत होते. यशाबद्दल अण्णासाहेबांना मुळींच शंका नव्हती. अण्णासाहेबांचा आत्मविश्वासही दांडगा होता. त्यामुळें आणि मुख्यतः प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मतदार संघांत निवडणुकीच्या प्रचारासाठीं अण्णासाहेब फार वेळां बाहेर पडले नाहींत. परंतु ह्यामुळें निवडणुकींतील त्यांचें यश धोक्यांत येण्याचा सुतरामही संभव नव्हता. सर्वसाधारण जागेसाठीं श्री. ठाकूरदास सी. अग्रानी, श्री. चोईथराम पी. गिडवानी, श्री. के. टी. रोहेरा, श्री. दौलतराव जे. झुंजारराव व अण्णासाहेब असे पांच उमेदवार उभे असून

राखीव जागेसाठीं श्री. बी. जी. बोकड, श्री. एन्. पी. लाखण व श्री. ए. एस्. नंदकर असे तीन उमेदवार उभे राहिले होते. ह्या उमेदवारांपैकीं श्री. अम्रानी व श्री. रोहेरा ह्यांनीं मतदानास सुरुवात होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर निवडणुकींतून माघार घेतली. एखाद्या उमेदवारास निवडणूक लढवावयाची नसल्यास मतदानास सुरुवात होण्यापूर्वी कायद्यानें ठरविण्यांत आलेल्या मुदतीच्या आंत आपली उमेदवारी त्याला मागें घ्यावी लागते. परंतु वरील उमेदवारांनीं आपलीं नांवें ह्या मुदतींत मागें न घेतल्यामुळें कायद्याच्या दृष्टीनें त्यांची उमेदवारी रद्द होऊं शकली नाहीं व प्रत्यक्ष मतदानाच्या वेळीं राहिलेल्या इतर उमेदवारांच्या पेट्यांबरोबर त्यांच्याही पेट्या मतदानासाठीं मतदान केन्द्रावर ठेवण्यांत आल्या. ह्या पेट्या प्रत्येक मतदान केन्द्रावर पुढील क्रमानें ठेवण्यांत आल्या होत्या. १ श्री. अम्रानी, २ श्री. बोकड, ३ श्री. गिडवानी, ४ श्री. लाखण, ५ श्री. नंदकर, ६ श्री. रोहेरा, ७ अण्णासाहेब व ८ श्री. झुंजारराव. ठाणें मतदार संघांतील मतदान ता. ३, ७ व ११ जानेवारी १९५२ रोजीं तीन हप्त्यांनीं झालें. मतदान सर्वत्र उत्तम झालें होतें. कॉंग्रेस उमेदवारांना भरीव पाठिंबा मिळाला होता. मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर ज्या क्रमानें मतदान केन्द्रावर उमेदवारांच्या पेट्या ठेवण्यांत आल्या होत्या त्या क्रमानें मतमोजणीसाठीं पेट्या घेण्यांत आल्या. पहिलीच पेटी आपली उमेदवारी मागें घेतलेल्या श्री. अम्रानी ह्या उमेदवाराची होती. प्रत्येक केन्द्रांतील त्यांच्या पेटींतून मतपत्रिका सारख्या बाहेर येऊं लागल्या. त्यामुळें मतपत्रिका पेटींत टाकतांना कांहीं मतदारांकडून घोटाळा झाला असावा अशी शंका येऊं लागली. ठाणें जिल्ह्यांतील बराचसा भाग जंगल विभाग आहे. ह्या भागांतील आदिवासी व इतर मागासलेल्या लोकांच्या आयुष्यांत मतदान करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें गडबडून जाऊन त्यांच्यापैकीं कांहींनीं श्री. अम्रानी ह्यांच्या पहिल्याच पेटींत आपल्या मतपत्रिका टाकल्या असाव्यात असा निष्कर्ष निघूं शकत होता. परंतु अशाच प्रकारें गडबडून

जाऊन भलत्याच पेटींत मतदारांनीं आपल्या मतपत्रिका टाकल्या असल्यास निवडणुकीच्या निकालाला निराळें वळण लागण्याचा धोका निर्माण झाला होता. श्री. अम्रानी ह्यांच्या पेट्यांतून एकंदर २१,१३२ मतपत्रिका निघाल्या. निवडणुकींतून माघार घेतलेले दुसरे उमेदवार श्री. रोहेरा हे होते. त्यांना तर श्री. अम्रानीपेक्षांही जास्त म्हणजे २९,१८२ मतें पडलीं होतीं ! ह्या अनपेक्षित प्रकारामुळें निकालाच्या दृष्टीनें परिस्थिति गुंता-गुंतीची झाली. राखीव जागेसाठीं कॉंग्रेस पक्षातर्फें उभे राहिलेले श्री. नंदकर ह्यांना एकंदर १,५१,९५२ मतें मिळालीं. श्री. नंदकर ह्यांना मिळालेल्या मतांवरून ते निवडून आल्यासारखेच होते. त्यांच्या अगोदर श्री. गिडवानी ह्यांच्या मतांची मोजणी झाली होती. त्यांना एकंदर १,४०,५९५ मतें पडलीं होतीं. श्री. नंदकर व त्यांच्या मतांत एकंदर ११,३५७ मतांचा फरक होता. श्री. नंदकर ह्यांच्या पेट्यांना लागून असलेल्या श्री. रोहेरा ह्यांच्या पेट्यांतून २९ हजारांवर मतपत्रिका निघाल्या होत्या. मतदारांनीं गडबडून जाऊन भलत्याच पेटींत आपल्या मतपत्रिका टाकल्यामुळें हजारों मतें फुकट गेल्याचें आतांपर्यंत सिद्ध झालें होतें. राहिलेल्या मतांचा विचार करतांना अण्णासाहेबांच्या व श्री. गिडवानी ह्यांच्या मतांत फार मोठा फरक पडण्याची शक्यता नव्हती. अण्णासाहेबांच्या पेट्यांतील मतें मोजल्यानंतर अण्णासाहेबांना एकंदर १,४०,६०९ मतें मिळाल्याचें आढळून आलें. अण्णासाहेबांना श्री. गिडवानी ह्यांच्या मतांपेक्षां अवघीं चौदा मतें जास्त मिळालीं होतीं. सर्वसाधारण जागेसाठीं उभे असलेले पांचवे उमेदवार श्री. झुंजारराव ह्यांना ६२,८६४ मतें मिळालीं होतीं. पहिल्या मतमोजणींत अण्णासाहेबांच्या व श्री. गिडवानी ह्यांच्या मतांत फार थोडें अंतर असल्यामुळें श्री. गिडवानी ह्यांनीं दुसऱ्या मतमोजणीची मागणी केली. दुसऱ्या कसोशीच्या मतमोजणींत अण्णासाहेबांना श्री. गिडवानी ह्यांच्यापेक्षां नऊ मतें अधिक मिळाल्याचें आढळून आलें. परंतु ह्या मतमोजणींत एक चमत्कारिक गोष्ट आढळून आली. पालघर तालुक्यांतील अक्करपट्टी मतदान

केन्द्रावर मतदारांना लोकसभेच्या निवडणुकीच्या मतपत्रिका देण्याऐवजीं मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीच्या मतपत्रिका देण्यांत आल्या होत्या. लोकसभेच्या आणि विधिमंडळाच्या निवडणुकी प्रत्येक मतदान केन्द्रावर एकाच दिवशीं झाल्या होत्या. त्यामुळें हा घोटाळा झाला. चुकीनें देण्यांत आलेल्या ह्या मतपत्रिकांपैकीं ३७१ मतपत्रिका डॉ. गिडवानी ह्यांच्या पेटींत आढळून आल्या. अण्णासाहेबांना ह्याप्रमाणें मिळालेलीं मतें ८४ होतीं. मतपत्रिका चुकीनें दिल्या गेल्या असल्या तरी मतदारांचा उद्देश लक्षांत घेऊन हीं मतें आपल्या मतमोजणींत धरावीं असा अर्ज श्री. गिडवानी ह्यांनीं निवडणुकीच्या रिटर्निंग ऑफिसरकडे केला. डॉ. गिडवानी ह्यांनीं उपस्थित केलेल्या मुद्याबाबत रिटर्निंग ऑफिसरनीं इलेक्शन कमिशनर श्री. सेन ह्यांच्याशीं टेलिफोनवरून विचारविनिमय करून कायद्याच्या दृष्टीनें डॉ. गिडवानी ह्यांनीं उपस्थित केलेला मुद्दा ग्राह्य धरतां येत नाहीं असा निकाल दिला आणि अण्णासाहेब नऊ जादा मतांनीं लोकसभेचे सभासद म्हणून निवडून आले.

ह्या निवडणुकीबाबत श्री. गिडवानी स्वस्थ बसणार नव्हते हें निश्चित होतें. परंतु अण्णासाहेबांना इतकीं मतें कमी कां मिळालीं ह्याची छाननी होणें जरूर आहे. विशेषतः राखीव जागेसाठीं असलेले कॉंग्रेसचे दुसरे उमेदवार श्री. नंदकर ह्यांना अण्णासाहेबांपेक्षां अकरा हजार मतें अधिक मिळावीं ही विशेष आश्चर्याची गोष्ट होती. ह्या निवडणुकीस उभे राहाण्यापूर्वीं ठाणें जिल्ह्यांतील जनतेलाच काय परंतु जिल्ह्यांतील चांगल्या चांगल्या कार्यकर्त्यांनासुद्धा श्री. नंदकर ह्यांचें नांव ऐकूनही माहीत नव्हतें. अशा उमेदवाराला अण्णासाहेबांपेक्षां अकरा हजार मतें जास्त कां पडावींत हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. शिवाय ह्या निवडणुकी-मध्यें उमेदवारी मागें घेतलेल्या उमेदवारांच्या पेट्यांत पडलेलीं हजारों मतें फुकट गेलीं हाही मुद्दा ह्या निवडणुकीच्या निकालाचें पृथक्करण करतांना विचारांत घेणें जरूर आहे. अशा प्रकारें फुकट गेलेल्या मतांपैकीं पहिल्या म्हणजे श्री. अग्रानी ह्यांच्या पेट्यांतून आणि श्री. नंदकर ह्यांच्या

पेट्यांशेजारील श्री. रोहेरा ह्यांच्या पेट्यांतून ५२ हजारांवर मतें निघालीं. ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतां कांहीं ठाम निष्कर्ष काढणें अवघड नाहीं. कॉंग्रेस उमेदवारांच्या पेट्यांच्या क्रमांकांत पहिली पेटी श्री. नंदकर ह्यांची व दुसरी पेटी अण्णासाहेबांची होती. दोन्ही पेट्यांवर उमेदवारांचें चिन्ह बैलजोडी हें होतें. श्री. नंदकर ह्यांच्या पेटीवरील बैलजोडीच्या चित्राभोवतीं एक तांबड्या रेघेचें वर्तुळ काढण्यांत आलें होतें. हाच काय तो ह्या दोन्ही पेट्यांवरील चित्रांत फरक होता. सार्वत्रिक मतदानाच्या पद्धतीनें पहिल्यानेंच झालेल्या ह्या प्रचंड निवडणुकींत मतदान करण्याचा खेड्यांतील लाखों मतदारांचा हा पहिलाच प्रसंग होता आणि त्यांत ठाणें जिल्ह्यांतील जंगल विभागांतील आदिवासी वगैरे मतदार तर निवडणुकीच्या बाबतींत अगदींच अनभिज्ञ होते. जेथें पेटीमध्यें नीट मतपत्रिका टाकण्याची मारामार तेथें नुसतें बैलजोडीचें चित्र व वलयांकित बैलजोडीचें चित्र ह्यांतील फरक कोठून कळणार? त्यांतल्या-त्यांत अवधान ठेवून ह्या मतदारांपैकीं कांहींनीं पहिली मतपत्रिका पहिल्या बैलजोडीच्या म्हणजे श्री. नंदकर ह्यांच्या पेटींत टाकली. परंतु दुसरी मतपत्रिका अण्णासाहेबांच्या पेटींत न टाकतां गडबडीनें श्री. नंदकर ह्यांच्या पेटीशेजारील दुसऱ्या पेटींत टाकली असावी ह्याबद्दल शंका नाहीं. ज्यांना कांहींच कळलें नाहीं त्यांनीं आपल्या मतपत्रिका पहिल्या पेटींत टाकल्या व कांहींनीं वेळेवर ज्याप्रमाणें सुचेल त्याप्रमाणें दुसऱ्या एखाद्या पेटींत टाकल्या. श्री. नंदकरांना अण्णासाहेबांपेक्षां ११ हजार मतें जास्त मिळालीं आणि उमेदवारी मागें घेतलेल्या उमेदवारांना ५२ हजारांवर मतें मिळालीं ह्याची मीमांसा दुसऱ्या कोणत्याच मार्गानें होऊं शकत नाहीं. हीं फुकट गेलेलीं मतें योग्य प्रकारें दिलीं गेलीं असतीं तर अण्णासाहेबांना व श्री. गिडवानी ह्यांना मिळालेल्या मतांत जमीन-अस्मानाचा फरक पडला असता ह्यांत मुळींच शंका नाहीं. ह्या निवडणुकींत चुकीच्या पेटींत मतपत्रिका टाकल्या गेल्यामुळें मुंबई राज्यांत इतरत्र कोठेंही एवढ्या प्रचंड प्रमाणावर मतें फुकट गेलीं नसतील. ह्या

निवडणुकींत अण्णासाहेबांना ठाणें जिल्ह्यानें दगा दिला असा कांहीं ठिकाणीं निष्कर्ष काढण्यांत येतो त्यांत मुळींच तथ्यांश नाहीं. ज्यांचें भलें व्हावें ह्यासाठीं अण्णासाहेब आयुष्यभर झटले, झगडले, त्यांच्यांतीलच कांहीं अगदीं तुरळक व्यक्तींनीं आपल्या हातून काय घडत आहे ह्याचें भान न राहून क्वचित् प्रतारणा केली असली तरी अण्णासाहेबांचा ठाणें जिल्हा ह्या निवडणुकीमध्यें अण्णासाहेबांच्या पाठीशीं होता ह्याबद्दल शंका नाहीं. निवडणुकीच्या निकालानंतरही अण्णासाहेबांचा ह्या बाबतींतला विश्वास मुळींच ढळला नाहीं. दोषच द्यावयाचा झाल्यास अज्ञ, अशिक्षित मतदारांना मतदानासंबंधीं शिक्षण देण्याच्या बाबतींत कॉंग्रेसच्या प्रचारकांकडून जे प्रयत्न झाले ते अपुरे पडले असें म्हणतां येईल. परंतु त्यांनाही मतदारांच्या अज्ञानामुळें एवढ्या मोठ्या प्रमाणांत धोका पोचेल अशी कल्पना येणें शक्य नव्हतें. कारणें कांहीं असोत परंतु ह्या निवडणुकीच्या अनपेक्षित निकालामुळें सर्व ठाणें जिल्हा खडबडून जागा झाला ह्यांत शंका नाहीं.

अपेक्षेप्रमाणें रिटर्निंग ऑफिसरच्या निकालाविरुद्ध श्री. गिडवानी ह्यांनीं इलेक्शन ट्रायब्यूनलपुढें अपील केलें. कायद्याच्या दृष्टीनें अण्णासाहेबांची बाजू फार मजबूत होती. ठाणें जिल्ह्यासाठीं नेमण्यांत आलेल्या श्री. नोरोन्हा, श्री. ए. ए. आडारकर व ठाण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. वझे ह्यांच्या ट्रायब्यूनल पुढें हें अपील चाललें. ह्या अपिलाचें काम पाहाण्यासाठीं अण्णासाहेबांतर्फे ठरविण्यांत आलेले मुंबई हायकोर्टाचे सुप्रसिद्ध वकील श्री. सीरवाई त्यांच्या दुसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या कामामुळें येऊं न शकल्यामुळें अण्णासाहेबांतर्फे श्री. के. टी. देसाई ह्यांनीं काम चालविलें. श्री. गिडवानी ह्यांच्या तर्फे सिंध प्रान्ताचे भूतपूर्व ॲडव्होकेट जनरल श्री. फत्तेचंद हे काम पाहात होते. ट्रायब्यूनलचा निकाल अण्णासाहेबांच्या विरुद्ध गेल्यामुळें सर्वांनाच मोठा धक्का बसला. कायद्याच्या दृष्टीनें मतदाराचा उल्लेख लक्षांत न घेतां मताच्या पेटींत पडलेल्या मतपत्रिका बरोबर होत्या किंवा नाहीं एवढेंच पाहिलें पाहिजे असें मोठमोठ्या कायदेपंडितांचें मत होतें. मतदारांचा उद्देश पाहावयाचा तर उमेदवारी

मागें घेतलेल्या उमेदवारांच्या पेटींत पडलेलीं ५२ हजार मतें फुकट जावींत असा उद्देश हें मतदान करणाऱ्यांचा निश्चित नव्हता असें त्यांचें म्हणणें होतें. कायदेपंडितांचा सल्ला कांहींही असला तरी ट्रायब्यूनलच्या निकालानें अण्णासाहेबांची निवडणूक रद्द झाली. ट्रायब्यूनलच्या ह्या निकालावर हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें; परंतु अशा प्रकारचें अपील विचारांत घेण्याचा आपणांस अधिकार नाहीं, ह्या मुद्द्यावर हायकोर्टानें ह्या अपिलाचा विचार केला नाहीं. हायकोर्टानंतर सुप्रीम कोर्टाकडे जाण्याचा सल्ला अण्णासाहेबांना कायदेपंडितांकडून मिळाला होता. परंतु तो त्यांनीं मानला नाहीं. ट्रायब्यूनलच्या निकालामुळें अण्णासाहेबांनीं बाहेरून दाखविलें नाहीं तरी त्यांच्या मनावर निश्चित आघात झाला होता. सबंध आयुष्यांत पहिल्यानेंच अपयश त्यांच्या पदरीं आलें होतें. त्यांच्या मानी मनावर ह्याचा आघात झाल्याशिवाय कसा राहील? जेथें खुल्या मैदानावर लढत देऊन भरघोस यश मिळवावयाचें तेथें पुन्हा पुन्हा कोर्टात जाऊन यश मिळण्याचा संभव असूनही तसा प्रयत्न करणें त्यांच्या मानी मनाला रुचलें नाहीं. एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें आपल्या पदरीं आलेलें अपयश त्यांनीं मोठ्या धैर्यानें पचवून टाकलें. अगदीं अशाच प्रकारचें अपयश गेल्या लोकसभेच्या निवडणुकींत श्री. एच. व्ही. कामत ह्यांना आलें होतें. ट्रायब्यूनलचा निकालही अण्णासाहेबांच्याप्रमाणें त्यांच्या विरुद्ध गेला होता. परंतु परवांच त्यांनीं सुप्रीम कोर्टापुढें केलेल्या अपिलाचा निकाल त्यांच्या बाजूनें लागलेला आहे. अण्णासाहेबांच्या पश्चात् झालेला हा निकाल ऐकून अण्णासाहेब हयात असते तर त्यांना काय वाटलें असतें हें सांगणें फार कठीण आहे. परंतु आपली निवडणूक रद्द झाली तरी अंतिम यश आपल्या बाजूचेंच होतें एवढें समाधान तरी त्यांना निश्चित लाभलें असतें. परंतु नियतीनें त्यांना एवढेंही समाधान लाभूं दिलें नाहीं. नियतीचे मार्ग नेहमींच अगम्य असतात हेंच खरें. ह्यापेक्षां ह्या दुर्दैवी घटनेचा दुसरा कोणता अर्थ असणार?

प्रकरण सव्विसावें

# महाप्रयाण

१९५१ च्या ऑगस्ट-सेप्टेंबर महिन्यांत पुण्यास मुक्काम असतांना अण्णासाहेबांच्या प्रकृतींत बिघाड होण्यास सुरुवात झाली. संधिवाताच्या त्यांच्या दुखण्यानें पुन्हा जोरानें डोकें वर काढण्यास सुरुवात केली. १९३५ सालीं पहिल्यानें ते संधिवाताच्या विकारानें आजारी झाले होते. परंतु त्या वेळच्या त्यांच्या दुखण्याचा जोर विशेष नव्हता व त्यावर तावडतोब उपाययोजना झाल्यामुळें त्या दुखण्यानें अण्णासाहेबांना विशेष त्रास दिला नाहीं. त्यानंतर १९५० पासून कधीं कधीं बोटांचे सांधे दुखणें, ढोपर दुखणें ह्यांसारखा त्रास चालू झाला. परंतु तात्पुरत्या उपायानें तो बरा होई. मधून मधून स्थूलपणा वाढत जाऊन वजनही सारखें वाढत जाई. त्यासाठीं ते डॉ. चुघ ह्यांचें होमिओपाथिक औषध घेत असत. त्यामुळें त्यांना बरें वाटे. स्थूलपणा वाढूं नये म्हणून त्यांनीं आहारावर फार नियंत्रण ठेविलें होतें. सांधे दुखण्याचा कधींतरी त्रास होई म्हणूनही नियंत्रित आहार घेणें त्यांना आवश्यक होऊन बसलें. पुढें एखादेदुसरें भाषण केलें म्हणजे त्यांचा आवाज एकदम बसून जात असे. त्यासाठीं ते डॉ. एल्. एच्. हिरानंदानी

ह्यांच्याकडून उपचार करून घेत असत. मधून मधून डॉ. ए. आर्. रांगणेकरही त्यांची प्रकृति तपाशीत असत. १९३५ सालच्या आजारांतून डॉ. रांगणेकर ह्यांनींच त्यांना त्वरित बरें केलें होतें. तेव्हांपासून डॉक्टर रांगणेकर ह्यांच्यावर त्यांची श्रद्धा बसली व पुढें पुढें त्यांचे संबंध अगदीं घरोब्याचे झाले. स्वतःची प्रकृति बिघडली अगर त्यांच्या कुटुंबांतील कोणीही विशेष आजारी पडलें कीं पहिल्यानें ते डॉ. रांगणेकर ह्यांना बोलावीत असत. मुंबईस मुक्काम असला म्हणजे तें सहज जमे. परंतु १९५१ सालीं पुण्याच्या मुक्कामांत त्यांच्या आजारानें उचल खाल्ली म्हणून पुण्याच्या डॉक्टरांकडून उपाय करून घेणें भाग पडलें. पुण्याचे सुप्रसिद्ध डॉक्टर कोयाजी ह्यांनीं त्यांच्यावर पुष्कळ उपाय करून पाहिले. परंतु त्यांच्या प्रकृतींत विशेष सुधारणा झाली नाहीं. गुण येई परंतु तो तात्पुरता असे. कधीं मनगटाचा सांधा धरला जाई, कधीं ढोपरेंच एकदम दुखूं लागत तर कधीं खांद्याच्या सांध्यामधून कळा येत असत. त्यामुळें त्यांना पुष्कळ वेळां झोप येत नसे. मानसिक त्रासही फार होई. पूर्वीं आनंदी व खेळकर असलेले अण्णासाहेब आतां कांहींसे चिडखोर व अबोल बनत चालले. शारीरिक व मानसिक त्रासामुळें ते क्वचित् एकदम रागावत असत. त्यांना झालेलें दुखणें कायमचें बरें होण्याच्या स्वरूपाचें नसल्यानें त्यांच्या अस्वस्थतेंत अधिकच भर पडली. परंतु त्यांनीं धीर सोडला नाहीं. त्यांत होणारा त्रास ते निमूटपणें सहन करीत. त्यांचें नेहमींचें काम अगर कार्यक्रम बंद पडले नव्हते. भेटीस नेहमींप्रमाणें लोक येत. अण्णासाहेब पूर्वींप्रमाणेंच त्यांच्याशीं अगदीं सहजपणें वागत. ऑफिसचें काम पाहाणेंही नेहमींप्रमाणें चालूच होतें. अण्णासाहेबांनीं आत्मसंयमनाची जणूं आतां साधना सुरू केली होती.

ऑक्टोबर महिन्यांत पुण्याहून मुंबईस मुक्काम आल्यानंतर अण्णासाहेबांच्या प्रकृतींत बरीच सुधारणा झाली. क्वचित कधींतरी एखादा सांधा दुखत असे एवढेंच. अण्णासाहेबांना हायड्रोसीलचाही

विकार असल्यामुळें प्रकृतींत ह्याप्रमाणें सुधारणा होतांच डॉक्टरांच्या सल्ल्यावरून मलबारहिलवरील सेंट एलिझाबेथ नर्सिंग होममध्यें त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. ऑपरेशन मुंबईचे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. एस्. आर्. जोगळेकर ह्यांनीं केलें होतें. ऑपरेशन उत्तम रीतीनें पार पडलें. परंतु जखम भरून येण्यास बराच अवधि लागला. त्यामुळें अण्णासाहेबांना हॉस्पिटलमध्यें बरेच दिवस राहावें लागलें. संधिवाताच्या दुखण्यामुळें आधींच त्यांचें मनस्वास्थ्य बिघडलें होतें. त्यांत ऑपरेशनमध्यें बरेच दिवस गेल्यामुळें प्रकृतीसंबंधीं त्यांना थोडीशी काळजी वाटूं लागली. त्यानंतर लोकसभेची निवडणूक झाली. निवडणुकींत त्यांना विजय मिळाला तरी तेवढ्यानेंच हें निवडणुकीचें प्रकरण संपलें नव्हतें. शिवाय निवडणुकीचा जो चमत्कारिक निकाल अखेर लागला त्याचाही परिणाम, त्यांनीं तसें कांहीं दाखविलें नाहीं तरी त्यांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. परंतु त्यांच्यावर झालेला हा आघात त्यांनीं आंतल्याआंत जिरविला आणि त्यांचे नित्य व्यवहार पूर्वीप्रमाणें सुरू झाले. निवडणुकीचा निकाल सुरुवातीस त्यांच्या बाजूचा झाल्यामुळें लोकसभेच्या अधिवेशनासाठीं अण्णासाहेब दिल्लीस गेले. दिल्ली येथें असतांना साऊथ ॲव्हेन्यू-मधील सरकारी फ्लॅटमध्यें अण्णासाहेब राहात असत. त्या वेळीं त्यांच्याबरोबर लोकसभेमध्यें सांगली भागांतून निवडून आलेले श्री. आबासाहेब पवार राहात असत. दिल्लींतील भयंकर उन्हाळ्यामुळें म्हणा अगर इतर कांहीं कारणामुळें म्हणा अण्णासाहेबांना संधिवाताच्या दुखण्याचा पुन्हा त्रास होऊं लागला. पुन्हा त्यांचे सांधे दुखूं लागले. नेहमींच्या शारीरिक हालचाली होण्यांत व्यत्यय येऊं लागला. परंतु अशाही परिस्थितींत ते लोकसभेच्या अधिवेशनास नियमितपणें हजर राहात. ह्या अधिवेशनांत त्यांनीं एक महत्त्वाचें भाषणही केलें. आपल्या अनेक सहकाऱ्यांच्या सहवासांत दिल्ली येथील मुक्कामांतील काळ शक्य तितक्या आनंदांत घालविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें

दिल्लीचें अधिवेशन संपण्यापूर्वीच अण्णासाहेब दोन चार दिवस आधीं दिल्लीहून घरीं आले. ताबडतोब डॉक्टर रांगणेकरांनीं त्यांची प्रकृति तपासली व उपचारही करून पाहिले. परंतु त्यांचें दुखणें विशेष कमी होण्याचें चिन्ह दिसेना. म्हणून डॉ. रांगणेकर ह्यांच्या सल्ल्यावरून मुंबईचे सुप्रसिद्ध डॉक्टर मोदी ह्यांना त्यांची प्रकृति दाखविली. त्यांच्या मतें अण्णासाहेबांचें संधिवाताचें दुखणें कायम बरें होण्याच्या स्वरूपाचें नव्हतें. त्यांनीं केलेल्या उपाययोजनेचाही फारसा उपयोग झाला नाहीं. आयुर्वेदांत अण्णासाहेबांच्या दुखण्यावर उत्तम उपाय आहे असें त्यांना अनेकांनीं सांगितल्यावरून आयुर्वेदिक औषधोपचार करून घेण्याचें अण्णासाहेबांनीं ठरविलें आणि त्याप्रमाणें वसई येथील पिढीजात वैद्य श्री. बबनराव जोशी ह्यांचा औषधोपचार त्यांनीं सुरू केला. श्री. बबनराव ह्यांनाही अण्णासाहेब संपूर्ण बरे होतील ह्यासंबंधीं खात्री होती. आणि झालेंही तसेंच. दोन-तीन महिन्यांच्या औषधोपचारानंतर अण्णासाहेबांचे सांधे दुखणें अजिबात नाहींसें झालें व त्यांना पूर्ववत् हुशारी व उत्साह वाटूं लागला. नेहमींप्रमाणें मुंबईचे पॅथॉलॉजिस्ट डॉ. एम्. जी. प्रधान ह्यांच्याकडून अण्णासाहेबांनीं युरिक ॲसिडची तपासणी करून घेतली. अण्णासाहेबांच्या बाबतींत युरिक ॲसिडचें प्रमाण सर्वसाधारण प्रमाणाप्रमाणें आढळून आल्यामुळें डॉ. प्रधान ह्यांनाही आश्चर्य वाटलें. १९३५ सालापासून अनेक वर्षें नियमानें अण्णासाहेब डॉ. प्रधान ह्यांजकडून युरिक ॲसिडची तपासणी करून घेत असत. परंतु इतक्या वर्षांत युरिक ॲसिडबाबतचा इतका चांगला रिपोर्ट पहिल्यानेंच मिळाला होता. आपण ह्या दुखण्यांतून आतां कायमचे बरे झालों अशा प्रकारचें समाधान अण्णासाहेबांना वाटूं लागलें. परंतु हें समाधान कायम टिकण्याचा योग नव्हता. दैवाचा पाठशिवणीचा खेळ सुरू झाला होता. एक दुखणें बरें झालें परंतु कांहीं दिवसांनीं १९५३च्या मे महिन्यांत आणखी दुसरेंच दुखणें उद्भवलें. कांहीं दिवस विश्रांतीसाठीं अण्णासाहेब बोर्डीस गेले होते त्या वेळीं त्यांच्या डोक्यावर लहान लहान पुळ्या उठूं लागल्या. परंतु

उन्हाळ्यांतील उष्णतेनें ह्या पुळ्या उगवल्या असतील असाच सर्वांचा समज झाला. त्यांच्यावर मामुली उपाययोजना करण्यांत आली. अण्णासाहेब घरीं आल्यानंतर डोक्यावर निघालेल्या पुळ्यांसारख्याच पुळ्या त्यांच्या कमरेच्या भागावर उगवूं लागल्या व त्यांतून रक्तस्राव होणें सुरू झालें. अण्णासाहेब पडून असत. फिरणें वगैरेसारखे रोजचे कार्यक्रम आतां बंद होऊं लागले. ह्याच वेळीं भूदानयज्ञासाठीं श्री. दादा धर्माधिकारी विरार येथें आले होते. त्यांच्या कार्यक्रमास मात्र अशाही परिस्थितींत अण्णासाहेब उपस्थित राहिले व भूदानयज्ञास आपली एकावन्न एकर जमीन देऊन ह्या चळवळीला त्यांनीं आपली सक्रीय सहानुभूति दर्शविली. त्यानंतर दुखण्याचा जोर सारखा वाढत राहिल्यामुळें अण्णासाहेबांना मुंबईस हॉस्पिटलमध्यें हलविणें जरूरीचें वाटूं लागलें. त्याप्रमाणें मुंबई येथील भाटिया हॉस्पिटलमध्यें त्यांना जून महिन्याच्या सुरुवातीस हालविण्यांत आलें आणि डॉ. साठे व डॉ. फर्नांडिज ह्यांच्या देखरेखीखालीं औषधोपचार सुरू झाला. परंतु सुरुवातीस रोगाचें पूर्ण निदान न झाल्यामुळें पहिले चार आठ दिवस कांहींच गुण आला नाहीं. अण्णासाहेबांना झालेलें दुखणें ॲलर्जिक स्वरूपाचें असावें असें निदान करून त्यांनीं औषधोपचार केले. आठदहा दिवसांनंतर थोडा थोडा गुण येत चालल्याचें दिसून आलें. कमरेवरील व डोक्यावरील व्रणांमध्यें सुधारणा दिसून आली. चेहेऱ्यावर काळसरपणा आला होता त्यांतही सुधारणा होऊं लागली. सर्वांनाच अण्णासाहेब थोड्याच दिवसांत संपूर्ण बरे होणार अशी खात्री वाटूं लागली. परंतु आपणांवर चालून येणाऱ्या मृत्यूच्या पावलांची अस्पष्ट चाहूल अण्णासाहेबांना लागली असावी. भाटिया हॉस्पिटलमध्यें असतांना पुष्कळ वेळां ते मृत्यूच्या गोष्टी काढीत. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी त्याच वेळीं थोड्याशा आजारानंतर मृत्यु पावले होते. अण्णासाहेबांच्या भाषणांत त्यांच्या मृत्यूचा अनेक वेळां उल्लेख येई. अण्णासाहेबांनीं असा उल्लेख केला म्हणजे त्यांचें कोणी समाधान करूं लागल्यास अण्णासाहेब हसून लगेच उत्तर देत,

"अरे, मृत्यूंत घाबरण्यासारखें काय आहे? ह्या दुखण्यांत मला मृत्यु आला तर कांहीं वाईट वाटून घेऊं नका. माझ्या सबंध आयुष्यांत वाईट वाटण्यासारखें कांहीं घडलें आहे का? मग मृत्यु आला तर आपण वाईट वाटून कां घ्यावें? माझें जीवन मीं माझ्या तरुणपणींच समाजाच्या सेवेसाठीं दिलें होतें. शेवटपर्यंत मी सर्वांची सेवा करूं शकलों. त्यांत व्यत्यय आला नाहीं, ह्यांतच माझ्या व्रताची पूर्तता झाली; माझें जीवन सार्थकीं लागलें." अण्णासाहेब असे ज्या वेळीं बोलत त्या वेळीं त्यांचा चेहेरा शांत व निर्विकार असे. त्यांचा राग निवळला होता. त्यांची विषण्णता नाहींशी झाली होती. भावनांच्या, विकारांच्या बंधनांतून मुक्त झालेला त्यांचा आत्मा अनंतांतील आपल्या पुढील मार्गाचा जणूं शोध घेत होता. अण्णासाहेब असे बोलूं लागले म्हणजे ऐकणाराला भडभडून येई. मनांत अनेक शंकाकुशंकांचें काहूर उठे. परंतु तें क्षणभरच. अण्णासाहेबांच्या प्रकृतींत सारखी सुधारणा होत होती. अण्णासाहेब ह्या आजारांतून नक्की उठतील ह्याबद्दल शंकेला मुळींच जागा नव्हती आणि खरोखरच वीस बावीस दिवसांनंतर अण्णासाहेबांची प्रकृति साफ सुधारली. डोक्यावरील व कमरेवरील पुळ्यांतून होणारा रक्तस्राव थांबला. पुळ्याही नाहींशा झाल्या. अण्णासाहेब खोलींत हिंडूंफिरूं लागले. डॉक्टरांची परवानगी असल्यास अण्णासाहेबांनीं घरीं जाण्याची इच्छा दर्शविली व एक दोन दिवसांतच अण्णासाहेबांस घरीं जाण्याची परवानगी मिळाली. जवळ जवळ एक महिन्याच्या मुक्कामानंतर जुलै महिन्याच्या सुरुवातीस अण्णासाहेब घरीं गेले. अण्णासाहेब संपूर्ण बरे झाले म्हणून सर्वांना आनंद झाला. परंतु हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. चारपांच दिवसांतच त्यांच्या डोक्याचा व कमरेचा भाग पुन्हा पुळ्यांनीं नुसता फुलून निघाला. त्यांच्यांतून सारखा रक्तस्राव होऊं लागला. त्यांना अनंत यातना होऊं लागल्या. प्रकृतींतील बिघाड झपाट्यानें वाढूं लागल्यामुळें विरार येथें त्यांना ठेवणें धोक्याचें वाटून सायन हॉस्पिटलमध्यें त्यांना ता. ८ जुलै रोजीं दुपारीं हालविण्यांत आलें. पहिले दोन दिवस साधारण बरे गेले.

परंतु त्यानंतर त्यांच्या प्रकृतींत झपाट्यानें बिघाड होऊं लागला. अण्णासाहेबांना मेटॅलिक पॉयझनिंग झाल्याचें डॉक्टरांनीं निदान केलें व अनेक उपाय जोरानें सुरू झाले. डॉ. गिल्डर, डॉ. नथूभाई पटेल, वगैरे अनेक नामांकित डॉक्टरांनीं व हॉस्पिटलचे डॉ. व्होरा ह्यांनीं जे जे उपाय करतां येण्यासारखे होते ते ते उपाय करण्याची पराकाष्ठा केली. परंतु अण्णासाहेबांची प्रकृति सारखी बिघडत गेली. कोणत्याही उपायाचा उपयोग होईना. ता. १२ रोजीं त्यांची शुद्ध जाऊं लागली. त्यांच्या प्रकृतींत सुधारणा होण्याची आशा दुरावत चालली. हॉस्पिटलमध्यें शेंकडों लोक त्यांच्या समाचारासाठीं येऊं लागले. हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना पाहावयास येणाऱ्या लोकांसाठीं हॉस्पिटलमधील वेळेचे निर्बंध दूर केले. मंत्र्यांच्या, मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या अण्णासाहेबांच्या समाचारार्थ हॉस्पिटलला भेटी होऊं लागल्या. अनेक लोक हॉस्पिटलमध्यें रात्रभर जागत राहूं लागले. ता. १३ रोजीं पहांटेस अण्णासाहेबांच्या प्रकृतींत अधिकच बिघाड झाला आणि त्यांना प्राणवायूवर ठेवण्यांत आलें. अद्यापिही कांहीं चमत्कार होऊन अण्णासाहेब ह्या दुखण्यांतून पार पडतील व पुन्हा आपणांत वावरूं लागतील अशी अंधुक फसवी आशा सर्वांच्या मनांत तग धरून राहिली होती. जाणारा प्रत्येक क्षण जड होता. १३ जुलैची सकाळ गेली, दुपार संपली, रात्रही निभावली. १४ तारीख उजाडली. अण्णासाहेबांना प्राणवायूवर ठेवून चोवीस तास झाले होते. क्षणाक्षणाला क्षीण होत चाललेल्या आशेला थोडीशी धुगधुगी येऊं लागली. गीतेचें, बायबलचें पठण सारखें चालू होतें. प्रत्येकाच्या अंतःकरणांत एकच मूकप्रार्थना चालू होती. अण्णासाहेबांची मालवूं पाहाणारी क्षीण जीवनज्योत स्थिर व्हावी, प्रज्ज्वलित व्हावी. मध्यान्ह झाली. अण्णासाहेबांना प्राणवायूवर ठेवून आतां तीस तास झाले होते. अखेरची आशा अद्यापिही हेलकावे खात होती. अण्णासाहेबांच्या प्रकृतींत चढउतार होत नव्हता. लोकांची गर्दी सारखी वाढतच होती. सहाच्या सुमारास परत घसरणी सुरू झाली. अण्णासाहेबांचा श्वासोच्छ्वास मंद मंद होऊं लागला. शरीराची

हालचाल क्षीण, अस्पष्ट होऊं लागली. अण्णासाहेबांच्या महानिर्वाणाचा क्षण जवळ आला होता. सर्व आप्तमंडळींनीं, स्नेहीमंडळींनीं साश्रुनयनांनीं त्यांचें अखेरचें दर्शन घेतलें. सहा वाजून पंचवीस मिनिटांनीं अण्णासाहेबांची जीवनज्योत अनंतांत विलीन झाली. संकटकाळीं पर्वता-सारखा अचल उभा राहून अनेकांना धीर व साह्य देणारा, स्वसमाजास चैतन्यानें स्फुरविणारा, मनुष्यांतील देवपणाला आवाहन करणारा व आपल्या मातृदेशाच्या सेवेसाठीं आपलें जीवनपुष्प अर्पण करणारा, हा थोर समाजसेवक, त्यागी देशभक्त व निष्ठावान् कर्मयोगी सर्वांना दुःखसागरांत सोडून निघून गेला !

प्रकरण सत्ताविसावें

# स्मशानयात्रा

ता. १५ जुलै रोजीं अण्णासाहेबांचा पार्थिव देह रेल्वेनें विरार येथें त्यांच्या घरीं नेण्यांत आला. अण्णासाहेबांच्या निधनाची व विरार येथून निघणाऱ्या त्यांच्या स्मशानयात्रेची बातमी आदल्या दिवशींच रात्रीं रेडिओवरून जाहीर करण्यांत आल्यामुळें मुंबई आणि ठाणें जिल्ह्यांतून ठिकठिकाणांहून त्यांचे शेंकडों चहाते, स्नेही व निरनिराळ्या कार्यक्षेत्रांतील त्यांचे सर्व सहकारी त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं विरार येथें आले. श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. वैकुंठभाई मेहता अण्णासाहेबांना अखेरची श्रद्धांजलि वाहाण्यासाठीं हजर राहिले. जिल्हाधिकारी, जिल्ह्याचे पोलिसप्रमुख व निरनिराळे सरकारी अधिकारी उपस्थित होते. वसई व पालघर तालुक्यांतून तर माणसांची नुसती रीघ लागून राहिली होती. बरोबर नऊ वाजतां अण्णासाहेबांचा देह लोकांच्या दर्शनासाठीं त्यांच्या ओटीवर आणून ठेवण्यांत आला. एकामागून एक हजारों स्त्री पुरुषांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं अण्णासाहेबांच्या पार्थिव देहाला अखेरचें वंदन केलें. पुष्पहारांचा नुसता वर्षाव चालू होता. बरोबर १०॥ वाजतां अण्णासाहेबांचा देह उचलण्यांत आला. ज्या घरांत अण्णासाहेब असले म्हणजे चैतन्य वावरत आहे

असें वाटे त्या घरांत अण्णासाहेब आतां पुन्हा दिसणार नव्हते. जेथून कोणी कधींच परत येत नाहीं अशा निजधामाच्या प्रवासास अण्णासाहेब निघाले होते. स्मशानयात्रा सुरू झाली. हजारों लोक रांगांनीं जड पावलें टाकीत स्मशानाकडे चालले होते. अण्णासाहेबांबरोबर विरार गांवचें सौभाग्य निघून चाललें होतें. अकरा वाजतां स्मशानयात्रा दहनभूमींत पोचली. सकाळपासून पाऊस न पडतां आकाश नुसतें भरून राहिलें होतें. सर्वत्र वातावरणांत खिन्नता पसरली होती. अण्णासाहेबांचा पार्थिव देह चितेवर ठेवण्यांत आला. अग्निसंस्कारापूर्वी आचार्य भिसे ह्यांनीं ठाणें जिल्ह्यातर्फें आणि श्री. भाऊसाहेब हिरे ह्यांनीं महाराष्ट्र व मुंबईसरकारतर्फें आपल्या भाषणांत अण्णासाहेबांना श्रद्धांजलि वाहिली. पोलीसदलातर्फें अण्णासाहेबांना अखेरची सलामी ( Last post ) देण्यांत आली. मुंबई सरकारतर्फें व बाळासाहेब खेर ह्यांच्यातर्फें त्यांना पुष्पहार अर्पण करण्यांत आले. बरोबर ११॥ वाजतां अण्णासाहेबांच्या पार्थिव देहाला अग्निसंस्कार करण्यांत आला. ज्या भूमींत अण्णासाहेब जन्मास आले, जेथें ते लहानाचे मोठे झाले, जिला त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, त्याच भूमातेच्या कुशींत अण्णासाहेबांनीं अखेरची निद्रा घेतली.

प्रकरण अठ्ठाविसावें

# कुटुंब व मित्रपरिवार

अण्णासाहेबांचे वडील अगदीं तरुणपणीं निवर्तले. त्यांना एकंदर तीन अपत्यें झालीं. एक मुलगा म्हणजे आपले चरित्रनायक अण्णासाहेब व दोन मुली. अण्णासाहेबांच्या मातुश्री पद्माबाई ह्यांना अण्णासाहेबांच्या आयुष्यांत फार मोठें स्थान आहे. त्यांचा उल्लेख पूर्वीं येऊन गेलेलाच आहे. त्या १९२९ सालीं निवर्तल्या.

अण्णासाहेबांचा विवाह पूर्वींच्या रीतीरिवाजाप्रमाणें १९०५ सालीं झाला. त्यांच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णाबाई. त्यांच्या आयुष्याचा पूर्वभाग जरी जुन्या जमान्यांत गेला असला तरी नवीन परिस्थितीशीं समरस होऊन अण्णासाहेबांचा संसार त्यांनीं उत्तम रीतीनें पार पाडला. अण्णासाहेबांना एकंदर सहा मुलगे आहेत. त्यांना एक कन्या झाली होती परंतु कन्येचें सुख त्यांना फार दिवस लाभलें नाहीं.

अण्णासाहेबांचे थोरले चिरंजीव श्री. भाऊसाहेब बी. ए., एल्एल्. बी. असून त्यांचा जन्म १९१४ सालीं झाला. अण्णासाहेबांनीं घालून दिलेला लोकसेवेचा आदर्श पुढें ठेवून अण्णासाहेबांचें लोकसेवेचें कार्य



त्यांनीं अखंड चालू ठेविलें आहे. श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें अण्णासाहेबांच्या लोकसेवेचे खरे वारसदार श्री. भाऊसाहेब आहेत. १९४१ पासून ठाणें जिल्हा लोकल बोर्डाचे ते सभासद असून अण्णासाहेबांप्रमाणेंच ठाणें जिल्हा लोकल बोर्डाचे दोनदा अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळालेला आहे. ठाणें जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष असून सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाचे ते मुख्य ट्रस्टी आहेत. एवढ्या लहान वयांत त्यांनीं उत्तम कार्य केलेलें असलें तरी जीवनांतील महनीय कामगिरी त्यांच्याकडून पुढेंच होणार आहे. आपल्या कर्तृत्वानें आणि कर्तव्यतत्परतेनें जनतेंत त्यांनीं ज्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत त्या त्यांच्याकडून पूर्ण केल्या जातील ह्यांत शंका नाहीं. त्यांचा विवाह चिंचणी येथील श्री. तात्यासाहेब चुरी ह्यांच्या कन्या इंदिरा ह्यांच्याशीं सन १९४० सालीं झाला. सौ. इंदिरा ह्यांचें शिक्षण बी. ए. पर्यंत झालेलें असून श्री. भाऊसाहेबांना आपल्या कामांत त्यांची नेहमींच मदत होत असते. अण्णासाहेबांचे दुसरे चिरंजीव श्री. नरसिंह ऊर्फ भाई ह्यांचें प्रिव्हिअसपर्यंत शिक्षण झालें असून ते शेतीवाडीचा उद्योग करीत असतात. घरचा बहुतेक सर्व व्यवहार तेच पाहात असतात. त्यांचा विवाह बोर्डीचे आत्मारामपंत सावे ह्यांच्या कन्या तारा ह्यांच्याशीं झाला असून, कल्पलता, नीलिमा आणि विकास अशीं त्यांना तीन अपत्यें आहेत. अण्णासाहेबांचे तिसरे चिरंजीव श्री. महादेव ऊर्फ नाना ह्यांचेंही शिक्षण प्रिव्हिअसपर्यंत झालेलें असून ते उद्योगधंद्यांत पडलेले आहेत. त्यांचा विवाह वसईचे भास्करराव पाटील ह्यांच्या कन्या विजया ह्यांच्याशीं झाला असून त्यांना राजीव व विवेक असे दोन मुलगे आहेत. अण्णासाहेबांच्या तिन्ही चिरंजिवांच्या विवाहांचा एक विशेष हा आहे कीं त्यांचे विवाह सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाच्या कार्यांतील अण्णासाहेबांच्या निकट सहकाऱ्यांच्या कन्यांबरोबर झालेले आहेत. अण्णासाहेबांच्या तिन्ही स्नुषा सुविद्य असून संसारदक्ष आहेत. अण्णासाहेबांचे चौथे चिरंजीव श्री. परशराम ऊर्फ दाजी हे नुकतेच

एम्. एस्सी. झाले असून, माशांसंबंधीं संशोधन करून त्यांनीं आपली एम्. एस्सी. पदवी मिळविली आहे. अण्णासाहेबांचे पांचवे चिरंजीव श्री. रघुनंदन ह्यांचेंही शिक्षण प्रिव्हिअसपर्यंत झालें असून ते सध्या मुंबईस नोकरी करीत असतात. अण्णासाहेबांचे सर्वांत धाकटे चिरंजीव श्री. हरिहर अद्यापि शिकत असून गेल्या सालीं ते इंटरच्या परीक्षेस बसले होते. ह्या सर्वच मुलांवर अण्णासाहेबांच्या जीवनाची छाप पडली असून त्यांच्याकडून आपल्या घराण्याची प्रतिष्ठा वाढविली जाईल ह्यांत शंका नाहीं.

अण्णासाहेबांना एक सावत्र व एक सख्खी अशा दोन भगिनी असून सख्ख्या भगिनी श्रीमती भीमाताई ह्यांचा विवाह वसईचे गणेश जगन्नाथ पाटील ह्यांच्याशीं झाला होता. ते कांहीं वर्षांपूर्वीं निवर्तले. भीमाताई ह्यांना एक मुलगा व दोन मुली अशीं तीन अपत्यें असून तिघांचेही विवाह झालेले आहेत. अण्णासाहेबांच्या सावत्र बहिणीचा विवाह वसईचे बाबूराव चौधरी ह्यांच्याशीं झाला होता. परंतु त्या तरुणपणींच वारल्या.

अण्णासाहेबांचें कौटुंबिक जीवन सुखी होतें. त्यांच्या आणि त्यांच्या पत्नीच्या शिक्षणांत फरक असला तरी अन्नपूर्णाबाई व्यवहारदक्ष असल्याकारणानें त्यांचा संसार सुखाचा झाला. मुलांचेंही सुख अण्णासाहेबांना चांगलें लाभलें. अण्णासाहेबांची शिस्त कडक असली तरी अंतःकरणानें ते फार प्रेमळ व हळुवार होते. आपलीं सर्व मुले आज्ञाधारक व सुशील निघालीं ह्याबद्दल अण्णासाहेबांना फार अभिमान वाटे. एरवीं क्वचित् प्रसंगीं कठोर वाटले तरी एखादा मुलगा आजारी पडल्यास ते अस्वस्थ होत असत. मुलांकडून कांहीं चूक झाल्यास एखादे वेळीं कांहीं बोलले तरी लगेच ते त्यांची समजूत काढीत. घरांत नातवंडें आल्यापासून अण्णासाहेबांचा आनंद दुणावला. त्यांचें कोडकौतुक करण्यांत, त्यांना जवळ घेऊन गोष्टी सांगण्यांत त्यांच्या विश्रांतीचा बराच वेळ जाई. आपल्या सर्व नातेवाईकांसंबंधीं त्यांची नेहमींच विचारपूस चाले. कोणास कांहीं मदतीची जरूर असल्यास ते त्वरित मदत करीत

असत. अण्णासाहेबांच्या आतिथ्यशील स्वभावामुळें त्यांच्याकडे पाहुण्यांची सारखी ये जा असे. अण्णासाहेबांकडे चहा घेतल्याशिवाय कोणीही मनुष्य परत जात नसे. हें सर्व करतांना घरांतील मंडळींनीं कधींही कुरकुर केली नाहीं. हें त्यांचें नित्याचें होऊन बसलें होतें. अण्णासाहेबांचें वागणें फार नियमित होतें. आपणांसाठीं घरांतील माणसांना त्रास होऊं नये म्हणून अण्णासाहेब दक्षता घेत असत. रात्रीं घरीं यावयास उशीर व्हावयाचा असला तर सर्वांनीं जेवून घ्यावें अशी त्यांची ताकीद असे. अण्णासाहेब स्वतःपेक्षां दुसऱ्याचीच सोय पाहाण्याचा प्रयत्न करीत. एकत्र कुटुंबाच्या यशाची ती गुरुकिल्ली होती. अण्णासाहेब सार्वजनिक जीवनांत जसे यशस्वी ठरले तसेच कौटुंबिक जीवनांतही ते यशस्वी झाले.

अण्णासाहेबांचा मित्रपरिवार फार मोठा होता. अण्णासाहेबांचे अनेक मित्र त्यांच्या विविध कार्यक्षेत्रांतील त्यांचे सहकारी होते. सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाच्या कार्यक्षेत्रांतील भायजी जगू राऊत, श्री. तात्यासाहेब चुरी, श्री. माधवराव राऊत, श्री. मुकुंदराव सावे, आत्मारामपंत सावे, मदनराव राऊत, भास्करराव पाटील, गोपाळराव पाटील, वगैरे सहकाऱ्यांचा उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे. त्यांत डॉ. दीनानाथ चुरी, श्री. शामराव पाटील व श्री. भास्करराव राऊत ह्यांचा अवश्य समावेश करावयास पाहिजे. अण्णासाहेबांचे हे सर्व सहकारी अत्यंत ध्येयवादी व पहिल्या प्रतीचे समाजसुधारक होते. संघाचे ते आधारस्तंभ असून अण्णासाहेबांप्रमाणेंच संघाच्या यशाचें श्रेय त्यांच्याकडेही बव्हंशीं जातें.

राजकीय व तद्सदृश कार्यक्षेत्रांतील अण्णासाहेबांच्या सहकारी मित्रांचा परिवार फार मोठा आहे. अण्णासाहेबांच्या पूर्ववयांत श्री. नानासाहेब देवधेकर, आप्पासाहेब करंदीकर, श्री. छोटालाल श्रॉफ, श्री. गणपतराव फडके, श्री. केशवराव मेकल हे अण्णासाहेबांच्या राजकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रांतील सहकारी होते. ह्या सर्वांमधील एकजूट व निरपेक्षपणें कार्य करण्याची पद्धत वाखाणण्यासारखी

होती. १९३५ नंतरच्या काळांत राजकीय कार्यक्षेत्रांत श्री. आप्पासाहेब कीर्तने, आचार्य भिसे, श्री. भाऊसाहेब परांजपे, श्री. बाबासाहेब दांडेकर, श्री. शामराव पाटील, नंडोऱ्याचे श्री. सखाराम पाटील वगैरे निकटवर्ति मंडळींचें अण्णासाहेबांना सहकार्य लाभलें. वसई तालुक्यापुरतें बोलावयाचें झाल्यास डॉ. दिनकरराव गाळवणकर, डॉ. परुळेकर, श्री. नारायणराव गाळवणकर, श्री. त्र्यंबकराव गव्हाणकर ह्यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे. ह्या सर्व मंडळींनीं कॉंग्रेसची अत्यंत निष्ठापूर्वक सेवा केली आणि अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं ठाणें जिल्ह्याला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

अण्णासाहेबांच्या नेहमींच्या बैठकींतील स्नेहीमंडळींत डॉ. अभ्यंकर ह्यांचा पहिल्यानें उल्लेख करावा लागेल. डॉ. अभ्यंकर व अण्णासाहेब ह्यांच्यामध्यें अकृत्रिम स्नेहाचें नातें होतें व तें अखेरपर्यंत तसेंच राहिलें. त्यानंतर मुंबईचे श्री. भाईसाहेब चौधरी ह्यांचें नांव ओघानें येतें. अण्णासाहेब व भाईसाहेब ह्यांना परस्परांसंबंधीं फार आदर होता व एकमेकांशीं वागतांना ते सख्ख्या भावाप्रमाणें वागत असत. कोठल्याही महत्त्वाच्या व्यावहारिक बाबतींत ते एकमेकांचा सल्ला घेत. आपल्या जिव्हाळ्याच्या गोष्टी बोलण्याचें भाईसाहेब म्हणजे अण्णासाहेबांचें एक विश्वासस्थान होतें. कॉलेजांत असतांना श्री. बाळासाहेब मोगरे व शांतारामभाऊ मोगरे ह्यांच्याशीं अण्णासाहेबांचा स्नेह जडला आणि शेवटपर्यंत अण्णासाहेब त्यांना आपले परममित्र मानीत असत. अण्णासाहेबांच्या निकट स्नेहीमंडळींत विरारचे श्री. मनोरदास गोपाळजी व श्री. मनमोहनदास तापीदास, अर्नाळ्याचे पुरुषोत्तमपंत गाळवणकर व डॉ. विठ्ठलराव गव्हाणकर, आगाशीचे श्री. प्रभुदास शाह व डॉ. बा. ना. पुरंदरे, वसईचे श्री. नानासाहेब मतकरी, मुंबईचे श्री. इच्छालाल जगमोहन, वेदीचे श्री. नथोबा म्हात्रे व शिरगांवचे श्री. वसंतराव मोगरे ह्यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे. अण्णासाहेबांना आपल्या सार्वजनिक व खाजगी जीवनांत ह्या मंडळींचें अनेक प्रकारें साह्य

झालें आहे. बोळींजचे गजानन बाळकृष्ण नाईक हे विरार-आगाशी ह्या भागांतील एक उत्तम वैद्य होते व त्यांच्या घराण्याशीं अण्णासाहेबांच्या घराण्याचा दोन पिढ्यांचा संबंध होता. अण्णासाहेबांचा त्यांच्यावर फार लोभ असून ते हयात असेपर्यंत अण्णासाहेब त्यांच्याकडून आजारांत औषधोपचार करून घेत असत. त्यांचे वडील बंधु श्री. नीळकंठराव नाईक ह्यांच्याशींही अण्णासाहेबांचें प्रेमाचें नातें होतें. अण्णासाहेब मुंबईस शिकत असतांना श्री. नीळकंठराव ह्यांच्याकडेच राहात असत. त्याचप्रमाणें वटार भागांतील पांडुरंग गोविंद ऊर्फ अण्णा कोपराडकर व श्री. अप्पा समनाळे ह्यांच्यावरही अण्णासाहेबांचा लोभ असून प्रत्येक कार्यांत त्यांनीं मोठ्या निष्ठेनें अण्णासाहेबांना मदत केलेली आहे.

अण्णासाहेबांच्या प्रेमांतील त्यांच्या असंख्य स्नेह्यांचा व सहकाऱ्यांचा उल्लेख विस्तारभयास्तव करतां आला नाहीं. अण्णासाहेबांच्या विशाल अंतःकरणांत ह्या सर्वांनाच स्थान होतें ह्याची ह्या ओळी लिहितांना लेखकाला विस्मृति झालेली नाहीं. अण्णासाहेबांनीं ज्यांना आपल्या जवळ केलें आणि ज्यांचें जीवन आपल्या प्रेमवर्षावानें फुलविलें, त्यांना ह्या पुस्तकांत स्थान कसें नसेल ? त्या सर्वांचीच स्मृति ह्या ओळी लिहिल्या जात असतांना लेखकाला होत आहे. अण्णासाहेबांच्या यशस्वी जीवनांत ह्या सर्वांचाच अंशभाग आहे. अण्णासाहेबांच्या जीवनाचें महावस्त्र विणलें जात असतांना आपल्या जीवनाचाही लहानसा धागा त्यांत कोठें तरी अनुस्यूत झालेला आहे ह्याची सुखद स्मृति अण्णासाहेबांचें हें जीवनचरित्र वाचतांना ह्या सहकाऱ्यांना होईल. त्या स्मृतीपेक्षां अधिक उल्लेखनीय व अधिक गौरवपर आणखी काय आहे ?

प्रकरण एकोणतिसावें

# विविधक्षेत्रांतील कामगिरी

अण्णासाहेबांचें सारें जीवन निरनिराळ्या क्षेत्रांतील सार्वजनिक सेवेनें व्यापून राहिलें होतें. ठाणें जिल्ह्यांत कोणतीही शैक्षणिक, सांस्कृतिक अगर लोकोपयोगी संस्था निघो, तिला अण्णासाहेबांचा हार्दिक पाठिंबा असे. राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीनें अण्णासाहेबांनीं ह्या संस्थांकडे पाहिलें. अण्णासाहेबांच्या साहचर्यानें ह्या संस्थांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. अण्णासाहेबांनीं ऋणी करून ठेवलेल्या ठाणें जिल्ह्यांत व ठाणें जिल्ह्याबाहेरही अशा अनेक संस्था आहेत. अशा संस्थांपैकीं कित्येक संस्था त्यांच्या प्रेरणेनें स्थापन झाल्या होत्या. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख विस्तारानें ह्या पुस्तकांत पूर्वीच आलेला आहे. राहिलेल्या संस्थांपैकीं अशा कांहीं संस्था आहेत कीं ज्यांचा उल्लेख ह्या पुस्तकांत न आल्यास तें एक मोठें न्यून राहून जाईल. अण्णासाहेबांच्या सार्वजनिक जीवनाच्या सुरुवातीस आपल्या कल्पनांना व विचारांना मूर्तस्वरूप देण्यासाठीं अण्णासाहेबांना ह्या संस्थांचा उपयोग झाला म्हणून त्यांच्या जीवनांत ह्या संस्थांना महत्त्व आहे.

अशाच संस्थांपैकीं विरार येथील स्नेहवर्धक समाज ही संस्था होती. अण्णासाहेब हे ह्या समाजाचे संस्थापक होते. विरार गांवांतील तरुणांची ह्या समाजाद्वारें संघटना करून सांस्कृतिक व विधायक प्रवृत्तींचें संवर्धन करण्यासाठीं १९२७ सालीं ह्या समाजाची स्थापना करण्यांत आली. अण्णासाहेब सुरुवातीपासून ह्या समाजाचे अध्यक्ष होते. दसरा व शिवजयंति उत्सव ह्यांसारखे सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणणें, सर्वसामान्य जनतेंत वाचनाची अभिरुचि वाढावी म्हणून वाचनालय काढणें, व्यायामशाळा स्थापन करणें, रुग्णाइतांच्या शुश्रुषेसाठीं उपकरणांची व्यवस्था करणें हे समाजाचे मुख्य उद्देश होते. ह्या उद्देशांच्या द्वारें गांवांत ऐक्यवृद्धि करण्याचें कार्य समाजानें उत्तम प्रकारें पार पाडलें. दसरा संमेलन अगर शिवजयंति उत्सवासारख्या प्रसंगीं प्रसिद्ध पुढाऱ्यांचीं भाषणें घडवून आणलीं जात. अशा व्याख्यात्यांत श्री. बाळासाहेब खेर व अच्युतराव कोल्हटकर ह्यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. व्यायामासंबंधीं आस्था उत्पन्न व्हावी म्हणून शारीरिक खेळांचे कार्यक्रम घडवून आणले जात. दसऱ्याच्या दिवशीं समाजामार्फत शिलंगणाचा सामुदायिक कार्यक्रम मोठ्या उत्साहानें साजरा केला जाई. स्नेहवर्धक समाजानें अशा प्रकारें विविध मार्गांनीं अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालीं आपल्या गांवाची सेवा केली.

स्नेहवर्धक समाजाच्या स्थापनेच्या सुमारास वसईसही अण्णासाहेबांचे एक निकट स्नेही भास्करराव पाटील ह्यांनीं 'मित्रमंडळ' ह्या नांवाची एक संस्था स्थापन केली होती. ह्या संस्थेचे उद्देश स्नेहवर्धक समाजाच्या उद्देशासारखेच असल्यामुळें अण्णासाहेबांना ह्या संस्थेसंबंधीं साहजिकच फार आस्था वाटत असे. वसईसारख्या शहरांतील ह्या संस्थेकडून होणारें उत्तम कार्य पाहून अण्णासाहेब ह्या संस्थेचे तहाहयात सभासद झाले. मंडळाच्या प्रत्येक कार्यांत मंडळाला अण्णासाहेबांकडून प्रोत्साहन मिळालें आणि मंडळाचे अनेक कार्यक्रम अण्णासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं पार पडले.

वसई तालुका मॅटर्निटी वेलफेअर मंडळातर्फे अण्णासाहेबांनीं केलेलें सामाजिक कार्य महत्त्वाचें असल्यामुळें ह्या संस्थेची थोड्या विस्तारानें माहिती देणें अवश्य आहे. वसई शहरांत नगरपालिकेनें चालविलेला धर्मार्थ दवाखाना फार पूर्वीपासून आहे. परंतु परिचारिका व इतर साधनांच्या अभावीं ह्या दवाखान्याला जोडून सूतिकागृहाची व्यवस्था होऊं शकत नव्हती. ही गैरसोय दूर करण्यासाठीं पापडी येथील श्रीमती ताराबाई जगमोहनदास ह्यांनीं आपले दिवंगत पति जगमोहनदास प्राणजीवनदास ह्यांच्या स्मरणार्थ कांहीं अटीवर वसई नगरपालिकेस दहा हजार रुपयांची देणगी देण्याचें जाहीर केलें. परंतु ह्या बाबतींत कांहीं अडचणीमुळें नगरपालिकेकडून कसलीही प्रगति न झाल्यामुळें अण्णासाहेबांनीं मोहनलाल प्रताप वगैरे मंडळीच्या साह्यानें पुढाकार घेऊन सन १९३२ सालीं वसई तालुका मॅटर्निटी वेलफेअर मंडळाची स्थापना केली. अण्णासाहेब ह्या मंडळाचे अध्यक्ष होते. अल्पावधींतच ह्या मंडळाकडून आठ हजार रुपयांचा निधि जमविण्यांत आला. मंडळाचें कार्य पाहून ताराबाईंनींही आपल्या दहा हजारांच्या देणगींत आणखी कांहीं भर घातली आणि निधि व देणगी मिळून जमा झालेली वीस हजार रुपयांची रक्कम वसई नगरपालिकेच्या हवालीं करण्यांत आली. सदर रकमेंतून लवकरच जगमोहनदास प्राणजीवनदास सूतिकागृह सुरू करण्यांत आलें आणि त्याचा उद्घाटन समारंभ ता. २३ मार्च १९३५ रोजीं करण्यांत आला. पुढें हें सूतिकागृह अपुरें पडत असल्याचें पाहून आणखी कांहीं निधि जमविण्यांत येऊन सूतिकागृहाची वाढ करण्यांत आली. स्त्रियांच्या बाबतींतली गैरसोय दूर करण्यासाठीं अण्णासाहेबांनीं ह्याप्रमाणें सूतिकागृहाच्या बाबतींत पुढाकार घेऊन मोठी संस्मरणीय कामगिरी बजावली.

मुंबईच्या लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूटशीं जवळ जवळ त्या संस्थेच्या स्थापनेपासून अण्णासाहेबांचा संबंध होता. अण्णासाहेब इन्स्टिट्यूटचे अनेक वर्षें उपाध्यक्ष होते. त्या संस्थेतील मुख्य कार्यकर्ते

श्री. एस्. एस्. नाईक व श्री. सी. डी. बर्फीवाला अण्णासाहेबांचे अगदीं निकटचे स्नेही होते. त्यांनीं ध्येयनिष्ठेनें ह्या संस्थेचें मुंबई राज्यभर कार्य चालविलें होतें. स्थानिक स्वराज्य संस्थांची उन्नति होऊन त्यांची सर्वांगीण प्रगति व्हावी ह्या ध्येयानेंच ही संस्था चालविण्यांत येत असल्यामुळें अण्णासाहेब ह्या संस्थेशीं साहजिकच एकरूप होऊं शकले. संस्थेच्या कारभाराचा आज जो विस्तार झालेला आहे त्याला अण्णासाहेबांचाही हातभार लागलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे मंत्री झाल्यावर अण्णासाहेबांनीं ह्या संस्थेकडे नेहमींच आपुलकीच्या भावनेनें पाहिलें. संस्थेचे मुख्य कार्यवाह श्री. एस्. एस्. नाईक व श्री. बर्फीवाला ह्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा स्थानिक संस्थांना मिळावा म्हणून अण्णासाहेब मंत्री असतांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या परिषदा झाल्या त्या परिषदांना अण्णासाहेब श्री. नाईक व श्री. बर्फीवाला ह्यांना बरोबर घेऊन जात असत. अण्णासाहेबांनीं त्यांच्यावर जी जी कामगिरी सोपविली ती ती त्यांनीं विश्वासपूर्वक व उत्तम रीतीनें पार पाडली, हें येथें नमूद करणें जरूर आहे.

वसई येथील किल्ल्यांत १९३९ च्या मे महिन्यांत साजरा झालेला वसई द्विशतसांवत्सरिक विजयदिनोत्सवाचा ओझरता उल्लेख करून अण्णासाहेबांच्या इतर कार्यांकडे वळणें अधिक सोयिस्कर होईल. १७३९ मध्यें झालेल्या वसईच्या रणसंग्रामांत प्राणपणानें फिरंग्यांच्या विरुद्ध लढून मराठ्यांनीं वसईचा किल्ला सर केला व त्या वेळीं आपल्या देशावर येऊं घातलेलें परकीयांचें आक्रमण थोपवून धरलें. ह्या रणसंग्रामानें वसईच्या आसमंतांतील रहिवाश्यांच्या बदलूं घातलेल्या नियतीला कायमचें रोखून धरलें. वसईचा रणसंग्राम इतक्या निर्धारानें व झुंजार वृत्तीनें लढविला गेला कीं तो कोणत्याही राष्ट्राला स्फूर्तिदायी व्हावा. मराठ्यांच्या इतिहासांतील ह्या उज्ज्वल प्रसंगाला १९३९ मध्यें दोनशें वर्षें पुरीं होत होतीं. त्या निमित्तानें ह्या रणसंग्रामांत धारातीर्थीं पतन पावलेल्या वीरांच्या पुण्यस्मरणार्थ ता. १२ व १३ मे १९३९ रोजीं वसईच्या किल्ल्यांत

ह्या संग्रामाचा द्विशतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यांत आला. अण्णासाहेबांनीं ह्या उत्सवांत पुढाकार घेतला होता व ते उत्सवाच्या स्वागत-मंडळाचे अध्यक्ष होते. बडोद्याचे सेवानिवृत्त सेनापति जनरल नानासाहेब शिंदे हे ह्या उत्सवाचे अध्यक्ष असून प्रो. माणिकराव, श्री. ज. स. करंदीकर, वगैरे मंडळी ह्या उत्सवास उपस्थित होती. स्वागताध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांनीं आपल्या भाषणांत असल्या स्फूर्तिदायक प्रसंगाचें सांस्कृतिक महत्त्व प्रतिपादन केलें. वसई किल्ल्यांतील हा उत्सव अपूर्व उत्साहानें पार पडला.

सामाजिक कार्याप्रमाणेंच अण्णासाहेबांना शैक्षणिक कार्यासंबंधीं अत्यंत जिव्हाळा वाटे. सोमवंशी क्षत्रिय समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठीं अण्णासाहेबांनीं केलेले प्रयत्न व आर्थिक साह्य ह्यांचा उल्लेख ह्या चरित्रांतून पूर्वीं आलेलाच आहे. शिक्षणप्रसाराच्या कार्याला अण्णासाहेब अत्यंत महत्त्व देत. राष्ट्राच्या प्रगतींतील शिक्षणप्रसार हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे असें अण्णासाहेब समजत असत. गरीब व होतकरू विद्यार्थी अण्णासाहेबांकडे मदतीसाठीं गेल्यास रिक्तहस्तें तो कधीं परत जात नसे. अण्णासाहेबांनीं अशा शेंकडों विद्यार्थ्यांना गाजावाजा न करतां मदत केलेली आहे. विरार, आगाशी व अर्नाळा ह्या विभागांत दुय्यम शिक्षणाची सोय नसल्यामुळें पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांना आपलें शिक्षण अर्धवट सोडून द्यावें लागे. अण्णासाहेबांनीं ह्या प्रश्नांत आस्थापूर्वक मन घातलें. १९२३–२४ च्या सुमारास आगाशी येथील श्री. धोंडोपंत गोखले व पांडोबा मराठे ह्यांनीं दुय्यम शिक्षणाचा एक खासगी वर्ग काढला होता. परंतु त्यांना ह्या वर्गासाठीं जागेची अडचण भासूं लागल्याकारणानें ह्या बाबतींत मार्गदर्शनासाठीं त्यांनीं अण्णासाहेबांची भेट घेतली. आगाशी येथील एक रहिवासी काशीदास घेलाभाई ह्यांनीं धर्मादाय म्हणून आपल्या मृत्युपत्रांत कांहीं मिळकत ठेविली होती. परंतु ह्या मिळकतीचा काशीदास घेलाभाई ह्यांच्या इच्छेप्रमाणें कांहीं उपयोग होत नसल्यामुळें ही मिळकत तशीच पडून राहिली होती. अण्णासाहेबांनीं ही गोष्ट ठाणें येथील

कोर्टाच्या व सरकारच्या निदर्शनास आणून ह्या मिळकतीचा दुय्यम शिक्षणासाठीं उपयोग करण्याबाबत त्यांची संमति मिळविली. ह्या मिळकतींतून पंधरा हजार रुपयांची रक्कम ह्या कार्यासाठीं मिळाली. ह्या रकमेंतूनच त्यांत आणखी भर टाकून आगाशी हायस्कूलची मुख्य इमारत बांधण्यांत आली. ही जागाही अपुरी पडूं लागल्यानें एक हजार रुपये खर्च करून अण्णासाहेबांनीं शाळेसाठीं एक ब्लॉक बांधून दिला. ह्याशिवाय शाळेसाटीं एक हजार रुपयांची देणगी देऊन अण्णासाहेब शाळेचे आश्रयदाते झाले.

१९४१ पर्यंत आगाशी हायस्कूल दादर येथील जनरल एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत होतें. पण पुढें मतभेद निर्माण झाल्यामुळें अण्णासाहेबांच्या मदतीनें ह्या भागांतील ग्रामस्थांनीं आगाशी–विरार–अर्नाळा एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि त्यानंतर १९४२ मध्यें आगाशी हायस्कूल ह्या सोसायटीच्या ताब्यांत आलें. अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत जे नेटाचे प्रयत्न केले त्यामुळेंच आगाशी हायस्कूल अस्तित्वांत येऊन ह्या सर्व भागांतील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली.

आगाशी येथील हायस्कूलप्रमाणें बोर्डी येथील एच्. पी. हकीमजी हायस्कूलशीं व वसई येथील आर्. पी. वाघ हायस्कूलशीं अण्णासाहेबांचा संबंध होता. बोर्डी हायस्कूलच्या वसतिगृहांत आपल्या मातुश्रींच्या नांवानें अण्णासाहेबांनीं एक खोली बांधून दिली आहे. वसई येथील वाघ हायस्कूल चालविणाऱ्या वसई एज्युकेशन सोसायटीचे अण्णासाहेब कांहीं काळ उपाध्यक्ष होते. त्याचप्रमाणें वसई हायस्कूलच्या आश्रय-दात्यांपैकीं ते एक होते. ठाणें जिल्ह्यांतील ह्या प्रमुख शिक्षण संस्थांशिवाय महाराष्ट्रांतील अनेक शिक्षण संस्थांना अण्णासाहेबांकडून मदत झालेली आहे. शिक्षण संस्थांना आणि गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अण्णासाहेबांनीं केलेल्या आर्थिक मदतीचा आंकडा फार मोठा आहे.

दुसऱ्यांच्या उपयोगी पडणें हा अण्णासाहेबांचा स्वभावधर्मच होता. त्यामुळें कोठेंही दैवी संकट ओढवलें म्हणजे त्याच्या निवारणार्थ शक्य

तो प्रयत्न करणें अण्णासाहेब आपलें कर्तव्य मानीत. अर्थात् अशा प्रकारच्या अनेक संकटांत केवळ निधिरूपानेंच मदत पोचविणें शक्य असतें. अशाच प्रकारच्या हिंदुस्थानांत जमविण्यांत आलेल्या निधींत चायना रिलीफ फंड, जपान रिलीफ फंड, केटा रिलीफ फंड, बिहार रिलीफ फंड, गुजराथ रिलीफ फंड, कोंकण रिलीफ फंड, वगैरे निधींची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. ह्या सर्व संकटनिवारण निधींसाठीं अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्यांतून फार मोठे निधि जमविले. ह्या सर्व निधींना अण्णासाहेबांनीं स्वतःची अशी मोठी वर्गणी दिली आहे.

संकटनिवारण निधींप्रमाणेंच देशांत ज्या ज्या वेळीं राष्ट्रीय निधि गोळा करण्यांत आले त्या वेळीं आपल्या जिल्ह्यांतून निधि जमविण्यांत अण्णासाहेबांनीं उत्तम प्रकारची कामगिरी बजावलेली आहे. अशा निधींत टिळक स्वराज्य निधि, कस्तुरबा स्मारक निधि, महात्मा गांधी स्मारक निधि ह्या निधींचा समावेश होतो. ह्या सर्वच निधींना अण्णासाहेबांनीं दिलेली वर्गणी मोठी आहे.

हे सर्व निधि जमवितांना अण्णासाहेबांचें संघटनाकौशल्य उत्तम प्रकारें दिसून आलें. त्याचप्रमाणें त्यांच्या चारित्र्यसंपन्न व्यक्तित्वाचाही ह्या कामीं फार उपयोग झाला. निधि गोळा करण्याच्या कार्यासाठीं अण्णासाहेब जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांना उत्तम प्रकारची साथ मिळाली आणि लोकांनींही आपणहून मोठ्या आनंदानें आपली वर्गणी ह्या निधींसाठीं दिली.

सामाजिक व शैक्षणिक संस्थांना, गरीब विद्यार्थ्यांना व उपरोक्त निधींबाबत अण्णासाहेबांनीं केलेलें साह्य त्यांच्या दातृत्वाची उत्तम साक्ष देतें. ह्याशिवाय अण्णासाहेबांनीं आपल्या नातेवाइकांस आणि अनेक सहकाऱ्यांना त्यांच्या आपत्कालांत आर्थिक मदत केलेली आहे. आपल्या आर्थिक सुस्थितीचा अण्णासाहेबांनीं यथार्थानें सदुपयोग केला आणि इतरांना धडा घालून दिला. अण्णासाहेबांचें दातृत्व हा त्यांच्या निरपेक्षपणाचाच एक भाग होता. अनेक व्यक्तींचा व संस्थांचा मिळून

समाज बनतो. समाजापासून व्यक्तीचें जीवन अलग होऊं शकत नाहीं. हरघडीं तिच्या जीवनावर सामाजिक संस्कार होत असतात. समाजाचें व्यक्तीवरील ऋण सारखें वाढतच असतें. ह्या ऋणाची फेड केवळ सामाजिक सेवेनेंच होऊं शकते. अण्णासाहेबांनीं आपल्या दातृत्वानें आणि निरपेक्ष सेवेनें समाजाचें हें ऋण फेडलें. अण्णासाहेबांनीं आपल्या हयातींत केलेलें दान पाऊण लाखाच्या घरांत जाईल.

अण्णासाहेबांचा जिल्ह्यांत निघालेल्या अनेक नियतकालिकांशीं संबंध होता. त्यामध्यें कुलाबा समाचार, प्रतियोगी, टणत्कार, राष्ट्रसेवक, सर्वोदय, वगैरेंचा उल्लेख करतां येईल. ह्यांपैकीं बहुतेक नियतकालिकें राष्ट्रीय वृत्तीचीं असून जिल्ह्यांत राष्ट्रीय भावना जागृत करण्याच्या दृष्टीनें चालविलीं जात होतीं. अण्णासाहेबांनीं ह्यांपैकीं कांहींसाठीं स्वतः आर्थिक झीजही सोसली आहे.

विविध क्षेत्रांतील अण्णासाहेबांच्या कार्याचा, विशेषतः ज्याच्याशीं त्यांचें आरंभीचें सार्वजनिक जीवन निगडित झालेलें आहे अशाच कार्याचा वर उल्लेख आलेला आहे. ह्या कार्यांतूनच त्यांच्या जीवनौघाला निश्चित मार्ग मिळाला. हा जीवनौघ पुढें सारखा रुंदावत गेला व त्यांतूनच कर्तृत्वाच्या अनेक क्षेत्रांना जीवन मिळालें. अण्णासाहेबांनीं ह्या सर्व क्षेत्रांत बजावलेल्या महत्त्वपूर्ण आणि अनेकविध कार्यांच्या दिग्दर्शनानेंच ह्या चरित्रग्रंथाचा बहुतेक भाग व्यापलेला आहे.

ह्या संग्रामाचा द्विशतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यांत आला. अण्णासाहेबांनीं ह्या उत्सवांत पुढाकार घेतला होता व ते उत्सवाच्या स्वागत-मंडळाचे अध्यक्ष होते. बडोद्याचे सेवानिवृत्त सेनापति जनरल नानासाहेब शिंदे हे ह्या उत्सवाचे अध्यक्ष असून प्रो. माणिकराव, श्री. ज. स. करंदीकर, वगैरे मंडळी ह्या उत्सवास उपस्थित होती. स्वागताध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांनीं आपल्या भाषणांत असल्या स्फूर्तिदायक प्रसंगाचें सांस्कृतिक महत्त्व प्रतिपादन केलें. वसई किल्ल्यांतील हा उत्सव अपूर्व उत्साहानें पार पडला.

सामाजिक कार्याप्रमाणेंच अण्णासाहेबांना शैक्षणिक कार्यासंबंधीं अत्यंत जिव्हाळा वाटे. सोमवंशी क्षत्रिय समाजाच्या शैक्षणिक उन्नती-साठीं अण्णासाहेबांनीं केलेले प्रयत्न व आर्थिक साह्य ह्यांचा उल्लेख ह्या चरित्रांतून पूर्वीं आलेलाच आहे. शिक्षणप्रसाराच्या कार्याला अण्णासाहेब अत्यंत महत्त्व देत. राष्ट्राच्या प्रगतींतील शिक्षणप्रसार हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे असें अण्णासाहेब समजत असत. गरीब व होतकरू विद्यार्थी अण्णासाहेबांकडे मदतीसाठीं गेल्यास रिक्तहस्तें तो कधीं परत जात नसे. अण्णासाहेबांनीं अशा शेंकडों विद्यार्थ्यांना गाजावाजा न करतां मदत केलेली आहे. विरार, आगाशी व अर्नाळा ह्या विभागांत दुय्यम शिक्षणाची सोय नसल्यामुळें पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांना आपलें शिक्षण अर्धवट सोडून द्यावें लागे. अण्णासाहेबांनीं ह्या प्रश्नांत आस्थापूर्वक मन घातलें. १९२३–२४ च्या सुमारास आगाशी येथील श्री. धोंडोपंत गोखले व पांडोबा मराठे ह्यांनीं दुय्यम शिक्षणाचा एक खासगी वर्ग काढला होता. परंतु त्यांना ह्या वर्गासाठीं जागेची अडचण भासूं लागल्याकारणानें ह्या बाबतींत मार्गदर्शनासाठीं त्यांनीं अण्णासाहेबांची भेट घेतली. आगाशी येथील एक रहिवासी काशीदास घेलाभाई ह्यांनीं धर्मादाय म्हणून आपल्या मृत्युपत्रांत कांहीं मिळकत ठेविली होती. परंतु ह्या मिळकतीचा काशीदास घेलाभाई ह्यांच्या इच्छेप्रमाणें कांहीं उपयोग होत नसल्यामुळें ही मिळकत तशीच पडून राहिली होती. अण्णासाहेबांनीं ही गोष्ट ठाणें येथील

कोर्टाच्या व सरकारच्या निदर्शनास आणून ह्या मिळकतीचा दुय्यम शिक्षणासाठीं उपयोग करण्याबाबत त्यांची संमति मिळविली. ह्या मिळकतींतून पंधरा हजार रुपयांची रक्कम ह्या कार्यासाठीं मिळाली. ह्या रकमेंतूनच त्यांत आणखी भर टाकून आगाशी हायस्कूलची मुख्य इमारत बांधण्यांत आली. ही जागाही अपुरी पडूं लागल्यानें एक हजार रुपये खर्च करून अण्णासाहेबांनीं शाळेसाठीं एक ब्लॉक बांधून दिला. ह्याशिवाय शाळेसाठीं एक हजार रुपयांची देणगी देऊन अण्णासाहेब शाळेचे आश्रयदाते झाले.

१९४१ पर्यंत आगाशी हायस्कूल दादर येथील जनरल एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत होतें. पण पुढें मतभेद निर्माण झाल्यामुळें अण्णासाहेबांच्या मदतीनें ह्या भागांतील ग्रामस्थांनीं आगाशी–विरार–अर्नाळा एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि त्यानंतर १९४२ मध्यें आगाशी हायस्कूल ह्या सोसायटीच्या ताब्यांत आलें. अण्णासाहेबांनीं ह्या बाबतींत जे नेटाचे प्रयत्न केले त्यामुळेंच आगाशी हायस्कूल अस्तित्वांत येऊन ह्या सर्व भागांतील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली.

आगाशी येथील हायस्कूलप्रमाणें बोर्डी येथील एच्. पी. हकीमजी हायस्कूलशीं व वसई येथील आर्. पी. वाघ हायस्कूलशीं अण्णासाहेबांचा संबंध होता. बोर्डी हायस्कूलच्या वसतिगृहांत आपल्या मातुश्रींच्या नांवानें अण्णासाहेबांनीं एक खोली बांधून दिली आहे. वसई येथील वाघ हायस्कूल चालविणाऱ्या वसई एज्युकेशन सोसायटीचे अण्णासाहेब कांहीं काळ उपाध्यक्ष होते. त्याचप्रमाणें वसई हायस्कूलच्या आश्रयदात्यांपैकीं ते एक होते. ठाणें जिल्ह्यांतील ह्या प्रमुख शिक्षण संस्थांशिवाय महाराष्ट्रांतील अनेक शिक्षण संस्थांना अण्णासाहेबांकडून मदत झालेली आहे. शिक्षण संस्थांना आणि गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अण्णासाहेबांनीं केलेल्या आर्थिक मदतीचा आंकडा फार मोठा आहे.

दुसऱ्यांच्या उपयोगी पडणें हा अण्णासाहेबांचा स्वभावधर्मच होता. त्यामुळें कोठेंही दैवी संकट ओढवलें म्हणजे त्याच्या निवारणार्थ शक्य

तो प्रयत्न करणें अण्णासाहेब आपलें कर्तव्य मानीत. अर्थात् अशा प्रकारच्या अनेक संकटांत केवळ निधिरूपानेंच मदत पोचविणें शक्य असतें. अशाच प्रकारच्या हिंदुस्थानांत जमविण्यांत आलेल्या निधींत चायना रिलीफ फंड, जपान रिलीफ फंड, क्वेटा रिलीफ फंड, बिहार रिलीफ फंड, गुजराथ रिलीफ फंड, कोंकण रिलीफ फंड, वगैरे निधींची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. ह्या सर्व संकटनिवारण निधींसाठीं अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्यांतून फार मोठे निधि जमविले. ह्या सर्व निधींना अण्णासाहेबांनीं स्वतःची अशी मोठी वर्गणी दिली आहे.

संकटनिवारण निधींप्रमाणेंच देशांत ज्या ज्या वेळीं राष्ट्रीय निधि गोळा करण्यांत आले त्या वेळीं आपल्या जिल्ह्यांतून निधि जमविण्यांत अण्णासाहेबांनीं उत्तम प्रकारची कामगिरी बजावलेली आहे. अशा निधींत टिळक स्वराज्य निधि, कस्तुरबा स्मारक निधि, महात्मा गांधी स्मारक निधि ह्या निधींचा समावेश होतो. ह्या सर्वच निधींना अण्णासाहेबांनीं दिलेली वर्गणी मोठी आहे.

हे सर्व निधि जमवितांना अण्णासाहेबांचें संघटनाकौशल्य उत्तम प्रकारें दिसून आलें. त्याचप्रमाणें त्यांच्या चारित्र्यसंपन्न व्यक्तित्वाचाही ह्या कामीं फार उपयोग झाला. निधि गोळा करण्याच्या कार्यासाठीं अण्णासाहेब जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांना उत्तम प्रकारची साथ मिळाली आणि लोकांनींही आपणहून मोठ्या आनंदानें आपली वर्गणी ह्या निधींसाठीं दिली.

सामाजिक व शैक्षणिक संस्थांना, गरीब विद्यार्थ्यांना व उपरोक्त निधींबाबत अण्णासाहेबांनीं केलेलें साह्य त्यांच्या दातृत्वाची उत्तम साक्ष देतें. ह्याशिवाय अण्णासाहेबांनीं आपल्या नातेवाइकांस आणि अनेक सहकाऱ्यांना त्यांच्या आपत्कालांत आर्थिक मदत केलेली आहे. आपल्या आर्थिक सुस्थितीचा अण्णासाहेबांनीं यथार्थानें सदुपयोग केला आणि इतरांना धडा घालून दिला. अण्णासाहेबांचें दातृत्व हा त्यांच्या निरपेक्षपणाचाच एक भाग होता. अनेक व्यक्तींचा व संस्थांचा मिळून

समाज बनतो. समाजापासून व्यक्तीचें जीवन अलग होऊं शकत नाहीं. हरघडीं तिच्या जीवनावर सामाजिक संस्कार होत असतात. समाजाचें व्यक्तीवरील ऋण सारखें वाढतच असतें. ह्या ऋणाची फेड केवळ सामाजिक सेवेनेंच होऊं शकते. अण्णासाहेबांनीं आपल्या दातृत्वानें आणि निरपेक्ष सेवेनें समाजाचें हें ऋण फेडलें. अण्णासाहेबांनीं आपल्या हयातींत केलेलें दान पाऊण लाखाच्या घरांत जाईल.

अण्णासाहेबांचा जिल्ह्यांत निघालेल्या अनेक नियतकालिकांशीं संबंध होता. त्यामध्यें कुलाबा समाचार, प्रतियोगी, टणत्कार, राष्ट्रसेवक, सर्वोदय, वगैरेंचा उल्लेख करतां येईल. ह्यांपैकीं बहुतेक नियतकालिकें राष्ट्रीय वृत्तीचीं असून जिल्ह्यांत राष्ट्रीय भावना जागृत करण्याच्या दृष्टीनें चालविलीं जात होतीं. अण्णासाहेबांनीं ह्यांपैकीं कांहींसाठीं स्वतः आर्थिक झीजही सोसली आहे.

विविध क्षेत्रांतील अण्णासाहेबांच्या कार्याचा, विशेषतः ज्याच्याशीं त्यांचें आरंभींचें सार्वजनिक जीवन निगडित झालेलें आहे अशाच कार्याचा वर उल्लेख आलेला आहे. ह्या कार्यांतूनच त्यांच्या जीवनौघाला निश्चित मार्ग मिळाला. हा जीवनौघ पुढें सारखा रुंदावत गेला व त्यांतूनच कर्तृत्वाच्या अनेक क्षेत्रांना जीवन मिळालें. अण्णासाहेबांनीं ह्या सर्व क्षेत्रांत बजावलेल्या महत्त्वपूर्ण आणि अनेकविध कार्याच्या दिग्दर्शनानेंच ह्या चरित्रग्रंथाचा बहुतेक भाग व्यापलेला आहे.

प्रकरण तिसावें

# इतर कांहीं गोष्टी

अण्णासाहेब मंत्री झाल्यानंतर मुंबईस राहावयास बंगला मिळेपर्यंत कांहीं दिवस विरारहूनच लोकलनें ते सेक्रेटेरिएटमध्यें येत असत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मलबारहिलवरील माउंट प्लेझंट रोडवर असलेल्या 'टू गेबल्स' ह्या सरकारी बंगल्यांत ते राहावयास गेले. पूर्वी बॅ. जिना मुंबईस ज्या प्रशस्त बंगल्यांत राहात असत त्या बंगल्यासमोरच हा बंगला आहे. बंगला लहानसाच व सोयिस्कर असला तरी ह्या बंगल्याला वारा नसल्याकारणानें अण्णासाहेबांनीं तो बदलून घेतला आणि पुढें १९४६ च्या नोव्हेंबर महिन्यापासून मलबारहिलवरील विंटर रोडवरच्या 'आयरी' नांवाच्या सरकारी बंगल्यांत अण्णासाहेब राहूं लागले. अण्णासाहेबांनीं पुढील पांच साडेपांच वर्षें ह्याच बंगल्यांत काढलीं. हा बंगलाही लहानसाच असला तरी नितान्त सुंदर ठिकाणीं आहे. 'आयरी' म्हणजे गरुडाचें घरटें. बंगल्याला दिलेलें नांव अगदीं यथार्थच आहे. मलबारहिलवरील एका उंच ठिकाणावर, शहरांतील सर्व वर्दळीपासून दूर अशा एकान्त ठिकाणीं

हा बंगला वसलेला आहे. बंगल्याच्या पहिल्या मजल्याच्या मागील गॅलरींतून अथांग समुद्राचें दर्शन होतें आणि समुद्रावरचे खारे वारे बंगल्याशीं हस्तांदोलन करून पुढें निघून जातात. बंगल्यासमोर लहानशीच पण टुमदार बाग आहे. अण्णासाहेब सकाळीं उठले म्हणजे ह्या बागेंत फेऱ्या मारीत मारीत दंतमंजनाचा कार्यक्रम उरकून घेत. अन्नधान्याच्या टंचाईच्या काळांत ह्या बागेंत थोडीशी भाजीपाल्याची लागवड केली होती. त्यासंबंधींच्या सूचना ह्या कार्यक्रमाच्या वेळीं अण्णासाहेब बागेच्या माळ्यांना देत. बागेंतील भाजीपाल्याच्या लागवडींत ते विशेष लक्ष घालीत. कोठला भाजीपाला केव्हां लावावा, त्याला कधीं व कोणत्या प्रकारचें खत द्यावें ह्यासंबंधीं त्यांना चांगलें ज्ञान होतें. मुखमार्जन आटोपल्यानंतर चहा घेत घेत ताज्या वर्तमानपत्रांचें अण्णासाहेब वाचन करीत. मंत्री म्हणून त्यांच्या बंगल्यावर इंग्रजी व मराठी अशीं बरींच वर्तमानपत्रें येत. वर्तमानपत्रांचें वाचन झाल्यानंतर अण्णासाहेब नियमानें थोडा व्यायाम घेत व नंतर कांहीं महत्त्वाचे सरकारी कागदपत्र असल्यास ते पाहून घेत. पहिल्या मजल्यावर जी एक प्रशस्तशी खोली आहे त्या खोलींतच अण्णासाहेबांचीं व्यायाम, वाचन, वगैरे नैमित्यिक कामें चालत. साधारणतः साडेदहा वाजतां अण्णासाहेब खालीं येत व स्नान, जेवण, वगैरे आटोपून साडेअकराच्या सुमारास सेक्रेटेरिएटमध्यें जात व तेथून साडेसहा-सातच्या सुमारास घरीं परत आल्यानंतर थोडेसे फिरून येत. त्यानंतर साडेआठ वाजण्याच्या सुमारास जेवण झाल्यानंतर परत सरकारी कागदपत्र पाहात अगर इतर वाचन करीत व साडेअकरा वाजतां झोपीं जात. मंत्री असतांना अण्णासाहेबांचा दैनंदिन कार्यक्रम हा असा होता.

सेक्रेटेरिएटमध्यें कामानिमित्त जी मंडळी त्यांना भेटावयास येत त्यांच्याशीं त्यांची वागणूक आपलेपणाची व सहानुभूतीची असे. त्यांचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर योग्य त्या अधिकाऱ्याला टेलिफोन करून ते त्यांना त्या अधिकाऱ्याकडे पाठवीत असत अगर काम महत्त्वाचें

असल्यास अधिकाऱ्याला बोलावून त्याच्याशीं चर्चा करीत. महत्त्वाच्या कामाच्या बाबतींत, आगाऊ न ठरवितां कोणी त्यांना भेटावयास गेल्यास त्यांना तें आवडत नसे. कारण त्या त्या बाबतींतल्या कामाचे कागद अगोदर पाहावयास न मिळाल्यामुळें भेटीस येणाऱ्या मंडळीचें म्हणणें तेवढेंच ऐकून घ्यावें लागत असे व कामासंबंधीं सविस्तर चर्चाही कागदपत्रांच्या अभावीं करणें शक्य होत नसे.

अण्णासाहेबांचें ऑफिसमधलें वागणें भारदस्त होतें. ते कांहींसे शिस्तप्रिय असल्यामुळें व त्यांचें व्यक्तित्वही भरदार असल्यामुळें ते ऑफीसमध्यें असतांना एक प्रकारचा वचक निर्माण होई. परंतु ह्यांत अधिकारवृत्तीचा अंशही नव्हता. हा वचक त्यांच्या धीरोदात्त व्यक्तित्वा-मुळें निर्माण होत असे. उलट त्यांच्या हाताखालील चोपदारांबरोबरचें त्यांचें वागणेंही प्रेमळपणाचें असे. त्यांच्या सुखदुःखाविषयीं, त्यांच्या अडीअडचणींविषयीं त्यांच्याकडून नेहमींच विचारपूस व्हावयाची. एकदा त्यांचा एक चोपदार बराच आजारी पडला व पुष्कळ दिवस रजेवर राहूनही कामावर रुजू होऊं शकला नाहीं. म्हणून त्या चोपदाराच्या जागीं दुसरा चोपदार घ्यावा असें खात्यामार्फत सुचविण्यांत आलें. पण तसें करण्यास अण्णासाहेबांनीं स्पष्ट नकार दिला. एवढेंच करून ते थांबले नाहींत तर आजारी चोपदाराची आपल्या वैयक्तिक चिटणिसामार्फत त्यांनीं वारंवार विचारपूस करून त्याच्या औषधपाण्याची नीट व्यवस्था लावली.

आपल्या दोन्ही वैयक्तिक चिटणिसांबरोबरचेही अण्णासाहेबांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. सरकारी नोकर म्हणून अण्णासाहेबांनीं त्यांच्याकडे कधींच पाहिलें नाहीं. अण्णासाहेबांची त्यांच्या एकनिष्ठेसंबंधीं खात्री होतांच अण्णासाहेबांनीं त्यांच्यासंबंधीं नेहमींच विश्वास दाखविला व त्यांना मोठ्या ममत्वाच्या भावनेनें वागविलें. अण्णासाहेबांचे त्यांच्याबरोबरचे संबंध खरोखरीच वैयक्तिक स्वरूपाचे झाले व ते अखेरपर्यंत तसेच टिकले.

आपल्या खात्यांतील व सेक्रेटेरिएटमधल्या इतर अधिकाऱ्यांबरोबरही अण्णासाहेब आपलेपणाच्या भावनेनें वागत. त्यांच्यासंबंधीं आपल्या बोलण्यांत अगर वागण्यांत अण्णासाहेबांनीं कधीं अविश्वास दर्शविला नाहीं, कधीं अनादरबुद्धि दाखविली नाहीं. त्यांना विश्वासांत घेऊनच अण्णासाहेबांनीं आपलें कार्य केलें व प्रत्येक वेळीं त्यांच्यासंबंधीं गुणग्राहकता व्यक्त केली. त्यांच्याकडून कांहीं चुकल्यास अण्णासाहेब त्यांना सांभाळून घेत, त्यांना बोलावून समजावून सांगत. अण्णासाहेबांनीं ह्याप्रमाणें आपल्या वागणुकीमुळें अधिकारीवर्गांत जसा आदरभाव निर्माण केला त्याचप्रमाणें त्यांना कर्तव्यतत्परही बनविलें. आजही मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांत अण्णासाहेबांसंबंधीं जी आदराची भावना आहे तिचें मूळ अण्णासाहेबांच्या त्यांच्यासंबंधींच्या ह्या वागणुकींत आहे.

मंत्री म्हणून विधिमंडळांत आपल्या मातृभाषेंत भाषणें करण्याचा पायंडा प्रथमतः अण्णासाहेबांनींच पाडला. वास्तविक इंग्रजी भाषेचें त्यांचें ज्ञान उत्तम होतें व इंग्रजीमधून ते उत्तम बोलूंही शकत. बी. ए. च्या परीक्षेसाठीं इंग्रजी व संस्कृत हेच विषय त्यांनीं घेतले होते. इंग्रजी भाषेची त्यांना आवड होती. परंतु परकीय भाषेपेक्षां मातृभाषेंतूनच आपले विचार व भावना अधिक चांगल्या प्रकारें व्यक्त करतां येतात अशी त्यांची भावना असल्याकारणानें विधिमंडळांतील आपलीं बहुतेक सर्व भाषणें त्यांनीं मराठींतूनच केलीं. विधिमंडळांतील त्यांचीं भाषणें अगदीं मुद्देसूद असत. त्यांच्यांत फाफटपसारा नसे. त्यांच्यांतून मधूनमधून विनोद डोकावत असे. विरोधीपक्षाबद्दल अनादराची भाषा अण्णासाहेब सहसा कधीं वापरीत नसत. अण्णासाहेबांनीं आपल्या वागणुकीमुळें सर्वत्र मित्र जोडले. अण्णासाहेबांच्या स्वभावाचा हा एक विशेष होता.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठीं सरकारचा मुक्काम पुण्यास असतो त्या वेळीं मंत्री क्वीन्स गार्डन्समधील सरकारी बंगल्यांत राहात असतात. पहिलीं चार वर्षें अण्णासाहेब २४ नंबरच्या बंगल्यामध्यें राहिले. पुढें ह्या बंगल्यासमोरच असलेला २६ नंबरचा बंगला श्री. बाळासाहेब

खेर ह्यांनीं सोडल्यामुळें शेवटचीं दोन वर्षें अण्णासाहेब ह्या बंगल्यांत राहिले. क्वीन्स गार्डन्समधील सर्वच बंगले प्रशस्त आहेत. २४ नंबरचा बंगला तर फारच मोठा आहे. ह्या बंगल्यासमोर पूर्वी फुलझाडांचा उत्तम बगीचा केलेला असे. अण्णासाहेब फुलांचे षोकी होते. बागेंतील उत्तम उत्तम फुलें पाहून त्यांचें मन फार उल्हसित होई. पुण्याची हवा त्यांना नेहमींच आवडे. पुण्यास मुक्काम असला म्हणजे बंडगार्डनच्या बाजूस कोरेगांव पार्कच्या रस्त्यानें अण्णासाहेब संध्याकाळीं फिरावयास जाण्यास चुकत नसत. पुण्याच्या ह्या मुक्कामांत मटार व मक्यांचा हंगाम असे. त्यांना ह्या दोन्ही वस्तु फार आवडत. विशेषतः मक्याचीं कणसें भाजून खाण्यांत त्यांना फार आनंद वाटे. पुण्यास असतांना अण्णासाहेबांचा हा नेहमींचाच कार्यक्रम असे.

अण्णासाहेबांचा मुक्काम पुण्यास असो अगर मुंबईस असो, त्यांना घरीं भेटावयास आलेल्या मंडळींना चहा फराळ घेतल्याशिवाय अण्णासाहेब जाऊं देत नसत. अण्णासाहेबांना आतिथ्याची फार आवड. मंत्री होण्यापूर्वीही विरार येथें त्यांच्या घरीं आठवड्यांतून बहुतेक दररोज कांहींतरी पाहुणे भोजनास असावयाचेच. पाहुण्यांचें आदरातिथ्य अण्णासाहेब फार उत्तम करावयाचे. त्यांत त्यांना अंतःकरणापासून आनंद वाटे. मंत्री असतांना पाहुणे जेवावयास असल्यास, पाहुण्यांच्या भोजनासाठीं काय काय पदार्थ करावयाचे ते ते स्वतः सांगत आणि प्रत्येक पदार्थ उत्तम झाला आहे किंवा नाहीं हें ते स्वतः पाहात असत. अण्णासाहेबांचा मूळचा स्वभाव फार आनंदी होता. पाहुणे वगैरे मंडळी त्यांच्याकडे आली म्हणजे ते मोठें आनंदी वातावरण निर्माण करीत. विनोदाचीही त्यांना चांगली देणगी होती. मधून मधून त्यांचा विनोद चाललेलाच असे. जेवण्याच्या वेळीं पाहुण्यांना ते आग्रह करीत. परंतु पाहुण्यांना अवघड वाटेल अशा प्रकारचा त्यांचा आग्रह नसे. अण्णासाहेबांना अत्तराची विशेष आवड होती. त्यामुळें पाहुणे मंडळी परत जाण्यापूर्वी विशेष प्रसंगीं बहुधा न चुकतां त्यांना अत्तरगुलाब होई.

भोजनानंतरचें आनंदी व प्रसन्न वातावरण ह्यामुळें अधिकच उल्हसित होत असे.

मंत्रिमंडळासाठीं अण्णासाहेबांकडे भोजनसमारंभ असला म्हणजे अण्णासाहेब प्रत्येक बाबतींत स्वतः लक्ष घालीत. हे बहुतेक सहभोजनाचे भोजनसमारंभ असत. मंत्र्यांच्या सहचारिण्यांनाही भोजनाचें आमंत्रण असे. भोजनोत्तर सर्वांना अत्तरगुलाब होईच परंतु बरोबर लहान लहान सुंदर पुष्पगुच्छही अण्णासाहेब सर्वांना देत असत. अण्णासाहेबांच्या ऋजु व विशुद्ध अंतःकरणाची हे गुच्छ म्हणजे एक साक्षच होती. अण्णासाहेबांकडील हे भोजनसमारंभ म्हणजे विनोदाची एक मेजवानीच असे. सर्वत्र खेळकर, आनंदी व प्रसन्न वातावरण असे. सर्व ठाकठीक व त्यांच्या मनाप्रमाणें पार पडलें म्हणजे अण्णासाहेबांना मोठा आनंद होई. मंत्रिमंडळाचा निरोपाचा भोजनसमारंभ (Farewell Dinner) अण्णासाहेबांनींच आपल्या बंगल्यावर घडवून आणला.

मंत्रिमंडळांतील आपल्या सर्व सहकाऱ्यांविषयीं अण्णासाहेबांच्या अंतःकरणांत नेहमींच आदराची भावना असे. श्री. बाळासाहेब खेर, श्री. मुरारजीभाई देसाई व श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांच्याबद्दल अण्णासाहेबांना नितान्त आदर वाटे. श्री. तपासे व श्री. नाईकनिंबाळकर ह्यांच्याबरोबरचे त्यांचे संबंध फार स्नेहाचे होते. विशेषतः श्री. तपासे ह्यांच्यावर त्यांचा विशेष लोभ होता.

अण्णासाहेबांना 'ब्रिज'चा विशेष षोक होता. मंत्री होण्यापूर्वीं महिन्यांतून एकदोन वेळां तरी फुरसतीच्या वेळीं तास दोन तास ब्रिज खेळण्यांत अण्णासाहेब घालवीत असत. त्यांना ब्रिजच्या खेळाचें उत्तम ज्ञान होतें. निरनिराळ्या खेळाडूंबरोबर खेळणें त्यांना आवडत असे. आपल्या पार्टनरकडून एखादी मोठी चूक झाल्यास अण्णासाहेब नाराज होत असत. विरोधी पक्षाचा एकंदर खेळ लक्षांत घेऊन त्यावर मात करण्यांत अण्णासाहेब पटाईत होते. मंत्री झाल्यापासून मात्र अण्णासाहेबांना तितकासा वेळ मिळत नसे. परंतु महिन्या दोन महिन्यांतून एकदा तरी

ब्रिजचा कार्यक्रम त्यांच्या बंगल्यावर होत असे. हा कार्यक्रम बहुधा त्यांचे स्नेही श्री. इच्छालाल जगमोहनदास ह्यांच्या सल्ल्यानें ठरत असे. तास दोन तास अशा कार्यक्रमाच्या वेळीं अण्णासाहेब ब्रिज खेळले म्हणजे त्यांचा दिवसाचा सगळा शीण नाहींसा होत असे. अण्णासाहेबांच्या येथील ब्रिजचा हा कार्यक्रम म्हणजे त्यांच्या स्नेह्यांच्या दृष्टीनें अण्णासाहेबांच्या स्निग्ध सहवासांत घटका दोन घटका मजेंत घालविण्याची सुसंधि असे. ब्रिजच्या ह्या कार्यक्रमाच्या वेळीं विनोदालाही भरती येई. ह्या कार्यक्रमाच्या रम्य आठवणी त्यांच्या स्नेह्यांच्या जीवनांत बराच काळ तरंगत राहातील.

मंत्री असतांना एखादें चांगलें नाटक लागल्यास अण्णासाहेब तें पाहावयास विसरत नसत. ह्या कार्यक्रमांत पुष्कळ वेळां श्री. शांताराम-भाऊ मोगरे व श्री. बाळासाहेब मोगरे ह्यांचा पुढाकार असे. परंतु अलीकडच्या काळांत नाटकें मागें पडल्यामुळें, असे योग फारसे जमून येत नसत. सिनेमाची अण्णासाहेबांना विशेष आवड नसे. पूर्वीं ज्या काळीं मराठी रंगभूमीनें रसिकांना वेड लावलें होतें, त्या वेळीं कोठलेंही चांगलें नाटक अण्णासाहेब चुकवीत नसत. अण्णासाहेबांच्या स्वतःच्या खासगी पुस्तकालयांत मराठींत रंगभूमीवर आलेल्या सर्वच नाटकांचीं पुस्तकें होतीं. अण्णासाहेबांनीं हीं सर्व नाटकें पाहिलीं होतीं. अण्णासाहेब नाट्यवाङ्मयाचे मोठे रसिक होते. कोठल्याही नाटकाचा आराखडा अगर त्यांतील बारकावे ते चटकन् सांगूं शकत असत. कित्येक नाटकांतील उतारेच्या उतारे त्यांना पाठ येत असत. अण्णासाहेबांच्या नाटकाच्या ह्या आवडीमुळेंच अण्णासाहेबांत अभिनयाची आवड निर्माण झाली असावी. कोठल्याही व्यक्तीच्या हावभावांची व तिच्या बोलण्यांतील लकबांची अण्णासाहेब सहजगत्या हुबेहूब नक्कल करून दाखवीत असत. ऐकणाऱ्यांना आणि पाहाणाऱ्यांना ह्याचें मोठें आश्चर्य वाटे. मराठींतील पूर्वींचीं बहुतेक सर्व नाटकें संगीतप्रधान असल्यामुळें संगीताचीही अण्णासाहेबांत मोठी आवड निर्माण झाली होती. नाटककारांत अण्णासाहेबांना गडकरी व खाडीलकर विशेष आवडत असत.

अण्णासाहेबांना पानाशिवाय दुसरें कसलेंही व्यसन नव्हतें. परंतु पानाच्या बाबतींतली त्यांची आवड फार चोखंदळ होती. त्यांना उत्कृष्ट प्रकारचीं पिकलेलीं पिवळीं कळीदार पानें लागत असत. असलीं पानें बाजारांत विशिष्ट दुकानांतच मिळतात. परंतु ह्या पानांशिवाय अण्णासाहेबांचें चालत नसे. पानाप्रमाणेंच त्यांना एका विशिष्ट प्रकारचा तंबाखू लागत असे. थोडासा उंची जर्दा व कांहीं साधा तंबाखू मिळून अण्णासाहेबांच्या पानाचा तंबाखू होत असे. पानें निवडण्यांत रोज त्यांचीं दहा-पांच मिनिटें खर्च होत. पान खाण्याची सवय अण्णासाहेबांना कॉलेज-मध्यें असतांना लागली व येरवड्याच्या तुरुंगांतील कारावासाचा काळ सोडून दिला तर ती शेवटपर्यंत टिकली. पूर्वी अण्णासाहेब दिवसां-तून बऱ्याच वेळां पान खात असत. परंतु मंत्री झाल्यापासून अण्णासाहे-बांनीं हें प्रमाण बरेंच कमी केलें होतें.

अण्णासाहेब १९२० पासून कॉंग्रेसच्या बहुतेक अधिवेशनांना हजर राहिले. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे ते अनेक वर्षें सभासद होते. महाराष्ट्राच्या कॉंग्रेस कार्यकारणीचेही ते अनेक वर्षें सभासद होते. १९५२ सालीं झालेल्या सार्वजनिक निवडणुकी लढविण्यासाठीं महाराष्ट्र प्रांतिकनें नेमलेल्या पार्लमेंटरी बोर्डाचेही अण्णासाहेब सभासद होते. ठाणें जिल्ह्याच्या कॉंग्रेस संघटनेंत त्यांचें स्थान अनन्यसाधारण होतें. त्यांच्या सल्ल्यानें व मार्गदर्शनानेंच ठाणें जिल्ह्यांतील कॉंग्रेसचें सर्व कार्य चालत असे. असें असलें तरी ठाणें जिल्ह्याच्या कॉंग्रेस कमिटीचे अण्णासाहेब एकदाही अध्यक्ष झाले नाहींत ही मोठी आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे.

अण्णासाहेबांच्या जीवनांतील ह्या ‘ इतर कांहीं गोष्टीं ’ ची ही लांबण अशीच चालू ठेवल्यास ती अखंड लांबत जाईल. अण्णासाहेबांच्या जीवनांतील वैशिष्ट्यें दाखविणाऱ्या गोष्टींचाच वर उल्लेख केलेला आहे. ह्यापेक्षां अधिक न लिहितां आतां ही लांबण येथेंच थांबविणें अधिक योग्य होईल.

प्रकरण एकतिसावें

# अण्णासाहेबांचे व्यक्तिविशेष

अण्णासाहेबांच्या संपन्न व्यक्तिमत्वाला अनेक चमकदार पैलू होते. त्यांची घडण बालपणीं आणि विद्यार्थीदशेंतच त्यांच्यावर झालेल्या संस्कारांनीं बनली होती. अण्णासाहेबांच्या घरांतील वातावरण बालबोध व कांहींशा ब्राह्मणी संस्कारांचें होतें. त्यांच्या बालपणीं त्यांच्या घरीं रोज पूजाअर्चा व चातुर्मासांत पोथी, कथा-पुराण चालू असायचेंच. अण्णासाहेबांची प्रवृत्ति ह्या संस्कारांमुळें धार्मिक बनत गेली आणि अखेरपर्यंत त्यांच्या धार्मिक वृत्तींत व आचरणांत कधींही खंड पडला नाहीं. अण्णासाहेबांच्या ह्या धार्मिक वृत्तीचा आविष्कार त्यांच्या जीवनांत अनेक रूपांनीं झाला होता. पूर्ववयांत अण्णासाहेब नियमितपणें देवपूजा करीत असत. परंतु पुढें कामाच्या गर्दीमुळें तें जमेनासें झालें. तरी स्नानानंतर प्रार्थना करण्यास ते एक दिवसही चुकले नाहींत. श्रीरामजन्मोत्सव व श्रीगणपत्युत्सव हे दोन उत्सव प्रतिवर्षीं ते मोठ्या आत्मीयतेनें आणि श्रद्धापूर्वक साजरे करीत असत. आषाढी व कार्तिकी एकादशींचे उपवासही ते नित्यनेमानें करीत असत. काशी, गया, हृषिकेशपासून खालीं कन्याकुमारीपर्यंत सर्व तीर्थांचें त्यांनीं अनेक वेळां दर्शन घेतलें होते.

विरार येथें असले म्हणजे संध्याकाळीं फिरून आल्यावर राममंदिरांत जाऊन श्रीरामाचें दर्शन घेण्यास अण्णासाहेब कधींही विसरत नसत. रामाबद्दल अण्णासाहेबांच्या मनांत अनन्यसाधारण भक्ति होती. राम हा त्यांचा आदर्श पुरुष होता.

अण्णासाहेबांच्या सद्विचारांचा आणि सत्प्रवृत्तींचा विकास ह्या धार्मिक संस्कारांतून आणि त्यांनीं आपल्यापुढें ठेवलेल्या ह्या आदर्शामधूनच झाला होता. त्यांच्या मातुश्रींच्या उज्ज्वल शिकवणुकीचा आणि त्यांच्या शैशवांत त्यांच्या आजोबांनीं घेतलेल्या दक्षतेचाही हा विकास होण्यांत हातभार लागला होता. अण्णासाहेबांचें आचरण अत्यंत विशुद्ध होतें. कोणाचेंही मार्गदर्शन नसतांना लहान वयांत आपल्या शिक्षणाचा व अभ्युदयाचा मार्ग, सर्व अनिष्ट प्रवृत्तींपासून स्वतःस दूर ठेवून, ह्याच सत्प्रवृत्तीच्या जोरावर त्यांनीं शोधून काढला. अण्णासाहेबांचें सर्वच जीवन सदाचरणानें आणि सत्प्रवृत्तींनीं फुललेलें होतें.

अण्णासाहेबांचें चारित्र्य घडविण्यांत व त्यांच्या सत्प्रवृतीची जोपासना करण्यांत धार्मिक भावनेची ह्याप्रमाणें मोठी मदत झाली. त्याचप्रमाणें ह्याच भावनेनें त्यांना मानसिक आत्मसामर्थ्यही प्राप्त करून दिलें. अण्णासाहेबांची जीवनावर श्रद्धा होती. ह्या श्रद्धेचा जन्मही अण्णासाहेबांच्या धार्मिक भावनेंतूनच झाला होता. आपल्या धार्मिक ग्रंथांत अनेक आदर्श सांगितलेले आहेत. ते आदर्श पुढें ठेवून आपल्या आचार-विचारांची नैतिक पातळी नेहमीं उच्च ठेवावी आणि आपलें जीवन अधिकाधिक विशुद्ध व समृद्ध करावें ह्याच दृष्टीनें अण्णासाहेब धार्मिक भावनेकडे पाहात असत. अशा दृष्टिकोनांतूनच श्रद्धेचा जन्म होत असतो. श्रद्धाहीन मनुष्याकडून कोणतेंच महान् कार्य होऊं शकणार नाहीं असें त्यांना वाटे. श्रद्धा संकटकालीं मनुष्याला आत्मिक व मानसिक सामर्थ्य प्राप्त करून देते व नेहमींच सुरू असलेल्या जीवनसंग्रामांत आघात-प्रत्याघातांनीं पावलोपावलीं फुटूं पाहाणारें जीवनाचें तारू सावरून धरण्यास त्याला मदत करते अशी त्यांची भावना होती. माणसानें

संकटांशीं झुंज देऊन त्यांवर मात करावी, त्यांच्यापासून भिऊन पळून जाऊं नये, परंतु हें साधण्यासाठीं जीवनांत श्रद्धाच उपयोगी पडते असें ते नेहमीं म्हणत. ह्या श्रद्धेची अण्णासाहेबांनीं आपल्या आयुष्यभर उपासना केली आणि मृत्यूची चाहूल कानांवर पडली असतांनाही त्यांचें धैर्य चलित झालें नाहीं. अण्णासाहेबांची श्रद्धा जिवंत होती. मृत्यूवरही तिनें विजय मिळविला.

अण्णासाहेबांच्या मनःप्रवृत्तींवर जसा धार्मिक भावनेचा व विचारांचा ठसा उमटलेला होता त्याचप्रमाणें आपल्या देशाच्या वैभवशाली व स्फूर्तिदायक इतिहासानेंही त्यांचें मन संस्कारित झालें होतें. विशेषतः महाराष्ट्राच्या शौर्यशाली इतिहासानें त्यांचें मन कांहींसें भारून गेलें होतें. महाराष्ट्राचा श्रीशिवाजीमहाराजांपासूनचा इतिहास त्यांना फार स्फूर्तिदायी वाटे. शिवाजीमहाराजांसंबंधीं गोष्टी निघाल्या म्हणजे त्यांचें अंतःकरण अभिमानानें फुलून जाई. राष्ट्र जगविण्यासाठीं ज्या उदात्त गुणांची जोपासना करावी लागते त्या निष्ठा, त्याग, धैर्य, शौर्य, वगैरे गुणांचें दर्शन अण्णासाहेबांना इतिहासांत होत असे. त्यामुळेंच अण्णासाहेबांना इतिहासापासून स्फूर्ति मिळे. लहानशीच गोष्ट आहे परंतु अस्पष्ट कां होईना, त्या गोष्टीमुळें अण्णासाहेबांचें व्यक्तिदर्शन होतें. मुंबई ते पुणें हा मोटरीचा प्रवास त्यांचा नेहमींचाच असे. परंतु प्रत्येक वेळीं चौक गांव आला कीं त्यांना तानाजी मालुसरे आणि शेलारमामा ह्यांची आठवण होत असे व त्यांचें मन उल्हसित होई. मनावर ह्याप्रमाणें चिरकाल परिणाम करणारे प्रसंग एवढे प्रभावी असतात!

धार्मिक व ऐतिहासिक संस्कारांनीं संवर्धित झालेल्या अण्णासाहेबांच्या तरुण ध्येयवादी मनावर ते कॉलेजमध्यें असतांनाच त्या काळांतील राजकीय घटनांचाही विलक्षण प्रभाव पडला. लोकमान्य टिळकांच्या जहाल व युयुत्सु राजकारणानें त्यांचें मन भारून गेलें होतें. देशप्रेम ही अण्णासाहेबांच्या जीवनांतील एक मोठी आसक्ति होती. निवृत्ति आणि प्रवृत्ति ह्यांचा त्यांच्या जीवनांत सुंदर मिलाफ झाला होता. लोकमान्यांच्या

तत्त्वज्ञानांतील कर्मयोगाचा जणुं तो परिपाक होता. दिव्यानें दिवा लावावा त्याप्रमाणें लोकमान्यांनीं निर्माण केलेल्या तेजाचा प्रकाश देशांत दाही दिशांना फाकत गेला. ह्याच प्रकाशानें अण्णासाहेबांचें जीवनही उजळून निघालें. अण्णासाहेबांचा जीवनमार्ग त्यानें साफ बदलून टाकला. घरची सुस्थिति, उपजत कुशाग्रबुद्धि व प्रभावी वक्तृत्व ह्यांच्या जोरावर अण्णासाहेब उत्तम नाणावलेले वकील होऊं शकले असते. परंतु सुखसमृद्धीकडे नेणाऱ्या ह्या मार्गाकडे अण्णासाहेबांनीं आपण होऊन पाठ फिरविली व राजकीय जीवनाचा खडतर मार्ग पत्करला. मागील पिढींतील देशसेवकांच्या जीवनांतील तत्त्वनिष्ठा, त्यांचें उज्ज्वल चारित्र्य व त्यांची निरपेक्षवृत्ति ह्यांचा सुंदर समन्वय अण्णासाहेबांच्या जीवनांत झाला होता. ह्या मागील पिढींतील देशसेवकांचे अण्णासाहेब प्रतिनिधि होते. त्यांचें प्रतिनिधित्व अण्णासाहेबांनीं उत्तम प्रकारें केलें.

लोकमान्यांनंतर गांधीजी आले. त्याग आणि सेवा हीं गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानांतील महान् तत्त्वें होतीं. उच्च नैतिक विचारसरणी-शिवाय हीं तत्त्वें आत्मसात होणें शक्य नव्हतें. वैयक्तिक व राजकीय जीवनांत अण्णासाहेब नैतिक मूल्यांना फार महत्त्व देत असल्यामुळें गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर असर पडावा हें साहजिकच होतें. अण्णासाहेबांची धीरोदात्त वृत्ति आणि त्यांचें नैतिक आचरण ह्यांचें मूळ त्यांच्या मनाच्या उपजत प्रवृत्तींप्रमाणेंच ते आपणापुढें जे आदर्श ठेवीत आले त्या आदर्शांत सापडेल. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हें अण्णासाहेबांचें ब्रीदवाक्य होतें. अण्णासाहेबांचें सर्वच जीवन ह्या ब्रीदाचा अखंड आविष्कार आहे.

अण्णासाहेबांच्या जीवनाला धार्मिक, ऐतिहासिक व राजकीय संस्कारांची ह्याप्रमाणें पार्श्वभूमि होती. ह्या पार्श्वभूमीची जोड असल्यामुळें अण्णासाहेबांचें सार्वजनिक जीवन इतकें विलोभनीय होऊं शकलें. अण्णासाहेब आपल्या ऐन तारुण्यांतच राजकारणाकडे आकर्षले गेले असले, तरी त्यांचा मूळ पिंड समाजसेवकाचा होता. त्यांच्या सार्वजनिक

जीवनाची सुरुवातही समाजसेवेनेंच झाली. सोमवंशी क्षत्रिय ज्ञातीच्या उत्कर्षासाठीं त्यांनीं स्थापन केलेला संघ व तत्प्रीत्यर्थ त्यांनीं केलेला त्याग, ग्रामीण विभागांतील दारूबंदीचें त्यांनीं हातीं घेतलेलें कार्य, शेतकऱ्यांच्या दुःखविमोचनासाठीं त्यांनीं केलेले संघटित प्रयत्न, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून ग्रामीण विभागाच्या उन्नतीसाठीं त्यांनीं केलेलें कार्य, इत्यादि गोष्टी अण्णासाहेबांच्या समाजसेवेचीं निरनिराळीं अंगें उपांगें होत. अण्णासाहेबांच्या ह्या समाजसेवेमागें एक विशिष्ट ध्येयदृष्टि होती. समाजांत निर्माण झालेली अगतिकपणाची व औदासीन्याची भावना नाहींशी होऊन समाज प्रगतिशील व्हावा, शेतकऱ्यांची प्रतिकारशक्ति वाढून त्यांच्या मूक भावनांना वाचा फुटावी, ग्रामीण भागांतील दुःखमूलक अनिष्ट प्रवृत्तींचें उच्चाटन होऊन आम जनतेंत आपल्या कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी आणि ह्या सर्वांची संघटित शक्ति राष्ट्रसेवेच्या कामीं उपयोगी पडावी ह्या उदात्त हेतूनें अण्णासाहेबांनीं समाजसेवा केली.

राष्ट्रसेवा ही अण्णासाहेबांच्या जीवनांतील एक साधना होती. त्यांचें सारें जीवन ह्या साधनेप्रीत्यर्थ केलेल्या प्रयत्नांनीं व्यापून राहिलें होतें. राजकारण व राष्ट्रसेवा ह्यांचें जवळचें नातें असलें तरी अण्णासाहेबांच्या जीवनांत व्यावहारिकदृष्ट्या ज्याला राजकारण म्हटलें जातें त्याला गौण स्थान होतें. राजकारणाचा उपयोग राष्ट्रसेवेचें एक साधन म्हणून त्यांनीं केला. ठाणें जिल्ह्याच्या मर्यादित क्षेत्रांतच त्यांनीं आपल्या राष्ट्रसेवेच्या साधनेला सुरुवात केली. कर्तव्यपालनाच्या हाकेस्तव जरी त्यांनीं आपल्या कर्तव्यक्षेत्राच्या मर्यादा मधून मधून ओलांडल्या असल्या तरी त्यांची खरी ओढ आपल्या मूळच्या कर्मभूमीकडेच होती. आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रांत आपल्या सेवेनें एकदिलाची, निर्भेळ राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचें ध्येय अण्णासाहेबांनीं आपल्यासमोर ठेवलें होतें. उच्च प्रकारचें चारित्र्य आणि विशाल ध्येयदृष्टि ह्यांच्या बळावर अण्णासाहेब आपल्या ध्येयाप्रत पोचूं शकले.

आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रांत त्यांनीं इतकी उत्कृष्ट कामगिरी बजावली कीं ठाणें जिल्ह्यांत त्यांच्या कार्याला महान शक्तीचें स्वरूप प्राप्त झालें.

लोकसंग्राहक वृत्ति हा अण्णासाहेबांचा सर्वांत मोठा गुण होता. ह्या गुणाच्या जोरावरच ते लोकसंघटना यशस्वी रीतीनें करूं शकले. लोकसंघटनेचें कार्य नेहमींच बिकट असतें. नाना प्रकृतींच्या, नाना विचारांच्या व्यक्तींना एकत्रित आणून एकाच ध्येयानें संघटकाला त्यांना कार्यप्रवृत्त करावयाचें असतें. त्यांच्या भावनांना न दुखवितां हळुवारपणें आपल्या विचारांची दीक्षा त्यांना द्यावयाची असते. समतेच्या ह्या युगांत प्रत्येक व्यक्तीला महत्त्व प्राप्त व्हावें हें साहजिकच आहे. त्यामुळें सार्वजनिक जीवनांत कित्येक वेळां वैयक्तिक अहंकार दुखावला जाऊन व्यक्तीव्यक्तींतील संबंध दुरावले जाण्याचा धोका निर्माण होत असतो. हा धोका टाळण्यांत लोकनेत्याचें नेतृत्व कसोटीस लागतें. अण्णासाहेबांच्या जीवनांत अशा प्रकारचे धोके निर्माण झाले नाहींत ह्याचें सर्व श्रेय दुसऱ्याची भावना समजून घेण्याचा अण्णासाहेबांत जो मोठा गुण होता त्याला द्यावें लागेल. त्यांच्या ह्या गुणामुळेंच सार्वजनिक जीवनाला अत्यावश्यक असणारा लोकसंग्रह अण्णासाहेब करूं शकले.

लोकसंग्रहकवृत्तीप्रमाणेंच सार्वजनिक जीवनांतील निरपेक्षता हा अण्णासाहेबांचा एक गुणविशेष होता. आपली वैयक्तिक प्रतिष्ठा वाढविण्याकडे अण्णासाहेबांनीं आपल्या समाजसेवेचा कधींच उपयोग केला नाहीं. अण्णासाहेबांच्या जीवनांत मानसन्मानाचे जे प्रसंग आले ते अनाहूतपणें आले. मानसन्मानाच्या पदांवर त्यांनीं अनेक प्रसंगीं आपल्या सहकाऱ्यांनाच बसविलें. मानसन्मानापेक्षां कार्याचें महत्त्व अण्णासाहेब अधिक मानीत. निरपेक्ष सेवा करण्यांत त्यांना अधिक आनंद होई. परंतु त्यामुळेंच जनमनाची पकड अण्णासाहेब घेऊं शकले व त्यांचें कार्य लोकादरास पात्र झालें. राज्याचें मंत्रिपद चालून आलें असतांनाही अण्णासोहब हुरळून गेले नाहींत. त्या पदाचा स्वीकार करण्याची त्यांची तयारी दिसली नाहीं. त्यासाठीं त्यांचें मन वळवावें लागलें. अण्णासाहेबांच्या

चारित्र्याचा हा सर्वांत मोठा विजय होय. अण्णासाहेब सेवाभावी वृत्तीचे होते. अधिकाराच्या मोठ्या पदापासून दूर राहाण्याची त्यांची इच्छा होती. लोकसेवेची प्राप्त झालेली एक मोठी संधि ह्या भावनेनेंच त्यांनीं ह्या पदाचा स्वीकार केला. श्री. मुरारजीभाई देसाई ह्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें अण्णासाहेब आदर्श लोकसेवक होते.

अण्णासाहेबांचा दुसरा एक गुणविशेष म्हणजे त्यांचें ओजस्वी व प्रभावी वक्तृत्व होय. महाराष्ट्रांतील उत्कृष्ट वक्त्यांत त्यांची गणना होत असे. बहुजनसमाजाच्या अंतःकरणाला भिडणारें असें त्यांचें वक्तृत्व होतें. त्यांत त्यांची बहुजनसमाजाविषयींची कळकळ प्रतीत होत असे. त्यांची भाषा ओघवती व डौलदार असे. इतिहासांतील रोजच्या व्यवहारांतील अनेक उदाहरणांनीं ते आपलें भाषण सजवीत असत. त्यांच्या भाषणांतून मधून मधून सुभाषितांची पखरण केलेली असे. श्रोतृसमुदायाला आवाहन करण्याची त्यांची हातोटी अजब होती. त्यांचा आवाज पल्लेदार व श्रोतृवर्गावर छाप बसविणारा होता. आवाजांत प्रसंगोपात् चढ उतार करण्याची कलाही त्यांना चांगली अवगत होती. अण्णासाहेबांच्या भाषणांत विविधपणा होता. त्याच्यांतून विनोदही थुई थुई उडणाऱ्या कारंजाप्रमाणें मधून मधून डोकावत असे. विषयाची मांडणीही ते उत्तम प्रकारें करीत. उत्कृष्ट वक्त्याला लागणारे सर्व गुण अण्णासाहेबांच्या अंगीं होते. त्यांचें सार्वजनिक जीवन यशस्वी होण्यास त्यांच्या वक्तृत्वाचा त्यांना चांगलाच उपयोग झाला.

अण्णासाहेबांचें वैयक्तिक जीवन अनेक सद्गुणांनीं फुललेलें होतें. दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं समरस होण्याची त्यांची ताकद विलक्षण होती. अण्णासाहेबांच्या अंतःकरणांतून प्रेमाचा निर्झर अखंड वाहात असे. दुसऱ्यांवर प्रेम करतांकरतांच त्यांनीं इतरांचें प्रेम संपादन केलें. सहानुभूतीचा ओलावा दिसला म्हणजे माणूस चटकन् त्या ठिकाणीं वळत असतो. अण्णासाहेबांच्या सहानुभूतीला जातिभेदाचीं, धर्मभेदाचीं बंधनें नव्हतीं. अथांग पसरलेल्या सागराप्रमाणें त्यांच्या सहानुभूतीची

व्याप्ति होती. निरक्षर अडाणी आदिवासींपासून तों निकटवर्ती स्नेहीमंडळीपर्यंत सर्वांनाच त्यांच्या सहानुभूतीची ऊब मिळे. त्यांच्या संकटकाळीं अण्णासाहेब त्यांच्या पाठीशीं उभे असत. तुफानी वादळांत सापडलेलें एखादें जहाज सुरक्षित बंदरांत नांगरून पडावें तशाच प्रकारची भावना अण्णासाहेबांच्या सान्निध्यांत निर्माण होत असे. पित्याचें वात्सल्य, मातेची क्षमाशीलता व बालकाची निरागस वृत्ति ह्यांचा सुंदर त्रिवेणी संगम अण्णासाहेबांच्या जीवनांत झाला होता.

मार्दवाबरोबरच अण्णासाहेबांच्या जीवनांत प्रखरताही होती. अण्णासाहेब अत्यंत स्वाभिमानी होते. त्यांच्या स्वाभिमानाला धक्का लावणारे प्रसंग उद्भवल्यास त्यांच्यांतील ही प्रखरता उफाळून येत असे. अशा वेळीं अण्णासाहेबांचें मन वळविणें अत्यंत कठीण काम होऊन बसे. स्वाभिमानाबरोबरच करारीपणाही त्यांच्या अंगीं असल्यामुळें अशा प्रसंगीं त्यांच्या वागण्याला व बोलण्याला एक प्रकारची धार येत असे. परंतु अशा प्रकारचे प्रसंग अण्णासाहेबांच्या आयुष्यांत फारच थोडे आले. उलट पक्षीं त्यांच्या अंगीं असलेल्या बाणेदारपणा, करारीपणा व कणखरपणा ह्या गुणांमुळें त्यांच्या व्यक्तित्वाला तेज चढलें.

मुंबईच्या नागरिक जीवनाशीं जरी त्यांचा रोजचा संबंध येत असे तरी त्यांचें मन ग्रामीण जीवनाशींच एकरूप झालेलें होतें. नागरिक जीवनाचे ठसे साहजिकपणें त्यांच्या जीवनावर उमटलेले असले तरी नागरिक जीवन त्यांना कधींच आत्मसात करूं शकलें नाहीं. संगमापाशीं एकत्र येऊनही गंगा आणि यमुना ह्यांचे प्रवाह एकरूप न होतां जसे स्पष्टपणें निरनिराळे दिसतात तशाच प्रकारचा ग्रामीण आणि नागरिक संस्कारांचा संगम अण्णासाहेबांच्या जीवनांत झाला होता. अण्णासाहेबांचें जीवन गंगोदकासारखें पवित्र व गंगौघासारखें प्रशान्त होतें. त्यांच्या ध्येयदृष्टीनें त्याला पावित्र्य आणलें आणि त्यांच्या जीवनदृष्टीनें त्याला खोली प्राप्त झाली. कोणाही ध्येयवादी लोकसेवकाला स्फूर्तिदायी व्हावें असेंच अण्णासाहेबांचें सर्व जीवन झालें.

प्रकरण बत्तिसावें

# श्रद्धांजलि

## विश्वासू सहकारी

कै. श्री. गोविंद धर्माजी ऊर्फ अण्णासाहेब वर्तक ह्यांच्या श्राद्धदिनीं आपण वाङ्मयश्रद्धांजलि अर्पण करण्याचें ठरविलें व मी चार शब्द लिहावे असें मला सुचविलें ह्याबद्दल मी आपला ऋणी आहें.

कै. अण्णासाहेब ह्यांचा व माझा प्रथम परिचय त्यांनीं मला विरार येथें हिंदु धर्मावर व्याख्यान देण्यास सुमारें २५ वर्षांपूर्वी निमंत्रण केलें तेव्हां झाला. मी विरारला गेलों व व्याख्यान दिलें. त्या वेळीं त्यांचीं मतें गांधीवादास पूर्ण अनुकूल नव्हतीं, पण हळूहळू त्यांच्यावर त्यांचा प्रभाव पडत होता असें मला वाटलें. ठाणें जिल्ह्यांत ते उत्कृष्ट लोकसेवा करीत होते. बोर्डीला फारच निष्ठावंत व निरलस कार्यकर्त्यांचा संघ होता. श्री. सखाराम पाटील, श्री. मुकुंदराव सावे, आचार्य भिसे व इतर अनेक कार्यकर्ते जनसेवा करीत होते व आहेत. त्या सर्वांस अण्णासाहेब वर्तकांचा पूर्ण आधार होता. ह्या कार्यामुळें माझा व त्यांचा अधिकच परिचय झाला व माझ्या मनांत त्यांच्याबद्दल पुष्कळ आदर उत्पन्न झाला. पुढें येरवडा येथील तुरुंगांत आमच्या गांठी पडत असत. त्यांची भव्य

शरीरयष्टि, शांत स्वभाव, समतोल वृत्ति व पोक्त आणि मोकळी राहाणी हीं माझ्या अवलोकनांत आलीं व माझा आदर वृद्धिंगत झाला.

१९४६ सालीं मुख्य प्रधान म्हणून मंत्रिमंडळ बनविण्याचें काम माझ्याकडे आलें त्या वेळीं मला अण्णासाहेब वर्तकांना मंत्रिमंडळांत प्रविष्ट करण्याची प्रेरणा झाली. निवडणुकीनंतर यशस्वी बहुसंख्य पक्षांतील अनेक सभासदांच्या महत्त्वाकांक्षा व सत्तालोलुपता जागृत होत असल्यामुळें मंत्रिमंडळ बनविण्याचें काम मोठें नाजूक असतें. दिरंगाई न लावतां पक्षांतील सर्व सभासदांच्या लायकीचें व पक्षनिष्ठेचें पूर्ण व यथातथ्य मूल्यमापन करून शक्य तेवढ्या लवकर मंत्र्यांची योजना करणें जरूर असतें. नाहींतर लोकांत व पक्षांत अस्वस्थता उत्पन्न होते, प्रकरण चिघळत जातें व वर्तमानपत्रांतून नानातऱ्हेच्या सूचना व कंड्या प्रसिद्ध होऊं लागतात. ह्यासाठीं गुप्तता राखणें अवश्य असतें. मी माझ्या मनाशीं अण्णासाहेबांचें नांव निश्चित केल्यावर फक्त एक दोन पक्षप्रमुखांस त्यांचें नांव सुचवून माझा निश्चय कळविला व ताबडतोब महात्मा गांधी रोडवरील माझ्या कचेरींत येऊन भेटण्यास त्यांच्याकडे तोंडी पण निकडीचा निरोप पाठविला. त्याप्रमाणें ते मला भेटण्यास आले. पण मी कशासाठीं बोलाविलें होतें ह्याची त्यांच्या मनास किंचित्‌ही वार्ता नव्हती. त्यांचा मंत्रिमंडळांत समावेश करण्याबद्दलची सूचना केल्यानें त्यांना आश्चर्य वाटलें व ‘ विचार करून उत्तर देतों ’ असें त्यांनीं सांगितलें. पुढें कबूल केल्याचें त्यांनीं कळविल्यावर मीं त्यांचें नांव जाहीर केलें. मंत्रिमंडळांत मला त्यांचा फार उपयोग झाला. सर्वांशीं मनमिळाऊपणानें वागण्याची त्यांची हातोटी अजब होती. त्यामुळें अनेक वेळां मी त्यांच्याकडे अवघड कामें सोपवीत असें व तीं ते निष्ठेनें पार पाडीत असत. सहा वर्षें मंत्रिपद चालविल्यानंतर त्यांना मध्यवर्ती विधिमंडळाच्या निवडणुकीस उभें राहाण्यास कॉंग्रेस पक्षानें सांगितलें व त्यांनीं कर्तव्य म्हणून मान्य केलें. ठाणें जिल्ह्यांत त्यांचें वजन फार मोठें होतें व ते निवडणुकींत यशस्वी होतील ह्याबद्दल कोणाच्याही मनांत शंका नव्हती. पण पक्षांतील कांहीं

मंडळींच्या गाफीलपणानें किंवा फाजील आत्मविश्वासामुळें किंवा हयगय इत्यादि कारणांमुळें अगदीं थोड्या मतांनीं त्यांचा पराभव झाला. त्याचा त्यांच्या मानी मनावर परिणाम झाला असला तरी त्यांनीं तो यत्किंचितही दुसऱ्याच्या दृष्टीस पडूं दिला नाहीं. १९५२ सालीं जून महिन्यांत मी इकडे येण्यास निघालों त्या वेळीं त्यांची प्रकृति चांगली होती. एक वर्षांत निर्घृण काळानें त्यांच्यावर हल्ला घातला. त्यामुळें सोमवंशी क्षत्रिय समाजाचीच नव्हे तर कॉंग्रेस पक्षाची व मुंबई प्रांताची न भरून येण्याजोगी हानि झाली. एका निष्ठावंत कार्यकर्त्यास आम्ही मुकलों. ईश्वरी इच्छेपुढें इलाज नाहीं.

**बा. गं. खेर**

*इंडिया हाऊस, लंडन*

## निष्ठावंत सेवक

श्रीयुत गो. ध. वर्तक ह्यांच्या निधनानें आपण एका श्रेष्ठ देशभक्ताला मुकलों आहोंत. गांधीजींच्या सहवासांत आल्यापासून त्यांनीं स्वतःला देशबांधवांच्या सेवेस वाहून घेतलें होतें. त्यांनीं कॉंग्रेसची तत्त्वप्रणाली वंदनीय मानली, एवढेंच नव्हे तर अखेरपर्यंत ते ज्या ज्या क्षेत्रांत कार्य करीत होते, त्या त्या क्षेत्रांत त्यांनीं ती आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या हृदयांत सहानुभूतीचा झरा अखंड वाहात होता आणि म्हणूनच त्यांच्या सहवासांत आलेल्या सर्व लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटत असे. ते वृत्तीनें सरळ, न्यायी व प्रसिद्धिपराङ्मुख होते. १९४६ सालीं दुसऱ्या कॉंग्रेस मंत्रिमंडळांत त्यांनीं यावें म्हणून महत्प्रयासानें त्याचें मन वळवावें लागलें. त्यांच्यामुळें मंत्रिमंडळाचें ऐक्य व सामर्थ्य कायम राहाण्यास मदत झाली. ह्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते एक मोठे सद्गृहस्थ होते. त्यांच्या निधनानें मुंबईची जनता एका निष्ठावंत सेवकास आणि मी एका निष्ठावंत मित्रास मुकलों आहें.

**मुरारजी देसाई**

*सेक्रेटरीएट, मुंबई*

# अण्णासाहेबांचा मोठेपणा

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें नांव आठवलें म्हणजे त्यांचा प्रेमळ स्वभाव व आनंदी वातावरण निर्माण करण्याची त्यांची हातोटी ह्याची आठवण होते; त्याचप्रमाणें त्यांची आतिथ्यपूर्ण मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहाते.

महाराष्ट्राच्या गेल्या कांहीं वर्षांच्या राजकारणांत ते प्रामुख्यानें चमकले आहेत. कैक वर्षें लोकलबोर्डाचे अध्यक्ष ह्या नात्यानें अनुभव घेतल्यामुळें नंतरच्या काळांत त्यांनीं अंगीकारलेल्या जबाबदाऱ्या ते लीलेनें पार पाडूं शकले. अन्नधान्याच्या बिकट समस्येवर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या त्या विभागाचे प्रमुख ह्या नात्यानें त्यांनीं केलेल्या सूचना व मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरलें. स्थानिक स्वराज्य संस्थांचे मंत्री म्हणूनदेखील सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबर त्यांनीं सरकारी खजिन्याचें विकेंद्रीकरण करण्याचा नवा पायंडा घातला. सत्तेचे व संपत्तीचें विकेंद्री-करणाचें तत्त्वज्ञान त्यांनीं सरकारला व इतर संस्थांना शिकविलें एवढेंच नव्हे, तर तें स्वतःही अमलांत आणण्याचा प्रयत्न केला.

१९४६ ते १९५२ मार्च अखेरपर्यंत अधिकारी मंत्री म्हणून वावरत असतांनादेखील १९५२ च्या निवडणुकींत त्यांनीं आपणहून त्या जागेची लालसा सोडली व दिल्लीचा रस्ता धरला. स्वतः जमीनदार असतांनादेखील मुंबई सरकारचें खंड-कराच्या बाबतींतलें प्रगतिपर धोरण त्यांनीं प्रत्येक वेळीं उचलून धरलें, ह्यांतच त्यांचा मोठेपणा सामावलेला होता.

अंतःकरणानें थोर, स्वभावानें गोड व मनानें दिलदार अशा कै. अण्णासाहेबांची आठवण झाली म्हणजे अजूनही ते आपल्या भोवतीं वावरत आहेत असा भास होतो.

**भाऊसाहेब हिरे**

# विशाल अंतःकरणाचे अण्णासाहेब

अण्णासाहेबांनीं इहलोक सोडल्यास उणेंपुरें एक वर्ष होत आहे. ह्या अवधींत एकही आठवडा असा गेला नसेल कीं त्या वेळीं अण्णासाहेबांची ह्या नाहीं त्या कारणावरून आठवण झाली नाहीं. कालानें दुःखभार हलका हलका होत जातो असें अनुभवास येतें. त्यामुळेंच त्यांच्या प्रथम श्राद्धदिनीं त्यांच्या स्मृति-ग्रंथांत ग्रथित करण्यासाठीं हा लहानसा लेख लिहूं शकत आहें.

कै. अण्णासाहेबांचा व माझा ओझरता परिचय सन १९४० मध्यें झाला. पाहिल्यानंतर छाप पडते असें म्हणतात ना तसलाच तो प्रकार होता. महाराष्ट्र कॉंग्रेस कार्यकर्त्यांची बैठक श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या वाड्यांत होती. बैठक सुरू होण्याच्या सुमारास अण्णासाहेब आले व प्रमुख जागीं बसले. 'हे कोण?' अशी मीं चौकशी केली, तेव्हां "हे ठाण्याचे अण्णासाहेब वर्तक" असें मला सांगण्यांत आलें.

जलौघांत अचानक दोन काष्ठें एकत्र येतात व कांहीं काळानें दूर जातात तद्वतच योगायोगानें आमच्या जीवनओघांत कांहीं काळ – दुसऱ्या खेर मंत्रिमंडळांत – आम्ही एकमेक इतके जवळ आलों कीं जणूं कांहीं जिवाचे मित्रच. परंतु अण्णासाहेबांच्या अकालीं जाण्यानें पुनश्च आम्ही दूर फेकले गेलों. अण्णासाहेब इहलोक सोडून जाण्याच्या दिवशीं, आपला विश्वास बसो अगर न बसो, मला स्वप्नांत अगदीं नेहमींच्या हसतमुखानें ज्या ठिकाणीं मी झोपलों होतों तेथें आले व 'मी जातों' असें मला बोलून निरोप घेऊन गेले. अण्णासाहेब गेले ते परत न येण्याच्या वाटेनें. अण्णासाहेबांनीं हसत हसत इहलोकची यात्रा संपविली आणि इतरांस रडावयास लावलें. थोर पुरुष हसत हसत मृत्यूशीं भेटतात व त्यांच्या-करितां पामर लोक रडतात. अण्णासाहेब अशांपैकीं थोर पुरुष होते.

म्हणतात ना, मोठ्या शरीरांत मोठें मन राहातें. अण्णासाहेबांच्या बाबतींत हें बिनचूक लागू होतें. परदुःख पाहून त्यांचें मन द्रवलें नाहीं

असें झालें नाहीं. गरिबांवर सतत प्रेमवर्षाव व्हावयाचाच. अण्णासाहेबांचा हात नेहमींच वर. आलेला त्यांच्याकडून कधीं विन्मुख गेलेला नाहीं. दैवानें दिलें आहे त्याचा उपयोग गरिबांस झाला पाहिजे ही त्यांची नेहमीं इच्छा. अनेक संस्थांना मागणी न होतां चेक पाठविले जावयाचेच. "कशाकरितां मी नाराज राहूं? मला दैवानें सर्व कांहीं दिलें आहे व सर्व कांहीं व्यवस्थित आहे" असें ते म्हणत. जर एखाद्या वेळीं ते भारी खुष असल्यास आनंदाचा व हसण्याचा नुसता वर्षाव होत असे. जमीन उन्हानें तापून निघावी व जोरकस पावसाच्या सरीवर सरी याव्यात म्हणजे जसें आनंदीआनंदाचें वातावरण निर्माण होतें तशी अण्णासाहेबांचा हसण्याचा वर्षाव सुरू झाल्यावर घरांत आनंदाची बरसात होत असे. अण्णासाहेबांचें मनमोकळें हसणें नेहमींच ऐकावयास मिळण्याचे ते दिवस आतां नाहींत म्हणून अश्रु गाळण्याची पाळी आली.

अण्णासाहेब लोकसंग्रही. कोणी आला आणि आपलासा केला नाहीं असें झालें नाहीं. मग तो कोणीही असो. अनेक पक्षांचा, पंथांचा व धर्मांचा गरिबापासून श्रीमंतापर्यंत त्यांच्याजवळ लोकसंग्रह असावयाचा. कोणास प्रेमानें बोलतील, कोणाचें दुःख हसण्यानें घालवितील, कोणास स्वतः विडा करून देतील, कोणास जेवूं घालतील, कोणास मदत करतील असें अनेकांस अनेक अंगांनीं ते रिझवीत असत.

अण्णासाहेबांच्या संगतींत १९४६ ते १९५२ पर्यंतचा काळ सुखा-समाधानानें गेला. ह्या काळांतील अनेक सुखद प्रसंग मनःश्चक्षूपुढें उभे राहातात व पापण्या आपोआप ओल्या होतात. त्यांच्या मृत्यूनें सर्वांचीच हानि झाली आहे. विशेषतः महाराष्ट्राची. माणसें येतात व जातात परंतु ज्यांची स्मृति जिवंत राहाते ते खरे मानव. अण्णासाहेबांची ही स्मृति बराच काल जिवंत राहील. ते खरे पुरुष म्हणण्यास सार्थ आहेत.

**ग. दे. तपासे**

*सेक्रेटरीएट, मुंबई*

# विशाल अंतःकरणाचे अण्णासाहेब

अण्णासाहेबांनीं इहलोक सोडल्यास उणेंपुरें एक वर्ष होत आहे. ह्या अवधींत एकही आठवडा असा गेला नसेल कीं त्या वेळीं अण्णासाहेबांची ह्या नाहीं त्या कारणावरून आठवण झाली नाहीं. कालानें दुःखभार हलका हलका होत जातो असें अनुभवास येतें. त्यामुळेंच त्यांच्या प्रथम श्राद्धदिनीं त्यांच्या स्मृति-ग्रंथांत ग्रथित करण्यासाठीं हा लहानसा लेख लिहूं शकत आहें.

कै. अण्णासाहेबांचा व माझा ओझरता परिचय सन १९४० मध्यें झाला. पाहिल्यानंतर छाप पडते असें म्हणतात ना तसलाच तो प्रकार होता. महाराष्ट्र कॉंग्रेस कार्यकर्त्यांची बैठक श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या वाड्यांत होती. बैठक सुरू होण्याच्या सुमारास अण्णासाहेब आले व प्रमुख जागीं बसले. 'हे कोण?' अशी मीं चौकशी केली, तेव्हां "हे ठाण्याचे अण्णासाहेब वर्तक" असें मला सांगण्यांत आलें.

जलौघांत अचानक दोन काष्ठें एकत्र येतात व कांहीं काळानें दूर जातात तद्वतच योगायोगानें आमच्या जीवनओघांत कांहीं काळ – दुसऱ्या खेर मंत्रिमंडळांत – आम्ही एकमेक इतके जवळ आलों कीं जणूं कांहीं जिवाचे मित्रच. परंतु अण्णासाहेबांच्या अकालीं जाण्यानें पुनश्च आम्ही दूर फेकले गेलों. अण्णासाहेब इहलोक सोडून जाण्याच्या दिवशीं, आपला विश्वास बसो अगर न बसो, मला स्वप्नांत अगदीं नेहमींच्या हसतमुखानें ज्या ठिकाणीं मी झोपलों होतों तेथें आले व 'मी जातों' असें मला बोलून निरोप घेऊन गेले. अण्णासाहेब गेले ते परत न येण्याच्या वाटेनें. अण्णासाहेबांनीं हसत हसत इहलोकची यात्रा संपविली आणि इतरांस रडावयास लावलें. थोर पुरुष हसत हसत मृत्यूशीं भेटतात व त्यांच्या-करितां पामर लोक रडतात. अण्णासाहेब अशांपैकीं थोर पुरुष होते.

म्हणतात ना, मोठ्या शरीरांत मोठें मन राहातें. अण्णासाहेबांच्या बाबतींत हें बिनचूक लागू होतें. परदुःख पाहून त्यांचें मन द्रवलें नाहीं

असें झालें नाहीं. गरिबांवर सतत प्रेमवर्षाव व्हावयाचाच. अण्णासाहेबांचा हात नेहमींच वर. आलेला त्यांच्याकडून कधीं विन्मुख गेलेला नाहीं. दैवानें दिलें आहे त्याचा उपयोग गरिबांस झाला पाहिजे ही त्यांची नेहमीं इच्छा. अनेक संस्थांना मागणी न होतां चेक पाठविले जावयाचेच. "कशाकरितां मी नाराज राहूं? मला दैवानें सर्व कांहीं दिलें आहे व सर्व कांहीं व्यवस्थित आहे" असें ते म्हणत. जर एखाद्या वेळीं ते भारी खुष असल्यास आनंदाचा व हसण्याचा नुसता वर्षाव होत असे. जमीन उन्हानें तापून निघावी व जोरकस पावसाच्या सरीवर सरी याव्यात म्हणजे जसें आनंदीआनंदाचें वातावरण निर्माण होतें तशी अण्णासाहेबांचा हसण्याचा वर्षाव सुरू झाल्यावर घरांत आनंदाची बरसात होत असे. अण्णासाहेबांचें मनमोकळें हसणें नेहमींच ऐकावयास मिळण्याचे ते दिवस आतां नाहींत म्हणून अश्रु गाळण्याची पाळी आली.

अण्णासाहेब लोकसंग्रही. कोणी आला आणि आपलासा केला नाहीं असें झालें नाहीं. मग तो कोणीही असो. अनेक पक्षांचा, पंथांचा व धर्मांचा गरिबापासून श्रीमंतापर्यंत त्यांच्याजवळ लोकसंग्रह असावयाचा. कोणास प्रेमानें बोलतील, कोणाचें दुःख हसण्यानें घालवितील, कोणास स्वतः विडा करून देतील, कोणास जेवूं घालतील, कोणास मदत करतील असें अनेकांस अनेक अंगांनीं ते रिझवीत असत.

अण्णासाहेबांच्या संगतींत १९४६ ते १९५२ पर्यंतचा काळ सुखासमाधानानें गेला. ह्या काळांतील अनेक सुखद प्रसंग मनःश्चक्षूपुढें उभे राहातात व पापण्या आपोआप ओल्या होतात. त्यांच्या मृत्यूनें सर्वांचीच हानि झाली आहे. विशेषतः महाराष्ट्राची. माणसें येतात व जातात परंतु ज्यांची स्मृति जिवंत राहाते ते खरे मानव. अण्णासाहेबांची ही स्मृति बराच काल जिवंत राहील. ते खरे पुरुष म्हणण्यास सार्थ आहेत.

**ग. दे. तपासे**

*सेक्रेटरीएट, मुंबई*

# कार्यकर्त्यांचें स्फूर्तिस्थान

ठाणें जिल्ह्याचे सुप्रसिद्ध पुढारी व माझे अत्यंत जिव्हाळ्याचे स्नेही कै. अण्णासाहेब वर्तक हे ता. १४ जुलै १९५३ रोजीं स्वर्गवासी झाले, ही घटना अत्यंत दुःखद खरी पण काळापुढें प्रत्येकालाच नमावें लागतें. अण्णासाहेब आज आपणांमध्यें देहरूपानें नसले तरी त्यांनीं केलेलें कार्य इतक्या मोलाचें आहे कीं त्याची स्मृति आपणा सर्वांस सततच राहील. म्हणून कै. अण्णासाहेब वर्तक स्मारकसमितीनें त्यांच्या चरित्रात्मक 'स्मृतिग्रंथा' चें प्रकाशन करण्याचें ठरविलें आहे तें योग्यच आहे. त्यासाठीं त्यांच्या आठवणी कळविण्यासंबंधीं समितीनें मला केलेल्या विनंतीचा स्वीकार मी संमिश्र भावनांनींच करीत आहें. कारण कै. अण्णासाहेबांसारख्या थोर व्यक्तीच्या सहवासांत घालविलेल्या काळाच्या स्मृति ह्या निमित्तानें मनांत जागृत होतात व त्यांची आठवण मन खिन्न करून सोडते व अशा गोंधळलेल्या मनःस्थितींत अंतःकरणांतील भावना शब्दांनीं व्यक्त करणें कठीण होऊन बसतें. पण ह्याबरोबरच त्यांच्या स्मृतीला आदरांजलि वाहाण्याचें पवित्र कर्तव्य करीत असतांना ह्या दुःखांतही मनाला समाधान वाटतें.

माझ्या राजकीय जीवनाला सुरुवात झाल्यापासून माझा व अण्णासाहेबांचा परिचय झाला व अनेक राजकीय क्षेत्रांमध्यें काम करीत असतांना तो परिचय दृढ होत गेला. ठाणें जिल्ह्यामध्यें राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या महनीय कामगिरीमुळें ते सर्व महाराष्ट्राच्या चांगले परिचयाचे झाले. हें त्यांचें कार्य पुढें अनेक कार्यकर्त्यांचें स्फूर्तिस्थान बनलें. त्यांची मजबूत शरीरयष्टि, हसरी मूर्ति व डौलदार आवाज ह्यांच्यामुळें त्यांचें व्यक्तिमत्व कोणाच्याही नजरेस चटकन भरत असे. परंतु मला त्यांच्या सहवासाचा जो लाभ घडला त्यामुळें त्यांचें व्यक्तिमत्व जवळून पाहाण्यास मिळालें. त्यांचा स्वभाव निगर्वी, निःस्पृह व बाणेदार होता. परंतु सर्वांत प्रकर्षानें चमकणारा त्यांचा कोणता मोठा

गुण माझ्या नजरेस आला असेल तर त्यांचें विशाल व वात्सल्यपूर्ण अंतःकरण. त्यांच्या सान्निध्यांत आलेली प्रत्येक व्यक्ति मग ती कोणत्याही जातीची, पंथाची व विचारसरणीची असो, ती त्यांच्या ह्या गुणामुळें त्यांच्याकडे आकर्षित होत असे. ह्याच गुणाच्या जोरावर सर्व महाराष्ट्रभर त्यांनीं भिन्नभिन्न प्रवृत्ति असलेले अनेक जिव्हाळ्याचे स्नेही जोडले होते.

आपल्या राज्यांतील स्थानिक संस्था आज आपणांस उत्कर्षाच्या मार्गावर दिसत आहेत. परंतु त्यांच्या उत्कर्षासाठीं कै. अण्णासाहेबांनीं सर्व हयातभर केलेले परिश्रम त्यांच्या मागें आहेत. लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वी रीतीनें अमलांत आणण्यासाठीं स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार जास्तींत जास्त लोकाभिमुख झाला पाहिजे असें त्यांचें ठाम मत होतें व त्याच दृष्टीनें त्या संस्थांमध्यें जाऊन त्यांनीं प्रत्यक्ष काम केलें. स्थानिक स्वराज्य मंत्री ह्या नात्यानें ह्या संस्थांची सर्वांगीण उन्नति होण्यासाठीं त्यांनीं सतत केलेले प्रयत्न सर्वश्रुतच आहेत.

गेल्या मंत्रिमंडळांत ते असतांना माझे व त्यांचे वैयक्तिक संबंध जास्त दृढ होत गेले. महाराष्ट्र प्रांतिकच्या सभेमध्यें असो किंवा मंत्री असतांना एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय करतांना असो कित्येक बिकट प्रसंगीं त्यांचें अचूक मार्गदर्शन मला लाभलें आहे. किंबहुना माझ्या राजकीय जीवनांत ज्या ज्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा मला उपयोग झाला त्यांत कै. अण्णासाहेबांचा फार मोठा भाग आहे. अत्यंत सत्शील, दिलदार, धीरगंभीर, आनंदी व सदैव वात्सल्ययुक्त प्रेमानें ओथंबलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा माझ्या अंतःपटलावर कायमचाच राहील. अशा ह्या थोर पुढाऱ्याच्या स्मृतीला माझे शतशः प्रणाम असोत !

**यशवंतराव चव्हाण**

*सेक्रेटेरीएट, मुंबई*

# अण्णासाहेबांचें अविस्मरणीय कार्य

अण्णासाहेबांना मीं प्रथम कधीं पाहिलें तें मला नीटसें स्मरत नाहीं. परंतु "चले जाव" चळवळीमधील स्थानबद्धतेंतून त्यांची मुक्तता झाल्यावर माझा त्यांचा प्रथम परिचय झाला. पीपल्स प्रॉव्हिन्शिअल फूड कौन्सिल ह्या नांवाची एक संस्था १९४४ मध्यें त्या वेळचे मेयर श्री. मिनू मसानी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन करण्यांत आली होती. ह्या संस्थेचा चिटणीस ह्या नात्यानें संस्थेच्या सभासदांशीं संबंध ठेवणें माझें कामच होतें. अण्णासाहेबांचा व माझा ह्या संस्थेचे सभासद ह्या नात्यानें परिचय झाला. मुंबई राज्यांतील शेतकऱ्यांच्या जीवनाची व शेती-विषयक परिस्थितीची अण्णासाहेबांना किती सूक्ष्म माहिती होती ह्याची मला त्या वेळीं थोडी कल्पना आली. धान्यवसुली व धान्यवांटप ह्यांमधून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचार कौन्सिलला करावा लागत असे. ह्या दोन्ही बाबतींत अण्णासाहेबांचा बहुमोल सल्ला व मार्गदर्शन कौन्सिलला उपयोगी पडलें.

ग्रामीण विभागाचे प्रमुख प्रतिनिधि ह्या नात्यानें अण्णासाहेबांचा १९४६–५२ च्या खेर मंत्रिमंडळांत समावेश झाला ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधीं त्यांची आवड लक्षांत घेतां स्थानिक स्वराज्य खातें त्यांच्याकडे देण्यांत आलें हें योग्यच झालें. खेर मंत्रिमंडळांतील मी एक :मंत्री असल्यामुळें त्या मंत्रिमंडळाच्या कामगिरीसंबंधीं मी कांहीं बोलणें उचित होणार नाहीं. परंतु त्या मंत्रिमंडळानें बजावलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीमध्यें अण्णासाहेबांचा फार मोठा वांटा होता एवढें मात्र मी जरूर सांगूं शकतों. त्या स्मरणीय कालांतला त्यांचा एक सहकारी मंत्री म्हणून ह्याहीपेक्षां थोडें पुढें जाऊन मी सांगूं इच्छितों कीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांत अशी कोणतीही सुधारणा किंवा त्या संस्थांचा विस्तार वाढविणारी योजना नव्हती कीं जी अण्णासाहेबांनीं मनांत आणली व यशस्वी रीतीनें अंमलांत आणली

गेली नाहीं. ह्या त्यांच्या कामगिरीचा विस्तारानें उल्लेख मी इतरत्र केलेलाच आहे. हिंदुस्थानांतील सर्व राज्यांत फिरून आल्यावर माझें असें ठाम मत झालें आहे कीं मुंबई राज्यानें १९४६–५२ च्या काळांत स्थानिक स्वराज्य क्षेत्रांत नजरेंत भरण्यासारखी जी प्रगति केली तेवढी इतर कोणत्याही राज्यामध्यें दिसून आली नाहीं. ह्याचें जवळ जवळ सर्व श्रेय अण्णासाहेबांनाच द्यावयास पाहिजे.

परंतु केवळ स्थानिक स्वराज्य क्षेत्रांतच मुंबई राज्याला प्रगतीच्या व उन्नतीच्या मार्गावर नेण्यापुरतें अण्णासाहेबांचें कार्यक्षेत्र मर्यादित नव्हतें. अण्णासाहेबांच्या मंत्रिपदाच्या कालांत जो कुळकायदा झाला तो तयार होत असतांना शेतीच्या परिस्थितीबाबतच्या अण्णासाहेबांच्या ज्ञानाची बहुमोल मदत झाली. ह्याहीपेक्षां खाऱ्या जमिनीची सुधारणा करण्याकरितां सरकारी धोरण ठरविण्याबाबत अण्णासाहेबांनीं अधिक प्रामुख्यानें भाग घेतला. त्यांनीं जें कार्य केलें त्यामुळें मंत्रिमंडळाच्या स्थैर्यांत व बळांत अधिकच भर पडली.

अण्णासाहेबांच्या अकाली मृत्यूपूर्वी थोडीं वर्षें कां होईना मला त्यांच्या स्नेहाचा लाभ मिळाला, हें मी माझें भाग्यच समजतों. त्यांचें आदरातिथ्य, सौजन्य व दुसऱ्यांच्या दृष्टीनें विचार करण्याची त्यांची प्रवृत्ति हे गुण त्यांच्या मोठ्या अंतःकरणाचीच साक्ष देतात. त्यांच्या विशाल व उदार अंतःकरणाप्रमाणेंच त्यांची शरीरयष्टीही भव्य होती. संकुचितपण, कूपमंडूकवृत्ति व असहिष्णुता ह्या गोष्टींना त्यांच्या स्वभावांत बिलकुल स्थान नव्हतें. ह्या गुणांमुळेंच केवळ ते आपल्या सहकाऱ्यांच्या प्रेमास व आदरास पात्र झाले असें नव्हे तर ज्यांच्या सेवेसाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व वेचलें त्या ठाणें जिल्ह्यांतील व इतर असंख्य शेतकरी बांधवांचेंही त्यांनीं प्रेम संपादन केलें.

**वैकुंठ ल. मेहता**

*अंधेरी*

## अण्णासाहेबांचें खरें स्मारक

कै. अण्णासाहेबांनीं ठाणें जिल्ह्याची व महाराष्ट्राची अनेक वर्षें मोठी सेवा केली आहे. अण्णासाहेबांचा व माझा सार्वजनिक कार्याच्या निमित्तानें अनेक वर्षांचा परिचय होता. अण्णासाहेबांचा व माझा प्रथम संबंध जेव्हां आला तेव्हां ते प्रतियोगी सहकारिता पक्षाचे एक नामवंत व लोकप्रिय सदस्य होते. ठाणें जिल्ह्यांतील जनतेवर त्यांचें फार मोठें वजन होतें. मी व माझे कांहीं सहकारी त्या वेळीं महाराष्ट्रांत कॉंग्रेसच्या घराचा पाया घालण्याचा प्रयत्न करीत होतों. सज्जन, सरळ व सर्वेषां अविरोधेन जनतेची सेवा करणारे असा अण्णासाहेबांचा सर्व महाराष्ट्रभर लौकिक होता. अशी व्यक्ति कॉंग्रेसच्या कामाला मिळेल तर कॉंग्रेसचें घर मजबूत बनेल ह्या श्रद्धेनें मी अण्णासाहेबांच्यापाशीं गेलों. अण्णासाहेबांनीं माझी निराशा केली नाहीं. ते कॉंग्रेसमध्यें आले व त्यांनीं कॉंग्रेसच्या वतीनें यशस्वी रीतीनें मुंबई असेंब्लीची निवडणूक लढविली आणि ठाणें जिल्हा कॉंग्रेसला मिळाला. तेव्हांपासून अखेरपर्यंत अण्णासाहेबांनीं महाराष्ट्रांतील कॉंग्रेसला बळकट व शक्तिशाली करण्यासाठीं आपली सर्व शक्ति खर्च केली. त्यांची माझी जेव्हां प्रथम भेट झाली, तेव्हां जसे अण्णासाहेब होते व त्यांच्याबद्दल जें ऐकलें होतें तसेच ते अखेरपर्यंत राहिले व त्यांच्या गुणांचा नेहमीं अधिकाधिक आविष्कारच होत गेला. त्यांच्या निधनानें महाराष्ट्राची व विशेषतः महाराष्ट्रांतील कॉंग्रेसची मोठीच हानि झालेली आहे. ती भरून काढण्याचा प्रयत्न करणें हेंच त्यांचें खरें स्मारक होय.

**शंकरराव देव**

*बजाजवाडी, वर्धा*

## लोकसेवेचा आदर्श

त्यांच्या हयातींत त्यांनीं केलेल्या भरीव लोकसेवेचा आदर्श समाजांतील सर्वच लहान-मोठ्या कार्यकर्त्यांना उत्स्फूर्त आणि कार्यप्रवण करणारा आहे.

**स. का. पाटील**

*मुंबई*

# अण्णासाहेबांचें वैशिष्ट्यपूर्ण जीवन

कै. गोविंदरावजी वर्तक ह्यांचा व माझा परिचय फार जुना, लोकमान्यांच्या ह्यातींतला. पण सन १९३० पासून सुमारें २० वर्षेपर्यंत तो दाट व जिव्हाळ्याचा होता. त्यांची तडफ, त्यांचा बाणेदारपणा, कर्तृत्वशक्ति व देशभक्ति अप्रतिम होती. त्यांची शालीनता व घरंदाजपणा हीं पण तशींच.

सार्वजनिक कार्यक्षेत्रांत वर्षानुवर्षें आम्हीं एकमेकांशीं मिळून काम केलें. त्यांत त्यांच्याशीं हळुवार मतभेद देखील कधीं झाल्याचें मला आठवत नाहीं. आम्हीं एकमेकांस आपले परममित्र समजत असूं. लहान-थोर सर्व कार्यकर्त्यांशीं अपूर्व सख्यत्वानें व बंधुत्वानें वागणारा त्यांच्या-सारखा साथीदार आचार्य भिसे ह्यांना सोडून ठाणें जिल्ह्यांत मीं दुसरा पाहिला नाहीं.

ब्राह्मण-ब्राह्मणेतर विषानें पछाडलेल्या महाराष्ट्रांत स्वतः शेतकरी वर्गांतील असूनही निव्वळ कर्तृत्वाच्या व आपल्या सद्गुणांच्या जोरावर ते झपाट्यानें पुढें आले व सर्वांच्या आदरास पात्र झाले. स्वतःस शेतकरी म्हणवून घेण्यांत शेवटपर्यंत त्यांना पराकाष्ठेचा अभिमान वाटत असे. ठाणें जिल्ह्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं व भरभराटीसाठीं त्यांनीं जन्मभर उदंड उद्योग केला. आपल्या योग्यतेनें ते प्रधानपदापर्यंत पोहोंचले. शेतकऱ्यांशीं व खेड्यांतील जनतेशीं ते अपूर्व तादात्म्य पावले होते.

त्यांचा घरंदाजपणा व जुन्या थाटाची राहाणी मला फारच आकर्षक वाटत असे. स्वतःच्या व घरांतील गरजा शहर-कारखान्यांतील वस्तूंनीं न भागवितां झीज सोसूनही आपल्याच गांव-खेड्यांतील सोनार, चांभार, लोहार, शिंपी, गवंडी, कोळी व क्रिस्तांव ह्यांच्याकडून निरनिराळ्या वस्तु आग्रहानें तयार करवून घेऊन ते भागवीत असत. विरार येथील घरीं त्यांची असली राहाणी व गांवकरी, शेतकरी, कोळी, आगरी, क्रिस्तांव व मुसलमान ह्या सर्वांशीं त्यांचा प्रेमाचा व्यवहार पाहून मला मोठी स्फूर्ति

मिळे व ह्याकरितां मी अनेक वेळां कोणत्या ना कोणत्या निमित्तानें विरारला त्यांच्या घरीं जात असें.

त्यांच्या निधनाची वार्ता समजली तेव्हां मला मोठा धक्का बसला व एका अत्यंत जिव्हाळ्याच्या सन्मित्राला हरवल्याचें दुःख मला झालें.

**स्वामी आनंद**

*मुंबई*

## थोर सेवक

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचा व माझा परिचय सुमारें ३० वर्षांपूर्वी झाला. ह्या तीस वर्षांत त्यांच्यावरोबर सार्वजनिक काम करण्याचे अनेक प्रसंग मला आले. मी जरी मुंबई उपनगरांत राहात असलों तरी सार्वजनिक कामानिमित्त, माझा व ठाणें जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचा संबंध मागचीं तीस पस्तीस वर्षें सारखा येत आहे. सार्वजनिक कामानिमित्त ठाणें जिल्ह्यांतील ज्या कांहीं थोड्या कार्यकर्त्यांचा अतिशय निकट संबंध आला आहे त्यांत कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचीही गणना होते. महाराष्ट्रांतील प्रांतिक कॉंग्रेस कमिटी, स्वराज्य पक्ष, आदिवासी सेवामंडळ, मुंबई कायदे मंडळ, मुंबई विधान सभा, कॉंग्रेस पक्ष व मुंबई सरकार अशा अनेक संस्थांमधून आम्हांस एकत्र काम करण्याची संधि लाभली होती. जास्त निकटचा सहवास म्हणजे ठाणें व नासिक येथील तुरुंगांतील व तोही दोन अडीच वर्षांचा. अशा प्रकारें काम करीत असतांना किंवा एकत्रित राहात असतांना त्यांच्या अंगचे अनेक गुण निदर्शनास आले. त्यांच्या ठिकाणीं बुद्धिमत्ता, कर्तृत्व, आत्मविश्वास, स्वाभिमान, कळकळ, निरलसता, निरपेक्षता, इत्यादि अनेक गुण वाखाणण्यासारखेच होते व त्यांच्या विविध कार्यांत व सार्वजनिक जीवनांत ते प्रतीत होत असत. त्यांच्या मरणानंतर मुंबईतील एक थोर व्यक्ति श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं मुंबई क्रॉनिकल ह्या पत्रांत जो एक लेख लिहिला त्यांत अण्णासाहेबांची

थोरवी ज्याप्रकारें वर्णन करण्यांत आली आहे त्याप्रकारें ती इतर कोणी वर्णन करूं शकेल असें वाटत नाहीं. कै. अण्णासाहेब एक थोर व्यक्ति होते व त्यांच्याकडून खास ठाणें जिल्ह्याची त्याप्रमाणें महाराष्ट्र प्रदेश व मुंबई राज्याची विविध क्षेत्रांत बहुमोल सेवा झाली एवढेंच मी येथें सांगूं इच्छितों.

**द. ना. वांद्रेकर**

*सेक्रेटेरीएट, मुंबई*

## प्रामाणिक कार्यकर्ते

कै. अण्णासाहेब वर्तक हे महाराष्ट्रांतील एक थोर गृहस्थ होते. कॉंग्रेसचे एकनिष्ठ सेवक म्हणून कॉंग्रेस कार्यक्रमांत देशासाठीं त्यांनीं त्याग केला, कष्ट सहन केले. आपल्या अंगच्या थोर गुणांमुळें व कर्तबगारीमुळें ते मुंबई राज्याच्या मंत्रिपदावर बसले. ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे ते कित्येक वर्षें अध्यक्ष होते. ह्या नात्यानें स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराविषयीं त्यांना संपूर्ण माहिती होती. म्हणूनच स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री म्हणून त्यांची सन १९४६ ते १९५२ पर्यंतची कारकीर्द यशस्वी व प्रशंसनीय झाली. मंत्रिमंडळांत ते सर्वांचे आवडते झाले होते. कायदेमंडळांतील सर्व पक्षाच्या सभासदांना त्यांच्याविषयीं आदर वाटत असे.

अण्णासाहेबांचा स्वभाव प्रेमळ व मनमिळाऊ होता. त्यांचें खाजगी व सार्वजनिक जीवन निर्मळ होतें. शुद्ध चारित्र्य व सचोटी ह्यांमुळें ते सर्वांच्या विश्वासास पात्र झालेले होते.

माझा व त्यांचा प्रथम परिचय सन १९३७ सालीं आम्हीं दोघे मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीवर निवडून आलों तेव्हां झाला. सन १९४६ सालीं ते मंत्री झाले व मलाही स्पीकर होण्याची संधि मिळाली. त्यामुळें आम्ही

परस्परांच्या फार नजीक आलों. त्यांतही त्यांना मुंबई येथें जो सरकारी बंगला राहाण्यास मिळाला होता त्याच्या शेजारींच मला बंगला मिळाला. त्यामुळें आमचे संबंध जास्त दृढ व प्रेमाचे झाले. त्यांचा स्वभाव प्रेमळ व सेवाभावी असल्यामुळें मुंबईमध्यें मी आजारी असतांना ते नियमित-पणें माझी विचारपूस करीत. तसेंच मी तेथें नसतांना माझ्या कुटुंबांतील मुलांबाळांशीं वडिलांप्रमाणें वागत. त्यामुळें आमच्या कुटुंबांतील एक वडीलधाऱ्या माणसांमध्येंच त्यांची गणना झाली.

सन १९४० सालीं व्यक्तिगत सत्याग्रहामध्यें मी येरवड्याच्या तुरुंगांत होतों. अण्णासाहेब तेव्हां तेथेंच होते. त्या वेळींही आम्हीं परस्परांचे स्वभाव जवळून पाहूं शकलों व परस्परांविषयीं आदरही तेव्हांपासून निर्माण झाला होता. तुरुंगांत थोडा वेळ करमणुकींत घालवावा म्हणून अण्णासाहेब दररोज पत्ते ( ब्रिज ) खेळत असत. मीही त्यांना सोबत देत असे. ब्रिज खेळण्याचा त्यांना विशेष नाद होता व त्यांत ते प्रवीणही होते. पण ब्रिजचें व्यसन त्यांनीं स्वतःस लावून घेतलें नाहीं. काम असेल तर महिनोमहिने ब्रिजची ते आठवणही करीत नसत. त्यांच्या गोड स्वभावामुळें राजकारणांतील निरनिराळ्या पक्षांशीं व कॉंग्रेसमधल्या निरनिराळ्या गटांशीं त्यांचे संबंध प्रेमाचे व आदराचे होते.

सन १९५१ पासून त्यांच्या प्रकृतींत कांहीं बिघाड झाला असें वाटूं लागलें. कारण एरव्हीं त्यांची शरीरयष्टी उंची पुरी व धिप्पाड होती. ते नेहमीं निरोगी व आनंदी असत. वर लिहिलेला प्रकृतींतील बिघाड हा मामुली स्वरूपाचा आहे असें त्यांनीं तज्ज्ञ लोकांस दाखवून घेतल्यामुळें वाटत होतें. कांहीं झालें तरी त्यांचा अंत इतक्या लवकर होईल असें कोणासही कळलें नाहीं. त्यांच्या निधनानें महाराष्ट्रांतील एक प्रामाणिक कार्यकर्ता नाहींसा झाला व त्यामुळें देशाची व समाजाची हानि झाली आहे.

**कुं. सो. फिरोदिया**

*अहमदनगर*

## प्रेमळ अण्णासाहेब

कै. अण्णासाहेब ह्यांचा व माझा संबंध १९४६ मध्यें आला. पहिल्या भेटींत त्यांच्याबद्दल माझा जो ग्रह झाला तो अखेरपर्यंत बदलण्याचा प्रसंग आला नाहीं. त्यांच्याकडे कोणीही जावो त्याचें म्हणणें ते शांतपणें ऐकून घेत. काम होण्याजोगें नसल्यास स्पष्टपणें हसत हसत कोणाचेंही मन न दुखवितां त्याला तसें सांगत असत. ह्यामुळें त्यांच्याकडे जाणारा गृहस्थ काम झालें नाहीं तरी नाराज होत नसे.

ते मंत्री होते तरी सर्वांशीं मिळूनमिसळून वागण्याचा त्यांचा स्वभाव होता. लहान मोठा कोणीही कार्यकर्ता त्यांच्याकडे गेल्यास ते त्याला फार प्रेमानें वागवीत असत. आपल्याकडे स्नेह्यांनीं यावें, मोकळेपणानें बोलावें, असें त्यांना सदैव वाटत असे. म्हणूनच त्यांच्या घरीं केव्हांही एक दोन मंडळी दिसावयाचीच.

स्थानिक स्वराज्य संस्था प्रबळ व्हावी, तिला सरकारकडून जास्त अधिकार व पैसा मिळावा व तिचें काम चांगलें चालावें ह्याबद्दल ते मनःपूर्वक प्रयत्न करीत असत. ह्या संस्थांच्या कारभाराचा पूर्ण परिचय असल्यामुळें आपलें म्हणणें ते मंत्रिमंडळाला सुलभ रीतीनें पटवूं शकत. गेल्या ६–७ वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांना जो जास्तींत जास्त अधिकार व पैसा मिळाला तो केवळ त्यांच्याच प्रयत्नामुळें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

त्यांच्या अनेक सद्गुणांमुळें त्यांना विसरणें शक्य नाहीं.

**रा. श्री. हुकेरीकर**

*मलबारहिल; मुंबई*

## ‘ गोड आठवणी ’

कैलासवासी अण्णासाहेब वर्तक ह्यांचा व माझा परिचय मी १९४७ सालीं स्थानिक स्वराज्य खात्याचा चिटणीस झालों तेव्हां प्रथम झाला.

तो परिचय सतत वाढतच गेला व पुढें मी त्यांना माझ्या कुटुंबांतील एका वडील माणसाप्रमाणें मानूं लागलों.

कै. अण्णासाहेब ह्यांनीं स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री ह्या नात्यानें केलेली कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे व ती स्थानिक स्वराज्य खात्याच्या इतिहासांत सदैव नमूद राहील. आर्थिक टंचाईमुळें स्थानिक स्वराज्य संस्थांची कुचंबणा होत आहे व त्यांच्या हातून नित्य कर्तव्येंही नीटशीं पार पडत नाहींत हें कै. अण्णासाहेब स्वानुभवानें जाणत होते. त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याचें कार्य कै. अण्णासाहेबांनीं प्रथम हातीं घेतलें व नावीन्यपूर्ण पद्धतीनें पार पाडलें. जंगल उत्पन्नाचा आणि शेतकी व बिनशेतकी साऱ्याचा कांहीं अंश स्थानिक संस्थांना देण्याची प्रथा त्यांनींच प्रथम पाडली व ह्या प्रथेंत सहजासहजीं खंड पडूं नये म्हणून तिला कायद्याचें स्वरूप दिलें. माझ्या माहितीप्रमाणें स्थानिक स्वराज्य संस्थांना अशा रीतीनें मदत देण्याची पद्धत त्यांनीं सुरू करीपर्यंत हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंही नव्हती. ह्यामुळें त्यांना ह्या पद्धतीचे आद्यजनक मानिलें पाहिजे. ह्यां व इतर रूपानें त्यांनीं दिलेल्या मदतीमुळें स्थानिक स्वराज्य संस्थांचा एक कोटि दहा लक्ष रुपयांचा वार्षिक फायदा झाला.

ग्रामपंचायतीमध्यें स्वतः काम केलें असल्यामुळें कै. अण्णासाहेबांना ग्रामपंचायतींबद्दल विशेष जिव्हाळा होता. म्हणून त्यांनीं आपल्या कारकीर्दींत ग्रामपंचायतीच्या कायद्यांत अनेक महत्त्वाचे फरक घडवून आणले व त्यांचें क्षेत्र जास्त विस्तृत व उपयुक्त केलें. तो कायदा मंजूर होण्याच्या वेळीं त्यांनीं जें प्रदीर्घ भाषण केलें तें अत्यंत कळकळीचें, मार्मिक व वक्तृत्वपूर्ण होतें व त्याबद्दल विधानसभेंतील विरुद्ध पक्षाच्या सभासदांनींसुद्धा त्यांची फार प्रशंसा केली हें मला प्रत्यक्ष माहीत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाहाण्याचा कै. अण्णासाहेबांचा दृष्टिकोन जितका ध्येयवादी तितकाच व्यावहारिक होता. स्थानिक संस्थांमध्यें दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या दोषांकडे त्यांनीं केव्हांही डोळेझाक केली नाहीं आणि

केलेल्या व करावयाच्या सुधारणा, असलेल्या परिस्थितींत लोकांच्या गळीं किती व कशा उतरतील ह्याबद्दल ते नेहमीं दक्ष असत व काळजी-पूर्वक पुढें पाऊल टाकीत.

कै. अण्णासाहेबांची काम करण्याची पद्धत आठवण ठेवण्यासारखी होती. ते निकटवर्ती अधिकाऱ्यांवर विश्वास टाकीत व त्यांच्याशीं मनमोकळेपणानें चर्चा करीत. हेतु व मन शुद्ध असल्यामुळें त्यांना आडपडद्याची जरूर नव्हती. ह्या बाबतींत मला अनेक मनोरंजक अनुभव आले आहेत. पुष्कळ वेळां गुंतागुंतीचे प्रश्न चर्चेस पुढें येत व तऱ्हेतऱ्हेच्या व्यक्ति व शिष्टमंडळें ह्यांच्याशीं वादविवाद होई. अशा वेळीं ते चिडखोरपणा किंवा भांडखोरपणा ह्यांच्या आहारीं कधींही जात नसत. उलट ह्या सर्व प्रसंगास ते विनोदाची कलाटणी देत व मतभेदाचा कडवेपणा नष्ट किंवा कमी करीत. कोणत्याही प्रसंगाचें किंवा व्यक्तीचें खरेखुरें अंतरंग ते तात्काळ जाणीत व त्यावर विनोदामक टीका करून हसवीत हसवीत शेवटीं योग्य तेंच करून प्रकरणें निकालांत काढीत. त्यामुळें त्यांचे निर्णय केवळ तात्त्विक स्वरूपाचे नसत; त्यांस व्यवहाराची मुरड पण घातलेली असे. विनाकारण वैर न वाढविणें व शक्य असल्यास शत्रूसही मित्र करणें ह्या दृष्टीनें ते काम करीत. अर्थात् त्यामुळें त्यांचा जहाल प्रकृतीच्या लोकांशीं मतभेद होई व त्यांना ते सौम्य आहेत असें वाटे. परंतु ह्याच लोकांना त्यांचा नाजूक प्रसंगीं तडजोड करण्यास उपयोग होई हें मला प्रत्यक्ष माहीत आहे.

कै. अण्णासाहेब हे स्वभावानें फार विनोदी होते व त्यांची विनोद-बुद्धि पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येई. कोणाही व्यक्तीचें किंवा प्रसंगाचें विनोदी वर्णन करण्याची त्यांना हौस असे व अशा वेळीं त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म व यथार्थ असे ह्याची जाणीव होई. त्यांचा विनोद केव्हांही बोचक किंवा कुरघोडी करणारा नसे व त्यांचा मुख्य उद्देश आनंदी वातावरण निर्माण करणें हा असे. त्यामुळें तो नेहमीं हवासा वाटे. स्वतःबद्दलसुद्धा ते अनेक वेळां विनोदी गोष्टी सांगत.

कै. अण्णासाहेबांचें आदरातिथ्य, त्यांच्या विनोदबुद्धीइतकेंच प्रसिद्ध होतें. केव्हांही कोणीही त्यांच्याकडे जावो त्यास ते बरोबरीनें व अगत्यानें वागवीत व खाण्यापिण्याचा आग्रह करीत. त्यांना स्वादिष्ट पदार्थ आवडत व ते दुसऱ्यांनींही खावेत अशी त्यांची नेहमीं उत्कट इच्छा असे. सर्व तऱ्हेचे लोक त्यांच्याकडे येत व आपुलकीनें वागत.

बुद्धीची प्रखरता किंवा गाढ विद्वत्ता कदाचित् त्यांच्याजवळ नव्हती. पण त्याबरोबरच त्यांच्याजवळ अहंकार व आत्मप्रौढीची हौसही नव्हती. सचोटी, सौजन्य, सर्वांबद्दल सदिच्छा व सत्कार्याकडे ओढ हें त्यांच्या व्यक्तिमत्वाचें वैशिष्ट्य होतें. त्यांची भव्य मूर्ति, खणखणीत आवाज व निरागस विनोद ज्यांना माहीत आहे त्यांना त्यांचा केव्हांही विसर पडणार नाहीं.

मंत्रिपदाचीं सूत्रें सोडण्याचे दिवस जेव्हां जवळ आले तेव्हां त्यांनीं मला त्यांचें एक छायाचित्र दिलें. तेव्हां त्यांना मी त्यावर कांहींतरी ध्येयवाक्य लिहावें म्हणून सुचविलें. त्यांच्या विनोदी व खेळाडू वृत्तीला ती सूचना फार गंभीर वाटली व त्यांनीं "गोड आठवणी" एवढेंच लिहून छायाचित्र माझ्याजवळ दिलें. खरोखरच त्यांच्या "गोड आठवणी" विसरणें मला कधींही शक्य होणार नाहीं.

**दा. रा. प्रधान**, आय्. सी. एस्., जे. पी.

मुंबई

## अमर अण्णासाहेब

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें सर्व चरित्र माझ्या नजरेसमोरच घडलें आहे. बाल, विद्यार्थी, समाजसेवक व राष्ट्रसेवक ह्या सर्व भूमिकांत मीं त्यांना पाहिलें आहे. ठाणें जिल्ह्यांत विशेषतः डहाणू, पालघर व वसई ह्या तालुक्यांत निरनिराळ्या गांवीं सोमवंशी क्षत्रिय नांवानें ओळखला जाणारा एक शेतकरी समाज आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी

ह्या शेतकरी समाज विखुरलेला, एकमेकांत दळण वळण नसलेला व मागसलेला होता. ह्या समाजाचें संघटन करून त्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूनें बोर्डीचे श्री. मुकुंदराव सावे व मी असें दोघांनीं ज्ञातीच्या गांवीं फिरण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें डहाणू व पालघर तालुक्यांतील ज्ञातीच्या गांवांत प्रमुख पुढाऱ्यांच्या गांठीभेटी घेऊन आमची कल्पना समजावून दिली. वसई तालुक्यांत आमच्या कल्पनेला पाठिंबा कसा मिळेल ह्याबद्दल आम्हीं साशंक होतों. परंतु आमच्या सद्भाग्यानें त्या वेळीं अण्णासाहेब पदवीधर होऊन आपल्या गांवीं आले होते. वसई तालुका त्यांच्याकडे प्रेमानें व आदरानें पाही. त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. त्यांचें जनतेवर वजन होतें. आम्ही अण्णासाहेबांना भेटून समाजसुधारणेची कल्पना सांगितली. त्यांना ती लगेच पटली. त्यांनीं तिचा पुरस्कार करण्यासाठीं पुढाकार घेतला. वसई तालुक्यांत समाजाच्या गांवीं दौरा काढून अनुकूल वातावरण निर्माण केलें. त्यांच्याच प्रयत्नानें वसई तालुका संघाच्या चळवळींत सामील झाला. समाजोन्नति करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या स्वयंसेवक मंडळाचे ते पहिले अध्यक्ष निवडले गेले. ह्या स्वयंसेवक मंडळाच्या कामांतून लवकरच पुढें सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाची कल्पना निघून त्याची स्थापना झाली. वसई तालुक्यांतील समाजांतील एक प्रमुख व वजनदार पुढारी भायजी जगू राऊत हे संघाचे अध्यक्ष झाले व अण्णासाहेब हे खजिनदार झाले. ह्या संघामार्फत समाजाला जागृत करून राष्ट्रीय बाणा देण्याचें महान् कार्य अण्णासाहेबांनीं केलें आहे. गरीब व मागासलेल्या शेतकरी समाजांत शैक्षणिक प्रगति केल्याशिवाय तरणोपाय नाहीं हें त्यांना कळून येतांच त्यांनीं त्या दृष्टीनें सतत भरीव प्रयत्न केले. गरीब व शेतकरी समाजबांधवांच्या दातृत्वाला आवाहन करून समाजमंदिराच्या उभारणीसाठीं साह्य देण्यास हाक दिली व अवघ्या पंचवीस वर्षांत ह्या शेतकरी समाजांतून एक लक्ष रुपयांचा निधि जमविला. समाजाकडून निधि जमविण्यांत अण्णासाहेबांचा

कै. अण्णासाहेबांचें आदरातिथ्य, त्यांच्या विनोदबुद्धीइतकेंच प्रसिद्ध होतें. केव्हांही कोणीही त्यांच्याकडे जावो त्यास ते बरोबरीनें व अगत्यानें वागवीत व खाण्यापिण्याचा आग्रह करीत. त्यांना स्वादिष्ट पदार्थ आवडत व ते दुसऱ्यांनींही खावेत अशी त्यांची नेहमीं उत्कट इच्छा असे. सर्व तऱ्हेचे लोक त्यांच्याकडे येत व आपुलकीनें वागत.

बुद्धीची प्रखरता किंवा गाढ विद्वत्ता कदाचित् त्यांच्याजवळ नव्हती. पण त्याबरोबरच त्यांच्याजवळ अहंकार व आत्मप्रौढीची हौसही नव्हती. सचोटी, सौजन्य, सर्वांबद्दल सदिच्छा व सत्कार्याकडे ओढ हें त्यांच्या व्यक्तिमत्वाचें वैशिष्टय होतें. त्यांची भव्य मूर्ति, खणखणीत आवाज व निरागस विनोद ज्यांना माहीत आहे त्यांना त्यांचा केव्हांही विसर पडणार नाहीं.

मंत्रिपदाचीं सूत्रें सोडण्याचे दिवस जेव्हां जवळ आले तेव्हां त्यांनीं मला त्यांचें एक छायाचित्र दिलें. तेव्हां त्यांना मी त्यावर कांहींतरी ध्येयवाक्य लिहावें म्हणून सुचविलें. त्यांच्या विनोदी व खेळाडू वृत्तीला ती सूचना फार गंभीर वाटली व त्यांनीं "गोड आठवणी" एवढेंच लिहून छायाचित्र माझ्याजवळ दिलें. खरोखरच त्यांच्या "गोड आठवणी" विसरणें मला कधींही शक्य होणार नाहीं.

**दा. रा. प्रधान**, आय्. सी. एस्., जे. पी.

मुंबई

## अमर अण्णासाहेब

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें सर्व चरित्र माझ्या नजरेसमोरच घडलें आहे. बाल, विद्यार्थी, समाजसेवक व राष्ट्रसेवक ह्या सर्व भूमिकांत मीं त्यांना पाहिलें आहे. ठाणें जिल्ह्यांत विशेषतः डहाणू, पालघर व वसई ह्या तालुक्यांत निरनिराळ्या गांवीं सोमवंशी क्षत्रिय नांवानें ओळखला जाणारा एक शेतकरी समाज आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी

ह्या शेतकरी समाज विखुरलेला, एकमेकांत दळण वळण नसलेला व मागसलेला होता. ह्या समाजाचें संघटन करून त्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूनें बोर्डीचे श्री. मुकुंदराव सावे व मी असें दोघांनीं ज्ञातीच्या गांवीं फिरण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें डहाणू व पालघर तालुक्यांतील ज्ञातीच्या गांवांत प्रमुख पुढाऱ्यांच्या गांठीभेटी घेऊन आमची कल्पना समजावून दिली. वसई तालुक्यांत आमच्या कल्पनेला पाठिंबा कसा मिळेल ह्याबद्दल आम्हीं साशंक होतों. परंतु आमच्या सद्भाग्यानें त्या वेळीं अण्णासाहेब पदवीधर होऊन आपल्या गांवीं आले होते. वसई तालुका त्यांच्याकडे प्रेमानें व आदरानें पाही. त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. त्यांचें जनतेवर वजन होतें. आम्ही अण्णासाहेबांना भेटून समाजसुधारणेची कल्पना सांगितली. त्यांना ती लगेच पटली. त्यांनीं तिचा पुरस्कार करण्यासाठीं पुढाकार घेतला. वसई तालुक्यांत समाजाच्या गांवीं दौरा काढून अनुकूल वातावरण निर्माण केलें. त्यांच्याच प्रयत्नानें वसई तालुका संघाच्या चळवळींत सामील झाला. समाजोन्नति करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या स्वयंसेवक मंडळाचे ते पहिले अध्यक्ष निवडले गेले. ह्या स्वयंसेवक मंडळाच्या कामांतून लवकरच पुढें सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाची कल्पना निघून त्याची स्थापना झाली. वसई तालुक्यांतील समाजांतील एक प्रमुख व वजनदार पुढारी भायजी जगू राऊत हे संघाचे अध्यक्ष झाले व अण्णासाहेब हे खजिनदार झाले. ह्या संघामार्फत समाजाला जागृत करून राष्ट्रीय बाणा देण्याचें महान् कार्य अण्णासाहेबांनीं केलें आहे. गरीब व मागासलेल्या शेतकरी समाजांत शैक्षणिक प्रगति केल्याशिवाय तरणोपाय नाहीं हें त्यांना कळून येतांच त्यांनीं त्या दृष्टीनें सतत भरीव प्रयत्न केले. गरीब व शेतकरी समाजबांधवांच्या दातृत्वाला आवाहन करून समाजमंदिराच्या उभारणीसाठीं साह्य देण्यास हाक दिली व अवघ्या पंचवीस वर्षांत ह्या शेतकरी समाजांतून एक लक्ष रुपयांचा निधि जमविला. समाजाकडून निधि जमविण्यांत अण्णासाहेबांचा

हातखंडा होता. समाजाच्या प्रत्येक परिषदेंत सकाळीं ११ वाजतां त्यांच्या भाषणास सुरुवात होई व १२॥ च्या सुमारास तें संपे. त्यांचें भाषण सभा मंत्रमुग्धतेनें व तन्मयतेनें ऐके. दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास त्यांचा एक प्रयोग ठरलेला असे. तो म्हणजे "आतां माध्यान्हाची वेळ झाली आहे व सर्वांचें भोजनाकडे लक्ष जाणें साहजिकच आहे. तसेंच संघाचीही ही माध्यान्हाची वेळ आहे. त्याची भूक शमविणें हें आपलें कर्तव्य आहे." अशा आपल्या ओजस्वी वाणीनें आपल्या समाजबांधवांना देणग्या देण्यास ते आवाहन करीत व आपलें भाषण संपवितांना आपल्या कुटुंबांतील दिवंगत अगर अन्य प्रकारच्या व्यक्तींच्या नांवानें आपली उदार देणगी प्रथम जाहीर करीत. नंतर देणग्यांचा वर्षाव होई. अण्णासाहेबांनीं संघाला हजारों रुपयांच्या देणग्या देऊन कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. संघाच्या ह्या निधींतून आज समाजांतील गरीब व होतकरू विद्यार्थी आपला शिक्षणक्रम चांगल्या प्रकारें पार पाडीत आहेत. अण्णासाहेबांचें हें समाजांतील महान् कार्य आहे.

अण्णासाहेबांनीं जरी आपल्या समाजाचें कार्य अनेक वर्षें अव्याहतपणें केलें असलें तरी त्यांच्या कार्यांत संकुचितपणा नव्हता. एक लहान समाजही राष्ट्राचा एक महत्त्वाचा घटक आहे, त्याच्या उन्नतींतच राष्ट्राची प्रगति समाविष्ट झालेली आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. ते निर्भेळ राष्ट्रवादी नेते होते. आपल्या ज्ञातीसाठीं अगर समाजासाठीं सवलती मागणें ह्यासारख्या क्षुद्र कल्पनांना त्यांनीं आपल्या समाजांत कधींच थारा दिला नाहीं. समाजाला अधःपतनाच्या गर्तेपासून वांचविण्यासाठीं मद्यपानासारख्या व्यसनाचें समूळ उच्चाटन झालें पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. समाजांतून सुशिक्षित, सुसंस्कृत, सेवाभावी व स्वार्थत्यागी समाजसेवक निघाल्याशिवाय समाजाला प्रतिष्ठा मिळत नाहीं ही त्यांची शिकवणूक होती.

अण्णासाहेबांनीं आपल्या समाजाच्या उन्नतीचें कार्य हातीं घेतलें असलें तरी त्यांच्या जीवनांतील मोठा कालखंड कॉंग्रेसच्या व सार्वजनिक जनसेवेच्या कार्यांतच गेलेला आहे.

ठाणें जिल्ह्यांत व महाराष्ट्रांत अनेक क्षेत्रांत त्यांनीं अग्रभागीं राहून महान् कामगिरी केली आहे. त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें व शीलानें सर्वत्र नांवलौकिक व प्रतिष्ठा मिळविली. त्यांच्या ह्या थोर व्यक्तित्वामुळेंच समाजाला प्रतिष्ठा व नांवलौकिक मिळाला.

अण्णासाहेब निःस्पृह तसेच स्पष्टवक्ते होते. आपणांस पटलेली गोष्ट ते अत्यंत निर्भयतेनें जनतेपुढें मांडीत असत. अण्णासाहेब वर्तक ही एक व्यक्ति नव्हती. ती एक सर्वसंग्रहात्मक संस्था होती. "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" ह्या सुभाषिताप्रमाणें ते स्वभावानें अत्यंत कोमल होते. एकाद्या करुण प्रसंगीं त्यांचें अंतःकरण लहान मुलाप्रमाणें विव्हळ होऊन त्याची कोमलता अश्रुधारांनीं प्रतीत होई. हें त्यांच्या निकटवर्ती मंडळींनीं अनेक वेळां पाहिलें होतें.

अण्णासाहेब हे ठाणें जिल्ह्याचे नैतिक प्राण होते. त्यांची मूर्ति जाऊन कीर्ति शिल्लक राहिली. अण्णासाहेब गेले. अण्णासाहेब अमर आहेत !

**परशराम धर्माजी चुरी**

*चिंचणी*

## ध्येयनिष्ठ सत्याग्रही

कै. अण्णासाहबे वर्तक हे फार प्रेमळ आणि आदरातिथ्यशील स्वभावाचे असल्यामुळें त्यांच्या मित्रांना त्यांच्या मृत्यूनें हळहळ वाटावी आणि त्यांची वारंवार आठवण यावी हें स्वाभाविक होय. वैयक्तिक मैत्रीच्या आठवणी कितीही गोड असल्या तरी कोणत्याही व्यक्तीचें सार्वजनिक जीवन तिच्या जीवनापेक्षां महत्त्वाचें असल्यामुळें त्या जीवनाविषयीं चार शब्द लिहून मी त्यांच्या स्मृतीला स्नेहांजलि देऊं इच्छितों.

कै. अण्णासाहेबांच्या सार्वजनिक चारित्र्यांत एक सद्गुण मला प्रामुख्यानें आढळून आला आणि तो म्हणजे प्रामाणिक ध्येयनिष्ठा. ही ध्येयनिष्ठा तुरुंगवासांत माझ्या अनुभवास आली. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या मोहिमेंत ते आणि मी येरवड्याच्या तुरुंगांत जवळ जवळ एक वर्ष एकत्र होतों. नंतर १९४३–४४ सालींही कांहीं महिने राजबंदी म्हणून ते आणि मी नाशिक तुरुंगांत एकत्र होतों. ह्या काळांतील राजबंद्यांना पुष्कळच सवलती असत. परंतु वैयक्तिक सत्याग्रहाच्या वेळीं तशी परिस्थिति नव्हती. त्या वेळीं बऱ्याच सत्याग्रह्यांना दीर्घ कालपर्यंत कडक निर्बंधांनीं बंदिस्त असें खडतर जीवन कंठावें लागलें. अशक्त प्रकृतीच्या किंवा सुखासीन जीवनाची सवय असलेल्या अनेक सत्याग्रह्यांच्या कसोटीची ती वेळ होती. आणि कै. अण्णासाहेब आपल्या प्रामाणिक ध्येयनिष्ठेमुळें त्या कसोटींतून उज्वल यशानें पार पडले. अण्णासाहेबांची सांपत्तिक सुस्थिति सामान्य लोकांना हेवा वाटावा इतकी चांगली होती. अशा स्थितींतील लोकांना तुरुंगवास विशेष कष्टप्रद वाटावा आणि आपल्या सांपत्तिक सामर्थ्याच्या जोरावर त्यांतून पळवाटा काढण्याचा मोह त्यांना व्हावा हें स्वाभाविक होय. परंतु कै. अण्णासाहेब ह्या मोहाला बळी पडले नाहींत ही खरोखर फार कौतुकास्पद गोष्ट होती. ते त्या मोहाला बळी पडले नाहींत एवढेंच नव्हे, तर तुरुंगांतील खडतर वर्षं त्यांनीं मोठ्या आनंदानें आणि खेळीमेळीनें काढलें. त्यांनीं कधीं कुरकुर केली नाहीं किंवा त्यांचा स्वभाव चिडखोर बनला नाहीं.

त्या वेळीं असेही पुष्कळ सत्याग्रही होते कीं ज्यांची ध्येयनिष्ठा प्रामाणिक होती. पण जे मोठ्या अपेक्षा उराशीं बाळगून तुरुंगांत आले होते, त्यांची अपेक्षा होती कीं वैयक्तिक सत्याग्रहाचें लवकरच सामुदायिक सत्याग्रहांत रूपांतर होईल व त्यामुळें अल्पावधींत आपण विजयी वीर म्हणून बाहेर पडूं. ह्या अपेक्षाभंगानंतर अशांचा गांधीजींच्या नेतृत्वावरील किंबहुना सत्याग्रही मार्गावरील विश्वास डळमळला. परंतु अण्णासाहेब ह्या मोहालाही बळी पडले नाहींत. कै. अण्णासाहेबांचें वय फार झालें नव्हतें आणि

म्हणून त्यांचें निधन अकालीं झालें; परंतु त्यांची व त्यांच्यासारख्या इतर प्रामाणिक सत्याग्रह्यांची ध्येयनिष्ठा फलद्रूप होऊन स्वातंत्र्याचा सुखसोहळा पाहाण्याइतकें आयुष्य त्यांना लाभलें ह्यांतच समाधान मानलें पाहिजे.

**बापूसाहेब गुप्ते,** एम्. पी.

*१, साऊथ ॲव्हेन्यू, नवी दिल्ली*

## समन्वय वृत्तीचे अण्णासाहेब

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांना १९४४ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत श्री. स. का. पाटील ह्यांनीं बोलाविलेल्या कॉंग्रेसजनांच्या परिषदेंत मीं प्रथम पाहिलें. त्यानंतर मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें त्यांचा अधिक परिचय झाला. ते मुंबई प्रांताचे एक थोर मंत्री होते. परंतु भेटीला येणाऱ्या कोणाही मनुष्याशीं ते मंत्र्याच्या अधिकाराच्या रूबाबांत कधींच वागले नाहींत. मंत्रिपदाच्या खुर्चीवरून किंवा स्वतःच्या घरच्या गादी-वरून कोठूनही ते सारखेच मोकळेपणानें, खेळीमेळीनें व आपुलकीनें भेटणाऱ्या मनुष्याला वागवीत. त्यामुळें अधिकारपदावर गेलेल्या मनुष्याच्या वागणुकींत एक प्रकारचा दूरपणा व औपचारिकपणा येतो, तो त्यांच्या ठिकाणीं कधींच आढळला नाहीं.

परंतु १९४६ ते ५२ पर्यंत सहा वर्षांमध्यें त्यांच्या वैयक्तिक गुणसमुच्चयाचा मला जो परिचय झाला त्यापेक्षां १९५२ च्या मे महिन्यापासून जुलै अखेर ते दिल्लीमध्यें पार्लमेंटच्या अधिवेशनासाठीं राहिले असतांना मला किती तरी पटींनीं जास्त झाला. त्यांचा प्रेमळपणा, मनमोकळेपणा, दिलदारपणा, सभ्यपणा आणि दुसऱ्याची अडचण ओळखून त्याला मदत देण्याबद्दल त्यांना वाटणारी उत्सुकता, इत्यादि अनेक गुण हरघडीं प्रत्ययाला येत. एकमेकांशीं बोलण्याइतकेही मोकळेपणानें न वागणारे लोक अण्णासाहेबांच्या मध्यस्थीनें परस्परांशीं विचारविनिमय करीत.

अण्णासाहेबांच्या ह्या समन्वयी वृत्तीचा उपयोग अनेक वेळां त्यांच्या सहकारी मंत्र्यांना झालेला आहे.

कोणताही संकुचित वाद त्यांना स्पर्श करूं शकला नाहीं. ते निर्भेळ राष्ट्रीयत्व मानणारे होते. स्वभावाच्या निःसीम गोडव्यामुळें कडवे जातीयवादी व निर्भेळ राष्ट्रवादी ह्या दोघांनाही ते हवेसे वाटत. दोघांच्या आत्यंतिक वृत्तीचा ते प्रेमानें निषेध करीत व व्यावहारिक दृष्टीनें समन्वय साधण्याबद्दल आग्रह करीत. जसे जातीय वादापासून तसे प्रांतीय वादापासूनही ते अलिप्त होते. ते महाराष्ट्रीय परंपरेचे अभिमानी होते पण गुजराथी समाजांतही लोकप्रिय होते. मला कित्येक वेळां ते विनोदानें म्हणत, "पंत, माझें 'वर्तक' हें नांव पुष्कळ वेळां गमती घडवून आणतें. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाच्या प्रसंगीं दोन्ही पक्षांचे लोक विश्वासानें, कधीं कधीं नांवाच्या चुकीच्या समजुतीनें आपले अंतरंगांतले विचार माझ्याजवळ स्पष्ट करून सांगत. पण मी ब्राह्मण नव्हे असें समजल्यावरही, ब्राह्मणांनीं मला परका मानलें नाहीं किंवा आपले अंतरंगांतले विचार सांगितल्याबद्दल त्यांना मजबद्दल भय वाटलें नाहीं."

ह्या गोष्टीचें मर्म त्यांच्या प्रेमळ स्वभावांत व निर्वैर वृत्तींत आहे. दिल्लीमध्यें असतांना त्यांच्या प्रेमळ मैत्रीचा जो मला लाभ झाला तो मला माझ्या भाग्याचा निधि वाटतो. वडील भावासारखें त्यांनीं मला प्रेमानें वागविलें म्हणूनच त्यांच्या निधनाची वार्ता ऐकून आपल्या आयुष्यांतला एक सुखद भाग गेला असें मला वाटून मन विषण्ण झालें. अण्णासाहेब देहरूपानें गेले पण गुणरूपानें ते चिरकाल स्मृतींत वास करीत राहातील!

**मोरेश्वर दिनकर जोशी,** एम्. पी.

*संपादक, 'बलवंत', रत्नागिरी*

*१७, साऊथ ॲव्हेन्यू, नवी दिल्ली*

# मृदु अंतःकरणाचे अण्णासाहेब

कै. गोविंदराव धर्माजी वर्तक म्हणजे आमचे "अण्णासाहेब" ह्यांची व माझी ओळख सव्वीस-सत्तावीस वर्षें होती. परमपूज्य बापूजींच्या आदेशानुरूप उच्च सरकारी नोकरीचा त्याग करून मी वांद्रें येथें येऊन राहिल्यानंतर वांद्रें काँग्रेस कमिटी, सबर्बन काँग्रेस कमिटी व ऑल इंडिया काँग्रेस कमिटी ह्यांचा सभासद म्हणून कै. विठ्ठलभाई पटेल ह्यांच्या नेतृत्वाखालीं काम करीत असतांना शेजारच्या ठाणें जिल्ह्यांतील एक प्रमुख कार्यकर्ते अण्णासाहेब ह्यांची माहिती झाली. त्यांची ती भव्य मूर्ति, रुबाबदार वागणूक व मोठा आवाज ह्यांच्यामुळें माझ्यासारखा माणूसही प्रथम साहजिकच दबला जात असे. कानपूर काँग्रेस अधिवेशनाच्या वेळीं आम्हीं एकाच झोपडींत शेजारीं राहात होतों. त्या वेळीं त्यांच्याशीं विशेष परिचय झाला व पुढें तो सारखा वाढत गेला. १९३१–३२ सालीं ठाणें येथील कारागृहांत असतांना दिवसभरचा वेळ अण्णासाहेबांच्या सहवासांत आनंदांत गेला. बाहेरून पोलादी कवच धारण करणारे व गंभीर दिसणारे अण्णासाहेब मनाचे अत्यंत मृदु व स्वभावाचे फारच गोड, थट्टामस्करी करणारे व दुसऱ्यांनीं केलेली थट्टा हसतमुखानें सहन करणारे अशी ख्याति झाल्यामुळें आमची मैत्री वाढत गेली व तिचें पुढें घरोब्यांत रूपान्तर झालें.

त्यांच्या विविध कार्यक्षेत्रांत अत्यंत महत्त्वाची व संस्मरणीय आणि त्यांना प्रिय अशी कामगिरी स्थानिक स्वराज्य संस्थांत झाली. विरार येथील ग्रामपंचायतीचे सरपंच, लोकलबोर्डाचे सदस्य व दोन वेळां अध्यक्ष आणि शेवटीं स्वतंत्र हिंदुस्थानच्या मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री अशा चढत्या पायरीनें त्यांनीं अप्रतिम देशसेवा केली. मंत्री असतांना कोणत्याही जिल्ह्याकडून तक्रार आली कीं शक्यतोंवर अण्णासाहेब स्वतः जाऊन तपास करून शक्य ती मदत त्या संस्थांस करीत असत. मी लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूटचा सेक्रेटरी व खजिनदार आज वीस एकवीस वर्षें असल्यामुळें आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील अण्णासाहेबांच्या कार्याशीं

माझा संबंध निगडित असल्यामुळें टेलिफोनद्वारें त्यांचें मला फर्मान येत असे व मला त्यांच्याबरोबर पुष्कळ जिल्ह्यांतील दौऱ्यावर जाणें भाग पडत असे. रोजचा शंभर दीडशें मैलांचा प्रवास व दहा बारा जाहीर व्याख्यानें हा कठीण कार्यक्रम ते पार पाडीत असत. आम्ही मात्र अगदीं थकून जात असूं. ग्रामीण जनतेची व प्रदेशाची त्यांनीं केलेली सेवा व त्यांच्यासाठीं दिलेल्या सवलती अपूर्व व इतर कोणाच्या हातून सहसा न मिळणाऱ्या आहेत. शेतसाऱ्यापैकीं १५% ग्रामपंचायतीस देणें, त्या नसतील तेथें लोकलबोर्डास देणें, जंगलउत्पन्नाचा भाग लोकलबोर्डास देणें, नोकरवर्गाच्या महागाई भत्त्यापैकीं शेकडा ५०% सरकारनें सोसणें, ह्या देणग्या इतक्या उदार आहेत कीं आमच्यापैकीं सर्वांसच त्या अपूर्व वाटाव्या.

त्यांचा स्वभाव हेंच त्यांच्या चरित्राचें वैशिष्ट्य आहे. ते अतिशय मेहनती व कष्टाळू होते. हातांत घेतलेलें काम देह पणास लावून करण्याची त्यांची प्रवृत्ति असे. शेवटीं एक वर्षभर आजारांत देखील, आमचें कोणाचें न ऐकतां ते काम करीत राहिले व त्यामुळें ते बरेच लवकर कालवश झाले. अण्णासाहेब प्रामाणिक होते. ढोंगी व थापेबाज लोकांचा त्यांस तिटकारा होता. मित्रांवरील त्यांचें प्रेम अवर्णनीय होतें. दिसण्यांत व बोलण्यांत साधारण कठोर भासत असले तरी अंतर्यामीं ते फारच प्रेमळ होते. संस्कृत कवीनें वर्णन केल्याप्रमाणें "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । लोकोत्तराणां चेतांसि" अशा तऱ्हेचे ते उच्च दर्जाचे पुरुष होते.

**सखाराम सीताराम नाईक**

वांद्रें

## अण्णासाहेबांचें वैशिष्ट्य

ज्यांच्या सहवासांत मीं अनेक वर्षें घालविलीं ते अण्णासाहेब वर्तक आज आपल्यामध्यें नाहींत. त्यांनीं आपलें सबंध आयुष्य स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या सेवेसाठीं वेंचलें व तें कार्य करीत असतांनाच काळानें त्यांना आपल्यामधून दूर नेलें. ते स्वतः ग्रामीण विभागांतलेच असल्यामुळें त्या भागांतील लोकांच्या सुखदुःखाशीं ते एकरूप झाले होते. ते स्थानिक स्वराज्य मंत्री झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य खात्याच्या कारभारांत आवश्यक असलेल्या ग्रामीण दृष्टिकोनाचें प्रतिबिंब ताबडतोब दिसूं लागलें. ग्रामपंचायती व जिल्हा लोकलबोर्ड ह्यांच्याकडे स्वाभाविकपणेंच त्यांचें प्रथम लक्ष वेधलें व त्या संस्थांची भरभक्कम पायावर पुनर्रचना करण्याची कामगिरी त्यांनीं प्रथम हातीं घेतली. त्यांनीं केलेल्या ह्या बहुमोल कामगिरीचें महत्त्व इतिहास नमूद करीलच. परंतु भावी कालांतील स्थानिक स्वराज्य मंत्र्यांनाही आपल्या कार्यांत अण्णासाहेबांचाच कित्ता गिरवावा लागेल.

अण्णासाहेब माझे निकटचे स्नेही होते. तीस वर्षांची आमची अखंड मैत्री होती. आमचें दोघांचें कार्यक्षेत्र एकच होतें, ध्येयही एकच होतें. तें गांठण्यासाठीं आम्ही दोघेही झगडलों. एकमेकांचे गुणदोष दाखविण्याचें धैर्य आमच्यामध्यें होतें व त्याचा उपयोग आम्हीं आमचे दोष सुधारण्याकडे करीत असूं. सामान्य मनुष्य व उच्चपदस्थ मंत्री ह्यांच्यामध्यें एवढें निकटचें नातें क्वचित्‌च पाहावयास मिळेल. परंतु हें नातें ते निर्माण करूं शकले हेंच त्यांचें वैशिष्ट्य होतें. त्याच्या जोरावरच आम्ही एकत्र कार्य करूं शकलों.

**सी. डी. बर्फीवाला**

*अंधेरी*

## खरे कर्मयोगी

श्री. अण्णासाहेब वर्तक हे महाराष्ट्रांतील एक सुप्रसिद्ध पुढारी व लोकनेते होते. ठाणें जिल्ह्यास आपली कर्मभूमि ठरवून त्या ठिकाणीं राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि बाबतींत जनसेवेचीं कामें त्यांनीं

तीन तपांपेक्षांही अधिक काळ अखंड आणि अविरतपणें केलीं आहेत. त्यांचें व्यक्तित्व भव्य आणि आकर्षक होतें. शेतकरी कुटुंबांत आपण जन्माला आलों ही ते मोठ्या अभिमानाची व गौरवाची गोष्ट मानीत. त्यामुळें शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधीं त्यांच्या अंतःकरणांत जिवंत जिव्हाळा होता. शेतकरी सुखी तर देश सुखी असें त्यांना वाटे. मद्यपानाचे ते कट्टे विरोधी होते. खेड्यापाड्यांत ह्या व्यसनापायीं शेतकरी-कामकरी-श्रमजीवि कुटुंबांची कशी वाताहात होते व त्यांतील माता-भगिनींची कशी दुर्दशा होते ह्याचें शब्दचित्र आपल्या भाषणांत ते रंगवूं लागले कीं श्रोत्यांच्या अंगावर शहारे येत व ह्या व्यसनाची भीषणता दृष्टिसमोर उभी राही. ते एक प्रभावशाली वक्ते होते. खेड्यापाड्यांतील बहुजन समाजाच्या अंतःकरणांत जाऊन भिडणारी त्यांची वाणी साधी, सरळ परंतु अत्यंत प्रभावी होती. त्यांची भाषा ओघवती होती. त्यांच्या वाणींत ओज व तेज होतें.

एका मागासलेल्या शेतकरी समाजांत त्यांचा जन्म झाला होता. परंतु त्यांनीं त्या समाजांतून आपल्या सहकारी मित्रांच्या सहकार्यानें व आपल्या कर्तृत्वानें, दातृत्वानें आणि सेवेनें वीस वर्षांच्या अल्पावधींत जागृत असा नवसमाज निर्माण केला व त्याची शैक्षणिक व सांस्कृतिक पातळी वर आणून त्यास सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. ह्या त्यांच्या सेवेचें व कर्तबगारीचें समाजावर कायमचें ऋण आहे. लहान लहान सम संस्कृतीचे समाज किंवा पोटजाती ह्यांचें ह्या काळांत स्वतंत्र अस्तित्व टिकविणें योग्य होणार नाहीं. त्या सर्वांचें एकीकरण होणेंच आवश्यक आहे व त्यासाठीं योग्य वातावरण निर्माण करणें व सतत प्रचारकार्य करणें जरूर आहे असें त्यांचें मत होतें. क्षात्रैक्य परिषदेनें चालविलेल्या एकीकरणाच्या कामाला त्यांचा पाठिंबा होता, ते त्या कार्याचे पुरस्कर्ते होते.

त्यांचें अंतःकरण विशाल होतें. त्यांचे विचार प्रगल्भ व प्रगतिपर होते. त्यांची वृत्ति उदार व दिलदार होती. त्यांचा स्वभाव बाणेदार व करारी

होता. त्यांच्या कार्यपद्धतींत व्यवहारकुशलता व टापटीप होती. त्यांच्या स्नेहसंबंधांत मतमतांतराचें बंधन नव्हतें. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता.

अण्णासाहेब हे जरी एक अग्रगण्य पुढारी होते तरी स्थानासाठीं त्यांची कधींही स्पर्धा नसे. ते आपल्या सहकारी मित्रांच्या नेतेपदास मान देऊन काम करीत असत. त्यांचा सल्ला नेहमीं दूरदृष्टीचा व मार्गदर्शक असे. ठाणें जिल्हा कॉंग्रेस कमिटी व जिल्ह्यांतील कॉंग्रेस संघटनेसंबंधीं त्यांना विशेष आत्मीयता वाटे. कांहीं वादग्रस्त अगर मतभेदाचे प्रश्न निर्माण झाले कीं लगेच त्यांनीं समयसूचकतेनें व कुशलतेनें ते हाताळून त्याला योग्य वळण लावावें. पुढाऱ्यांत व कार्यकर्त्यांत एकोपा साधावा, त्यांच्यांत गोडवा निर्माण करावा व वातावरण निर्मळ करावें असें त्यांचें काम होतें.

सन १९२० सालापासून सन १९५३ सालापर्यंत हैद्राबाद येथें भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनापर्यंत बहुतेक कॉंग्रेस अधिवेशनांस ते प्रतिनिधि म्हणून हजर राहिले होते. ते अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अनेक वर्षें सभासद होते. तसेंच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीचेही अनेक वर्षें सभासद होते. महाराष्ट्र कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचेही सभासद होते. महाराष्ट्रांत व ठाणें जिल्ह्यांत वादग्रस्त प्रश्न निर्माण झाले कीं त्यांचा सल्ला घेतला जाई. त्यांच्या शब्दाला मोठी किंमत व मान होता. ते अत्यंत निःस्पृह व स्पष्टवक्ते होते.

आपल्या जिल्ह्यांतील कॉंग्रेस संघटना प्रभावी व कार्यक्षम राहावी ही त्यांची सदैव दृष्टि असे. आपण घालून दिलेली आदर्श परंपरा ठाणें जिल्हा लोकलबोर्ड व स्कूलबोर्ड ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांतही कायम राहावी अशी त्यांची उत्कट इच्छा होती. ह्या दोन्ही संस्था लोकसेवेंत एकमेकांना पुरक राहाव्यात व चांगल्या कर्तबगार व निःस्वार्थी मंडळीच्या हातीं त्यांचा कारभार राहावा असा त्यांचा आग्रह असे.

सुरुवातीपासून अण्णासाहेबांवर लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारसरणीचा खोलवर परिणाम झालेला होता. प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व

व धोरण त्यांना योग्य व आकर्षक वाटत होतें. सरकारशीं जरूर तेथें सहकार्य व जरूर तेथें अडवणूक व विरोध हें त्यांना पसंत पडे. परंतु पुढें ते महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे मोठे उपासक झाले. बापूजींची शिकवणूक व विचारपरंपरा त्यांच्या अंतःकरणांत खोलवर गेली. ते आपल्या व्याख्यानांत, संभाषणांत व चर्चेंत गांधी-विचारसरणीची तन्मयतेनें मांडणी करीत.

मंत्रिमंडळांत असतांनाच दोन वर्षांपासून त्यांची प्रकृति ठीक नव्हती. डॉक्टर विश्रांति घेण्याचा सल्ला देत होते परंतु त्यांनीं तिकडे दुर्लक्ष करून आपलें कर्तव्य पार पाडलें. अण्णासाहेब हे खरे कर्मयोगी होते.

**शामराव रा. पाटील**

*बोर्डी*

## ध्येयनिष्ठ अण्णासाहेब

प्रिय निकटवर्तीयांच्या मृत्यूनंतर कांहीं स्मृतिपर बोलणें किंवा लिहिणें ही गोष्ट फार कठीण आणि त्यांतल्या त्यांत ज्यांच्या सहवासांत जीवनांतील आनंद आणि दुःख ह्यांचा अनुभव घेतला, संकटांत झगडलों आणि आनंदांत बेहोश झालों अशा प्रिय माणसाच्या मृत्यूनंतर अक्षरशः दोन शब्द लिहिणें तर त्याहीपेक्षां अवघड आहे. दुःखावेग इतका तीव्र होत आहे कीं लेखणींतून शब्द उतरत नाहीं व मनांतले विचार मनांतच राहातात.

तुकाराममहाराजांनीं “ जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले ।। ” असें जें म्हटलें आहे त्याचें यथायोग्य दर्शन मला अण्णासाहेबांत नेहमीं दिसून आलें. चंदनाप्रमाणें आपल्या ५९ वर्षांच्या जीवनांत आपली सर्व काया त्यांनीं गरीब, राबणाऱ्या जनतेच्या हितासाठीं झिजविली. अण्णासाहेबांचा माझ्या मतें सर्वांत मोठा गुण म्हणजे त्यांचीं प्रखर ध्येय व तत्त्वनिष्ठा आणि करारी बाणा हा होय. आयुष्यांत त्यांनीं

उत्तम मित्रसंग्रह केला व सर्वांना आपलेंसें केलें. त्यांच्या मृत्यूमुळें आपल्या घरांतीलच माणूस नाहींसा झाला असें प्रत्येकास वाटतें.

अण्णासाहेबांची दारूबंदीवर नितान्त श्रद्धा होती. कॉंग्रेसचें धोरण म्हणून त्यांनीं दारूबंदीचा पुरस्कार केला असें नाहीं. स्वतःच्या मालकीच्या शेतींत माडाचीं झाडें होतीं त्यांवर त्यांना हजारों रुपये मिळवितां आले असते. परंतु त्या प्रकारें संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. दारूबंदीप्रमाणेंच हरिजनोद्धारावरही त्यांची अशीच श्रद्धा होती. कायदा होण्याची वाट त्यांनीं पाहिली नाहीं किंवा लोकमत बदलण्याची त्यांनीं अपेक्षा केली नाहीं. तर ध्येयनिष्ठेनें व स्वतःच्या समाधानासाठीं आपल्या मालकीचें श्रीराममंदिर त्यांनीं हरिजनांसाठीं खुलें केलें. 'आधीं केलें मग सांगितलें' हेंच त्यांचें ब्रीद होतें.

मुंबई मंत्रिमंडळांत त्यांचा समावेश त्या वेळचे मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर ह्यांनीं केला व त्यांना मानाचें स्थान दिलें. आपल्या कारकीर्दींत त्यांनीं लोकशाहीस साजेल अशीं कितीतरी उत्तम कामें केलीं. ते पट्टीचे वक्ते होते. इलाख्यांतील हजारोंच्या जमावापुढील त्यांचीं भाषणें फारच परिणामकारक होत. स्थानिक स्वराज्य खात्याचे १९४६ सालीं ते जेव्हां मंत्री झाले तेव्हां त्यांनीं आपल्या खात्यांत केलेलें कार्य अजरामर झालें आहे. दोन हजारांपेक्षां अधिक लोकवस्ती असलेल्या खेड्यांना ग्रामपंचायत स्थापनेचा अधिकार देववून मुंबई राज्यांत पंचायत–राज्याचा ओनामा त्यांनीं घालून दिला. खेड्याचा कारभार पंचायतीमार्फत चालावा म्हणून सत्तेचें विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीनें त्यांनींच प्रथम प्रयत्न केले.

वसई येथें महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसची बैठक भरली असतांना आम्हां कार्यकर्त्यांना त्यांनीं कळकळीनें कॉंग्रेसची परंपरा पुढें ध्येयनिष्ठेनें चालविण्याबद्दल आवाहन केलें. अण्णासाहेब आज आमच्यांतून निघून गेले आहेत परंतु त्यांनीं आपल्या जीवनांत जें कार्य केलें, जी निरपेक्ष

सेवा केली व जी तत्त्वनिष्ठा दाखविली तिचा जो ठसा कालप्रवाहावर उमटला गेला आहे तो अविनाशी आहे, अमर आहे.

अण्णासाहेबांबरोबर काम करण्याची खरी संधि मला मुंबई सरकारनें १९३७ सालीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं जी "स्थानिक स्वराज्य चौकशी समिति" नेमली त्या वेळीं आली व त्याच वेळीं जवळून त्यांच्या स्वभावधर्माचें गुणदर्शन झालें. ते "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" ह्या वृत्तीचे होते. हसतमुख खेळाडू वृत्ति, दयाळु अंतःकरण हेंच त्यांचें वैशिष्ट्य.

अण्णासाहेबांबद्दल लिहिण्यासारखें उत्तम असें कितीतरी आहे. अण्णासाहेबांच्या ध्येयनिष्ठ जीवनामुळें श्री. मुरारजीभाई देसाई ह्यांना त्यांच्याबद्दल फार आदर होता आणि अण्णासाहेबांशीं त्यांचे संबंध मोठ्या स्नेहाचे व आपुलकीचे होते. अण्णासाहेबांसारखा निरपेक्ष सेवावृत्तीचा व ध्येयनिष्ठेचा देशभक्त आपल्या महाराष्ट्रांतून नाहींसा झाला ही महाराष्ट्राच्या दृष्टीनें मोठी हानि झाली. पुढें येणाऱ्या काळांत त्यांच्या हातून महाराष्ट्राची मोठी सेवा झाली असती.

**वसंत ना. नाईक**

*नाशिक*

## अण्णासाहेबांच्या जीवनाचे पैलू

अण्णासाहेबांची व माझी अगदीं लहानपणापासून ओळख होती. परंतु ह्या मामुली ओळखीचें गाढ परिचयांत रूपान्तर १९११ सालानंतर होत गेलें. विरार येथें माझ्या श्वशुरांचें घर असल्यामुळें माझें तेथें येणें जाणें सुरू झालें. विरारला असतांना प्रातःकालीं अण्णासाहेबांबरोबर फिरावयास जाणें हा तर माझा नित्यक्रमच होऊन बसला होता. अण्णासाहेबांच्या स्वभावांतील विविध व वैशिष्ट्यपूर्ण छटा पाहून त्यांच्यांतील असामान्यपणाची जाणीव मला त्याच वेळीं झाली होती.

परिचयानंतर त्यांच्याबद्दलचा माझा आदर दिवसेंदिवस सारखा वाढतच गेला. अण्णासाहेब मॅट्रिकच्या परीक्षेच्या अभ्यासासाठीं मुंबईस एका ब्राह्मण कुटुंबांत येऊन राहिले होते. त्या मंडळींशीं त्यांचा पूर्वीपासून परिचय होता. त्या ब्राह्मण कुटुंबांत अण्णासाहेबांना कोणत्याही प्रकारचा भेदभाव न दाखवितां आपल्या कुटुंबांतीलच एक ह्या भावनेनें मोठ्या प्रेमानें वागविलें जात असे. आज ह्या गोष्टीचें कोणास महत्त्व वाटणार नाहीं. परंतु त्या काळीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद चालू असतांना अशी गोष्ट घडणें मोठ्या कौतुकाचें होतें. परंतु ह्याला मुख्य कारण म्हणजे अण्णासाहेबांच्या ठिकाणीं असलेला मनमिळाऊ व प्रेमळ स्वभाव हें होय.

अण्णासाहेबानीं वर्णभेदाला फाजील महत्त्व कधींच दिलें नाहीं. त्यांच्या जीवनांत माणुसकीला पहिलें स्थान होतें. म्हणूनच त्यांनीं हरिजनांसारख्या दलितवर्गाला जवळ केलें. माणुसकीचा धर्म अण्णासाहेब कधींच विसरले नाहींत.

अण्णासाहेबांच्या स्वभावांतील पूर्वीचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा भिडस्तपणा हें होय. त्याची मला एक आठवण स्मरते. वरील ब्राह्मण कुटुंबांत अण्णासाहेब राहात असतांना मी त्यांना अनेकदा आमच्या घरीं भोजनासाठीं येण्याचा आग्रह केला. परंतु भिडस्त स्वभावामुळें प्रत्येक वेळीं ते नकार देत. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर आमच्या घरीं भोजनासाठीं येण्याकरितां मला त्यांना मोठा आग्रह करावा लागला.

अण्णासाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहून ते गंभीर स्वभावाचे असावेत असा प्रथमदर्शनीं ग्रह होत असे. परंतु अण्णासाहेबांची ओळख होतांच तो ग्रह तात्काळ नाहींसा होई. अण्णासाहेबांचा विनोदी स्वभाव त्यांच्याशीं परिचय असणाऱ्या पुष्कळांना माहीत असेल.

त्यांच्या स्वभावांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना असलेली लहान मुलांची आवड. लहान मुलांबद्दल त्यांना नेहमींच आस्था व प्रेम

वाटे. लहान मुलांची ते बारकाईनें व आपुलकीनें चौकशी करीत. प्रसंगीं गोड शब्दांनीं त्यांना उपदेशाच्या चार गोष्टीही सांगत.

सार्वजनिक कार्य करतांना अण्णासाहेबांनीं आपल्या देहाची कधींच पर्वा केली नाहीं. त्या कार्याला त्यांनीं तन्मयतेनें स्वतःस वाहून घेतलें होतें. शेवटीं शेवटीं त्यांची प्रकृति नादुरुस्त झाली तरीही त्यांनीं आपल्या स्वीकृत कार्यांत कधीं खंड पडूं दिला नाहीं.

सामान्यतः अण्णासाहेबांना सर्वसाधारण जनता जर कशामुळें ओळखत असेल तर ती त्यांच्यांतील परोपकारी वृत्तीमुळें. त्यांच्या निगर्वी स्वभावामुळें त्यांची लोकप्रियता आबालवृद्धांत सारखीच होती. त्यांनीं सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाची केलेली सेवा सर्वश्रुतच आहे. देशकल्याणार्थ त्यांनीं घेतलेले श्रम, त्याच्यासाठीं त्यांनीं भोगलेला तुरुंगवास व पत्करलेलें खडतर जीवन, मंत्रिपदावर असतांना त्यांनीं केलेले अविश्रान्त कष्ट ह्याचीही जाणीव सर्वांनाच आहे. अण्णासाहेबांचें सर्व आयुष्य अत्यंत निःस्वार्थी बुद्धीनें राष्ट्र व समाजसेवा करण्यांत गेलें.

अण्णासाहेबांचें सारेंच जीवन सव्यसाची होतें.

**आत्माराम लक्ष्मण चौधरी**

मुंबई

## अनुभवी नेता

१९१९ सालीं ठाणें जिल्हा कॉंग्रेस परिषदेचें एक अधिवेशन डहाणू येथें कै. दादासाहेब करंदीकर ( सातारा ) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्या अधिवेशनांत मी एक चिटणीस म्हणून काम करीत होतों. त्या वेळीं कै. अण्णासाहेब वर्तक व त्यांच्या वसई तालुक्यांतील सहकारी मंडळींनीं खूपच मदत केली. तेव्हांपासून अण्णासाहेब व मी लोकमान्यांच्या राष्ट्रीय पक्षांतील कार्यकर्ते म्हणून जवळ आलों.

१९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत अण्णासाहेब अर्नाळा व विरार येथील शिबिराचे एक आधारस्तंभ होते. १९३२ सालीं त्यांची

जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. त्या वेळीं मी जिल्हा बोर्डाचा एक सभासद होतों. त्यांनीं मजकडे ग्रामपंचायतीचें चेअरमनचें काम सोपविलें होतें. जिल्ह्यांतील ग्रामपंचायती आम्हांला कार्यक्षम करावयाच्या होत्या.

१९४२ च्या चळवळींतील तुरुंगवास संपवून बाहेर आल्यानंतर जिल्हा बोर्डाचा अध्यक्ष म्हणून मीं काम करावें अशी त्यांनीं मला सूचना केली. त्या वेळीं मी आजारी होतों. निवडणुकीची दगदग सहन करण्याची माझ्या अंगांत शक्ति नाहीं असें मी त्यांना कळविल्यावर त्यांनीं मला आग्रहाचा निरोप पाठविला कीं, "पालघरमध्यें निवडणूक न होतां विरोधी पक्षास एखादी जागा द्यावी लागली तरी हरकत नाहीं पण तुम्हीं निवडणुकीस उभें राहिलें पाहिजे व अध्यक्षाचे वेळेसही उभें राहिलें पाहिजे." त्यांच्या ह्या सल्ल्याप्रमाणें पालघर तालुक्यांत बिनविरोध निवडणूक घडवून आणली व मी जिल्हा बोर्डाच्या अध्यक्षाच्या जागेसाठीं उभा राहिलों. पक्षाच्या बाहेर असलेल्या सभासदांचीं मतें मिळविण्याकरितां त्यांनीं व मीं खटपट केली व बहुमतानें ठाणें जिल्हा बोर्डाचा अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली. त्यांनीं घालून दिलेलें धोरण मीं अनुसरलें व जिल्हा बोर्डाचा अध्यक्ष म्हणून जिल्ह्याची शक्य ती सेवा केली. ज्याप्रमाणें जिल्हा बोर्डाचा अध्यक्ष कै. अण्णासाहेब ह्यांच्यामुळें मी झालों त्याचप्रमाणें ठाणें जिल्हा स्कूल बोर्डाच्या चेअरमनची जागाही त्यांच्याच आग्रहामुळें मजकडे आली. ह्या दोन्ही गोष्टींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे.

१९१९ पासून ते १९५३ पर्यंत पस्तीस वर्षें आम्हीं एकत्रित व सहकारितेनें काम केलें. आमचा एकमेकांवर संपूर्ण विश्वास असे. माझा सार्वजनिक कार्यांतील जुन्यांतला जुना सन्मित्र व जिल्ह्याचा अनुभविक नेता नाहींसा झाल्यामुळें आम्ही दोघेही पोरके झालों.

**वि. वा. दांडेकर**

*पालघर*

# स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्कृष्ट वकील

१९४६ सालीं कॉंग्रेस पक्षाचें मंत्रिमंडळ मुंबईराज्यांत कारभार पाहूं लागल्यावर परकीय राजवटींत वाळत गेलेल्या व पूर्णतया दुर्लक्षिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांत सरकारनें लक्ष घातलें. १९४६ च्या ह्या खेर मंत्रिमंडळांत कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचा स्थानिक स्वराज्य मंत्री म्हणून समावेश झाला होता. सत्तास्थानापासून दूर राहाण्याचीच त्यांची प्रवृत्ति असल्यामुळें मंत्रिमंडळांत येण्यास ते तितकेसे राजी नव्हते असें त्यांच्या मृत्यूनंतर आम्हांस समजलें. पण एकदा जागा स्वीकारावी लागल्यानंतर त्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांचें केलेलें अक्षरशः पुनरुज्जीवन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत प्रामुख्यानें नमूद केलें जाईल ह्यांत शंका नाहीं. लोकलबोर्डांचें व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांचें उत्पन्न तोकडें होतें. त्यांत महागाईभत्ते वगैरे अनपेक्षित बोजे ह्या संस्थांवर पडले. उत्पन्नांत वाढ होण्याचीं तर कोणतींही चिन्हें दिसत नसल्यानें स्थानिक स्वराज्य संस्थांची अक्षरशः त्रेधा उडाली असतांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षितिजावर त्यांना एक प्रकाशमान तारा दिसला. ह्याच ताऱ्यानें ह्या संस्थांना अंधारांतून प्रकाशांत आणलें. त्याचेंच नांव गोविंदराव ऊर्फ अण्णासाहेब वर्तक. मंत्री असतांना स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे त्यांनीं उत्कृष्ट वकिली केली. लोकलबोर्ड, ग्रामपंचायती ह्यांना शेतसाऱ्याच्या १५ टक्के रक्कम देवविली. एन्. ए. असेसमेंटचें १५ टक्के उत्पन्न म्युनिसिपालिटींना देवविलें. नोकरलोकांच्या महागाईभत्त्याचा ५० टक्के रक्कमेचा बोजा सरकारनें उचलण्यास सरकारला प्रवृत्त केलें. त्या वेळीं मी सातारा जिल्हा लोकलबोर्डाचा अध्यक्ष होतों. माझ्या जिल्ह्यांत दौऱ्यावर असतांना त्यांनीं एक हकीगत मला सांगितली होती. जेव्हां जेव्हां स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिकदृष्ट्या ताकदवान करण्यासाठीं अण्णासाहेबांनीं मंत्रिमंडळापुढें कांहीं योजना ठेवल्या, तेव्हां तेव्हां त्या वेळचे गृहमंत्री (आजचे मुख्य मंत्री) श्री. मोरारजीभाई देसाई ह्यांनीं त्यांना मनोभावें पाठिंबा दिला. हें मोठ्या अभिमानानें ते सांगत असत.

मी जिल्हा लोकलबोर्डाचा अध्यक्ष असतांना प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं खेडेगांवांतून येणाऱ्या अति गरीब विद्यार्थ्यांकरितां एकेक वसतिगृह बांधण्याचें ठरविलें व त्याकरितां साडेतीन लाख रुपये बोर्डानें मंजूरही केले. अडचण आली शेवटीं ऑडिटरची. लोकलबोर्ड अॅक्टमध्यें कोणत्याही कलमाखालीं तुम्हांला हीं व असलीं वसतिगृहें बांधतां येणार नाहींत असें त्यांनीं आम्हांस फर्माविलें. मी थेट अण्णासाहेबांच्या दारांत जाऊन थडकलों व ' दहा वर्षांत कांहीं पुंजी साठवून वसतिगृहें बांधावींत आणि खेडेगांवांतून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांची कैक वर्षांची आबाळ थांबवावी ह्या हेतूनें लोकलबोर्डातर्फे ही योजना मीं आंखली व आतां कायद्यांत तरतूद नाहीं म्हणून ती बारगळणार ह्याचें मला मनस्वी दुःख होत आहे ' असें त्यांना विनवून सांगितलें. ' कोल्हापुरास बोर्डिंग नसतें तर मी एल्एल्. बी. होण्याऐवजीं गिरणींत फार तर जॉबर झालों असतों. इतकें माझ्या जीवनांत बोर्डिंग ह्या संस्थेचें महत्त्व आहे. तेव्हां कृपा करून माझ्या ह्या वसतिगृहयोजनेस पाठिंबा द्या. ' अण्णासाहेबांचें मन हेलावलें व त्यांनीं मला आश्वासन देऊन परत पाठविलें. कांहीं दिवसांनीं सरकारी हुकूम मिळाला व माझ्या बोर्डानें आंखलेली ही वसतिगृहाची योजना अखेरीस पार पडली.

कै. अण्णासाहेबांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक क्षेत्रांत नवजीवन दिलें. ह्या क्षेत्रांतला इतिहास नवीनच लिहिण्यास त्यांनीं सुरुवात केली. आजचे स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं १५ टक्क्यांवरून ३० टक्के शेतसारा स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्याचा नुकताच कायदा केला आहे. त्या दृष्टीनें ते अभिनंदनास पात्र आहेत. परंतु त्याची बैठक मात्र कै. अण्णासाहेब वर्तकांनीं घालून दिलेली आहे हें दिसून येईल. आज ते आमच्यांत नाहींत. बहुजनसमाजाचा एक सन्मित्रच कालानें आमच्यांतून ओढून नेला आहे. इलाज नाहीं. मात्र त्यांनीं केलेलें अविस्मरणीय काम चिरकाल लोकस्मृतींतून जाणार नाहीं.

**बाळासाहेब देसाई**

*पुणें*

# अण्णासाहेबांचा सामाजिक दृष्टिकोन

पूज्य कै. अण्णासाहेबांच्या अनेकविध कार्यांपैकीं त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याला अग्रगण्यतेचा मान मिळतो. त्यांच्या जीवनाला सुरुवात झाली तीच सामाजिक कार्यापासून. त्यामुळेंच सामाजिक सुधारणा हें त्यांचें एकमेव जीवनसूत्र बनून राहिलें होतें. सामाजिक कार्य करीत असतांना त्यांत ते त्यांचा सर्व जिव्हाळा ओतीत. त्यांत कोठेंही कृत्रिमता दिसत नसे. मनाचा हळुवारपणा व भावनेच्या भरारीचा अभाव, ह्यामुळें सामान्य जनमनावर ते लगेच पकड बसवीत. त्यांतल्या त्यांत त्यांना लाभलेलें सागरासारखें उदार हृदय, हिमाप्रमाणें शुद्ध आचरण व अविरत सेवानिष्ठा ह्या गुणांमुळें त्यांचें समाजकार्यांत एक प्रकारचें वैशिष्ट्य निर्माण झालें होतें. समाजसुधारणेचीं प्रमेयें सामान्य-जनांपुढें मांडतांना भविष्याकडे पाहाण्याच्या विशाल दृष्टिकोनामुळें त्यांच्या विचारसरणींत एक प्रकारची मुग्धता व प्रगल्भता दिसून येत असे.

समाजसुधारणा करतांना त्यांच्या डोळ्यांपुढें संकुचितवृत्ति कधींही आली नाहीं. समाज हा राष्ट्राचा एक पूरक व अविभाज्य असा घटक असून त्याची शैक्षणिक, आर्थिक व नैतिक सुधारणा करणें व समाज-सुधारणेद्वारा राष्ट्राचा उद्धार करणें हेंच ध्येय त्यांनीं आमरण नजरेसमोर ठेवून, समाजाची एकजुटी संघटना आपल्या सहकाऱ्यांच्या साह्यानें केली. हें कार्य करीत असतांना त्यांना लाभलेली भव्य देहयष्टी, विचाराची प्रगल्भता व प्रसंगीं जातीनें त्याग करावयाच्या गुणांमुळें समाजसंघटनेच्या कार्याची संस्था, महाराष्ट्रांतील चार पांच आदर्श संस्थांतील एक प्रमुख संस्था म्हणून गणली जाते.

समाजसंघाला व गांधीयुगाला एकाच वेळीं सुरुवात झाली. महात्माजींनीं विशिष्ट प्रकारच्या राष्ट्रीय विचारसरणीचे नंदादीप प्रज्वलित केले, त्यांपैकीं कै. अण्णा हे एक होत. ह्यामुळेंच समाजाला राष्ट्रीय वृत्तीचें बाळकडू सुरुवातीपासूनच पाजलें गेलें असून आज एक राष्ट्रीयवृत्तीचा समाज

म्हणून सर्वत्र ओळखला जातो. ह्या राष्टीयवृत्तीच्या श्रमजीवि समाजाबद्दल अण्णांना नेहमींच आदर आणि अभिमान वाटे.

परंतु समाजांत जरी ह्याप्रमाणें राष्ट्रीयबाणा निर्माण होऊं शकला तरी तो कायम टिकविण्याकरितां, त्याचें आकलन होण्याकरितां, सुधारणेला स्थैर्य प्राप्त होण्याकरितां व समाजांत स्वास्थ्य नांदण्याकरितां शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणांत झाला पाहिजे असें त्यांना नेहमीं वाटत असे. संघाच्या स्थापनेपासून शिक्षणप्रसारकार्यांत जास्तींत जास्त यश मिळालेलें असूनही फक्त शिक्षणानेंच समाज उच्च पातळीवर येऊं शकत नाहीं तर शिक्षणाबरोबर सांस्कृतिक विकासही व्हावयास पाहिजे असेंही त्यांना वाटत असे. समाजाच्या शिरगांव येथील परिषदेस दिल्लीहून पाठविलेल्या संदेशांत ह्या सांस्कृतिक विकासावरच त्यांनीं फार भर दिला होता.

समाजाला खूप शिक्षण देऊन सर्वस्वी बुद्धिजीवि समाज करून ठेवावयाचा ह्या विचारसरणीशीं ते तेवढेसे सहमत नव्हते. समाजांत असलेल्या श्रमजीवि जीवनाशीं बुद्धिजीवि जीवनाचा समन्वय करून बदलत्या काळाला हिमतीनें तोंड देणारा असा श्रमबुद्धिजीवि नवसमाज निर्माण व्हावा ही आकांक्षा त्यांनीं नेहमीं समाजापुढें मांडली.

राजकीय पक्ष कोणताही असो, समाजतरुणांमध्यें विचारांची शुद्धता व चारित्र्याची जोड ही असलीच पाहिजे असें ते नेहमीं बोलून दाखवीत. राजकीय पक्षापेक्षां माणसांतल्या चांगुलपणाबद्दल त्यांना नेहमीं आदर वाटत असे. त्यामुळें सर्वपक्षीय चांगुलपणा त्यांच्यांत निर्माण झाला होता. त्यांच्या चहात्यांना जेवढे ते आपलेसे वाटत तेवढेच विरोधकांनाही ते आदरणीय वाटत.

राष्ट्रांतील सर्व समाज एकत्रित झाले पाहिजेत असा त्यांचा समाज-सुधारक म्हणून विशाल दृष्टिकोन होता. हा दृष्टिकोन संघाच्या स्थापनेपासून दिसून येत असून पोटजातींचें एकीकरण व्हावयास पाहिजे असें त्यांचें आग्रही मत होतें. त्यानुसार तशा आशयाचा ठराव त्यांच्याच प्रेरणनें संघाच्या संमेलनांत संमत केला गेला आहे.

अण्णा आपली जीवनयात्रा संपवून आज आपणांमधून निघून गेले आहेत. आज आमच्याजवळ त्यांच्या विचारांची स्मृति राहिली आहे. त्या स्मृतीचें आम्हांस विस्मरण न पडो एवढीच प्रार्थना आहे.

**डॉ. दीनानाथ बाळकृष्ण चुरी**

*बोर्डी*

## झुंजार संघटक

कै. अण्णासाहेबांशीं माझा परिचय सन १९१९ सालीं झाला. त्या परिचयांतून आम्ही स्नेही सहकारी झालों. अण्णासाहेब कर्तबगार पुढारी होते. ते आपल्या कर्तबगारीनें जिल्ह्यांत तेजस्वीपणानें चमकत होते. जिल्ह्यांतील सार्वजनिक कामांत त्यांचा सल्ला घेतला जाई. त्यांचा सल्ला दूरदृष्टीचा व बहुमोलाचा समजला जाई.

१९३६ सालीं मी ठाणें जिल्हा कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष निवडलों गेलों. तेव्हांपासून तर त्यांचें मला निकटचें सहकार्य व साह्य झालें. ठाणें जिल्ह्यांत कॉंग्रेसची चळवळ यशस्वी करण्यांत अण्णासाहेबांचा मोठा हिस्सा आहे. आपला जिल्हा कॉंग्रेस चळवळींत अग्रभागीं राहावा हा त्यांचा आग्रह असे.

ठाणें जिल्हा लोकलबोर्डांत मी सभासद असतांना अण्णासाहेब बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या प्रत्येक कामांत कार्यकुशलता दिसून येई. प्रतिपक्षीयांशीं युक्तिवादानें जुळतें घेण्यांत त्यांचा हातखंडा असे. परंतु तत्त्वास त्यांनीं कधींच मुरड घातली नाहीं.

ठाणें जिल्हा स्कूल बोर्डाचा मी चेअरमन निवडलों गेल्यावर त्यांचें सहकार्य व साह्य मला अधिकाधिक मिळालें.

१९४६ ते १९५२ पर्यंत मुंबई लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत आम्ही होतों त्या वेळीं त्यांचें प्रेमळ व निकट सान्निध्य मला मिळालें. स्थानिक स्वराज्य

मंत्री म्हणून त्यांनीं जी बहुमोल कामगिरी केली तिचा छाप मुंबई राज्यांतील जनतेवर पडला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था प्रभावी होण्यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले व त्या प्रयत्नांस यशाही मिळालें.

अण्णासाहेब झुंजारवृत्तीचे संघटनाकुशल, प्रभावी पुढारी होते. तेजस्वी हिरा हरपला !

**वासुदेव विष्णु कीर्तने**

डहाणू

## कर्तव्यनिष्ठ अण्णासाहेब

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांच्या स्मारकग्रंथाकरितां चार ओळी लिहावयाच्या म्हणजे प्रथमतः मागील काळाची आठवण होते. त्यांच्या व त्यांच्याबरोबर काम करीत असलेल्या इतर स्नेह्यांच्या सहवासांत घालविलेल्या सुखद दिवसांची आठवण विसरणें शक्य नाहीं. कै. अण्णासाहेब व मी ठाणें जिल्हा बोर्डाचे सतत चौदा वर्षें सभासद होतों. कै. अप्पासाहेब करंदीकर, श्री. नारायण दामोदर देवधेकर, श्री. केशव लक्ष्मण मेकल, श्री छोटालाल रामदास श्रॉफ, खानसाहेब अकबरसाहेब दिवकर, बोर्डाचे माजी इंजिनिअर श्री. स. वि. घाटे व चीफ ऑफिसर कै. सीतारामपंत प्रधान ह्यांच्या व इतर स्नेह्यांच्या बरोबर काम करण्यांत जो काळ गेला तो अधिक लांबला असता तर बरें झालें असतें असें वाटतें. निःस्वार्थीपणें व राष्ट्रीय दृष्टीनें समान भूमिकेवरून विचार करणाऱ्या ह्या कार्यकर्त्यांचे कै. अण्णासाहेब हे पुढारी होते.

ठाणें जिल्हा बोर्डाच्या निवडणुकीकरितां बॅ. जमनादास मेहेता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं आम्हीं 'ठाणें जिल्हा सभा' ह्या नांवाची एक संस्था सन १९२२ सालीं स्थापन केली. त्या वेळेपासून कै. अण्णासाहेबांचा व माझा संबंध आला व हा जडलेला स्नेहसंबंध शेवटपर्यंत कायम टिकला हें मी माझें भाग्य समजतों. ते उच्चपदावर गेल्यावर पूर्वीइतका संबंध

राहाण्याची संधि आली नाहीं पण त्यांचा माझ्यावरील व माझ्या कुटुंबीयांवरील लोभ कायम राहिला. एवढेंच नव्हे, तर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. भाऊसाहेब वर्तक ह्यांनींही पूर्वींचा स्नेहसंबंध चालू ठेवला आहे ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

अण्णासाहेबांच्या सार्वजनिक कार्याचा प्रारंभ राष्ट्रीय सभा व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांपासून झाला. त्या वेळच्या परिस्थितीस अनुसरून ते ब्राह्मणेतर पक्षांत सामील होणें साहजिक होतें. तसें झालें असतें तर सरकार दरबारीं त्यांचा चांगला मान राहिला असता. सार्वजनिक कार्यांतलें त्यांचें पुढारीपणही राहिलें असतें व आर्थिक दृष्ट्या कदाचित् फायदाही झाला असता. पण सुरुवातीपासूनच त्यांनीं राष्ट्रीय बाणा अंगीकारला हें त्यांचें फार मोठें वैशिष्ट्य होय व तो शेवटपर्यंत टिकविला हेंही वैशिष्ट्यच आहे. राष्ट्रीय पक्ष सत्ताधीश झाल्यावर त्यांना देशभक्तीची एकदम स्फूर्ति झाली असें नाहीं. स्वार्थी विचारांना त्यांनीं कधींही थारा दिला नाहीं. ह्या त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीकरितां त्यांना नाना प्रकारें झीज सोसावी लागली. कोणत्याही मानाच्या जागेकरितां त्यांनीं कधींही हांव धरली नाहीं. सार्वजनिक काम करणें हें आपलें कर्तव्यच आहे अशी त्यांची भावना होती. त्यांच्या गुणामुळेंच त्यांना अधिकारपदें देणें पक्षाला भाग पडलें. त्यांना मंत्री करण्याची सूचना आली त्या वेळीं त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटलें. स्थानिक स्वराज्यसंस्थांत त्यांनीं बरींच वर्षें काम केलें असल्यामुळें मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द या संस्थांना सुखदायक गेली.

**ग. कृ. फडके**

*कल्याण*

## उमद्या मनाचे अण्णासाहेब

कै. गोविंदराव वर्तकांच्या कुटुंबाचा व माझ्या कुटुंबाचा दोन पिढ्या संबंध असला तरी त्यांचा व माझा परिचय झाल्यास तीन तपें झालीं.

तीन तपांच्या निगडित स्नेह्याच्या आठवणी मर्यादित क्षेत्रांत निवेदन करणें कांहींसें मुष्किलीचें खरें! १९२१ सालीं वसई येथें महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचें अधिवेशन डॉ. मुंजे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. ह्या अधिवेशनास म. गांधी, सौ. कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, विठ्ठल-भाई पटेल ह्यांच्यासारखे अखिल भारतीय नेते उपस्थित होते. त्याच प्रसंगीं राजकारणाच्या क्षेत्रांत गोविंदरावजींनीं प्रथम पदार्पण केलें व तेव्हांपासून माझ्याशीं त्यांचें सार्वजनिक क्षेत्रांत स्नेहाचें व खासगी कौटुंबिक क्षेत्रांत बंधूचें नातें आमरण कायम राहिलें. श्री. गोविंद-रावांनींच मला व कल्याणचे बापूसाहेब फडके ह्यांना परिषदेचे उपाध्यक्ष होण्यास आग्रह केला व मींही त्याला संमति दिली.

सन १९२३ पासून १९३४ पर्यंत वारकऱ्याप्रमाणें गोविंदरावजी, डॉ. अभ्यंकर व मी कॉंग्रेसच्या अधिवेशनास नियमानें उपस्थित राहिलों व जवळ जवळ सबंध भारत देश पाहाण्याचें भाग्य मला मिळालें.

सन १९२३ सालीं विरार येथील महाराष्ट्र प्रांतिकची सभा गोविंद-रावजींच्या समयसूचकतेमुळें व धैर्यामुळेंच अतिप्रसंग न होतां यशस्वी रीतीनें पार पडली.

सन १९२७ सालीं ठाणें जिल्हा सभेनें ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष बापूसाहेब फडके ह्यांनीं व्हावें व जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन मीं व्हावें अशी योजना ठरविली होती. दुर्दैवानें बापूसाहेब फडके हे अध्यक्षपदाच्या निवडणुकींत अयशस्वी झाले व त्याला कारण मीच असेन ह्या संशयानें कांहीं कार्यकर्त्यांना मी चेअरमन होऊं नये असें वाटत होतें. परंतु माझ्या दीर्घ परिचयामुळें श्री. गोविंदरावांना माझ्या प्रामाणिकपणाबद्दल विश्वास वाटत असल्यामुळें त्यांनीं मला संपूर्ण पाठिंबा दिला. इतकेंच नव्हे तर स्कूल बोर्डाच्या चेअरमनच्या जागीं निवडून येण्यास मदत केली. मी स्पष्टपणें सांगूं शकेन कीं त्यांच्याच मदतीनें मी निवडून आलों.

सन १९२८ सालीं मुंबई विधिमंडळाच्या ठाणें व मुंबई सबर्बन जिल्हा मतदारसंघातर्फें गोविंदराव प्रधान ह्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेकरितां पोटनिवडणुकींत गोविंदरावजींनींच माझें उमेदवार म्हणून नांव सुचविलें व मला शेवटपर्यंत मदत करून निवडून आणलें.

सन १९२९ सालीं वसई तालुक्यांतील धारावाढीची चळवळ त्यांनींच सुरू केली. त्यांत अंशतः यश मिळण्यास त्यांचा दीर्घ अभ्यास, निरपेक्ष व निरलस कार्यक्षमताच कारणीभूत झाली ह्यांत शंका नाहीं.

माझ्यावर व माझ्या कुटुंबावर सन १९३९ पासून आपत्तीची लाट कोसळत असतांना मला धीर देऊन, सक्रीय मदत करून माझ्या सख्ख्या भावाप्रमाणें त्या वादळांत सापडलेल्या माझ्या जीवननौकेला स्थैर्य व शांति मिळवून देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला हें मी आजन्म विसरणार नाहीं.

गोविंदरावजींसारखा उमदा, मोकळ्या मनाचा, खंबीर व प्रसंगीं उपयोगी पडणारा खंदा कार्यकर्ता अकालीं आमच्यामधून नाहींसा व्हावा ह्याबद्दल अतिशय दुःख होतें व मन अस्वस्थ होतें. त्यांच्या वाढत्या कार्यक्षेत्रामुळें कधीं कधीं वाटतें कीं ‘ हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार. ”

**छोटालाल रामदास श्रॉफ**

*पालघर*

## शेतकऱ्यांचे कणखर कैवारी

वाणीनें गोड, स्वभावानें आनंदी, आचारानें शुद्ध, विचारानें निष्ठावंत असे आमचे गोविंदराव वर्तक होते. शेतकऱ्यांचे ते कणखर कैवारी. वसई स्टेशनाजवळच घातलेल्या मंडपांत माझ्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या परिषदेंत — पान, विडा व तंबाखू खाल्ल्याशिवाय त्यांच्या कार्याला तेज येत नसल्यानें — दहा पंधरा मिनिटें उशीरा सुरू झालेलें

त्यांनीं स्वागताध्यक्ष ह्या नात्यानें केलेलें भाषण शेतकऱ्यांच्या लढ्याच्या इतिहासांत स्मरणीय ठरणार होतें. ह्या परिषदेतर्फे एक शिष्ट मंडळ गव्हर्नरसाहेबांकडे गेलें. ओळखीनंतर चर्चेच्या वेळीं साहेबांच्या गोऱ्या चिटणीसानें गोखले ह्यांनीं नांगर कधींच धरला नाहीं असा खवचट उल्लेख केला व मी त्यांना ‘ तुम्ही कधीं नांगर धरलात व ह्या देशांतील शेतकऱ्यांचा आपला किती संबंध ’ असें उत्तर दिलें. गोविंदरावांचा ह्या प्रश्नामुळें सात्त्विक राग वाढला होता. त्यांची पाळी येतांच “ मी हजारों एकरांचा बागाईतदार, शेतांत स्वतः राबतों. परिषदेचे अध्यक्ष व मी हेच शेतकऱ्यांचे खरे प्रतिनिधि. गोरा नोकर पगारी नोकर. आमची दाद लावून घेऊंच घेऊं. ” असें त्यांनीं बजावलें. गव्हर्नरसाहेबांना मध्यें पडून गाऱ्हाण्याची दाद लावावी लागली. पुढें मंत्री झाल्यावर हेच गोरे नोकर गोविंदरावांच्या पुढें पुढें करीत. हा स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा महिमा. पण गोविंदरावांची परीक्षा त्याच वेळीं झाली होती.

१९३० सालीं गांधीजींच्या प्रेरणेनें सुरू झालेल्या मिठाच्या सत्याग्रहाची मोहीम वसईजवळच्या अर्नाळा गांवांत सुरू होती. अर्नाळा छावणीचा मी ‘ डिक्टेटर ’—सेनापति होतों. शंभर स्वयंसेवक सत्याग्रही होते. गोविंदरावांनीं ह्या छावणीला केलेली सर्व प्रकारची मदत अविस्मरणीय होती. जिल्हाधिकाऱ्यांचें आव्हान होतें कीं ठाणें जिल्ह्यांतून पंचवीसही सत्याग्रही मिळणार नाहींत. ह्या आव्हानाला उत्तर म्हणून जिल्हाभर सभा भरवून हजारों सत्याग्रह्यांचीं नांवें जाहीर केलीं! अर्नाळ्याचा सत्याग्रह यशस्वी झाला ह्याचें श्रेय बहुतांशीं गोविंदराव ह्यांना व त्यांच्या प्रभावळींतील सहकाऱ्यांना दिलें पाहिजे. स्वराज्याच्या लढ्याच्या प्रत्येक कालखंडांत त्यांनीं अधिकाधिक तेज व त्याग दाखविला.

**दा. वि. गोखले**

*पुणें*

# सफल जीवन

श्री. गोविंदराव म्हटलें कीं माझ्या डोळ्यांसमोर त्यांची ती भव्य, लांब डगला घातलेली, भरघोस भरलेली, ठसठशीत बांध्याची मूर्ति उभी राहाते. त्यांच्या सार्वजनिक व खाजगी जीवनाची आठवण झाली म्हणजे आंग्ल कवीच्या पुढील ओळी मनांत येतात.

In small proportions we just beauties see,
In small measures life may perfect be.

अगदीं अल्पप्रमाण आकृति असली तरी तींत रेखीव सौंदर्याची प्रचीति येऊं शकते आणि लहान मर्यादित मापाचें क्षेत्र असलें तरी त्यांत जीवन परिपूर्ण होऊं शकतें.

असेंच गोविंदरावांचें नाहीं का? जरी आयुष्याच्या अखेरीस ते प्रांताचे मंत्री झाले तरी त्यांचें खरें कार्यक्षेत्र ठाणें जिल्हाच. पण जिल्हा पुढारी ह्या नात्यानें त्यांचें चरित्र किती संपन्न व नमुनेदार !

ठाणें जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनाची अशी बाजू नाहीं कीं जिच्याशीं गोविंदरावांचा संबंध नाहीं. तालुका बोर्ड, जिल्हा बोर्ड, शेती संघ, व्यायामशाळा, शिक्षण संस्था वगैरे वगैरे कित्येक प्रकारच्या समाजसेवाक्षेत्रांत त्यांनीं कार्य केलें. तथापि स्मरणीय म्हणून त्यांनीं जी कामगिरी केली ती म्हणजे वसई तालुक्यांतील सारावाढीविरुद्ध चळवळ, १९३० सालीं मीठ सत्याग्रहाच्या आंदोलनांतील सत्याग्रहाची अर्नाळा छावणी, मंत्री असतांना स्थानिक संस्थांस दिलेला जमीनधाऱ्याचा हिस्सा व ग्रामपंचायतीची प्रतिष्ठापना ह्या बाबतींतील होय. त्याबद्दल जिल्हा त्यांचा सदैव ऋणी राहील.

कार्याचें क्षेत्र जिल्ह्यापुरतें असो अगर प्रांतापुरतें असो अगर आणखी सगळ्या देशाइतकें व्यापक असो, नेतृत्वाची गुणवत्ता सर्व क्षेत्रांत सारखीच. लोकसंग्रह हा श्रेष्ठ गुण छोट्या मोठ्या लोकाग्रणींना लागतो. ह्या महान् गुणाच्या पोटांत इतर अनेक फलदायी गुण येतात आणि ते

गोविंदरावांच्या ठायीं वास करीत होते. त्याशिवाय का त्यांचे चिरंजीव यांचें नांव चालविण्याची मनीषा बाळगतात आणि त्यांचा मित्रपरिवार त्यांचा स्मारकप्राय गुण-गौरव ग्रंथ प्रसिद्ध करतो !

श्री. गोविंदराव श्रीमंत असून गरिबांविषयीं सहानुभूति बाळगीत, जमीनदार असून कुळांबरोबर आपुलकीनें वागत, ब्राह्मणेतर असून ब्राह्मणांविषयीं प्रेम राखीत. मंत्री असूनही खालच्या नोकरवर्गाशीं समानतेचें वर्तन ठेवीत, शिकलेले असून अज्ञ लोकांविषयीं आदर दाखवीत. एवंगुणविशिष्ट गोविंदराव होते म्हणूनच ते जिल्ह्यांत एवढे लोकप्रिय झाले व त्यांच्या हातून जिल्ह्यांतील जनतेची विविध व चिरस्मरणीय सेवा घडली. जगन्नियंत्याच्या इच्छेकडे लक्ष देऊन त्यांची जीवनयात्रा झाली तेवढीसुद्धा सफळ व संपूर्ण झाली असें यथार्थत्वानें मानून समाधानी झालें पाहिजे.

**दि. वा. दिवेकर, एम्. ए.**

*केसरी कचेरी, पुणें*

## कर्तव्यदक्ष मंत्री

श्री. गोविंदराव धर्माजी ऊर्फ अण्णासाहेब वर्तक ह्यांनीं आपलें नांव केवळ देशसेवकच म्हणून नव्हे तर मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे क्रान्तिकारक व यशस्वी मंत्री म्हणूनही अजरामर केलें ह्यांत शंका नाहीं. महात्मा गांधींच्या सत्याच्या प्रयोगाप्रमाणेंच ग्रामपंचायत, जिल्हा लोकलबोर्ड ह्या संस्थांच्या अध्यक्षपदावरून कित्येक वर्षें अनुभव घेऊन त्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांत आमूलाग्र फरक करून भारतांतील कोणत्याही राज्याच्या आधीं शेतसाऱ्यांतील पंधरा टक्के रक्कम ग्रँट म्हणून देवविली. पंचायतींना न्यायदान मंडळाचे अधिकार देऊन अंमलबजावणी केली आणि ह्या संस्थांना जनतेच्या हिताकडे लक्ष देण्यास भाग पाडून त्यांना कर्तव्यदक्ष बनविलें. माझ्या बोर्डानें लोकल फंड

सेस एक आण्यावरून दीड आणा, दीड आण्यावरून दोन आणे आणि दोन आण्यांवरून तीन आणे केला. सरकारकडून एक आणा लोकल फंड सेस असतांना जी रक्कम बोर्डास मिळत होती तेवढीच तीन आणे सेस झाला असतांना मिळे. ह्यामुळें आम्हीं वेळोवेळीं कलेक्टर, कमिशनर व सरकार ह्यांना प्रत्यक्ष भेटून व तगादे देऊनही आमच्या थकबाकीचा कित्येक वर्षें प्रयत्न करूनही उपयोग झाला नाहीं. ही अडचण आम्ही आमचे मित्र ना. अण्णासाहेब वर्तक ह्यांच्या निदर्शनास आणल्याबरोबर त्यांनीं ह्या कामीं लक्ष घालून कलेक्टरांनीं जादा स्टाफ देऊन हिशेब देवविला. ह्यामुळें माझ्या पुणें जिल्हा लोकलबोर्डास अंदाजें साडेसहा लक्ष रुपये मिळाले. मुंबई राज्यांत प्रथमच माझ्या बोर्डाला त्यांनीं हें यश मिळवून दिलें. ह्या रकमेंतून माझ्या बोर्डास भव्य सभागृह, शिपायांना आधुनिक पद्धतीचें निवासस्थान, प्रत्येक तालुक्यांत कायम स्वरूपाचीं बांधकामादि कामें करतां आलीं. पुणें जिल्हा लोकलबोर्डाचा अध्यक्ष ह्या नात्यानें माझ्या बारा वर्षांच्या कारभारांत श्री. अण्णासाहेबांनीं मार्गदर्शन करून प्रत्यक्ष सहकार्य दिलें म्हणूनच बोर्डास सर्वांगीण आदर्श निर्माण करतां आला. त्यांनीं दाखविलेला मार्ग स्थानिक स्वराज्य संस्थांनीं कृतींत आणल्यानेंच त्यांचें खरें स्मारक होईल.

**अण्णासाहेब आवटे**

*पुणें*

## आदर्श समाजसेवक

श्री. गोविंद धर्माजी उपाख्य अण्णासाहेब वर्तक ह्यांच्या मृत्यूनें निव्वळ ठाणें जिल्ह्याचेंच नव्हे तर अखिल महाराष्ट्राचें नुकसान झालें आहे. ऐन उमेदींत जरी म्हणतां यावयाचें नाहीं, तरी ज्या वेळीं त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा व कर्तबगारीचा पूर्ण फायदा मिळणार अशा वेळीं त्यांना मरण यावें ही खरोखरीच दुःखाची व दुर्दैवाची गोष्ट होय.

कोणत्याही देशाची अगर समाजाची योग्यता त्यांत जन्मलेल्या थोर व कर्तबगार माणसांच्या संख्येवरून करण्यांत येते. कै. अण्णासाहेबांनीं महाराष्ट्राच्या थोर परंपरेंत भर तर घातलीच आहे पण त्याबरोबर ज्या ज्ञातींत जन्म घेतला त्या ज्ञातीचाही दर्जा वाढविला.

गोड स्वभाव, परोपकारी व त्यागी वृत्ति, इत्यादि गुणांनीं कै. अण्णासाहेब लहानापासून थोरापर्यंत, समाजांत व समाजाबाहेरील सर्व लोकांना आपलेच कोणी अगदीं निकटचे नातलग आहेत असेंच वाटावयाचें.

व्यवसाय शेतकीचा असल्यामुळें शेतकऱ्यांच्या सुखदुःखाची त्यांना पूर्ण जाणीव असे. त्यांचें घर म्हणजे आपलेंच घर असें प्रत्येकाला विशेषतः शेतकऱ्यांना वाटत असे. कै. अण्णासाहेबांना केव्हांही भेटावयास जावें तों तेथें सल्लामसलतीसाठीं आलेल्या लोकांची रीघ लागलेली दिसावयाची.

ठाणें जिल्ह्यांत आज जी सामाजिक व राजकीय जागृति दिसत आहे त्याला मुख्यतः निःसंशय अण्णासाहेबच कारणीभूत आहेत.

कै. अण्णासाहेबांचें अमोघ वक्तृत्व ही ईश्वरदत्त देणगीच होय. श्रोतृसमाज कितीही मोठा असो, आपल्या वक्तृत्वानें ते जणूं भारून टाकीत असत. तसेंच भव्य शरीर-संपत्ति असल्यामुळें कोणतेंही दगदगीचें व त्रासाचें काम ते सहज पार पाडीत असत.

मरणापूर्वीं एक महिना अगोदर आम्ही (मी व श्री. चेंबुरकर) त्यांच्या येथें विरारला सकाळीं कांहीं कामाकरितां गेलों होतों. त्या वेळीं त्यांचा हात दुखत होता. श्री. चेंबुरकरांनीं त्यांना सहज विचारलें कीं आपलें सकाळचें फिरणें झालें असेलच ? तेव्हां ते म्हणाले, "अहो माधवराव, सकाळीं फिरणें हें नाजूक प्रकृतीच्या माणसासाठीं आहे, माझ्यासारख्या शेतकऱ्यासाठीं नाहीं. मी रोज सकाळीं दंड-बैठका घालीत असतों आणि म्हणून माझी प्रकृति दिसते अशी आहे. मला

दैवयोगानें जरी उच्च शिक्षणाचा लाभ मिळाला तरी मी शेतकरी आहें हें कधींही विसरलों नाहीं. ”

अण्णासाहेबांनीं स्थापन केलेला ‘ सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघ ’ हें त्यांचें जिवंत स्मारक होय. ह्या समाजातर्फे त्यांनीं ज्ञातींत एक प्रकारची जागृति केल्यामुळें अनेक तरुणांना त्यांच्यापासून स्फूर्ति मिळाली. कोषाध्यक्ष, विश्वस्त व अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं गेलीं ३५ वर्षें ह्या समाजाची सेवा केली.

मी पार्ले-अंधेरी म्युनिसिपालिटींत निवडून आल्यानंतर त्यांचा माझा परिचय अधिकच दृढ झाला. ते स्वतः स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री असतांना मला वेळोवेळीं माझ्या कार्यांत त्यांचें मार्गदर्शन झालें. माझ्या कार्याबद्दल ते नेहमीं आपुलकीनें चौकशी करीत असत.

कै. अण्णासाहेब अनेक संस्थांचे जनक असल्यामुळें आज त्यांच्या मृत्यूमुळें त्या सर्व संस्था पोरक्या झाल्या आहेत.

**सौ. रमाबाई चेंबूरकर**

*विलेपार्लें*

## लोकसंग्राहक अण्णासाहेब

सर्वसाधारणपणें श्रीमान् उच्च घराण्यांत जन्मलेले व सुशिक्षित असे तरुण आपला विद्याभ्यास झाल्यावर राष्ट्रकार्याच्या खडतर मार्गाचा अवलंब न करतां अधिक सुखाच्या शोधांत मग्न झालेले आढळून येतात. कै. गोविंदरावजी हे त्यांपैकीं एक नव्हते. त्यांनीं आपलें शिक्षण पुरें झाल्यानंतर आपली सर्व हयात सार्वजनिक कार्यासाठीं वाहिली. सार्वजनिक कार्यांत त्यांचा व माझा संबंध १९३० सालापासून आला. तो उत्तरोत्तर इतका गाढ होत गेला कीं आम्ही एकमेकांना सख्ख्या भावाप्रमाणें मानूं लागलों. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ असल्यामुळें त्यांनीं लोकसंग्रह उत्तम प्रकारें केला. त्यांचा मित्रपरिवारही बराच मोठा असून ह्या सर्व

मित्रांचा त्यांनीं सार्वजनिक कार्यामध्यें उत्तम उपयोग करून घेतला. त्यांच्या साध्या व विनयी स्वभावामुळें कित्येक कार्यकर्ते त्यांच्याकडे आकर्षित होऊन त्यांच्या बरोबर कार्य करण्यास त्यांना हुरूप वाटत असे. कोणीही सद्गृहस्थ आपल्या पक्षाचा असो वा नसो, त्याच्याशीं ते सारख्याच प्रेमानें वागत असत. त्यामुळें सार्वजनिक कार्यांत ते अजातशत्रु होते.

ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष असतांनाची त्यांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची व दुसऱ्या जिल्हा बोर्डांना नमुनारूप अशी होती. जिल्हा बोर्डाचा कारभार त्यांनीं संपूर्ण लोकशाही स्वरूपाचा बनविला. अशा रीतीनें देशाच्या लोकशाही कारभाराचा पाया स्थानिक स्वराज्य संस्थांमधून घालण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गाढ अनुभवामुळें व त्याबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेमुळें मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री झाल्यावर त्यांची कामगिरी उल्लेखनीय अशी झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासामध्यें त्यांचें नांव अमर राहील. त्यांच्या ठिकाणीं जातीय किंवा प्रांतीय असा कोणताच वाद नसून ते संपूर्ण भारतीय होते. असा कॉंग्रेसचा एकनिष्ठ सेवक, सत्य व अहिंसा तत्त्वाचा सच्चा अनुयायी, ध्येयनिष्ठ, त्यागी कार्यकर्ता आमच्या-मधून काळानें हिरावून नेल्यामुळें मुंबई राज्याचें व देशाचें अतिशय नुकसान झालें आहे.

**हरिकृष्ण चिंतामणि जोशी**

*देहेली – भिलाड*

## जनसेवेचे उपासक

पूज्य अण्णासाहेबांचें जीवनचरित्र त्यांच्या पूर्वजन्मींच्या संस्कारां-नुसार आत्मोन्नतीचें घडलेलें होतें. सधन व सुखवस्तु शेतकरी कुटुंबांत जन्म झाला असतांही त्यांनीं आपलें ज्ञानार्जनाचें कार्य मोठ्या चिकाटीनें

पुरें केलें. त्यांच्या विरार गांवीं पांचव्या यत्तेच्या वर शिक्षणाची सोय नसल्यामुळें त्यांच्या शिक्षणाच्या मार्गांत एक मोठी धोंड होती. परंतु त्या परिस्थितीला त्यांनीं मोठ्या धीरानें तोंड देऊन त्यांतून मार्ग काढला. त्यांनीं मुंबईस माध्यमिक व उच्च शिक्षण संपादन केलें व पुढें ते मुंबई विश्वविद्यालयाचे पदवीधर झाले.

लो. टिळकांच्या जीवनचरित्राचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम होऊन त्यांनीं राष्ट्रसेवेचें व्रत घेतलें व जीवनाच्या अखेरपर्यंत तें तेजस्वी रीतीनें पार पाडलें. म. गांधीजींच्या १९२१ च्या असहकारितेच्या काळांत त्यांच्या जीवनांत कायमचा बदल झाला. त्यांचें जीवन अखंड सेवेनें भरलेलें आहे. त्यांनीं तन-मन-धनानें राष्ट्राची व समाजाची सेवा केली आहे.

१९४२ सालीं महान् स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत मला नाशिक तुरुंगांत अण्णासाहेबांच्या शेजारीं सव्वा वर्ष राहाण्याचें भाग्य लाभलें होतें. त्या वेळीं त्यांचें जीवन जवळून पाहाण्याचा योग आला. अण्णासाहेब अत्यंत उदार व प्रेमळ हृदयाचे होते. त्यांचें शील व चारित्र्य उदात्त होतें. त्यांच्या व्यक्तित्वांत आकर्षकता होती. जेलमध्यें त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. त्या काळची स्मृति आली कीं अंतःकरण भरून येतें.

जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षापासून तों स्थानिक स्वराज्य मंत्री होईपर्यंत त्यांना जो बहुमान मिळाला त्याची त्यांनीं कधींच लालसा बाळगली नाहीं. जनतेचें त्यांच्यावर अगाध प्रेम होतें. ते एक निःस्वार्थी महान् देशसेवक होते.

'जनसेवा' हाच त्यांच्या जीवनाचा महामंत्र होता. त्यासाठीं त्यांनीं आपलें सर्व जीवन समर्पण केलें. त्या थोर आत्म्यास माझे प्रणाम.

**डॉ. दिनकर जगन्नाथ गाळवणकर**

*अर्नाळा*

# निष्ठावंत अण्णासाहेब

कै. पूज्य अण्णासाहेब वर्तक ह्यांचा व माझा परिचय १९२४ सालापासून होता. ते निष्ठावंत, प्रामाणिक समाजसेवक होते. ते ज्याप्रमाणें शरीरानें धिप्पाड व मजबूत होते त्याचप्रमाणें मनानें मोठे उदार, चारित्र्यवान्, शीलवान् पुढारी होऊन गेले. ते फार नियमित होते.

गेलीं २८–३० वर्षें ते सतत आपला अर्धा दिवस सार्वजनिक कार्यांत घालवीत असत. सकाळीं घरचा व्यवहार पाहून जेवण झाल्यावर बाहेर पडले कीं सर्व सार्वजनिक कामें पुढारीपणानें आटोपून आनंदी वृत्तीनें, हसतमुखानें रात्रीं परत विरारला येत असत किंवा जरूर लागल्यास १–२ दिवस बाहेरही राहात असत. तास सव्वातास खड्या आवाजांत ते भाषण करीत असत. त्यांनीं आपलें विरार येथील श्रीराममंदिर हरिजनांना दर्शन घेण्यास बऱ्याच वर्षांपूर्वीं खुलें केलें. त्यांना व्यायामाचा फार षोक होता व ते इतके नियमित होते कीं येरवड्याच्या स्वराज्यमंदिरांत असतांना जोर, बैठका, पळणें, वगैरे व्यायाम घेत असत.

तालुकानिहाय अथवा जिल्हानिहाय कॉंग्रेस कमिट्या आणि लोकलबोर्डांच्या निवडणुका लढविण्यांत अण्णासाहेब प्रामुख्यानें भाग घेत असत. आपसांत तडजोड, दोन पक्षांत सलोखा, वगैरे कामांत अण्णासाहेबांचा सल्ला फार उपयोगी पडत असे. त्यांचे मित्र, सर्व जातींचे, पंथांचे व पक्षाचे असत व त्या सर्वांना ज्या ज्या प्रकारची मदत लागेल ती ते देत. त्यांनीं वर्गणी देण्यांत कोणालाही नाखुष केलें नाहीं, उलट त्यांचा आंकडा फार मोठा असे. स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री झाल्यावर त्यांच्या योजनेमुळें जिल्हा लोकलबोर्डाचें उत्पन्न पुष्कळ वाढलें व त्यामुळें लोकोपयोगी जास्त कामें करतां आलीं. वसईच्या म्युनिसिपल टोल नाक्यापासून वसईरोड स्टेशनपर्यंतचा सिमेंटचा रस्ता त्यांच्या अनुकूल सल्ल्यामुळें व मदतीनें झाला.

डॉ. गणेश भिकाजी परुळेकर

वसई

# अजातशत्रु कर्मयोगी

कै. अण्णासाहेबांशीं माझा परिचय १९१९ च्या सुमारास झाला. त्यांनीं सरकारच्या रागालोभाची पर्वा न करतां लोकहिताची दृष्टि ठेवून ठाणें जिल्ह्यांत फार उत्तम प्रकारची कामगिरी बजावली. उदारपणा, प्रेमळपणा, मनाचा थोरपणा, कार्यकुशलता, धडाडी, चिकाटी, दुसऱ्याबद्दल आदर, वगैरे गुणांनीं युक्त व मेणाहून मृदु असे आमचे अण्णासाहेब होते. त्यांनीं आपल्या मित्रपरिवारांत इतका जिव्हाळा, इतकी आत्मीयता निर्माण केली होती कीं अण्णासाहेब अद्यापि हयात असून आपणामध्यें आनंदानें वावरत आहेत असा अजूनही भास होतो.

अण्णासाहेबांचें आचरण सदाचारसंपन्न होतें. सामाजिक, व्यावहारिक, सांसारिक व राष्ट्रीय नातीं सांभाळण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांच्याशीं एखाद्याचा थोडासा जरी संबंध आला असला तरी त्या माणसाकडे सुखदुःखप्रसंगीं ते उपस्थित व्हावयाचे, हें त्यांचें एक मोठें वैशिष्ट्य होतें.

शिक्षणासंबंधीं अण्णासाहेबांना फार आस्था होती. अनेक संस्था स्थापन करण्यांत अण्णासाहेबांचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. त्या संस्थारूपी रोपट्यांना जलसिंचन करून सुंदर वनश्रीची शोभा अण्णासाहेबांनींच आणली आहे. राष्ट्रानें अभिमान बाळगावा असे अण्णासाहेब एक थोर पुरुष होते. आपल्या सहकारी मित्रांवर त्यांचा दृढ विश्वास, निष्ठा व निर्व्याज प्रेम असे. त्यांच्या सहवासांत सदैव आनंदाचें वातावरण निर्माण व्हावयाचेंच. कोणीही आमचा हेवा करावा इतका आम्हांस त्यांचा निकट सहवास लाभला. व्यक्तिशः माझ्याबद्दल त्यांना फार कळकळ होती. माझ्या हातून सार्वजनिक क्षेत्रांत जी कांहीं अल्पस्वल्प कामगिरी झाली असेल, तिचें सर्व श्रेय अण्णासाहेबांनाच आहे. मला जे पदाधिकारांचे योग लाभले ते केवळ त्यांचा माझ्यावर असलेला संपूर्ण विश्वास व लोभ ह्यामुळेंच प्राप्त झाले.

त्यांचें उदात्त व उज्ज्वल चरित्र एक राष्ट्रसेवक म्हणून आपणांपुढें सतत राहील. त्यांच्या निधनामुळें महाराष्ट्रांतील एक गोड, निर्लोभ, कार्यक्षम, धीरोदात्त, समतोल विचाराचा व अजातशत्रु असा कर्मयोगी नाहींसा झाला.

ह्या भागांत असा तळमळीचा सव्यसाची कार्यकर्ता आजपर्यंत झालेला नाहीं. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करतां किंवा मोठेपणाची हांव न धरतां आपलें कर्तव्य म्हणून यथाशक्ति राष्ट्रसेवा व सार्वजनिक कार्य करणारे जे समाजसेवक व राष्ट्रपुरुष होऊन गेले त्यांत अण्णासाहेबांची अवश्य गणना करावी लागेल. गरम नरम राजकारणी, ब्राह्मणब्राह्मणेतर, सरकारी अधिकारी व इतर पक्षीय लोक, हितशत्रु व अंतर्भेदी अशा सर्वांस एकत्र आणून राष्ट्रकार्य करून दाखविणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे ! धुतलेल्या तांदुळासारखे असलेल्या अण्णासाहेबांच्या चारित्र्याकडे पाहिलें तर "झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु ह्यासम हा" असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं.

नारायण गणेश गाळवणकर

*वसई*

## पितृतुल्य अण्णासाहेब

अण्णासाहेबांचा व आमच्या घराण्याचा दोन पिढ्यांचा संबंध असल्यामुळें बालपणापासूनच त्यांच्याकडे वडिलांप्रमाणें पाहाण्याची माझी दृष्टि होती. माझ्या जीवनांत आमचा पिता पुत्री असा संबंध होता. माझ्यावर त्यांचें सतत लक्ष असे. आज जें कांहीं थोडें बहुत सार्वजनिक काम मी करीत आहें त्याची स्फूर्ति माझ्या वडिलांकडून व तेवढीच अण्णासाहेबांकडून मला मिळाली आहे. त्यांच्या आशीर्वादाची मी सतत अपेक्षा करीत असें.

जयंती श्रॉफ

## लोकप्रिय पुढारी

कै. अण्णासाहेब वर्तक ह्यांचा व माझा संबंध जरी अलीकडला असला तरी त्यांनीं अत्यंत निष्ठेनें व त्यागपूर्ण केलेली समाजसेवा व राष्ट्रसेवा मला माहीत होती आणि ठाणें जिल्ह्याशीं माझे थोडेबहुत जवळचे संबंध असल्यामुळें त्यांच्याबद्दल मला नित्य आदर व अभिमान वाटे. सोमवंशी क्षत्रिय समाजाची आजची भरभराट — शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक — ही बहुतांशीं अण्णासाहेबांच्याच कर्तृत्वशक्तीचा एक भक्कम पुरावा आहे. सोमवंशी क्षत्रिय समाजाच्या संघटनेंत मिळालेलें यश व त्यांनीं दाखविलेली उद्योगशीलता पुढील विशाल अशा राजकीय क्षेत्रांत यांना अत्यंत उपयुक्त ठरली. राजकीय क्षेत्रांत त्यांनीं दाखविलेली धडाडी, संघटनाकौशल्य आज सर्वांच्या नजरेसमोर आहे. ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं केलेली सेवा व त्यानिमित्त निरनिराळ्या समाजांशीं व गांवांशीं आलेले संबंध व त्या संबंधांमुळें त्यांनीं मिळविलेली लोकप्रियता त्यांच्या मृत्यूनंतरही जनतेच्या हृदयांत ठाम ठाणें धरून बसली आहे व म्हणूनच त्यांच्या मृत्यूनंतर चोहोंकडे हळहळ निर्माण झाली. शरीरप्रकृति निकोप असतांनासुद्धा अवघ्या एकूणसाठाव्या वर्षी त्यांनीं इहलोक सोडावा ही अत्यंत दुःखद घटना होय. ठाणें जिल्हा एका अत्यंत निष्ठावंत व लोकप्रिय पुढाऱ्यास पारखा झाला व कधींही भरून न येणारी हानि झाली.

**डॉ. मधुकर ब. राऊत**

*दादर, मुंबई*

## अजातशत्रु अण्णासाहेब

२५ मे १९३८ रोजीं झालेल्या ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या निवडणुकींत मीं कॉंग्रेसचा उमेदवार ह्या नात्यानें भिवंडी तालुक्यांतून निवडून आलों. तोंपर्यंत १९२५ सालापासून भिवंडी बोर्डांत मी सतत निवडून येत होतों. कै. अण्णासाहेब हे ठाणें जिल्ह्यांतल्या राष्ट्रीय पक्षाचे

प्रमुख म्हणून मी त्यांना दुरून ओळखत होतों. ह्या राष्ट्रीय पक्षाचे नेते म्हणून ते जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष झाले होते. अणजूर रस्त्याच्या कांहीं बाबतींत ठाणें बोर्डाचा गैरसमज दूर करण्याकरितां एक दोन वेळां जिल्हा बोर्डाचा सभासद ह्या नात्यानें मीं कै. अण्णासाहेबांची भेट घेतली होती. त्यापेक्षां माझी त्यांच्याशीं जास्त ओळख व सलगी नव्हती. १९३८ च्या निवडणुकीनंतर त्यांचा माझा परिचय वाढूं लागला. प्रथमतः त्यांचा विरोधक म्हणूनच त्यांची माझी भेट झाली. दोनतीन महिन्यांच्या अवधीनंतर त्यांनीं माझा स्वभाव ओळखला. काम करण्याची उमेद त्यांना पटली, ती इतकी कीं त्या वेळच्या कॉंग्रेस पक्षाच्या चिटणीसांना राजीनामा द्यावयास लागल्यानंतर त्यांनीं त्यांच्या जुन्या इतर मित्रांपैकीं कोणाची निवडणूक चिटणिसाच्या जागीं केली नाहीं. मलाच पक्षाचे चिटणीस म्हणून नेमून घेतलें. त्यानंतर बोर्डातून मी बाहेर निघेपर्यंत पक्षाचा चिटणीस व पक्षाचा नेता म्हणून काम केलें आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख एवढ्याचकरितां करतों कीं कै. अण्णासाहेब आपल्या मनाच्या विरुद्ध मताच्या माणसासही निवडून घेण्यास मागें पुढें पाहात नसत. कामाचें महत्त्व ते नजरेसमोर ठेवून घेत असत. खाजगी वैयक्तिक भांडण ते पाहात नसत.

पुढें कै. अण्णासाहेब ठाणें जिल्ह्याचे एकमेव पुढारी झाले त्याला त्यांच्या अंगचे वरील प्रकारचे अनेक गुण कारणीभूत झाले. त्यांना माणसांवर छाप ठेवून पण आपुलकीनें कार्यकर्त्यांना आपल्या बाजूस वळविण्याची हातोटी उत्तम प्रकारें साधली होती. आपल्या मित्रांवर व पक्षाच्या माणसांवर त्यांचा फार लोभ असे व सर्व प्रकारें ते त्यांची विचारपूस करीत. त्यांना सल्ला देत. मदतही करीत असत. मित्रमंडळी जमली कीं कै. अण्णासाहेबांना फार आनंद होई व ते अशा वेळीं खर्चेही करीत.

कै. अण्णासाहेब त्या वेळीं ठाणें जिल्ह्याचे एकमेव पुढारी समजले जात होते. ठाणें जिल्ह्यांत होणाऱ्या प्रत्येक चळवळींत ते अग्रभागानें

कार्य करीत असलेले दिसत होते. ठाणें जिल्ह्यांतले एकूण एक कार्यकर्ते कै. अण्णासाहेबांचा सल्ला हरएक बाबतींत घेत असत. ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या ऑफिसांत नेहमीं जिल्ह्यांतल्या व बाहेरच्याही कार्यकर्त्यांची नेहमींच गर्दी असे. जिल्हा कॉंग्रेस कमेटी ही सर्वस्वी त्यांच्याच सल्ल्यानें चालत होती. ठाणें जिल्हा हा त्या वेळीं एकसंधी बनला होता.

१९४२ च्या ऑगस्ट महिन्यांत इतरांच्याबरोबर बंदिवासांत राहिले त्या वेळीं ते नाशिक जेलमध्यें तुरुंगांत होते. त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना ह्याच तुरुंगांत आणून ठेवलें होतें. ह्या तुरुंगांत वास्तव्य असतांना त्यांना नेहमीं आपल्या पक्षाला मार्गदर्शन करावें लागे. ह्या वेळीं मी जिल्हा बोर्डाचा अध्यक्ष असल्यानें अत्यंत जिकीरीनें काम करावें लागे. बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागत होतें. ठाणें जिल्ह्यांत दुष्काळ चालू होता. तसेंच सरकारचें संशयाचें धोरण कार्यकर्त्यांच्या कार्याच्या आड येत होतें. कोण केव्हां तुरुंगांत पाठविला जाईल हें समजणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत अण्णासाहेबांनीं नाशिकच्या तुरुंगांतल्या सर्व सहकाऱ्यांना संघटित करून बाहेरही आम्हांस ते मार्गदर्शन करीत असत.

१९४२ नोव्हेंबरमध्यें मी तुरुंगांत गेलों. त्या वेळीं आम्ही सर्वजण बाहेरच्या चळवळीचा तेथें आढावा घेत असूं व पुढील कार्याची रूपरेषा आंखीत असूं. तुरुंगांतही अण्णासाहेबांच्या दिलदार वृत्तीमुळें आम्ही सर्वजण एकत्र व संघटित राहिलों.

सन १९४७ च्या मंत्रिमंडळांत त्यांना जें स्थान मिळालें त्याचा उगम त्यांच्या ह्या वेळच्या कर्तृत्वांत शोधावा लागतो.

कै. अण्णासाहेबांइतका प्रेमळ मित्र क्वचित्‌च कोणास लाभला असेल. त्यांच्याबरोबर कांहीं जणांनीं अकारण वैर धरलें होतें. पण कै. अण्णासाहेबांच्या तें वैर ध्यानींमनींहीं नसे. अशा माणसावर प्रेम करून त्याचें चांगलें करणें आपलें कर्तव्य आहे असें ते समजत असत. त्यामुळें ते शेवटपर्यंत अजातशत्रुच राहिले.

*अणजुर* **गजानन गोविंद नाईक**

## आदर्श समाजनेते

सोमवंशी क्षत्रिय समाजांतील निष्ठावंत समाजसेवक व राष्ट्रभक्त अण्णासाहेब वर्तक ह्यांचा समाजाच्या जीवनविकासाच्या दृष्टीनें अत्यंत स्पृहणीय व मौलिक असा उपयोग झाला आहे. समाजोन्नति संघाला जिवंतपणा आणण्याचें कार्य अण्णासाहेबांनीं केलें आहे. अण्णासाहेब हे ह्या संस्थेचे प्राण होते.

अण्णासाहेब नेहमीं म्हणावयाचे, ह्या जगांत शरीरानें व मनानें दुबळा असलेल्या मनुष्यास जगण्याचा अधिकार नाहीं. अण्णासाहेब शरीरानें मजबूत होते, तसेच ते उंच व तेजस्वी होते. प्रसन्न चेहेरा व हसतमुख अशी अण्णासाहेबांची सुंदर मूर्ति प्रत्येकाला आदर्शभूत वाटे. दातृत्व, उदारता, सज्जनता, सहृदयता, कल्पकता, अवधान, वगैरे सद्गुण अण्णासाहेबांत वसत होते. ते नियमित व्यायाम घेत असत आणि संयमानें मनावर ताबा ठेवीत.

**मुकुंदराव सावे**

*बोर्डी*

## पुण्यस्मरण

सन्माननीय अण्णासाहेबांचें स्मरण म्हणजे अनेक सद्गुणांचा प्रकर्ष, सद्भावनांची मूर्ति व सहानुभूतीचा आदर्श डोळ्यांपुढें आल्यावांचून राहातच नाहीं. माझा त्यांचा भेटण्या–बोलण्याचा सुयोग १९२०–२१ च्या दरम्यान आला. २० सालीं बोर्डीस सोमवंशी समाजाचें स्वयंसेवक मंडळ स्थापन होऊन, २१ सालीं वसईस पहिली परिषद आनंदी व उत्साही वातावरणांत पार पडली त्या वेळीं विशेष ओळख झाली. त्यांच्याच सक्रीय साह्यामुळें आणि धीरोदात्त वृत्तीमुळें सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघास आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

स्व. अण्णासाहेबांचें शीलवान् शुद्ध चारित्र्य, आर्थिक उदार मनस्कता, निरभिमानी वृत्ति, गुणग्राहकता, अधिकारवाणीचें वक्तृत्व, राष्ट्र व समाज ह्यांच्या उद्धाराची उत्कट इच्छा, इत्यादि अनेक सद्गुणांनीं सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाला आज उर्जितावस्थेला आणलें आहे. हें मी माझ्या गेल्या चोवीस वर्षांच्या अनुभवानें व निरीक्षणानें सांगत आहें.

**मोरो नानाजी पाटील**

*शिरगांव*

## अण्णासाहेबांचें असामान्यत्व

शेतकरी समाजांत जन्मलेल्या व अगदीं लहान वयांतच डोक्यावरील छत्र नाहींसें झालेल्या दहाबारा वर्षांच्या मुलानें आपलें कर्तव्य काय हें जाणून शिक्षण घेण्यास सुरुवात करावी व तें घेतल्यानंतर जनसेवा आचरून आपल्या जीवनांतील कर्तव्याची पूर्तता करावी ही असामान्य गोष्ट माझे निकटचे स्नेही अण्णासाहेब वर्तक ह्यांनीं करून दाखविली आहे.

**नीळकंठ बाळकृष्ण नाईक**

*पुणें*

## माझें स्फूर्तिस्थान

पू. कै. अण्णासाहेब वर्तकांचा व माझा सन १९१९ सालीं परिचय झाला. पहिल्या सत्याग्रह चळवळींत ते दारूबंदी (पिकेटिंग) पथकाचे प्रमुख होते. त्यांच्या हाताखालीं मी स्वयंसेवक म्हणून दारूबंदीचें काम करण्याचें व्रत घेतलें तें आजतागायत त्यांच्याच स्फूर्तीनें माझ्याकडून थोड्या फार प्रमाणांत पार पडत आहे.

दारूबंदीचें काम करीत असतांना अधूनमधून निराशा उत्पन्न होई त्या वेळीं नेटानें काम करण्याबद्दल त्यांच्याकडून स्फूर्ति मिळे. स्वतःच्या मालकीच्या ताडाच्या झाडांचें सालीना शेंकडों रुपयांचें उत्पन्न त्यांनीं कायमचें सोडून दिलें. ह्या त्यांच्या कृतीनें मला निरुत्साहांत उत्साह वाटे. आपल्या बांधवांची उन्नति करण्यासाठीं त्यांना व्यसनापासून दूर केलें पाहिजे असें ते वारंवार निश्चयीपणानें आम्हांस सांगत असत.

पुढें पुढें अण्णासाहेबांचा व माझा अतिशय निकट संबंध आला. त्यांचें स्नेहीमंडळीवरील निर्लोभ प्रेम, स्वार्थत्याग, सोशिकता, वगैरे गुण मला दिसून आले. आज पदोपदीं त्यांची मला आठवण होत आहे. त्यांची मूर्ति मी मनःचक्षूंपुढें ठेवून स्फूर्ति मिळवितों. क्वचित एखाद्या महिन्यांत माझी व त्यांची भेट झाली नाहीं तर ते निरोप पाठवून मला बोलावून घेत अगर स्वतः येत. एके ठिकाणीं बसून आम्ही खेळ खेळत असूं. मला जी थोडेंबहुत सार्वजनिक कार्य करण्याची गोडी लागली तिचें सारें श्रेय अण्णासाहेबांनाच आहे.

**प्रभुदास भगवानदास शहा**

*आगाशी*

## जिव्हाळ्याचे स्नेही

माझे जिव्हाळ्याचे स्नेही अण्णासाहेब वर्तक ह्यांचा आणि माझा अनेक वर्षांचा स्नेह होता. त्यांचें अव्याज मित्रप्रेम मी कधींही विसरणार नाहीं. आमची मैत्री अकृत्रिम होती. आपल्या मित्रांच्या बारीकसारीक गोष्टींकडेही त्यांचें पूर्ण लक्ष असे. त्यांच्या व्यवहारदक्ष स्वभावामुळें त्यांच्या मित्रमंडळींत त्यांच्या शब्दाला मान असे. ह्यामुळें आणि त्यांच्या शुद्ध चारित्र्यामुळें आमच्या सर्व मित्रमंडळींत त्यांच्यासंबंधीं आत्यंतिक आदराची भावना होती. त्यांचा गोड स्वभाव व उमदा दिलदारपणा त्यांच्या खानदानीपणाला अधिकच शोभा देत असे. अण्णासाहेबांच्या

सान्निध्यांत, विनोदपूर्ण वातावरणांत आम्हीं घालविलेला काळ आमच्या जीवनांतील एक सुखद स्मृतींचा काळ आहे. ब्रिज हा त्यांचा अत्यंत आवडता खेळ होता. सुटीच्या अगर फुरसतीच्या दिवशीं आम्ही मधून मधून त्यांच्या घरीं ब्रिज खेळण्यासाठीं जमत असूं. अण्णासाहेब ह्या खेळांत अगदीं निष्णात होते. त्याच्यामध्यें ते पूर्णपणें रमून जात असत. अण्णासाहेबांचा मुक्काम पुण्यास असतांना त्यांना आवडत असणारीं विशिष्ट प्रकारचीं कळीदार खावयाचीं पानें दर आठवड्याला पुण्यास पाठविण्याची कामगिरी माझ्याकडे असे. माझ्याकडून अण्णासाहेबांची ही सेवा घडली हें मी माझें भाग्य समजतों.

आमच्यांतून अण्णासाहेब फार लवकर निघून गेले. चांगलीं माणसें देवाला आवडतात ही गोष्ट खोटी नाहीं. अण्णासाहेबांनीं स्वतःसाठीं विशेष असें कांहींच केलें नाहीं. जें केलें तें आमच्यासारख्या मित्रांसाठीं आणि इतरेजनांसाठीं. अण्णासाहेबांना आमच्या जीवनांत अनन्यसाधारण स्थान आहे. त्यांची स्मृति आमच्या जीवनांत अखंड तेवत राहील.

**इच्छालाल जगमोहनदास**

*मुंबई*

## दूरदृष्टि नेते

कै. अण्णासाहेब ह्यांच्या अंगीं असलेली लोकसंग्राहक वृत्ति आणि त्यांची आदरणीय अशी मनमिळाऊ सेवावृत्ति ह्यामुळें त्यांनीं आपल्या भोवतीं अनेक निष्ठावंत सहकारी आणि कार्यकर्ते मिळविले. अशा ह्या निष्ठावंत संबंधितांपैकींच मी एक आहें. माझ्या मनश्चक्षूंपुढें कै. अण्णासाहेबांची ती उण्यापुऱ्या उंचीची परंतु तेजस्वी अशी भव्य मूर्ति उभी राहाते आणि त्याबरोबरच गेल्या तीस बत्तीस वर्षांत त्यांनीं इकडील भागांत मिळविलेली लोकप्रियता आणि निरनिराळ्या मार्गांनीं केलेल्या अनेक लोकोपयोगी कार्यांची स्मृति उत्कटपणें जागृत होते.

सार्वजनिक कार्य करीत असतांना व्यक्तिगत स्वार्थाची बाजू तर नव्हतीच; परंतु विशिष्ट एका गटाचें अगर समाजाचें हित पाहून कार्य करावयाचें अशी विकृत दृष्टिही त्यांनीं कधींच ठेवली नाहीं. एखादें काम सार्वजनिक हिताचें व सोईचें आहे अशी खात्री पटतांच सडेतोडपणें प्रसंगीं हितसंबंधीयांना डावलूनही त्यांनीं तें पार पाडलें आहे. निष्काम सेवा, प्रामाणिकपणा व गरीबांसंबंधीं कळकळ ह्या गुणांमुळेंच त्यांच्या कार्यक्षेत्रांतील जनता त्यांना आपला पुढारी मानी आणि संकटप्रसंगीं त्यांचा त्यांना आधार वाटे. मंत्रीपदासारखी मानाची व उच्च जागा मिळूनही अण्णासाहेब आपल्या गरीब शेतकरी बांधवांना विसरले नाहींत.

ज्याप्रमाणें अण्णासाहेब प्रसंगीं झीज सोसूनही कार्य करीत त्याप्रमाणेंच व्यक्तिगत बाबतींतही योग्य तो सल्ला देऊन मार्गदर्शन करीत असत, अशीं अनेक उदाहरणें आहेत. आमच्या गांवांतील एका सद्गृहस्थांस गांवांत एक दत्तमंदिर बांधावयाची इच्छा झाली. गृहस्थ मोठा धार्मिक वृत्तीचा व भावनाशील, परंतु स्वखर्चानें मंदिराचें काम पूर्ण होणें शक्य होणार नव्हतें म्हणून ह्या कामीं योग्य तो सल्ला व कांहीं मदत ह्या दुहेरी हेतूनें त्यांनीं अण्णासाहेबांची भेट घेण्याचें ठरविलें. त्यांचा अण्णासाहेबांशीं विशेष परिचय नसल्यामुळें मला त्यांच्याबरोबर जावें लागलें. अण्णासाहेबांनीं त्यांचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेऊन त्यांना सांगितलें कीं, "तुमची भावना मी जाणतों. स्वखर्चानें अथवा सार्वजनिक मदतीनें कदाचित् तुम्हीं मंदिर बांधालही. परंतु त्या मंदिराची शेवटपर्यंत व्यवस्था होईल अशी कांहीं माया तुम्हीं करून ठेविली आहे काय? आणि तसें नसेल तर आपल्या हिंदूंचीं अनेक मंदिरें आज जशीं पडून आहेत तशीच ह्याही मंदिराची स्थिति होईल, ह्या गोष्टीचा तुम्ही विचार करा." हें ऐकतांच आम्हांस एका नव्या विचाराचें दर्शन झालें. कारण त्या बाजूनें आम्हीं कधीं विचार केलाच नव्हता. सदर गृहस्थ अद्यापपर्यंत ही गोष्ट ऐकवितात.

अण्णासाहेब ह्यांच्याबद्दल मला वाटणारा आदर शब्दानें पूर्णपणें व्यक्त करण्याइतकी शक्ति माझ्या लेखणींत नाहीं. परंतु अण्णासाहेबांना व्यक्तिशः माझ्याबद्दल आणि विशेषतः आमच्या 'सामवेदी ब्राह्मण संघा'–बद्दल वाटत असलेली कळकळ आम्ही कधींहीं विसरणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं केलेल्या सेवेचें व कार्याचें ऋण येथील जनताही कधीं विसरणार नाहीं.

**रामचंद्र लक्ष्मण सम्हाले**
**अध्यक्ष,** सामवेदी ब्राह्मण संघ

*वटार*

## आमचे अण्णा

सन १९१२ साल असेल. अण्णासाहेबांची माझी प्रथम ओळख विरार येथें त्यांच्या घरींच झाली. त्या वेळीं त्यांचें शालेय शिक्षण बंद झालें होतें तरी शिकविण्यासाठीं घरीं शिक्षक येत असत. एवढ्यावरून अण्णासाहेबांविषयीं माझ्या मनांत पूज्य भावना निर्माण झाली. त्यामुळें मी त्यांना नेहमीं भेटत असें. भेटावें असें वाटेच मुळीं. कारण दुसऱ्यावर प्रेम करण्याची त्यांची हातोटी कांहीं और होती. ती दुसऱ्याला सहसा साधणार नाहीं. ते स्वतःबद्दल कोणाच्याही मनांत आदर उपन्न करीत. पुढें सन १९१३ च्या सुमारास ते मुंबई येथें अभ्यासासाठीं राहावयास गेले. ते मुंबईस गेल्यावर त्यांच्या अभ्यासाच्या खोलीवर मी नेहमीं जात असें. माझें जाणें येणें अण्णासाहेबांना कंटाळवाणें वाटलें नाहीं. त्यामुळें माझ्या मनांत त्यांच्यासंबंधीं आदराची भावना निर्माण झाली.

अण्णासाहेब नेहमीं लवकर उठत असत. ६ वाजण्यापूर्वीं त्यांची झोप पुरी होई. उठल्याबरोबर प्रथम कपडे बदलून व चूळ भरून आपला स्वतःचा बिछाना व्यवस्थित गुंडाळीत. मग खालीं येऊन तोंड धूत. दांत घासतां घासतां ते बैलांच्या गोठ्यांत जाऊन येत असत. बैल

व इतर जनावरें ह्यांची सबंध दिवसांत ते सकाळींच भेट घेत असत आणि गड्यांकरवीं त्यांची विचारपूस करीत. बैल अडले का? दाणापाणी व्यवस्थित झालें काय? अशी चौकशी करावयाचे. जनावरें वाळलेलीं दिसलीं म्हणजे अण्णा गड्यांना रागे भरावयाचे आणि बैलांच्या तब्येती सुधारल्या पाहिजेत अशी त्यांना ताकीद द्यावयाचे. कारण त्यांच्या श्रमांवरच शेतकरी जगतो असें ते नेहमीं म्हणत. बैलांवर खरोखरच त्यांचें फार प्रेम असे. एकदा ते वेढीस आमच्या घरीं आले होते. १९२४ साल असेल. त्या वेळेला त्यांचा एक आवडता बैल मेला होता. दोन दिवस ते आमच्याकडे राहिले पण त्या बैलाला विसरूं शकले नाहींत. ह्याप्रमाणें जनावरांवरही त्यांचें प्रेम असे. तोंड धुणें झाल्यावर सूर्यनारायणास व ओटीवरील श्रीरामाच्या व श्रीविष्णूच्या प्रतिमांना ते नमस्कार करीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ही त्यांची सकाळची प्रार्थनाच. एवढें झाल्यावर ते चहा घेत. त्यानंतर खायचीं पानें डब्यांतून काढून साफसूफ करीत. त्यांतील कांहीं परत डब्यांत भरून ठेवीत असत व सबंध दिवस पुरतील एवढीं चंचींत ठेवीत असत. पानें चांगलीं असलीं म्हणजे तीं साफ करतांना अण्णा आनंदांत असत. खायचें पान ही त्यांची अत्यंत आवडीची वस्तु होती. त्यांचें पानाचें सामान अगदीं ठराविक असावयाचें. दगडी सुपारी, आवळी कात, चांगलें कळीदार पिवळें पान, सातारी तंबाखू व घरीं तयार केलेला स्वच्छ चुना असें तें सामान असावयाचें. तंबाखू ते सातारा किंवा पुणें येथून मागवीत. हा पान खाण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर ते टपाल पाहात असत. हें आटोपल्यानंतर वरवर वर्तमानपत्र चाळणें व नंतर शौचास जाऊन आल्यानंतर थोडा व्यायाम घेणें व त्यानंतर आल्यागेल्यांची विचारपूस करणें. एवढें झाल्यानंतर मुंबई वगैरे ठिकाणीं जावयाचें असल्यास त्याची तयारी करणें, त्यानंतर दाढी, स्नान व प्रार्थना. बाहेर पडतांना देवाला नमस्कार करून बाहेर पडावयाचे. जातांना वाटेंत श्रीरामाच्या देवळाच्या दरवाजाजवळ जाऊन श्रीरामाचें दर्शन घेतल्याशिवाय राहात

नसत. नंतर स्टेशनवर गाडीला दोन मिनिटें अवकाश असतांनाच पोहोचावयाचे. बाहेरून येतांना रात्रीं कितीही उशीर झाला तरीही देवळांत वळून श्रीरामाचें दर्शन घेतल्याशिवाय परत येत नसत. देवळांतील घंटा वाजविण्याची त्यांची पद्धत कांहीं निराळीच होती. ती कोणालाही साधत नसे. देवळांत घंटा वाजूं लागली म्हणजे घरीं सर्वजण समजावयाचे कीं अण्णा आले. मग सर्वत्र सामसूम. जो तो आपआपल्या कामांत चूर. घंटा वाजली म्हणजे अण्णा आले ह्याची पूर्व-सूचनाच. घरीं आल्यानंतर कपडे बदलण्यापूर्वी खिशांतील पैशाचें पाकीट व्यवस्थित ठेवीत. नंतर कपडे बदलून हातपाय धुऊन संध्याकाळचें जेवण घेत असत. पान खाऊन झाल्यावर गप्पागोष्टी करणें. एवढें झाल्यावर म्हणजे सुमारें १० वाजल्यानंतर झोपावयास जात. अण्णा एकदा झोपले म्हणजे झोप पुरी झाल्याशिवाय जागे होत नसत. सुमारें ५–५॥ च्या सुमारास श्रीराम, श्रीराम करीत अण्णा जागे व्हायचे. असा त्यांचा कार्यक्रम असे.

त्यांचा पुरुषोत्तम न्हावी ठरलेला. दाढी व केस कापणें हें पुरुषोत्तम शिवाय दुसऱ्यास जमत नसे. केस अगदीं बारीक कापीत. हा प्रकार दुसऱ्या न्हाव्यास साधत नसे. पुरुषोत्तम कट असें त्याचें नांव. केस कापून झाल्यावर ते व्यवस्थित कापले आहेत किंवा नाहींत हें पाहाण्याचें काम बहुधा माझ्यावर यावयाचें. मला ते म्हणावयाचे, चश्मा चढवा आणि केस बरोबर कापले आहेत किंवा नाहींत तें सांगा. मग माझी मोठी तिरपीट उडावयाची. कारण चांगले कापले आहेत असें म्हटलें तर चांगले कां? व वाईट कापले असल्यास वाईट कां? हें सिद्ध करून द्यावें लागत असे. हें काम फारच कठीण.

त्यांच्या खादीच्या टोपीला आंतून कव्हर असे. तें कृष्णा शिंप्याशिवाय इतरांना व्यवस्थित बसवतां येत नसे. एकदाच १५।२० टोप्या तयार करून ठेवायच्या. त्यांत प्रकार दोन. एक केस वाढलेले असतील तेव्हां डोकीस व्यवस्थित बसणाऱ्या व एक केस कापल्यावर डोकीस बसतील

अशा. त्यांचा पोषाख आरंभीं असे तसाच शेवटपर्यंत राहिला. शर्ट, टोपी, डगला, धोतर व पायांत स्लीपर. हा पोषाख साधा पण अगदीं नीटनेटका असावयाचा. फॅशन म्हणून त्यांच्या पोषाखांत कांहींच नसावयाचें. त्यांना अत्तराचीही थोडी आवड होती.

अण्णासाहेब व्यवहारांत अत्यंत दक्ष असावयाचे. घरगुती सामानाचे पैसे स्वतः सर्व हिशेब पाहून चोख रीतीनें चुकते करावयाचे. दुकानावरील सामानासाठीं एक स्वतंत्र चोपडी असावयाची. त्या चोपडीवरून हिशेब करून ते दरमहा ताबडतोब व्यवहार पुरा करीत. हिशेबाची दिरंगाई त्यांना बिलकूल खपत नसे. रोजचा हिशेबसुद्धा व्यवस्थित जमला पाहिजे ह्यावर त्यांचा फार कटाक्ष होता. तो जमवितांना कितीही वेळ गेला तरी त्याकडे ते विशेष लक्ष देत नसत. एकदा काय झालें, अण्णासाहेब हैदराबाद कॅांग्रेससाठीं गेले होते. तेथील सर्व हिशेब लिहिलेला, पण घरीं येऊन पाहातात तों शिल्लक १० रुपयांनीं जास्त. असें कां व्हावें म्हणून पुन्हा पुन्हा आठवण करून अण्णासाहेब हिशेब तपाशीत होते. पण शिल्लक कां वाढते हें कांहीं समजेना. रात्रीं ११ वाजेपर्यंत अण्णासाहेबांची ही हिशेबतपासणी चालली होती. परंतु हिशेब जमेना म्हणून त्यांचें मन अस्वस्थ होतें. पण सकाळीं उठल्याबरोबर अण्णांकडून पहिली बातमी मिळाली ती ही कीं शिल्लक जमली. त्याचें असें झालें होतें कीं त्यांचे वर्गणीचे पैसे नामदार यशवंतराव चव्हाण ह्यांनीं भरले होते. अण्णासाहेबांनीं ते खर्चीं घातले पण त्यांना दिले नव्हते. त्यांचा हिशेब किती चोख, व्यवस्थित व जेव्हांच्या तेव्हां लिहिलेला असावयाचा ह्याचें हें उत्तम उदाहरण आहे.

माझ्यावर त्यांचें अतिशय प्रेम होतें. त्या प्रेमाला मोजमाप नव्हतें. सारीं वजनें-मापें अपुरीं पडतील, असें निरलस प्रेम ते माझ्यावर करीत. सन १९३१ सालीं मी फारच आजारी होतों. जगण्याची आशा बिलकूल नव्हती. त्या वेळीं त्यांनीं मला मुंबईस नेऊन डॉक्टर तिरोडकरांना

दाखविलें व औषधोपचार केला. पुढें आजारांतून मी पूर्ण बरा झालों. त्याचें सर्व श्रेय अण्णासाहेबांनाच द्यावें लागेल. त्यांनीं माझ्यासाठीं जें केलें तें कोणालाही करतां येण्यासारखें नाहीं. मी त्यांचा आजन्म ऋणी आहें. अशा कितीतरी गोष्टी लिहितां येतील. त्यांनीं ४० वर्षांच्या सहवासांत मला माणुसकी शिकविली, चांगलें मार्गदर्शन केलें, निर्व्यसनी बनविलें आणि मला अत्यंत प्रेमानें बरोबरीच्या नात्यानें वागविलें. त्यांच्या प्रेमाला शेवटपावेतों मी पात्र ठरलों ह्याबद्दल मला नेहमींच अभिमान वाटतो. मीं कांहींही केलें तरी त्यांच्या ऋणांतून मुक्त होणार नाहीं. त्यांच्या पवित्र स्मृतींना माझे शतशः प्रणाम असोत.

**नथोबा त्र्यंबक म्हात्रे**

*वेढी*

## एक सन्मित्र

कै. अण्णासाहेबांच्या व आमच्या घराण्याचा पिढीजाद स्नेहसंबंध असल्यामुळें माझ्या स्वर्गस्थ पिताजींचें अण्णासाहेबांवर नितान्त प्रेम होतें. ह्यामुळें मला अण्णासाहेब आमच्याच घरांतील एक वाटत असत. माझ्या माहितीप्रमाणें ज्या ज्या घराण्यांशीं अण्णासाहेबांचे संबंध प्रेमाचे होते त्या सर्वांसच अण्णासाहेब आपले एक सन्मित्रच वाटत. त्यांच्यांतील सद्गुणांचें व त्यांच्या लोकसेवेचें वर्णन करावें तेवढें थोडेंच होईल. त्यांच्यासारखा सर्वांबद्दल कळकळ बाळगणारा व जनहिताबद्दल सदैव जागरूक राहाणारा कार्यकर्ता क्वचितच पाहावयास मिळतो. त्यांच्यामुळें आमच्या विरार गांवाचें नांव इतिहासांत अमर झालें आहे.

**मनमोहन तापीदास**

*विरार*

## निःपक्षपाती न्यायदाता

"आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन। सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।" हें भगवंतांनीं केलेलें संतांचें वर्णन अण्णासाहेबांना तंतोतंत लागू पडतें. अण्णासाहेब कर्मयोगी होते. त्यांच्या हृदयांत निर्मलता वास करीत होती. उच्च विचार, नैष्ठिक राहाणी व सार्वजनिक कामाची आवड हें त्यांच्या जीवनाचें वैशिष्ट्य होतें. ते जरी न्यायाधिशाच्या एखाद्या जागेवर अधिष्ठित झालेले दिसले नाहींत तरी गरिबांपासून श्रीमंतापर्यंतचे अनेकांचे आपसांतील तंटेबखेडे त्यांच्याकडे अहर्निश यावयाचे व अण्णासाहेबांनीं दिलेला सल्ला अथवा निकाल ते निमूट मानावयाचेच आणि म्हणूनच निःपक्षपातीपणें न्याय देणारा असा अण्णासाहेबांचा लौकिक पसरला होता. त्यांच्या देहावसानानंतर त्यांचा पार्थिव देह विरारला आणला जात असतांना दादर ते विरार पर्यंतच्या हरएक स्टेशनवर व अखेर निवासस्थानीं त्यांच्या दर्शनार्थ अश्रुपूर्ण नयनांनीं जमलेल्या लोकांच्या झुंडी पाहून "Act like god, your homes will be temples" हे मॅझिनीचें वचन अण्णासाहेबांनीं आपल्या आयुष्यांत यथार्थ करून दाखविल्याची प्रचीति आली.

**रामचंद्र बाबाजी जोशी**

*बोळींज*

## थोर नेते

ज्यांच्या विमल चारित्र्याचा, सेवामय व त्यागपूर्ण जीवनाचा, प्रभावी नेतृत्वाचा आणि मार्गदर्शनाचा ठाणें जिल्ह्यांतील चालू पिढीवर सुपरिणाम झाला आहे असे श्री. अण्णासाहेब वर्तक हे ठाणें जिल्ह्याला ललामभूत झालेले थोर नेते होते. ते जसे शरीरानें भव्य तसेच अंतःकरणानें विशाल! त्यांचें वक्तृत्व जसें अमोघ व प्रभावी तसेंच त्यांचें मनही दिलदार व

उदार ! स्वतःच्या सेवेनें, त्यागानें, निःस्वार्थी व निःपक्षपाती वृत्तीमुळें ते जिल्ह्यांतील सर्व पक्षीयांच्या आदरास पात्र होते.

**शां. दा. पाटील**

*माहीम*

## आमच्या जीवनांतील दीपस्तंभ

अण्णासाहेबांनीं आपलें सारें जीवन अगतिकांच्या प्रगतीसाठीं व शेतकऱ्यांनीं सुखी व्हावें म्हणून वेचलें. सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघाचे तर ते एक जनकच होते. ह्या संघाच्या द्वारें त्यांनीं केलेली सेवा अविस्मरणीय ठरली आहे. सर्व लहान थोर कार्यकर्त्यांचें तें एक स्फूर्तिस्थानच होतें. त्यांची सदाचारी राहाणी व ओघवती वाणी त्यांच्या निर्मळ चारित्र्याचें स्पष्ट दर्शन करून देत असे. ते एक कर्मयोगी पुरुष होते. मला तर ते दीपस्तंभाप्रमाणें वाटतात.

**डॉ. यादवराव रामचंद्र ठाकूर**

*शिरगांव*

## लोकनेते

आमच्या गांवच्या प्राथमिक शाळेचे वर्ग कमी होऊं नयेत हें गाऱ्हाणें घेऊन १९२५ सालीं मी अण्णासाहेबांकडे गेलों असतां त्यांच्याशीं परिचय होण्याचा योग आला. त्यांच्या पहिल्या भेटींतच ते एक थोर हृदयाचे व बहुजनसमाजाविषयीं कळकळ वाळगणारे लोकनेते आहेत अशी आमच्या मनावर छाप बसली व ती अखेरपर्यंत कायम राहिली.

त्यांच्याच प्रेरणादायी मार्गदर्शनांतून आमच्या इंग्रजी वर्गांतून आम्ही हायस्कूल काढूं शकलों. माहीम येथील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांतही ते मंत्री असतांना त्यांनीं आम्हांस योग्य तें मार्गदर्शन केलें.

ते जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष व मी त्यांच्या काँग्रेस पक्षाचा एक सभासद होतों. मी एकदा आजारी झालों असतां ते माझ्या घरीं आले व आस्थापूर्वक माझ्या प्रकृतीची चौकशी केली व सूचना केल्या. आपल्या सहकारी कार्यकर्त्यांबद्दल त्यांना किती प्रेम व आस्था वाटत होती हें ह्यावरून दिसून येतें.

**जनार्दन पांडुरंग राऊत**

के. *माहीम*

अनुक्रम ९८३.२५
विभाग ८१ २५१
क्रमांक ६८०३
नों. दि. १२/८/५५

# श्रद्धासुमनाञ्जलिः ।

वन्दे गजाननं देवं शारदां स्फूर्तिदायिनीम् ।
शारदाम्भोजवदनां श्रीरामं कुलदैवतम् ॥ १ ॥

सोमवंशे च क्षात्राणां जातं बुद्धिमतां वरम् ।
वर्तकान्वय–सम्भूतं गोविन्दं लोकसेवकम् ॥ २ ॥

धर्माजितनयं श्रेष्ठं भीमकान्त–गुणैर्युतम् ।
लोकप्रियं च शंसामि सोमवंशविभूषणम् ॥ ३ ॥

आसीत् पुरा 'हिरा' नाम विरारे लोकविश्रुतः ।
धर्मशीलो महाभागः सोमवंशविभूषणः ॥ ४ ॥

धर्माजिस्तनयस्तस्य श्रीमान् शुभ गुणान्वितः ।
सर्वैः सुलक्षणैर्युक्तः कृषिको नीतिकोविदः ॥ ५ ॥

तस्य जातश्च पद्मायां भार्यायां शुभलक्षणः ।
पंचग्रहनवैकेब्दे ख्रिस्ताब्दस्य सुतः सुधीः ॥ ६ ॥

नामाभिधानं पुत्रस्य गोविन्द इति वत्सलः ।
तनयप्राप्तिहृष्टोऽसौ चक्रे प्रेम्णा तदा पिता ॥ ७ ॥

बाल्ये वयसि पुत्रस्य पिता बत दिवं गतः ।
जाताः सर्वे दिशाः शून्याः गोविन्दो हृदि दुःखितः ॥ ८ ॥

स प्रवेशपरीक्षायामुत्तीर्णो गतवान् सुधीः ।
विल्सन्–विद्यालयं तत्र चक्रे विद्यार्जनं तदा ॥ ९ ॥

बी. ए. सुपदवीं प्राप्य कृतवान् लोकसेवकः ।
समाजसेवां, क्षात्राणां संघं स्थापितवान् सुधीः ॥ १० ॥

आत्मारामो मुकुंदश्च सावे–वंश–विभूषणौ ।
कृतवन्तौ संघसेवां सार्धं तेन मनीषिणा ॥ ११ ॥

चुरी परशुरामाख्यो पाटिलो भास्कराभिधः ।
समाजसेवाकार्येऽस्मिन्प्रमुखौ सहकारिणौ ॥ १२ ॥

कृतो विद्याप्रसारश्च समाजे तेन धीमता ।
दृढा संघटना कृत्वा साधितं कार्यमुत्तमम् ॥ १३ ॥
लोकसेवा कृता तेन प्रीतिः सम्पादिता तथा ।
जनानामादरस्थानं प्राप्तं तेन मनीषिणा ॥ १४ ॥
जनताऽर्पितवती तस्मायध्यक्षपदमुत्तमम् ।
'जिल्हाबोर्ड' द्विवारं वै गोविन्दाय मुदान्विता ॥ १५ ॥
महात्मना कृता यत्ना देशस्वातंत्र्य प्राप्तये ।
समयज्ञो महात्मानमन्वगच्छद् विशालधीः ॥ १६ ॥
कारागृहे द्विवारं वै क्षिप्तो भारतसेवकः ।
काव्यशास्त्रविनोदेन कालक्षेपं चकार सः ॥ १७ ॥
अधिकार स्वीकारश्च स्वराष्ट्र सभया यदा ।
कृतो मुम्बापुरीप्रान्ते स्थापितं मंत्रिमण्डलम् ॥ १८ ॥
स्थानिकस्वराज्य संस्थानां गोविन्देन विभूषितम् ।
मन्त्रीपदं कृतं कार्यं लोककल्याण हेतुना ॥ १९ ॥
कृतं समाजकार्यंच राष्ट्रकार्यं कृतं तथा ।
धन्यो 'गोविन्दराव' स्तु 'अण्णासाहेब' संज्ञितः ॥ २० ॥
लोकसेवापरो नेता धीमान् सत्यपरायणः ।
वाग्मी विशालहृदयः शालप्रांशुः स्मिताननः ॥ २१ ॥
दिनेचतुर्दशे मासि सप्तमेच दिवंगतः ।
त्रिपञ्च नवभू संख्ये ख्रिस्ताब्दस्य महामतिः ॥ २२ ॥
सर्वे लोका बभूवुर्वै दुःखशोक समन्विताः ।
संस्मृत्य सद्गुणांस्तस्य गोविन्दस्य मनीषिणः ॥ २३ ॥
पुत्रस्तस्य हरिर्नाम धीमान् विद्यासमन्वितः ।
पितुराचरति प्राज्ञो देशसेवा–कुलव्रतम् ॥ २४ ॥
दिवं गतोऽसौ गोविन्दो लोकसेवापरः सुधीः ।
जनताहृदये किन्तु चिरञ्जीवीति मे मतिः ॥ २५ ॥

कीर्तने कुलसंभवो भास्करसुतो भुवनेशः

## स्वर्गस्थ अण्णांस —

मानव्यांतिल दिव्यता प्रकटली साक्षात् मुखश्रीवरी
सेवाशील विनम्र वृत्ति उजळी स्नेहाळ ती वैखरी
धीरोदात्त विचार उत्कट खुले आचार अन् राहणी
हातीं खेळत संपदा व्यय तिचा केला जनोद्धारणीं.

अज्ञानांध नि मद्यपानव्यसनीं जे रंजले गांजले
दुःखी शेतकरी तसे श्रमजिवी कोणी ऋणी, नाडले
गेले होरपळून जीव सहसा ग्रामीण भागांतले
त्या आजन्म झटूनि कष्टुनि तुवा माणूस केले भले.

तो सत्याग्रह–दिव्यशक्ति फुलवी शांती अहिंसाबला
क्रांती जी नव, रोमहर्षक करी साऱ्याच उर्वीतला.
युद्धीं त्या दिसली तुझ्यांत वसली हर्षें प्रकर्षें अती
श्रद्धा, त्याग, निती अलौकिक तशी जाज्ज्वल्य देशप्रिती.

ये चालून स्वयें 'नकोच' म्हटलें तें थोर मन्त्रीपद
सेवाभावि जनांस कीं क्वचितची जें होय सौख्यप्रद
अन् कर्तव्य म्हणून मन्त्री बनतां राज्यांतुनी हिंडुनी
संस्था स्थानिक सर्वही तगविल्या देऊन संजीवनी.

'शोभे वर्तक हा प्रवर्तक' कुणी 'सन्मित्र' बोले कुणी
वा 'आदर्श समाज सेवक' तुला दे कोण संबोधुनी
अन्तःचक्षुपुढें यशोधवल ती मूर्ती तुझी आणुनी
कार्यें थोर विलोभनीय बघतों पाणावल्या लोचनीं

वसंत नरहर मोगरे

*शिरगांव-पालघर*

*२१-४-५५*

# परिशिष्ट

श्री

येरवडा प्रिझन,
ता. २१-१-४१

श्री. गजाननराव नाईक, चिटणीस, ठाणें जिल्हा लोकलबोर्ड, कॉंग्रेस पार्टी ह्यांस स. न. वि. वि.

आपण श्री. प्रधान, घाटे, भाऊसाहेब परांजपे ह्यांच्यासह ता. २७-१२-४० रोजीं येथें भेटण्यास आलां होतां. जिल्हा लोकलबोर्डाच्या संबंधानें व इतर बाबतींतही भेटीच्या ठरलेल्या वेळांत शक्य ती चर्चा आपण केली. परंतु त्यानें मनाचें समाधान झालें नाहीं. म्हणून महिन्यांतून घरीं दोन पत्रें पाठवितां येतात त्यांपैकीं दुसरें पत्र पाठविण्याचा हक्क आपल्या सर्वांच्या भेटीकरितां बजावण्याची संधि घेतली आहे. अतिस्नेहः खलु पापशंकी. ज्या संस्थेविषयीं आपलें गाढ प्रेम असतें त्या संस्थेविषयीं चटकन् बऱ्यावाईट कल्पना मनांत येऊन जातात. हातास चिकटलेला फणसाचा डिंक चोळून काढावयास लागलें कीं जसा अधिकच चिकटून बसतो तशा बऱ्यावाईट कल्पना मनांत अधिक गुंतागुंत निर्माण करितात. म्हणून जवळ जवळ दोन महिन्यांनीं जिल्हा बोर्डांतील सर्व स्नेही मंडळींची पत्रद्वारें भेट घेण्याचें ठरवून मन मोकळें करीत आहें.

आपल्या पक्षांतील सर्व सभासदांचें पूर्ण सहकार्य मला मिळालें. परंतु पक्षाबाहेरील सभासदांनींसुद्धा तसेंच सहकार्य दिल्यामुळें ठाणें जिल्हा लोकल बोर्डाचा कारभार इतका प्रभावी व कॉंग्रेसची इभ्रत वाढविणारा असा आपणांस करून दाखवितां आला. मी मागें आपल्या पक्षाच्या सभेंत आपणा सर्वांचा निरोप घेतांना हा कारभार एक व्यक्ति कांहीं काल आपल्यांतून दूर झाली तरीसुद्धा आपल्या पक्षाच्या इभ्रतीच्या दृष्टीनें तसाच पुढें आपण सर्वांनीं चालवावा अशी विनंती केली होती आणि मला निरोप देतांना तो तसाच एकसूत्रीपणानें चालविण्याचें मला आपण सर्वांनीं आश्वासन दिलें. एवढेंच नव्हे तर माझ्याविषयीं पूर्ण विश्वास

दाखवून पुढें जरूर लागेल त्या वेळीं अध्यक्षांच्या जागीं कोणाची निवडणूक करावी तें नांव सुचविण्याची कामगिरी माझ्यावरच सोंपविली. गेल्या महिन्यांतील भेटीच्या वेळीं अध्यक्षस्थानीं श्री. नाईक ह्यांची निवडणूक करण्यांत यावी असें श्री. भाऊसाहेब परांजपे ह्यांस मीं सांगितलें. त्याप्रमाणें पक्षांतील सर्व मंडळीसही त्यांनीं कळविलें असेलच. श्री. गणपतराव फडके वगैरे मंडळीही आपल्या निवडणुकीला विरोध करणार नाहीं अशी मी अपेक्षा करतों व ही निवडणूक एकमतानें पार पडेल अशी सदिच्छा व्यक्त करतों. आतांपर्यंत जिल्हा बोर्डातील काँग्रेस पक्षाचे चिटणीस म्हणून मोठ्या आस्थेनें जिल्हा बोर्डाचें काम आपण करीत आलां आहांत. आतां तर प्रत्यक्ष जबाबदारीच आपणांवर पडणार आहे. राज्य ओटघटकेचें असलें तरी ही जबाबदारी आपण उत्तम रीतीनें पार पाडाल अशी माझी पूर्ण खात्री आहे. गेल्या दोन महिन्यांत अध्यक्ष म्हणून सर्व कामाची जबाबदारी श्री. गंगाराम भाऊ माने ह्यांच्यावर पडली आहे. त्यांची नेमणूक उपाध्यक्षांच्या जागीं केली तेव्हां कामाची विशेष जबाबदारी त्यांच्यावर पडणार नाहीं असें मीं त्यांस त्या वेळीं आश्वासन दिलें होतें. परंतु आतां क्रमप्राप्त झाल्यामुळें त्यांच्यावर जबाबदारी सोंपवावी लागली व त्यांनींही ती आनंदानें व जबाबदारीनें पार पाडली असेल अशी मी अपेक्षा करतों. श्री. प्रधानजीसारखे सच्छील वर्तनाचे चीफ ऑफिसर असतांना त्यांना कोणत्याही तऱ्हेची अडचण पडली नसेल असें मला वाटतें. ह्यापुढेंही कोणत्याही प्रकारची अडचण उपस्थित होऊं नये म्हणून एखाद्या बाबतींत मतभेद झाला तर श्री. गंगाराम भाऊ माने ह्यांनीं व आपण श्री. प्रधानजी ह्यांच्या बरोबर खुल्या दिलानें चर्चा करून तो प्रश्न निकालांत काढावा अशी मी प्रेमाची व आग्रहाची सूचना आपणां सर्वांना देत आहें. मतभेद रोगांसारखे आहेत. रोग लपविला, योग्य वेळीं औषध घेतलें नाहीं म्हणजे शेवटीं शस्त्रक्रियेची पाळी येते. माझ्याबरोबर श्री. प्रधानजी ह्यांचें असलेलें नातें अध्यक्ष व चीफ ऑफिसर ह्यांपेक्षांही थोडें निराळें आहे. परंतु दुसऱ्या

कोणत्याही अध्यक्षांबरोबर तत्त्वनिष्ठ राहाणारे प्रधानजी खुल्या दिलानें चर्चा करून आपणां सर्वांचें समाधान करतील असा मला पूर्ण भरंवसा आहे. श्रीयुत घाटे हे तर मागें ठरल्याप्रमाणें एप्रिलनंतर जेवढी हक्काची रजा मिळेल तेवढी लांब मुदतीची रजा घेऊन सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचें आपलें सर्व बाबतींत जमत नसलें तरीही जिल्हा बोर्डाच्या इंजिनिअरिंग खात्यांत त्यांच्या अंगीं असलेल्या प्रामाणिक वृत्तीमुळें त्यांनीं एका तऱ्हेचा दरारा बसविला आहे. त्यांच्या राहिलेल्या थोड्या मुदतींत त्यांना सुखानें निरोप देतां यावा अशी सर्व सभासदांनीं त्यांच्याविषयीं वृत्ति ठेवावी अशी माझी सर्वांस विनंती आहे. श्री. जोगळेकर ह्यांच्यासंबंधानें मागच्या सभेच्या वेळीं आपणां सर्वांना मीं सांगितलें आहेच किरकोळ शरीरयष्टी हा नैसर्गिक दोष वगळला तर अत्यंत श्रम घेऊन आपल्या कामांत दक्ष असणारे असे ते गृहस्थ आहेत. त्यांना पुढें काम करण्याची योग्य संधि आपण द्याल ह्यांत मला शंका वाटत नाहीं. जिल्हा बोर्डाचे अकौंटंट व हेडक्लार्क म्हणून श्री. जोशी हेसुद्धा आपलें काम चोख रीतीनें बजावीत आहेत. कांहीं कांहीं कामांचा भार असह्य झाल्यामुळें आणि अशक्त प्रकृतीला तें न झेपल्यामुळें चिरचिर करतांना ते दिसतात परंतु आपलें काम प्रामाणिकपणानें, दक्षतेनें करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळें जबाबदार जागेवर काम करण्याची पात्रता त्यांनीं सिद्ध करून दाखविली आहे. ह्याशिवाय ज्यांचा उल्लेख करतां येईल अशी श्री. वैद्य, खोपकर आदिकरून कांहीं मंडळी आपल्या ऑफिसांत आहेत. एकंदरींत आपलें जिल्हा बोर्ड हें सध्यां तरी एक सुखी कुटुंब आहे आणि ह्या सुखी कुटुंबाचा कारभार असाच एकोप्यानें चालावा अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आम्हांला पत्र लिहिण्याकरितां कागदाचे दोन कपटे दिले जातात. बारीक लिहिण्याची कला तुमच्यासारखी मला अवगत असती तर आणखी मजकूर लिहितां आला असता. एक कपटा भरून गेला आणखी बरेंच लिहिण्याचें राहिलें आहे. तरी आतां पुढच्या मीटिंगकरितां कांहीं सूचना प्रथमच करीत आहें. त्यांचा शक्यतों स्वीकार करावा.

(१) जिल्ह्यांत नवीन ग्रामपंचायती बऱ्याच स्थापन झाल्या आहेत. त्यांचें अधिकारक्षेत्रही वाढलें आहे. त्यांचा कारभार यशस्वी करून दाखविण्याकरितां चीफ ऑफिसरसारख्यांनीं बोर्डाचें नेहमींचें काम सांभाळून त्यांना वारंवार भेटी दिल्या पाहिजेत. ह्या कामाकरितां दरमहा रु. १०० (शंभर) अगर जो योग्य वाटेल तो कायम भत्ता निदान एक वर्षाकरितां प्रयोगादाखल म्हणून चीफ ऑफिसर ह्यांचा बसविण्यांत यावा. म्हणजे त्यांस जास्त तत्परतेनें काम करतां येईल.

(२) स्कूल बोर्ड बजेटमध्यें शेतकी स्कॉलरशिप्स दरमहा रु. ४ प्रमाणें ४५ स्कॉलरशिप्स देण्याचें ठरवून २१६० ची तरतूद केलेली आहे. दरमहा रु. ४ ही स्कॉलरशिप् अपुरी आहे. करितां त्याऐवजीं दरमहा रु. ५ प्रमाणें रक्कम रु. २१६० मध्यें जेवढ्या स्कॉलरशिप्स बसतील तेवढ्या देण्यांत याव्यात असें श्री. राऊत ह्यांचें म्हणणें आहे व तें बरोबर आहे असें मला वाटतें. तरी श्री. टकले ह्यांस विचारून जरूर तो फेरफार ह्या बाबतींत करणें शक्य असल्यास करावा.

किरकोळ गोष्टी लिहिण्यास लागलों तर जागा पुरणार नाहीं. म्हणून आतां चार शब्द माझ्यासंबंधानें लिहितों. पुण्यांतील व महाराष्ट्रांतील बरीच स्नेहीमंडळी येथें बी क्लासमध्यें असल्यामुळें वेळ मोठ्या आनंदांत जातो. शेजारींच भिंतीच्या आड ए क्लासमध्यें सरदार वल्लभभाई, बाळासाहेब खेर, भुलाभाई देसाई व मुंबई इलाख्याचे माजी प्रधान-मंडळाचे सभासद आहेत. कायदेमंडळाचे सभासदही येथें बरेच आहेत. आमची हल्लींची पुण्याची कायदेमंडळाची नव्हे, कायदेभंगाची बैठक लांब मुदतीची आहे. प्राप्त झालेल्या परिस्थितीशीं समरस होऊन आनंदी वातावरण निर्माण करण्याच्या माझ्या नेहमींच्या वृत्तीमुळें येथें मला कोणत्याही प्रकारें त्रास होत नाहीं. खरोखर मानवी आयुष्य म्हणजे एक दैनिक वर्तमानपत्रच आहे. प्रत्येक दिवस हा त्याचा ताजा अंक. तो उत्सुकतेनें उघडावयाचा आणि चाळावयाचा हें काम सतत चाललेलें असतें. दुसरा दिवस उजाडला कीं पहिला अंक चालला वाण्याच्या रद्दींत.

बहुतेक माणसें आपल्या आयुष्याचा असाच अपव्यय करीत असतात. उधळा मनुष्य कांहीं जमाखर्च ठेवीत नाहीं आणि कधीं आढावा काढीत नाहीं. परंतु तुरुंगांतला आयुष्यक्रम थोडा निराळा आहे. येथल्या आयुष्यक्रमाला एक विशिष्ट वळण लावून घेतां येतें. संध्याकाळीं ६ वाजतां आम्हांला दुसऱ्या कोणाचा त्रास होऊं नये म्हणून खोलीला कुलूप लावून टाकतात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ६॥ वाजण्याच्या सुमारास दरवाजा उघडतात. तेरा तासांच्या अवधींत झोप फार तर ६-७ तास घेतां येते. थोडा वेळ प्रार्थनेंत गेला तरी वाचण्याकरितां ४-५ तास मिळतात. नेहमींच्या घडपडीमुळें राहिलेलें वाचन आधाश्यासारखें संपविण्याची संधिच मिळाली असें मी समजतों. रात्रौ १० वाजेपर्यंत व पहाटे ५ वाजल्यापासून प्रत्येक खोलींत इलेक्ट्रिक लाईट असतो. येथें नेहमींची धावपळ नाहीं. उलट पूर्ण विश्रांति मिळाल्यामुळें आयुष्यांतील झीज भरून काढण्याची संधिच मिळत आहे असें म्हटलें तर त्यांत कोणत्याही प्रकारें अतिशयोक्ति होणार नाहीं. कागदाचा दुसरा कपटा भरत आला. आतां आंवरतें घेणें भाग आहे. आपल्या लोकलबोर्डातील सर्व स्वपक्षीय सहकारी बंधूंना सप्रेम प्रणाम सांगणें. प्रत्येकाचा नामनिर्देश करण्याची इच्छा असून जागेच्या अभावीं तसें करतां येत नाहीं ह्याबद्दल क्षमा असावी. खानसाहेब दिवकर ह्यांस सप्रेम सलाम विदित करणें. श्री. गणपतराव फडके ह्यांस सप्रेम नमस्कार सांगणें. श्री. प्रधानजी, घाटेसाहेब, जोगळेकर, जोशी, वैद्य, दातार आदिकरून ऑफिसच्या सर्व मंडळींस नमस्कार कळविणें. भगवान हवालदार व इतर शिपाई मंडळी ह्यांस प्रेमाचा रामराम सांगणें.

येत्या सभेच्या कामाचा अहवाल जर आपण विरार येथें पाठविला तर पुढच्या पत्राबरोबर तो येथें पाठविण्याची तजवीज होईल. ऑफिशिअली बजेट कॉपी बुक पोस्टानें येथें मीटिंगनंतर तुम्हांस पाठवितां येईल. श्री. प्रधानजी ह्यांस जानेवारी महिन्याच्या अखेरीस ऑफिसच्या कामाकरितां इंटरव्ह्यू घेतां आल्यास अधिक चांगलें होईल. जिल्हा बोर्डाच्या निवड-

णुकी मे महिन्यांत व्हावयाच्या किंवा बोर्डाची मुदत वाढविली आहे तें बोर्डाच्या मीटिंगचा अहवाल देतांना कळविण्याची तसदी घ्यावी. विरार येथें चि. भाऊसाहेब ह्यांस पत्र पाठवून माझें पुढील पत्र त्यांना ता. ३–२–४१ च्या सुमारास मिळेल असें कळविणें. श्री. बाळूनाना दांडेकर, बाबुरावजी पेठे, हरिकृष्ण जोशी, भालूनाना कारूळकर, पजवाणी, जोशी, तात्यासाहेब सामंत, जानोबा राऊत, सखाराम पाटील, बॅ. वडीलाल प्रताप, मंगुशेट चंदुलाल, स्वरूपचंद, नारायण शेट, गंगारामभाऊ माने, पांडु पाटील, बर्वे, नारायण राम पाटील, गर्गे, शिपाई, इत्यादि सर्व सभासद मंडळींस अगत्यपूर्वक माझी आठवण करून द्यावी. कळावें. लोभ असावा. सर्वांचा आहेच. वृद्धिंगत व्हावा ही अपेक्षा. इत्यलम्.

सर्वांचा कृपाकांक्षी,
**गोविंदराव वर्तक**

REFBK-0008574